शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

बी. ए. भाग–३ (राज्यशास्त्र)

सत्र–५ (Major Mandatory (VII) :

राजकीय सिद्धांत (Political Theory)

सत्र–६ (Major Mandatory (X) :

पाश्चात्य राजकीय विचार (Western Political Thought)

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

प्रथमावृत्ती : २०२६

बी. ए. भाग–३ (राज्यशास्त्र)

राजकीय सिद्धांत : सत्र–५

पाश्चात्य राजकीय विचार : सत्र–६

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

प्रती : १२०

■

प्रकाशक

डॉ. व्ही. एन. शिंदे

कुलसचिव,

शिवाजी विद्यापीठ,

कोल्हापूर : ४१६ ००४

■

मुद्रक

श्री. बी. पी. पाटील

अधीक्षक,

शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,

कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-68244-18-4

■ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर–४१६ ००४ (महाराष्ट्र)

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर

■ सल्लागार समिति ■

प्रो. (डॉ.) आर. के. कामत
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रो. (डॉ.) ज्योती जाधव
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रो. (डॉ.) प्रकाश पवार
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रो. (डॉ.) एस. विद्याशंकर
कुलगुरू, केएसओयू
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

डॉ. राजेंद्र कांकरिया
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

प्रो. (डॉ.) सीमा येवले
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २, ११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापुर-४१६००१

डॉ. संजय रत्नपारखी
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विश्वविद्‌यालय,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

प्रो. (डॉ.) कविता ओझा
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रो. (डॉ.) चेतन आवटी
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रो. (डॉ.) श्रीमती व्ही. व्ही. मैंदरगी
प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रो. (डॉ.) एम. एस. देशमुख
प्र. अधिष्ठाता, मानव विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रो. (डॉ.) आर. व्ही. गुरव
प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) ए. बी. साळी
प्र. अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. ए. एन. जाधव
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

श्रीमती सुहासिनी सरदार पाटील
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) पी. एस. पाटणकर
(सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र

अध्यक्ष – **डॉ. प्रकाश रामचंद्र पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. अरुण मारुतीराव चव्हाण**
  भोगावती महाविद्यालय, कुरुकली, जि. कोल्हापूर
- **डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. कराड,
  जि. सातारा
- **डॉ. सचिन महादेव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. विक्रमराव एन. पाटील**
  शंकरराव जगताप आर्टस कॉलेज, वाघोली,
  जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मेघा संजय पाटील**
  कै. मालती व. पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **प्रा. (डॉ.) संतोष केशव खडसे**
  कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. श्रद्धा विनोद कोठावळे**
  सहकारभूषण मा. एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड,
  ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
- **डॉ. राहुल दत्ता मांडणीकर**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. बाळ अनंत कांबळे**
  धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा
- **डॉ. वासंती प्रतापचंद्र रासम**
  घरोंदा ३८४/३८५ आर. के. नगर सोसायटी नं. ५,
  मोरेवाडी, कोल्हापूर
- **प्रा. (डॉ.) अनिल देवगौडा पाटील**
  आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. सिकंदर आप्पासाहेब जमादार**
  राजहंस हौसिंग कार्पोरेशन प्लॉट नं. ०९, विजय नगर,
  इस्ट सांगली मिरज रोड, सांगली
- **प्रा. रमेश दिनकर डुबल**
  किसन वीर महाविद्यालय वाई, जि. सातारा

प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या वंचित राहिलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली.

सदर पुस्तक बी. ए. भाग तीन च्या राज्यशास्त्र विषयाच्या पेपर क्रमांक ७ सत्र पाच साठी 'राजकीय सिद्धांत (MM) आणि पेपर क्रमाक १०. सत्र सहा साठी 'पाश्चात्त्य राजकीय विचार' (MM) हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

सत्र ५ साठी पेपर क्रमांक ७ राजकीय सिद्धांत यामध्ये राकीय सिद्धांत यामध्ये राजकीय सिद्धांत, राजकीय सिद्धातांचे दृष्टीकोन, पेपर क्रमांक १० पाश्चात्त्य राजकीय विचार (MM) यामध्ये प्लेटो, ॲरिस्टाटल, मेक्याव्हेली आणि रूसो यांच्या विचारांचा राजकीय सिद्धांतावरील संकल्पना सत्र ६ साठी पेपर क्रमांक १० राज्याच्या उत्पत्तीचे सिद्धांत या विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे मा. कुलगुरू, मा. प्र. कुलगुरु, मा. कुलसचिव यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश पवार यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व घटक लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक, प्रा. (डॉ.) पी. एस. पाटणकर, दूरशिक्षण केंद्रातील सर्व सहकारी, विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

• संपादक •

प्रा. (डॉ.) अनिल पाटील,
आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

प्र. प्राचार्य, डॉ. श्रद्धा कोठावळे,
सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय,
कुरूंदवाद, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

बी. ए. भाग–३ (राज्यशास्त्र)
सत्र–५ : राजकीय सिद्धांत
सत्र–६ : पाश्चात्य राजकीय विचार

अभ्यास घटकांचे लेखक

लेखकाचे नाव	सत्र ५ घटक क्रमांक	सत्र ६ घटक क्रमांक
डॉ सुर्यकांत गायकवाड, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	१	४
प्रा. (डॉ.) शिवाजी पाटील, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा	२	–
डॉ. खंडेराव खळदकर, जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर, ता. शिरोळ जि. कोल्हापूर	३	–
प्रा. (डॉ.) आण्णासाहेब हरदारे, शिवराज कॉलेज गडहिंग्लज **प्रा. (डॉ.) रविंद्र भणगे,** राज्यशास्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर	४	–
प्रा विजय पानस्कर, बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. पाटण, जि. सातारा	–	१
प्रा. (डॉ.) राहूल मांडणीकर, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक कोल्हापूर	–	२
डॉ आनंदा कांबळे, भोगावती महाविद्यालय कुरुकली, ता करवीर जि कोल्हापूर	–	३

• संपादक •

डॉ. अनिल पाटील,
आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

प्र. प्राचार्य, डॉ. श्रद्धा कोठावळे,
सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय,
कुरूंदवाद, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

अनुक्रमणिका

घटक क्रमांक	घटकाचे शीर्षक	पान क्रमांक
	सत्र – ५ : राकीय सिद्धांत	
१	राजकीय सिद्धांत (Political Theory)	०१
२	राजकीय सिद्धांताचे दृष्टिकोन (Approaches of Political Theory)	१९
३	राज्याच्या उत्पत्तीचे सिद्धांत (Theories of the Origin of State)	५१
४	राजकीय सिद्धांतातील संकल्पना (Concepts in Political Theory)	११९
	सत्र–६ : पाश्चात्य राजकीय विचार	
१	प्लेटो (Plato)	१४७
२	ॲरिस्टॉटल (Aristotle)	१८३
३	मॅकियाव्हेली (Machiavelli)	२११
४	जीन जॅक रूसो (J. J. Rousseau)	२२८

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२६-२७ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक १

राजकीय सिद्धांत

(Political Theory)

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

  १.२.१ राजकीय सिद्धान्ताचे स्वरूप व व्याप्ती

  १.२.२ राजकीय तत्त्वज्ञान आणि राजकीय सिद्धान्त

  १.२.३ राजकीय सिद्धांताचा ऱ्हास, पुनरूज्जीवन व महत्त्व

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१.० उद्दिष्ट्ये :

या प्रस्तुत घटकामध्ये खालील उद्दिष्ट्ये स्पष्ट होतील.

- राजकीय सिद्धांताचे स्वरूप व व्याप्ती समजावून घेणे.
- राजकीय तत्त्वज्ञान व राजकीय सिद्धान्त याच्यातील संबंधाची चर्चा करणे.
- राजकीय सिद्धान्ताचा ऱ्हास व पुनरुज्जीवन याचा आढावा घेणे.
- राजकीय सिद्धान्ताचे महत्त्व स्पष्ट करणे.

१.१ प्रास्ताविक :

राज्यशास्त्र हे प्राचीन सामाजिक शास्त्र आहे. मनुष्यप्राणी एकत्रित समाजजीवन जगत असल्यापासून या शास्त्राचा उगम झाला. काळाच्या ओघामध्ये त्यात अनेक बदल होत गेले व एक सर्वव्यापी राज्यशास्त्र म्हणून उदयास आले. त्यामध्ये राजकीय सिद्धान्त ही एक उपशाखा आहे. एखाद्या विद्याशाखेचा अभ्यास करताना

अनेक तत्त्ववेते सिद्धान्तांची मांडणी करीत असतात. राज्यशास्त्रामध्ये सिद्धान्त हे वेगवेगळ्या अर्थाने वापरण्यात आले आहे. राजकीय सिद्धान्तामध्ये राज्यसंस्थेविषयीचा समावेश केला जातो. राज्यसंस्थेची ध्येये, मूल्य आणि कार्यपद्धती त्याच्यावरून राज्यसंस्थेविषयाचे स्वरूप काय असावे, याविषयी जे वेगवेगळे विचारप्रवाह निर्माण झाले त्यांना राजकीय सिद्धान्त म्हणून ओळखले जाते. जेव्हा ॲरिस्टॉटलने आपल्या ग्रंथाला पॉलीटिक्स हे नाव दिले त्यावरून राज्यकारभाराचे शास्त्र असे ओळखले जाऊ लागले. राज्यशास्त्र म्हणजे राज्याचे शास्त्र असे आर. जी. गेटेल यांनी राज्यशास्त्राची व्याख्या केली आहे. तर राजकीय सिद्धान्त म्हणजे राज्यकारभारसंबंधीचे चिंतन आणि राजकीय प्रश्नाची शिस्तबद्ध शोध घेणे होय. त्यामुळे राजकीय सिद्धान्ताचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

१.२ विषय–विवेचन :

राजकीय सिद्धान्ताचा विचार करण्यापूर्वी सिद्धान्त म्हणजे काय हे पाहणे आवश्यक आहे. थिअरी हा शब्द ग्रीक शब्द थिआ (Thea) या शब्दापासून निर्माण झालेला आहे. Thea म्हणजे दृष्टी किंवा दृश्य पाहणे होय. म्हणजेच जाणून घेण्याची दृष्टी असा अर्थ होतो. सिद्धान्त म्हणजे घटनाचा परस्परसंबंध आणि वास्तवता जाणून घेणारा दृष्टिकोन होय सुसंघटित ज्ञानाच्या आधारे संशोधन करून निष्कर्ष काढले जातात. माहितीचे संकलन आणि विश्लेशण जेवढे अचूक असेल तेवढ्या प्रमाणात निष्कर्षाचा पडताळा येऊन तो सिद्धान्त वास्तववादी व प्रमाणभूत ठरतो.

१.२.१ राजकीय सिद्धान्ताचे स्वरूप व व्याप्ती

मानवाने आपल्या समूह जीवनाचे व संघटनेचे प्रश्न जाणीवपूर्वक समजावून घेण्याचा व सोडवण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे राजकीय सिद्धान्त होय. राजकीय सिद्धान्तामध्ये तत्त्वज्ञान, विचारप्राणाली व विज्ञान यांच्या मूलतत्त्वाच्या आधारे बौद्धिक मांडणी केलेली असते. काळानुसार आणि परिस्थितीनुसार राजकीय सिद्धान्तावर त्या काळातील संस्कृतीचा प्रभाव पडलेला असतो. राजकीय सिद्धान्ताच्या अनेक विचारवंतांनी व्याख्या केल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे आहेत.

सेबाईन यांच्या मते, ''राजकीय सिद्धांत ही एक बौद्धिक परंपरा आहे आणि तिच्या इतिहासात माणसाने काळाच्या ओघात राजकीय प्रश्नावर जे विचार मांडले त्या प्रश्नाची शिस्तबद्ध मांडणी करणे म्हणजे राजकीय सिद्धांत होय.''

ॲन्ड्रयू हॅकर यांच्या मते, ''ज्या तत्त्वज्ञानात्मक आणि शास्त्रीय ज्ञानाच्या संकल्पनामुळे, मग ते केव्हाही आणि कुठेही केलेले असो, आम्ही राहत असलेल्या वर्तमानकालीन आणि भविष्यकालीन जगाविषयीची आमची समजूत वाढते त्यास राजकीय सिद्धांत असे म्हणता येईल.''

डान्टे जर्मिनोच्या मते, ''मानवाच्या सामाजिक अस्तित्वासाठी आवश्यक असणाऱ्या योग्य अशा व्यवस्थेच्या तत्त्वाचा चिकित्सात्मक अभ्यास म्हणजे राजकीय सिद्धांत होय.''

एफ. डब्ल्यू. कोकरच्या मते, ''मानवाच्या कायमस्वरूपी गरजा, अपेक्षा आणि मते या दृष्टिकोणातून राजकीय शासनसंस्था व त्याच्या विभागाचे कार्य याचे मूल्यांकन केले जाते तेव्हा त्या अभ्यासास राजकीय सिद्धांताचे स्वरूप प्राप्त होते.''

वरील सर्व व्याख्यावरून असे दिसून येते की, राजकीय सिद्धान्त मुख्यत: मानवी जीवनातील समस्या सोडवते, मानव हिताच्या दृष्टिकोशातून राज्यसंस्थेचा अभ्यास करणे, त्याचबरोबर राजकीय व्यवस्थेतील प्रश्नाची व्यवस्थित मांडणी करणे म्हणजेच राजकीय सिद्धांत होय.

❑ राजकीय सिद्धांताची वैशिष्ट्ये :

राजकीय सिद्धांताची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. राजकीय सिद्धांत हे मूलत: व्यक्तीच्या बौद्धिक व राजकीय कार्यावर आधारलेले आहेत. कारण एखाद्या व्यक्तीने चिंतन करून जे राजकीय वास्तव स्पष्ट केले आहे किंवा काही संकल्पना स्पष्ट केल्या आहेत, यातूनच राजकीय सिद्धांताची निर्मिती होते. त्यामध्ये प्रामुख्याने प्लेटोच्या रिपब्लिक, ॲरिस्टॉटलच्या पॉलिटिक्स किंवा जॉन रॉल्स याची 'ए थेअरी ऑफ जस्टिस' इत्यादी ग्रंथातून राजकीय सिद्धांताची निर्मिती झाल्याचे दिसून येते.

२. राजकीय सिद्धांतामध्ये व्यक्ती, समाज आणि इतिहासाचा समावेश होतो, कारण एखादा समाज कसे संघटित होऊन काम करतो, त्याचे प्रमुख तत्त्व कोणते आहे. समाजातील प्रश्न कसे सोडवता येतील या सर्व गोष्टींचा विचार राजकीय सिद्धांत करीत असतो.

३. राजकीय सिद्धांत हे एका विशेष विषयावर आधारित आहे. कारण विचारवंतांचा उद्देश केवळ राज्याच्या स्वरूपासंबंधी विचार करीत असतो. परंतु ती व्यक्ती, तत्त्वज्ञ, इतिहासकार, अर्थतज्ज्ञ, धर्मशास्त्रज्ञ किंवा समाजशास्त्रज्ञ असे कोणीही असू शकते.

४. राजकीय सिद्धांताचा उद्देश केवळ राजकीय वास्तवता समजून घेणे एवढेच नाही तर समाज परिवर्तन करण्यासाठी साधने एकत्रित करणे आणि ऐतिहासिक प्रक्रिया संवर्धित करणे हा आहे.

५. राजकीय सिद्धांतामध्ये विचारधाराही समाविष्ट असते. ही विचारधारा विश्वास, मूल्ये आणि विचाराच्या आधारावर निर्माण झालेली असते. राजकीय विचारधारांच्या माध्यमातून राजकीय मूल्ये, संस्था व व्यवहाराची माहिती कळते.

६. राजकीय सिद्धांतातील निष्कर्ष हे तत्त्व आणि व्यवहार यात समन्वय साधून काढलेले असतील तर ते सामाजिक व राजकीय परिस्थितीशी अधिक जुळणारे व सुसंगत ठरतात.

अशा प्रकारे राजकीय सिद्धांताची वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील.

राजकीय सिद्धांताचे स्वरूप :

अॅन्ड्र्यू हॅकरच्या मते, राजकीय तत्त्वज्ञान व राजकीय विचारप्रणाली यांना राजकीय सिद्धांतात महत्त्वाचे स्थान आहे. व्यापक अर्थाने विचार केला तर असे म्हणता येईल की, राजकीय विषयावरील सर्वसाधारणात्मक तत्त्वज्ञान, चिंतन आणि ज्यात तत्त्वज्ञान आहे असे, तसेच विचारप्रणाली व विज्ञान यांच्या मूलतत्त्वाच्या आधारे बौद्धिक मांडणी केलेली असते, असे प्रतिपादन यांचा अंतर्भाव राजकीय सिद्धांतात करता येईल. त्याद्वारे मानवी समाजजीवनाचे व्यावहारिक प्रश्न समजावून घेणे आणि सोडवणे सहज शक्य होते. हॅकरच्या मते, राजकीय संकल्पना आणि राजकीय सिद्धांत यामध्ये फरक असतो. राज्य, सार्वभौम सत्ता, अधिसत्ता, स्वातंत्र्य, समता, न्याय इत्यादी राजकीय संकल्पनांचे स्पष्टीकरण करण्याचे कार्य राजकीय सिद्धांत करीत असतात. संकल्पनांना प्रत्यक्षात आणण्यासाठी राजकीय सिद्धांताचे मार्गदर्शन उपयुक्त ठरते.

सेबाईन यांनी ऐतिहासिक दृष्टिकोनातून राजकीय सिद्धांताचे स्पष्टीकरण केले आहे. सेबाईनच्या मते, राजकीय सिद्धांत म्हणजे माणसाने आपल्या समूह जीवनाचे व संघटनेचे प्रश्न जाणीवपूर्वक समजावून घेण्याचा व सोडवण्याचा केलेला प्रयत्न होय. याचा अर्थ असा की, राजकीय सिद्धांत ही एक बौद्धिक परंपरा आहे आणि तिच्या इतिहासात माणसाने काळाच्या ओघात राजकीय प्रश्नावर जे विचार मांडले त्यांची उत्क्रांती सामावलेली आहे, त्या-त्या काळातील संस्कृतीची छाप तेव्हाच्या राजकीय सिद्धांतावर स्पष्ट उमटलेली असते. पिढ्यान्पिढ्या हस्तांतरित होत जाणाऱ्या संस्कृतीचा राजकीय सिद्धांत हा एक अविभाज्य भाग असतो. सेबाईनच्या मते, राजकीय सिद्धांत म्हणजे राजकारणाविषयीचे किंवा राजकारणाशी प्रस्तुत असलेले सगळेच चिंतन होय.

सेबाईन हे ऐतिहासिक दृष्टिकोनाला महत्त्व देतात. कोणताही राजकीय सिद्धांत हा इतिहासातील विशिष्ट टप्प्यावरच्या विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात मांडलेला असतो. त्यामुळे तो सिद्धांत समजावून घ्यायचा तर त्या विशिष्ट स्थळ काळ परिस्थितीचे संदर्भ मनात उभे करूनच ते केले जाऊ शकते. मात्र हे सिद्धांत भूतकाळातील विशिष्ट घटनेतून निर्माण झाले म्हणून ते भविष्यकाळाच्या दृष्टीने अप्रस्तुत आहे असे म्हणता येणार नाही. राजकीय सिद्धांताची निर्मिती एखाद्या विशिष्ट प्रसंगात किंवा परिस्थितीतून झाली असली तरी त्याचे महत्त्व मात्र त्रिकालाबाधीत असते. ते नेहमीच उपयुक्त व मार्गदर्शक ठरते. त्यामुळे सेबाईनच्या मते, राजकीय सिद्धांताचे हे सार्वत्रिक व त्रिकालबाधित स्वरूपच त्याला आदरपात्र ठरवते. ऐतिहासिक विकासाच्या प्रवाहात विशिष्ट घटितांना ध्यानात ठेवले म्हणजे भविष्यकालीन परिवर्तनाच्या शक्यता अजमावणेही शक्य आहे. त्यामुळे सेबाईनने कोणत्याही राजकीय सिद्धांतात खालील तीन गोष्टही ठळकपणे आढळतात, असे सांगितले आहे.

१. ज्या घडामोडींनी तो सिद्धांत जन्मास घातला त्याची वस्तुनिष्ठ मांडणी

२. स्थूलमानाने ज्यास कार्यकारण संबंध म्हणता येईल त्याचे विवरण.

३. अमूक एक गोष्ट घडावी किंवा घडणे योग्य होईल व इष्ट होईल असे मूल्यात्मक प्रतिपादन.

अशा प्रकारे कोणताही राजकीय सिद्धांत असो, त्यामध्ये वस्तुनिष्ठता, कार्यकारणसंबंध आणि मूल्यमापनात्मक प्रतिपादन या गोष्टींचा समावेश असतो, असे सेबाईन यांचे मत आहे.

राजकीय सिद्धांताचे स्वरूप सुरूवातीचा काळात तत्त्वज्ञानात्मक होते. पूर्वीच्याकाळी तथ्ये आणि मूल्ये यामध्ये फरक मानला जात नव्हता. ॲरिस्टॉटलने राजकीय सिद्धांत व राजकीय कृती यामध्ये फरक केला आहे, परंतु प्लेटोपासून मार्क्सपर्यंत अनेक राज्यशास्त्रज्ञांनी आपल्या लिखाणात तात्त्विक गोष्टींनाच महत्त्व देऊन राजकीय सिद्धांताची मांडणी आपल्या कल्पकबुद्धीने केली. यामुळे विशिष्ट परिणामाकडे जाण्याची त्याची पद्धत शास्त्रीय नव्हती. याउलट ॲरिस्टॉटलने १५८ राज्यघटनांचा वास्तववादी अभ्यास करून काही निष्कर्ष काढले. ॲरिस्टॉटलने सांगितलेले तत्कालीन समाजातील वास्तववादी विचार आजही उपयुक्त व मार्गदर्शक ठरतात. हॉब्ज आणि मॅकेव्हेलीने आपले राजकीय सिद्धांत तत्कालीन परिस्थितीच्या अभ्यासावरून मांडले होते ते त्या काळातील घटनाचे कार्यकारण संबंध दर्शविणे त्यादृष्टीने त्यांनी मांडलेले राजकीय सिद्धांत आजही महत्त्वपूर्ण ठरतात. आधुनिक काळात राज्यशास्त्रज्ञांनी राजकीय घटना व त्यांचा परस्परसंबंध निश्चित करून शास्त्रीय निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यामुळे विसाव्या शतकातील राजकीय सिद्धांताला मूल्यनिरपेक्षतेच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झाले. मूल्यनिरपेक्ष दृष्टीनेच आधुनिक राज्यशास्त्रज्ञांनी राजकीय सिद्धांताची मांडणी केली. अवलोकन, निरीक्षण, मुलाखती, सर्वेक्षण, मापन या पद्धतीचा अवलंब करून आधुनिक काळात राजकीय सिद्धांत मांडण्यात आले.

वरील सर्व विवेचनाच्या अनुषंगाने राजकीय सिद्धांताचे स्वरूप खालीलप्रमाणे सांगता येईल.

१. राजकीय सिद्धांत हे अनुभवावर आधारलेले असतात, कारण अनुभवाद्वारे प्राप्त होणारे ज्ञान हेच खरे ज्ञान होय.

२. राजकीय सिद्धांत मानवी जीवनापुढे निर्माण झालेले प्रश्न सोडविण्याचे कार्य करतात. समाजाच्या राजकीय जीवनाचे तात्कालिक व संभाव्य प्रश्न इतरांपेक्षा चटकन पाहणे आणि इतरांपेक्षा त्याचे अधिक सखोल विश्लेषण करणे, हे राजकीय सिद्धांताचे कार्य आहे.

३. राजकीय सिद्धांत हे राजकीय विचारप्रणालींना जन्म देतात. उदा. मार्क्सने मांडलेल्या सिद्धांतातून माक्सवादी विचारप्रणाली अस्तित्वात आल्याचे दिसून येते.

४. राजकीय सिद्धांत हे सुव्यवस्थित परस्परसंबंध व तर्कशुद्धरित्या मांडलेले असतात.

५. राजकीय सिद्धांत हे सद्यपरिस्थितीचा अभ्यास करतात आणि भविष्यातील समाजाच्या विकासाचा विचार करतात.

६. राजकीय सिद्धांत एखाद्या प्रश्नाचे निराकरण करीत असताना अनुभवलेली गोष्ट व्यवस्थितरित्या मांडणे, त्याचे विश्लेषण करणे व त्याचे मूल्यमापन करणे ही कार्ये करतात.

अशा प्रकारे राजकीय सिद्धांताच्या स्वरूपासंबंधी मुद्दे मांडता येतील. कारण आधुनिक काळातील राजकीय सिद्धांताला राजकीय विश्लेषण असेही म्हटले जाते. राजकीय सिद्धांत हे आदर्शवादी तत्त्वज्ञानात्मक आणि मूल्याधिष्ठीत होते ते स्वरूप विसाव्या शतकात बदलले आणि राजकीय सिद्धांताला अनुभववादी, मूल्यनिरपेक्षता याची जोड लाभली, त्यामुळे जुन्या राजकीय सिद्धांताचे पुनरुज्जीवन झाले आहे, असे डान्ट म्हणतो.

राजकीय सिद्धांताची व्याप्ती :

हेन्री मेयो यांनी राजकीय सिद्धांताची व्याप्ती पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट केली आहे.

१) विचारप्रणालीचे अध्ययन :

प्रत्येक राजकीय विचारप्रणाली ही विशिष्ट राजकीय सिद्धांत आणि तत्त्वज्ञान सांगते. त्याचबरोबर प्रत्येक राजकीय व्यवस्था ही कोणत्यातरी राजकीय विचारप्रणालीने प्रभावित झालेली असते. यांचा अभ्यास राजकीय सिद्धांताद्वारे केला जातो. उदा. हुकूमशाही, लोकशाही, सामंतशाही, साम्यवाद, उदारमतवाद, राष्ट्रवाद इत्यादी भारतातील राजकीय व्यवस्था लोकशाही, समाजवादी, धर्मनिरपेक्ष या विचारप्रणालीवर आधारित आहे. अमेरिकेच्या अध्यक्षीय लोकशाहीत भांडवलशाही विचारप्रणालीचा प्रभाव पडलेला आहे. या सर्व गोष्टीचा अभ्यास राजकीय सिद्धांतात केला जातो.

२) अभिजात राजकीय वाङ्मयाचे अध्ययन :

विविध राजकीय विचारवंतांनी आत्तापर्यंत केलेले अभिजात राजकीय वाङ्मयाचे अध्ययन करणे आवश्यक आहे. कारण प्रत्येक राजकीय व्यवस्था म्हणजे गतकालीन इतिहासाचा आणि घडलेल्या घडामोडींचा इतिहास आहे. त्यामुळे भूतकाळातील घटना वर्तमानकाळातील परिस्थितीचा अभ्यास करून ह्या सिद्धांताच्या आधारे भविष्य कथन करता येते. उदा. प्लेटो, ॲरिस्टॉटल, मॅकियाव्हेली हॉब्ज, लॉक, रूसो, मार्क्स इत्यादी विचारवंतांनी जे काही ग्रंथ लिहिले आहेत, त्या ग्रंथांचा अभ्यास केला आहे तो अभ्यास योग्य किंवा अयोग्य आहे, याचा विचार तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात करून वर्तमानकालीन परिस्थितीशी तुलना करून अशा राजकीय वाङ्मयाचा बोध घेण्यास आपणास राजकीय सिद्धांत मदतनीस ठरतो.

३) राजकीय व्यवस्थांचे अध्ययन :

राजकीय सिद्धांत एखाद्या विशिष्ट राजकीय व्यवस्थेचे स्पष्टीकरण व समर्थन करीत असतो. राजकीय व्यवस्थांचा अभ्यास केला असता विविध राजकीय सिद्धांताचे ज्ञान होऊ शकते. उदा. साम्यवाद हा सोव्हिएट रशिया आणि साम्यवादी चीनच्या राजकीय व्यवस्थेचे समर्थन आणि स्पष्टीकरण करतो. राजकीय व्यवस्थांच्या अभ्यासामुळे राजकीय सिद्धांत आणि त्या राष्ट्रातील प्रत्यक्ष वस्तुस्थिती याचे आकलन करतो. थोडक्यात, एखादा राजकीय सिद्धांत आणि त्याची त्या देशातील ऐतिहासिक पार्श्वभूमी समजावून घेण्यासाठी राजकीय व्यवस्थाचा अभ्यास उपयुक्त व मार्गदर्शक ठरतो.

४) अनुभवप्रामाण्य संशोधन :

तथ्यसंकलन व विश्लेषण करून संकल्पनाचे संकलन करणे आणि राजकीय सिद्धांत मांडणे हे कार्य राजकीय सिद्धांत करतो. संशोधन पद्धतीचा वापर करून राजकीय संकल्पनांचे जेव्हा विश्लेषण केले जाते तेव्हा त्या संशोधनातून काही राजकीय निष्कर्ष व सिद्धांत मांडले जातात. कल्पनांवर आधारलेले आणि वास्तववादावर आधारलेले सिद्धांत कोणते यांचे मूल्यमापन संशोधन पद्धतीद्वारे होत असते. तरीही संशोधन पद्धतीमध्ये मूल्यव्यवस्थेला अधिक महत्त्व देवून चालणार नाही तर मूल्याची चिकित्सा करून त्याचे व्यवहारातील महत्त्व विचारात घ्यावे लागते. डेव्हिड ईस्टन, हेन्री मेयो, चार्लस मेरियम यांच्या मते, संशोधनामध्ये सामाजिक वास्तवतेला अधिक महत्त्व दिले पाहिजे. थोडक्यात, संशोधन करताना निष्कर्षाच्या आधारावर पडताळून पाहणे आणि त्याद्वारे अनुभवप्रामाण्य ज्ञान प्राप्त करणे हा राजकीय सिद्धांताचा एक भाग आहे.

अशा प्रकारे वरील मुद्यांच्या आधारे राजकीय सिद्धांताची व्याप्ती स्पष्ट करण्यात आली आहे.

❑ राजकीय सिद्धांताचा विकास :

राजकीय सिद्धांताची वाटचाल पाहताना आपणास असे सांगता येते की, सिद्धांताचा इतिहास प्राचीन ग्रीक वाङ्मयातून निर्माण झाला आहे. प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांनी न्यायव्यवस्था स्थापन करण्यासाठी आणि व्यक्तींना उत्तम जीवन देण्यासाठी राज्याची कार्ये आहेत, अशी भूमिका मांडली आहे. त्याचबरोबर ॲरिस्टॉटलने १५८ नगरराज्यांच्या राज्यघटनांचा तुलनात्मक पद्धतीने अभ्यास करून आदर्श राज्याची कल्पना किंवा सिद्धांत मांडला आहे. त्यामुळेच त्यांना राज्यशास्त्राचे जनक असे म्हटले आहे. त्यानंतर म्हणजे जवळपास पंधराव्या शतकापर्यंत असे राजकीय सिद्धांत व्यवस्थितरित्या मांडण्यात आले नाहीत. सोळाव्या शतकात युरोपमध्ये ज्ञानाच्या पुनरुज्जीवनाचा कालखंड सुरू झाला आणि विवेकनिष्ठेचे युग सुरू झाले. त्यामुळे राज्याच्या विकासाला चालना मिळाली. या काळात हॉब्ज, लॉक, रुसोनी सामाजिक करार सिद्धांत मांडला. त्यामध्ये प्रामुख्याने वैज्ञानिक पद्धतीचा, गणितीय पद्धती, काहीनी तार्किक पद्धतीचा स्विकार करून राजकीय सिद्धांत मांडले. परंतु त्यांनी काढलेले निष्कर्ष वस्तुस्थितीशी विसंगत, काल्पनिक असे ठरले. त्यामुळे सोळाव्या आणि सतराव्या शतकात मांडलेले सिद्धांत शास्त्रशुद्ध नव्हते.

एकोणिसाव्या शतकात राजकीय सिद्धांताच्या विकासाला विशेष चालना मिळाली, कारण त्या काळात औद्योगिक क्रांती, फ्रेंच राज्यक्रांती इत्यादी घटना घडल्या होत्या. त्यातूनच नवनवीन राजकीय संकल्पना आणि सिद्धांत उदयाला आले. त्यामध्ये प्रामुख्याने राज्य, शासनाचे स्वरूप, शासनाची उद्दिष्टये, कार्य व आदर्श याचा समावेश होतो. यामध्ये गृहीते, प्रमेये, इतिहासाचा अर्थ लावून निष्कर्ष मांडण्याची पद्धती आणि शास्त्रशुद्धतेचा स्वयंसिद्ध आधार यावर भर देण्यात आला. विसाव्या शतकात राजकीय सिद्धांत मांडण्याच्या पद्धतीमुळे आमूलाग्र बदल झाला, कारण पहिल्या महायुद्धामुळे निर्माण झालेली भीषणता हे आहे. या सिद्धांतानी पाश्चात्याच्या राजकीय जीवनाला अभिप्रेत असलेली मूल्ये नाकारली. सैद्धांतिक विश्लेषणाऐवजी राजकीय जीवनाला अभिप्रेत असलेली मूल्ये नाकारली. सैद्धांतिक विश्लेषणाऐवजी राजकीय जीवनातील विविध

माहितीचे संकलन करणे, मूल्याची चर्चा न करता वस्तुस्थितीचे परिक्षण करणे त्या आधारावर संशोधन करणे संशोधनाच्या नवीन पद्धती आणि तंत्रे स्विकारून सिद्धांत मांडण्यावर भर दिला. थोडक्यात, विसाव्या शतकातील विचारवंतांनी राजकीय जीवनातील प्रक्रियाचे निरीक्षण, संशोधन, निष्कर्ष या मार्गांनी कार्य सुरू केले. त्यामुळे नव्या राजकीय सिद्धांताची निर्मिती होऊ शकली नाही. १९६० च्या नंतर रचना आणि व्यवहारनिष्ठ उपयोग त्याच्या संतुलनावर भर देऊन राजकीय सिद्धांत मांडण्यात आले. ही वाटचाल संथगतीची आणि उपयुक्त ठरली. या सिद्धांताच्यामध्ये कल्पनारम्य चित्र रंगविण्याचे नाकारले. डेव्हीड ईस्टन यांनी नव्या सिद्धांत रचनेला अधिक महत्त्व दिले पाहिजे, अशी आग्रही भूमिका मांडली. वस्तुनिष्ठ माहितीचे संकलन करणे, वैयक्तिक मताचा त्याग करणे, तटस्थ वृत्तीने निष्कर्ष काढणे, निष्कर्षाचा पडताळा घेणे, राजकीय जीवनातील विविध प्रक्रियांचा शोध घेणे, राजकीय प्रभाव आणि त्याचा सत्ताकेंद्रावर होणारा परिणाम पाहणे या मानवी राजकीय पैलूवर भर दिला आणि राजकीय सिद्धांत रचनेला व्यापक आधार मिळवून दिला. हे भविष्य काळातील सिद्धांत रचनेला आधारभूत व मार्गदर्शक ठरू शकेल असे वाटते.

१.२.२ राजकीय तत्त्वज्ञान आणि राजकीय सिद्धान्त :

राजकीय तत्त्वज्ञान आणि राजकीय सिद्धांत या दोन्ही संकल्पना बऱ्याच वेळा एकाच अर्थाने वापरल्या जातात. परंतु त्या संकल्पना वेगळ्या असून ते एकमेकास पूरक आहेत. राजकीय तत्त्वज्ञान म्हणजे राजकीय बाबीचे स्वरूप आणि योग्य व उत्तम राजकीय व्यवस्थेबद्दलचे ज्ञान होय. तर राजकीय सिद्धांत हे मानवाने आपल्या समूह जीवनाचे व संघटनेचे प्रश्न जाणीवपूर्वक समजावून घेण्याचा व सोडवण्याचा केलेला प्रयत्न होय. या दोन्ही संकल्पना एकमेकांपासून वेगळ्या करता येत नाहीत. कारण राजकीय सिद्धांतामध्ये राजकीय तत्त्वज्ञानाचा अंतर्भाव होतो आणि चांगला राजकीय सिद्धांत केवळ शास्त्रशुद्ध असून चालणार नाही तर त्यामध्ये तत्त्वज्ञानाची बैठक हवी असते. उपलब्ध ज्ञानाच्या चौकटीत कोणत्याही प्रश्नाची चिकित्सा करून तत्त्वज्ञान कधीच थांबत नाही. तर त्याच्या पलीकडे जाऊन त्या प्रश्नांची उत्तरे शोधीत असते. राजकीय व्यवहार कसा चालावा, त्याचे कोणते ध्येय असावे, समाजाचे राजकीय आदर्श कोणते असावे, याचा विचार करणे व राजकीय संकल्पनांचे तार्किक विश्लेषण करणे हा राजकीय तत्त्वज्ञानाचा उद्देश असतो. तत्त्वज्ञान हे चिंतनात्मक असल्यामुळे व्यक्तीपरत्वे व स्थलकालपरत्वे त्याचे स्वरूप वेगळे असू शकते त्याचा उपयोग त्या त्या काळातील मानवी जीवन समजावून घेण्यासाठी होतो. परंतु कालांतराने ते तत्त्वज्ञान कालबाह्य ठरू शकते. राजकीय तत्त्वज्ञानाचा वास्तव जीवनापेक्षा आदर्श विचारावरच जास्त भर असतो. असे असले तरीही त्याची मौलिकता मात्र कमी होत नाही. राजकीय तत्त्वज्ञानाच्या आधारावर राजकीय सिद्धांताची निर्मिती होऊ शकते.

राजकीय सिद्धांत म्हणजे केवळ तत्त्वज्ञान नव्हे कारण राजकीय सिद्धांताचा वापर हा शास्त्रीय अर्थाने केला जातो. स्पष्टीकरण करण्याच्या उद्देशाने सिद्धांताची रचना केली जाते. राजकीय सिद्धांत हे राजकीय वास्तवावर आधारलेले असतात. राजकीय स्थितीचा अभ्यास करून माहिती संकलीत केली जाते. त्याच्या आधारे विविध घटकामधील परस्परसंबंध स्पष्ट केला जातो आणि सार्वजनिक स्पष्टीकरणातून नियम तयार होतात. ते नियम

म्हणजेच राजकीय सिद्धांत होय. राजकीय सिद्धांतामध्ये सार्वत्रिक निष्कर्ष काढले जातात. राजकीय सिद्धांताची मांडणी करताना तत्त्वज्ञानाचा, विचारप्रणालीचा आणि विज्ञानाचा अधार घेतला जातो. त्यामुळे राजकीय सिद्धांत हे भविष्यकालीन प्रश्न सोडवण्यासाठी मार्गदर्शक ठरतात. त्यामुळे राजकीय सिद्धांत हे कधीच कालबाह्य होत नाहीत त्यामुळे राजकीय सिद्धांताचा विचार करताना प्लेटो, ॲरिस्टॉटलपासून मार्क्स, मिल आणि लास्कीपर्यंतच्या राजकीय विचारवंतांचे ग्रंथ अभ्यासणे आवश्यक ठरते. प्लेटोनी अनेक राजकीय विचार मांडले आहेत. त्यात प्रामुख्याने प्लेटोनी आदर्श राज्य, तत्त्वज्ञ राजा, स्त्रियांचा व संपत्तीचा साम्यवाद इ. तत्त्वज्ञानाची मांडणी केली आहे. ॲरिस्टॉटलने १५८ राज्यघटनाचा वास्तववादी अभ्यास केला. त्यांनी मांडलेले तत्कालीन समाजातील वास्तववादी विचार आजही उपयुक्त व मार्गदर्शक ठरतात. ॲरिस्टॉटलने शासनाचे चांगले व विकृत प्रकार सांगितले आहेत. क्रांतीविषयीची कल्पना स्पष्ट केली आहे. हॉब्ज, लॉकपासून लास्कीपर्यंत सर्वांनी वेगवेगळे राजकीय तत्त्वज्ञान मांडले आहे. त्यावर अनेक सिद्धांतही निर्माण झाले आहेत. त्याचबरोबर राजकीय संकल्पना या राजकीय तत्त्वज्ञानातून निर्माण झाल्या आहेत. राज्य, राष्ट्र सार्वभौमत्त्व या संकल्पनांना वास्तववादी रूप प्राप्त झाले की, त्यांनी सैद्धांतिक स्वरूप प्राप्त होते. आदर्शवाद, साम्यवाद, फॅसिस्टवाद, लोकशाही, समाजवाद, उदारमतवाद असे कोणतेही राजकीय सिद्धांत विचारात घेतले तर ते कोणत्या ना कोणत्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करण्यासाठी तयार झालेले आहेत. म्हणून राजकीय तत्त्वज्ञान व राजकीय सिद्धांत हे एकमेकास पूरक व पोषक आहेत.

आधुनिक काळात मात्र राजकीय तत्त्वज्ञान व राजकीय सिद्धांत यात फरक करण्याचा प्रयत्न झाला. कारण राजकीय तत्त्वज्ञानी फक्त तत्त्वांना व मूल्यांना महत्त्व देत राहिले. प्रत्यक्ष वस्तुस्थितीचा विचार केला जात नव्हता. सोव्हिएत रशियामध्ये साम्यवादी राजवट ७० वर्षानंतर विस्कळीत झाली. त्याचे कारण कोणते याचा विचार करताना मार्क्सवादी तत्त्वज्ञानाबरोबर रशियातील प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. तर लोकशाही व्यवस्था अंमलात आणताना स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या समान मूल्याची तात्त्वीक बाजू महत्त्वाची आहेत म्हणून चालणार नाही तर ती मूल्ये कोणत्या देशात स्विकारणार आहेत त्या देशातील वस्तुस्थिती समजून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे राजकीय सिद्धांताला राजकीय तत्त्वज्ञानाची बैठक असावी लागते. राजकीय तत्त्वज्ञान हे राजकीय सिद्धांताची पार्श्वभूमी तयार करीत असते आणि त्यावरच राजकीय सिद्धांत निर्माण होतात. थोडक्यात, राजकीय तत्त्वज्ञान आणि राजकीय सिद्धांत हे परस्परांना पूरक व पोषक असतील तरच ते सिद्धांत कालबाह्य न होता टिकून राहतात आणि राजकीय व्यवस्था कार्यरत राहते.

१.२.३ राजकीय सिद्धांताचा ऱ्हास, पुनरुज्जीवन व महत्त्व :

विसाव्या शतकाच्या सुरवातीस साम्राज्यवाद आणि वसाहतवाद प्रभावी होता. त्यातून पहिल्या महायुद्धाचा उदय झाला. यामध्ये जर्मनी, ऑस्ट्रिया व तुर्कस्थान यांनी इंग्लंड आणि फ्रान्सच्या सत्तेला आव्हान दिले. त्यात जर्मनीचा पराभव झाला. याच काळात रशियामध्ये १९१७ साली बोल्शेविक क्रांती झाली आणि लेनिनच्या नेतृत्त्वाखाली नव्या समाजवादी सोव्हिएत राज्याचा उदय झाला. त्यानंतर समाजवाद कशा रीतीने स्थापन करावा

याबाबत विचारमंथन सुरू झाले. त्यामध्ये प्रामुख्याने लेनिन, स्टॅलिन, ट्रॉटस्की यांचा समावेश होतो. दुसरीकडे १९२३ साली फ्रँकफर्ट येथे 'फ्रँकफर्ट स्कूल ऑफ क्रिटीकल थेअरी'ची स्थापना झाली. १९३९-४५ या काळात दुसरे महायुद्ध झाले. त्यामध्ये जर्मनी, इटली व जपान यांचा पूर्ण पराभव झाला आणि इंग्लंड व अमेरिका यांनी हे युद्ध जिंकले. या युद्धानंतर महासत्ता म्हणून इंग्लंडची जागा अमेरिकेने घेतली. राज्यशास्त्रात ही अमेरिकन राज्यशास्त्रज्ञांनी पुढाकार घेतला आणि विकासाच्या राजकारणाचे निकष वापरून तौलनिक राजकारण ही अभ्यासाची नवी शाखा जन्मास घातली. कारण अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांत्या झाल्या, त्या काळात राजकीय सिद्धांताची भूमिका व हेतू पूर्णपणे बदलले होते. राजकीय विचारवंतांनी समाजात बदल करण्याचे व विकासाचे मार्ग सांगावेत ही भावना जनतेमध्ये दृढ झाली होती. एकूणच दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेमध्ये सर्व सामाजिक शास्त्रांपेक्षा राज्यशास्त्र हे वैज्ञानिक पद्धती स्वीकारण्यात मागे आहे, तेथे अजून इतिहास, तत्त्वज्ञान व नीतीशास्त्र यावर जास्त भर दिला जातो, त्यामुळे प्रत्यक्ष राजकारणाचा, राजकीय प्रक्रियेचा योग्य अभ्यास होत नाही असे आक्षेप घेण्यात आले. डेव्हीड ईस्टनने वर्तनवादी क्रांतीचा उद्‌घोष केला आणि आल्मंड आणि पावेल यांनी रचनात्मक कार्यवादाचा वापर करून राजकीय व्यवस्थेचे विकासवादी प्रतिमान मांडले. या सर्व कारणामुळे आदर्शवादी विचार हे सद्य:स्थितीत उपयोगी नाहीत, असा विचार अनेक विचारवंतांनी मांडला. राजकीय सिद्धांताचे आता प्रयोजन उरलेले नाही, म्हणून अनेक विचारवंतांनी राजकीय सिद्धांताचा ऱ्हास झाला आहे, अशी घोषणा केली.

पीटर लास्लेट यांनी 'फिलॉसॉफी, पॉलिटिक्स अँड सोसायटी' या संपादित ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत राजकीय सिद्धांत आता मृत झाले आहे, राजकीय सिद्धांत चिरायू होवो अशी घोषणा करून टाकली. कारण प्लेटोपासून राजकीय सिद्धांताची मांडणी करण्यास सुरुवात झाली व ते मार्क्स, मिलनंतर संपले त्याचा शेवटचा प्रतिनिधी म्हणून हेरॉल्ड लास्की यांना मानले जाते. लास्कीच्या 'ग्रामर ऑफ पॉलिटिक्स' नंतर राज्यशास्त्राचे कोणतेच पुस्तक प्रकाशित झाले नव्हते. डेव्हीड ईस्टन आणि आलमंड कॉबन यांनी राजकीय सिद्धांताचा ऱ्हास झाला आहे, असे म्हटले तर लास्लेट व रॉबर्ट डहाल यांनी राजकीय सिद्धांत मृत पावल्याची घोषणा केली. परंतु राजकीय सिद्धांत १९७०-७१ च्या दशकात पुनरुज्जीवन झाले, त्यामुळे लास्लेट यांनी आपल्या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीत त्याचे राजकीय सिद्धांत मृत पावल्याचे म्हणणे मागे घ्यावे लागले.

❑ राजकीय सिद्धांताच्या ऱ्हासाची कारणे :

डेव्हिड ईस्टनच्या मते, राजकीय सिद्धांताच्या ऱ्हासाची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) इतिहासवाद :

डेव्हीड ईस्टनच्या मते, डनिंग, सेबाईन, मॅक्सिवेन, लिंडसे आणि ऐलन या राजकीय विचारवंतांनी भूतकाळातील राजकीय विचारांचा अभ्यास करण्यातच अधिक वेळ खर्ची घातला. त्यांनी नवे सिद्धांत मांडून त्याचे विश्लेषण करण्याऐवजी समकालीन आणि भूतकालीन मूल्याचा अर्थ, अंतर्गत सुसंगती व ऐतिहासिक विकासक्रम याबद्दलची माहिती गोळा करण्यातच धन्यता मानली. काही अभ्यासकांनी संस्था आणि राजकीय

विचाराचा ऐतिहासिक आढावा घेतला तर काहींनी त्याची वाटचाल कशा रितीने झाली, याचा अभ्यास केला. एकूणच सर्व अभ्यासकांनी ऐतिहासिक दृष्टीकोणानेच विचार केला. त्यात बार्कर आणि लास्की यांचे अपवाद सोडले तर सर्व राजकीय विचारवंत केवळ इतिहासकार झाले आहेत, असे म्हटले जाऊ लागले. त्यामुळे इतिहासवाद हे राजकीय सिद्धांताचे ऱ्हास होण्यास कारणीभूत घडले.

२) नैतिक सापेक्षतावाद :

ह्युम, वेबर, मार्क्स इ. विचारवंतांनी तथ्ये व मूल्ये यांना एकमेकांपासून वेगळे करण्याचा प्रयत्न केला. मॅक्स वेबरने अनुभववादी संशोधनामध्ये मूल्यांना स्थान दिले नाही. त्यामुळे अनेक विचारवंतांनी मूल्यनिरपेक्षतेचा आग्रह धरला. परंतु व्यक्तीच्या व समूहाच्या जीवनानुभवातून त्यांचे अग्रक्रम तयार होतात आणि त्या अग्रक्रमाचा आविष्कार म्हणजे त्यांची मूल्ये असतात. एका कालखंडातील मूल्ये दुसऱ्या कालखंडात लागू करता येत नाही, त्यामुळे तसे करणे व्यर्थ आहे. त्यामळे विसाव्या शतकात नैतिक सापेक्षतावादी विचारवंतांनी या जुन्या मूल्यांचा चिकित्सकरित्या अभ्यास करून नव्याने पुनर्बांधणी करण्याचा प्रयत्न केला नाही, त्यामुळे नैतिक सापेक्षतावाद राजकीय सिद्धांताचा ऱ्हास होण्यास कारणीभत ठरला.

३) विज्ञान व सिद्धांत यातील विसंगतपणा :

२० व्या शतकाच्या सुरुवातीपासून राज्यशास्त्रज्ञ हे विज्ञानाला सिद्धांत समजू लागले. सिद्धांत हा विज्ञानाच्या पलीकडे जाणारा असतो याचे त्यांना विस्मरण झाले, त्यामुळे पारंपारिक राजकीय सिद्धांत मागे पडले, कारण तथ्याचे संकलन करणे आणि त्या आधारावर राजकीय संस्था व प्रक्रिया सुधारण्याचे उपाय सुचवणे हे त्यांनी आपले कार्य मानले. हे कार्य शास्त्रीय असले तरी त्यातून आपोआप सिद्धांत हाती घेणे शक्यच नव्हते. संस्थांपेक्षा हेतू आणि प्रेरणा तपासणे महत्त्वाचे असले तरी सिद्धांत निर्मितीसाठी मात्र ते पुरेसे नाही, त्यामुळे विज्ञान आणि सिद्धांत याचे आकलन चुकीचे होते.

४) अतितथ्यता :

सिद्धांताला अनुभववादाची जोड देण्याच्या हव्यासापोटी तथ्यसंकलनाला प्राधान्य देण्यात आले व सिद्धांताचे स्थान दुय्यम झाले आणि कालांतराने सिद्धांत मागे पडले. तथ्य संकलनाची कार्यक्षम तंत्रे शोधण्यात राज्यशास्त्राने बरीच प्रगती केली. परंतु प्रत्यक्ष राजकारणाचा समग्र वेध घेण्याची साधने मात्र ते हरवून बसले. अशा प्रकारे सिद्धांताअभावी तथ्यसंकलन निरर्थक ठरले.

५) वास्तववादी मूल्ये आणि संकल्पनाचा अभाव :

आल्फ्रेड कॉबन यांच्या मते, आधुनिक जगामध्ये राज्याच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे सर्वच क्षेत्रात नोकरशाहीचे वर्चस्व निर्माण झाले. त्याचबरोबर जगात सामर्थ्यशाली लष्करी यंत्रणा उभ्या राहिल्या. ही परिस्थिती राजकीय चिंतनाला मारक ठरली. कारण पूर्वी होऊन गेलेल्या राजकीय विचारवंतांनी वास्तवाची जाणीव ठेवून प्रत्यक्ष राजकीय संस्थाचा पुरस्कार किंवा निषेध केला होता. परंतु आधुनिक राजकीय विचारवंतांनी वास्तववादी परिस्थितीशी जुळणाऱ्या राजकीय मूल्याची किंवा संकल्पनांची निर्मिती केली नाही.

नैतिक तटस्थता आणि शास्त्रीय पद्धतीचे अनुकरण स्विकारल्यामुळे राजकीय सिद्धांताचे मूल्यांकन व परीक्षण करता आले नाही. कारण आधुनिक विचारवंत नैसर्गिक शास्त्राच्या अभ्यास पद्धती जशास तशा आपल्या विषयाला लागू करण्यातच धन्यता मानू लागले होते. त्यामुळे राजकीय सिद्धांताच्या ऱ्हासास वास्तववादी मूल्ये व संकल्पनेचा अभाव हे एक कारण ठरले.

६) विचारप्रणाली :

दान्ते जर्मिनोसारखा अभ्यासक राजकीय सिद्धांताच्या ऱ्हासाला विचारप्रणाली जबाबदार मानतो. विचारनिर्मिती ही भौतिकवादी प्रक्रिया असून, सामाजिक व राजकीय सुधारणा घडवून आणणे हे विचारप्रणालीचे प्रमुख काम व ध्येय आहे. विचाराचे स्रोत विचारप्रणालीपुरते मर्यादित करण्याच्या प्रक्रियेमुळे विचारप्रणालीचा ऱ्हास घडून आला आणि त्यामुळे सिद्धांत निर्मितीची प्रक्रिया थांबली. त्याला जर्मिनो 'आयडिऑलॉजिकल रिडक्शनिझम' असे नाव देतो.

वरील कारणांमुळे राजकीय सिद्धांताचा ऱ्हास झाल्याचे दिसून येते. त्याचबरोबर जर्मिनो ट्रेनीच्या मते, विचारप्रणालीची निर्मिती ही राजकीय सिद्धांताच्या ऱ्हासास कारणीभूत ठरलेली आहे. ऑगस्ट कॉम्तचा प्रत्यक्षार्थवाद हे राजकीय सिद्धांताच्या ऱ्हासाचे कारण ठरले. ब्रेस्ट आणि डेव्हिड ईस्टन यांच्या मते, वेबरने तथ्य आणि मूल्यांच्यामध्ये केलेल्या तफावतीमुळे राजकीय सिद्धांताचा ऱ्हास झाला, तर लिपसेट आणि पॅट्रिजच्या मते जगातील सर्व प्रश्नांची उत्तरे औद्योगिक क्रांतीने देऊन टाकली आहेत. त्यामुळे त्या प्रश्नाच्या भोवतीच उभे राहिलेले सर्व पारंपारिक राजकीय सिद्धांत आधुनिक काळात गैरलागू झाले, अशी अनेक विचारवंतांनी राजकीय सिद्धांताच्या ऱ्हासाची कारणे सांगितली आहेत. परंतु राजकीय सिद्धांताचा ऱ्हास झाला आहे का? याचे उत्तर नाही असे द्यावे लागेल, कारण राजकीय सिद्धांत कधीच कालबाह्य होत नाहीत तर मानवी समाजाचे अस्तित्व असेपर्यंत त्याची गरज भासणार आहे, म्हणून राजकीय सिद्धांत हे मृत झाले नसून १९७० नंतरच्या काळात पुनरुज्जीवीत झाल्याचे दिसून येते.

❑ राजकीय सिद्धांताचे पुनरुज्जीवन :

राजकीय सिद्धांताच्या अभ्यासाबद्दल काही प्रमाणात लोकांची रुची कमी झाली असली तरी त्याचा अभ्यास चालू होता. नव्या परिस्थितीच्या, नव्या आव्हानाच्या संदर्भात त्याची मांडणी अभ्यासक करीत होते. त्यामुळे काही विचारवंतांच्या मते, राजकीय सिद्धांतातील काही गोष्टी कालबाह्य झालेल्या आहेत परंतु त्याचा ऱ्हास झाला नाही. तर त्याच्या मते राजकीय सिद्धांत जीवित असून त्यामध्ये बदल झाला आहे आणि विकास झाला आहे. इसाय बर्लिनच्या मते, कोणताही काळ राजकीय सिद्धांताशिवाय गेला नाही किंवा जाऊ शकत नाही. त्यामुळेच पारंपारिक राजकीय विचारवंतांच्या मते, राजकीय सिद्धांत मृत पावलेलाच नव्हता, असे स्पष्टीकरण देण्यात आले. या काळातच राजकीय सिद्धांतामध्ये न्याय, स्वातंत्र्य, लोकशाही, अधिकार इत्यादी संकल्पनांच्या संदर्भात पुनर्मांडणी करण्यात आली. एकूणच १९७० नंतरच्या काळात राजकीय सिद्धांत नव्या स्वरूपात मांडण्यात आले. त्याचबरोबर जागतिक पातळीवर अनेक घटना घडल्या. जी वर्तनवादाची लाट होती

ती ओसरली होती, यामुळे पिटर लासलेट यांनी संपादित केलेल्या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीत राजकीय सिद्धांताचे पुनरूज्जीवन झाले आहे, असे घोषित करण्यात आले.

❑ राजकीय सिद्धांताच्या पुनरूज्जीवनाची कारणे :

राजकीय सिद्धांतात जे बदल होत होते, त्याचबरोबर जागतिक पातळीवर युद्ध, चळवळी झाल्या. काही नवे विचार विकसित झाले, त्यातून राजकीय सिद्धांताचे पुनरूज्जीवन झाले, त्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) नव्या राजकीय ग्रंथाची निर्मिती :

१९७० च्या काळात न्याय, स्वातंत्र्य, अधिकार, लोकशाही इ. संकल्पनांवर अनेक मूलगामी विचार मांडणारे ग्रंथ लिहिले गेले. त्यामध्ये जॉन रॉल्स यांचा 'थिअरी ऑफ जस्टिस' (Theory of Justice), इसाया बर्लिन यांचा 'टू कन्सेप्टस ऑफ लिबर्टी' (Two concepts of Liberty), रोनाल्ड डार्विन यांचा 'टेकिंग राईटस् सिरियसली (Taking Right Seriously), ब्रॉयन बॅरी यांचा 'पॉलिटिकल आरग्युमेंट' (Political Argument) आणि सी. व्ही. मॅक्फर्सन यांचा 'थिअरी ऑफ डेमॉक्रसी' हे महत्त्वाचे ग्रंथ होते. याच काळात ॲना आरेंट, निको स्ट्रॉस, नॉझिक, कार्ल पॉपर इत्यादी विचारवंत राजकीय सिद्धांतावर लिखाण करीतच होते. या सर्व बदलांची दखल घेऊन लासलेटने घोषित केले की, राजकीय सिद्धांताचे पुनरूज्जीवन झाले आहे.

२) नवमार्क्सवादाचा उदय :

कार्ल मार्क्सचे तत्त्वज्ञान हे नव्या युगातील एक महत्त्वाचे तत्त्वज्ञान आहे. १९१७ ला रशियन क्रांती व १९४९ ला चीनमध्ये क्रांती झाली, त्यामुळे लेनिन, स्टॅलिन व माओ-त्से तुंग यांनी मांडलेल्या विचारांभोवतीच जगभराच्या परिवर्तनवादी व क्रांतीकारी शक्ती उभ्या राहिल्या. या शक्ती भांडवलशाही आणि साम्राज्यशाही विरोधात उभ्या राहिल्या. या सर्व गोष्टींचा विचार करून युरोपातील कम्युनिस्ट पक्षाला जवळ असणाऱ्या काही बुद्धिवंतांनी व विचारवंतांनी मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास सुरू केला. मुख्य चळवळीशी विसंगत अशा प्रवृत्तीचे काही लोक होते. तेही त्यांना सामील झाले. या लोकांनी नवमार्क्सवादाचे बीजारोपण केले. नवमार्क्सवाद्यांनी राजकीय सिद्धांतामध्ये मोठी भर घातली. त्यामध्ये प्रामुख्याने फ्रँकफर्ट स्कूलच्या ॲडोर्लो, हार्कहायेर, एरिक फ्रॉम, बेझांमिन हेबरमास इ. विचारवंतांचा समावेश होतो. त्याचबरोबर हर्बर्ट मार्क्यूस, लुकाच, कार्ल कोर्स गोल्डमन यांचे योगदानही महत्त्वाचे होते.

३) व्हिएतनामचे युद्ध :

शीतयुद्धाच्या काळात उत्तर व्हिएतनाम विरुद्ध दक्षिण व्हिएतनाम (अमेरिका व इतर देशांचे समर्थन) मध्ये जे युद्ध झाले त्यात व्हिएतनामचे युद्ध असे मानले जाते. हे युद्ध साम्यवादी विचारांच्या देशाच्या गटातील उत्तर व्हिएतनाम व त्याच्या विरोधात दक्षिण व्हिएतनाम हा साम्यवादाला विरोध करणारा गट होता. या युद्धात अमेरिकेचा सहभाग वाढत होता. त्यामुळे सैन्य संख्या कमी पडत होती म्हणून अनेक विद्यार्थ्यांना आपला अभ्यास सोडून, कॉलेज सोडून सैन्यात सामील व्हावे लागले. त्यावेळी युद्धभूमीवर लढत असताना विद्यार्थ्यांना

याची जाणीव झाली की, अमेरिका गरीब व्हिएतनामवर अन्याय करीत आहे. त्यामुळे हे विद्यार्थी कॉलेजापर्यंत आल्यानंतर व्हिएतनामच्या युद्धाबद्दल प्रश्न विचारू लागले आणि त्याच्यामध्ये अमेरिकेच्या धोरणाविरोधात बंडखोरीची भावना निर्माण झाली. यातून बऱ्याच लोकांना अमेरिकेबाबत तसेच भांडवलशाहीबाबत भ्रमनिरास झाला.

४) न्यू लेफ्ट मुव्हमेंट :

१९६० च्या उत्तरार्धात युरोपमध्ये आक्रमक अशा विद्यार्थी चळवळी झाल्या, याची सुरूवात इंग्लंडमध्ये झाली. इंग्लंडमध्ये 'न्यू रीझनर' आणि 'युनिव्हर्सिटी आणि लेफ्ट रिव्ह्यू' या दोन मालिकांच्या संयोगातून 'न्यू लेफ्ट रिव्ह्यू'चा जन्म झाला. ही चळवळ वाढत गेली आणि १९६८ साली अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स आणि प. जर्मनी येथे या विद्यार्थ्यांनी क्रांती करण्याचा प्रयत्न केला. 'न्य लेफ्ट रिव्हू'मध्ये अनेक तात्त्विक प्रश्नांची सखोल चर्चा करण्यात आली. मार्क्सवादाची फेरमांडणी करण्याचा त्याचा प्रयत्न होता. पेरी अँडरसन, रेजिसदेब्र, तारिक अली, थॉम्सन अशा पुढाऱ्यानी मूलगामी विचार मांडले. या चळवळीस मार्क्सच्या विचारांचा आधार होता. अशा न्यू लेफ्ट मुव्हमेंट विचारवंतानी सोव्हिएत शासन व्यवस्थेवर टीका करण्यास सुरवात केली, त्यांचा स्टॅलिनवादाला विरोध होता, त्यामुळे त्यानी लोकशाही, सत्तेचे विकेंद्रीकरण, केंद्रीकृत शासन यंत्रणा विसर्जन इत्यादी बाबींचा पुरस्कार केला.

५) तिसऱ्या जगातील नवा विचारप्रवाह :

माओत्से तुंगच्या मते, तीन जग आहेत. पहिले जग अमेरिका व सोव्हिएत संघ या महासत्ताचे, दुसरे पूर्व व पश्चिम युरोपमधील देशांचे आणि आफ्रिका, आशिया आणि लॅटिन अमेरिकेतील देशांचे तिसरे जग. जगामधील खरा संघर्ष हा पहिल्या आणि तिसऱ्या जगामध्ये आहे. युरोप खंडातील देशांनी विज्ञान तंत्रज्ञानात प्रगती केली आणि सर्व जगावर ताबा मिळविला. त्यामुळे आशिया, आफ्रिका खंडातील देश हे मागे पडले आणि परावलंबी बनले, त्यामुळे विकसित आणि अविकसित देशातील अंतर वाढत गेले. जे तत्त्वज्ञान अथवा सिद्धांत मांडले जात होते ते सिद्धांत आणि अविकसित देशातील अंतर वाढत गेले. जे तत्त्वज्ञान अथवा सिद्धांत मांडले जात होते ते सिद्धांत विकसित देशातूनच मांडले जात होते. परंतु १९७० नंतर तिसऱ्या जगातील विचारवंतांनी अर्थविकासाचे व परावलंबित्त्वाचे सिद्धांत मांडले. त्यात प्रामुख्याने सांतोस, कोर्डोसा, फुर्तांडो आणि आंद्रे गुदर फ्रँक या लॅटिन अमेरिकेतील विचारवंतांचा समावेश होतो. त्याशिवाय इमॅन्युंल वॉलेस्टिन यांनी विश्वव्यवस्था सिद्धांत मांडले, तर समीर यांनी अर्थ विकासाचा परावलंबित्वाचा सिद्धांत मांडला. आंद्रे गुंदर, फ्रँक यांनी अर्थ व न्यून विकासाचे व परावलंबीत्वाचे सिद्धांत मांडले. तिसऱ्या जगातील विचारवंतांचे विचार लोकांसमोर आला, त्यामुळे राजकीय सिद्धांतात भर पडली व राजकीय सिद्धांताचे पुनरूज्जीवन झाले.

६) उत्तर वर्तनवाद :

डेव्हीड ईस्टन यांनी वर्तनवादाचा पाया घातला. त्याद्वारे राजकीय सिद्धांताचा ऱ्हास झाल्याची घोषणा केली. ७० च्या दशकानंतर डेव्हिड ईस्टनने या वर्तनवादी दृष्टिकोनाच्या फुलश्रुतीची परखड चिकित्सा केली.

प्रचंड पैसा, वेळ व शक्ती खर्च करूनसुद्धा फारसे काही हाती लागले नाही. तो असे म्हणतो की, या काळात जगापुढील सामाजिक, राजकीय व आर्थिक आव्हाने तीव्र होती, त्याचे भान वर्तनवादी अभ्यासकांना नव्हते. त्यामुळे वर्तनवादी दृष्टिकोनाच्या जमेच्या बाजू मान्य करून पुढे राज्यशास्त्राचे संशोधन अधिक प्रस्तुत व उपयुक्त कसे करता येईल, असा भविष्यकाळाच्या दृष्टीने वर्तनवादाचा विचार करणे गरजेचे होते. १९६९ साली अमेरिकन राज्यशास्त्र परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात ईस्टनने उत्तर वर्तनवादाच्या काही सूत्रामध्ये आपणास बदल करावा लागेल. राज्यशास्त्राच्या संशोधनात मूल्य व प्रस्तूतता यांना महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे आणि राज्यशास्त्रांनी लोकांचे प्रश्न आणि चळवळी यांचा प्रत्यक्ष जागी जाऊन अभ्यास केला पाहिजे, असे म्हटले.

अशा प्रकारे वरील सर्व कारणांमुळे राजकीय सिद्धांताचे पुनरूज्जीवन झाले आहे. म्हणून असे म्हणता येईल की, २० व्या शतकामध्ये राजकीय सिद्धांत मुख्यत: परंपरावादी राजकीय सिद्धांत व आधुनिक व्यवहारवादी राजकीय सिद्धांत या दोन विचारधारांमध्ये विकसित झाला आहे. कारण उत्तर वर्तनवादाच्या उदयामुळे या दोन्हींमधील दुही कमी झाली. अशा प्रकारे १९७०-७१ पासून राजकीय सिद्धांताच्या पुनरूज्जीवनास सुरूवात झाली आहे.

❑ राजकीय सिद्धांताचे महत्त्व :

राजकीय सिद्धांताचे महत्त्व हे त्याच्या कार्यावर आणि त्याच्या उद्देशाच्या आधारावर समजून घेता येते. काही राजकीय विचारवंतांच्या मते मात्र राजकीय सिद्धांताचा ऱ्हास झालेला नाही तर राजकीय सिद्धांताचे स्वरूप फक्त बदलले. पूर्वी राजकीय सिद्धांताचा भर केवळ शासन संस्थेची निर्मिती कशी झाली, शासनाचे कामकाज कसे चालते, राज्यसंस्थेची साध्ये आणि उद्दिष्ट्ये इत्यादी गोष्टीवर होते. नंतरच्या काळामध्ये राजकीय सिद्धांतामध्ये मूल्यनिरपेक्षता, अनुभववाद इत्यादी शास्त्रीय पद्धतीचा स्विकार करण्यात आला एकूणच राजकीय सिद्धांत हे मानवी समाजजीवन विकसित करण्यासाठी आवश्यक आहे. राजकीय सिद्धांत व राजकीय तत्त्वज्ञान हे एकमेकांशी पूरक आहेत. त्यामुळे मानवी जीवनात राजकीय सिद्धांत व राजकीय तत्त्वज्ञानही महत्त्वाचे आहे. राज्य आणि समाजाची परिस्थिती, सरकारचे सर्वश्रेष्ठ स्वरूप, व्यक्ती आणि राज्य यांच्यातील संबंध त्याद्वारे स्वातंत्र्य, समता, न्याय इत्यादी संकल्पनाचा विकास करण्यासाठी काही दृष्टिकोन व पद्धतीच्या निर्मितीसाठी राजकीय सिद्धांत महत्त्वाचे आहेत. राजकीय संशोधन राजकीय सिद्धांताच्या आणि विचारप्रणालीच्या अभ्यासातून मानवी समाजाच्या समस्यांचे निराकरण करू शकतो. भूतकालीन राजकीय सिद्धांताच्या अभ्यासामुळे वर्तमानकालीन समस्या सोडविण्याचे आणि भविष्यकालीन समस्यांना मार्गदर्शन करण्याचे कार्य अधिक सुलभ होऊ शकते. राजकीय सिद्धांत विशिष्ट राजकीय विचारप्रणालीचा पुरस्कार करताना दिसतात. एकूणच राजकीय सिद्धांत हे व्यक्ती, समाज, सरकार, विचारप्रणाली, तत्त्वज्ञान या सर्व गोष्टींच्या आधारे समाजजीवन विकसित करीत असतात. राजकीय सिद्धांताचे महत्त्व खालीलप्रमाणे सांगता येईल.

१. राजकीय सिद्धांत हे राज्य आणि सरकार यांच्या स्वरूपाची आणि उद्देशाची माहिती उपलब्ध करून देते.

२. समाजामधील वर्तमान काळातील निर्माण झालेल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी राजकीय सिद्धांत मार्गदर्शक व उपयुक्त ठरतात.

३. राजकीय सिद्धांत हे सामाजिक आणि राजकीय परिस्थिती, तेथील समाजाचे आदर्श आणि उद्देशाचा समन्वय साधणे व त्याचे परस्परसंबंध निर्माण करण्यास मदत करतात.

४. राजकीय सिद्धांत हे मानवाला किंवा व्यक्तीला अधिकार, कर्तव्य, स्वातंत्र्य, समता, संमती, न्याय इत्यादी गोष्टी सामाजिक जीवनात वापरण्यासाठी प्रेरणा देतात आणि मानवी समाजाला मार्गदर्शक, प्रेरक व उपयुक्त ठरतात.

५. राजकीय सिद्धांत हे सामाजिक, आर्थिक व्यवस्था समजून घेण्यासाठी दृष्टिकोन निर्माण करतात आणि समाजातील गरीबी, हिंसा, भ्रष्टाचार, जातीवाद इत्यादी संदर्भात सिद्धांत करून पर्यायी व्यवस्था प्रदान करतात.

६. राजकीय सिद्धांताचे कार्य हे केवळ संकल्पना निर्मिती करणारे नसून सामाजिक सुधारणा आणि क्रांतिकारी विचाराने समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी महत्त्वाचे असतात. त्याचबरोबर समाज परिवर्तनात झालेल्या चुका व अपयशाची कारणे ही समजून येतात.

७. राजकीय सिद्धांताद्वारे समाजातील वास्तविक परिस्थितीचा अभ्यास करता येतो आणि भविष्यात कोणत्या अडचणी येतील हे समजावून घेता येते.

अशा प्रकारे राजकीय सिद्धांत हे मानवी जीवनाच्या विकासासाठी, राज्याच्या शासन व्यवस्थेच्या आणि समाजाच्या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी महत्त्वाचे आहेत.

१.३ सारांश :

राजकीय सिद्धांत हे मानवी जीवनाच्या विकासासाठी, त्याचबरोबर समाजातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आवश्यक आणि महत्त्वाचे आहेत. त्यामुळे राजकीय सिद्धांताचे स्वरूप, व्याप्ती, महत्त्व यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. राजकीय सिद्धांत हे मानवी जीवन आणि समाजाची वास्तवस्थिती जाणून घेण्याचे कार्य करतात. तसेच भविष्यकालीन प्रश्नाच्या सोडवणूकीसाठी मार्गदर्शक ठरतात. त्यामुळे त्याचे महत्त्व आजही कायम आहे. तसेच राजकीय तत्त्वज्ञान व राजकीय सिद्धांत हे वेगळे असले तरी ते एकमेकास पूरक व पोषक आहेत. राजकीय तत्त्वज्ञानाच्या आधारावर राजकीय सिद्धांत निर्माण होतात परंतु सगळेच राजकीय तत्त्वज्ञान हे राजकीय सिद्धात होत नाहीत. वर्तनवादी, प्रत्यक्षार्थवादी विचारवंतांनी राजकीय सिद्धांत मृत पावल्याची घोषणा केली. परंतु १९७० नंतर राजकीय सिद्धांतामध्ये नव्या ग्रंथाची निर्मिती झाली. नवमार्क्सवादाचा उदय, उत्तर वर्तनवादाची मांडणी, व्हिएतनामचे युद्ध इत्यादी कारणामुळे राजकीय सिद्धांताचे पुनरूज्जीवन झाल्याची घोषणा करण्यात आली. एकूणच राजकीय सिद्धांताचे स्वरूप, व्याप्ती, महत्त्व, राजकीय तत्त्वज्ञान व राजकीय सिद्धांत यांच्यातील संबंध राजकीय सिद्धांताचा ऱ्हास व पुनरूज्जीवनाची कारणे इत्यादीची चर्चा प्रस्तुत प्रकरणात केली आहे.

१.४ पारिभाषिक शब्द :

१) सिद्धांत : ज्ञानाची सुसंगत रचना म्हणजे सिद्धांत होय.

२) राजकीय तत्त्वज्ञान : राजकीय व्यवस्थेबदलचे ज्ञान

३) ऱ्हास : उपयोगाची नसणे

४) पुनरूज्जीवन : नव्याने मांडणी करणे

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

१) सेबाईन यांनी कोणत्या दृष्टीकोनातून राजकीय सिद्धांताचे स्पष्टीकरण केला आहे?

उत्तर : ऐतिहासिक

२) ॲरिस्टॉटल यांनी किती राज्यघटनांचा अभ्यास केला?

उत्तर : १५८

३) फिलॉसॉफी, पॉलिटिक्स ॲड सोसायटी या ग्रंथांचे संपादक कोण आहेत?

उत्तर : पीटर लास्लेट

४) थिअरी ऑफ जस्टीस हे पुस्तक कोणी लिहिले?

उत्तर : जॉन रॉल्स

५) वर्तनवादाचा पाया कोणी घातला?

उत्तर : डेव्हीड ईस्टन

१.६ स्वाध्याय

टिपा लिहा.

१) राजकीय सिद्धांताचे स्वरूप

२) राजकीय सिद्धांताची व्याप्ती

३) राजकीय सिद्धांताचे महत्त्व

४) राजकीय सिद्धांत व राजकीय तत्त्वज्ञान

दिर्घोत्तरी प्रश्न.

१) राजकीय सिद्धांताचे स्वरूप, व्याप्ती स्पष्ट करा.

२) राजकीय सिद्धांत व राजकीय तत्त्वज्ञानाचे संबंध स्पष्ट करा.

३) राजकीय सिद्धांताचे ऱ्हास व पुनरूज्जीवनाच्या कारणाची चर्चा करा.

४) राजकीय सिद्धांताचे अर्थ व महत्त्व स्पष्ट करा.

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१) Gouba O. P. : 'An Introduction to Political Theory', Macmillan Publisher, New Delhi (2011).

२) Ramaswary Sushila : 'Political Theory Ideas and Concepts', PHI learning Private ltd. Delhi (2015).

३) पाठक नवराज : 'पाश्चिमात्य राजनीतिक विचार-भाग १', आवृत्ती दुसरी, विश्वभारती पब्लिकेशन, नवी दिल्ली (२००६).

४) चौसाळकर अशोक : 'आधुनिक राजकीय सिद्धांत', युनिक ॲकॅडमी, पुणे (२०१७).

५) Varma, S. P. : 'Modern Political Theory', Vikas Publishing House. (1975)

६) भोळे, भा. ल. : राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण, पिंपळापुरे, नागपूर. (१९८८).

❍❍❍

घटक २

राजकीय सिद्धांताचे दृष्टिकोन

(Approaches of Political Theory)

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ दृष्टिकोन म्हणजे काय?

२.२.२ आदर्शवादी किंवा मूल्याधिष्ठित दृष्टीकोन

२.२.३ अनुभववादी दृष्टिकोन

२.२.४ वर्तनवादी दृष्टिकोन

२.२.५ उत्तर–वर्तनवादी दृष्टिकोन

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे

२.६ स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

२.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास खालील बाबी समजतील.

- राज्यशास्त्राच्या आदर्शवादी दृष्टिकोनाचा विकास कसा झाला.
- आदर्शवादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये व उणीवा समजतील.
- अनुभववादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये व उणीवा समजतील.
- वर्तनवादी दृष्टीकोन विकसित होण्यामध्ये जबाबदार घटकांना समजून घेता येईल.

- उत्तर-वर्तनवादी क्रांती घडून येण्यामागील कारकांचे आकलन करून घेता येईल.
- वर्तनवाद व उत्तर-वर्तनवादी दृष्टिकोनाचे चिकित्सेद्वारे तुलनात्मक आकलन करून घेता येईल.
- वर्तनवाद व उत्तर वर्तनवादी दृष्टिकोनाचे राज्यशास्त्रातील महत्त्व समजून घेता येईल.

२.१ प्रास्ताविक :

राजकीय सिद्धांताचा अभ्यास हा राज्यशास्त्राचा एक महत्त्वाचा भाग आहे. घटक क्र. १ मध्ये आपण राजकीय सिद्धांताचा अर्थ, स्वरूप, व्याप्ती व महत्त्व पाहिले. त्याचबरोबर राजकीय सिद्धांताचा ऱ्हास आणि त्याचे पुनरूज्जीवन याचाही अभ्यास केला. राजकीय सिद्धांताचा अभ्यास करताना राजकीय सिद्धांताचे दृष्टिकोन समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. राजकीय सिद्धांताचा आशय व दिशा या दृष्टिकोनावरून समजून घेता येते. स्थूल स्वरूपाने राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे दोन कालखंड मानले जातात. साधारणपणे दुसऱ्या महायुद्धापर्यंत पारंपारिक राज्यशास्त्र तर दुसऱ्या महायुद्धानंतर राज्यशास्त्राचा आधुनिक कालखंड मानला जातो. यानुसार राजकीय सिद्धांताचे पारंपारिक सिद्धांत आणि आधुनिक सिद्धांतामध्ये ढोबळमानाने वर्गीकरण केले जाते. सदरच्या घटकामध्ये आपण पारंपारिक दृष्टिकोनामधील आदर्शवादी दृष्टिकोन तर आधुनिक सिद्धांतामधील अनुभववादी दृष्टिकोनाचा अभ्यास करणार आहोत.

राजकीय दृष्टीकोनाच्या उत्तरोत्तर विकसित होत असलेल्या ऐतिहासिक क्रमामध्ये वर्तनवादी व उत्तर वर्तनवादी दृष्टिकोनाने राज्यशास्त्राला अधिक शास्त्रीय व उपयोगी शास्त्र बनविण्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. साधारणत: दुसऱ्या महायुद्धानंतर पारंपारिक राज्यशास्त्राच्या विरोधात व्यापक क्रांतीला सुरुवात झाली. या क्रांतीलाच वर्तनवाद या नावाने ओळखले जावू लागले. वर्तनवाद्यानी पारंपारिक राजकीय सिद्धांताच्या अभ्यास पद्धतीऐवजी मूल्यनिरपेक्षपणे राजकीय वर्तनावर आपले लक्ष केंद्रित करून अनुभवात्मक संशोधनाला प्राथमिकता दिली. परंतु लवकरच वर्तनवादांच्या मर्यादा स्पष्ट करून वर्तनवादी क्रांतीने आम्ही आमच्या विश्लेषणाला न्याय देऊ शकलो नाही, म्हणून आम्हाला उत्तर-वर्तनवादी बनले पाहिजे असे डेव्हिड ईस्टनने स्पष्ट केले. उत्तर-वर्तनवादी राजकीय विश्लेषणात मूल्यांना समाविष्ट करून राजकीय विश्लेषणाला अधिक परिपूर्ण व प्रासंगिक बनविण्यासाठी प्रयत्नशील होते. ज्यामध्ये तथ्य व मूल्य या दोन्हींचा एकत्रित वापर करून परिस्थितीनुरूप वापराला महत्व प्राप्त करून दिले गेले. अशाप्रकारे प्रस्तुत वर्तनवाद व उत्तर-वर्तनवाद या प्रकरणामध्ये वर्तनवादी क्रांती होण्यासाठी जबाबदार घटक, वर्तनवादी दृष्टिकोनाचा अर्थ, वैशिष्ट्ये व त्याचे राज्यशास्त्रातील योगदानाचे मूल्यमापन तसेच उत्तर-वर्तनवादीक्रांतीला जबाबदार कारणे, उत्तर-वर्तनवादी दृष्टीकोनाची वैशिष्ट्ये व त्याचे राज्यशास्त्रातील योगदानाचे मूल्यमापन आणि प्रस्तुत दोन्ही दृष्टीकोनांचे महत्त्व इत्यादी घटकांचा अभ्यास केला जाणार आहे.

२.२ विषय-विवेचन :

२.२.१ दृष्टिकोन म्हणजे काय?

एखाद्या विषयाकडे, विचाराकडे संशोधक किंवा अभ्यासक कोणत्या भूमिकेमधून, विश्लेषणामधून बघतो याला साधारणपणे दृष्टिकोन असे म्हणतात. डॉ. विजय देव यांच्या आधुनिक राजकीय विश्लेषण कोशानुसार, 'दृष्टिकोन' ही एक विश्लेषण पद्धती असून ती राजकीय तत्त्वे समजण्यासाठी, तसेच राजकीय तत्त्वे आणि संकल्पनांचा अभ्यास करण्यासाठी एक बौद्धिक साधन म्हणून उपयुक्त ठरते. राज्यशास्त्रात या पद्धतीचा उपयोग माहिती मिळविणे, माहितीची जुळणी करणे, माहितीतून अर्थ काढणे, माहितीतील घटकांचा परस्परसंबंध प्रस्थापित करणे, माहितीचे मूल्यमापन करणे इत्यादीसाठी होतो. कोणताही दृष्टिकोन हाच एक महत्त्वपूर्ण सिद्धांत असतो. दृष्टिकोनाचा मुख्य हेतू म्हणजे विविध राजकीय तत्त्वांची एक व्यवस्था निर्माण करून ती काही संकल्पनामध्ये बसविली जाते.'

दुसऱ्या महायुद्धानंतर पारंपारिक राज्यशास्त्राच्या विरोधात व्यापक क्रांतीला सुरूवात झाली. सामाजिक शास्त्राचे सर्व विषय या क्रांतीने प्रभावित झाले. या क्रांतीला वर्तनवादी नावाने ओळखले जाते. राज्यशास्त्रात वर्तनवाद म्हणजे आधुनिक प्रयत्न व दृष्टिकोनाची देण आहे. पारंपारिक राजकीय सिद्धांतात अंतर्भूत मूल्य, तत्त्वज्ञान, कायदा, इतिहासवाद, वर्णनात्मक अभ्यास पद्धती तसेच संस्थात्मक प्राथमिकतेची अपर्याप्तता यामुळे असंतुष्ट होऊन वर्तनवादी समर्थकांनी एका पर्यायाच्या रूपाने प्रस्तुत केले, ज्यात 'वर्तन'च्या अभ्यासाचे महत्त्व राज्यशास्त्रज्ञांनी स्वीकारले. वर्तनवादाने मुख्यत: आपले लक्ष राजकीय वर्तना वर केंद्रित केले आहे. वर्तनवादाने अनुभवात्मक संशोधनाला प्राथमिकता देऊन निरंतर संशोधनाला चालना दिली. पारंपरिक सिद्धांताप्रमाणे व्यक्तिनिष्ठ मूल्य, मानवीय विश्लेषण तसेच कल्पना यांना स्थान देत नाही. या दृष्टीने वर्तनवाद पारंपरिक राज्यशास्त्रापेक्षा पूर्णत: भिन्न आहे. राज्यशास्त्राला कायदा, तत्त्वज्ञान, मूल्य, नैतिकता याच्या चौकटीत बांधून ठेवण्यास तयार नाही.

थोडक्यात, दृष्टिकोन हे नेहमी राज्यशास्त्रात आपण कोणता व कशाचा अभ्यास करावा, याचे उत्तर देतात व त्याला अनुसरून जे निकष व शेवटी जे निष्कर्ष ठरविले जातात त्याला दृष्टिकोन असे म्हणतात.

राजकीय सिद्धांताच्या अभ्यासासाठी आपण खालील दोन दृष्टिकोनाचा सविस्तर विचार करणार आहोत, आदर्शवादी दृष्टिकोन आणि अनुभववादी दृष्टिकोन.

२.२.२ आदर्शवादी दृष्टिकोन (Normative Approach) :

पारंपारिक राज्यशास्त्रामध्ये आदर्शवादी दृष्टिकोनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. या दृष्टीकोनाला मूल्याधिष्ठित दृष्टीकोन असेही म्हणतात. पारंपारिक राजकीय विचारवंतांनी राज्यशास्त्राचा अभ्यास आदर्शात्मक दृष्टीने केला आहे. या दृष्टीकोनामध्ये काही मूल्ये व आदर्श प्रमाण मानून त्यावरून चांगल्या समाजव्यवस्थेचा व राजकीय व्यवस्थेचा शोध व अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला असतो. म्हणून केनेथ थॉम्पसन या दृष्टिकोनास

नैतिक मापदंडानुसार राज्यशास्त्राचे केलेले अध्ययन असे म्हणतो. व्यक्ती व समाज यांच्या दृष्टीने चांगले काम, वाईट काम किंवा योग्य-अयोग्य याबाबतचा निर्णय घेण्याचे काम हा दृष्टीकोन करतो. प्लेटो पासून कार्ल मार्क्सपर्यंत व पुन्हा अलीकडच्या काळात लास्की, रॉल्स यांनी मूल्यांना, काही आदर्शांना राज्यशास्त्रात महत्त्व देऊन आपले विचार मांडले आहेत. हा दृष्टीकोन अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचा असून याची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतात.

२.२.२.१ आदर्शवादी दृष्टीकोनाची वैशिष्ट्ये :

१) मूल्यावर अधिक भर किंवा मूल्यप्राधान्यता :

आदर्शवाद दृष्टीकोन हा मूल्यांवर जास्त प्रमाणावर भर देतो. हा सिद्धांत मूल्यांना बांधील असून मूल्यांना आदर्श मानतो. राज्याचा उद्देश चांगल्या जीवनाची प्राप्ती करून देणे हा आहे त्यामुळे हा दृष्टीकोन राज्याच्या स्वरूपाचे चांगले, वाईट, आदर्श, नैतिक, अनैतिक अशा दृष्टीने विवेचन करतो. यामधील राजकीय विचारवंतानी काही चांगली मूल्ये, आदर्श शोधून त्यावर आधारीत आपले विचार किंवा सिद्धांत मांडले. सॉक्रेटिसने ज्ञान हाच सद्‌गुण मानला, प्लेटोने आदर्श राज्यासाठी तत्त्वज्ञानी व्यक्तीला प्राधान्य दिले. हेगेलने विचारांना महत्त्व देऊन द्वंद्ववादी सिद्धांत मांडला. या सिद्धांतामध्ये नीतीशास्त्राला प्राधान्य दिले आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता इ. मूल्यांना हा सिद्धांत महत्त्व देतो. थोडक्यात, हा सिद्धांत सातत्याने समाजहितासाठी आदर्श मूल्यांचा शोध घेण्यावर भर देतो.

२) तत्त्वज्ञानाला महत्त्व किंवा तात्विक बैठक :

या सिद्धांताचा मूळ आधार तत्त्वज्ञान हा आहे. पारंपारिक राज्यशास्त्र हे नीतीशास्त्रावर आधारीत आहे तर नीतीशास्त्राचा आधार हा तत्त्वज्ञान आहे. या आदर्शवादी विचारवंतांच्या मते, तत्त्वज्ञानाचा आधार घेऊनच सत्यापर्यंत पोहोचता येते केवळ तथ्याचा आधार उपयोगी ठरत नाही. राजकीय संस्था उपयुक्त व टिकाऊ स्वरूपाच्या बनण्यासाठी तात्त्विक बैठक आवश्यक असते. दैनंदिन राजकारणाला सुद्धा तत्त्वज्ञानाचा आधार असला पाहिजे, असे या विचारवंतांचे मत आहे. प्लेटोने आदर्श राज्य, तत्त्वज्ञानी राजा, हेगेलने आदर्श राज्य, विरोधविकासवाद इ. प्रकारच्या तत्त्वज्ञानाच्या बैठकीवर आपले सिद्धांत मांडले आहेत. सेंट ऑगस्टीन, सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, हॉब्ज, लॉक, रुसो, मिल इ. विचारवंताना त्यांनी मांडलेल्या तात्त्विक बैठकीमुळेच आजही महत्त्व आहे.

३) आदर्श व काल्पनिक राजकीय चिंतन :

या दृष्टिकोनामध्ये कल्पनेवर, स्वप्नरंजन विचारांना महत्त्व दिले गेले. वास्तवात न येणाऱ्या अनेक कल्पनांना अवास्तव महत्त्व दिले गेले. उदा. प्लेटोचा तत्त्वज्ञ राज्यकर्ता हा अत्यंतिक कल्पनावादी व आदर्शवादी तत्त्वावर मांडला गेला. प्लेटोने पुढे उपआदर्श राज्यामध्ये यामध्ये थोड्या प्रमाणात बदल करून राज्याचे प्रारूप मांडले.

प्लेटोचा स्त्रीविषयक साम्यवाद हा फारच आदर्श स्वरूपात मांडला आहे. थोडक्यात, आदर्शवादी दृष्टीकोन हा एक प्रकारचा युरोपिया आहे, अशी अनेकांनी टीका केली आहे.

४) तार्किक अनुगामी अभ्यास पद्धतीचा वापर :

हा दृष्टिकोन अनुगामी पद्धतीने राजकीय सिद्धांताची मांडणी करतो. निगमनात्मक पद्धतीचा वापर करून 'सामान्याकडून विशेषाकडे' जाण्याचा प्रयत्न केला जातो. एखादे सामान्य स्वरूपाचे गृहीततत्त्व स्वीकारून त्यावरून विशेष स्वरूपाचे निष्कर्ष काढण्यात येतात. उदा. हॉब्ज, लॉक, रूसो यांनी राज्याच्या उदयाचा सामाजिक करार सिद्धांत मांडताना निसर्ग अवस्था, मानवी स्वभाव गृहीत धरून त्याच्या आधारे निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला. प्लेटोने निगमनात्मक पद्धतीने अभ्यास केला तर पुढे ॲरिस्टॉटलने विगमनात्मक पद्धतीने विश्लेषण करून सिद्धांत मांडले.

५) ऐतिहासिकवादाला महत्त्व :

हा दृष्टिकोन इतिहासाच्या आधारावरील अभ्यासाला महत्त्व देतो. भूतकाळामधील राजकीय विचारांचा अभ्यास करण्यामध्ये विचारवंतानी अधिक वेळ घालविला. समकालीन राजकीय व सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी नवीन सिद्धांत किंवा उत्तरे शोधण्याऐवजी राजकीय विचारवंत एक प्रकारे विचारवंत बनले. थोडक्यात, हा दृष्टिकोन इतिहासाला आपला आधार मानतो. राजकीय मानवाचा ऐतिहासिक वर्तनाचा मागोवा घेऊन निष्कर्ष काढले जातात. मॉंटेस्क्यू, कार्ल मार्क्स यांनी ऐतिहासिक बाबींचा विचार करून सिद्धांत मांडले.

६) संस्थात्मक व कायद्यावर भर :

हा दृष्टिकोन शासनसंस्थांची चौकट, शासनसंस्थांची विविध अंगे व त्यांची कार्ये यांच्या अभ्यासावर भर देतो. राजकीय संस्थांचे वर्णन, त्यांची ध्येये आणि कार्यपद्धती यांचा अभ्यास केला जातो. या संस्थांची कायद्यावर आधारित कार्यपद्धती याचाही अभ्यास केला जातो. निर्णय घेत असताना औपचारिक कायदेविषयक चौकटीला महत्त्व दिले जाते. उदा. संसदीय शासनपद्धतीमध्ये कायदेमंडळाला जबाबदार राहून त्या चौकटीमध्ये मंत्रीमंडळ निर्णय घेते. सामान्य कायदे, नियम, प्रथा, परंपरा, न्यायालयीन निर्णय इ. चा आधार घेऊन त्या ठिकाणच्या राजकीय जीवनाचा व राजकीय व्यवहाराचा अभ्यास केला जातो.

७) राज्याशी संबंधित संकल्पनांना महत्त्व :

हा दृष्टिकोन राज्याची रचना, कार्ये याच्या अभ्यासाला महत्त्व देतोच त्याचबरोबर राज्याशी संबंधित संकल्पनांनाही महत्त्व देतो. यामध्ये राज्याच्या निर्मितीबरोबर आदर्श राज्याची संकल्पना, राज्य व व्यक्तीमधील संबंध, राज्याराज्यामधील संबंध इ. चाही अभ्यास केला जातो.

८) तुलनात्मक अभ्यासाचाही विचार :

आदर्शवादी दृष्टीकोन अमूर्त बाबींचा विचार करून अभ्यास करीत असला तरी काही विचारवंतानी तत्कालीन परिस्थितीचा वास्तववादी अभ्यास केलेला आहे. त्याचप्रमाणे तुलनात्मक अभ्यास पद्धतीचाही अवलंब केला आहे. उदा. ॲरिस्टॉटलने १५८ राज्यघटनांचा अभ्यास केला तर के. सी. व्हिअर यांनी संघराज्याचा अभ्यास, लास्की यांचे राजकीय संस्थांचे विवेचन हे तुलनात्मक अभ्यासपद्धतीचे उत्तम उदाहरण आहे.

९) व्यक्तीनिष्ठ स्वरूप :

अनेकवेळा आदर्शवादी दृष्टीकोन हा व्यक्तीनिष्ठ स्वरूपाचा वाटतो. एखादा राजकीय सिद्धांत मांडताना त्या विचारवंतावर पडलेल्या प्रभावांना, विचारांना, आदर्शांना जास्त महत्त्व दिले जाते. अभ्यासक किंवा विचारवंत जी गृहिततत्त्वे प्रमाण मानून त्या आधारे सिद्धांताची मांडणी करतो त्या गृहिततत्त्वांची सत्यासत्यता पडताळून पाहण्याचा प्रयत्न केला जात नाही. एखाद्या विचारवंताला एखादा विचार आदर्श वाटला म्हणून तो त्या आधारे आपल्या सिद्धांताची मांडणी करतो. या ठिकाणी वस्तुस्थितीपेक्षा त्या विचारवंतांची मते प्रमाण किंवा महत्त्वाची मानली जातात. त्यामुळे हा दृष्टिकोन वस्तुनिष्ठतेऐवजी व्यक्तीनिष्ठ स्वरूपाचा बनतो.

१०) नैतिकतेला जास्त महत्त्व :

आदर्शवादी दृष्टिकोन हा नीतीशास्त्राला महत्त्व देतो. आदर्शवादी विचारवंत राज्याच्या स्वरूपाचे चांगले, वाईट, नैतिक अशा दृष्टींनी विवेचन करतात. व्यक्ती आणि समाजाच्या दृष्टीने चांगले - वाईट, योग्य-अयोग्य यासंबंधीचे विवेचन करून नैतिक मूल्यांची प्रस्थापना करण्यावर हा दृष्टिकोन भर देतो. राज्यशास्त्राला मूल्यांचे अधिष्ठान प्राप्त करून देण्याचे कार्य या दृष्टिकोनाने केले आहे. डेव्हिड आप्टर आणि ए. चार्लस् यांच्या मते, आदर्शवादी दृष्टिकोन हा मूल्यांचे आणि आदर्शांचे अत्यंत व्यवस्थित विश्लेषण करतो की ज्यामुळे व्यक्तीला चांगली शासनसंस्था तसेच चांगले धोरण निवडण्यामध्ये मदत होते.

२.२.२.२ आदर्शवादी दृष्टीकोनाचे मूल्यमापन :

राज्यशास्त्राच्या अध्ययनासाठी आदर्शवादी दृष्टिकोन हा अत्यंत मूलभूत व महत्त्वाचा असला तरी यामध्ये खालीलप्रमाणे उणीवा किंवा मर्यादा आहेत.

१) मर्यादित अभ्यासावर भर :

हा दृष्टिकोन राज्य, राज्याची कार्ये, शासनसंस्थांची रचना इ. चा अभ्यास करतो. त्याअंगाने हा दृष्टिकोन मर्यादित स्वरूपाचा आहे, अशी टीका केली आहे.

२) मूल्यांना, तत्त्वांना अतिरेकी महत्त्व :

हा दृष्टिकोन आदर्श मूल्ये, तत्त्वे यांना वस्तुस्थितीपेक्षा जास्त महत्त्व देतो त्यामुळे अनेक राजकीय समस्या सोडविण्यामध्ये हा दृष्टिकोन कमी पडतो. नीतीशास्त्र प्रमाण मानून मूल्यांना महत्त्व दिल्यामुळे वास्तव राजकारणामध्ये विश्लेषण हा दृष्टिकोन करू शकत नाही.

३) आंतरविद्याशाखीय अभ्यासाला कमी महत्त्व :

आदर्शवादी दृष्टिकोनामध्ये तत्त्वज्ञान, इतिहास, नीतीशास्त्र याच्या आधारावर जास्त अभ्यास केला गेला. परंतु मानवाच्या कृती या सामाजिक, आर्थिक, मानसशास्त्रीय स्वरूपाच्या असतात. त्यामुळे समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, मानववंशास्त्र इ. सर्व सामाजिक शास्त्रांचा अभ्यास करून मानवाचे राजकीय जीवन व वर्तन याविषयी निष्कर्ष काढणे जास्त योग्य ठरते. परंतु आदर्शवादी दृष्टिकोनामध्ये आंतरविद्याशाखीय अभ्यासाचा अभाव असलेला दिसून येतो.

४) शास्त्रीय दर्जा कमी :

आदर्शवादी दृष्टिकोनाला फारसा शास्त्रीय दर्जा नाही. केवळ मूल्ये व आदर्श यावर भर दिल्यामुळे शास्त्रीयता अभ्यासली गेली नाही. राजकीय विवेचन किंवा विश्लेषण करताना वस्तुनिष्ठता आवश्यक असते. त्यासाठी संख्याशास्त्र, मानसशास्त्र, गणित यांचा वापर आधुनिक काळात राज्यशास्त्रामध्ये होऊ लागला आहे. त्यादृष्टीने आदर्शवादी दृष्टिकोनाला शास्त्रीय दर्जा देता येत नाही.

५) मूल्याची सापेक्षता :

मूल्ये ही सापेक्ष असतात म्हणजे ही मूल्ये देश, राज्य, समाज इ. परत्वे बदलत असतात. एखाद्या समाजात आदर्श असणारी मूल्ये जशीच्या तशी दुसऱ्या समाजात आदर्श असतीलच असे नाही. त्यामुळे आदर्शवादी दृष्टिकोनाने मूल्यावर किंवा आदर्शावर निर्माण केलेले सिद्धांत वैश्विक स्वरूपाचे ठरत नाहीत. ही महत्त्वाची मर्यादा या दृष्टिकोनाची आहे.

वरीलप्रमाणे आदर्शवादी दृष्टिकोनावर टीका केली जाते. त्यामधील दोष किंवा उणीवा सांगितल्या जातात तरीसुद्धा या सिद्धांताचे महत्त्व कमी होत नाही. कारण समाजासाठी, मानवी वर्तन चांगले राहण्यासाठी आदर्शांची, मूल्यांची नितांत आवश्यकता असते. या दृष्टिकोनामधून निर्माण झालेली स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, विकेंद्रीकरण, राजकारणामधील नैतिकता इ. आदर्श किंवा मूल्ये आधुनिक राज्यशास्त्रानेसुद्धा मान्य केली आहेत. त्यामुळे हा दृष्टिकोन राज्यशास्त्राच्या अभ्यासासाठी एक मार्गदर्शक व मूलभूत स्वरूपाचा असून त्याचे कायमस्वरूपी महत्त्व राहणार आहे.

२.२.३ अनुभवजन्य किंवा अनुभववादी दृष्टिकोन (Empirical Approach) :

विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून राज्याच्या तसेच राज्य व नागरिक यांच्या संबंधामध्ये मोठ्या प्रमाणावर विस्तार होऊ लागला. राज्याची कार्ये केवळ शासनसंस्थेपुरती मर्यादित न राहता ती सर्वव्यापी होऊ लागली. यामधूनच आधुनिक राज्यशास्त्राचा उदय झाला. या आधुनिक राज्यशास्त्राचा पाया हा अनुभववादी दृष्टिकोन आहे, असे मानले जाते. या दृष्टिकोनाला 'मूल्यनिरपेक्ष दृष्टिकोन' असेही म्हणतात.

ॲरिस्टॉटलने १५८ राज्यघटकांचा तुलनात्मक अभ्यास करून त्या अनुभवावर आधारित निष्कर्ष काढले होते. त्या अर्थाने ॲरिस्टॉटल हा या दृष्टिकोनाचा पुरस्कर्ता आहे. हॉब्ज, लॉक, रुसो, बेंथम, मिल यांनीसुद्धा मानवी अनुभवाच्या आधारे आपले सामाजिक कराराचे, राज्याच्या कार्याचे तसेच उपयोगितावादाचे सिद्धांतन केले आहे.

सिडने वेब आणि बिट्रीस वेब यांनी अर्थशास्त्रामध्ये पहिल्यांदा अनुभवजन्य दृष्टिकोन मांडला व पुढे मॅक्स वेबर, रिकेट, हर्बट सायमन, डेव्हिड ईस्टन, आल्मंड, बेंटले इ. नी हा सिद्धांत विस्ताराने मांडला आहे. ह्यूम, मुरे, वुड्रो विल्सन, आर्थर बेंटले, लॉर्ड ब्राईस, ग्रॅहम वालास यांनीही अनुभववादी दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे. वॉल्टर बेजहॉट यांनी 'ब्रिटीश कॉन्स्टिट्यूशन' या ग्रंथात तर ग्रॅहम वालास यांनी 'ह्यूमन नेचर इन पॉलिटिक्स' (१९०८) या ग्रंथामध्ये अनुभवजन्य दृष्टिकोनातून विचार मांडले आहेत. शिकागो विद्यापीठामधील चार्लस् मेरियम यांनी १९०८ मध्ये 'प्रायमरी इलेक्शन' हा ग्रंथ अनुभववादी दृष्टिकोनाचा स्वीकार करून लिहिला आहे. 'न्यू अस्पेक्टस् ऑफ पॉलिटिक्स' (१९२५) या मेरियम यांच्या ग्रंथात त्यांनी वैज्ञानिक पद्धतीचा, राजकीय प्रक्रियेचा विकास होण्याच्या दृष्टिने लेखन केले आहे. थोडक्यात, अमेरिकन विचारवंतांनी या दृष्टिकोनाचा जोरदार पुरस्कार केला आहे.

२.२.३.१ अनुभववादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये :

या दृष्टिकोनाची महत्त्वाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतात.

१) मूल्यनिरपेक्ष दृष्टिकोन :

अनुभववादी दृष्टिकोन हा 'मूल्यनिरपेक्ष दृष्टिकोन' म्हणून ओळखला जातो. अनुभववादी विचारवंत मूल्ये, आदर्श यांना विशेष स्थान देत नाहीत. त्यांच्या मते, मूल्ये किंवा आदर्श या बाबी व्यक्तिनिष्ठ स्वरूपाच्या असतात. वास्तवतेच्या कसोटीवर या मूल्यांची पडताळणी केली जाऊ शकत नाही. संशोधकाने पूर्वग्रहीत अशी मूल्ये धरता कामा नये. त्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून मिळणाऱ्या म्हणजेच निरीक्षण, प्रयोग, माहितीचे संकलन इ. द्वारे उपलब्ध होणाऱ्या माहितीवरून आपले निष्कर्ष काढले पाहिजेत. अनुभववादावर विकसित झालेला वर्तनवाद हा पूर्णपणे मूल्यनिरपेक्षतेवर भर देतो. अनुभव, निरीक्षण इ. द्वारे मिळालेले ज्ञान हेच खरे ज्ञान असते, असे हा दृष्टिकोन मानतो.

२) अनुभवनिष्ठ ज्ञानावर भर :

हा दृष्टिकोन राज्यशास्त्राच्या अध्ययनासाठी राजकीय व्यवहारातील प्रत्यक्ष अनुभवाला विशेष महत्त्व देतो. अनुभवाद्वारे मिळणारे प्रत्यक्ष ज्ञान हाच ज्ञानसंपादनाचा खरा मार्ग होय, असे या दृष्टिकोनाचे पुरस्कर्ते मानतात. त्यांच्या मते, अशा प्रकारचे ज्ञान अभ्यासाविषयाची परिपूर्ण माहिती होण्यास उपयुक्त ठरते कारण ते वस्तुस्थितीवर आधारित असते.

३) विश्लेषणावर भर :

पारंपारिक राज्यशास्त्राच्या दृष्टिकोनामधील वर्णनात्मक पद्धतीऐवजी हा दृष्टिकोन विश्लेषणावर भर देतो. नवीन तंत्रे आणि नवीन पद्धतीच्या शोधामुळे राजकीय प्रश्नांचे विवेचन व विश्लेषण करणे अधिक सोयीचे झाले.

पूर्वीच्या अभ्यासपद्धतीमध्ये ढोबळ मानाने संकल्पना मांडण्यात येत असल्यामुळे त्यामध्ये मोठी अस्पष्टता होती. परंतु नवीन पद्धतीमुळे अनेक बाबीमध्ये स्पष्टता येऊ लागली. वर्तनवाद, व्यवस्थावाद इ. सिद्धांत या अनुभववादी दृष्टिकोनामधून उदयास आलेले आहेत, असे म्हटले जाते.

४) आधुनिक शास्त्रीय पद्धतीचा अवलंब :

अनुभववादी विचारवंत संशोधनासाठी आधुनिक शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करतात. हा दृष्टिकोन वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करतो. शास्त्रीय पद्धतीमधील निरिक्षण, सर्वेक्षण, मुलाखती, परिमाणीकरण, गणिती पद्धती इ. चा. अवलंब करून निष्कर्ष काढतात. उदा. डेव्हिड ईस्टन यांनी मांडलेल्या वर्तनवादी सिद्धांतामध्ये शास्त्रशुद्धतेवर भर देऊन आधुनिक शास्त्रीय पद्धतींच्या आधारे मानवी वर्तनाचा अभ्यास केला आहे.

५) आंतरविद्याशाखीय स्वरूप :

अनुभववादी दृष्टिकोन राज्यशास्त्राचे अध्ययन करीत असताना सर्व सामाजिक शास्त्राच्या संबंधावर व अभ्यासावर भर देतो. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, सांख्यिकीशास्त्र, जीवशास्त्र इ. शाखेतील सिद्धांताचा वापर या दृष्टिकोनामध्ये केला जातो. यामुळे या दृष्टिकोनाला आंतरविद्याशाखीय स्वरूप प्राप्त झाले आहे. वर्तनवाद, व्यवस्थावाद, कार्ल ड्वाइशचा राजकीय संसूचनवाद, राजकीय आधुनिकीकरण, राजकीय परिवर्तन इ. सिद्धांताचा आधार अनुभववादी दृष्टिकोन हा आहे.

६) परिवर्तनशीतेला मान्यता :

हा दृष्टिकोन स्थितीशील न राहता परिवर्तनशीलतेला मान्यता देतो. अनुभववादी विचारवंतांच्या मते, विशिष्ट परिस्थितीत मांडलेले किंवा प्रस्थापित केलेले सिद्धांत फक्त याच परिस्थितीमध्ये लागू होतात. मात्र परिस्थितीमध्ये बदल झाल्यावर ते सिद्धांत लागू होत नाहीत. अशावेळी बदललेल्या परिस्थितीचा अभ्यास करून, निरीक्षण करून त्या सिद्धांताची पुनर्मांडणी, पुनर्तपासणी केली पाहिजे.

७) अमेरिकन विचारवंतांचा प्रभाव :

अनुभववादी दृष्टिकोनावर अमेरिकन विचारवंतांचा मोठा प्रभाव आहे. यापूर्वी युरोपियन विचारवंतांचा प्रभाव पारंपारिक किंवा आदर्शवादी सिद्धांतावर होता. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेचा महासत्ता म्हणून उदय झाला. अमेरिकेमध्ये राज्यशास्त्राच्या अभ्यासासाठी फ्रँकफर्ट स्कूल, शिकागो स्कूल, रॉकफेलर फाऊंडेशन, फोर्ड फाऊंडेशन इ. द्वारा मोठ्या प्रमाणात चालना दिली गेली. डेव्हिड ईस्टन, टालकॉट पार्सन, आल्मंड आणि पॉवेल, रॉबर्ट मर्टन, चार्लस मेरियम, आर्थर बेंटले, बियर्ड, लॉवेल, ब्राईस, रॉबर्ट ढाल्ह इ. विचारवंतांनी अनुभववादी दृष्टिकोनाचा आधार घेऊन आधुनिक राज्यशास्त्राचा पाया रचला. यामध्ये अमेरिकन राज्यशास्त्रांनी १९०३ मध्ये स्थापन केलेल्या 'अमेरिकन पोलिटिकल असोसिएशनची' महत्त्वाची भूमिका आहे.

८) राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे व्यापक क्षेत्र :

अनुभववादी दृष्टिकोनाच्या अध्ययनामुळे राज्यशास्त्राचे अभ्यासक्षेत्र केवळ शासनसंस्था, राज्याचा अभ्यास एवढ्यापुरते मर्यादित राहिले नाही तर या अभ्यासक्षेत्राचा मोठा विस्तार झाला राज्यशास्त्रामध्ये केवळ राजकारणाचा अभ्यास करण्याऐवजी राजकीय प्रक्रियांच्या अभ्यासावर भर देण्यात येऊ लागला. राज्यशास्त्र हे केवळ युरोपकेंद्रीत न राहता ते तिसऱ्या जगामधील राजकीय व्यवस्था, राजकीय परिवर्तन यांचा अभ्यास करू लागले. अनुभववादी दृष्टिकोनामुळेच नवीन बदललेल्या राजकीय समस्यांचे आकलन करून सिद्धांतन करण्यात येऊ लागले.

२.२.३.२ अनुभववादी दृष्टिकोनाचे मूल्यमापन:

अनुभववादी दृष्टिकोन हा राज्यशास्त्राच्या अध्ययनासाठी महत्त्वाचा आहे. तरीही यामध्ये खालील प्रकारच्या काही उणीवा किंवा मर्यादा सांगता येतात.

१) मूल्यांना कमी महत्त्व :

अनुभववादी मूल्यांना महत्त्व न देता मूल्यनिरपेक्षतेवर भर देतात. परंतु मानवी वर्तनाचा विचार करता मूल्यांना महत्त्व देणे आवश्यक आहे. जर मूल्ये पूर्णपणे हद्दपार केली तर योग्य-अयोग्य, चांगले-वाईट यामधील फरक करणे कठीण होईल. तसेच चांगल्या मूल्यामुळे मानवजातीचे कल्याणच झाले आहे. आज स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय इ. जी मूल्ये आवश्यक असून त्याला महत्त्व दिले जाते ती पारंपारिक किंवा आदर्शवादी दृष्टिकोनाची देणगी आहे. वर्तनवाद मांडून डेव्हिड ईस्टनने मूल्यांना हद्दपार करण्याचा प्रयत्न केला परंतु त्याच डेव्हिड ईस्टनने उत्तर वर्तनवादी सिद्धांत मानून मूल्यांना पुनर्स्थापित केले. एकूणच मानवी जीवनात मूल्यांचे महत्त्व कायमच राहणार आहे.

२) अति तांत्रिकता व शास्त्रशुद्धता उपयोगी नाही :

अनुभववादी अतितांत्रिकता व अतिशास्त्रशुद्धतेवर भर देतात. संख्याशास्त्र, गणिती सिद्धांत इ. चा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. परंतु तरीही अनेक ठिकाणी अनुभववादी सिद्धांत कमी पडताना दिसतात. कारण राज्यशास्त्र हे जीवशास्त्र किंवा भौतिकशास्त्राप्रमाणे शुद्धशास्त्र नाही तर ते सामाजिकशास्त्र आहे. त्यामुळे अतितांत्रिकता किंवा अतिशास्त्रशुद्धता उपयोगी नाही. उदा. निवडणूक अंदाज शास्त्रामध्ये सर्व शास्त्रीय आधार घेऊन निष्कर्ष काढले जातात. तरीही अनेक वेळा निवडणूक अंदाजशास्त्राचे अंदाज चुकीचे ठरल्याचे दिसून येते.

वरीलप्रमाणे या दृष्टिकोनावर टीका होत असली तरी अनुभववादी दृष्टिकोनामुळे राज्यशास्त्राचे अध्ययन समृद्ध होण्यास मदत झाली आहे. समकालीन समस्यांचा वेध घेऊन त्याची सोडवणूक करण्याची राज्यशास्त्राची क्षमता या दृष्टिकोनामुळे वाढली आहे. त्यामुळे या दृष्टिकोनाला राज्यशास्त्रामध्ये महत्त्वाचे स्थान आहे.

२.२.४ वर्तनवादी दृष्टिकोन :

अर्थ –

१९ व्या शतकाच्या अंतिम दशकात राज्य, समाज व मानव याचे व्यवस्थित अध्ययन विद्यापीठीय स्तरावर सुरू झाले होते. या प्रकारच्या अभ्यासक्रमाला 'सामाजिक शास्त्रे' या नावाने ओळखले जाते. अमेरिकन कायदेमंडळाकडून एक समिती 'राष्ट्रीय विज्ञान निधी'वर विचार करण्यासाठी स्थापन करण्यात आली होती. विज्ञानातील उच्चस्तरीय संशोधनासाठी आर्थिक संसाधनाची तरतूद करण्यासाठी ही समिती निर्माण केली होती. सामाजिक शास्त्रांतर्गत येणाऱ्या विभिन्न विषयाच्या प्रतिनिधींनी आर्थिक सहाय्यता मिळविण्यासाठी सामाजिक शास्त्राला 'समाज विज्ञान' असे घोषित केले; परंतु याला समाज विज्ञानाऐवजी 'वर्तनवादी शास्त्रे' असा शब्दप्रयोग करण्यात आला. सुरुवातीला वर्तनवादी विज्ञान याअंतर्गत मानसशास्त्र, मानववंशशास्त्र व समाजशास्त्र या विषयांचाच समावेश होता; परंतु नंतर राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, कायदा याही विषयांचा अंतर्भाव यात करण्यात आला.

वर्तनवाद हा सिद्धांत नसून ती एक क्रांती आहे. पारंपरिक राजकीय सिद्धांताच्या आधारावर ज्या व्यवस्थांचा ऱ्हास होत चालला होता. त्यांना स्थिरता प्राप्त करण्यासाठी वर्तनवादाचा विकास करण्यात आला. वर्तनवाद म्हणजे मानवी वर्तनाचा राजकीय व्यवस्थेवर पडणाऱ्या प्रभावाचा अभ्यास होय. प्लेटो, पासून ते आधुनिक विचारवंतापर्यंत अनेकांच्या विचारात वर्तनवाद दिसून येतो.

१९०८ साली आर्थर बेंटले यांनी 'Process of Government : A Study of Social Procedure' हा ग्रंथ लिहून वर्तनवादाची उत्पत्ती स्पष्ट केली. बेंटलेच्या मते, राज्यशास्त्र निर्जीव आहे कारण राजकीय सिद्धांतात 'का?' पेक्षा 'कसा?' याचा विचार व्हायला पाहिजे. चार्ल्स मेरीयम म्हणतात की, ''राज्यशास्त्रात शास्त्रीय पद्धती आणि तंत्र जास्त विकसित करण्याची गरज नाही. काही काळानंतर राज्यशास्त्रात अन्य शास्त्राप्रमाणे

औपचारिक अभ्यासापेक्षा नवीन आयामांच्या अभ्यासाला महत्व प्राप्त होईल.'' त्यामुळे वर्तनवाद्यांनी सार्वजनिक वितरण प्रणाली, व्यक्तिगत दृष्टिकोन, विश्वास, सार्वजनिक शिक्षण, आधुनिक विचारांवर लक्ष केंद्रीत केले. १९०८ मध्ये ग्राहम वालास यांनी 'Human Nature of Politics' हा ग्रंथ लिहून राजकीय सिद्धांताच्या मांडणीत बदल घडवून आणले व हळूहळू नंतरच्या काळात वर्तनवादाचा विकास होत गेला.

राजकीय वर्तन :

राजकीय वर्तन हा शब्दप्रयोग अमेरिकन राज्यशास्त्रज्ञाद्वारे सर्वप्रथम दुसऱ्या महायुद्धानंतर करण्यात येऊ लागला. पत्रकार फ्रँक केंट यांनी १९२८ मध्ये 'पॉलिटिकल बिहेवियर' हे पुस्तक प्रकाशित केले व यामध्ये राजकीय वर्तन हा शब्दप्रयोग केलेला होता. या शब्दाला सन्मानास्पद स्थान मिळवून देण्याचे श्रेय स्वीडनचे एक विद्वान हर्बर्ट टिंग्स्टनद्रार लिखित 'पॉलिटिकल बिहेवियर - स्टडिज इन इलेक्शन स्टॅटिस्टिक्स' (१९३७) या पुस्तकाला दिले जाते.

डेव्हीड ट्र्यूमन यांच्या मते वर्तनवादी राज्यशास्त्रात दोन गोष्टी येतात.

(१) संशोधन व्यवस्थित व्हायला पाहिजे.

(२) त्याचा संग्रह अनुभवावर व प्रयोगावर आधारित असावा.

राजकीय सिद्धांतवाद्यांचे लक्ष्य राजकीय प्रक्रियांचा एक विज्ञान म्हणून विकास करणे हा आहे. यावरून असे लक्षात येते की, वर्तनवाद हे पारंपरिक राजकीय सिद्धांतामधील चुकांविरुद्ध व त्यामुळे निर्माण झालेल्या अकार्यक्षमतेविरुद्ध उभारलेले आंदोलन आहे. वर्तनवाद म्हणजे नवीन शास्त्र नाही. तर राज्यशास्त्रातील राजकीय सिद्धांतात अनुभवी व वैज्ञानिक पद्धती निर्माण करणारी एक क्रांती आहे. आधुनिक काळाच्या समस्या सोडविण्यात पारंपरिक राजकीय सिद्धांत अयशस्वी ठरल्यानंतर त्या समस्या सोडविण्यासाठी राज्यशास्त्रात वैज्ञानिकता आणण्याचा प्रयत्न केला व त्याद्वारे राजकीय सिद्धांतात आमुलाग्र परिवर्तन झाले हे परिवर्तन घडवून आणण्याचे श्रेय वर्तनवादाला देता येईल.

वर्तनवादाचा अर्थ स्पष्ट करताना रॉबर्ट डाल लिहितो,

१. वर्तनवादी हे राज्यशास्त्रांतर्गत एक असे विरोधी आंदोलन आहे, ज्यात अनेक राज्यशास्त्रज्ञ विशेषत: अमेरिकन राज्यशास्त्रज्ञ आहेत जे पारंपरिक राजकीय सिद्धांताविषयी असंतुष्ट आहेत, हे आंदोलन पारंपारिक राज्यशास्त्रातील विभिन्न घटक जसे इतिहास, तत्त्वज्ञान, कायदा, संस्था इत्यादी यांच्या विरोधातील एक प्रतिक्रिया आहे.

२. वर्तनवादी समर्थक असे मानतात की, अभ्यासाची नवीन पद्धत विकसित करावी, ज्याच्या साह्याने राज्यशास्त्रात परिवर्तन घडवून आणण्यास मदत होईल.

३. हे एक असे आंदोलन आहे, ज्याचा उद्देश राज्यशास्त्राच्या अध्ययनाला अधिक वस्तुनिष्ठ बनवावे तसेच मानसशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्रातील विकसित संकल्पनेच्या साह्याने अचूक संशोधनाच्या जवळ जाता येईल.

४. हा एक असा प्रयत्न आहे जो राज्यशास्त्रातील अनुभवात्मक तत्त्वांना अधिक शास्त्रशुद्धता प्रदान करेल.

५. ज्याचा उद्देश प्रशासनासंबंधी सर्व घटकांना मनुष्याच्या दैनंदिन कामकाजात उपयोगी पडू शकतील की ज्याचे परीक्षण, पुनर्निरीक्षण करता येईल.

६. वर्तनवादी विषयाच्या अनुभविक तत्त्वांना अधिक वैज्ञानिक व शास्त्रीय बनविण्याचा प्रयत्न आहे. हा एक असा दृष्टिकोन आहे, ज्याचा उद्देश राजकीय जीवनाला अधिक अनुभविक बनविणे तथा संशोधन पद्धती सिद्धांत यात काटेकोरपणा आणणे.

डेव्हिड इस्टन :

वर्तनवादाचा भर वस्तुनिष्ठ संशोधनावर आहे व याच्या अध्ययनाचा उद्देश मानवाचे वर्तन ज्याचे प्रत्येक व्यक्तीद्वारे पर्यवेक्षण, मापन आणि सत्य पडताळणी करता येऊ शकते याच्याशी संबंधित आहे. राज्यशास्त्राची शास्त्रीय व्याख्या विकसित करण्याबरोबरच वर्तनवाद, मनोवैज्ञानिक आदर्शवाद यांच्याविरुद्ध वास्तववाद, निवडणूक वर्तन यासंदर्भात अभ्यास करण्याची नवीन पद्धत आहे.

वर्तनवाद एक असा दृष्टिकोन आहे, ज्याचा उद्देश विश्लेषणाची एक नवी पद्धत, नवी संकल्पना, नवे अध्ययन तंत्र, तथ्य संकल्पनाचे मार्ग आणि शास्त्रीय सिद्धांताचा विकास या संदर्भातला एक मार्ग आहे. वर्तनवादाने नैसर्गिक शास्त्र आणि सामाजिक शास्त्रांमध्ये गुणात्मकता निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

वर्तनवाद हा राजकारणाच्या अभ्यासाचा एक नवा दृष्टिकोन आहे. या दृष्टिकोनाच्या आगमनानंतर राज्यशास्त्रात इतके परिवर्तन घडून आले की, त्याला वर्तनवादी क्रांती असे संबोधले जाते. ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे की, व्यवस्था विश्लेषण आणि संरचनात्मक – कार्यात्मक दृष्टिकोन यासारखे सिद्धांत स्वयं राजकारणाचे स्पष्टीकरण करू पाहतात, परंतु वर्तनवाद राजकारणाचे कोणतेही स्पष्टीकरण देत नाही. तो केवळ राजकारणाच्या अध्ययनाची एक चौकट पुरवतो, ज्याचा वापर करून राज्यशास्त्रज्ञ आपापले निष्कर्ष काढू शकतात.

२.२.४.१ वर्तनवादी दृष्टिकोनाचा विकास :

ग्राहम वालासचे पुस्तक 'ह्युमन नेचर इन पॉलिटिक्स' तसेच आर्थर बेंटले 'द प्रोसेस ऑफ गव्हर्नमेंट' प्रकाशित झाले. त्या काळी या दोन पुस्तकांचे प्रकाशन राज्यशास्त्राच्या अध्ययन प्रणालीतील परिवर्तनाचे प्रतीक होते. राजकारणातील अनौपचारिक घटकावर अधिक भर व राज्याच्या राजकीय संस्थावर कमी भर देण्यात येऊ लागला. राज्यशास्त्राच्या अध्ययनात समाजशास्त्र, मानसशास्त्र यासारख्या सामाजिक शास्त्राच्या शाखांचा मोकळेपणाने आधार घेण्यात येऊ लागला.

वर्तनवादी दृष्टिकोन दुसऱ्या महायुद्धातील गुंतागुंतीच्या परिस्थितीची उपज आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी अनेक युरोपियन तज्ञांना भीतीपोटी अमेरिकेत आश्रय घ्यावा लागला. युद्धकालीन परिस्थितीने त्यांना अनुभववादी तसेच मूल्यनिरपेक्ष बनावे लागले. यातूनच वर्तनवादी क्रांतीचा जन्म झाला.

वर्तनवादाचा आधार अनुभववाद आहे. राज्यशास्त्रात अनुभववादाचा इतिहास फार जुना आहे. याचा आधुनिक जनक जॉन लॉकला मानले जाते. समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञांच्या प्रभावामुळे राज्यशास्त्रज्ञही वर्तनवादाकडे झुकलेले दिसतात. अमेरिकेत चार्ल्स मेरियमने (१८७४-१९५३) सर्वप्रथम वर्तनवादाचे समर्थन केले. मेरियमचे पुस्तक 'न्यू अस्पेक्टस ऑफ पॉलिटिक्स' (१९२५) या ग्रंथाने वर्तनवादी दृष्टिकोनाचा प्रथम संकेत दिला. मेरियमच्या नेतृत्वाखाली राजकीय तज्ज्ञांच्या समूहाने राज्यशास्त्राला समाजशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, सांख्यिकी, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र या विषयांच्या जवळ आणण्याचा प्रयत्न केला. राजकीय प्रक्रियेच्या अध्ययनात १९२५ पासून महत्त्वपूर्ण विकास झाला. यापैकी काहींचा उल्लेख येथे करता येऊ शकतो. या अध्ययनात गॉस्नेल, राइस, कॅथलिन, अलबर्ट गीज, बॉटुट, थर्स्टन तसेच फ्लॉरस यांचे लेखन उल्लेखनीय आहे. यांच्या लेखनामुळेच वर्तनवादी विचाराला चालना मिळाली. लासवेल (१९०२-१९७८) लिखित 'साइको पॅथोलॉजी अँण्ड पॉलिटिक्स' या पुस्तकातील मनोविश्लेषणाच्या दृष्टिकोनातून राजकीय व्यक्तिमत्वाचा अभ्यास एक निर्भीड तथा मौलिक आणि आपल्या पद्धतीने साहसपूर्ण कार्य आहे. लासवेलनेच १९३६ मध्ये 'कोणाला, काय आणि कसे प्राप्त होते' असा अभ्यासविषय सांगितला म्हणून राजकारणाच्या विश्लेषणात निवडणुका आणि राजकीय पक्षांच्या अभ्यासावर भर दिला जाऊ लागला.

शिकागो विद्यापीठातील त्रिमूर्ती - टी. व्ही. स्मिथ, चार्ल्स मेरियम, हेराल्ड लासवेल यांना अभिनव राज्यशास्त्राचे संस्थापक म्हटले जाते. चार्ल्स मेरियम 'स्पेशल साइन्स रिसर्च काउन्सिल'चे पहिले चेअरमन होते, ज्यांनी 'न्यू आस्पेक्टस ऑफ पॉलिटिक्स' या पुस्तकातून राज्यशास्त्राला विज्ञानाधिष्ठीत बनविण्याची घोषणा केली. मेरियमच्या प्रेरणेने शिकागोतील अभ्यासक संप्रदाय वर्तनवादाचा बालेकिल्ला बनला. मेरियमच्या प्रेरणेनेच वर्णन आणि विश्लेषणाची सांख्यिकीय प्रयोगपद्धती वापरण्यास सुरुवात केली. व्यक्ती व व्यक्तिसमूहाच्या राजकीय आचरणाचाही अभ्यास करण्यास सुरुवात झाली. मेरियमच्याच शब्दांत राजकीय व्यक्तिमत्त्वाच्या अध्ययनासंबंधी तथा. सामाजिक आणि राजकीय वर्तनावर निर्णयाची प्रक्रिया तसेच इतर घटकांच्या प्रभावाने राजकीय प्रक्रियेवर कसा प्रभाव पडतो, या संदर्भात ज्ञान मिळविण्यासाठी ही पद्धत उपयोगी पडते. मेरियमनंतर लासवेल, डेव्हिड इस्टन, आल्मंड, कोलमन, कार्ल डवाइश, एडवर्ड शिल्स इत्यादींनी वर्तनवादी अभ्यासाच्या विकासात मोलाची भर टाकली आहे. रॉबर्ट ए डाल आणि सिमूर एम. लिपसेट यांनी संशोधनासाठी सिद्धांत निर्मितीवर भर दिला.

राजकीय सिद्धांताची असमर्थता, आधुनिक जगासमोरील समस्यांच्या निराकरणाची अयशस्विता आणि बदललेल्या संदर्भांनी शास्त्रांसमोर निर्माण केलेली शास्त्रियतेची अट मुख्यत्वे करून वर्तनवादाच्या उगमाला कारणीभूत ठरली आहेत. सिद्धांतात घडून येणारे बदल ही एक अव्याहत प्रक्रिया आहे. निरंतर चालणाऱ्या संशोधनामुळे राजकीय सिद्धांतात बदल घडून येणे सहज शक्य आहे. काळाच्या ओघात तसे बदलही घडून

आले आहेत. परंतु २० व्या शतकात राज्यशास्त्राचा नव्या अंगाने अभ्यास करण्यास सुरुवात झाली. त्यामुळे राजकीय सिद्धांतांना आधुनिक काळातील समस्यांशी एकरूप करण्याच्या प्रयत्नातून राजकीय सिद्धांतात जे बदल घडून आले. त्यालाच वर्तनवादी क्रांती किंवा वर्तनवादी सिद्धांत म्हटले गेले. याच काळात आधुनिक व्यवस्थेच्या अनुषंगाने नविन राजकीय सिद्धांताची मांडणी करण्याची स्पर्धा सुरू झाली. ही राजकीय सिद्धांतातील परिवर्तनाची क्रांती म्हणजे वर्तनवाद होय.

२.२.४.२ वर्तनवादी दृष्टीकोनाच्या उदयाची कारणे :

राजकीय विचाराच्या इतिहासात वर्तनवादाची सूत्रे काही प्रमाणात अस्ताव्यस्तपणे प्लेटो-ॲरिस्टॉटल, मॅकियाव्हेली, जॉन लॉक, मॉन्टेस्क्यू यांच्या विचारात मिळते; परंतु एक सिद्धांतरूपाने वर्तनवाद २० व्या शतकाचीच देण आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर शासन आणि राजकारणाच्या अध्ययनात वर्तनवादी अध्ययन पद्धतीला अधिक महत्त्व दिलेले आहे. याला विकसित करण्याचे श्रेय अमेरिकन राज्यशास्त्रज्ञांना (शिकागो आंदोलन) आहे. वर्तनवादाचा उदय आणि विकासाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

अ) परंपरागत अध्ययन पद्धतीच्या मर्यादा :

२० व्या शतकाच्या प्रारंभी अनेक राज्यशास्त्राच्या अभ्यासकांची परंपरागत राज्यशास्त्राच्या अध्ययन पद्धतीने निराशा केली. परंपरागत राज्यशास्त्राच्या अध्ययन पद्धतीविषयी राज्यशास्त्रामध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. त्यांचे असे मत होते की, पारंपरिक राज्यशास्त्राच्या अभ्यासाने राजकीय जीवनाची वास्तविकता आपल्यासमोर येऊ शकत नाही.

१. राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी असा अनुभव घेतला की, शासनाच्या धोरण निर्मितीमध्ये राजकीय प्रतिनिधी, राजकीय नेते यांना सन्मानजनक स्थान दिले जात होते; परंतु राज्यशास्त्राचे तज्ञ, अभ्यासकाचे ज्ञान, कौशल्य व त्यांच्या अनुभवाची उपेक्षा करण्यात आली. ज्यामुळे यांच्यात निराशा उत्पन्न झाली.

२. राज्यशास्त्रज्ञांना या गोष्टीची पक्की खात्री झाली की, अध्ययनात ज्या सैद्धांतिक घटकावर भर दिला जात होता तो पुरेसा व विश्वसनीय नव्हता. सिद्धांत व वास्तव राजकारण यांच्यात अंतर मोठे होते. राजकीय समस्यांचे विश्लेषण करण्याची ताकद पारंपरिक राज्यशास्त्रात नव्हती.

३. दोन महायुद्धांच्या मधल्या काळात फॅसिझम, नाझिझम, सर्वंकषवाद व समाजवादी शासनपद्धतीचा उदय, विकास व लोकप्रियतेच्या कारणांचा शोध घेण्याची ताकद पारंपारिक राज्यशास्त्राकडे नव्हती. या घटकाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे वास्तविकतेकडे पाठ फिरवण्यासारखे होते.

४. पारंपारिक राज्यशास्त्राची अभ्यासपद्धती वर्णनात्मक होती तसेच तत्त्वज्ञान, संस्था, औपचारिक घटक, कलह व ऐतिहासिक पद्धत या घटकाच्या बाहेर जाणारी नव्हती. राजकीय प्रक्रियेवर प्रभाव टाकणाऱ्या अनौपचारिक घटकांना यात स्थान नव्हते.

५. अन्य विषयांनी जसे समाजशास्त्र, मानसशास्त्र इत्यादींनी नवीन पद्धतीचा अवलंब केल्याने नवनवीन ज्ञानशाखा त्यांना उपलब्ध झाल्या, त्या प्रमाणात राज्यशास्त्र मागे राहिले.

६. दुसऱ्या महायुद्धापर्यंत फक्त युरोप, अमेरिका यांच्यापुरतेच राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे स्वरूप होते; परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर नव्याने स्वतंत्र झालेल्या आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका या नवस्वतंत्र राष्ट्रांचा राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी पारंपारिक राज्यशास्त्राकडे व्यवस्था नव्हती. येथील समस्यांचा अभ्यास करण्यासाठी यंत्रणा अपुरी होती. म्हणूनच राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या कक्षा वाढविण्याची गरज होती, ती वर्तनवादी क्रांतीने शक्य झाली होती.

७. पारंपारिक राजकीय सिद्धांत राज्य आणि शासनसंस्था यापलिकडे जाऊन अभ्यास करायला तयार नाही. आधुनिक काळात मात्र राज्य व शासनसंस्थेच्या क्रिया प्रतिक्रियांवर इतर समाज घटकांचा प्रभाव दिसून येऊ लागला. त्यामुळे राजकारणाचे संदर्भ आणि प्रक्रिया बदलण्यास सुरुवात झाली. वर्तनवाद्यांनी याच आधारावर राजकारणावर प्रभाव पाडणाऱ्या अंतर्गत व बाह्य घटकांच्या अभ्यासाचा आग्रह धरल्याचे आपणास दिसून येते.

ब) इतर सामाजिक शास्त्रांची प्रेरणा : इतर सामाजिक शास्त्रांनी अभ्यासाच्या नवीन मार्गांचा अवलंब केला. समाजशास्त्रज्ञ अगस्त कॉम्त यांनी प्रत्यक्षार्थवाद मांडला, तेव्हा राज्यशास्त्रही यापासून कसे मागे राहू शकेल? म्हणून रॉबर्ट डाल म्हणतो, वर्तनवाद एक असे आंदोलन आहे ज्याचा उद्देश राजकीय अभ्यासाला अधिक प्रगत बनविण्यासाठी मानसशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्रातील विकसित सिद्धांत, पद्धती, संशोधन आणि दृष्टिकोन यांच्या संपर्कात आणणे हा उद्देश आहे.

क) दुसऱ्या महायुद्धाचा परिणाम : दुसऱ्या महायुद्धाने वर्तनवादाला गती प्राप्त झाली. युद्धकालीन घटनांनी राज्यशास्त्रज्ञांच्या मनाची जी खात्री झाली की राजकीय जीवनाची गुंतागुंत समजून घेण्यासाठी संस्था आणि तिची संरचना या अभ्यासक्रमाबाहेर येऊन संस्था आणि त्याअंतर्गत काम करणाऱ्या व्यक्तीच्या वर्तनाचा अभ्यास केला पाहिजे.

अभ्यास पद्धतीने नवनवीन प्रयोग : दुसऱ्या महायुद्धानंतरच्या दशकात राज्यशास्त्रांतर्गत नवीन अभ्यास पद्धतीच्यानिर्मितीवर जोर देण्यात आला. परीक्षण, प्रयोगपद्धती, संशोधन साहित्य, सर्वेक्षण पद्धती, सांखिकीय विश्लेषण, गणितीय प्रारूप, सर्वेक्षण यासारख्या माध्यमांचा अवलंब करून राजकीय वर्तनाच्या अध्ययनाला वस्तुनिष्ठ बनविले पाहिजे. अशा पद्धतीने नवीन अभ्यास पद्धतीचे समर्थन करण्यात आले.

२.२.४.३ वर्तनवादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये :

डेव्हिड इस्टनने त्याच्या "The Political System : An Enquiry into the state of Political Science" या ग्रंथात वर्तनवादाची काही वेशिष्ट्ये सांगितली आहेत. त्यांनी त्याला बौद्धिक आधारशीला असे नाव दिले. या आधारावरच समस्त वर्तनवादाची इमारत उभी करता येऊ शकते. ही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. नियमितता किंवा सात्यतता :

वर्तनवादी मानतात की वर्तनवादाच्या सहाय्याने सामान्य सिद्धांताचा शोध घेता येऊ शकतो. राजकीय प्रक्रियेत काही अशा प्रवृत्ती असतात त्या त्या वारंवार घडतात. या आधारावर काही निष्कर्ष काढता येऊ शकतात. या संदर्भात काही भविष्यवाणी करता येते. या कोणत्याही शास्त्राच्या मुख्य कसोट्या असतात. मतदार-वर्तनाच्या अभ्यासावरून असे आढळते की, मतदारांचा सामाजिक, आर्थिक, दर्जा, व्यावसायिक-जातीय प्रतिष्ठा वगैरे गोष्टींच्या आधारे एक आकृतीबंध तयार होतो. त्या आधारे अभ्यासक मतदारवर्तनाचे स्पष्टीकरण व भाकीत कथन करू शकतो.

२. पडताळा : (Verification)

वर्तनवादी असे समजतात की, मानवीय वर्तनाच्या संदर्भातील उपलब्ध ज्ञान अनुभववादी घटकाच्या आधारावर त्याची पडताळणी करता येते. मुळात पडताळा हा वैज्ञानिकतेचा आधार आहे. संशोधनाच्या संदर्भात करावयाच्या सर्व विधानांना अनुभवसिद्ध पुराव्यांचे आधार असलेच पाहिजेत. ज्ञान, नियम, सिद्धांत याची वैधता निरीक्षणक्षम प्रयोगानी सिद्ध झाली पाहिजे.

३. तंत्रे :

वर्तनवादी संशोधन सामग्रीचा संग्रह करते आणि त्याची व्याख्या करण्यासाठी अध्ययन तंत्राचा वापर अधिक फायदेशीर ठरतो. नैसर्गिक शास्त्रांमध्ये प्रचलित असलेल्या अध्ययनतंत्रांचा अवलंब करून राज्यशास्त्रीय तथ्यांचे संकलन व विश्लेषण केले पाहिजे. काटेकोर अशा गणितीय पद्धतीने प्रस्थापित केलेली मांडणी निश्चितच वादातीत व अधिक विश्वसनीय असते. त्याचप्रमाणे तौलनिक अध्ययनाच्या दृष्टीने ती अधिक उपयुक्त ठरू शकेल. यादृष्टीने सर्वेक्षण पद्धती, आशय विश्लेषण, नमुना पद्धत अशी तंत्रे वर्तनवादी अभ्यासकांनी हाताळली आहेत.

४. परिमाणीकरण : (Quantification)

वर्तनवाद्यांच्या मते, उपलब्ध साधनसामग्री व तथ्यामध्ये स्पष्टता व निश्चितता आणण्यासाठी परिमापन व परिमाणीकरण केले पाहिजे. म्हणजेच मोजमाप करण्याचा काटेकोर मार्ग म्हणून संख्याशास्त्रीय परिमापनाचा अवलंब वर्तनवादी अभ्यासकांनी मोठ्या प्रमाणावर केला. संख्यांच्या स्वरूपात शास्त्रीय घटिते मांडल्यामुळे त्यांच्या प्रतिपादनात नेमकेपणा येतो.

५. मूल्य निरपेक्षता :

वर्तनवादी अभ्यासकांनी नैतिक मूल्यांकन व तथ्यात्मक व्याख्या यात अंतर केलेले आहे. मूल्य व तथ्य यांना वेगळे ठेवले पाहिजे. लोकशाही, स्वातंत्र्य, समता यांसारखी मूल्ये कितीही उत्तम असली तरी त्यांचा खरे-खोटेपणा वा बरे-वाईटपणा शास्त्रीय कसोट्यांवर सिद्ध होणारा नसल्यामुळे त्यांच्याविषयी वस्तुनिष्ठ संशोधन केलेच जाऊ शकत नाही. संशोधनकार्य करीत असताना संशोधकाने स्वत:ची मूल्यांकन बांधिलकी व अग्रक्रम

दूर ठेवावेत.

६. क्रमबद्धतीकरण :

वर्तनवादी अभ्यासक असे म्हणतात की संशोधन क्रमबद्ध असले पाहिजे. तथ्य संकलन – विश्लेषण – स्पष्टीकरण – भाकीत कथन अशा पायऱ्या–पायऱ्यांनी पद्धतशीरपणे संशोधन केले जावे. संशोधनाला सिद्धांताची जोड मिळायलाच हवी. त्याखेरीज संशोधन अर्थपूर्ण होणार नाही. मात्र वर्तनवादी दृष्टिकोनातील या सिद्धांताचे स्वरूप अभिजात परंपरेतील चिंतनपर सिद्धांतापेक्षा मूलत: निराळे असते. या सिद्धांताचे स्वरूप कार्यकारणात्मक स्वरूपाचे असते. 'नीट मांडलेल्या व तर्काने परस्परांशी जोडल्या गेलेल्या अशा संकल्पनांच्या आधारे उभी केलेली प्रमेये' असे त्यांचे स्वरूप असते. पुन्हा पुन्हा चाचण्या करून अंतिम सिद्धांत मांडता येतात. सर्वसाधारण – सार्वत्रिक सिद्धांत निर्माण करता यावेत हा वर्तनवादी दृष्टिकोनाचा हेतू असला पाहिजे.

७. शुद्ध शास्त्र :

वर्तनवादी शुद्ध शास्त्र या दृष्टीने विचार करतात. ते या गोष्टीशी सहमत आहेत की सिद्धांताच्या साह्याने वास्तविक जीवनाच्या समस्यांना समजून घेता येते. इस्टन यांनी विशुद्ध शास्त्र या दृष्टिकोनातूनच संशोधनाची मांडणी केली आहे. या संशोधनाचा उपयोग सामाजिक–राजकीय प्रश्न सोडविण्यासाठी झालाच पाहिजे, असा आग्रह त्यांनी धरलेला होता.

८. आंतरविद्याशाखीय अभ्यास :

राजकीय संशोधन ठोस व परिपक्व व्हायचे असेल तर अन्य सामाजिक शास्त्रांचा जास्तीत जास्त उपयोग राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी करून घ्यावा. माणूस हा एकाच वेळी सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक घटकांनी प्रभावित असतो. तेव्हा स्वतंत्रपणे अभ्यास करून निष्कर्ष काढण्यापेक्षा यांचा एकत्रित अभ्यास करून निष्कर्ष काढले तर ते अधिक वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असू शकतात. थोडक्यात, मानवी वर्तनाचा अभ्यास विभागून करता येत नाही. तेव्हा आंतरविद्याशाखीय अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

२.२.४.४ वर्तनवादी दृष्टिकोनाचे मूल्यमापन :

पारंपरिक दृष्टिकोन केवळ पुस्तकी व चिंतनावर आधारित होता. केवळ मोठ्या प्रश्नांचा व नैतिक मूल्यांचाच त्यात विचार होई. समाजाच्या दैनंदिन राजकीय जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या लहान गोष्टींकडे त्यात दुर्लक्ष केले जाई. यावर टीका करून अभ्यास विषयाला शास्त्रीय स्वरूप देण्याचा खटाटोप त्यांनी केला; पण प्रत्यक्षात पद्धती शास्त्राची गुंतागुंत, अवास्तव तथ्याला महत्त्व यामुळे वर्तनवादी दृष्टीकोन टीकेचा विषय ठरला.

२० व्या शतकामध्ये राजकीय सिद्धांतात वर्तनवादाने एक आमुलाग्र बदल घडवून आणला व राजकीय सिद्धांतात एका नव्या क्रांतीचा जन्म झाला. पारंपारिक राजकीय सिद्धांत हे पारंपारिक शासन व्यवस्थेचा अभ्यास करणारे शास्त्र होते. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांसमोरील प्रश्न व समस्या सोडविण्यामध्ये पारंपारिक राजकीय सिद्धांत अयशस्वी ठरले. त्यामुळे अशा स्वतंत्र राष्ट्राच्या पुनर्बांधणीसाठी राजकीय सिद्धांतात संशोधन होऊ लागले. त्यामुळे पारंपारिक राजकीय सिद्धांतात निर्माण झालेल्या काही त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न

वर्तनवादात केला गेला. राजकीय सिद्धांतातील संशोधन पद्धती, त्यातील आशय-विश्लेषण अशा प्रकारची विविध नवीन तंत्रे वर्तनवादात नव्याने उपयोगात आणली गेली व त्यानुसार आधुनिक काळातील परिस्थिती लक्षात घेऊन राजकीय सिद्धांताची मांडणी करण्यात आली आहे. हे जरी सत्य असले तरी वर्तनवादी क्रांतीवर काही शास्त्रज्ञांनी टीका केल्याचे दिसून येते. या टीका शास्त्रज्ञांनी खालील मुद्यांच्या आधारे वर्तनवादावर केल्या आहेत.

१. भाषिक क्लिष्टता :

टीकाकारांच्या मते, वर्तनवादी लेखन साहित्यिक दृष्टीने अयोग्य आहे. क्लिष्ट लिखाण, अपरिचित शब्दरचना व नवीन पद्धतीचे स्तोम यामुळे वर्तनवाद्यांचे लेखन भरकटलेले दिसते.

२. शास्त्रीयीकरणाचा अभाव :

पद्धतीशास्त्र कितीही विकसित केले तरी राज्यशास्त्राचे मूळ स्वरूपच असे आहे की, नैसर्गिक शास्त्राच्या अर्थाने शास्त्रीय प्रतिष्ठा त्याला लाभूच शकत नाही. मानवी वर्तन हा विषय उंदीर वा वनस्पती यांच्याप्रमाणे तटस्थपणे अभ्यासलाच जाऊ शकत नाही. नियंत्रित परिस्थितीत प्रयोग करणे सामाजिक शास्त्रांना अशक्य असते. राज्यव्यवस्था व राजकीय प्रक्रिया यांचे स्वरूप सतत बदलत असते. व्यक्तीच्या राजकीय वर्तनाला असंख्य घटक प्रभावित करतात, त्याचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास अशक्यच असतो.

३. राजकीय वर्तनाची कल्पना अपुरी :

वर्तनवादी म्हणतात की, राज्यशास्त्रात संस्थात्मक अभ्यासाऐवजी राजकीय वर्तनाचा अभ्यास केला पाहिजे; परंतु वर्तनवादी मानवी वर्तनाचे विज्ञान प्रस्तुत करण्यात असमर्थ ठरले आहेत; कारण वर्तनवादी नियमिततेवर अत्यधिक भर देतात. नैसर्गिक शास्त्राप्रमाणे मानवी वर्तनाचे काटेकोर निष्कर्ष अशक्य असतात.

४. दुय्यम प्रश्नांना प्राधान्य :

पारंपारिक राजकीय सिद्धांतामध्ये ज्या प्रमाणे शासन संस्थाचा अभ्यास करून त्या व्यवस्थेसमोर निर्माण होणाऱ्या समस्येच्या निराकरणासाठी राजकीय सिद्धांताची निर्मिती केली जात असे. अर्थातच पारंपारिक राजकीय सिद्धांतात राजकीय व्यवस्था परिवर्तनावर भर देण्यात येत होता. तसेच पारंपारिक राजकीय सिद्धांतात मुख्य समस्येवर अधिक लक्ष देण्यात येत असे व त्या समस्येला केंद्रबिंदू मानून त्या समस्येच्या निराकरणासाठी राजकीय सिद्धांताची निर्मिती केली जात असे. वर्तनवादात अशा समस्येला प्रभावीत करणाऱ्या घटकांचा विचार करण्यात आला. त्यामुळे मुख्य समस्येकडून दुर्लक्ष होऊन वर्तनवाद आपल्या कार्यात अयशस्वी ठरला.

५. पद्धती शास्त्राचाअतिरेक :

राज्यशास्त्र हा सामाजिक शास्त्राचा घटक आहे, नैसर्गिक शास्त्राचा नाही. वर्तनवाद्यांनी राज्यशास्त्राला विशुद्ध शास्त्र बनविण्याचा प्रयत्न केला. यात राज्यशास्त्राचे स्वरूपच वर्तनवादी विसरले. प्रयोगशाळेत राज्यशास्त्राचे संशोधन करता येत नाही. काटेकोर व प्रयोगपद्धतीला इथे मर्यादा येतात.राजकीय सिद्धांतात अधिक शास्त्रीयता

प्राप्त करण्यासाठी अनेक पद्धती शास्त्राचा वापर वर्तनवादात केला गेला. परंतु त्याचा उपयोग राजकीय सिद्धांतामध्ये पाहिजे, त्या प्रमाणात होऊ शकला नाही. कारण नैसर्गिक शास्त्रातील तंत्र व पद्धती राजकीय सिद्धांतात उपयोगात आणणे कधीही शक्य होत नाही. पण तरीही राजकीय सिद्धांतातील निष्कर्ष हे काटेकोर असावे. त्या निष्कर्षाची पडताळणी करता यावी. यासाठी संख्याशास्त्राचा आशय विश्लेणाचा उपयोग करण्यात आला. परंतु राजकीय सिद्धांतात अशा तंत्र व पद्धतीचा वापर होऊ शकत नाही. त्यामुळे वर्तनवादात राजकीय सिद्धांत आशयाचा बळी ठरला अशी टीका केली जाते.

६. मूल्यनिरपेक्षतेचा अभाव :

वर्तनवादी मूल्यनिरपेक्ष संशोधनावर जास्त भर देतात; परंतु हे अशक्य आहे. संशोधनकर्त्याचे व्यक्तिगत मूल्य संशोधन निष्कर्षाला प्रभावित करत असतात. राज्यशास्त्र मूल्यनिरपेक्ष राहूच शकत नाही.

७. लोकशाही मूल्य व्यवस्थेचा विरोध :

लोकशाही व्यवस्थेचा मुख्य आधार सामान्य जनतेच्या विवेकशीलतेचा विश्वास आहे. ज्यामुळे व्यक्तीला राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याचा समान अधिकार प्राप्त होतो. वर्तनवाद्यांच्या अभ्यासानुसार विवेकशीलता, संघटन, क्षमता इत्यादी राजकीय घटकांचे वितरण समान न झाल्यामुळे अल्पसंख्य वर्गाचे शासन अनिवार्य बनते. लोकशाहीचा आधार मूल्य आहे; परंतु वर्तनवादी मूल्यव्यवस्थाच नाकारतात.

८. खर्चिक पद्धत :

वर्तनवादाची संशोधन पद्धत अतिशय खर्चिक आहे. अमेरिकेत वर्तनवादी अध्ययनाच्या नावावर करोडो डॉलर खर्च केला गेला.परंतु पाहिजे तसे निष्कर्ष निघत नाहीत. विशेष म्हणजे विकसनशील देशांत वर्तनवादी पद्धतींचा अवलंब करून संशोधन करणे हे अतिशय खर्चिक असल्यामुळे राज्यशास्त्रातील संशोधन विकासाला मर्यादा येतात. त्याच बरोबर विकसित देशांत वर्तनवादी पद्धती नुसार संशोधन करूनही पाहिजे तसे निष्कर्ष प्राप्त करता येत नाहीत.

९. इतर अभ्यास पद्धतीचे महत्त्व नाकारणे :

वर्तनवाद्यांनी अन्य अभ्यास पद्धतींचे महत्त्व नाकारलेले आहे; परंतु वर्तनवादी अभ्यासपद्धतही एकमेव नाही.अभ्यास पद्धत अनेक राज्यशास्त्रीय अभ्यास पद्धतींचा उपयोग करून राज्यशास्त्र संशोधकांना समस्यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून निष्कर्ष काढणे आवश्यक असते. अनेक मार्गाने अभ्यास करावा लागतो.

१०. उत्तरदायित्वाचा अभाव :

संशोधन प्रत्यक्ष व्यवहारात उपयुक्त असलेच पाहिजे असा आग्रह न धरल्यामुळे अभ्यासकांना सामाजिक उत्तरदायित्व उरलेच नाही.

यापैकी बहुतेक आक्षेप वर्तनवादी अभ्यासक मान्य करतात. त्यांचे म्हणणे एवढेच असते की संशोधनतंत्रे अपुरी व अविकसित असल्यामुळे वरील दोष उद्‌भवतात. तंत्रे अधिक कार्यक्षम करून ते टाळता येतील; पण वर्तनवाद प्राथमिक अवस्थेत किंवा बाल्यावस्थेत असण्यातून या उणीवा निर्माण झाल्या हे मान्य करता येत नाही. वर्तनवादाचे ते अंगभूत दोष आहेत, हेच अधिक पटते.

पारंपारिक व वर्तनवाद यातून राज्यशास्त्र अधिक विकसित होते.वर्तनवादी क्रांतीमुळेच आज राज्यशास्त्राला ऽआधुनिक राज्यशास्त्र' नावाने ओळखले जाते. मागील चार दशकांपासून राज्यशास्त्राची व्याप्ती व स्वरूप यात अभूतपूर्व वृद्धी झालेली आहे. वर्तनवादाच्या निर्मितीमुळेच संस्थांच्या औपचारिक अध्ययनाला आव्हान दिले गेले. राज्यशास्त्रातील बहुतांश अभ्यासकांनी तथ्यांचे महत्त्व स्वीकारले आहे. निवडणूक अभ्यास क्षेत्र विशेषकरून मतदाता व्यक्तीचे वर्तन या संदर्भातील अभ्यासाचे नवीन क्षेत्र उपलब्ध करून दिले. वर्तनवादाने अभ्यासाच्या नवीन पद्धती विकसित केल्या. उदाहरणार्थ तथ्य संकलन, क्रमबद्धता, विश्लेषण पद्धती, प्रश्नावली, तक्ते, गणितीय पद्धत आणि सांख्यिकीय सारणी, संगणकाचा वापर करून वर्तनवादाने राजकीय संशोधनाचे नवीन क्षेत्र निर्माण केले आहे. या अभ्यासाच्या प्रभावामुळेच पारंपारिक राज्यशास्त्राचे क्षेत्र विस्तारले. थोडक्यात, सूक्ष्म अभ्यासाची सुरुवात झाली. वर्तनवादाच्या तथ्यपूर्ण निष्कर्षांनी राज्यशास्त्राला सामाजिक अभियांत्रिकीचे एक माध्यम बनवले.

डेव्हिड इस्टनच्या मते, ''वर्तनवादी दृष्टिकोन संपूर्ण सामाजिक शास्त्रामध्ये विश्लेषणात्मक व व्याख्यात्मक सिद्धांताचे सूचक आहे.''

थोडक्यात राज्यशास्त्रातील वर्तनवादाचे योगदान खालीलप्रमाणे स्पष्ट करता येते -

१. वर्तनवादी क्रांतीने राज्यशास्त्राचे लक्ष्य, स्वरूप, विषयाची व्याप्ती, अभ्यास पद्धती यात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले.

२. वर्तनवादाने राज्यशास्त्राला शास्त्रीय आधार मिळवून दिला.

३. वर्तनवादाने राज्यशास्त्रामध्ये सुधारणाच केलेल्या नाहीत तर त्याचे स्वरूपच बदलून टाकलेले आहे. राज्यशास्त्राला नवी मुल्ये, नवी भाषा, नवी अभ्यासपद्धती तथा नवीन दिशा प्रदान केलेली आहे.

४. वर्तनवादाने राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या कक्षा व्यापक बनविल्या. औपचारिक घटकाबरोबरच राजकीय प्रक्रियेला प्रभावित करणाऱ्या अनौपचारिक घटकावरही लक्ष केंद्रित केले. .

५. आतापर्यंत राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी मूल्य तथा आदर्शांनाच महत्त्व दिले होते; परंतु वर्तनवादाने राज्यशास्त्राला वास्तवतेचा आधार मिळवून दिला.

६. वर्तनवादाने आपल्या शास्त्रीय अनुभववादाच्या माध्यमातून नवीन दृष्टिकोन व अभ्यासाच्या नवीन पद्धती विकसित केल्या.

निष्कर्षत: रूपाने असे म्हणता येईल की, वर्तनवादाची प्रमुख लक्षणे, शास्त्रीय पद्धत, अनुभववादी दृष्टिकोन व मूल्यनिरपेक्षवाद राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी आत्मसात केलेले आहेत. आधुनिक राज्यशास्त्राच्या निर्मितीत वर्तनवादाची भूमिका उल्लेखनीय आहे. वर्तनवादाच्या अभ्यासाने राज्यशास्त्राच्या कक्षा व्यापक बनल्या, राजकीय प्रक्रिया, राजकीय समस्या, याची मांडणी करून त्या सोडविण्यासंदर्भात मार्ग शोधण्यावर भर दिला गेला.

वर्तनवाद हा शासन आणि राजकारण यांचा व्यक्ती आणि गटांच्या राजकीय वर्तनाच्या संदर्भात शास्त्रशुद्धरित्या अभ्यास करणारा एक महत्त्वपूर्ण दृष्टिकोन मानला जातो. हा दृष्टिकोन व्यक्ती, गट, संस्था आणि संघटनांच्या औपचारिक भूमिकांवर भर देण्यापेक्षा व्यक्ती आणि गटांच्या प्रत्यक्ष वर्तनावर अधिक भर देतो. वर्तनवादाच्या स्वरूप आणि व्याप्तीविषयी अभ्यासकांमध्ये एकमत दिसून येत नाही. तथापि, वर्तनवादी अभ्यासक हे आपल्या अभ्यास आणि संशोधनामध्ये अधिक पद्धतशीरपणा, तसेच नेमकेपणा आणण्याचा प्रयत्न करतात. ते पद्धतशीरपणे मिळविलेल्या माहितीचे मोजमाप करतात, व्यक्ती आणि गटांच्या राजकीय वर्तनात असलेला सारखेपणा आणि नियमितपणा शोधून काढतात, त्यासाठी वस्तुनिष्ठ गृहीतके निर्माण करून ती संशोधनक्षेत्रात तपासून पाहतात. तत्त्व आणि व्यवहारात असलेला निश्चित संबंध ते शोधून काढतात. प्रत्यक्ष वर्तन आणि वस्तुस्थिती यांचा सिद्धान्ताशी मेळ घालणे हे वर्तनवाद्यांच्या दृष्टीने फार महत्त्वाचे असते. मानवी वर्तनाविषयीची माहिती आणि ज्ञान एकत्रित करून त्यांचा सामाजिक, राजकीय आणि आर्थिक अंगांशी असलेला संबंध शोधणे हेही वर्तनवाद्यांचे एक उद्दिष्ट असते.

२.२.५ उत्तर–वर्तनवादी दृष्टिकोन (Post-Behavioural Approach) :

''वर्तनवादी क्रांतीने आम्ही आमच्या विश्लेषणाला न्याय देऊ शकलो नाही, म्हणून आम्हाला उत्तर–वर्तनवादी बनले पाहिजे.'' – डेव्हिड इस्टन.

१९६० च्या दशकाच्या समाप्तीपूर्वीच डेविड इस्टनद्वारे जे स्वत: वर्तनवादी क्रांतीच्या प्रमुख समर्थकापैकी एक आहेत. त्यांनी वर्तनवादी दृष्टिकोनावर जोरदार हल्ला चढवला ते प्रथम वर्तनवादी जे आता उत्तर–वर्तनवादी बनले. इस्टनच्या म्हणण्यानुसार राजकारणाच्या आकलनास कठोर शास्त्रीय संशोधनपद्धतीच्या साच्यात परिबद्ध करण्याचा प्रयत्न केला जात होता, त्यास नवी दिशा देण्यासाठी इस्टनने 'उत्तर–वर्तनवादी क्रांती'चा उद्घोष केला.

२.२.५.१ उत्तर– वर्तनवादी दृष्टिकोनाचा अर्थ :

वर्तनवादी क्रांतीच्या अभ्यासकांनी आपल्या अभ्यास संशोधनात मुल्यनिरपेक्ष अभ्यासावर भर दिला होता. संशोधन साधनापेक्षाही अध्ययनतंत्रे महत्त्वाची मानली. यामुळे राजकीय विश्लेषणाला शास्त्रीयतेचा स्तर प्राप्त झाला; परंतु त्यांच्या निष्कर्षात समर्पकता व वैद्य–शाश्वततेचा अभाव राहिला. उत्तर–वर्तनवादी राजकीय विश्लेषणात मूल्यांना समाविष्ट करून राजकीय विश्लेषणाला अधिक परिपूर्ण व प्रासंगिक बनविण्यासाठी प्रयत्नशील होते. अशा पद्धतीने उत्तर–वर्तनवाद एक सुधारणावादी प्रवाह म्हणून पुढे आला. कारण याने राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासाचा नवीन समन्वयात्मक दृष्टिकोन प्रस्तुत केला, ज्यात तथ्य व मूल्य या दोन्हीचा एकत्रित वापर करून परिस्थितीनुरूप वापराला महत्त्व दिले.

डेव्हिड इस्टनने असे मत प्रदर्शन केले की, सहाव्या व सातव्या दशकात बहुतांश वेळ अनावश्यक संशोधनात खर्च केला गेला. राज्यशास्त्रज्ञ आपापल्या विद्यापीठाच्या वातानुकुलित मनोऱ्यात बसून सर्वसाधारणत: वेगवेगळ्या प्रकारची प्रतिमाने संकल्पनात्मक चौकटीतील प्रारुपे आणि अधिसिद्धांत निर्माण करण्यात व्यस्त होते. त्यांनी फार कमी क्षेत्रकार्याकडे लक्ष दिले. बाहेरील वास्तविक जगाशी फार कमी संबंध आला त्यामुळे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक उलथापालथी विषयी त्यांचा संबंध आला नाही. तत्कालीन समाजात निर्माण झालेल्या समस्यांची पूर्वकल्पना देण्यात वर्तनवादी कमी पडले. उत्तर वर्तनवाद्यांनी असे मत प्रदर्शित केले असल्याचे आढळते. त्यांच्या मते, जे संशोधन सामाजिक समस्यांशी कोणत्याच अर्थाने संबंधित नाही त्याचा उपयोग काय?

उत्तर-वर्तनवादाने वर्तनवादावर अवश्य टीका केली; परंतु त्याने परंपरावादास पुन्हा प्रस्थापित करण्याचे समर्थन केले नाही. त्याने वर्तनवादाचे योगदान मान्य करत राज्यशास्त्राच्या नव्या क्षितिजाचा संकेत दिला. हे न केवळ प्रतिक्रियेचे सूचक होते, न केवळ सुधारणेची मागणी होती. उत्तर-वर्तनवाद्याने कोणत्याही विशिष्ट विचारप्रणालीचा पुरस्कारही केला नाही. त्यांच्या प्रमुख दोन मागण्या होत्या. त्या म्हणजे समर्पकता आणि कृती या होत.

उत्तर-वर्तनवाद, वर्तनवादाची पुढची पायरी आहे. वर्तनवादात ज्या उणिवा राहिलेल्या आहेत त्या पूर्ण करण्यासाठी उत्तर-वर्तनवादाचा जन्म झाला. एक सुधारणावादी आंदोलन तथा नवीन दिशेचा संकेत आहे.वर्तनवादी दृष्टिकोनाच्या जमेच्या बाजू मान्य करून पुढे राज्यशास्त्राचे संशोधन अधिक प्रस्तुत व उपयुक्त कसे करता येईल असा भविष्यलक्षी विचार उत्तर-वर्तनवादी विचारवंत करीत होते, डेव्हिड इस्टन हा त्याचा प्रमुख प्रवक्ता होता. त्यांच्या मते, हे जे आत्मपरीक्षण वर्तनवादोत्तर प्रवाहाने केले ते राज्यशास्त्राच्या व्याप्तीत व उद्दिष्टात क्रांती घडवून आणणारे ठरले. ज्यांनी एकत्र येऊन जे केले त्यांच्यात कट्टर डाव्या विचारप्रणालीपासून थेट उजव्या विचारप्रणालीचे अभ्यासक होते.

उत्तर- वर्तनवादी क्रांती होण्यासाठी जबाबदार कारणे :

उत्तर वर्तनवादी क्रांतीचा जन्म वर्तनवादातील रूढीवाद, जडता आणि दिशाहीनतेच्या कारणातून झालेला आहे. डेव्हिड इस्टन १९६९ मध्ये ६५ व्या अमेरिकन पॉलिटिकल सायन्स असोसिएशनच्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, वर्तनवादी क्रांतीने आम्ही आपल्या विश्लेषणाला समर्पकता देऊ शकलो नाही. आपण गोळा केलेले ज्ञान कशासाठी आहे? आपले संशोधन कार्य कितपत प्रस्तुत आहे? आपला दृष्टिकोन परिपूर्ण आहे काय? विद्वानांचे सामाजिक उत्तरदायित्व कोणत्या प्रकारचे आहे? असे प्रश्न अभ्यासकांना नंतरच्या दशकात भेडसावू लागले होते. वरील प्रश्नांना पूरक असे संशोधन करणे गरजेचे होते. वर्तनवादाच्या मर्यादा स्पष्ट झाल्याने त्यात सुधारणा करणे गरजेचे होते. यामुळेच डेव्हिड इस्टनने उत्तर-वर्तनवादी क्रांतीची घोषणा केली. उत्तर-वर्तनवादी क्रांतीच्या उदयाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. ही वर्तनवादाच्या विरुद्ध एक प्रतिक्रिया आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर वर्तनवादाच्या माध्यमातून राज्यशास्त्राला आधुनिक सैद्धांतिक व शास्त्रीय रूप देण्याचा प्रयत्न करण्यात आला; परंतु ही परिपूर्ण अभ्यास पद्धत नाही. स्वत: वर्तनवादी अभ्यासकही नाराज होते.

२. नैसर्गिक शास्त्राची अभ्यास पद्धत व सामाजिक शास्त्रे याच्या अभ्यासपद्धतीत मूलभूत फरक आहे. सामाजिक शास्त्राला नैसर्गिक शास्त्राची अभ्यास पद्धत लागू करणे घातक आहे. कारण समाज व व्यक्तीचे स्वरूप परिवर्तनशील असते. तेव्हा त्याचे अध्ययन नैसर्गिक शास्त्रासारखे संभव नाही. वर्तनवादाद्वारे केलेले विभाजन कृत्रिम आहे. व्यक्तीच्या आकांक्षा, विश्‍वास, भावना याचे विश्‍लेषण शास्त्रीय पद्धतीने करणे अशक्य असते.

३. उत्तर-वर्तनवादी वर्तनवाद्यांच्या संशोधनाप्रती असंतुष्ट होते. वर्तनवाद्यांनी संशोधनात तथ्य-मूल्य विवादालाच जास्तीचे प्राधान्य दिले. वर्तनवाद्यांनी मूल्याला शास्त्रीय अभ्यासाची दुर्बलता मानली व तथ्याला प्राधान्य दिले. तथ्यात्मक स्वरूपाचे अध्ययन वास्तविक अध्ययन समजले; परंतु उत्तर-वर्तनवाद्यांनी तथ्य आणि मूल्य या दोन्हींनाही व्यक्तीच्या संदर्भात सप्रमाण मानून या दोन्हीत कृत्रिम भेद करणे अयोग्य मानले.

४. वर्तनवादी क्रांतीबरोबरच समाज तथा राजकीय व्यवस्थेला जागतिक संकटे व समस्यांनी घेरले. अंतर्गत अशांतता, यादवी, राजकीय अस्थिरता, आण्विक युद्धाचे भय, वांशिक संघर्ष, व्हिएतनामचे अघोषित युद्ध, लोकसंख्या विस्फोट इत्यादी संकटांनी राजकीय व्यवस्थेसमोर मोठेच आव्हान निर्माण केले होते. यासंदर्भातचे विश्‍लेषण करण्यात वर्तनवादी अपयशी ठरले होते. यातूनच उत्तर-वर्तनवादी क्रांतीची निर्मिती झाली.

२.२.५.२ उत्तर- वर्तनवादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये :

डेव्हिड इस्टनने उत्तर-वर्तनवादाची दोन प्रमुख लक्षणे सांगितली.

१) संशोधनाची समर्पकता किंवा प्रासंगिकता आणि

२) कार्यनिष्ठता किंवा कार्य या तत्त्वांनुसार उत्तर-वर्तनवादी संशोधन कार्याला गती देतील. डेव्हिड इस्टनने उत्तर- वर्तनवादाची ७ लक्षणे सांगितली आहेत.

१. प्रथम उपयोगिता त्यानंतर तंत्र :

संशोधन तंत्रापेक्षा संशोधनाचा हेतू अधिक महत्त्वाचा असतो. समाजापुढील तातडीच्या प्रश्‍नांच्या संदर्भात राज्यशास्त्रीय संशोधन हे अर्थपूर्ण व प्रस्तुत असायला पाहिजे तसे ते नसल्यास अशा संशोधनाचा उपयोग काय? संशोधन जर प्रस्तुत असेल तर ते काटेकोर नसले तरी चालेल.

राजकीय संशोधनात तंत्राला इतके महत्त्व नाही जितके मूलतत्त्वांना, मूल्यांना आहे अर्थात जर तांत्रिकदृष्ट्या एखादे संशोधन उच्च कोटीचे असेल, मात्र समकालीन समस्यांची उकल करण्यास असमर्थ असेल तर त्यापासून

अलिप्त राहणेच योग्य ठरते.

२. सामाजिक परिवर्तन व समाजोन्मुखता :

राजकीय वास्तवाच्या वर्णन-विश्लेषणातच व्यस्त राहिल्यामुळे वर्तनवादी दृष्टिकोन स्थितीवादी व परिवर्तनवादी ठरला आहे. व्यापक सामाजिक संदर्भ लक्षात न घेता त्यात तथ्य संकलन केले गेले. त्यामुळे तो सामाजिक पुराणमतवादाने ग्रस्त झाला आहे. तथ्यांना विस्तृत सामाजिक संदर्भांशी जोडून पाहिले पाहिजे.

३. राजकीय वास्तवाचा सामना :

वर्तनवादाने अमूर्तीकरण आणि विश्लेषणावर लक्ष केंद्रित करत राज्यशास्त्राच्या कटू वास्तवाकडे पाठ फिरविली असल्याचा निष्कर्ष इस्टनने काढला होता. भौतिक सुखसमृद्धी असूनदेखील वर्तमानकाळ संकट, संघर्ष आणि चिंताजनक आहे. त्यातून उभारी घेण्यासाठी मार्ग सुचविणे व शोधणे ही जबाबदारी राज्यशास्त्राची नाही तर कोणाची आहे, असा प्रश्नही इस्टनने उपस्थित केला होता.

४. मूल्याभिमुखता :

वर्तनवादाने सामाजिक मूल्यांना इतके कमी महत्त्व दिले होते की, त्याचे मोजमापही करणे अवघड होते. आपले सर्व ज्ञान मूल्यांच्या आधारावरच टिकून असते; म्हणून मूल्यांना जर ज्ञानाची प्रेरणाशक्ती मानली नाही तर ज्ञानाचा दुरुपयोग होण्याचा धोका कायम राहतो. राजकारणात मूल्यांची भूमिका अतिशय महत्त्वाची ठरते. शास्त्राच्या नावे मूल्यांना राज्यशास्त्राच्या अभ्यासक्षेत्राबाहेर ठेवता येत नाही. ज्ञानाचा उपयोग योग्य साध्याची प्राप्ती करण्यासाठी करायचा असेल तर मूल्यांना पुन्हा एकदा राज्यशास्त्राच्या केंद्रस्थानी आणणे आवश्यक असल्याचे इस्टनचे मत होते.

५. बुद्धिजीवींची भूमिका :

तटस्थ व वस्तुनिष्ठ संशोधक अशी भूमिका स्वत:कडे घेऊन राज्यशास्त्रज्ञांनी आपली सामाजिक जबाबदारी टाळू नये. उत्तर-वर्तनवाद राज्यशास्त्रज्ञांकडे अशी मागणी करतो की, बुद्धिजीवी म्हणून त्यांनी समाजात मोठमोठी कार्ये केली पाहिजेत. मानवी मूल्यांचे संरक्षण करणे ही त्यांची विशेष जबाबदारी आहे. ते जर केवळ तंत्रज्ञ असतील तर त्यांना चौकशीचे स्वातंत्र्य कशाला हवे? किंवा समाजाने त्यांना संरक्षण तरी का द्यावे?

६. ज्ञानाचे रूपांतर कृतीत व्हावे :

ज्ञानाचा उपयोग नवसमाजनिर्मितीसाठी व्हावा. सामाजिक समस्यांचे आकलन झाल्यानंतर राज्यशास्त्रज्ञ कारवाईपासून पाठ फिरवू शकत नाहीत. १९ व्या शतकापर्यंत चिंतनात्मक शास्त्र ठीक होते. जेव्हा विभिन्न शास्त्रांची नैतिक तत्त्वे एकसारखी होती; परंतु समकालीन समाजात इतके वैचारिक मतभेद होते की, राज्यशास्त्रास चिंतनाची लक्ष्मणरेषा ओलांडून भरीव कार्याच्या क्षेत्रात उतरावे लागले. त्यामुळे या नाजूक समयी समाजास विघटनापासून वाचवू शकले. थोडक्यात, स्वत:ची बांधिलकी ओळखून संशोधकांनी कृतिप्रवण होण्याची गरज

आहे.

७. व्यवसायांचे राजकियीकरण अटळ :

संशोधन संस्था, मंडळे वा विद्यापीठे यांना यापुढे सामाजिक, शासकीय प्रश्नांवर भूमिका घ्याव्याच लागतील. अलिप्त राहून चालणार नाही. बुद्धिजीवींना एक सकारात्मक भूमिका पार पाडावयाची असते. अर्थात त्यांना समाजासाठी उपयुक्त साध्ये निश्चित करावयाची असतात आणि त्या दिशेने प्रेरित करावयाचे असते. हे एकदा स्वीकारल्यानंतर सर्व व्यवसायांना राजकारणाशी जोडून घेणे अनिवार्य आणि वांच्छनीय ठरेल.

सामाजिक शास्त्रज्ञाने काय करावे व कोणते अग्रक्रम बाळगावेत, याबद्दलचे महत्त्वाचे मुद्दे वरील सात सूत्रांत आहेत. व्यावसायिक नीतिमत्ता, विज्ञानाचे सामाजिक संदर्भ व विचारवंतांची राजकीय भूमिका यासंबंधी त्यात मौलिक प्रश्न उपस्थित केले गेले आहेत.

उपरोक्त डेव्हिड इस्टन प्रणीत उत्तर वर्तनवादाच्या वैशिष्ट्यानंतर उत्तर वर्तनवादाची काही सर्वसाधारण वैशिष्ट्य पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

(१) बुद्धिवाद्यांची भूमिका :

राज्यशास्त्रज्ञ बुद्धिवंत, विचारवंत आहे. त्यांनी केवळ तथ्यांचे किंवा समस्यांचे किंवा त्याकरिता आवश्यक तंत्राचे संशोधन करीत बसणे अयोग्य आहे. या कठीण प्रसंगी त्यांची भूमिका रचनात्मक असायला पाहिजे. काही आदर्श व मानवी मूल्यांना टिकवून ठेवणे हे राज्यशास्त्राचे मूलभूत कर्तव्य आहे. प्रत्येक काळात उपस्थित सर्व समस्यांच्या अभ्यास करून त्यावर उपाय योजना शोधून काढणे व सामाजिक, आर्थिक, राजकीय अस्थिरता दूर करणे. ही राज्यशास्त्राची रचनात्मक भूमिका आहे. असे शास्त्रज्ञ तत्कालीन समस्यांचा विचार करीत नसतील तर त्यांची भूमिका यंत्रवत बनून राहील.

(२) राज्यशास्त्रज्ञाची सक्रियता :

उत्तर वर्तनवाद्यांनी परिस्थिती परिवर्तनासाठी कार्य करावे. म्हणजे ते कर्तव्यनिष्ठ असावे. समाजाच्या पुनर्मांडणीत महत्त्वाची भूमिका असावी. पुनर्रचनेच्या कार्यात स्वत:ला झोकून देणे ही वैज्ञानिकाची भूमिका असायला पाहिजे. उत्तरवर्तनवादी म्हणतात की, राज्यशास्त्रज्ञ चेतनाशील आहेत. उत्तरवर्तनवाद्यांच्या मते केवळ कोरे चिंतन करण्यापेक्षा त्याचे संशोधन असे असावे की, तत्कालीन समस्यांचे समाधान होईल. अर्थात संशोधकाचे संशोधीत ज्ञान कार्यात्मक असावे.

(३) मूल्यसापेक्षता :

वर्तनवाद्यांनी मानवी मूल्यांना नाकारले आणि मूल्यनिरपेक्षतेवर वैज्ञानिकतेचे कठोरतेने पालन केले. त्यामुळे राज्यशास्त्र निरस व प्रयोजनहीन बनले. खरे पाहता राजकीय सिद्धांतात मूल्यांना खूप महत्त्व आहे. ईस्टनच्या मते व्हिएतनामवर जेव्हा बॉम्ब हल्ला होत होता. तेव्हा वर्तनवादी त्यांच्या शवांना मोजण्याचे काम करीत होते. सभ्यता, आदर्श व मानवी मूल्यांची सुरक्षा करणे बुद्धिवाद्यांचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. त्याबद्दल

राज्यशास्त्रज्ञ तठस्थ राहू शकत नाही. जर योग्य मूल्य आदर्श नसतील तर त्याचा दुरुपयोग होऊ शकतो. म्हणून उत्तरवर्तनवाद्यांनी वर्तनवादातील मूल्यनिरपेक्षतेला बाजूला सारून राजकीय सिद्धांतामध्ये मूल्यांना महत्त्व प्राप्त करून दिले.

(४) व्यवसायीकरणावर भर :

वर्तनवादी सामाजिक समस्येवर तटस्थ राहण्यावर भर देतात. तर उत्तरवर्तनवादी त्याबद्दल सक्रिय भूमिका दर्शवितात. त्यांच्या मते, राज्यशास्त्राची समाजात सकारात्मक भूमिका असावी. ते समाजात विशिष्ट उद्देशापर्यंत पोहचण्याकरिता सुव्यवस्थित दिशा प्राप्त करून देण्याचे आवाहन करतात. बुद्धिवाद्यांच्या संघाला केवळ निरपेक्ष संशोधन करण्यापेक्षा मानवी मूल्यांच्या संरक्षणाकरिता संघर्षाच्या मैदानात उतरायला पाहिजे. अर्थातच राज्यशास्त्राच्या व्यवसायाचे मार्गदर्शन व्हावे. ते केवळ वर्णन राहू नये. १९६९ मध्ये अमेरिकन राज्यशास्त्रज्ञांच्या वार्षिक अधिवेशन बैठकीत व्यवसायीकरणाची मागणी केली व त्यातच उत्तर वर्तनवादाचा उगम झाला.

(५) तंत्र साधने व पद्धतीपेक्षा विषय समस्या महत्वाचे :

वर्तनवाद्यांनी तंत्र व संशोधनाच्या पद्धतीवर अधिक भर दिला. परंतु त्या मानाने मुख्य समस्या गौण ठरल्या गेल्या. विषयाच्या संदर्भात तंत्रपद्धती शोधून काढणे, त्याचा विकास करणे योग्य आहे. परंतु त्याचबरोबर त्या तंत्रपद्धतींचा उपयोग ज्या करीता करायचा असतो, ती सार वस्तू अधिक महत्त्वाची असते. डेव्हिड ईस्टनच्या मते, संशोधनाकरिता सूक्ष्म तंत्रे व उपकरणे योग्य आहे. परंतु त्यापेक्षाही ज्या करीता त्या उपकरणांचा उपयोग केला जातो, तो उद्देश महत्त्वाचा आहेत. उद्देश अस्पष्ट असण्यापेक्षा ते अचूक असणे योग्य आहे हा विज्ञानाचा मूलमंत्र आहे. अयोग्य परिशुद्धतेपेक्षा योग्य तंत्र अधिक लाभदायक ठरते. त्याप्रमाणे उत्तरवर्तनवादी तंत्रज्ञानापेक्षा व तंत्रसाधनांपेक्षा विषयांच्या संदर्भात गांभीर्याला अधिक महत्त्व देतात.

(६) सामाजिक परिवर्तनावर भर :

वर्तनवादात सामाजिक परिस्थितीवर अधिक भर देण्यात आला. परंतु उत्तर वर्तनवादांनी त्यावर मात करून सामाजिक परिवर्तनावर अधिक भर दिला. वर्तनवादात तथ्य गोळा करणे, त्याचे विश्लेषण करणे, त्याचे वर्णन करणे, हे सर्व करतांना मूल्यनिरपेक्षता लक्षात घेणे व त्यानुसार राजकीय सिद्धांताची मांडणी करणे यावर भर होता. परंतु या सर्वांचा सामाजिक संदर्भात काय महत्त्व आहे याचा विचारच केला गेला नाही. त्यामुळे वर्तनवाद्यांनी 'जैसे थे' अशी सामाजिक परिस्थिती कायम ठेवली. काय असावे? यापेक्षा काय असू नये? यावर वर्तनवाद्यांनी विचार केला नाही. म्हणून वर्तनवादी उदासीन असल्याचे दिसून येतात. परंतु उत्तर वर्तनवादात परिवर्तनावर अधिक भर देण्यात आला. काय आहे त्यापेक्षा काय असू नये? यावर अधिक भर देण्यात आला व त्यानुसार काय असावे? याचाही विचार करण्यात आला व त्यातून सामाजिक परिवर्तन कसे साधता येईल याचा प्रयत्न उत्तर वर्तनवादात केला गेला.

अशाप्रकारे पारंपारिक राजकीय सिद्धांत व आधुनिक राजकीय सिद्धांत यांच्यात मेळ घालून उत्तर वर्तनवाद उदयास आला. वर्तनवादाला आलेले अपयश दूर करता यावे व त्यातून राजकीय सिद्धांत जास्तीत जास्त

पारदर्शक करता यावेत. यासाठी उत्तर वर्तनवादाच्या काळात राजकीय सिद्धांतावर नव्याने विचार होऊ लागला. या उत्तर वर्तनवादाच्या वैशिष्ट्यांनी राजकीय सिद्धांतामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अशा उत्तर वर्तनवादी राजकीय सिद्धांताच्या वैशिष्ट्यांचे वर्णन वरील प्रमाणे केले जाते.

२.२.५.३ उत्तर– वर्तनवादी दृष्टिकोनाचे मूल्यमापन :

१९६५ नंतर राज्यशास्त्रात जी बौद्धिक विचारांची लाट निर्माण झाली ती वर्तनवादोत्तर विचार म्हणून ओळखली जाते. ती लाट निर्माण होईपर्यंत राज्यशास्त्रात वर्तनवादाचा प्रचंड प्रभाव होता. वर्तनवादामुळे व्यक्ती आणि समाज कसे असावेत याकडे अधिक लक्ष देण्यापेक्षा ते कसे आहेत याकडे लक्ष दिले गेले, त्यामुळे व्यक्ती आणि समाज यांच्यातील परिवर्तन आणि विकास याकडे समाज वैज्ञानिकांनी जवळजवळ दुर्लक्ष केले. अर्थातच १९६५ नंतर राज्यशास्त्रज्ञांकडून अशी अपेक्षा केली गेली की त्यांनी समाजाशी असलेला त्यांचा अभ्यासाचा संदर्भ कायम ठेवावा, विचारमूल्यांकडे अधिक लक्ष द्यावे आणि आपल्या ज्ञानाचा उपयोग व्यक्ती आणि समाजाचे परिवर्तन करण्यासाठी करावा. उत्तर–वर्तनवादाने वर्तनवादाच्या योगदानास सामावून घेऊन त्याच्या विकासाची नवी दिशा दाखवली. त्यामुळे ते सामाजिक पुनर्निर्माणासाठी सहाय्यक ठरेल. यात अनुभवजन्य दृष्टिकोनाच्या विकसित रूपाचा तात्त्विक दृष्टिकोनाशी मेळ घालण्याचा प्रयत्न करण्यात आला होता हे सत्य आहे की, १९७० च्या दशकापासून राजकीय सिद्धांतातील मूल्यांच्या विश्लेषणात नव्याने अभिरुची निर्माण झालेली होती आणि वर्तनवादाशी संबंधित अभ्यासास सामाजिक समस्यांची उकल करण्यासाठी उपयुक्त बनवले जात आहे. यादृष्टीने वर्तनवादी परंपरेने उत्तर–वर्तनवादाच्या योगदानास आत्मसात केले होते.

उत्तर वर्तनवादीविचार ही वर्तनवादावरील प्रतिक्रिया असल्याचे दिसते. ती पूर्णपणे विकसित झालेली विचारप्रणाली नाही; मात्र काही राजकीय विचारवंतांनी मांडलेला तो एक दृष्टिकोन निश्चित आहे. उत्तर वर्तनवादी विचार मांडणाऱ्यांच्या मते, वर्तनवाद्यांनी अभ्यासापेक्षा अभ्यास–पद्धतीलाच अधिक महत्त्व दिले, त्यामुळे राज्यशास्त्रातील महत्त्वाचे प्रश्न आणि वास्तव हे राज्यशास्त्राच्या अभ्यास विषयापासून दूर राहिले. उत्तर वर्तनवादी विचारवंतांचे असे म्हणणे दिसून येते की, तंत्रापेक्षा आशय महत्त्वाचा असतो आणि शुद्धवैज्ञानिक दृष्टिकोनापेक्षा सामाजिक संदर्भ महत्त्वाचा असतो. शैक्षणिक तटस्थतेपेक्षा अनेकदा कृती महत्त्वाची असते.

वर्तनवादी विचार हा निर्माण होण्याचे कारण म्हणजे गेल्या दोन–तीन दशकांत झालेला माहिती आणि ज्ञानाचा प्रचंड स्फोट. मानवाचे कल्याण कशात आहे? मानवाविषयीचे वास्तव शोधण्यात, की त्याच्या कल्याणाचा विचार करण्यात? तसे पाहिले तर उत्तर वर्तनवादी विचार मांडणारी मंडळी ही राज्यशास्त्राकडे पारंपरिक दृष्टिकोनातून पाहताना दिसतात. त्यांना वर्तनवादाची उद्दिष्टे आणि अभ्यासपद्धतीच पसंत नाही असे दिसते. नव्या दमाचे राज्यशास्त्रज्ञ हे अधिक सुधारणावादी आणि कृतिशील असल्यामुळे ते राज्यशास्त्राचा आधुनिक संदर्भ लक्षात घेऊन विचार मांडतात. राज्यशास्त्रातील मूल्ये आणि अभ्यास पद्धतीचा शास्त्रीय संशोधनातील मर्यादांशी मेळ घालून उत्तर वर्तनवादी विचारवंत राज्यशास्त्राकडे पाहताना दिसतात. उत्तर वर्तनवादी विचारामुळे वर्तनवादाची पीछेहाट झाली असे मात्र म्हणता येत नाही, उलट वर्तनवादी विचारांमुळे पारंपरिक राज्यशास्त्र आणि आधुनिक राज्यशास्त्र यांचा समन्वय साधला गेला.

उत्तर वर्तनवादी अभ्यासकांनी त्यांना अभिप्रेत असलेले राज्यशास्त्र नेमके कसे असेल? अंतर्गत यादवी, भीषण विषमता, हिंसक आंदोलन, भूमिगत चळवळी, अण्वस्त्रे, लोकसंख्या स्फोट, राजकीय दडपशाही, वंशभेद, सामाजिक न्यायास नकार, व्यक्तिस्वातंत्र्यात कपात वगैरे असंख्य प्रश्नांना त्यातून उत्तरे कशी मिळतील? या प्रश्नांची उत्तरे उत्तर-वर्तनवादाने दिलेली नाहीत. त्यामुळे त्यांची सूत्र म्हणजे पारंपरिक राज्यशास्त्राची केवळ विडंबनात्मक पुनरुक्तीच वाटते. केवळ वर्तमान संशोधनाविषयीचे असमाधान एवढे एकच कारण त्यांना एकत्र येण्यासाठी सापडले आहे. हे ऐक्य नकारात्मक आहे. यांच्या अध्ययनातून खऱ्या क्रांतीऐवजी प्रतिक्रांतीचीच शक्यता मोठी आहे. राज्यशास्त्र म्हणजे राजकारणाचे केवळ तंत्रज्ञान नाही तर विचारप्रणाली असते. यांच्याकडून ही अपेक्षा पूर्ण होऊ शकत नाही.

२.३ सारांश :

राज्यशास्त्राच्या अध्ययनासाठी आदर्शवादी तसेच अनुभववादी हे दोन्हीही दृष्टिकोन महत्त्वाचे आहेत. या दोन्ही दृष्टिकोनाचे समर्थन करणारे दोन गट निर्माण झाले आहेत. परंतु वस्तुस्थिती पाहता दोन्हीमध्ये विरोध असण्याचे कारण नाही. दोन्ही दृष्टिकोन एकमेकांना सहाय्यकारी तसेच पूरक आहेत. आदर्शवादी दृष्टिकोन मूल्यांना जास्त महत्त्व देतात, ते काल्पनिक आहेत, व्यक्तिनिष्ठ आहेत अशी टीका अनुभववाद्याकडून होत असली तरी अनुभववादी दृष्टिकोनसुद्धा परिपूर्ण नाही. अतितांत्रिकता, अतिशास्त्रशुद्धता, मूल्यनिरपेक्षकता या बाबी राज्यशास्त्राच्या अध्ययनामध्ये पूर्णपणे शक्य नाहीत ही अनुभववाद्यांची मर्यादा आहे. उदा. मानवी वर्तन हे परिस्थिती आणि वातावरण यानुसार बदलत असते. त्यामुळे मानवाच्या वर्तनाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केला जाऊ शकेल असे नाही. मूल्ये, आदर्श यांच्याशिवाय मानवी जीवनाचे अध्ययन सामाजिक शास्त्रे करू शकणार नाहीत याला राज्यशास्त्रसुद्धा अपवाद नाही. आदर्शवादी दृष्टिकोनावर टीका करून अनुभववादाचा पुरस्कार करून डेव्हिड ईस्टनने वर्तनवादी सिद्धांत मांडला. वर्तनवादामध्ये मूल्ये, आदर्श यांना हद्दपार केले तर शास्त्रशुद्धता, मूल्यनिरपेक्षता यांना महत्त्व दिले. परंतु मूल्ये व आदर्शांना पूर्णपणे नाकारून मानवी वर्तन तसेच राज्यशास्त्राचा अभ्यास करणे शक्य नाही, हे डेव्हिड ईस्टनच्या लक्षात आल्यामुळे मूल्यांचा पुरस्कार करीत पुन्हा उत्तरवर्तनवादी सिद्धांत मांडला. याचाच अर्थ असा आहे की, आदर्शवादी आणि अनुभववादी हे दोन्हीही दृष्टिकोन राज्यशास्त्राच्या अध्ययनासाठी उपयुक्त आहेत. म्हणून आदर्शवादी आणि अनुभववादी या दोन्ही दृष्टिकोनामध्ये समन्वय साधून राज्यशास्त्राचे विश्लेषण करणे आवश्यक आहे, असे रॉबर्ट ढाल म्हणतो. थोडक्यात, आदर्शवादी आणि अनुभववादी दृष्टिकोनांच्या समन्वयी अभ्यासामुळे राज्यशास्त्र जास्तीत जास्त समृद्ध होणार आहे. त्यामुळे या दोन्हीही दृष्टिकोनांचे महत्त्व राज्यशास्त्राच्या अभ्यासामध्ये कायम राहणार आहे.

वर्तनवादी विचार हा काही पूर्णपणे नवा विचार म्हणता येणार नाही. तथापि, अभ्यासाचा वर्तनवादी दृष्टिकोन हा १९५० पासून महत्त्वाचा मानला जाऊ लागला. १९६० नंतर सामाजिक शास्त्रांच्या विविध दृष्टिकोनांत वर्तनवादाला विशेष स्थान प्राप्त झाले. १९७० नंतर तर वर्तनवादाची लाटच निर्माण झाली. वर्तनवाद हा केवळ एक अभ्यासविषय न राहता सामाजिक शास्त्रांना विज्ञानाचा किंवा शास्त्राचा दर्जा प्राप्त करून देणारा विचार ठरला. सर्व सामाजिक शास्त्रांचा अभ्यास वर्तनवादी अभ्यासपद्धतीने होऊ लागला. विश्लेषणाची

संख्याशास्त्रीय साधने निर्माण झाली. राज्यशास्त्रीय लेखन करणारे विचारवंत वर्तनवादी दृष्टिकोनातून राजकीय प्रश्नासंबंधी लिहू लागले. अमेरिकेतील बहुतेक सर्व विद्यापीठांनी राज्यशास्त्राचे अभ्यासक्रम वर्तनवादी पद्धतीमध्ये बसविले. १९८० च्या सुमारास मात्र वर्तनवादाला विरोध होऊ लागला. अभ्यासाच्या आशयापेक्षा वर्तनवाद अभ्यासपद्धतीलाच अधिक महत्त्व देतो, असा आरोप केला जाऊ लागला. वर्तनवादावर झालेल्या या टीकेला 'उत्तर वर्तनवादी किंवा वर्तनवादोत्तर क्रांती' असे म्हटले गेले. परिणामत: राज्यशास्त्राला वर्तनवादी शास्त्र म्हणण्याऐवजी एक अपरिपूर्ण शास्त्र असे म्हटले जाऊ लागले.

२.४ पारिभाषिक शब्द :

१) **दृष्टिकोन :** राजकीय तत्त्वे समजण्यासाठी असलेली विश्लेषण पद्धती.

३) **मूल्यनिरपेक्षता :** मूल्यांना नाकारणारी, महत्त्व न देणारी व्यवस्था.

४) **आदर्शवाद :** मूल्ये आणि आदर्श यांना प्रमाण मानणारी व्यवथा.

५) **अनुभववाद :** अवलोकन आणि प्रयोग यातून मिळविलेली माहिती म्हणजे अनुभववाद किंवा वस्तुनिष्ठता.

६) **आंतरविद्याशास्त्रीय :** विविध विषयांचा उपयोग करून त्यामधील संकल्पनांचा वापर करणे म्हणजे आंतरविद्याशास्त्रीय अभ्यास होय.

७) **परिवर्तनशीलता :** बदललेल्या परिस्थितीनुसार नवीन बदल स्वीकारणे.

८) **वर्तनवाद :** दुसऱ्या महायुद्धानंतर पारंपारिक राज्यशास्त्राच्या विरोधात व्यापक क्रांतीला सुरुवात झाली. या क्रांतीला वर्तनवाद या नावाने ओळखले जाते.

९) **राजकीय वर्तन :** वर्तनवादी दृष्टिकोनानुसार, राजकीय वर्तन अर्थात जे व्यक्ती व्यक्त करते वास्तव राजकारणात विविध भूमिका निभावतात त्यांच्या वर्तनावर लक्ष केंद्रित करणे होय.

१०) **उत्तर–वर्तनवादी क्रांती :** सामाजिक व राजकीय व्यवस्थेतील समस्या सोडविण्यासाठी नव्याने संशोधन करण्याच्या गरजेतून वर्तनवादी हे उत्तर वर्तनवादाकडे वळले. यालाच उत्तर वर्तनवाद किंवा वर्तनवादोत्तर क्रांती असे म्हटले गेले.

११) **मूल्य निरपेक्षता :** वर्तनवाद्यांच्या मते, मूल्यनिरपेक्षता म्हणजे संशोधन कार्य करीत असताना संशोधकाने स्वत:ची मुल्यांत्मक बांधिलकी दूर ठेवली पाहिजे.

१२) **परिमाणीकारण :** उपलब्ध साधन सामग्री व तथ्यामध्ये स्पष्टता व निश्चितता आणण्यासाठी परीमापन व परिमाणीकरण केले जाते.

१३) **मूल्याभिमुखता :** उत्तर वर्तनवाद्याच्या मते, मूल्याभिमुखता अर्थात ज्ञानाचा उपयोग योग्य साध्यांची प्राप्ती करण्यासाठी करावयाचा असेल तर मूल्यांना पुन्हा एकदा राज्यशास्त्राच्या केंद्रस्थानी आणणे.

अ) रिकाम्या जागा भरा.

१) .... हा दृष्टिकोन मूल्ये, आदर्श, तत्त्वे यांना महत्त्व देतो.

२) पारंपारिक राज्यशास्त्राचा अभ्यास .... दृष्टिकोनामधून केला जातो.

३) मूल्यनिरपेक्षता हे .... दृष्टिकोनाचे वैशिष्ट्य आहे.

४) .... यांनी वर्तनवादी दृष्टिकोन मांडला.

५) अनुभववादी दृष्टिकोनावर .... विचारवंतांचा प्रभाव आहे.

६) वर्तनवादी सिद्धांत .... यांनी मांडला?

७) .... यांनी 'ह्यूमन नेचर इन पॉलिटिक्स' हा ग्रंथ लिहिला?

८) .... यांनी उत्तर वर्तनवादी सिद्धांत मांडला?

९) .... यांनी "The Political System" हा ग्रंथ लिहिला?

२.५ वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे :

१) आदर्शवादी, २) आदर्शवादी, ३) अनुभववादी,

४) डेव्हिड ईस्टन, ५) अमेरिकन **६)** डेव्हिड ईस्टन

७) ग्राहम वालास **८)** डेव्हिड इस्टन **९)** डेव्हिड इस्टन

२.६ स्वाध्याय :

अ) टीपा लिहा.

१) आदर्शवादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये

२) अनुभववादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये

३) वर्तनवादी दृष्टिकोनाच्या उदयाची कारणे

४) उत्तर-वर्तनवादी दृष्टिकोन

ब) दीर्घोत्तरी प्रश्न.

१) आदर्शवादी दृष्टिकोनाचा विकास सांगून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) अनुभववादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये सांगून दोष सांगा.

३) वर्तनवादी दृष्टिकोनाचा अर्थ सांगून त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४) वर्तनवादी दृष्टीकोनाच्या उदयाची कारणमीमांसा स्पष्ट करा.

५) वर्तनवादी दृष्टिकोनाचे मूल्यमापन करा.

६) उत्तर वर्तनवादी क्रांतीची कारणमीमांसा करा.

७) उत्तर वर्तनवादी दृष्टीकोन म्हणजे काय ते सांगून त्याचे महत्व विषद करा.

२.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके :

१) देव विजय : 'आधुनिक राजकीय विश्लेषण कोश', डायमंड, पुणे (२०१३).

२) देव विजय व इतर : 'राजकीय संकल्पना आणि सिद्धांत', डायमंड पुणे (२०१५).

३) मुठाळ राम : 'राजकीय सिद्धांत आणि राजकीय विश्लेषण,' अंशुल, नागपूर (१९९७).

४) ठाकरे एस. बी. : 'आधुनिक राजकीय विश्लेषण', विद्या, नागपूर (१९९३).

५) पाटील बी. बी. : 'राजकीय सिद्धांत', फडके, कोल्हापूर. (२०१२).

६) बोराळकर कृ. दि. : 'आधुनिक राजकीय विश्लेषण', पिंपळापुरे, नागपूर. (१९९२).

७) तिजारे, घांग्रेकर : 'आधुनिक राजकीय विश्लेषण', मंगेश, नागपूर. (१९९४)

८) Varma S. P. : 'Modern Political Theory', Vikas, Delhi. (1975).

९) O. P. Guba : 'An Introduction to Political Theory'.

१०) Ashirvadam K. Misra : 'Political Theory', Chand, Delhi. (2004).

११) चौसाळकर अशोक : 'आधुनिक राजकीय सिद्धांत', युनिक, पुणे. (२०१५).

१२) खेडेकर दि. आ. : 'राजकीय सिद्धांतातील मूलभूत संकल्पना', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. (२००९).

ooo

घटक-३

राज्याच्या उत्पत्तीचे सिद्धांत

(Theories of the Origin of State)

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्ताविक

३.२ विषय विवेचन

    ३.२.१ राज्याच्या उत्पत्तीचा दैवी सिद्धांत

    ३.२.२ राज्याच्या उत्पत्तीचा सामाजिक करार सिद्धांत

    ३.२.३ राज्याच्या उत्पत्तीचा उत्क्रांतीवादी सिद्धांत

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ स्वाध्याय

३.७ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ

....

३.० उद्दिष्टे:

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास

१. राज्याची उत्पत्ती कशी झाली हे समजून घेता येईल.

२. राज्याच्या उत्पत्तीचा दैवी सिद्धांत स्पष्ट होऊन त्याचे गुणदोष समजून घेता येतील.

३. राज्याच्या उत्पत्तीचा सामाजिक करार सिद्धांत समजून घेऊन त्याचे गुणदोष स्पष्ट होतील.

४. राज्याच्या उत्पत्तीचा उत्क्रांतीवादी सिद्धांत समजून घेता येईल.

५. राज्य आणि नागरिक यांतील परस्परसंबंध समजून घेता येतील.

३.१ प्रस्ताविक:

राजकीय सिद्धांत या विषयाचा अभ्यास करताना आपण आतापर्यंत राजकीय सिद्धांताचा अर्थ, स्वरूप, व्याप्ती तसेच राजकीय सिद्धांत व राजकीय तत्त्वज्ञान यातील परस्परसंबंध, राजकीय सिद्धांताचा ऱ्हास आणि पुनर्जीवन व राजकीय सिद्धांताचे महत्व याचा अभ्यास केला. याशिवाय राज्यशास्त्राच्या अभ्यासासंबंधी महत्त्वाचे असलेले आदर्शवादी, अनुभववादी व वर्तनवादी-उत्तरवर्तनवादी या दृष्टिकोनांचाही अभ्यास केला. या अभ्यासातून आपल्याला राज्यशास्त्र हा विषय विविध दृष्टिकोनातून कसा विकसित होत गेला याची

माहिती मिळाली. राज्यशास्त्राचा एकंदर आकृतीबंध समजून घेण्यासाठी आपण दुसऱ्या प्रकरणात राज्यशास्त्राकडे बघण्याचे विविध दृष्टिकोन समजून घेतले, अभ्यासले. प्रस्तुत प्रकरणात राज्यशास्त्रातील 'राज्य' या मध्यवर्ती संकल्पनेवर आपणास लक्ष केंद्रित करावयाचे आहे. सर्व संस्थांत 'राज्य' ही अत्यंत महत्त्वाची संस्था आहे. मानवी सभ्यतेच्या (Civilization) विकासाचा इतिहास हा राज्यसंस्थेच्या अस्तित्वाशी संलग्न आहे. राज्याची उत्पत्ती (निर्मिती, उदय) कशी झाली हे एक रहस्य आहे. कारण आपण निश्चितपणे सांगू शकत नाही की, राज्याची निर्मिती केव्हा आणि कशी झाली. मानववंशशास्त्र (Anthropology), जातीशास्त्र (Ethnology) आणि भाषारचनाशास्त्र (Philology) इत्यादीतील संशोधनाने या विषयावर थोडासा प्रकाश टाकला आहे. परंतु सर्व दृष्टीने राज्याच्या उत्पत्तीचा तर्कपूर्ण अर्थ स्पष्ट करत नाही. राज्याची उत्पत्ती कशी झाली यासंबंधी सर्वसंमत असा कोणताही सिद्धांत आढळत नाही. अनेक विचारवंतांनी कल्पनाशक्तीच्या व संकेतांच्या आधारावर राज्याच्या उत्पत्तीचे (निर्मितीचे, उदयाचे) सिद्धांत मांडले असल्याचे आढळतात. प्रस्तुत प्रकरणात राज्याच्या उत्पत्तीच्या संदर्भात अनेक कल्पना व संकेतांच्या आधारावर वेगवेगळ्या कालखंडात मांडलेल्या वेगवेगळ्या सिद्धांतापैकी निवडक सिद्धांतांचा अभ्यास आपण करणार आहोत. यामध्ये राज्याच्या उत्पत्तीचा दैवी सिद्धांत, राज्याच्या उत्पत्तीचा सामाजिक करार सिद्धांत, राज्याच्या उत्पत्तीचा उत्क्रांतीवादी सिद्धांत यांचा समावेश होतो. यासंदर्भात आपण सविस्तर माहिती प्रस्तुत प्रकरणात अभ्यासणार आहोत.

३.२ विषय विवेचन:

३.२.१ राज्याच्या उत्पत्तीचा दैवी सिद्धांत (Divine Origin Theory of the State)

राज्याची उत्पत्ती (निर्मिती) कशी झाली? हा प्रश्न राज्यशास्त्राच्या चर्चाविश्वामध्ये नेहमीच एक अभ्यासाचा विषय राहिला आहे. या संदर्भात राज्यशास्त्रज्ञांनी भिन्न भिन्न सिद्धांतांची मांडणी केलेली आहे. त्यामध्ये सर्वप्रथम येतो दैवी सिद्धांत. मानव हा जिज्ञासू आणि चिंतनशील प्राणी आहे. तो नेहमी कोणत्या ना कोणत्या विषयासंदर्भात ज्ञान प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो. राज्याची उत्पत्ती याचाच एक भाग आहे. मानवाने राज्य उत्पत्तीच्या संदर्भात माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यास स्पष्ट ऐतिहासिक तथ्य (Fact) न मिळाल्यामुळे आपल्या कल्पनाशक्तीच्या आधारावर राज्य उत्पत्तीचे विभिन्न सिद्धांत मांडले असून, ते परस्परविरोधी आहेत. प्रा. गिलक्राईस्ट यांच्या मते, 'जेथे इतिहास अयशस्वी होतो तेथे कल्पनेचा आधार घ्यावा लागतो.' अशा प्रकारे चिंतनाच्या कल्पनाशक्तीवर आधारित राज्य उत्पत्तीचे सिद्धांत धर्म, शक्ती (बळ), व मानवाला केंद्रीभूत मानून मांडण्यात आलेले आहेत. त्यामध्ये दैवी सिद्धांताचा समावेश होतो.

विशेषतः पारंपारिक राज्यशास्त्रात राज्याच्या उत्पत्तीचा दैवी सिद्धांत अधिक प्रभावी होता. या सिद्धांतालाच राज्याचा ईश्वरी सिद्धांत असेही म्हणतात. हा एक काल्पनिक सिद्धांत आहे. तसे पाहता राज्याची उत्पत्ती समजून घेण्यासाठी हा सिद्धांत विशेष सहाय्यभूत ठरत नाही. याचे मुख्य उद्दिष्ट राज्यशक्तीच्या दैवी अधिष्ठानाला पुष्टी देणे हे आहे आणि यासाठी हा सिद्धांत राज्याच्या उत्पतीसंबंधी दैविकल्पनेचा अवलंब करतो. दैवी सिद्धांताच्या समर्थकांच्या मते, राज्याची निर्मिती ईश्वराने केली आहे व त्यावर ईश्वराचा प्रतिनिधी शासन(राज्य) करतो. अशाप्रकारे शासक ईश्वराचा नियुक्त प्रतिनिधी आहे व आपल्या कार्यासाठी तो केवळ ईश्वराला जबाबदार आहे. म्हणून शासनाच्या आज्ञेचे पालन करणे एक धार्मिक कर्तव्य समजले

जाते. शासन देशाला विरोध करणे पाप आहे. शासक (राज्यकर्ता) जनता आणि कायद्यापेक्षा श्रेष्ठ आहे. पृथ्वीवरील कोणतीही शक्ती राज्याच्या इच्छेवर व शक्तीवर प्रतिबंध किंवा नियंत्रण घालू शकत नाही. त्याचा आदेशच कायदा आहे आणि त्याचे कार्य नेहमीच न्यायपूर्ण असते अशी मांडणी या सिद्धांताचे समर्थक करतात. जे लोक शासनाविरुद्ध विद्रोह, असंतोष व्यक्त करतात व राज्याच्या कार्याला अन्यायकारक म्हणतात अशावेळी या कृत्यास पाप समजले जाऊन त्यास दैवीय दंड देण्याची तरतूद या सिद्धांतात होती.

विविध देशांच्या परंपरेत आढळून येणारे दैवी सिद्धांताचे स्वरूप:

प्राचीन काळात राज्याच्या दैवी सिद्धांताला त्या त्या देशातील धर्माने व धर्मग्रंथांनी पाठिंबा दिला होता. या काळात धर्म व राजकारण यात घनिष्ठ संबंध होते. राजाच्या राजपदाला धर्मगुरूंची मान्यता आवश्यक होती. राजाने धर्माचे पालन व संरक्षण करावे अशी अपेक्षा गृहीत धरली जाई. धर्मप्रसार करणारा, धर्म वाढवणारा व धर्मासाठी जीवन खर्च करणारा राजा सार्वभौम, पराक्रमी व आदर्श मानला जाईल.

यहुदी, ख्रिश्चन, इस्लाम, हिंदू यासारख्या अनेक धर्मानी, धर्मग्रंथांनी या सिद्धांताचे समर्थन केलेले आहे. राज्याच्या उदयाचा दैवी सिद्धांत हा एक जुना सिद्धांत असून युरोपीय व भारतीय या दोन्ही परंपरात याचे संकेत मिळतात. मात्र, या दोहोतील संदेश भिन्न-भिन्न स्वरूपाचा आहे. याशिवाय यहुदी (ज्यू) धर्मग्रंथात स्वयं ईश्वरालाच राजा मानलेले आहे. मुस्लिम धर्म देखील राज्याला ईश्वरीय संस्थेच्या स्वरूपात पाहतो. प्राचीन मिस्त्र देश म्हणजेच आजच्या इजिप्त देशाच्या परंपरेत राजाला सूर्यदेवतेचा पुत्र मानले गेले आहे. उदा. राजा फराओ (Pharaoh) हा प्राचीन इजिप्तचा राजा, ज्याला देवाचा अवतार किंवा देवतुल्य मानले जात असे. जपानी लोक पूर्वी राजाला सूर्याचा प्रतिनिधी मानत असत. चीन मध्ये चीनच्या सम्राटास स्वर्ग पुत्राच्या रूपात गौरविले गेले असल्याचे संदर्भ आढळतात. नेपाळमध्ये राजाला विष्णूचा अवतार मानले जाते.

१) युरोपीय परंपरेत आढळून येणारे दैवी सिद्धांताचे स्वरूप :

युरोपीय परंपरेत राजेशाहीच्या (Monarchy) काळात दैवी सिद्धांताचा विकास झाला. या सिद्धांताचे ध्येय राजाचे अधिकार हे दैवी अधिकार आहेत हे सिद्ध करणे होते. म्हणजे जशा देवदेवता आपल्याला पूजनीय असतात आणि त्यांच्या इच्छा अथवा आज्ञांसमोर आपण जसे नतमस्तक होत असतो, त्याचप्रमाणे राजाच्या इच्छा व आज्ञांचे पालन करणे हे देखील आपले आद्यकर्तव्य आहे. राजाची नियुक्ती स्वयं ईश्वरानेच केली आहे अथवा राज्य ईश्वराच्या आज्ञेवरूनच स्थापन झालेले आहे. या बाबीवर भर देण्यासाठीच हा सिद्धांत मांडण्यात आला आहे. शासकाची (राज्यकर्त्याची) सत्ता इतकी सर्वोच्च आहे की, तो आपल्या कार्यसिद्धीसाठी मानवी जगतातील कोणत्याही सत्तेला बांधील नसतो; किंबहुना तो केवळ ईश्वरालाच बांधील असतो. या विचाराचे प्रथम संकेत ख्रिश्चन धर्माच्या 'बायबल' या धर्मग्रंथात ग्रंथात सापडतात, ज्यानुसार ईश्वर हाच सर्व शक्तींचा आधार आहे. जीवनातील प्रत्येक शक्ती ईश्वरी शक्तीचीच अभिव्यक्ती आहे, म्हणून राजाची शक्ती देखील ईश्वरी सत्तेचेच एक रूप आहे. या शक्तीला विरोध करणे म्हणजे ईश्वरी सत्तेला विरोध करणे होय आणि म्हणून ही बाब पूर्णतः निंदाजनक आहे अशी मांडणी बायबल ग्रंथात करण्यात आली आहे.

मध्ययुगीन युरोपात विशेषतः १६ व्या व १७ व्या शतकात युरोपमध्ये राजेशाही आणि चर्च या दोन सत्तांमध्ये परस्पर विरोध निर्माण झाल्यावर हा सिद्धांत मांडला गेला. यावेळी असा तर्क मांडला गेला की, राजाला चर्चच्या माध्यमातून नव्हे तर थेट ईश्वराकडूनच आपली सत्ता प्राप्त झालेली आहे, म्हणून राजा हा चर्चच्या आधीन येत नाही. इंग्लंडमध्ये स्टुअर्ट राजा आणि त्यांच्या समर्थकांनी या आधारावर निरंकुश राजेशाहीचे समर्थन केले आहे. राज्याच्या दैवी उत्पत्तीच्या सिद्धांतास पुष्टी देण्याकरिता सर रॉबर्ट फिल्मर (१५८८-१६५३) या विचारवंताने आपल्या 'पेट्रीआर्क' (पितृसत्ता) (Patriarch) (१६८०) या ग्रंथात असा तर्क मांडला आहे की, सत्तेच्या स्थापनेची सुरुवात ईश्वराने केली होती. ईश्वराने 'आदम' (Adam) ला पहिला मनुष्य (आदिपुरुष किंवा प्रथम मानव) बनवले असे नव्हे तर तो या पृथ्वीतलावरील पहिला राजा देखील होता आणि वर्तमानकाळातील राजे त्याचेच उत्तराधिकारी (वारसदार) आहेत. वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की, राज्याच्या दैवीय अधिकारांतर्गत १६व्या व १७व्या शतकात राज्य उत्पत्तीच्या सिद्धांताने राज्याच्या दैवी अधिकार सिद्धांताचे स्वरूप धारण केले आहे. इंग्लंडमध्ये स्टुअर्ट राजा आणि त्यांच्या समर्थकांनी या आधारावर निरंकुश राजेशाहीचे समर्थन केले असल्याचे दिसून येते.

राज्याच्या दैवी अधिकाराचे तात्पर्य हे होते की, ईश्वर जिथे आपल्या इच्छेने या संपूर्ण जड जगतास संचलित करतो, तर मानवी जगतात राजाच्या माध्यमातून तो आपले शासन चालवत असतो; म्हणून राजा स्वयं ईश्वराचा प्रतिनिधी आहे. आपल्या प्रजेच्या प्रती त्याची शक्ती (Power) अमर्याद आहे; त्याच्या आज्ञा ईश्वराच्या आज्ञा मानूनच त्याचे पालन जनतेने केले पाहिजे. राजाच्या आदेशांचे पालन करणे हे केवळ जनतेचे कर्तव्यच नव्हे तर धार्मिक कर्तव्य देखील आहे; त्यांची अवहेलना करणे केवळ एक अपराधच नव्हे तर पाप ही आहे.

युरोपमधील मध्ययुगीन राजकीय विचारावर या सिद्धांताचा दूरगामी परिणाम झाला होता. संत अगस्टाईन, पोप ग्रीगरी इत्यादीने सांगितले की, व्यक्तीने विनम्रतेने राजाच्या आदेशाचे पालन करावे. त्यांच्या मते, 'चांगल्या लोकांसाठी ईश्वर चांगला राजा आणि वाईट लोकांसाठी वाईट शासक पाठवतो'. राज्याच्या दैवीय अधिकाराअंतर्गत युरोपमधील अनेक शासकांनी आपल्या सत्तेच्या ईश्वरी स्त्रोताचा दावा करून त्यास पवित्र आणि वैध ठरवण्याचा प्रयत्न केला. उदा. इंग्लंडच्या पहिल्या जेम्स (१५६६-१६२५) राजाने आपल्या निरंकुश शासनास योग्य ठरविण्यासाठी असा युक्तिवाद केला होता की, जरी एखादा राजा दुष्ट व पापी असला तरी प्रजेने त्याला विरोध करता कामा नये; किंबहुना असे मानले पाहिजे की, ईश्वराने लोकांना आपल्या पापाची शिक्षा देण्यासाठीच त्या राजास आपला प्रतिनिधी (शासक) म्हणून धरतीवर पाठविले आहे.

२) भारतीय परंपरेत दैवी सिद्धांताचे स्वरूप:

i) भारतीय परंपरेत महाभारताच्या शुक्रनीती व शांतिपर्वात राज्य राज्याच्या दैवी सिद्धांताचे संकेत मिळतात. त्यानुसार जेव्हा पृथ्वीवर समाजात अराजकता, अशांतता निर्माण होऊन मत्स्य न्यायाचे प्रस्थ वाढले होते, तेव्हा लोक ईश्वराकडे गेले आणि त्यांनी ईश्वराकडे प्रार्थना केली की, आम्हाला असा शासक द्या की, जो राज्याचे अराजकता, अशांततेच्या परिस्थितीपासून संरक्षण करू शकेल. त्यांनी देवाकडे याचना केली की, हे देवा राज्य प्रमुखाशिवाय आमचा विनाश होत आहे, आम्हाला प्रमुख द्या, ज्याची आम्ही सर्वजण मिळून आराधना करू आणि तो आमचे रक्षण करेल. तेव्हा ईश्वराने शांती, कायदा सुव्यवस्था, न्याय आणि सुरक्षितता कायम राखण्यासाठी धर्माची स्थापना केली आणि त्याबरोबरच 'विराट'

नावाच्या राजाची निर्मिती केली. महाभारताच्या शांतिपर्वात 'मत्स्य न्याया'ची संकल्पना आढळते. 'मत्स्य न्याय म्हणजे मनुष्याची माशांसारखी अवस्था, म्हणजेच समुद्रात जसे छोट्या माशास मोठा मासा खातो, गिळंकृत करतो, त्याप्रमाणे समाजात प्रत्येक दुर्बल व्यक्तीस सबल व्यक्ती त्रास देऊ लागतो. अशा परिस्थितीत सर्व मनुष्यप्राण्यास सुरक्षा प्रदान करण्यासाठी ईश्वराने राजाला नियुक्त केले असे दाखले भारतीय पुराणांमध्ये आढळतात.

ii) 'मनुस्मृती'या ग्रंथात असे म्हटले आहे की, लोक जेव्हा सर्वत्र आराजक पसरल्यामुळे भीतीने सैरभैर होतात तेव्हा त्या सर्वांच्या रक्षणासाठी ईश्वराने राज्याची निर्मिती केली.

iii) कौटिल्याने राज्यनिर्मिती विषयीचे विचार आपल्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथात काही प्राचीन ग्रंथाच्या आधारे मांडलेले दिसतात. कौटिल्याच्या मते, प्राचीन काळी समाजात अराजकता, अस्थिरतेची परिस्थिती प्रत्यक्षात अस्तित्वात होती आणि ती संपुष्टात आणण्यासाठी राजा निर्माण करावा लागला. कौटिल्याच्या मते, मत्स्य न्यायाने त्रस्त झालेले लोक मनू वशिष्ठाकडे गेले आणि त्याला काही कर देण्याचे मान्य करून त्यांनी त्याला आपला राजा बनविले. त्या करारानुसार मनूला शेतीच्या उत्पन्नाचा सहावा भाग आणि व्यापारातील नफ्याचा दहावा भाग रोख देण्याचा करार करून राजा केले. मनूला साक्षात दंडशक्तीचे स्वरूप मानले जाते. थोडक्यात, राजाने प्रजेचे संरक्षण करावे आणि त्या बदल्यात प्रजेने आपल्या मिळकतीचा काही भाग अथवा कर राजाला द्यावा असा हा दुहेरी करार होता. अशा रीतीने राजा व प्रजा या दोघांमध्ये करार होऊन राज्यसंस्थेची उत्पत्ती झाली असे स्पष्ट दिसून येते.

याशिवाय कौटील्याने राज्य निर्मितीचा दैवी सिद्धांतही मान्य केल्याचे दिसते. कौटील्याच्या मते, राजा हा देवाने निर्माण केला असून तो ईश्वराचा अंश आहे. त्याच्या मते, इंद्र, वायू, यम, सूर्य, अग्नी, वरूण, चंद्र व कुबेर या देवांच्या अंशापासून ब्रह्मदेवाने प्रजेच्या रक्षणाकरिता राजाची निर्मिती केली. महाभारताच्या शुक्रनीती व शांतिपर्व या दोन्ही भागात राज्य निर्मितीच्या या दैवी सिद्धांताचा उल्लेख आढळतो. कौटिल्याच्या 'अर्थशास्त्र' ग्रंथात राज्यसंस्थेच्या निर्मितीच्या वरील दोन्ही कल्पना आढळतात. परंतु राज्यसंस्था ही मानवी कल्पना आहे, या मताचा पुरस्कार कौटील्याने केलेला आहे. राज्यसंस्था मानवनिर्मित आहे, हेच मत कौटल्याने मांडलेले आहे. कौटील्याच्या मते, राजा व प्रजा या दोन्हीमध्ये करार होऊनच राज्यसंस्था निर्माण झाली आणि प्राचीन काळापासून असेच मत चालत अल्यामुळे त्याचा स्वीकार त्यांनी आपल्या 'अर्थशास्त्र' या राजनीतिशास्त्र वरील ग्रंथात केलेला आहे.

iv) बौद्ध धर्म ग्रंथ दीघ निकाय (Digha Nikaya) मध्ये राज्याच्या उत्पत्तीविषयी विचार आढळतात. यामध्ये राज्यनिर्मितीचा आणि राजसत्तेचा उगम सांगितला आहे. परंतु येथे दैवतपति सिद्धांत (Divine Origin Theory) स्पष्टपणे मान्य केलेला नाही. उलट, बौद्ध विचारांनुसार राज्याची निर्मिती ही समाजातील अराजकता, चोरी आणि अन्याय थांबवण्यासाठी लोकांनी परस्पर संमतीने एका व्यक्तीची निवड करून केली. त्या व्यक्तीस महासम्मत (महाजनसंमत) असे म्हटले गेले. म्हणजेच, "Digha Nikaya" मध्ये राज्याचा उगम हा दैवी शक्तीकडून झाला असे न मानता, लोकांच्या करारातून (Social Contract Theory) झाला असे प्रतिपादन आढळते. थोडक्यात, वरील सर्व विश्लेषणावरून असे म्हणता येईल की, जनतेचे संरक्षण करणे हे राजाचे आद्यकर्तव्य आहे, त्या जबाबदारीपासून राजा विन्मुख (परावृत्त) होऊ शकत नाही.

राज्य उत्पत्तीच्या दैवी सिद्धांताचे गुण-दोष:

अ) राज्य उत्पत्तीच्या दैवी सिद्धांताचे गुण:

१) समाज बांधणीचे काम:

राज्य निर्मितीच्या दैवी सिद्धांताने प्राचीन काळी समाजबांधणीचे महत्त्वाचे काम केले. समाजात शांतता, सुव्यवस्था व कायद्याचे अधिराज्य निर्माण करण्याची जबाबदारी शासन संस्थेची असते. प्राचीन काळी व राजेशाही शासनपद्धतीमध्ये राजाप्रति आदरयुक्त भीती तयार करण्याचे काम या सिद्धांताने केल्याचे दिसून येते.

२) समाजात ऐक्याची भावना निर्माण करण्यास उपयुक्त:

कोणतेही शासन लोकमताच्या पाठिंब्यावर, बळावर चालत असते. हा पाठिंबा मिळवण्यासाठी शासनाला विविध लोककल्याणाची कामे करावी लागतात. मात्र, केवळ लोककल्याणाची कामे केल्यामुळे लोक राजाच्या राज्यकारभाराला कायमस्वरूपी पाठिंबा देतीलच असे नाही, तर यासाठी ईश्वर, धर्म, पाप-पुण्य स्वर्ग-नरक यासारख्या अधिभौतिक संकल्पनाची भीतीही समाजात राजाच्या राज्यकारभाराला पाठिंबा मिळवण्यासाठी उपयोगी ठरत असते. राजाला ईश्वर मानल्याने लोकांनी त्याला संघटित व एकजिनसी पाठिंबा दिला. यातूनच समाजात ऐक्याची भावना निर्माण झाली. थोडक्यात, प्राचीन व मध्ययुगीन काळात दैवी सिद्धांत समाजाला संघटित करून त्यांच्यात ऐक्याची भावना निर्माण करण्यास उपयुक्त ठरला असे म्हणता येईल.

३) समाजात शांतता, सुव्यवस्था व शिस्त निर्माण करण्यास उपयुक्त:

लोकांच्या एकमुखी पाठिंब्यावर शासनाचे यश हे अवलंबून असते. दैवी सिद्धांतात राजाला मिळालेला पाठिंबा एकमुखी व खात्रीशीर होता. यामुळेच राजाला समाजात शांतता, सुव्यवस्था व शिस्त निर्माण करता आली. तसेच समाजाच्या एकमुखी पाठिंब्यामुळे समाजाचे नियमन व प्रभावी नियंत्रण करता आले. थोडक्यात, असे म्हणता येईल की, प्राचीन काळात समाजात शांतता, सुव्यवस्था व शिस्त निर्माण करण्यास हा सिद्धांत उपयुक्त ठरला.

४) समाजात नैतिकता निर्माण होण्यास मदत:

राज्य उत्पत्तीच्या दैवी सिद्धांतामुळे समाजात नैतिकता निर्माण झाली. आपण जर वाईट वागलो, पाप केले तर त्याची आपल्याला शिक्षा मिळेल. आपण राजाच्या आज्ञा व आदेशांचे पालन केले नाही, राजाच्या राज्यकारभाराविरुद्ध विद्रोह व असंतोष प्रकट करून त्यास त्रास दिल्यास ईश्वराची अवकृपा होईल, देवाचा कोप होईल व राज्य संकटात सापडेल. परिणामी समाजाला रोगराईचा सामना करावा लागेल. यापेक्षा आपण चांगले वागून नैतिक बनूया. राजाच्या आज्ञा व आदेश यांचे एकमुखाने पालन करूया असा संदेश दैवी सिद्धांताने लोकांना दिला. यातून आदर्श व नैतिक समाज निर्माण होण्यास मदत झाली.

५) राष्ट्र उभारणीत लोकसहभाग महत्त्वाचा ठरला:

राज्य उत्पत्तीच्या दैवी सिद्धांतात राजाला मिळालेल्या लोकांच्या उत्स्फूर्त व प्रभावी सहकार्यामुळे त्याला लोककल्याणाची, साहित्य, संस्कृती व कलेची कामे प्रभावीपणे करता आली. परिणामी प्राचीन व मध्ययुगीन काळात राष्ट्र उभारणीत राजा बरोबरच लोकांचा सहभागही उपयोगी व महत्त्वाचा ठरला, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

ब) राज्य उत्पत्तीच्या दैवी सिद्धांताचे दोष :

राज्य उत्पत्तीच्या दैवी सिद्धांताला वर्तमान आधुनिक राजकीय विचारसरणी मध्ये कोणतेही स्थान नाही. या सिद्धांताला आता कोठेही मान्यता दिली जात नाही. आता हा सिद्धांत केवळ धार्मिक व श्रद्धेचा विषय राहिला आहे. हा सिद्धांत तर्क व प्रमाणावर आधारित नाही. या सिद्धांतावर अनेक प्रकारच्या टीका केल्या जातात, त्या पुढील प्रमाणे -

१) काल्पनिक सिद्धांत:

राज्य उत्पत्तीच्या दैवी सिद्धांताचा आधार विवेक किंवा तर्क नाही तर केवळ कल्पना आहेत. जगातील वेगवेगळ्या धर्माच्या धर्मग्रंथांमध्ये राजाच्या ईश्वरत्वाची केलेली वर्णने अवास्तव, काल्पनिक व अतिशयोक्तीने भरलेली आहेत. त्या सर्व काल्पनिक दंतकथा असून त्या वास्तवाला धरून नाहीत. उदा. ऋग्वेदात राजाचे वर्णने करताना सूर्याचा पराभव करणारा, दैत्यांचे निर्मूलन करणारा राजा काल्पनिक वाटतो.

२) कालबाह्य संकल्पना:

'राज्य ईश्वराने निर्माण केले असून राजा हा ईश्वराचा अंश असतो' या धार्मिक संकल्पना सार्वत्रिक असल्या तरी वर्तमान काळात त्या अयोग्य, चुकीच्या व कालबाह्य ठरलेल्या आहेत. ईश्वर, देव या संकल्पनावर लोकांची श्रद्धा असली तरी या संकल्पना पुराव्यासह दाखवता येत नाहीत ही या सिद्धांताची मर्यादा आहे. आधुनिक राजकीय विचारप्रणालीमध्ये या सिद्धांताला कोणतेही स्थान नाही. या सिद्धांताला आता कुठेही मान्यता दिली जात नाही. हा सिद्धांत आता केवळ धार्मिक श्रद्धेचा विषय राहिला आहे. थोडक्यात; आज २१ व्या शतकातील राज्यशास्त्र हे अधिक शास्त्रीय, वस्तुनिष्ठ, अचूक व आंतरविद्याशाखीय बनत आहे. अशा स्थितीत असे पारंपारिक व अपुरे सिद्धांत कालबाह्य ठरतात.

३) लोकशाही विरोधी सिद्धांत:

राज्याच्या उदयाचा दैवी सिद्धांत हा उघडपणे राजेशाहीचा म्हणजेच एकाधिकारशाहीचा पुरस्कार करतो. राजा कधी चुकू शकत नाही. राजाला विरोध म्हणजे ईश्वराला विरोध. यासारख्या विचारातून दैवी सिद्धांत हुकूमशाहीला पाठिंबा देताना दिसतो. त्याचवेळी तो लोकशाही शासन व्यवस्थेला विरोध करतो. लोकशाही शासन व्यवस्थेत राज्यकर्ते चुकत असले अथवा अन्यायी, अत्याचारी असले तर त्याला विरोध करण्याचा, त्याला घटनात्मक मार्गाने पदावरून हटवण्याचा अधिकार जनतेला असतो. अशी सोय दैवी सिद्धांतात आढळत नाही. दैवी सिद्धांतात अन्यायी, अत्याचारी राजाला विरोध करण्याचा अधिकार जनतेला नसतो. म्हणून हा सिद्धांत लोकशाही विरोधी आहे.

४) लोकशाही मूल्यविरोधी सिद्धांत:

दैवी सिद्धांत राजाला म्हणजेच शासनाला सर्व अधिकार देऊन जनतेच्या व्यक्तिस्वातंत्र्य, मूलभूत अधिकार, शासन व समाजातील समन्वय, परस्पर सुसंवाद, व्यक्ती विकास, सहकार्य आणि लोकमत या सर्वच प्रभावी लोकशाही मूल्यांकडे, साधनांकडे दुर्लक्ष करतो. म्हणून हा सिद्धांत लोकशाही मूल्यविरोधी असल्याची टीका केली जाते.

५) धर्म व राजकारण यांची सरमिसळ:

प्राचीन राजनीतिमध्ये धर्म व राजकारण यांची सरमिसळ झाल्याचे पहावयास मिळते. त्या काळात धर्म व राजकारण या एकाच नाण्याच्या दोन बाजू मानल्या जात होत्या. प्राचीन काळात राजाला धार्मिक व राजकीय अशी दुहेरी भूमिका पार पाडावी लागत असे. त्याच्या या दुहेरी भूमिकेला समाजाची अधिमान्यता होती. धार्मिक व राजकीय सत्ता एकाच व्यक्तीच्या हाती असल्यामुळे तो एकाधिकारशाही व हुकूमशाही पद्धतीने राज्यकारभार करत असे व त्याचे दुष्परिणाम जनतेला भोगावे लागत असत. मात्र, आधुनिक लोकशाही शासन व्यवस्थेत धर्मकारण व राजकारण या दोन गोष्टी भिन्न मानल्या गेल्या आहेत. शासकाला (राज्यकर्त्यांना) धर्मकारण करता येत नाही. आधुनिक काळात सर्वच लोकशाही राष्ट्रांनी धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार केला आहे. अशा परिस्थितीत दैवी अथवा पारंपारिक सिद्धांत स्वीकारून धर्माचे राजकारण करणे हितकारक ठरणार नाही.

६) अनियंत्रित, अत्याचारी व हुकूमशाही वृत्तीच्या शासकांकडून या सिद्धांताचा दुरुपयोग:

युरोपीय परंपरेत राज्य उत्पत्तीच्या दैवी सिद्धांताचा दुरुपयोग करून अनेक अनियंत्रित व अत्याचारी शासकांनी जनतेकडून निर्विवाद आज्ञापालनाची अपेक्षा व्यक्त केली होती. उदाहरणार्थ, इंग्लंडचा राजा जेम्स पहिला याने अनियंत्रित शासन व दैवी सिद्धांताचा पुरस्कार केला होता. त्याने जनहितांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून अन्यायी, अत्याचारी, अदूरदर्शी व हुकूमशाही पद्धतीने राज्यकारभार करून जनतेचे शोषण केल्याचे दिसून येते. तसेच युरोपमध्ये विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात हिटलर व मुसोलिनी सारख्या हुकूमशहानी राष्ट्रवादाच्या उभारणीसाठी दैवी सिद्धांताचा आधार घेऊन अनियंत्रित व अत्याचारी पद्धतीने राज्यकारभार केल्याचे दिसून येते.

दैवी सिद्धांताच्या दृष्टीने विचार करता युरोपीय परंपरेपेक्षा भारतीय परंपरा अधिक तर्कसंगत वाटते, कारण त्यात राजाचा दैवी अधिकार त्या मर्यादेतच मान्य करण्यात आला होता की, जोपर्यंत राजा स्वतः आपले कर्तव्यपालन करतो. तोपर्यंत तो आपल्या पदावर राहू शकतो. जनहित दुर्लक्षित करून राजा अनियंत्रित, अत्याचारी पद्धतीने राज्यकारभार करत असेल व तो आपले कर्तव्यपालन टाळून जनतेचे शोषण करत असेल तर भारतीय परंपरेत हा सिद्धांत जनतेला अशी संमती देत असे की, राजा अत्याचारी झाल्यास त्याला त्याच्या पदावरून हटवावे. थोडक्यात, अनियंत्रित, अत्याचारी व शोषण करणारा राजा हा ईश्वराचा प्रतिनिधी मानता येत नाही.

७) कर्मकांडावर आधारित:

हा सिद्धांत व्यावहारिक दृष्टीने घातक आहे. तसेच तो लोकशाही मूल्यांच्या विरोधात आहे. तो संविधान विरोधी असून आधुनिक राज्यासाठी उपयोगाचा नाही. हा सिद्धांत कट्टर रुढीवादी व कर्मकांडावर आधारित आहे. तसेच राज्य मानवनिर्मित आहे. ईश्वराने राज्याची निर्मिती केली असा ऐतिहासिक पुरावा सापडत नाही.

अशाप्रकारे दैवी सिद्धांतावर वरीलप्रमाणे अनेक प्रकारच्या टीका करण्यात येत असल्या तरी या सिद्धांताचे महत्त्व नाकारता येत नाही. आपण हे वास्तव स्वीकारले पाहिजे की धर्माने राज्याच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. प्रारंभीच्या काळात शासकाने स्वतःला धर्म व दैवी सिद्धांताशी जोडून घेतले

होते. कारण प्राचीन व मध्ययुगीन काळात नियम व कायद्याच्या निर्मितीला धर्माची अधिमान्यता(स्वीकृती) असणे आवश्यक होते. एवढेच नाही तर स्वतः जनता धार्मिक नियमांचे, परंपरांचे काटेकोरपणे पालन करत होती. राजाचा आदेश धार्मिक कर्तव्य म्हणून पालन केले जात असत. प्राचीन व मध्ययुगीन काळात सार्वजनिक व खाजगी बाबतीत धर्म महत्वपूर्ण होता. तो आजही असल्याचे विविध परंपरांतून आपल्याला दिसून येते. या दैवी सिद्धांताने जनतेला आज्ञापन करण्याचे शिकवले तेव्हा ते शासन करण्यास पात्र नव्हते. दैवी सिद्धांत राजकीय कृतीला नैतिकतेची भावना प्रदान करतो. या माध्यमातून राज्याला नैतिकतेची शिकवण देतो. परंतु आजही राजकारणामध्ये धर्म आणि देवाच्या नावाने राजकारण केले जात असल्याचे दिसून येते. वर्तमान काळात जगात अनेक ठिकाणी शासनकर्ते स्वतःला ईश्वराचा अवतार मानतात. उदाहरणार्थ, नेपाळ सारख्या देशात शासकाला विष्णूचा अवतार मानले जाते. तसेच जपानचा सम्राट (राजा) देखील पवित्र मानला जातो. वर्तमानकाळात जगातील अनेक देशात सत्तेच्या राजकारणात धर्म, देव, कर्मकांड इत्यादीचा प्रयोग केला जात असल्याचे दिसून येते.

स्वयं अध्ययन प्रश्न–१ :

प्रश्न १): दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.

१. राज्याच्या उत्पत्तीचा सर्वात प्राचीन सिद्धांत कोणता मानला जातो?

अ) सामाजिक करार सिद्धांत ब) उत्क्रांतिवादी सिद्धांत

क) दैवी सिद्धांत ड) शक्ती सिद्धांत

२. दैवी सिद्धांतानुसार राज्याची निर्मिती कोणी केली?

अ) जनतेने ब) राजाने

क) समाजाने ड) ईश्वराने

३. दैवी सिद्धांतानुसार शासक कोणाचा प्रतिनिधी मानला जातो?

अ) जनतेचा ब) धर्मगुरूंचा

क) ईश्वराचा ड) सैन्याचा

४. दैवी सिद्धांतानुसार राजाच्या आज्ञेचे पालन करणे काय मानले जाते?

अ) सामाजिक कर्तव्य ब) आर्थिक कर्तव्य

क) धार्मिक कर्तव्य ड) वैयक्तिक कर्तव्य

५. 'जेथे इतिहास अयशस्वी होतो तेथे कल्पनेचा आधार घ्यावा लागतो' हे विधान कोणी केले?

अ) लॉक ब) गिलक्राईस्ट

क) हॉब्ज ड) रूसो

६. प्राचीन इजिप्तमध्ये राजा 'फराओला' कोणाचा पुत्र मानले जात होते?

अ) विष्णू ब) इंद्र

क) सूर्यदेव ड) शिव

७. जपानी परंपरेनुसार राजा कोणाचा प्रतिनिधी मानला जात असे?

अ) चंद्राचा ब) सूर्याचा

क) विष्णूचा ड) बुद्धाचा

८. चीनच्या सम्राटाला कोणत्या स्वरूपात गौरविले जात होते?

अ) देवपुत्र ब) स्वर्गपुत्र

क) धर्मपुत्र ड) राजपुत्र

९. नेपाळमध्ये राजाला कोणाचा अवतार मानले जात होते?

अ) ब्रह्मा ब) शिव

क) विष्णू ड) गणेश

१०. दैवी अधिकार सिद्धांताचे समर्थन करणारा 'Patriarcha' ग्रंथ कोणी लिहिला?

अ) लॉक ब) हॉब्ज

क) फिल्मर ड) बेंथम

११. फिल्मरच्या मते पृथ्वीवरील पहिला राजा कोण होता?

अ) मनू ब) ॲडम

क) मोझेस ड) डेव्हिड

१२. युरोपमध्ये दैवी सिद्धांताचा विशेष विकास कोणत्या काळात झाला?

अ) प्राचीन ब) आधुनिक

क) मध्ययुगीन ड) उत्तर-आधुनिक

१३. दैवी सिद्धांताला सर्वाधिक पाठिंबा कोणत्या शासनपद्धतीत मिळाला?

अ) लोकशाही ब) राजेशाही

क) समाजवाद ड) संघराज्य

१४. भारतीय परंपरेत मत्स्य न्याय म्हणजे काय?

अ) माशांचे संरक्षण ब) धार्मिक न्याय

क) बलवानाने दुर्बलावर अत्याचार करणे ड) समुद्री कायदा

१५. मनुस्मृतीनुसार राज्याची निर्मिती कशासाठी झाली?

अ) व्यापार वाढीसाठी | ब) लोकांच्या संरक्षणासाठी

क) युद्धासाठी | ड) कर वसुलीसाठी

१६. कौटिल्याच्या मते लोकांनी कोणाला राजा बनविले?

अ) विराट | ब) मनू

क) भरत | ड) जनक

१७. बौद्ध धर्मग्रंथ 'दीघ निकाय' मध्ये राज्याची उत्पत्ती कशातून झाल्याचे मानले आहे?

अ) दैवी शक्तीतून | ब) युद्धातून

क) सामाजिक करारातून | ड) कुटुंबातून

१८. दैवी सिद्धांतावर मुख्य टीका कोणती केली जाते?

अ) वैज्ञानिक सिद्धांत आहे | ब) लोकशाहीवादी आहे

क) काल्पनिक व तर्कहीन आहे | ड) आधुनिक आहे

१९. दैवी सिद्धांताचा सर्वात मोठा दोष कोणता मानला जातो?

अ) लोकशाहीविरोधी स्वरूप | ब) लोककल्याणकारी स्वरूप

क) नैतिकतेचा पुरस्कार | ड) शिस्तीची निर्मिती

३.२.२ **राज्याच्या उत्पत्तीचा सामाजिक करार सिद्धांत** (The Social Contract Theory of Origin of State)

प्राचीन काळात मांडलेला राज्याच्या उत्पत्तीचा दैवी सिद्धांत पारंपारिक व अपुरा असल्याने आधुनिक काळात सामाजिक करार सिद्धांतांना महत्त्व प्राप्त झाले. १७व्या व १८व्या शतकात युरोपमध्ये सामाजिक करार सिद्धांत प्रचलित झाला. हा राज्याच्या उत्पत्तीचा उदारमतवादी सिद्धांत आहे. या सिद्धांताची मांडणी करणाऱ्यांमध्ये थॉमस हॉब्ज (१५८८-१६७९), आणि जॉन लॉक (१६६२-१७०४), जीन जॅक्स रुसो (१७१२-१७७८), इम्यान्युअल कांट यांची नावे विशेषतत्त्वाने घेतली जातात. याशिवाय अलीकडच्या काळात अन्य काही विचारवंतांनी देखील आपल्या चिंतनात सामाजिक करार संकल्पनेचे मिश्रण करून त्याचा पुढे विकास केला असल्याचे दिसून येते. यामध्ये प्रसिद्ध उदारमतवादी विचारवंत हर्बर्ट स्पेन्सर (१८२०-१९०३),जॉन रॉल्स (१९२१-२००२) आणि रॉबर्ट नॉझिक (१९३८-२००२) यांच्या नावांचा विशेष उल्लेख करता येईल. तसेच रिचर्ड हूकर, अल्थुशियस, ह्युगो ग्रोशियस, पॅकेनडॉर्फ स्पिनोजा इत्यादी विचारवंतानी देखील सामाजिक कराराचे समर्थन केले आहे. या सिद्धांताचे मुख्य प्रतिपादन असे आहे की, राज्य किंवा शासनाची सत्ता जनतेने केलेल्या करारावर आधारित आहे. दैवी सिद्धांतात राज्यनिर्मितीचा स्रोत ईश्वर मानले असून तो सृष्टीचा निर्माता आहे अशी मांडणी केली आहे. तर सामाजिक

करार सिद्धांताचे प्रतिपादन आहे की, राज्याची निर्मिती कृत्रिम असून जनतेने केली आहे व राज्यातील सत्तेचा स्रोत जनता आहे.

उदारमतवादी विचारवंत राज्याला अशी संस्था मानतात की, ज्यास सर्व व्यक्तींनी व त्यांच्या समूहाने एकत्र येऊन आपले हित आणि लाभ यासाठी निर्माण केली आहे. सामाजिक करार सिद्धांतनुसार राज्याचे प्रमुख कार्य आपल्या परिक्षेत्रातील (कार्यक्षेत्रातील) परस्परविरोधी हितसंबंधांमध्ये सामंजस्य निर्माण करणे हे आहे. सामाजिक करार सिद्धांत राज्याच्या उत्पत्ती संबंधी अशी कल्पना अभिव्यक्त करतो की ज्यामुळे उदारमतवादी विचारांना पुष्टी मिळते. यात अशी कल्पना करण्यात आली आहे की, राज्याची निर्मिती सर्व मानवाने एकत्र येऊन सर्वांच्या हिताची परिपूर्ती करण्याच्या उद्देशाने केली आहे. थोडक्यात, राज्य हे मानवनिर्मित असून ते मानवाच्या गरजेतून निर्माण झालेले आहे हा विचार मांडणारा सिद्धांत म्हणजेच सामाजिक करार सिद्धांत होय.

राज्याची निर्मिती ही ईश्वरनिर्मित किंवा नैसर्गिक नसून, व्यक्तींनी परस्पर संमतीने केलेल्या सामाजिक करारातून (Social Contract) झाली आहे, असे प्रतिपादन करणारा सिद्धांत म्हणजे राज्याच्या उत्पत्तीचा सामाजिक करार सिद्धांत होय.

निसर्गावस्थेतील (राज्य पूर्व अवस्थेमधील) असुरक्षितता, संघर्ष व अडचणी दूर करण्यासाठी लोकांनी परस्पर करार करून राज्याची स्थापना केली,' ही कल्पना सामाजिक करार सिद्धांत मांडतो. राज्यशास्त्रीय भाषेत असे म्हणता येईल की, मानवांनी आपल्या काही स्वातंत्र्यांचा त्याग करून सुरक्षितता, सुव्यवस्था आणि न्याय मिळविण्यासाठी सामूहिक संमतीने राज्याची निर्मिती केली.' ही सामाजिक करार सिद्धांताची मूलभूत संकल्पना आहे. थोडक्यात: लोकांच्या परस्पर संमतीने व करारातून राज्याची निर्मिती झाली, असे मानणारा सिद्धांत म्हणजे सामाजिक करार सिद्धांत होय.

थॉमस हॉब्ज, जॉन लॉक, रुसो या विचारवंतांनी मानवी स्वभाव, निसर्ग अवस्था, सामाजिक करार, राज्य व सत्ता, व्यक्ती आणि राज्यातील संबंध हे टप्पे (विभाग) महत्त्वाचे मानले आहेत. सामाजिक करार सिद्धांत मांडणाऱ्या विचारवंतामध्ये थॉमस हॉब्ज हा पहिला विचारवंत आहे.

३.२.२.१ थॉमस हॉब्जचा सामाजिक करार सिद्धांत:

पार्श्वभूमी :

थॉमस हॉब्ज (१५८८-१६७९) या ब्रिटिश विचारवंताने त्याच्या लेविएथन (Leviathan) नावाच्या प्रसिद्ध ग्रंथात सामाजिक करार सिद्धांत मांडला आहे. थॉमस हॉब्जच्या काळात ब्रिटनमध्ये गृहयुद्धाची स्थिती निर्माण होऊन सर्वत्र अराजकता व भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. याचा गंभीर परिणाम हॉब्जच्या विचारावर झाला. १६४० मध्ये गृहयुद्धाच्या भीतीमुळे त्याने इंग्लंड सोडून फ्रान्सची राजधानी पॅरिस मध्ये एक तप घालवले. राजा व संसद यांच्या संघर्षमय परिस्थितीत त्याचे राजकारणाकडे लक्ष गेले. याच काळामध्ये त्याने अनियंत्रित व निरंकुश राजेशाहीचे समर्थन करणारा 'लेविएथन' नावाचा प्रसिद्ध ग्रंथ १६५१ मध्ये फ्रान्समध्ये प्रकाशित केला. इंग्लंडमधील गृहयुद्धातील व राजकीय स्थित्यंतराच्या उत्कर्ष व अपकर्ष याचा थॉमस हॉब्ज हा साक्षीदार होता. प्रत्यक्ष राजकारणातील बऱ्यावाईट घटना त्याने पाहिल्या व अनुभवल्या होत्या. तो अवघा पंधरा वर्षाचा असताना जेम्स पहिला याचे अनियंत्रित शासन व दैवी सिद्धांताचा पुरस्कार

पाहिला होता. त्याने संसदेकडे सतत दुर्लक्ष केले होते. संसद समर्थकांच्या राजसत्तेवरील नियंत्रण व करारोपण या मागण्या अमान्य केल्या गेल्या. त्याच्या मृत्यूनंतर चार्ल्स पहिला सत्तेवर आला. त्याच्या हुकमशाही वर्तनामुळे व अदूरदर्शी नेतृत्वामुळे आर्थिक परिस्थिती अधिकच बिघडत गेली. याच दरम्यान इंग्लंड मधील १६४२-४९ यादवी युद्ध (Civil War in England), जे सम्राट चार्ल्स पाहिला आणि त्याच्या विरोधी संसद सदस्यांमध्ये घडून आले. संसदीय पक्षाचा प्रमुख नेता ऑलिवर क्रॉमवेल याच्या नेतृत्वात क्रांती होऊन पहिल्या चार्ल्सचा पराभव झाला आणि त्याला १६४९ मध्ये देहदंड देण्यात आला व क्रॉमवेलकडे सत्तेची सूत्रे आली. या गृहयुद्धाचे एक उद्दिष्ट राजेशाहीचा अंत करणे हे होते. परंतु ऑलिवर क्रॉमवेल (१५९९-१६५८) यांच्या मृत्यूनंतर दुसऱ्या चार्ल्सचा राज्यभिषेक झाल्यामुळे तिथे पुन्हा राजेशाही प्रस्थापित झाली. चार्ल्स द्वितीय हा थॉमस हॉब्ज चा विद्यार्थी होता. इंग्लंडमधील तत्कालीन या सर्व घटनांचा प्रभाव हॉब्जवर पडला. त्यातूनच त्याला असे वाटले की विकसित जीवनासाठी शक्तिशाली शासनाची गरज असते. असे स्थिर व सुव्यवस्थित शक्तिशाली शासन केवळ राजतंत्रच देऊ शकेल. त्यामुळे राजाच्या प्रति प्रजा निष्ठावान असली पाहिजे. राजा हा सर्वश्रेष्ठ असून राजावर कोणाचेही नियंत्रण नसते व राजाला विरोध करण्याचा प्रजेलाही अधिकार नसतो ही त्याची कल्पना या परिस्थितीमुळे उदयास आली होती. फ्रान्समध्ये वास्तव्यास असताना तेथील मजबूत राजेशाही मुळे स्थिर व सुव्यवस्थित शासन त्याने अनुभवले होते. त्यातून त्याने राजेशाहीनिष्ठ असे आपले विचार अभिव्यक्त केले. परिणामतः अनियंत्रित व निरंकुश राजेशाहीचा तो समर्थक बनला.

थॉमस हॉब्ज यांचा सामाजिक करार सिद्धांत (Thomas Hobbes's Social Contract Theory):

थॉमस हॉब्जने राज्यशास्त्राच्या क्षेत्रात सामाजिक करार सिद्धांताची नवीन परंपरा निर्माण केली. त्याने ऐतिहासिक व भौतिकवादी समीक्षा, वैज्ञानिक पद्धती, तर्कशुद्ध व बुद्धिनिष्ठ पद्धतीचा वापर करून विचारांची सुस्पष्ट मांडणी केली. त्याने राज्य हे मानवनिर्मित आहे असे मत मांडून दैवी सिद्धांताला नाकारले व सामाजिक कराराचा पाया घातला. त्यासाठी वैज्ञानिक भौतिकवादाचा आधार घेतला. हॉब्ज यांच्या राजकीय विचारधारेमध्ये सर्वप्रथम सामाजिक करार सिद्धांताचे स्थान आहे. सामाजिक करार संबंधी विचाराची चर्चा पुढील प्रमाणे-

१) मानव स्वभाव (Human Nature):

थॉमस हॉब्जने मानवी स्वभावातील दुष्ट व नकारात्मक पैलू पुढे आणले. त्याने मनुष्याला स्वार्थी, दुष्ट, लोभी, नीच, विवेकहीन, वाईट, बर्बर, आत्मकेंद्री, भांडकुदळ, अहंकारी, हिंसक संबोधले आहे. हॉब्जने मानवी स्वभावाचे मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषण केले आहे. हॉब्जच्या मते, मनुष्य आनंद प्राप्त करू इच्छितो व वेळोवेळी आपल्या इच्छा पूर्ण करून आवश्यक वस्तू मिळवणे, यशस्वी होणे आणि आनंद प्राप्त करणे हे त्याचे ध्येय असते. यासाठी शक्ती साधनांचा (बळाच्या साधनांचा) उपयोग केला जातो व इच्छापूर्तीसाठी शक्ती (Power) प्राप्त करण्याची मनुष्याची इच्छा निरंतर वाढत जाते. या आधारावर मानव स्वभावाचे चित्रण केले आहे.मनुष्य स्वभावाने स्वार्थी, लालसी, लोभी, हिंसक, वासनाप्रधान, अहंकारी आहे. या साधनांच्या प्राप्तीसाठी प्रतिस्पर्धा, भय, यश यासाठी माणसा माणसांमध्ये स्पर्धा, संघर्ष निर्माण होतो. यामुळे समाजामध्ये असंतोष, अविश्वास, जीवनाच्या व संपत्तीच्या सुरक्षेपुढे

आव्हाने उभी राहिली. हॉब्जच्या मते, मनुष्य आपला स्वार्थपूर्ण उद्देश साध्य करण्यासाठी कोणत्याही मर्यादा ओलांडायला तयार झालेला होता. जर त्याला आपला उद्देश साध्य करण्यासाठी एखाद्याची हत्या करावयाची गरज पडली तर तो तीही करत असे. म्हणून त्याने मानवी स्वभाव अतिशय निकृष्ट मानला आहे.

हॉब्जच्या मते, मानवी स्वभावाची दुसरी बाजू अशी आहे की माणूस हा शांतता व एकतेचा अभिलाषी आहे.सर्वच माणसे जरी शांतता ही मूलभूत व आवश्यक मानत असली तरी एकमेकांपासून त्यांना वाटणारी भीती किंवा अविश्वास, संपत्तीची इच्छा व कीर्तीची (यशाची) अभिलाषा त्यांच्यात विद्यमान असल्यामुळे ते आपल्या अन्य व्यक्तीबरोबर सदैव संघर्ष करत राहतात. हा संघर्ष जंगली जनावरांइतकाच भयंकर असतो. माणसे कितीही सभ्य (सुसंस्कृत) व सज्जनतेची प्रतिमूर्ती वाटत असली तरी त्यांचे वास्तविक स्वरूप वेगळेच असते. हा केवळ देखावा असतो. तो स्वार्थी असतो व त्याच्या सर्व भावनांचे केंद्र त्याचा अहंभाव हे असते. हॉब्जच्या मते, मनुष्य हा एकलकोंडा, स्वार्थी, भित्रा, अविश्वासू, पशुतुल्य व दुष्ट प्रवृत्तीचा आहे. मेक्याव्हेली प्रमाणे (Niccol1 Machiavelli) हॉब्जनेही मानवी स्वभावाचे निराशाजनक आणि एकांगी चित्र रेखाटले आहे.

एकंदरीत, वरीलप्रमाणे थॉमस हॉब्जला मानवी स्वभावासंबंधी असा निराशाजनक, एकांगी व नकारात्मक विचार करण्यास तत्कालीन इंग्लंड मधील परिस्थितीने भाग पाडले होते. प्रत्येक विचारवंत हा त्या-त्या काळाचे अपत्य असतो. त्यांच्यावर त्याच्या समकालीन समाजकारण, राजकारण यांचा प्रभाव असतो. हॉब्जही या नियमाला अपवाद नव्हता. म्हणूनच तत्कालीन इंग्लंड मधील परिस्थितीला समोर ठेवून त्याने आपले विचार मांडले आहेत.

२) निसर्ग अवस्था (The State of Nature):

थॉमस हॉब्जच्या मते, निसर्ग अवस्था म्हणजे समाज व राज्य निर्मितीच्या पूर्वीची अराजकसदृश्य परिस्थिती होय. थॉमस हॉब्जने मानवी स्वभावाच्या आधारावर निसर्ग अवस्थेच्या संघर्षमय जीवनाचे वर्णन केले आहे. हॉब्जने निसर्गावस्थेचे केलेले वर्णन काल्पनिक आहे.थॉमस हॉब्जच्या मते, निसर्गावस्था शासनसंस्थेच्या नियंत्रणापासून मुक्त असल्यामुळे माणसावर कोणतेही बंधन नव्हते. तो मुक्त विहार (संचार) करीत असे. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचारी वर्तन असे त्याकाळी समीकरण बनले होते. प्रत्येक व्यक्ती आपल्या इच्छेनुसार कार्य करीत असल्यामुळे मानवी स्वभावातील पाशवीवृत्तीने त्याचे वर्तन होत असे. या काळात 'बळी तो कान पिळी' असे वातावरण होते. सबलांचे दुर्बलांवर वर्चस्व निर्माण होत असे. ज्यांच्याकडे अधिक शारीरिक बळ (शक्ती) होते ते आपल्या दुबळ्या साथीदारावर अधिपत्य, वर्चस्व निर्माण करत असत. निसर्गावस्थेतील मनुष्य स्वार्थी, अत्यंत गर्विष्ठ व अहंकारी होता. तसाच तो क्रूर व रक्तपिपासू होता. त्यामुळे निसर्गावस्था ही युद्ध व अशांततेने भरलेली होती. स्पर्धा, परस्परांबद्दल अविश्वास व यश ही तीन मानवी संघर्षाची प्रमुख कारणे होती. मानवी जीवनात आत्मसंरक्षणासाठी (Self-Preservation) संघर्ष अटळ असतो. याकाळात 'मत्स्यन्याय' असल्यामुळे दुर्बलांचे जीवन व संपत्ती यांची हमी नव्हती, अधिकार नव्हते. शासनसंस्था अस्तित्वात नसल्यामुळे सर्वत्र भीती व असुरक्षितेचे वातावरण होते. प्रत्येकजण एकमेकांना एकमेकांचे शत्रू समजत असत.

थॉमस हॉब्जच्या मते, निसर्ग अवस्थेतील अशा अस्थिर व युद्धखोर वातावरणात संस्कृती, कला, साहित्य, व्यापार, वैज्ञानिक विकास इत्यादी विषयांचे व्यक्तींना ज्ञान होणे दुरापस्त, कठीण होते. सतत भीती व अपघाती मृत्यू याची धास्ती असे, त्यामुळे मानवाचे जीवन हे एकाकी, निर्धन अथवा दरिद्री, तिरस्करणीय, घृणास्पद, पाशवी, पशुवत आणि अल्पजीवी (क्षणभंगुर) होते. निसर्ग अवस्थेतील अशा नैराश्यमय काळ्याकुट्ट अंध:कारमय अवस्थेत सातत्याने माणूस दबून गेला होता. थॉमस हॉब्जच्या मते, निसर्गावस्थेत न्याय-अन्याय, नैतिक -अनैतिक अशा भावनांना कोणतेही स्थान नव्हते. शक्तीच्या (बळाच्या) आधारावर आपल्या इच्छेनुसार लाभप्राप्तीकरिता केलेल्या प्रत्येक कार्याला चांगले समजले जाई. शासनसंस्थेचे अस्तित्व नसल्यामुळे कायदेशीर न्याय-अन्यायाचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. तसेच ज्याला शक्य असेल त्याने ते मिळवावे व टिकवावे हा जीवनाचा अर्थ बनला होता. थोडक्यात, हॉब्ज म्हणतो, निसर्गावस्थेतील माणूस हा एकाकी, निर्धन (दरिद्री) व वन्य पशु प्राण्यांप्रमाणे जीवन जगत होता. असे भयंकर व भीतीदायक जीवन माणसाला असह्य झाले. त्यातूनच तो आत्मरक्षण (Self-Preservation) व सुरक्षेसाठी सामाजिक कराराकडे वळला.

अशाप्रकारे वरीलप्रमाणे थॉमस हॉब्ज यांनी समाज व राज्यनिर्मिती पूर्वीच्या अराजकसदृश्य निसर्ग अवस्थेचे काल्पनिक वर्णन आपल्या 'लेविएथान' ग्रंथामध्ये केलेले आहे. सारांश, थॉमस हॉब्जने निसर्गअवस्थेचे वरील प्रमाणे जे वर्णन केलेले आहे याचा अर्थ, मनुष्य खरोखरच अशा अवस्थेत वास्तव्य करत होता असे नाही. त्याचा मथितार्थ हे स्पष्ट करणे होता की, जेव्हा कोणत्याही स्वरूपाचे स्थिर शासन राज्यात (देशात) अस्तित्वात असत नाही तेव्हा मनुष्याची अवस्था किती दयनीय होते. हे स्पष्ट करणे आहे.

३) सामाजिक करार : (Social Contract):

थॉमस हॉब्जने वर्णन केलेली निसर्गावस्था दुःखद, असह्य, त्रासदायक, भयानक, चिंताग्रस्त आणि अस्थिर स्वरूपाची संघर्षमय अवस्था होती. थॉमस हॉब्जने वर्णन केलेला मानवी स्वभाव व निसर्ग अवस्था एवढी वाईट असेल तर सामाजिक करार करून राज्यनिर्मिती करावी हे माणसाला सुचले कसे? असा प्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नाचे उत्तर देताना हॉब्ज म्हणतो की, माणसाला बुद्धी असल्यामुळे त्याने विवेकशील असा विचार केला की निसर्ग अवस्थेतील या अस्थिर, भयावह व संघर्षमय अवस्थेतून मुक्त होण्यासाठी आणि आत्मसंरक्षणासाठी एका शक्तिशाली सत्तेची स्थापना केली पाहिजे की, जी प्रत्येक व्यक्तीच्या संरक्षणाचे कार्य करेल. त्याकरिता माणसाने आपल्या नैसर्गिक अधिकाराचा त्याग करून आणि स्वतःवर नियंत्रण प्रस्थापित केले तरच तो सुखी व शाश्वत जीवन प्राप्त करू शकेल, जगू शकेल. निसर्ग अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी मनुष्य आपापसात करार करतो. आपणासोबत इतरांनी कसे वागावे असे स्वतःस जसे वाटते तसे आपण इतरांबरोबर वागणे हे न्याय सांगत असते. अशी व्यवस्था निर्माण करणारी यंत्रणा म्हणजे राज्यसंस्था होय.

थॉमस हॉब्जच्या मते, निसर्ग अवस्थेतील आराजकता व अत्याचारापासून मुक्ती मिळविण्यासाठी व्यक्तीने आपापसात एक करार केला. या करारातून राज्याची उत्पत्ती झाली व प्रत्येक व्यक्तीने एकत्र येऊन अशी शपथ (प्रतिज्ञा) घेतली की, **'मी या व्यक्तीला किंवा व्यक्तीसमूहाला माझे सर्व अधिकार सोपविण्यास व स्वयंशासनाचा त्याग करण्यास तयार आहे. परंतु एक अट अशी की, तू देखील तुझे सर्व अधिकार याच पद्धतीने त्याच व्यक्तीला किंवा व्यक्तीसमूहाला देण्यास तयार असले पाहिजे आणि त्याची**

सत्ता मान्य केली पाहिजे.' आशा आशयाची प्रतिज्ञा घेऊन हा करार करण्यात आला आहे. या कराराने सर्व समाज एका समूहात बांधला जातो त्यालाच तो राज्य संबोधतो. या करारातून असंख्य व्यक्तींचा मिळून एक मानवी समाज अर्थात 'जनसमुदाय' निर्माण झाला. त्यालाच हॉब्ज Common Wealth म्हणजेच 'राज्य' म्हणतो. थोडक्यात, या करारातून राज्य अथवा सामुदायिक शासन (Common Wealth) अस्तित्वात आले. या करारापूर्वी समाज व राज्यसंस्था हे दोन्हीही अस्तित्वात नव्हते. 'लेविएथन' च्या करार निर्मितीतून त्यांचे अस्तित्व निर्माण झाले. तेव्हापासून ज्ञान, संस्कृती, कला, व्यापार उदिम यांची सुरुवात झाली. 'सार्वभौम' सत्तेच्या उदयाने राज्यसंस्था अस्तित्वात आली. ज्या व्यक्ती किंवा व्यक्तीसमूहाला करार करून व्यक्तीने आपले अधिकार बहाल केले, सोपविले तो महाकाय 'लेविएथन' (सर्वोच्च शासक/सार्वभौम राजा) आहे. तो सर्वोच्च व निरंकुश आहे. सार्वभौम सत्ता या कराराची भागीदार नसते; कारण ती पूर्वीपासून अस्तित्वात नव्हती, तर ती कराराचे फलित म्हणून अस्तित्वात आली आहे.

थॉमस हॉब्जच्या मते सार्वभौम सत्ता (Sovereign) परिपूर्ण आणि सर्वोच्च असते. याचा अर्थ हा की, राज्याची स्थापना मनुष्याची इच्छा वा सहमतीने होत असते. परंतु त्याची स्थापना झाल्यानंतर त्याला प्रतिकार करण्यासाठी मनुष्य स्वतंत्र राहत नाही. सार्वभौम सत्तेला सर्व अधिकार कायमस्वरूपी सोपवलेले असतात ज्यास परत मागता येत नाही. या अधिकारांची परत मागणी करणे याचा अर्थ सभ्य (सुसंस्कृत) समाजाचा भंग करून पुन्हा निसर्गावस्थेत परत जाणे, जिथे शांतता व सुरक्षितेची किंचितही शक्यता नसते. या आधारे थॉमस हॉब्जने व्यक्तीच्या प्रतिकाराच्या हक्काचे (Right to Resistance) खंडन करून इंग्लंडच्या १६४२ ते ४९ मधील यादवी युद्धास (Civil War) उचित ठरवले असल्याचे दिसून येते.

थोडक्यात, सामाजिक करार करताना प्रत्येक व्यक्ती काही अटींवर आपले सर्व अधिकार एका निश्चित अशा व्यक्तीला किंवा व्यक्तीसमूहाला (सार्वभौम सत्तेला) देण्यास तयार झाले. त्या मोबदल्यात व्यक्तींना त्या सार्वभौमाकडून संरक्षणाची हमी मिळाली. सारांश, थॉमस हॉब्जने सामाजिक कराराचे वरीलप्रमाणे विवेचन करून समाज व राज्यसंस्था उदयास आली असे प्रतिपादन केले आहे. या सामाजिक कराराच्या माध्यमातून सर्व व्यक्तींनी आत्मसंरक्षणाशिवाय सर्व अधिकारांचा त्याग केला व शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी एका विशिष्ट व्यक्तीकडे किंवा व्यक्तीसमूहाकडे नियंत्रण करण्याचे सर्वश्रेष्ठ अधिकार स्वेच्छेने सोपविले. त्यातून सार्वभौमाचे अस्तित्व निर्माण झाले. हा सार्वभौम शासक सर्वश्रेष्ठ, अनियंत्रित, निरंकुश, सर्वव्यापी व सर्वांना नियंत्रित करणारा असतो. अशाप्रकारे थॉमस हॉब्ज हा अनियंत्रित सार्वभौमत्वाची कल्पना मांडणारा प्रथम विचारवंत ठरतो.

४) व्यक्ती आणि राज्य (Individual Person and State)**:**

थॉमस हॉब्जने प्रतिपादन केलेल्या सामाजिक करारामध्ये राजा सहभागी नाही. हॉब्जच्या मते, हा करार राजा आणि प्रजेमध्ये झालेला नाही. व्यक्तींनी आपापसात करार केला आहे. या करारातून जनता आपले सर्व अधिकार सर्वोच्च व निरंकुश अशा सार्वभौम सत्तेला (शासकाला) बहाल करते. या करारामध्ये राजा सहभागी नाही व कराराची अट राजाला लागू नाही व राजा जनतेला जबाबदार नाही. हॉब्जच्या मते, या करारामधून दोन गोष्टी साध्य झाल्या, त्यापैकी एक म्हणजे सुव्यवस्थित आणि सभ्य (सुसंस्कृत) अशा समाजाची स्थापना झाली आणि दुसरी म्हणजे, एका अशा राज्याची स्थापना झाली ज्यामध्ये व्यक्ती

आपल्या संपूर्ण नैसर्गिक अधिकारांचा त्याग करून एका निरंकुश सत्तेची निर्मिती करतो. हॉब्ज म्हणतो की, या कराराद्वारे निर्मित राज्य व्यक्तीला असे आश्वासन देते की, त्याचे बाह्य व अंतर्गत शत्रूपासून संरक्षण करेल. जेव्हा सर्व व्यक्ती राज्याच्या (सार्वभौम सत्तेच्या) आज्ञा व आदेशांचे पालन करण्याचे आश्वासन देतील. या सार्वभौम सत्तेला विरोध करण्याचा अधिकार जनतेला नाही. सार्वभौम सत्तेचा आदेश, आज्ञा हाच नियम व कायदा असतो आणि राज्याचे प्रत्येक कार्य वैध व न्यायपूर्ण असते. सार्वभौम सत्ता अखंड व अविभाज्य असते.सार्वभौम सत्तेला राज्याचे अमर्याद अधिकार प्राप्त असतात. जनतेचे केवळ एकमात्र कार्य सार्वभौम सत्तेच्या आदेशांचे पालन करणे हे आहे. सामाजिक करारानंतर समाजामध्ये कला, साहित्य, विज्ञान, व्यापार इत्यादींची निर्मिती झाली, विकास झाला. या करारातून हॉब्ज निरंकुश राज्यसत्तेची स्थापना करतो, त्याचे समर्थन करतो.

हॉब्जच्या सामाजिक कराराचे मूल्यमापन (Evaluation of Hobbes's Social Contract)**:**

थॉमस हॉब्जच्या सामाजिक कराराच्या सिद्धांताने आधुनिक राजकीय विचारसरणीत महत्त्वाचे स्थान मिळवले आहे. अराजकतेतून मुक्त होण्यासाठी लोकांनी परस्पर करार करून आपले सर्व अधिकार एका सार्वभौम सत्तेकडे सोपविले आणि राज्याची निर्मिती झाली. हॉब्जच्या या सामाजिक कराराचे मूल्यमापन करताना त्याच्या गुण-दोषाची चर्चा करणे आवश्यक ठरते. ती खालील प्रमाणे-

अ) गुण :

१) राज्य मानवनिर्मित संस्था:

राज्याच्या उत्पत्तीच्या दैवी सिद्धांताला विरोध करून राज्य हे ईश्वराने निर्माण केलेले नसून ती मानवनिर्मित संस्था आहे, असे स्पष्टपणे सांगणारा थॉमस हॉब्ज हा आधुनिक काळातील पहिला विचारवंत आहे. त्यातून त्याने आधुनिक राज्यसंकल्पनेचा पाया घातला. ही हॉब्जची कल्पना आधुनिक राजकीय विचारांसाठी क्रांतिकारक ठरली.

२) स्थिर व प्रभावी शासन पद्धतीचा पुरस्कर्ता:

मानवी जीवन सुरक्षित आणि शांततापूर्ण करण्यासाठी स्थिर व मजबूत राज्यसत्तेची आवश्यकता आहे, हे हॉब्जने सांगितले. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था टिकविण्याचे महत्त्व अधोरेखित झाले. थॉमस हॉब्ज हा वास्तववादी विचारवंत होता. इंग्लंडमधील अस्थिर अशा राजकीय परिस्थितीला संपुष्टात आणून स्थिर व प्रभावी शासन व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी हॉब्जने अनियंत्रित राजसत्तेचे समर्थन केले. त्याने गृहयुद्धांमधील पहिला चार्ल्स, क्रॉमवेल व दुसरा चार्ल्स अशा संघर्षमय प्रवासात संमिश्र व्यवस्था किंवा अन्य शासनावर टीका करून राजसत्ता ही एकच सर्वश्रेष्ठ शासन प्रणाली मानली. राजाच्या आज्ञा म्हणजे कायदा. राजाला विरोध करण्याचा प्रजेस हक्क नसतो. प्रजेने विरोधी वर्तन करणे म्हणजे पुनश्च नैसर्गिक अवस्थेच्या अराजक परिस्थितीला पोहोचणे असे हॉब्ज मानतो. ज्या उद्देशाने राज्यसंस्था निर्माण झाली त्या विरोधी वर्तन करणे अन्यायकारक ठरते व त्यासाठी राजा व्यक्तींना शिक्षा देऊ शकतो. थॉमस हॉब्जने राजा धर्म व इतर सर्व संस्थांपेक्षा श्रेष्ठ आहे असे वर्णन करून अनियंत्रित राजेशाहीचे समर्थन केले आहे. राजाला तो सार्वभौम शासक मानतो. थोडक्यात, हॉब्ज तत्कालीन इंग्लंडच्या अस्थैर्याचा व अराजकाचा विचार करत स्थिर व प्रभावी शासनपद्धती असावी म्हणून तो अनियंत्रित राजेशाहीचा पुरस्कार करतो.

३) तर्कसुसंगत व वास्तववादी विचार:

निसर्ग अवस्थेतील मानवी जीवन हे रानटी, एकाकी, घृणास्पद, पाशवी आणि क्षणभंगुर होते. लोकांना या जीवनाचा कंटाळा आलेला होता व त्यातून मुक्ती मिळवण्यासाठी, स्वतःच्या आत्मसंरक्षणासाठी, शांतता व सुरक्षेसाठी, शाश्वत जीवनासाठी, आपल्या जीवित्ताचे, वित्ताचे संरक्षण करण्यासाठी लोकांनी एकत्र येऊन आपापसात स्वखुशीने जाणीवपूर्वक करार केला. आत्मसंरक्षणाशिवाय अन्य सर्व निसर्गदत्त अधिकार एका व्यक्तीला किंवा व्यक्ती समूहाला (सार्वभौम राजाला) दिले. या करारातून स्वतःवर सार्वभौमत्त्वाचे नियंत्रण लादून घेतले व त्यातून राज्यसंस्था अस्तित्वात आली. हे हॉब्जचे विचार बुद्धीला पटणारे व तार्किकदृष्ट्या वास्तववादी, सुसंगत वाटतात.

४) वैज्ञानिक व तर्कशुद्ध दृष्टिकोन:

राज्याची उत्पत्ती धार्मिक आधारा ऐवजी तर्क आणि मानवी गरजांवर आधारित आहे, असे हॉब्जने विचार मांडले. त्यामुळे राजकारणाचा अभ्यास वैज्ञानिक पद्धतीने करण्यास सुरुवात झाली.

५) व्यक्तीच्या सुरक्षेवर भर:

हॉब्जच्या मते, राज्याचे प्रमुख कार्य म्हणजे नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करणे. व्यक्तीच्या सुरक्षिततेला त्याने महत्त्व दिले.

६) सार्वभौमत्वाची स्पष्ट मांडणी:

हॉब्जने सार्वभौम सत्तेची संकल्पना स्पष्ट केली. राज्याची सत्ता सर्वोच्च असावी, अन्यथा समाजात अराजकता निर्माण होईल, असे त्याचे मत होते. थोडक्यात, हॉब्जच्या विचारात कायदेशीर सार्वभौमत्वाची संकल्पना मांडलेली दिसून येते.

७) सार्वभौम सत्तेला बदलण्याचा अधिकार जनतेला:

सामाजिक करार करण्याचे उद्दिष्ट अंतर्गत शांतता आणि बाह्य आक्रमणापासून व्यक्तींच्या संरक्षणाचे आहे. जर व्यक्तीच्या संरक्षणाचे कार्य सार्वभौम सत्तेकडून (शासकाकडून) होत नसेल तर प्रजेवर हा करार बंधनकारक राहत नाही. कारण करारात व्यक्तीने आत्मसंरक्षणाचा अधिकार आपल्याकडे ठेवून बाकीच्या अधिकारांचा त्याग केला व स्वेच्छेने सार्वभौमत्वाचे बंधन मान्य केले आहे.कराराचा मूळ उद्देश साध्य होत नसेल तर प्रजा कराराशी बांधिल राहणार नाही असे हॉब्ज ने स्पष्ट केले आहे. सर्वसाधारण परिस्थितीत सार्वभौम सत्तेला एखाद्या व्यक्तीला विरोध करण्याचा अधिकार नाही; परंतु जर शासक जनतेची आत्मरक्षा व सुरक्षा करण्यात अपयशी ठरला, पुन्हा अन्याय-अत्याचाराचे सत्र सुरू झाले तर बहुसंख्य जनतेला सामूहिकपणे सार्वभौम सत्तेला बदलण्याचा अधिकार हॉब्ज जनतेला देतो. हे तत्व उदारमतवादी सिद्धांताला जन्म देते.

ब) दोष:

१) मानवी स्वभावाचे एकांगी चित्रण:

हॉब्जच्या मते, मनुष्य हा स्वार्थी, दुष्ट आणि अहंभावी प्रवृत्तीचा असतो. तो मानवाला पशुतुल्य व विश्वासघातकी मानतो. सर्व दुर्गुणांचा प्रतिकात्मक पुतळा म्हणजे माणूस असे त्याला सुचवायचे आहे. हॉब्जने मानवी स्वभाव अत्यंत स्वार्थी, हिंसक आणि क्रूर असल्याचे वर्णन केले आहे. परंतु मानवामध्ये सहकार्य, प्रेम, त्याग, दया आणि नैतिकता यांसारखे सद्गुणही असतात याकडे तो दुर्लक्ष करतो. त्यामुळे त्याचे मानवी स्वभावाचे चित्रण एकांगी आणि अतिशयोक्तीपूर्ण वाटते.

२) निसर्ग अवस्थेचे अवास्तव व काल्पनिक वर्णन:

हॉब्ज म्हणतो निसर्ग अवस्था ही अराजकतापूर्ण स्थिती होती. मानवाला जीवित, वित्त यांची हमी नव्हती. हॉब्जने वर्णन केलेली 'मानव हा मानवाचा शत्रू आहे' अशी नैसर्गिक अवस्था प्रत्यक्ष इतिहासात आढळत नाही. त्यामुळे हॉब्जचे निसर्ग अवस्थेचे वर्णन अवास्तव व काल्पनिक मानले जाते.

३) निरंकुश सत्तेला समर्थन:

हॉब्जने सार्वभौम सत्तेला अमर्याद अधिकार दिले. त्यामुळे त्याच्या सिद्धांतातून हुकूमशाही आणि निरंकुश राजसत्तेला समर्थन मिळते. एकंदर, हॉब्जने शासनाच्या हाती अमर्याद सत्ता सोपवून आणि जनसामान्यांना प्रतिकाराच्या हक्कांपासून वंचित ठेवून निरंकूशवादास (Absolutism) प्रोत्साहन दिले आहे.

४) व्यक्तिस्वातंत्र्याकडे दुर्लक्ष:

थॉमस हॉब्जचा सार्वभौम शासक निरंकुश असून प्रजेचे संपूर्ण नियंत्रण करण्याची शक्ती (Power) बाळगणारा आहे. व्यक्तीने आपापसात करार करून स्वखुशीने आपले सर्व नैसर्गिक अधिकार त्याला दिल्यामुळे व्यक्तीला आत्मसंरक्षणाशिवाय (Self-Preservation) कोणतेच अधिकार व स्वातंत्र्य राहत नाही. सार्वभौमाच्या आज्ञा निमूटपणे पाळण्याचे स्वातंत्र्य एवढेच व्यक्तीकडे असते. सार्वभौमाची हुकूमशाही निर्माण करून त्याने व्यक्ती स्वातंत्र्य संपुष्टात आणल्याची त्यावर टीका होते. थोडक्यात, व्यक्तीच्या जीवित व वित्ताच्या सुरक्षेच्या नावाखाली हॉब्जने व्यक्तीचे बहुतेक अधिकार राज्याकडे दिले. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य आणि लोकशाही मूल्यांना कमी महत्त्व त्याच्या विचारात मिळाले आहे. अशी टीका त्याच्या विचारावर होते.

५) करारात सार्वभौम सत्ता सहभागी नाही:

थॉमस हॉब्ज म्हणतो, सामाजिक करार हा लोकांमध्ये झाला असून सार्वभौम सत्ता त्यात सहभागी नाही. वास्तवात कोणताही करार हा केवळ एका पक्षात होत नसतो. त्यामुळे सार्वभौम सत्तेवर कोणतेही नियंत्रण राहत नाही. त्यामुळे तो अनियंत्रित व अमर्याद शक्ती (Power) असणारा निरंकुश शासक बनतो. हॉब्जच्या सामाजिक कराराच्या कल्पनेला कोणताही ऐतिहासिक आधार नाही.

६) लोकशाहीविरोधी प्रवृत्ती:

हॉब्जच्या मते, राज्याची सार्वभौम सत्ता ही एकाच व्यक्तीच्या किंवा व्यक्ती समूहाच्या ठिकाणी केंद्रीत असते. मात्र लोकशाहीमध्ये सार्वभौम सत्ता विकेंद्रीत असावी असे मानले जाते. लोकशाही दृष्टिकोनातून सार्वभौमत्वाच्या विकेंद्रीकरणाला अधिक महत्त्व दिले जाते. थॉमस हॉब्ज मात्र एकाच सार्वभौम राजाला अनियंत्रित व अमर्यादित अधिकार प्रदान करताना दिसतो. थोडक्यात, हॉब्जचा सिद्धांत लोकशाहीपेक्षा राजेशाही आणि केंद्रीकृत सत्तेला अधिक पाठिंबा देतो. त्यामुळे आधुनिक लोकशाही तत्त्वांशी तो सुसंगत नाही.

७) विचारातील परस्पर विसंगती :

थॉमस हब्ज म्हणतो, निसर्गा अवस्था ही अराजकतापूर्ण स्थिती होती. मानवाला जीवित व वित्त यांची हमी नव्हती. बळी तो कानपिळी अशी निसर्गावस्था होती. जमेल ते लुबाडने व शक्य त्यास ठार करणे ही मानवी प्रवृत्ती होती. अशी काळीकुट्ट अंध:कारमय स्थिती असेल तर मनुष्य आपापसात करार करून शांततापूर्ण समाज स्थापन करणे शक्य वाटत नाही. मानवातील संघर्षमय जीवनातून सहयोगी शांततेचे जीवन जगण्याएवढे परिवर्तन अनाकलनीय वाटते. हॉब्ज एका बाजुने शक्तीच्या (सत्तेच्या) भीतीशिवाय करार कार्यान्वित होणार नाही असे म्हणतो, तर दुसऱ्या बाजूने करार शक्ती निर्मिती अगोदर झाला असे हॉब्ज मानतो. त्याचे हे विचार परस्पर विसंगत वाटतात.

८) केवळ भीती हा राज्याचा आधार नसतो:

निसर्ग अवस्थेतील मानवाच्या असुरक्षिततेच्या, भीतीच्या भावनेतून राज्य उदयास आले व हे राज्य नष्ट झाले तर अराजकता निर्माण होईल. या भीतीमुळे ते राज्य टिकवणे आवश्यक असल्याचे मत हॉब्ज मांडतो. परंतु केवळ भीती हा राज्याच्या निर्मितीचा पाया, आधार होऊ शकत नाही. जनकल्याण, सहकार्य व सुखी जीवन हे अधिक महत्वाचे वाटते. लोकसंमती हा कराराचा महत्त्वाचा आधार किंवा पाया असतो, याकडे हॉब्ज दुर्लक्ष करताना दिसतो.

सारांश:

एकंदर वरील विवेचनावरून असे म्हणता येईल की, थॉमस हॉब्जचा सामाजिक करार सिद्धांत आधुनिक राजकीय विचारांच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. त्याने राज्याची उत्पत्ती मानवी करारातून झाली, ही आधुनिक कल्पना दिली. तसेच सार्वभौमत्व आणि राज्यसत्तेचे महत्त्व स्पष्ट केले. धर्म व राज्य यासंबंधी विचार मांडून धर्मनिरपेक्ष सार्वभौम राज्य स्थापन करण्याचे समर्थन केले. राज्य हे ईश्वरनिर्मित नसून मानवनिर्मित संस्था असल्याचे हॉब्जने स्पष्ट केले. थॉमस हॉब्जने राज्यातील इतर सर्व संस्थाप्रमाणे राज्यसंस्थेच्या नियंत्रणात धर्म संस्था असावी असे सांगून, धर्म सत्तेला राज्य सत्तेच्या अधिनस्थ केले .परंतु मानवी स्वभावाचे निराशाजनक चित्रण, निरंकुश सत्तेचे समर्थन आणि व्यक्तिस्वातंत्र्याकडे दुर्लक्ष , विचारातील परस्पर विसंगती यांमुळे त्याच्या सिद्धांतावर मोठ्या प्रमाणात टीका करण्यात आली. तरीही आधुनिक राज्यशास्त्राच्या विकासात थॉमस हॉब्जचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते.

स्वयं अध्ययन प्रश्न -२ :

प्रश्न-१) दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.

१. थॉमस हॉब्जने सामाजिक करार सिद्धांत कोणत्या ग्रंथात मांडला?

अ) Two Treatises of Civil Government   ब) Leviathan

क) Social Contract   ड) Republic

२. थॉमस हॉब्ज कोणत्या देशाचा विचारवंत होता?

अ) फ्रान्स   ब) जर्मनी

क) इंग्लंड   ड) इटली

३. हॉब्जच्या मते राज्याची निर्मिती कशातून झाली?

अ) ईश्वरी इच्छेतून   ब) युद्धातून

क) सामाजिक करारातून   ड) कुटुंबातून

४. हॉब्जच्या मते मानवाचा मूलभूत स्वभाव कसा आहे?

अ) परोपकारी   ब) स्वार्थी व संघर्षप्रिय

क) धार्मिक   ड) नैतिक

५. हॉब्जच्या मते निसर्गावस्था कशी होती?

अ) शांततामय   ब) आदर्श

क) संघर्षमय व अराजकपूर्ण   ड) धार्मिक

६. हॉब्जच्या मते निसर्गावस्थेतील जीवन कसे होते?

अ) आनंदी व समृद्ध   ब) सुरक्षित

क) सभ्य व सुसंस्कृत   ड) एकाकी, दरिद्री व अल्पजीवी

७. हॉब्जच्या मते निसर्गावस्थेत संघर्षाची प्रमुख कारणे कोणती?

अ) धर्म, जात, भाषा   ब) स्पर्धा, भय व कीर्तीची इच्छा

क) संपत्ती व शिक्षण   ड) व्यापार व उद्योग

८. हॉब्जच्या मते सामाजिक कराराचा मुख्य उद्देश कोणता?

अ) लोकशाही प्रस्थापित करणे   ब) धर्माचा प्रसार करणे

क) आत्मसंरक्षण व सुरक्षितता   ड) आर्थिक विकास

९. सामाजिक करारानंतर व्यक्तीने आपले अधिकार कोणाकडे सोपविले?

अ) संसदेकडे ब) चर्चकडे

क) सार्वभौम सत्तेकडे ड) न्यायालयाकडे

१०. हॉब्जच्या मते सार्वभौम सत्ता कशी असते?

अ) मर्यादित ब) लोकनियंत्रित

क) निरंकुश व सर्वोच्च ड) विकेंद्रित

११. हॉब्जच्या सामाजिक करारात सार्वभौम सत्ता सहभागी असते का?

अ) होय ब) नाही

क) अंशतः ड) कधी कधी

१२. हॉब्जच्या मते प्रजेला सार्वभौम सत्तेला विरोध करण्याचा अधिकार आहे का?

अ) पूर्ण अधिकार आहे ब) काही प्रमाणात आहे

क) नाही ड) संसदेच्या परवानगीने आहे

१३. हॉब्जच्या मते राज्याचे प्रमुख कार्य कोणते?

अ) शिक्षण देणे ब) धर्माचे रक्षण करणे

क) व्यक्तींच्या जीविताचे संरक्षण करणे ड) व्यापार वाढविणे

१४. हॉब्ज कोणत्या प्रकारच्या शासनाचा समर्थक होता?

अ) लोकशाही ब) समाजवाद

क) निरंकुश राजेशाही ड) संघराज्य

१५. हॉब्जच्या मते Commonwealth म्हणजे काय?

अ) संसद ब) राज्य

क) न्यायालय ड) चर्च

१६. हॉब्जच्या विचारांवर कोणत्या घटनेचा प्रभाव होता?

अ) फ्रेंच राज्यक्रांती ब) अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध

क) इंग्लंडमधील गृहयुद्ध ड) रशियन क्रांती

१७. हॉब्जच्या मते व्यक्तीने कोणता अधिकार स्वतःकडे ठेवला?

अ) मतदानाचा अधिकार ब) संपत्तीचा अधिकार

क) आत्मसंरक्षणाचा अधिकार ड) शिक्षणाचा अधिकार

१८. हॉब्जच्या मते निसर्गावस्थेत न्याय-अन्यायाला स्थान होते का?

अ) होते | ब) नव्हते
क) काही प्रमाणात होते | ड) धर्मावर अवलंबून होते

१९. हॉब्जच्या सामाजिक करार सिद्धांताचा मुख्य दोष कोणता मानला जातो?

अ) लोकशाहीचे समर्थन | ब) मानवी स्वभावाचे सकारात्मक चित्रण
क) निरंकुश सत्तेला समर्थन | ड) राज्यविरोधी भूमिका

२०. राज्य मानवनिर्मित संस्था आहे, असे स्पष्टपणे सांगणारा आधुनिक काळातील पहिला विचारवंत कोण?

अ) जे.जे. रुसो | ब) जॉन लॉक
क) थॉमस हॉब्ज | ड) इम्यान्युयल कांट

३.२.२.२ जॉन लॉकचा सामाजिक कराराचा सिद्धांत (John Locke's Social Contract Theory):

पार्श्वभूमी :

जॉन लॉक (१६३२-१७०४) हा १७ व्या शतकातील इंग्लंडचा प्रसिद्ध उदारमतवादी विचारवंत होता. सामाजिक कराराच्या सिद्धांताचा तो दुसरा प्रमुख प्रवर्तक आहे. त्याने आपल्या Two Treatises of Civil Government (1690) या ग्रंथामध्ये सामाजिक कराराचा सिद्धांत मांडला. लॉकच्या विचारांचा आधुनिक लोकशाही, उदारमतवाद, संविधानवाद आणि मानवी हक्कांवर मोठा प्रभाव पडला आहे. ब्रिटिश राजकीय तत्त्वज्ञानात थॉमस हॉब्ज नंतर दुसरा महत्त्वाचा विचारवंत म्हणून जॉन लॉकला ओळखले जाते. थॉमस हॉब्जचा अनियंत्रित सार्वभौमत्वाचा सिद्धांत जॉन लॉकने मर्यादित सार्वभौमात परिवर्तित केला. थॉमस हॉब्जने निरंकुश राजेशाहीचे प्रबळ समर्थन केले आहे. तर जॉन लॉक यांने मर्यादित राजेशाहीचे समर्थन केले आहे. जॉन लॉकने १६८८ च्या 'गौरवशाली राज्यक्रांतीचे (रक्तहीन क्रांती) (Glorious Revolution)' चे समर्थन केले आणि राजसत्तेवर जनतेच्या मताची मर्यादा घातली.

इंग्लंडमधील तत्कालीन परिस्थितीचा जॉन लॉकच्या विचारावर प्रभाव पडलेला दिसून येतो. तत्कालीन इंग्लंडमधील परिस्थितीचा विचार करता इंग्लंडची संसद इंग्लंडचा राजा चार्ल्स प्रथम (१६२५-४९) बरोबर आपल्या अधिकाराकरिता संघर्ष करत होती. त्याकाळात जॉन लॉक चा जन्म झाला. हा इंग्लंडमधील गृहयुद्धाचा (१६४२-४९) कालखंड होता. राजा व प्रजा यांच्या संघर्षाचा परिणाम चार्ल्स प्रथमची हत्या (१६४९) झाली. काही दिवस क्रॉमवेलची सत्ता (१६४९-१६६०) राहिली. (क्रॉमवेल शासनाच्या माध्यमातून राजा विरोधात विद्रोह करून ब्रिटनमध्ये लोकशाहीची स्थापना करण्यात आली होती). क्रॉमवेलच्या मृत्यूनंतर पुन्हा चार्ल्स द्वितीयेच्या रूपाने राजेशाही अस्तित्वात आली. राजावर संसदेने अनेक बंधने लादली. जेम्स दुसरा गादीवर आल्यानंतर त्याच्या जुलमी व अत्याचारी नीतीमुळे संघर्ष वाढत जाऊन त्याला पलायन करावे लागले. याच वर्षी १६८८ मध्ये जेम्स दुसरा याच्या पालयानामुळे संसदेने विल्यम व मेरी यांना गादीवर बसवले. हीच ती इंग्लंडची गौरवशाली क्रांती होय. ज्या क्रांतीत रक्ताचा एकही

थेंब न सांडता सत्ता परिवर्तन झाले. संसदेने विल्यमला सत्तास्थानी बसविल्याने संसदेचे वर्चस्व निर्माण झाले व राजा नामधारी प्रमुख बनला. संसदेने हक्काची सनद-१६८९ (Bill of Rights) मान्य करून राजावर संसदेचे नियंत्रण प्रस्थापित केले. इंग्लंडमधील या सर्व घडामोडीचा जॉन लॉक साक्षीदार होता, हॉब्ज व जॉन लॉक यांच्या विचारात खूप मोठा फरक आहे. कारण जॉन लॉक ने १६८८ ची गौरवशाली क्रांती अनुभवली होती. त्यातून अन्यायी राजसत्तेत परिवर्तनाचा अधिकार जनतेस असतो असे तत्त्व मांडून त्यांने राजकीय विचाराला नवी दिशा दिली. जॉन लॉकचे वडील एक सूप्रसिद्ध वकील होते. १६४२ते १६४९या काळात राजसत्तेच्या विरोधी गृहयुद्धातील सैन्यातील एका तुकडीच्या प्रमुख पदावर ते होते. त्यामुळे जॉन लॉकची निरंकुश राजसत्तेचा विरोधक व मर्यादित राजसत्तेचा समर्थक अशी उदारमतवादी भूमिका निर्माण झाली. त्यातून त्याने १६८८ च्या क्रांतीचे समर्थन केले.

१) मानवी स्वभाव (Human Nature)**:**

जॉन लॉक ने Human Concerning Human Understanding (१६९०) या ग्रंथात मानवी स्वभाव संबंधी विचार मांडले आहेत. थॉमस हॉब्ज आणि जॉन लॉक यांच्या मानव स्वभावासंबंधीच्या विचारात दोन टोकांचे अंतर आहे. हॉब्जने माणसात पशुवत अवगून बधितले. तर जॉन लॉकने मानवीय गुणावर लक्ष केंद्रित केले आहे. थॉमस हॉब्ज प्रमाणे पशुवत स्वार्थी भावना असलेला मानवप्राणी अशी अभिव्यक्ती न करता माणूस हा सामाजिक व नैतिक प्राणी असल्याचे जॉन लॉक विचार मांडतो. जॉन लॉक च्या मते, मनुष्य बुद्धिमान व विचारशीलप्राणी आहे. त्याच्यामते माणूस हा नैतिक जीवन जगणारा विवेकी (बुद्धिमान) व सामाजिक प्राणी आहे. तो स्वार्थी व आक्रमक प्रवृत्तीचा नसतो. मनुष्य हा विवेकशील (Rational) प्राणी आहे आणि तो स्वभावत:च नैतिक नियमांचे पालन करतो. त्याच्यामध्ये परस्पर सहकार्य, सहानुभूती, प्रेम, सदभावना, दया आणि सामाजिक न्याय भावना ही मूल्य विद्यमान असतात. या मूल्यांच्या आधारावर मानव आपले सामाजिक जीवन व्यतीत करीत असतो.शांतता व एकतेने इतरांसोबत तो सामाजिक बांधिलकी पत्करू इच्छितो. हॉब्जसारखे पाशवी प्रवृत्तीचे चित्रण न करता मुलत: माणूस चांगला, नैतिक, कर्तव्यदक्ष व शांत, योग्य, शिस्तप्रिय(न्यायप्रिय), सामाजिक जाणीव असलेला मानवतावादी आणि स्वनियंत्रित अशा सद्‌गुणांचा पुतळा आहे, असे सांगून मानवी स्वभाव विषयी जॉन लॉकने आशादायी चित्र रेखाटले आहे. जॉन लॉकच्या मते, राजसत्ता व चर्चमधील सत्तास्पर्धा कमी झाली व गौरवशाली क्रांती होऊन सत्तेत परिवर्तन होऊ शकले या घटना चांगल्या बाजूशी संबंधित आहेत.

२) निसर्ग अवस्था (State of Nature)**:**

थॉमस हॉब्ज प्रमाणे निसर्ग अवस्था ही समाजपुर्व अवस्था न मानता जॉन लॉकने ती राज्यपूर्व अवस्था मानलेली आहे. याचाच अर्थ राज्य अस्तित्वात नव्हते, मात्र समाज अस्तित्वात होता. त्यामुळे माणूस रानटी नसून सामाजिक होता हे स्पष्ट होते. निसर्ग अवस्थेत माणूस पूर्ण स्वतंत्र होता. आपल्या व्यक्तिमत्त्वाचा व इच्छेचा तो पूर्ण अविष्कार करू शकत असे. तसेच सर्व माणसे समान होती, कारण सर्व माणसे ही सर्व शक्तिमान अशा ईश्वराची निर्मिती आहेत. जॉन लॉकने वर्णन केलेली निसर्गावस्था शांतता, सदभाव, सहकार्य व संरक्षण या तत्त्वावर आधारित एक आदर्श नैतिक स्थिती आहे. माणूस हा विवेकी (बुद्धिमानप्राणी) असल्यामुळे त्याच्या स्वार्थावर नियंत्रण येत असते. जॉन लॉक असे म्हणतो की, बुद्धिवादी

(विवेकशील) माणसे एकत्र राहत होती, तेव्हा कोणीही सर्वोच्च अधिकारी नव्हता. ते स्वतःच आपणामधून न्याय देत असत अशी पृथ्वीवरील निसर्गावस्था सुवर्णयुगाची अवस्था होती. माणूस नैतिक होता कारण तो बुद्धीवादी होता. निसर्गनियमानुसार त्याचा संपूर्ण व्यवहार होत असे. हे निसर्ग नियम न्याय व विवेकावर आधारित असत. निसर्गावस्थेतील माणूस स्वतंत्र होता परंतु स्वैराचारी नव्हता. निसर्ग नियम अर्थात विवेकाधिष्ठीत नैतिक नियमांचे त्याच्यावर नियंत्रण होते. माणसे अशी वागत असत की, दुसऱ्यांनी आपल्याशी कसे वागावे असे समजत. जशी तुम्ही इतरांकडून चांगल्या वागणुकीची अपेक्षा करता तसेच आपण इतरांशी वागावे हा नियम सर्वत्र मान्य होता. उदा. दुसऱ्याची हत्या करणे निसर्ग नियमांच्या विरुद्ध आहे. बुद्धी हा स्वातंत्र्याचा आधार असून ती माणसाला नैसर्गिक नियमानुसार जीवन जगण्याचे योग्य मार्गदर्शन करते. 'जशास तसे' हा गुन्हेगारांना शिक्षा करण्याचा समाजातील प्रत्येकाला अधिकार होता. उदा. लांडगा किंवा वाघाने माणसांवर हल्ला केला तर त्याला ज्या निसर्ग न्यायाने आपण ठार मारतो. तोच न्याय माणसाच्या बाबतीत लागू होत असे. गुन्हेगाराने पुन्हा गुन्ह्याकडे वळू नये याकरिता प्रमाणात शिक्षेची तरतूद होती. अशा प्रकारे निसर्गावस्था ही स्वतंत्र व समान व्यक्ती असलेली नैसर्गिक नियमावर चालणारी राज्यपूर्व समाज अवस्था होती असे जॉन लॉक सांगतो.

जॉन लॉकने वर्णन केलेली निसर्गावस्था निसर्ग नियमांच्या नियंत्रणात होती. सर्वजण समान व स्वतंत्र असल्यामुळे कोणीही दुसऱ्याचे जीवन, स्वातंत्र्य व संपत्ती यास धोका निर्माण करू नये, आक्रमण करू नये आणि शांतता व संरक्षण देणाऱ्या निसर्ग नियमांचे पालन करावे यासाठी काही नैसर्गिक अधिकार प्रत्येक व्यक्तीला नैसर्गिक नियमानुसार मिळत असत. असे तीन नैसर्गिक अधिकार म्हणजेच १) जीविताचा अधिकार (जीवन जगण्याचा अधिकार) २) स्वातंत्र्याचा अधिकार ३) संपत्तीचा (खाजगी मालमत्तेचा) अधिकार. हे अधिकार प्रत्येक व्यक्तीला नैसर्गिक नियमानुसार मिळत असत. जॉन लॉकच्या मते, जीविताचा अधिकार मानवाच्या उपजत आत्मसंरक्षणाशी संबंधित आहे. तर स्वातंत्र्याचा आणि संपत्तीचा अधिकार व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असल्याचे लॉक सांगतो. जॉन लॉकच्या नैसर्गिक अधिकाराचे परिणाम अमेरिकेच्या राज्यघटनेवर झालेले दिसतात.

नैसर्गिक अवस्थेतील अडचणी व राज्यसंस्थेची आवश्यकता:

जॉन लॉकने वर्णन केलेली निसर्गावस्था अत्यंत चांगली होती. माणूस विवेकशील वर्तन करीत होता. शांतता, सद्‌भाव, सहकार्य व संरक्षण या सर्व गोष्टी विद्यमान होत्या, असे असताना माणसांना राज्यसंस्थेच्या निर्मितीची आवश्यकता का भासली? याचे कारण निसर्गावस्थेतील असुविधा, अडचणी होय. जॉन लॉकच्यामते, निसर्ग अवस्थेत कालांतराने तीन असुविधा, गैरसोयी किंवा अडचणी निर्माण झाल्या. त्या पुढील प्रमाणे आहेत. १) नैसर्गिक कायद्याची अस्पष्टता: निसर्गावस्थेत स्पष्ट व सर्वसंमतीचा निश्चित स्वरूपाचा स्थिर असा कायदा अस्तित्वात नव्हता. ज्याद्वारे योग्य-अयोग्य किंवा मतभेदाचे निर्णय घेता येतील. प्रत्येक व्यक्ती विवेकशील असला तरी निसर्ग नियमांचा, कायद्याचा अर्थ स्वतःच्या मर्जीनुसार लावत असल्याने त्यात निःष्पक्षपातीपणा नव्हता. म्हणजेच नैसर्गिक नियम व कायदा अस्पष्ट होता. थोडक्यात, स्पष्ट व निश्चित कायदा करणारे आजच्यासारखे कायदेमंडळ अस्तित्वात नव्हते. २) निसर्ग नियमांना कार्यान्वित करणारी यंत्रणा नव्हती: निसर्ग नियमांच्या व कायद्याच्या अनुरूप निर्णयांना कार्यान्वित (अमलात आणणारी/अंमलबजावणी करणारी) करणारी कोणतीही सामर्थ्यसंपन्न अशी प्रभावी यंत्रणा, संस्था

अस्तित्वात नव्हती. म्हणजेच येथे कार्यकारी मंडळाचा अभाव होता. ३) नि:ष्पक्ष व स्वतंत्र न्यायदान व्यवस्थेचा अभाव: नैसर्गिक नियमांचा, कायद्यांचा अर्थ लावणारी अधिकृत स्वतंत्र सत्ता, संस्था अस्तित्वात नव्हती. प्रत्येक व्यक्तीला न्यायदान करण्याचा व अपराध्यास शिक्षा देण्याचा अधिकार होता. स्वतंत्र न्यायदान करणारा तिसरा पक्ष अस्तित्वात नसल्यामुळे स्वतःच्या अपराधाविषयी शिक्षा भोगण्यात माणूस नि:ष्पक्ष राहू शकणार नाही हे स्पष्ट असते. थोडक्यात, निसर्गावस्थेत सर्व व्यक्तींना नि:ष्पक्षपणे दंड (शिक्षा) किंवा न्याय देणारी सक्षम सत्ता, यंत्रणा अस्तित्वात नव्हती. म्हणजेच तेथे नि:ष्पक्ष व स्वतंत्र न्यायमंडळाचा अभाव होता.

अशाप्रकारे निसर्ग अवस्थेतील वरील या तीन अडचणी, गैरसोयी सोडविण्यासाठी, निसर्गावस्थेतील अनिश्चित व अस्थिर परिस्थितीला संपुष्टात आणण्यासाठी सुस्पष्ट नियम निर्माण करणारी (कायदेमंडळ), त्या नियमांचे पालन करवून घेणारी (कार्यकारी मंडळ), व त्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा करणारी (न्यायमंडळ) नि:ष्पक्षपाती शासनव्यवस्थेची आवश्यकता भासली. त्याची परिणीती म्हणून व्यक्तीने सामाजिक करारातून राज्यसंस्थेची निर्मिती केली असे विचार जॉन लॉकने मांडले आहेत.

३) सामाजिक करार (Social Contract)**:**

जॉन लॉक निसर्ग अवस्थेतील जनतेला सामाजिक करार का करावा लागला याचे स्पष्टीकरण देतो. जॉन लॉकच्या मते, निसर्ग अवस्था ही शांतता व सुरक्षिततेची असली तरी कालांतराने तीन गैरसोयी, समस्या निर्माण झाल्या. यामध्ये एक, नैसर्गिक कायद्याची अस्पष्टता. दुसरी, निसर्ग नियमांना अमलात आणणारी प्रभावी यंत्रणा अस्तित्वात नव्हती. तिसरी, निसर्ग नियमांचा अर्थ लावणारी अधिकृत सत्ता, संस्था अस्तित्वात नव्हती. अशा या तीन समस्या निर्माण झाल्या होत्या. त्या समस्या दूर करण्यासाठी निसर्गावस्थेतील माणसांना करार करावा लागला असे जॉन लॉक म्हणतो. सामाजिक करारांतर्गत मनुष्य परस्परांना असे वचन देतो की, **प्रत्येकजण नैसर्गिक अधिकार त्यागण्यास व सामाजिक बंधनांचा स्वीकार करण्यास तयार होतो, जर सर्व माणसे एकत्र येऊन सुखी, संरक्षित व शांततामय जीवनाची हमी देऊन त्यांच्या नैसर्गिक अधिकारांच्या (जीविताचा, स्वातंत्र्याचा व संपत्तीचा) संरक्षणाची हमी अधिक स्वरूपात देत असतील तर! अशाप्रकारे प्रत्येक माणूस दुसऱ्या माणसासोबत विशिष्ट हेतूने करारबद्ध होतो.**

जीवित, स्वातंत्र्य, व संपत्ती या नैसर्गिक अधिकारांचे समुदायांतर्गत व समुदायबाह्य संरक्षण मिळावे यासाठी मनुष्य कराराने एकत्र येतो व नागरी समाजाची (Civil Society) ची स्थापना करतो. जॉन लॉकच्या मतानुसार व्यक्तींनी त्यांना 'नैसर्गिक कायदे व नियमासंबंधी' ज्या अडचणी, गैरसोयी निर्माण होत असत त्यासंबंधित असलेले अधिकार समाजाला बहाल केले. यामध्ये प्रत्येक व्यक्तीने नैसर्गिक कायदा लागू करणे आणि त्याच्या उल्लंघनासंदर्भात दंड देण्याचा अधिकार सर्व समाजाला बहाल केला. निसर्गावस्थेत व्यक्तीला जे नैसर्गिक अधिकार प्राप्त होते ते समाजाला बहाल केले नाहीत. ते स्वतःकडे ठेवले. उदा. जीविताचा (जीवन जगण्याचा), स्वातंत्र्याचा व संपत्तीचा (खाजगी मालमत्तेचा) हे तीन नैसर्गिक अधिकार अदेय असल्यामुळे ते स्वतः जवळ सुरक्षित ठेवले. इतर अधिकारांचा त्याग करून या अधिकारांना अधिक संरक्षण प्राप्त व्हावे यासाठीच तर सामाजिक करार केला. या करातून नागरी समाज (Civil Society) निर्माण झाला.

जॉन लॉकने दोन करार सांगितलेले आहेत. त्यापैकी एक, 'नागरी समाज' हा आहे आणि दुसरा, 'शासनाच्या निर्मितीसंबंधी' करार आहे.म्हणजेच, जॉन लॉकने अस्पष्टरित्या दोन करार कल्पिले आहेत. एक

समाजाची निर्मिती करतो आणि दुसरा शासनसंस्था निर्माण करतो. पहिल्या कराराने व्यक्ती आपले अधिकार समाजाला बहाल करते व नंतर समाज शासनसंस्थेस देतो. जॉन लॉकने येथे 'नागरी समाजाची स्थापना' आणि 'शासनाची स्थापना' यात भेद केला आहे. लॉकच्या मते, या शासनाच्या माध्यमातून 'राजकीय समाजा'ची (Political Society) उद्देशपूर्ती करता येईल. थॉमस हॉब्जप्रमाणे जॉन लॉकच्या करारामध्ये नैसर्गिक अधिकार सर्व व्यक्तींनी एका व्यक्तीला किंवा व्यक्तीसमूहाला (सार्वभौम सत्तेला) दिलेले अधिकार नाहीत. तर ते प्रत्येक व्यक्तीने समाजाला दिलेले अधिकार आहेत आणि व्यक्तींच्या नैसर्गिक अधिकारांच्या संरक्षणाच्या आश्वासनाने ते राजकीय समाजाला (राज्यसंस्थेला) दिलेले आहेत. येथे जॉन लॉकच्या सामाजिक करारातील राजकीय समाज म्हणजे राज्य (राज्यसंस्था) होय. सार्वभौमसत्ता म्हणून राज्यसंस्था अस्तित्वात येताना त्या संस्थेचे मानवी तत्त्व म्हणून राजाची (King) निर्मिती झाली. म्हणजे निसर्गावस्थेतील व्यक्तींनी सार्वभौम (Sovereign) म्हणून राजाची निर्मिती करून राज्यसंस्थेचा उदय घडवून आणला. साहजिकच राजाला आवश्यक तेच अधिकार सामाजिक करारातून प्राप्त झाले. व्यक्तींनी त्यांचे महत्त्वाचे अधिकार स्वतःसाठी राखून ठेवले. व्यक्तींचे तीन मूलभूत नैसर्गिक अधिकार म्हणजे जीवन जगण्याचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क आणि खाजगी संपत्तीचा हक्क आहेत. या तीन महत्त्वाच्या हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी ही राजामार्फत राज्यसंस्थेवर पडली. आपली जबाबदारी पार पाडता येईल इतकीच मर्यादित सत्ता सार्वभौमला बहाल केली असे जॉन लॉक म्हणतो.

व्यक्तीने कराराच्या माध्यमातून आपल्या नैसर्गिक अधिकारांच्या संरक्षणाची जबाबदारी राजकीय समाजाकडे(राज्यसंस्थेकडे) सोपवल्यामुळे राज्यसंस्थेवर दोन बंधने येतात. एक, म्हणजे निसर्गावस्थेतील व्यक्तींचे जीवित, स्वातंत्र्य व संपत्ती या नैसर्गिक अधिकारांचे संरक्षण करणे व दोन, म्हणजे नैसर्गिक नियमांच्या पालनातून कायदानिर्मिती, त्यांची अंमलबजावणी व त्यांच्या उल्लंघनासंदर्भात निश्चित दंड देण्याचे उचित कार्य करणे होय. अशाप्रकारे वरील दोन उद्देशांच्या पूर्ततेसाठी व्यक्तींनी सामाजिक कराराच्या माध्यमातून राज्याची म्हणजेच शासनसंस्थेची निर्मिती केली. पहिल्या कराराद्वारे व्यक्तीने समाजाला काही अधिकार दिले तर दुसऱ्या कराराने समाजाने शासनसंस्था म्हणजेच राज्य निर्माण केले. थॉमस हॉब्ज व्यक्तीचे सर्व अधिकार एका अनियंत्रित सार्वभौमाला सत्तेला (राजाला) सुपूर्द (बहाल) करतो. तर जॉन लॉक मर्यादित प्रमाणात राजकीय समाजाला (राज्यसंस्थेला) सत्ता (Power) बहाल करतो. सामाजिक कराराद्वारे राज्यसंस्थेवर समाजाने टाकलेल्या वरील दोन जबाबदाऱ्या (जनतेच्या इच्छा) पूर्ण करण्यात शासनसंस्था अपयशी ठरली असेल तर समाज त्या सत्तेस बरखास्त करून अथवा हटवून दुसरी सत्ता प्रस्थापित करू शकतो. अशा प्रकारे जॉन लॉकने मर्यादित व जबाबदार शासनाचा विचार दिला आहे. ज्यामध्ये जनतेची संमती, जनकल्याण, कायदेशीर, सहिष्णु, निषेधात्मक, मर्यादित शासन अभिप्रेत आहे. सारांश, जॉन लॉकने मर्यादित व जबाबदार राजसत्तेचे समर्थन करून व्यक्ती स्वातंत्र्य अबाधित ठेवले आहे.

४) शासन (Government):

जॉन लॉकने राज्य आणि शासनातील फरक मान्य केला आहे.परंतु त्याचे स्पष्ट स्पष्टीकरण देताना तो दिसत नाही. जॉन लॉकच्या लिखाणात अधेमध्ये कुठेतरी अस्पष्टपणे दुसऱ्या कराराचा संदर्भ मिळतो. राजकीय समाजाच्या स्थापनेनंतर शासन निर्माण झाले. शासनसंस्था लोकसंमतीवर अवलंबून असते. लॉकच्या विचारानुसार केवळ शासनाच्या स्थापनेसाठीच समाजाच्या संमतीची (Consent) गरज असते.

अशारीतीने लॉकने संविधानिक शासनाच्या (Constitutional Government) विचारास चालना दिली. निसर्गावस्थेतील उणिवा दूर करून नैसर्गिक अधिकारांच्या (जीवित, स्वातंत्र्य व संपत्ती) संरक्षणासाठी सामाजिक करारातून राज्यसंस्था अस्तित्वात आली. समाजाने शासनाची स्थापना विश्वस्त संस्था (Trustee Institution) या स्वरूपात केली आहे. लॉकने राज्याला व्यक्ती विकासाचे एक साधन मानून एक 'विश्वस्त' संस्था असे स्वरूप दिले. समाज शासनाची निर्मिती यासाठी करतो की, नैसर्गिक कायद्याच्या अनुकूल असतील असे निश्चित व स्पष्ट, निःसंदिग्ध कायदे निर्माण करणे. जनतेतील परस्पर विवाद, भांडणतंटे सोडविणे, सर्व व्यक्तींच्या किंवा समाजाच्या हिताचे रक्षण करणे, पहिल्या करारानुसार समाजाला जे अधिकार प्राप्त झालेले आहेत, त्यांचा प्रयोग (अंमल) शासनाद्वारे करणे. जॉन लॉकच्या मते, शासनाच्या तीन अंगामध्ये कायदेमंडळ सर्वोच्च आहे. त्यांनी कार्यकारी मंडळ व न्याय मंडळाचा कायदेमंडळामध्ये अंतर्भाव केला आहे. परंतु त्याने कायदेमंडळास निरंकुश बनवण्याचा प्रयत्न केला नाही.

शासनसंस्था (कायदेमंडळ) मनमानी करू शकत नाही. कारण समाजाने शासनसंस्थेची स्थापना नैसर्गिक अधिकारांच्या संरक्षणाच्या अटीवरच केली आहे. जर शासन मनमानी, जुलमी, हुकुमशाही पद्धतीने राज्यकारभार करीत असेल व आपल्या मूलभूत कर्तव्यांचे पालन करण्यात अथवा आपली जबाबदारी पूर्ण करण्यात अपयशी ठरली असेल, तर समाजास त्या शासनसत्तेस बदलून, हटवून दुसरी सत्ता (नवीन सरकार) स्थापन करण्याचा अधिकार आहे. जॉन लॉकच्या मते, शासन जुलूम, अन्याय व नैसर्गिक अधिकारावर आक्रमण करीत असेल तर त्याविरुद्ध जनता विद्रोह करू शकते. जॉन लॉकने जनतेच्या विद्रोह करण्याच्या अधिकारावर दोन मर्यादा घातलेल्या आहेत.

१) जनतेने जोपर्यंत अधिक गंभीर परिस्थिती निर्माण होत नाही तोपर्यंत शक्तीचा (बाळाचा) प्रयोग करू नये.

२) बहुसंख्यांक लोकांना एकत्र येऊन शासनाविरुद्ध विद्रोह करण्याचा अधिकार आहे.

अशारीतीने जॉन लॉकने अन्यायी, जुलमी व आपले कर्तव्य पालन करण्यात अपयशी ठरलेल्या शासनाच्या विरुद्ध जनतेच्या क्रांतीच्या अधिकारास (Right to Revolt) मान्यता दिली आणि १६८८ च्या रक्तहीन क्रांतीस अर्थात गौरवशाली क्रांतीस (Glorious Revolution) योग्य ठरविले. शासनाचा भंग (बरखास्त, पदच्युत) झाल्यास अथवा सत्ताबदल झाल्यास समाजात अराजकता निर्माण होत नाही; कारण समाजाची स्थापना व शासनाची स्थापना या दोन्हीही बाबी वेगवेगळ्या आहेत. लॉकच्या मते, सरकार बदलणे म्हणजे राज्य नष्ट होणे नव्हे, सरकार बदलता येते, राज्य नष्ट करता येत नाही.

थोडक्यात, वरील विवेचनावरून असे म्हणता येईल की, जॉन लॉकने सत्ताविभाजनाच्या सिद्धांताचे स्पष्टपणे प्रतिपादन केले नाही; परंतु स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ व कायदेमंडळ एकाच व्यक्ती किंवा व्यक्ती समूहाच्या हातात एकवटल्यास विरोध करण्याचा अधिकार तो जनतेस देतो. जॉन लॉक राजेशाही शासन कायम करण्यास राजी होता; परंतु अट अशी होती की, कायदेनिर्मिती आणि शासन करण्याची सत्ता (Power) जनतेच्या इच्छेवर अवलंबून, निर्भर असावी. अशाप्रकारे जॉन लॉकने नियंत्रित शासनव्यवस्था व जनतेचे सार्वभौमत्व या कल्पना स्पष्ट केल्या आहेत. त्याने शासन संस्थेला विश्वस्त (Trustee) मानले आहे.

५) व्यक्ती व राज्य (Individual and the State)**:**

जॉन लॉकने राज्यापेक्षा व्यक्तीला अधिक महत्त्व दिले आहे. राज्याचे औचित्य, महत्त्व व अस्तित्व व्यक्तीच्या नैसर्गिक अधिकारांच्या संरक्षणासाठी आहे. म्हणून सामाजिक करार या उद्देशाच्या प्राप्तीसाठीच झालेला आहे.

जॉन लॉकच्या सामाजिक करार सिद्धांताचे मूल्यमापन :

जॉन लॉक हा इंग्लंडमधील उदारमतवादी विचारसरणीचा प्रमुख विचारवंत मानला जातो. त्याच्या या विचारांचा आधुनिक लोकशाही व्यवस्थेवर मोठा प्रभाव पडला आहे. जॉन लॉकच्या सामाजिक करार सिद्धांताचे मूल्यमापन (गुण-दोष) खालील प्रमाणे करता येईल.

अ) गुण:

१) मूलभूत अधिकारांची उत्पत्ती:

जॉन लॉकच्या मते, नैसर्गिक अधिकार जे जन्मत:च व्यक्तीला मिळतात त्यांचे संरक्षण करण्यासाठी राज्यसंस्थेची (शासनसंस्थेची) निर्मिती झाली आहे. व्यक्तीला या अधिकारांपासून वंचित ठेवण्याचा अधिकार राज्यसत्तेला देखील नाही. जर तसा प्रयत्न तिच्याकडून झाला तर जनतेला लॉकने त्या सत्तेविरोधी विद्रोह वा क्रांती करण्याचा किंवा त्या सत्तेत बदल घडवून (नवीन सरकार) आणण्याचा अधिकार दिलेला आहे. आधुनिक काळात जगातील सर्व देशातील संविधानांमधून मूलभूत अधिकारांना प्रथम स्थान दिले गेले असल्याचे दिसते. या नैसर्गिक हक्कांनाच मानवी हक्क असेही म्हटले जाते. अशाप्रकारे जॉन लॉकचे विचार लोकसत्ता(जनतेची सर्वोच्च सत्ता) व उदारमतवादाचा पाया, आधारशिल ठरतात.

२) जनसंमती शासनाचा आधार:

जॉन लॉकने दैवी सिद्धांताला नाकारून जनतेच्या संमतीची शासनव्यवस्थेला आवश्यकता असते हा विचार सुस्पष्ट शब्दात मांडला. त्याने जनतेला सार्वभौमत्व देऊन राजकीय सार्वभौमत्वाचा पाया घातला. त्याने प्रतिनिधीक शासन व कायदेमंडळाला अधिक महत्त्व देऊन राजाची सत्ता मर्यादित केली. राज्य हे जनतेच्या इच्छेवर अवलंबून असते हे त्यांने स्पष्ट केले आहे. जोपर्यंत शासन जनहित समोर ठेवून कार्य करते, तोपर्यंतच त्यांना सत्तेवर राहण्याचा अधिकार आहे, या विचाराचा पाया जॉन लॉकने घातला. यावरून स्पष्ट होते की लॉकने जनसंमतीचे वैधानिक शासन असण्यावर भर दिला. थोडक्यात, जॉन लॉक लोकसहमतीला महत्त्व देतो. लॉकने शासनाची वैधता ही लोकांच्या संमतीवर आधारित मानली. लोकांच्या इच्छेविरुद्ध राज्य चालू शकत नाही, हा लोकशाहीचा मूलभूत विचार त्याने मांडला.

३) सत्ता विभाजन सिद्धांताचा प्रतिपादक:

जॉन लॉक हा सत्ता विभाजनाच्या सिद्धांताचा प्रतिपादक आहे. त्याने शासन संस्थेची तीन प्रमुख अंगे सांगितलेली आहेत. त्याच्यामते शासनाच्या तीन अंगामध्ये कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांच्यात सत्तेचे विभाजन होऊन या मंडळांनी आपापली कामे स्वतंत्रपणे पार पाडावीत. सत्ता विभाजनाचे हे तत्व अमेरिकन घटनाकारानी प्रथम स्वीकारले. तसेच मॉटेस्क्यु या फ्रेंच तत्त्वज्ञाने पद्धतशीरपणे मांडलेल्या सत्ताविभाजन सिद्धांताची बीजे आपल्याला लॉकच्या विचारात दिसून येतात.

४) व्यक्तीवादाला महत्व:

जॉन लॉक व्यक्तीला साध्य व राज्याला साधन मानतो. शासनसंस्था समाज व व्यक्तीच्या विकासासाठी अस्तित्वात आली आहे. जर शासन आपल्या सत्तेचा दुरुपयोग करीत असेल किंवा आपल्या मूलभूत कार्याकडे, कर्तव्याकडे दुर्लक्ष करत असेल तर व्यक्तींना राज्याला विरोध करण्याचा अधिकार देऊन लॉक व्यक्तीवादाला महत्त्व देतो.

५) मर्यादित सार्वभौमत्व व जनसार्वभौमत्व संकल्पनांचा उगम:

जॉन लॉक अमर्याद व अनियंत्रित सार्वभौमत्व (शासन) अमान्य करतो. शासन अन्यायी व जुलमी पद्धतीने राज्यकारभार करत जनहित दुर्लक्षित असेल व नैसर्गिक अधिकारावर अतिक्रमण करीत असेल तर त्या शासनास विरोध करण्याचा, ते शासन बदलण्याचा अधिकार लॉक जनतेला देतो. जॉन लॉकच्या या विचारातून मर्यादित सार्वभौमत्व व जनसार्वभौमत्व अशी संकल्पना उदयास येते. थोडक्यात, राज्याच्या (शासनाच्या) अधिकारांवर मर्यादा असाव्यात असे लॉकचे मत होते. शासनाने मनमानी करू नये म्हणून त्याने मर्यादित शासनाची कल्पना मांडली. यामुळे निरंकुश राजसत्तेला विरोध झाला. म्हणून तो घटनात्मक राजेशाहीचा पुरस्कर्ता ठरतो.

६) नैसर्गिक हक्कांचे संरक्षण:

जॉन लॉकच्या मते, प्रत्येक व्यक्तीला जन्मतःच जीविताचा, स्वातंत्र्याचा आणि संपत्तीचा हे नैसर्गिक हक्क प्राप्त असतात. हे हक्क कोणतीही एक व्यक्ती अथवा शासन देत नसून नैसर्गिकरित्या ते जन्मतःच व्यक्तीला प्राप्त होतात व ते हिरावून घेण्याचा कोणा व्यक्तीला अथवा शासनाला अधिकार नाही. म्हणून हे हक्क मानवी हक्क असून ते वैश्विक स्वरूपाचे आहेत. राज्याचे (शासनाचे) मुख्य कार्य या हक्कांचे संरक्षण करणे हे आहे. त्यामुळे व्यक्तीच्या अधिकारांना महत्त्व प्राप्त झाले. 'UNO' या जागतिक संघटनेने या हक्कांना मानवी हक्क म्हणून घोषित (१० डिसेंबर १९४८)केले आहे.

७) क्रांतीचा अधिकार:

जर शासन लोकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात अपयशी ठरले तर जनतेला शासनाविरुद्ध बंड किंवा क्रांती करण्याचा अधिकार आहे, असे लॉकने स्पष्ट केले. येथे क्रांतीचा अर्थ हिंसा नसून बहुमताने अहिंसक मार्गाने (मतदानाच्या) जुलमी, अन्यायी व अकार्यक्षम शासनाला सत्तेतून हटवणे, पदच्युत करणे व नवीन सरकार सत्तेत आणणे हा क्रांतीचा अर्थ जॉन लॉकला अपेक्षित आहे. लॉकचा हा विचार अत्यंत प्रगत आणि लोकहितवादी मानला जातो.

८) आधुनिक लोकशाहीचा पाया:

आधुनिक काळातील लोकशाही, घटनात्मक शासन, कायद्याचे राज्य, सत्ता विभाजन आणि मूलभूत अधिकार या आधुनिक संकल्पनांवर जॉन लॉकच्या विचारांचा मोठा प्रभाव पडला असल्याचे दिसून येते.

९) उदारमतवादाचा पाया:

जॉन लॉकने व्यक्तिस्वातंत्र्य, खाजगी मालमत्ता आणि व्यक्तीचे महत्त्व यांवर भर देऊन उदारमतवादी विचारसरणीला बळ दिले. जॉन लॉकचे हे उदारमतवादी विचार आज सर्वमान्य असलेले दिसतात.

१०) अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांतीवर प्रभाव:

जॉन लॉकच्या विचारांचा अमेरिकेची स्वातंत्र्य घोषणा (४ जुलै १७७६) आणि फ्रेंच राज्यक्रांती (१७८९) वर मोठा प्रभाव पडला. लोकसत्ता आणि स्वातंत्र्य या संकल्पना त्यातून अधिक मजबूत झाल्या.

ब) दोष:

१)मानवी स्वभाव:

जॉन लॉक माणसाच्या केवळ सद्‌गुणावर भाष्य करतो, मानवी स्वभावाचे एकांगी चित्रण करतो. जर माणूस हा विवेकी व बुद्धिसंगत व्यवहार करणारा असेल तर निसर्ग अवस्थेत अडचणी निर्माण होण्याचा प्रश्न येणार नाही. वास्तविक मानवी स्वभाव म्हणजे चांगल्या वाईट प्रवृत्तीचे मिश्रण असते याकडे जॉन लॉकचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते.

२) निसर्गावस्थेचे अवास्तव चित्रण :

जॉन लॉकने निसर्गावस्थेचे वर्णन शांततापूर्ण, न्यायाची व आदर्श स्वरूपाची होती असे केले आहे. प्रत्यक्षात अशी अवस्था अस्तित्वात होती याचा ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही. एकंदर, जॉन लॉकचे निसर्गावस्थेचे चित्रण पृथ्वीतलावर असणे दुरापास्त वाटते. आजची अशांत, अराजक व युद्धखोर प्रवृत्ती बघून मानवाचे अध:पतन राज्यनिर्मितीनंतर होत गेल्याचा निष्कर्ष काढणे अधिक योग्य ठरेल.

३) सामाजिक कराराच्या संदर्भात अस्पष्टता:

जॉन लॉकने राज्य आणि शासनातील फरक मान्य केला. परंतु त्याचे स्पष्ट स्पष्टीकरण देताना तो दिसत नाही. जॉन लॉकने सामाजिक करार दोन झाल्याचे स्पष्टपणे लिखाणात कुठेच म्हटले नाही. लॉक करार एक झाला की दोन याचे स्पष्टीकरण कुठेच देत नाही. परंतु त्याच्या करारासंदर्भात 'मूळ करार' हा शब्दप्रयोग आलेला आहे. त्याने 'Second Treaties' मध्ये समाज व सरकार यासंबंधी फरक दाखविला आहे. यावरून करार दोन झाले असावेत असे काही टीकाकार मानतात. सेबाईंनने प्रथम समाज व नंतर राज्य निर्माण झाले असावे असे म्हटले आहे.

४) सामाजिक कराराची कल्पना काल्पनिक :

सामाजिक कराराची इतिहासात कोठेही पुष्टी होत नाही. लॉक म्हणतो की, पहिल्या कराराने व्यक्तीने आपल्या संपूर्ण अधिकारचा त्याग केला नाही. त्याने केवळ नैसर्गिक अधिकारांच्या रक्षणासाठी आपल्या अधिकाराला समाजाकडे सोपवले आहे. थोडक्यात, राज्यनिर्मितीसाठी सर्व लोकांनी एकत्र येऊन करार केला ही जॉन लॉकची कल्पना काल्पनिक मानली जाते. इतिहासात असा करार प्रत्यक्ष झाल्याचे दिसून येत नाही.

५) भांडवलशाहीला पोषक विचारधारा:

जॉन लॉकची राजकीय विचारधारा ही भांडवलशाहीला पोषक ठरली असा आक्षेप त्याच्यावर घेतला गेला आहे. त्याच्यावरील या आरोपाचे प्रमुख कारण म्हणजे त्याने पुरस्कृत केलेला खाजगी मालमत्तेचा अधिकार होय. लॉकने मांडलेले व्यक्तीचे तीन निसर्गदत्त अधिकार म्हणजे जीवित, स्वातंत्र्य व

खाजगी मलमत्तेचे अधिकार. इतर सर्व मूलभूत हक्कांचे हे तीन निसर्गदत्त अधिकार म्हणजे मूलाधारच म्हणावे लागतील. लॉकने व्यक्तीचे हे अधिकार अमर्यादित असतात असे गृहीत धरले आहे. अर्थातच, त्याचा परिणाम हा भांडवलशाहीला प्रोत्साहन देणारा ठरला. वास्तविक पाहता सामाजिक करारातून जॉन लॉकला अशी समाजरचना निर्माण करायची होती की, जी व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे रक्षण करेल. परंतु, त्यामुळे असे म्हणता येणार नाही की जॉन लॉक हा मूलतःच भांडवलशाही समाज रचनेचा पुरस्कर्ता होता. मात्र, हे खरे की निसर्गदत्त स्वातंत्र्याविषयीचे लॉकचे विचार हे मुख्यतः व्यक्तीकेंद्रित होते. याशिवाय, लॉकने खाजगी संपत्तीच्या संरक्षणावर विशेष भर दिला. त्यामुळे श्रीमंत भांडवलदार वर्गाच्या हिताचे समर्थन केल्याचा आरोप त्याच्यावर केला जातो.

६) बहुसंख्याकांची हुकूमशाही राजकीय स्थैर्याला मारक:

जॉन लॉक शासन मनमानी राज्यकारभार करून व्यक्तींच्या नैसर्गिक अधिकारावर आक्रमण व अन्याय करीत असेल तर बहुसंख्यांक लोकांना एकत्र येऊन शासनाच्या विरूद्ध विद्रोह (बंड, क्रांती) करण्याचा व शासनाची सत्ता बदलण्याचा अधिकार जनतेला देतो. परंतु बहुसंख्यांकांच्या अत्याचाराविरुद्ध कोणतीही संरक्षणाची तरतूद करत नाही. बहुसंख्यांकांचा शासना विरुद्धच्या क्रांतीचा अधिकार मान्य केल्यास राज्य अस्थिर व दुबळे बनेल. अनेक स्वार्थी प्रवृत्तीचे लोक एकत्र येऊन शासनाची सत्ता उलथून टाकण्याचा प्रयत्न करतील. बहुसंख्यांकांच्या हुकूमशाहीमुळे निर्माण होणाऱ्या राजकीय अस्थिरतेमुळे राज्य व्यक्ती व समाजाचे अंतर्गत व बाह्य शत्रूपासून संरक्षण करू शकणार नाही. यामुळे राजकीय अस्थिरता निर्माण होईल. या आवश्यक गोष्टीकडे जॉन लॉकचे दुर्लक्ष झाल्याची टीका करण्यात येते.

७) राज्याचे स्वरूप केवळ संरक्षक:

जॉन लॉकने राज्याकडे केवळ संरक्षक स्वरूपाची कार्य सोपवली आहेत. लॉक केवळ व्यक्तींच्या स्वातंत्र्य, संपत्ती व जीवन संरक्षणाचे कार्य राज्याने करावे असे म्हणतो. कारण त्या संरक्षणासाठी राज्याची निर्मिती झाली आहे असे त्याचे मत आहे. कल्याणकारी व बलशाली असे त्याच्या राज्याचे स्वरूप नाही अशी टीका त्याच्या राज्याच्या विचारावर केली जाते.

८) कायदेशीर सार्वभौमत्वाच्या संकल्पनेची उपेक्षा:

जॉन लॉकने कायदेशीर सार्वभौमत्त्वाच्या (सर्वोच्च सत्तेच्या) संकल्पनेची पूर्णपणे उपेक्षा केली आहे. थॉमस हॉब्ज कायदेशीर सार्वभौमत्वाच्या सिद्धांताचे प्रतिपादन करतो. परंतु तो राजकीय सार्वभौमत्वाचे अस्तित्व आणि शक्तीचा स्वीकार करीत नाही. जॉन लॉक राजकीय सार्वभौमत्वाच्या सत्तेला/शक्तीला (Power) संमती देतो. परंतु कायद्याच्या सार्वभौमत्वाला योग्य ती संमती देत नाही.

९)बहुमताच्या अत्याचाराची शक्यता:

लोकसहमतीवर आधारित शासनामध्ये बहुमत अल्पसंख्याकांवर अन्याय करू शकते. लॉकने या समस्येवर पुरेसे स्पष्टीकरण दिले नाही.

१०) पूर्ण समानतेचा अभाव:

लॉकने सर्वांना समान हक्क दिल्याचे सांगितले असले तरी प्रत्यक्षात स्त्रिया, गरीब आणि गुलाम यांच्याबाबत त्याची भूमिका मर्यादित होती.

११) राज्याच्या उत्पत्तीचे अपूर्ण स्पष्टीकरण:

राज्याची उत्पत्ती केवळ करारातून झाली असे सांगणे अपूर्ण वाटते. सामाजिक, आर्थिक आणि ऐतिहासिक घटकांनाही महत्त्व असते.

१२) अत्याधिक व्यक्तिवाद:

जॉन लॉकने अतिव्यक्तीवादाचे समर्थन करून व्यक्तीस्वातंत्र्यावर जास्त भर दिला. त्यामुळे समाजहित आणि सामूहिक जबाबदारी याकडे त्याने तुलनेने कमी लक्ष दिले गेले असल्याची टीका होते.

सारांश :

वरीलप्रमाणे जॉन लॉकच्या सामाजिक कराराच्या सिद्धांताचे काही दोष असून आणि थॉमस हॉबच्या तुलनेत जॉन लॉक हा साधारण तत्ववेत्ता मानला जाऊन देखील त्याचा पुढील पिढ्यावरील प्रभाव लक्षात घेण्यासारखा आहे. राज्यशास्त्राला त्याने नव्या विचारांची देणगी दिली. जॉन लॉकचा सामाजिक करार सिद्धांत हा आधुनिक लोकशाही, घटनात्मक शासन, आणि उदारमतवादाचा पाया मानला जातो. व्यक्तीचे नैसर्गिक हक्क, लोकशाही, शासनाचा आधार लोकसंमती आणि मर्यादित शासन, संविधानवाद, सत्ता विभाजनाचे तत्व, कायद्याचे राज्य, मानवी हक्क या संकल्पनांमुळे त्याच्या विचारांना विशेष महत्त्व प्राप्त झाले. फ्रान्सची राज्यक्रांती व अमेरिकेतील स्वातंत्र्याची घोषणा त्यातून सत्ता विभाजनाला अमेरिकेच्या संविधानात मिळालेले स्थान याला जॉन लॉकचे राजकीय विचार प्रेरणादायक ठरले. आज युरोप व आशिया खंडातील राष्ट्रांच्या संविधानावर, शासनव्यवस्थेवर जॉन लॉकच्या विचारांची मोठी छाप दिसून येते. यातच त्याच्या राजकीय तत्वज्ञानाचे महत्त्व स्पष्ट होते.

स्वयं अध्ययन प्रश्न -३ :

प्रश्न:१) दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा व लिहा.

१. जॉन लॉकने सामाजिक कराराचा सिद्धांत कोणत्या ग्रंथात मांडला?

अ) Leviathan ब) The Republic

क) Two Treatises of Civil Government ड) Politics

२. जॉन लॉक कोणत्या देशाचा विचारवंत होता?

अ) फ्रान्स ब) इंग्लंड

क) जर्मनी ड) इटली

३. जॉन लॉकच्या मते मनुष्य स्वभावतः कसा आहे?

अ) स्वार्थी व हिंसक ब) पाशवी व क्रूर

क) विवेकी व सामाजिक ड) अराजकप्रिय

४. जॉन लॉकच्या मते निसर्गावस्था कोणती होती?

अ) युद्धाची अवस्था | ब) अराजकतेची अवस्था
क) शांतता व सहकार्याची अवस्था | ड) गुलामगिरीची अवस्था

५. लॉकच्या मते निसर्गावस्था ही कोणत्या स्वरूपाची अवस्था होती.

अ) राज्यपूर्व | ब) समाजपूर्व
क) धार्मिक | ड) साम्यवादी

६. जॉन लॉकने कोणते नैसर्गिक अधिकार मान्य केले?

अ) मतदान, शिक्षण, रोजगार | ब) जीवन, स्वातंत्र्य, संपत्ती
क) धर्म, भाषा, संस्कृती | ड) समता, न्याय, बंधुता

७. जॉन लॉकच्या मते संपत्तीचा अधिकार हा कोणत्या प्रकारचा अधिकार आहे?

अ) राजकीय | ब) कायदेशीर
क) नैसर्गिक | ड) सामाजिक

८. जॉन लॉकच्या मते निसर्गावस्थेतील प्रमुख अडचणी किती होत्या?

अ) दोन | ब) तीन
क) चार | ड) पाच

९. खालीलपैकी कोणती निसर्गावस्थेतील अडचण होती?

अ) स्पष्ट कायद्याचा अभाव | ब) संसदेचा अभाव
क) राजाचा अभाव | ड) संपत्तीचा अभाव

१०. जॉन लॉकच्या मते राज्याची निर्मिती कशासाठी झाली?

अ) राजाची सत्ता वाढवण्यासाठी | ब) नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करण्यासाठी
क) युद्ध करण्यासाठी | ड) धर्मप्रसारासाठी

११. जॉन लॉकने राज्याला कोणत्या स्वरूपाची संस्था मानले?

अ) दैवी संस्था | ब) विश्वस्त संस्था
क) धार्मिक संस्था | ड) आर्थिक संस्था

१२. जॉन लॉकच्या मते शासनाची वैधता कशावर आधारित असते?

अ) धर्मावर | ब) राजाच्या इच्छेवर
क) लोकसंमतीवर | ड) सैन्यशक्तीवर

१३. जॉन लॉकने कोणत्या प्रकारच्या शासनाचे समर्थन केले?

अ) निरंकुश राजेशाही
ब) मर्यादित शासन
क) हुकूमशाही
ड) सैनिकी शासन

१४. जॉन लॉकने कोणत्या क्रांतीचे समर्थन केले?

अ) फ्रेंच राज्यक्रांती
ब) रशियन क्रांती
क) गौरवशाली क्रांती (१६८८)
ड) अमेरिकन गृहयुद्ध

१५. "Bill of Rights' कोणत्या वर्षी स्वीकारण्यात आला?

अ) १६८८
ब) १६८९
क) १६९०
ड) १७०४

१६. जॉन लॉकच्या मते शासन अपयशी ठरल्यास जनतेला कोणता अधिकार आहे?

अ) कर न भरण्याचा
ब) शासन बदलण्याचा
क) देश सोडण्याचा
ड) संपत्ती जप्त करण्याचा

१७. जॉन लॉकच्या विचारांचा प्रभाव कोणत्या देशाच्या राज्यघटनेवर दिसतो?

अ) अमेरिका
ब) चीन
क) जपान
ड) रशिया

१८. जॉन लॉकला कोणत्या विचारसरणीचा जनक मानले जाते?

अ) समाजवाद
ब) साम्यवाद
क) उदारमतवाद
ड) फॅसिझम

१९. जॉन लॉकच्या मते राज्यापेक्षा अधिक महत्त्व कोणाला आहे?

अ) राजाला
ब) संसदेला
क) व्यक्तीला
ड) न्यायालयाला

२०. क्रांतीचा अधिकार ही संकल्पना कोणाशी संबंधित आहे?

अ) प्लेटो
ब) थॉमस हॉब्ज
क) जॉन लॉक
ड) हेगेल

३.२.२.३ जीन जॅक्स रुसोचा सामाजिक करार सिद्धांत:

(Jean Jacques Rousseau's Social Contract Theory):

पार्श्वभूमी :

जीन जॅक्स रुसो (१७१२-१७७८) हा १८ व्या शतकातील फ्रेंच विचारवंत आहे. त्यांना आधुनिक लोकशाही आणि लोकसत्तेचा महत्त्वाचा विचारवंत मानले जाते. त्याने आपल्या Social Contract (१७६२) या ग्रंथात सामाजिक करार सिद्धांत मांडला. रुसोचा हा सिद्धांत राजकीय तत्त्वज्ञानातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि क्रांतीकारी टप्पा मानला जातो. थॉमस हॉब्ज व जॉन लॉक या दोघांपेक्षा रूसोचे तत्त्वज्ञान वेगळे आहे. हॉब्ज राज्याच्या निरंकुश व अनियंत्रित सार्वभौम शासन व्यवस्थेच्या (निरंकुश राजेशाहीचे) स्वरूपाचे प्रतिपादन करतो, जॉन लॉक मर्यादित शासनाचे, तर रुसो प्रत्यक्ष लोकशाही आणि लोकशाही मूल्यांच्या चिंतनाशी संबंधित आहे. रुसोच्या विचारांच्या प्रेरणेतून १७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांती घडून आली. रूसोच्या 'Social Contract' या ग्रंथाचा प्रारंभ, 'Man is born free and everywhere he is in Chains' 'व्यक्ती जन्मतः स्वतंत्र आहे आणि तो प्रत्येक ठिकाणी समाजाच्या अनेक बंधनात अडकलेला आहे' या वाक्याने होतो. हे त्याचे प्रसिद्ध वाक्य या सिद्धांताचा गाभा आहे. रूसोच्या या विचाराने जगात स्वातंत्र्याची प्रेरणा दिली. रुसोच्या मते, राज्याची निर्मिती लोकांच्या सामूहिक इच्छेतून झाली असून सार्वभौम सत्ता जनतेमध्ये निहित (अंतर्भूत, समाविष्ट) असते.

रुसोच्या काळात फ्रान्समध्ये राजेशाही, सामाजिक विषमता आणि सरंजामशाही प्रबळ होती. समाजात श्रीमंत व गरीब यांच्यात मोठी दरी निर्माण झाली होती. सामान्य जनतेवर जुलमी पद्धतीने अन्याय-अत्याचार होत होते. या परिस्थितीला विरोध म्हणून रुसोने लोकसत्ता, समानता आणि स्वातंत्र्य यांचा पुरस्कार केला व सामाजिक कराराचा सिद्धांत मांडला. हा सिद्धांत समजून घेण्यासाठी त्याचे प्रामुख्याने तीन भाग पडतात, त्याची चर्चा पुढीलप्रमाणे-

१) मानवी स्वभाव (Human Nature)**:**

रुसोने मानवी स्वभावासंबंधीचे विचार 'Discourses on the Origin of Inequality (1755)' या ग्रंथामध्ये मांडले आहेत. रुसोला अभिप्रेत असलेला मानवी स्वभाव निसर्ग अवस्थेतील अदिम समाजव्यवस्थेतील व्यक्तीचा आहे. ज्या काळात व्यक्तींमध्ये परस्पर द्वेष, ताण-तणाव, संघर्ष निर्माण झाला नव्हता. त्या आधारावर त्याने मानवी स्वभावाची मांडणी केली आहे. थॉमस हॉब्स व जान लॉक या दोन सामाजिक कराराच्या पुरस्कर्त्यांनी मानवी स्वभावा विषयी परस्परविरोधी विचार मांडले आहेत. हॉब्ज मनुष्याला दुर्गुणाचा पुतळा मानतो तर जॉन लॉक सदगुणांचा. थॉमस हॉब्जने व्यक्तीचा स्वभाव क्रूर, दुष्ट, स्वार्थी व वाईट मानला तर जॉन लॉकने मानवी स्वभाव प्रेमळ, दयाळू, शांतिप्रिय, परस्पर सहकार्य करणारा असे चित्रण केले आहे. रुसो हॉब्जप्रमाणे मानवाला स्वार्थी व दुष्ट मानत नाही. जॉन लॉक प्रमाणे माणूस स्वभावत: चांगला असतो असे तो मानतो. रुसोच्या मते, अदिम समाज व्यवस्थेतील मानव स्वभावाने मूलतः चांगला, साधाभोळा, लहान मुलांसारखा निरागस, सुखी, समाधानी, निर्दोष, तणावमुक्त, निरोगी, शांतताप्रिय, दयाळू, स्वातंत्र्यप्रिय आणि निष्पाप होता. नैसर्गिक अवस्थेत तो स्वतंत्र आणि आनंदी जीवन जगत होता. त्याच्यामध्ये दया,

सहानुभूती आणि परस्पर सहकार्याची भावना होती. माणूस स्वभावत: चांगला असतो परंतु समाजाच्या संपर्कामुळे तो दुर्गुणी बनला असे मानवी स्वभावाचे रूसो विश्लेषण करतो.

रुसोच्या मते, मानवी स्वभावनिर्मितीच्या दोन प्रेरणा कारणीभूत आहेत. १) आत्मप्रेम, स्व-प्रेम (Self Love) किंवा स्वसंरक्षण भावना २) सहानुभूती (Sympathy) किंवा परस्पर सहकार्य. रुसोच्या मते, माणसाच्या स्वभावाच्या आत्मप्रेम व सहानुभूती या दोन मूळ प्रवृत्ती असून इतर भावनांची निर्मिती या प्रवृत्तीवर आधारित निर्माण होत असते. कधीकधी आत्मप्रेम/स्वसंरक्षण व सहानुभूती यात संघर्ष निर्माण होतो. असे प्रसंग अटळ असतात. त्यामधून एक वेगळीच समस्या, अडचण निर्माण होते. परंतु, एकाच वेळी मानवाच्या दोन्ही भावनांचे संतुष्टीकरण होऊ शकत नसल्याने व्यक्तीला या दोन्हीमध्ये तडजोड घडवून आणावी लागते. उदा. जसे आत्मप्रेम एका आईला स्वतः जेवणास प्रेरित करेल तर सहानुभूती त्याच आईला आपल्या मुलास भोजन देण्यास भाग पाडेल. रूसो म्हणतो असे प्रसंग अटळ असतात.

रूसोच्या मते, कौटुंबिक हिताची भावना व्यक्तीस समाजविरोधी कार्य करण्यास प्रेरित करते. त्यामुळे जी एक नवीन भावना (प्रेरणा, चेतना) उत्पन्न होते. त्या भावनेस रुसोने अंत:करण किंवा सद्सद्विवेकबुद्धी (आतला आवाज) (Conscience) म्हटले आहे. अंत:करण माणसाला सत्यावर प्रेम व असत्याची घृणा, तिरस्कार करण्यास शिकविते. सत्कार्याची प्रेरणा देते. ती केवळ एक नैतिक शक्ती आहे. रुसो म्हणतो अंत:करणाला सत्य-असत्य, योग्य-अयोग्य, नैतिक-अनैतिक यात फरक करता येत नाही. ती एक सदभावना असते. त्यामुळे सत्य-असत्य, नैतिक-अनैतिक, योग्य-अयोग्य यातील फरक ओळखण्यासाठी त्याला विवेकावर अवलंबून राहावे लागते. थोडक्यात, विवेक मार्ग दाखवतो व अंत:करण कार्य करते.अशाप्रकारे आत्मप्रेम व सहानुभूती या दोहोत समन्वय निर्माण करण्याचे कार्य अंत:करण व विवेक या दोघांच्या मुळे होत असते. रूसो म्हणतो की, जर माणूस वाममार्गाकडे (चुकीच्या, वाईट) वळला तर त्यात विवेकाचा दोष आहे. विवेकाने योग्य-अयोग्य किंवा सत्य-असत्य यामध्ये फरक करण्यात चूक केली तर तसे घडू शकते. अंतःकरण कधीच चुकत नसते. रुसोच्या मते, माणूस विवेकद्वारे समाजात राहूनच आपला सर्वांगीण विकास करू शकतो. जोपर्यंत माणूस आपल्या विवेक व अंत:करण याप्रवृत्तीमध्ये योग्य समन्वय साधू शकतो तोपर्यंत तो स्वाभाविकपणे चांगला असतो. परंतु जेव्हा या विपरीत घडते तेव्हा विकृती निर्माण होते. दुसऱ्या शब्दात; मनुष्य स्वभावत: चांगला आहे. त्यांचे अध:पतन होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्याचे आत्मप्रेम, स्व- प्रेम (Self Love) हे दंभात (Vanity) म्हणजेच अहंकार, व्यर्थ गर्व यामध्ये बदलते. माणसाने विवेकाला दंभापासून, अहंकारापासून दूर ठेवले तर तो अत्यंत चांगला व आदर्श राहू शकेल. अशाप्रकारे वरीलप्रमाणे रूसोने मानवी स्वभावाचे आदर्श व आशादायी चित्र रेखाटले आहे.

सारांश; रुसोच्या मते, निसर्ग अवस्थेत सुरुवातीला माणूस हा स्वभावाने अत्यंत चांगला, साधा, निष्पाप आणि शांतताप्रिय होता. तो कोणत्याही कपटाशिवाय निसर्गाच्या सानिध्यात राहत होता. रुसोने या सुरुवातीच्या माणसाला 'उदात्त रानटी' (Noble Savage) असे म्हटले आहे. त्याला पाप-पुण्य, बरे-वाईट किंवा 'माझे-तुझे' याची काहीच जाणीव नव्हती.

२)निसर्ग अवस्था (State of Nature)**:**

रूसोच्या मते, निसर्गावस्था ही मानवी जीवनाची आदिम आणि नैसर्गिक अवस्था होती. या अवस्थेत माणूस साधा, स्वतंत्र, शांतताप्रिय, सुखी, समाधानी आणि आनंदी जीवन जगत होता. त्याचे कोणाशीही भांडण किंवा द्वेष, संघर्ष नव्हता. नैसर्गिक अवस्था म्हणजे पृथ्वीवरील नंदनवनच! जणू काही 'सुवर्णयुग' होते. रुसो निसर्गावस्थेतील माणूस निसर्गाच्या सानिध्यात आपले जीवन वन्य प्राण्यांप्रमाणे एकांतात, सुखी, आनंदी व कोणतीही काळजी न करता निश्चींत जीवन जगत होता असे गृहीत धरतो. माणसाला भाषेचे ज्ञान नव्हते तसेच तो कपडे परिधान करीत नव्हता. नैसर्गिक संकेतच संवादाचे माध्यम होते. त्याच्यावर कोणतेच बाह्य बंधन नव्हते. त्याचे जीवन निष्पाप, निर्लेप असल्याने आनंदी होते. कोणत्याही व्यक्तीचे कुटुंब नव्हते किंवा व्यक्तिगत संपत्ती नव्हती. व्यक्ती निसर्गाचा साधेपणा आणि परस्पर सहकार्याच्या भावनेने एकमेकांशी व्यवहार करीत होता. या अवस्थेत सर्व माणसे स्वतंत्र व समान होती. ती आपापल्या जीवनाचे मालक होती. स्वावलंबी व समाधानी होती. माणसे सामाजिक नसल्यामुळे चांगल्या वाईटाविषयी अनभिज्ञ होती. योग्य-अयोग्य, नैतिक -अनैतिक या भावनेतून मुक्त नि:स्वार्थ, वैयक्तिक खाजगी संपत्ती व कुटुंब इत्यादी शिवाय माणूस राहत होता. त्यांची बुद्धी विकसित नव्हती परंतु उदात्तभावना व औदार्य होते. त्यांच्या गरजा अत्यंत मर्यादित होत्या. त्यामुळे ते सहज गरजपुर्ती करू शकत असत. रुसो अशाप्रकारच्या निसर्ग अवस्थेतील आदिमानवाला 'उदात्त वनचर' (Noble Savage) म्हणतो. म्हणजेच 'उदात्त रानटी माणूस' म्हणतो. 'उदात्त रानटी' (Noble Savage) हा शब्द रुसोने प्रत्यक्षपणे फारसा वापरलेला नाही. हा शब्द नंतरच्या अभ्यासकांनी त्याच्या विचारांचे वर्णन करण्यासाठी वापरला आहे. रुसोने निसर्गावस्थेतील आदिम मानवाचे जे चित्रण केले आहे त्याला नंतरच्या विचारवंतांनी 'उदात्त रानटी' (Noble Savage) असे संबोधले आहे.

रुसो म्हणतो निसर्गावस्थेतील व्यक्तीचे जीवन लहान मुलांसारखे निरागस, उनाड, साधेभोळे, सरळ आणि आनंददायी होते. आदिम मानव हा अज्ञानी व रानटी जरूर होता. परंतु आजच्या संस्कृतीची तुलना केल्यास धोकेबाज, विश्वासघातकी, अनैतिक व अप्रमाणिक नक्कीच नव्हता. तो बुद्धीहीन असेल पण चारित्र्यहीन नव्हता. रुसो Discourse on Arts and Science (1751) या ग्रंथामध्ये म्हणतो की, जेवढ्या मोठ्या प्रमाणात शास्त्र (विज्ञान) व कलेत वृद्धी होत गेली. त्याच प्रमाणात मानवी मन भ्रष्ट झाले. मनुष्याच्या अनैतिकतेचे कारण समाज आहे. मनुष्य स्वभाविकत: चांगला आहे, परंतु सामाजिक संस्थांच्या संपर्काने त्यास दुष्ट बनविले. हा त्याच्या ग्रंथातील कल्पनेचा मध्यवर्ती गाभा आहे. रूसो असे म्हणतो की, समाजाच्या संपर्कामुळे त्याचा अधःपात झाला. निसर्गावस्थेतील अदिम मानवाची आजच्या मानवाशी तुलना करून रुसो म्हणतो की, 'आम्हाला आमचे अज्ञान, भोळेपणा, निष्पापवृत्ती व गरिबी परत द्या. या गोष्टीच आम्हाला आनंदी करू शकतील'. रूसोच्या निसर्गावस्थेची वैशिष्ट्ये: नैसर्गिक स्वातंत्र्य, नैसर्गिक समानता, शांतता व सुरक्षितता, करुणा आणि आत्मप्रेम, खाजगी मालमत्तेचा अभाव, साधे व निरागस जीवन ही आहेत.

एकंदर, निसर्ग अवस्था एवढी उदात्त, आदर्श व स्वर्गतुल्य असेल तर ती का संपुष्टात आली यासंबंधी रुसो विश्लेषण करून सामाजिक कराराकडे वळतो. रुसोला निसर्गावस्थेतील परिवर्तनाचे कारण स्वातंत्र्य व समतेच्या ऱ्हासात जाणवते. रुसो म्हणतो, विवेकाच्या उदयामुळे मानवाला स्थिर कौटुंबिक जीवन

व्यतीत करण्यासाठी खाजगी संपत्तीची कल्पना सुचली असावी. रुसो म्हणतो, 'ज्या माणसाने एखाद्या भूखंडाभोवती कुंपण घालून हा भूखंड माझा आहे', अशी प्रथम घोषणा केली आणि इतर व्यक्तींनी भाबडेपणाने त्यावर विश्वास ठेवला व त्या व्यक्तीच्या खाजगी संपत्तीला मान्यता दिली, तो खाजगी संपत्तीधारक व्यक्ती राजकीय समाजाचा संस्थापक ठरतो. अशाप्रकारे खाजगी संपत्तीच्या उदयामुळे 'तुझे-माझे' हे शब्द अस्तित्वात येऊन माणसाचे निसर्ग अवस्थेतील अदिम जीवन बदलून गेले. रूसोच्या मते, निसर्गावस्थेचा अंत खाजगी मालमत्तेच्या उदयामुळे झाला. ही जमीन माझी आहे असे म्हणणाऱ्या पहिल्या व्यक्तीपासून विषमता, शोषण आणि संघर्ष सुरू झाला.

बुद्धीच्या विकासामुळे, विवेकामुळे माणसे उद्योगी बनली. निसर्गतः सर्व माणसे समान नसल्यामुळे त्यांच्या बुद्धी, कुशलता व श्रम याबाबतही माणसा-माणसात फरक आढळतो. त्यामुळे सुरुवातीला ज्या माणसाने सर्वप्रथम भूमीवर श्रम, कष्ट करून वैयक्तिक खाजगी संपत्ती मिळविली तेव्हापासून माणसाचे अध:पतन, अधोगती सुरू झाली. समाजातील बुद्धिवंतानी कमी श्रमात जास्त संपत्ती मिळवण्याचे उपाय शोधून काढले. परिणामतः समाजात श्रीमंत (धनिक) व गरीब (निर्धन) असे दोन वर्ग उदयास आले. जंगलात भटकंती करणारे स्त्री-पुरुष एकत्र येऊन कुटुंबनिर्माण केले. स्थिर कौटुंबिक व्यवस्थेमुळे लोकसंख्या वाढत गेली. त्यामुळे गरजा वाढल्या आणि सहकार्याची जागा संघर्षाने घेतली. मित्रत्वाऐवजी शत्रुत्व, सहानुभूतीऐवजी स्वार्थ, स्व-प्रेम बळावल्याने व्यक्तीचे जीवन अस्थिर बनले. निसर्गावस्थेतील स्वातंत्र्य, समानता आणि आनंदी जीवन संपुष्टात आले. अशा परिस्थितीत परत निसर्गाकडे प्रवास करणे शक्य नव्हते. मात्र माणसाला निसर्गावस्थेसारखे शांतता व सुरक्षितता, स्वातंत्र्य व समानता, असलेले सुखी व आनंदी असे चांगले जीवन हवे होते. या कारणामुळेच मानवाला सामाजिक कराराच्या माध्यमातून राजकीय समाजाची स्थापना करावी लागली. या करारातून मानवाला निसर्गावस्थेचे आदिम मानवी जीवन प्राप्त होईल अशी रुसोला अशा (Hope) व अपेक्षा (Expectation) होती. अशा प्रकारे रूसोच्या मते, निसर्गावस्था ही हॉब्जने वर्णन केल्याप्रमाणे संघर्षमय नव्हती. लोकांमध्ये युद्ध, स्पर्धा किंवा वैरभाव कमी होता. थोडक्यात, रुसोला अपेक्षित असलेली निसर्ग अवस्था ही थॉमस हॉब्ज आणि जॉन लॉक पेक्षा भिन्न होती.

सारांश; रुसो म्हणतो की, सुरुवातीची नैसर्गिक अवस्था अतिशय सुखी आणि नंदनवनासारखी होती. सर्व लोक समान आणि स्वतंत्र होते. परंतु, हळूहळू लोकसंख्या वाढली, बुद्धीचा विकास झाला आणि माणसाने जमिनीवर ताबा मिळवून 'खाजगी मालमत्ता' (Private Property) निर्माण केली. ज्या क्षणी एका माणसाने जमिनीच्या तुकड्याला कुंपण घालून हे माझे आहे असे म्हटले आणि इतरांनी ते खरे मानले, तिथूनच समाजातील विषमतेची सुरुवात झाली. या खाजगी मालमत्तेमुळे समाजात श्रीमंत आणि गरीब असे दोन वर्ग निर्माण झाले. शांतता नष्ट झाली आणि चोरी, खून, मत्सर, युद्ध सुरू झाले. या अशा संघर्षमय व अराजक परिस्थितीतून सुटका करून घेण्यासाठी माणसाला राज्याची गरज भासू लागली.

३) सामाजिक करार आणि राज्याची निर्मिती :

'जन्मत: मनुष्य स्वतंत्र आहे, परंतु प्रत्येक ठिकाणी तो बंधनात जखडलेला आहे'. यातील पहिल्या अर्ध्या वाक्याचा अर्थ निसर्गावस्थेतील स्वतंत्र मानवाशी असून पुढील संदर्भ समाजाच्या स्थापनेनंतर त्याच्यावर आलेल्या बंधनाशी संबंधित आहे. या वाक्याचा साधासरळ अर्थ असा की, 'माणूस जन्माला येताना मुक्त असतो; पण समाजातील विविध नियम, परंपरा, संस्था आणि सत्तेमुळे तो अनेक बंधनांमध्ये

अडकतो'. या वाक्यात रुसोचा मुख्य मुद्दा असा आहे की, निसर्गावस्थेत मनुष्य स्वतंत्र होता, परंतु सभ्यता (संस्कृती)(Civilization) आणि समाजाच्या विकासाबरोबर त्याच्या स्वातंत्र्यावर अनेक मर्यादा आल्या. त्यामुळे खऱ्या स्वातंत्र्याची पुनर्स्थापना करण्यासाठी रुसोने सामाजिक कराराचा सिद्धांत मांडला.

रुसोने वर्णन केलेली निसर्ग अवस्था आदर्श व स्वर्गतुल्य स्वरूपाची होती. कोणत्याही प्रकारचा संघर्ष,ताणतणाव नव्हता. तो सुखी व समाधानी जीवन जगत होता. परंतु ही आदर्श स्वरूपाची निसर्ग अवस्था अधिक काळ टिकली नाही. कारण कालांतराने विवेक व संपत्तीचा उदय आणि लोकसंख्येची वाढ यामुळे निसर्ग अवस्थेतील व्यक्तीच्या निष्पाप स्वभावात बदल होत गेला. आत्मप्रेमी, स्व-प्रेमी (Self Love) व्यक्ती अहंकारी, गर्विष्ठ बनली. सहानुभूतीची (Sympathy) व परस्पर सहकार्याची जागा स्वार्थाने घेतली. स्त्री पुरुषाच्या तात्पुरत्या भेटीचे स्वरूप स्थायी जीवनात रूपांतरित झाले आणि कुटुंबसंस्था अस्तित्वात आली. कुटुंबाच्या उदयाने व्यक्तिगत खाजगी संपत्तीचा संग्रह करण्याच्या मानवी प्रवृत्तीत वाढ झाली. परिणामी विषमता, शोषण आणि परस्पर द्वेष, संघर्ष सुरू झाला. तुझे-माझे ही प्रवृत्ती अधिक वाढीस लागली आणि समाजातील पूर्वीची स्वतंत्रता व समानता, सुख शांती नष्ट झाली. संपत्तीच्या उदयाने निसर्ग अवस्थेतील आदिमानवाची उदात्त वनचाराची (Noble Savage) नैसर्गिक समानता, स्वतंत्रता संपुष्टात आली.

पृथ्वीवरील नंदनवनासारखी आदर्श व स्वर्गतुल्य असलेल्या निसर्ग अवस्थेची जागा खाजगी मालमत्तेच्या उदयानंतर परस्पर द्वेष, संघर्ष व अराजकतेने घेतल्यामुळे शांतता व सुरक्षिततेकरिता प्रभावी नियंत्रण करणाऱ्या एका सत्तेची (शक्तीची) आवश्यकता मानवाला भासली. खाजगी मालमत्तेच्या उदयानंतर निर्माण झालेली विषमता, शोषण, संघर्ष आणि असुरक्षितता दूर करण्यासाठी मानवाने सामाजिक कराराद्वारे राजकीय समाजाची स्थापना केली. निसर्ग अवस्थेत निर्माण झालेली अराजक व्यवस्था संपुष्टात आणण्यासाठी सर्व व्यक्ती एका ठिकाणी एकत्र जमल्या आणि त्यांनी आपले सर्व अधिकार सामूहिक इच्छेला (General Will) समर्पित केले. एखाद्या व्यक्ती किंवा गटाला नाही तर संपूर्ण समाजाला व्यक्तीने आपले अधिकार समर्पित (बहाल) केले आहेत. सामाजिक कराराच्या माध्यमातून राजकीय समाजाची (राजकीय सत्तेची) स्थापना करू इच्छिणाऱ्या सर्व व्यक्ती एकत्र येऊन त्यांनी परस्परांमध्ये करार करताना असे म्हटले की, आमच्यातील प्रत्येकजण सामूहिक इच्छेच्या सर्वोच्च नियंत्रणाखाली आपले व्यक्तित्व व सर्व अधिकार समर्पित /बहाल करतो आणि सामुदायिक एकत्वाचा अविभाज्य घटक या नात्याने त्याचा परत स्वीकार करतो! अशाप्रकारे निसर्ग अवस्थेतील प्रत्येक माणूस समाज घटकाचा एक अविभाज्य भाग बनतो आणि त्याचा एक सदस्य म्हणून नैतिक समाजाची निर्मिती करतो. अशाप्रकारे रुसोने कल्पिलेल्या या नागरी समाजाला व राजकीय समाजाला प्रत्येक व्यक्तीने संमती दिलेली आहे.

रुसोने वर्णन केलेला सामाजिक करार कसा झाला याचे स्पष्टीकरण : रुसो वर्णित सामाजिक करार दोन पक्षांत होतो. म्हणजेच, करार करताना व्यक्ती एक पक्ष असतो व सामुदायिक समाज या स्वरूपात दुसरा पक्ष असतो. हा करार जनतेच्या व्यक्तिगत खाजगी आणि सामूहिक समाज या स्वरूपामध्ये झाला आहे. अ+ ब+ क+ ड+ ई अशा व्यक्तींनी मिळून समाज बनलेला असतो. प्रत्येक व्यक्ती या समाजाकडे सामूहिक स्वरूपात आपले अधिकार समर्पित करतो. उदा. 'अ' हा व्यक्ती समाजाचा घटकही असतो

आणि करार करणारा स्वतंत्र घटक देखील असतो. व्यक्तिगत रूपाने 'अ' हा व्यक्ती आपले सर्व अधिकार ब, क, ड, ई या व्यक्तींना (समुदायाला) समर्पित करतो .परंतु 'ब' हा व्यक्ती जेव्हा आपले अधिकार समर्पित (बहाल) करतो, तेव्हा 'अ' हा व्यक्ती समाजाचा घटक असतो. अ, क, ड, ई म्हणजेच प्रत्येकजण स्वतंत्ररित्या अधिकार सोडतात व सामुदायिकरित्या परत स्वीकारतात. सर्वच जण व्यक्तिगतरीत्या सर्वांसाठी आपले अधिकार समर्पित (बहाल) करत असल्यामुळे कुणीही कुणाच्या आधीन(नियंत्रणात, बंधनात) नसते. वास्तविक प्रत्येकजण पूर्वी इतकाच स्वतंत्र असतो. करारामुळे व्यक्तीला वास्तविकत: काहीच गमवावे लागत नाही. उलट नैसर्गिक अधिकारांची हमी, संरक्षण व सहकार्य या गोष्टी प्राप्त होतात. यामध्ये कोणाचेही नुकसान नाही तर सर्वांचा लाभ आहे. जेव्हा कोणाही एखाद्या व्यक्तीच्या अधिकारावर आक्रमण होते तेव्हा त्याच्या रक्षणासाठी संपूर्ण समाज उभा राहतो.

अशाप्रकारे सामाजिक करारात सहभागी झालेल्या सर्व व्यक्तींची मिळून राजकीय संघटना निर्माण होते. ही संघटना नैतिक स्वरूपाची असते. या सामुदायिक (सामूहिक) संघटनेला सत्ता, एकता, जीवन व इच्छा प्राप्त होते. सर्व व्यक्तींच्या सामूहिक इच्छेतून निर्माण झालेल्या संघटनेस राज्य म्हटले जाते. थोडक्यात, या सामाजिक कराराचा परिणाम म्हणून समाज, राज्य व शासन संस्था निर्माण झाली. सामाजिक करारातून निर्माण झालेल्या राज्याला सामूहिक इच्छा (General Will) असे म्हटले जाते. सार्वभौमत्वाची अभिव्यक्ती या सामान्य इच्छेमध्ये असते. सर्व व्यक्ती या सामान्य इच्छेच्या अंतर्गत कार्य करतात. प्रत्येक नागरिकांचा सार्वभौमत्वामध्ये एक सदस्य म्हणून भाग असतो. व्यक्तीने स्वतःला सार्वभौम स्वरूपात निर्माण केले आहे. अशाप्रकारे रुसोच्या लोकप्रिय सार्वभौमत्व (Popular Sovereignty) आणि प्रत्यक्ष लोकशाहीला (Direct Democracy) आधार मिळवून दिला आहे.

सारांश, खाजगी मालमत्तेच्या उदयानंतर निर्माण झालेली विषमता, शोषण, संघर्ष आणि असुरक्षितता दूर करण्यासाठी मानवाने सामाजिक कराराद्वारे राजकीय समाजाची स्थापना (राज्याची निर्मिती) केली. सामाजिक करारातून निर्मित राज्याला सामूहिक इच्छा (General Will) असे म्हटले जाते. या सामाजिक कराराचे वैशिष्ट्य असे होते की, प्रत्येक व्यक्तीने आपले सर्व हक्क कोणा एका राजाला न देता, संपूर्ण समाजाला (सामूहिकतेला) अर्पण केले. या करारातून एका नव्या शक्तीचा (सत्तेचा) जन्म झाला, ज्याला रुसो सामूहिक इच्छा किंवा उदात्त इच्छा (General Will) असे म्हणतो. या कराराद्वारे व्यक्तीने आपले स्वातंत्र्य गमावले नाही, कारण तो ज्या समाजाचा भाग होता, त्याच समाजाकडे त्याने हक्क सोपवले होते. त्यामुळे समाजाचे नियम पाळणे म्हणजे स्वतःचेच नियम पाळण्यासारखे होते.

५) सामूहिक ईहा (इच्छा) (General Will)**:**

रुसोची सामूहिक इच्छा (General Will) ही संकल्पना आधुनिक राज्यशास्त्रातील एक महत्त्वाची संकल्पना आहे. निसर्गावस्थेमधील व्यक्तींनी सामाजिक करार करून आपले अधिकार समाजाला दिले. व्यक्तिगत इच्छेच्या जागी सामूहिक इच्छा अस्तित्वात आली. रुसोच्या सामाजिक कराराच्या सिद्धांतातील सर्वात महत्त्वाची संकल्पना म्हणजे सामूहिक इच्छा होय. समाजाच्या सर्वसामान्य हितासाठी निर्माण झालेली इच्छा म्हणजे सामूहिक इच्छा. ती लोककल्याणावर आधारित असते. ती व्यक्तीगत स्वार्थापेक्षा श्रेष्ठ असते. सार्वभौम सत्ता सामूहिक इच्छेत निहित(अंतर्भूत) असते. रुसोच्या मते, प्रत्येक व्यक्तीच्या मनात वास्तविक

इच्छा (Actual Will) व आदर्श इच्छा (Real Will) अशा दोन प्रकारच्या इच्छा असतात. त्यांचे स्वरूप समजून घेतल्यावरच सामूहिक इच्छेचे (General Will) चे स्वरूप समजू शकते.

अ) वास्तविक इच्छा (Actual Will)**:**

रुसोच्या मते, वास्तविक इच्छेला भावनाप्रधान किंवा व्यक्तीनिष्ठ इच्छा असेही म्हणतात. वास्तविक इच्छेमुळे व्यक्तीच्या मनात आपला वैयक्तिक स्वार्थ साध्य करण्यासाठी अविवेकी, संकुचित, अदूरदर्शी, क्षणिक अशा भावना किंवा स्वार्थी विचार निर्माण होतात. या भावनांचा वापर समाजहिताकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून वैयक्तिक हित साधण्यासाठी केला जातो. म्हणून वास्तविक इच्छा समाजाला घातक ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. उदा. १) नफा मिळविण्याच्या स्वार्थी हेतूने बेकायदेशीरपणे, अवैद्यरित्या व्यापाऱ्यांकडून अन्नधान्यांमध्ये होणारी भेसळ. २) विद्यार्थ्याला अभ्यासाऐवजी दिवसभर मोबाईल वापरण्याची इच्छा असणे. ३) वाहनचालकाला सिग्नल तोडून लवकर जाण्याची इच्छा होणे ही वास्तविक इच्छा.

ब) आदर्श इच्छा (Real Will)**:**

रुसोच्या मते, आदर्श इच्छेला सामाजिक इच्छा असेही म्हणतात. आदर्श इच्छा ही सातत्याने सामाजिक हिताचा विवेकशील विचार करते. आदर्श इच्छा ही नि:स्वार्थ, दूरदर्शी, कल्याणकारी, बुद्धीसंगत व स्वातंत्र्याची प्रतीक असते. यामध्ये व्यक्तिगत हिताला गौण स्थान देऊन सामाजिक हिताला श्रेष्ठ व सर्वोच्च स्थान दिले जाते.आदर्श इच्छा ही स्थायी स्वरूपाची इच्छा असते. आदर्श इच्छा ही व्यक्ती व समाजात सामंजस्य निर्माण करते. उदा. १) नियमित अभ्यास करून यश मिळवण्याची इच्छा. २)वाहतूक नियम पाळून सर्वांच्या सुरक्षिततेचा विचार करणे.

क) सामूहिक ईहा (General Will)**:**

समाजाच्या सर्वसामान्य हितासाठी निर्माण झालेली इच्छा म्हणजे सामूहिक इहा होय. रुसोच्या मते, समाजातील सर्व व्यक्तींच्या आदर्श इच्छांचा समन्वय (बेरीज) म्हणजे सामूहिक ईहा होय. दुसऱ्या शब्दात, सामूहिक इच्छा ही सर्वांच्या आदर्श इच्छांची साधी बेरीज नसून संपूर्ण समाजाच्या सामूहिक हिताचे प्रतिनिधित्व करणारी इच्छा आहे. व्यक्तीच्या मनात विचाराअंती एखादा निर्णय समाजहिताच्या दूरदृष्टीने घेताना जी इच्छा निर्माण होते ती सामान्य इच्छा असते. सामूहिक इच्छेत व्यक्तीच्या व्यक्तिगत हितापेक्षा समाजहित विचारात घेतले जाते. ती सर्वांची इच्छा असते व समाजकल्याण हा तिचा हेतू असतो. वेपरच्या मते, 'सर्वांच्या कल्याणाकरिता व्यक्त होणारी सर्व व्यक्तींची स्वहितापेक्षा समाज हितास प्राधान्य देणारी इच्छा म्हणजे रुसोची सामूहिक ईहा होय'. उदा. १) सर्व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी महाविद्यालयाने अभ्यासाचे नियम ठरवणे (उदा. मोबाईल वापरण्यावर बंदी) ही सामूहिक इच्छा होय. उदा. २) रस्ते अपघात होऊ नयेत व रस्ते सुरक्षित राहावेत म्हणून सर्वांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे ही सामूहिक इच्छा होय.

थोडक्यात, वरील विवेचनावरून असे म्हणता येईल की, वास्तविक इच्छा ही संकुचित आणि स्वार्थी असते. तर आदर्श इच्छा ही विवेकवादी आणि न्याय्य असते. तर समाजातील सर्व व्यक्तींच्या आदर्श इच्छांची बेरीज म्हणजे 'सामूहिक इच्छा' होय. जी सदैव संपूर्ण समाजाच्या कल्याणाचा विचार करते.

रुसोच्या सामूहिक इच्छा या संकल्पनेचा दुहेरी वापर:

रुसोच्या सामूहिक इच्छा या संकल्पनेचा हेतू व्यक्तिगत हितापेक्षा समाजहित असला तरी या संकल्पनेने राजकीय क्षेत्रात परस्परविरोधी क्रांतिकारक वळण घेतले. लोकशाहीच्या समर्थकांनी या संकल्पनेला लोकशाहीचा पाया मानले तर निरंकुश शासकांनी याच संकल्पनेच्या आधारावर मनमानी केली. रुसोच्या सामूहिक इच्छा (General Will) या संकल्पनेचा मूलभूत उद्देश लोकहित, लोकसत्ता आणि जनसार्वभौमत्व प्रस्थापित करणे हा होता. परंतु इतिहासात या संकल्पनेचा दोन वेगवेगळ्या प्रकारे वापर झाला. काहींनी तिच्या आधारावर लोकशाही मजबूत केली, तर काही निरंकुश शासकांनी मीच जनतेच्या इच्छेचे प्रतिनिधित्व करतो असा दावा करून हुकूमशाही प्रस्थापित केली.

अ) लोकशाहीचा पाया घालणारी उदाहरणे:

१) फ्रेंच राज्यक्रांती (१७८९):

फ्रेंच राज्यक्रांती वेळी सार्वभौम सत्ता राजाकडे नसून जनतेकडे असते ही कल्पना रुसोच्या विचारावर प्रेरित होती. या क्रांतीतून स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या लोकशाही मूल्यांचा प्रसार झाला तसेच लोकप्रतिनिधी शासनव्यवस्थेचा पाया घातला गेला. थोडक्यात, फ्रेंच राज्यक्रांतीत लोकसत्तेचा आणि जनसार्वभौमत्वाचा पाया रुसोच्या सामूहिक इच्छेच्या संकल्पनेवर उभारला गेला.

२) अमेरिकेची लोकशाही व्यवस्था:

अमेरिकेच्या संविधानातील लोकांच्या संमतीवर आधारित शासन ही संकल्पना रुसोच्या विचारांशी सुसंगत आहे. तसेच संविधानवाद आणि जनसार्वभौमत्वाला महत्त्व मिळाले. अमेरिकामध्ये लोकांच्या संमतीवर आधारित शासनव्यवस्था आणि लोकसत्तेच्या तत्त्वांवर रुसोच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो.

३) स्वित्झर्लंडची प्रत्यक्ष लोकशाही:

स्वित्झर्लंड मध्ये जनमतसंग्रह आणि राज्यकारभारात लोकांचा थेट सहभाग यामध्ये सामूहिक इच्छेची संकल्पना दिसून येते. तसेच लोक स्वतः महत्त्वाच्या धोरणांवर निर्णय घेतात. थोडक्यात, स्वित्झर्लंडमध्ये जनमतसंग्रह आणि प्रत्यक्ष लोकशाहीच्या माध्यमातून सामूहिक इच्छेची कल्पना प्रत्यक्षात आणली गेली.

४) आधुनिक लोकशाही राष्ट्रे:

भारत, फ्रान्स, कॅनडा इत्यादी देशांतील जनसार्वभौमत्वाची कल्पना, प्रौढ मताधिकारचे तत्व, प्रातिनिधिक शासनव्यवस्था यासारखी तत्वे रुसोच्या विचारांनी प्रभावित झाली आहेत.

वरीलप्रमाणे काही उदाहरणे लोकशाहीचा पाया मजबूत करणारी आहेत.

ब) निरंकुश शासकांनी केलेला वापर– काही उदाहरणे:

जगातील निरंकुश शासकांनी/हुकूमशाहा यांनी रुसोच्या सामूहिक इच्छेच्या संकल्पनेचा गैरअर्थ लावला किंवा तिचा उपयोग स्वतःच्या सत्तेला वैधता देण्यासाठी केला. त्याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे–

१) **रोबेस्पिअर आणि दहशतीचे राज्य:** फ्रेंच राज्यक्रांती दरम्यान मॅक्सीमिलन रोबेस्पिअरने स्वतःला जनतेच्या इच्छेचा प्रतिनिधी मानले आणि विरोधकांना 'जनतेचे शत्रू' ठरवून शिक्षा दिली, परिणामी दहशतीचे राज्य निर्माण झाले.

२) **अडॉल्फ हिटलर:** अडॉल्फ हिटलरने 'जर्मन जनतेची इच्छा' व्यक्त करत असल्याचा दावा केला. लोकहिताच्या नावाखाली सर्व सत्ता स्वतःकडे केंद्रित केली. लोकशाही संस्थांचा नाश करून हुकूमशाही प्रस्थापित केली.

३) **बेनिटो मुसोलिनी:** बेनिटो मुसोलिनी याने राष्ट्रहित आणि जनतेची इच्छा यांचा आधार घेत इटली मध्ये फॅसिस्ट राजवट उभी केली. विरोधी पक्ष आणि नागरी स्वातंत्र्यांवर निर्बंध आणले.

४) **जोसेफ स्टालिन:** सोव्हिएत संघात जोसेफ स्टॅलिन याने कामगार वर्गाच्या सामूहिक हिताचे प्रतिनिधित्व करीत असल्याचा दावा केला. आणि प्रत्यक्षात सर्व सत्ता स्वतःकडे केंद्रित करून एकाधिकारशाही निर्माण केली. जोसेफ स्टॅलिनने जनतेच्या हिताचे प्रतिनिधित्व करण्याचा दावा करून निरंकुश सत्ता प्रस्थापित केली.

५) **माओ झेडाँग:** चीनमध्ये माओ झेडाँग याने जनतेच्या सामूहिक हिताच्या नावाखाली कठोर केंद्रीकृत शासन चालविले आणि विरोधकांचे दमन केले.

सारांश:

रुसोच्या सामूहिक इच्छा या संकल्पनेचा उद्देश लोकशाही, लोकसत्ता आणि जनकल्याण हा होता; परंतु त्याच्या सामूहिक इच्छा या संकल्पनेचा गैरअर्थ हिटलर, मुसोलिनी, स्टालिन आणि माओ यांसारख्या काही शासकांनी मीच जनतेच्या इच्छेचे प्रतिनिधित्व करतो असा लावून आपल्या हुकूमशाहीला वैचारिक आधार देत स्वतःच्या निरंकुश सत्तेला वैधता देण्याचा प्रयत्न केला. तर फ्रान्स, अमेरिका, स्वित्झर्लंड आणि इतर लोकशाही राष्ट्रांनी त्याच संकल्पनेतून येथील लोकशाहीला बळ दिले आणि लोकशाहीचा पाया मजबूत केला. एकंदर विचार करता रुसोच्या सामूहिक इच्छा (General Will) या संकल्पनेचा प्रभाव लोकशाही आणि निरंकुश सत्ता या दोन्ही प्रवाहांवर पडल्याचे दिसून येते.

रुसोच्या सामाजिक करार सिद्धांताचे मूल्यमापन (Evaluation) **:**

गुण : (Merits):

१) आधुनिक लोकशाहीचा पाया:

जनतेची सार्वभौम सत्ता, लोकसहभाग आणि लोकशाही शासनव्यवस्था यांचा पाया रुसोच्या विचारांमध्ये आढळतो. रुसोने लोकसत्ता आणि जनसहभाग यांचा पुरस्कार करून आधुनिक लोकशाहीला बळ दिले. रुसोने 'जनतेचे सार्वभौमत्व' (Popular Sovereignty) हा विचार मांडला. सत्ता राजाची नसून जनतेची आहे, हा विचार आधुनिक लोकशाहीचा पाया ठरला.

२) जनतेच्या सार्वभौमत्वाचा पुरस्कार:

राज्याची अंतिम सत्ता जनतेमध्ये असावी हा विचार आधुनिक लोकशाही व्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला. रुसोने 'जनतेचे सार्वभौमत्व' (Popular Sovereignty) हा विचार मांडला. अंतिम सत्ता

राजाच्या हातात नसून 'जनतेच्या इच्छेत' (General Will) असते, हा विचार रुसोने दिला. म्हणूनच त्याला आधुनिक लोकशाहीचा उद्गाता मानले जाते.

३) स्वातंत्र्य आणि समानतेचा पुरस्कार:

रुसोने व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक समानता आणि लोककल्याण यांना महत्त्व दिले. त्याने सर्व व्यक्तींना समान मानले आणि नैसर्गिक स्वातंत्र्याचे समर्थन केले. त्याच्या याच विचारांतून १७८९ च्या 'फ्रेंच राज्यक्रांती'ला प्रेरणा मिळाली. फ्रेंच राज्यक्रांतीची 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता' ही तीन तत्वे, मूल्ये रुसोच्या विचारांवरच आधारित आहेत.

४) नैतिक राज्याची कल्पना (कल्याणकारी राज्याची संकल्पना):

रुसोने राज्याला केवळ दडपशाही संस्था न मानता लोककल्याणासाठी कार्य करणारी नैतिक संस्था मानले आहे. राज्याचा मुख्य उद्देश लोकांचे कल्याण आणि हित साधणे हा आहे, हे रुसोने स्पष्ट केले.

५) निरंकुश राजसत्तेला विरोध:

रुसोचा सिद्धांत राजाच्या दैवी अधिकाराला (Divine Right) नाकारतो. राज्य हे देवाचा अवतार नसून ते माणसांनी कराराद्वारे निर्माण केले आहे, हे सांगून रुसोने लोकशाहीचा पाया घातला आणि निरंकुश राजसत्तेला विरोध केला. अशाप्रकारे रुसोने राजांच्या दैवी अधिकार सिद्धांताला विरोध करून लोकांच्या अधिकारांचे समर्थन केले. रुसोच्या सिद्धांतामुळे राजांच्या दैवी अधिकाराच्या संकल्पनेला आव्हान मिळाले आणि लोकशाही शासनव्यवस्थेचा मार्ग मोकळा झाला.

६) सत्तेच्या दैवी अधिकाराला विरोध:

तत्कालीन राजे स्वतःला देवाचे प्रतिनिधी मानत असत. रुसोने हे स्पष्ट केले की, राज्य हे देवाचे नसून मानवांच्या कराराचे अपत्य आहे. त्यामुळे जनतेला जुलमी सत्ता बदलण्याचा अधिकार मिळतो.

७) सामूहिक इच्छेची संकल्पना:

सार्वजनिक हिताला प्राधान्य देणारी सामूहिक इच्छेची (General Will) संकल्पना रुसोने मांडली. यामुळे समाजहित आणि लोककल्याणाला महत्त्व प्राप्त झाले. रुसो जनकल्याणावर भर देतो. रुसोच्या 'सामान्य इच्छा' या संकल्पनेमुळे सार्वजनिक हिताला महत्त्व प्राप्त झाले.

८) वैयक्तिक हित आणि सामाजिक हित यात समन्वय घालण्याचा प्रयत्न:

रुसोच्या मते, व्यक्तीने स्वतःच्या वास्तविक इच्छेचा म्हणजेच भावनाप्रधान किंवा व्यक्तीनिष्ठ स्वार्थी इच्छेचा (Actual Will) त्याग करून समाजाच्या कल्याणासाठी असणाऱ्या 'आदर्श इच्छेचा म्हणजेच सामाजिक इच्छेचा' (Real Will) स्वीकार केला पाहिजे. यातून वैयक्तिक हित आणि सामाजिक हित यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न रुसोने केला असल्याचे दिसून येते .

दोष/मर्यादा : (Demerits / Limitation):

१) मानवी स्वभावाचे एकांगी वर्णन:

रुसोने मानवी स्वभावाचे सदगुण तेवढेच लक्षात घेतले व दुर्गुणासंबंधी तो समाजाच्या संपर्कामुळे दुष्ट बनला असे सांगितले. समाज व इतर संस्था मानवी हितासाठी निर्माण झाल्या आहेत. उलट माणसानेच

त्या संस्थांना भ्रष्ट बनविले आहे. माणूस सदगुण व दुर्गुण यांचे संमिश्रण आहे याकडे रूसोचे लक्ष गेलेले दिसत नाही.

२) नैसर्गिक अवस्थेचे अवास्तव आणि काल्पनिक वर्णन:

रुसोने नैसर्गिक अवस्थेला सुवर्णयुग म्हटले; परंतु इतिहासात अशा अवस्थेचे स्पष्ट पुरावे आढळत नाहीत. इतिहासकारांच्या मते, रुसोने वर्णन केलेली 'मनैसर्गिक अवस्था' किंवा 'उदात्त रानटी माणूस' पूर्णपणे काल्पनिक आहे. इतिहासात असा कोणताही करार झाल्याची नोंद नाही. हे केवळ एक काल्पनिक आणि तात्विक गृहीतक (Hypothesis) आहे.

३) सामूहिक इच्छा ही संकल्पना अस्पष्ट:

रुसोची 'सामूहिक इच्छा' (General Will) ही संकल्पना अत्यंत गुंतागुंतीची आणि अस्पष्ट आहे. संपूर्ण समाजाची एकच इच्छा कशी असू शकते आणि ती कशी मोजायची, याचे स्पष्ट व्यावहारिक उत्तर रुसो देत नाही. बहुमताची इच्छा म्हणजे सामूहिक इच्छा की सर्वांची इच्छा? हे नक्की ठरवणे कठीण जाते. 'सामूहिक इच्छा' म्हणजे नेमके काय याची स्पष्ट व्याख्या रुसोने दिलेली नाही. त्यामुळे तिचा विविध प्रकारे अर्थ लावला जाऊ शकतो. जसे लोकशाहीच्या समर्थकांनी या संकल्पनेला लोकशाहीचा पाया मानले तर निरंकुश शासकांनी याच संकल्पनेचा गैरअर्थ लावला किंवा तिचा उपयोग स्वतःच्या सत्तेला वैधता देण्यासाठी केला.

४) हुकूमशाहीला खतपाणी:

काही विचारवंतांच्या, टीकाकारांच्या मते, रुसोचा सिद्धांत नकळतपणे हुकूमशाहीला पाठबळ देतो. व्यक्तीने आपले सर्व हक्क समाजाला (General Will) समर्पित केल्यामुळे, राज्याच्या नावाखाली एखादा हुकूमशहा 'मी म्हणजेच जनतेची इच्छा' असे म्हणून जनतेवर जुलूम करू शकतो. 'सामान्य इच्छा' या संकल्पनेच्या नावाखाली शासक लोकांवर आपली इच्छा लादू शकतो. उदा. हिटलर किंवा मुसोलिनी यांच्या विचारसरणीत याचा प्रभाव दिसतो.

५) व्यक्तिस्वातंत्र्याला बाधा:

सामाजिक करारावर स्वाक्षरी केल्यानंतर व्यक्तीला राज्याच्या किंवा सामूहिक इच्छेच्या विरोधात जाण्याचा अधिकार राहत नाही. रुसो म्हणतो की, व्यक्तीला स्वतंत्र होण्यासाठी सक्ती केली जाऊ शकते, जे लोकशाहीच्या तत्त्वाविरुद्ध वाटते. सामूहिक इच्छेला सर्वोच्च स्थान दिल्यामुळे व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर बंधने येऊ शकतात. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा येतात.

६) बहुमताच्या हुकूमशाहीचा धोका (अल्पसंख्याकांच्या स्वातंत्र्याचा संकोच):

टीकाकारांच्या मते, रुसोचा सिद्धांत नकळतपणे हुकूमशाहीला खतपाणी घालतो. 'व्यक्तीला स्वतंत्र होण्यासाठी सक्ती केली जाऊ शकते,' असे रुसो म्हणतो. जर राज्याने (किंवा बहुमताने) घेतलेला निर्णय हाच 'सामान्य इच्छा' मानला, तर अल्पसंख्याकांच्या स्वातंत्र्याचा संकोच होऊ शकतो. हिटलर किंवा मुसोलिनी सारख्या हुकूमशहांनी याच विचाराचा गैरवापर केला. बार्करच्या मते, 'रुसो सर्वाधिकारवादी आहे. याचे कारण तो सर्वोच्च सत्तेवर कोणतेच बंधन घालत नाही'.

७) प्रत्यक्ष लोकशाहीची अवास्तव कल्पना:

रुसोने प्रत्यक्ष लोकशाहीचा पुरस्कार केला. रुसोच्या मते, प्रत्यक्ष लोकशाही (Direct Democracy) उत्तम आहे, जिथे सर्व नागरिक एकत्र येऊन निर्णय घेतात. परंतु, आजच्या भौगोलिक दृष्ट्या मोठ्या आकाराच्या आणि कोट्यवधी लोकसंख्या असलेल्या आधुनिक राष्ट्रांमध्ये प्रत्यक्ष लोकशाही राबवणे अशक्य आहे. ती मोठ्या राज्यांसाठी गैरसोयीची व पूर्णपणे अव्यवहार्य ठरते. उदा.- भारत, चीन, रशिया, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी इत्यादी. अशा भौगोलिक व लोकसंख्येच्या दृष्टीने मोठ्या असणाऱ्या देशांमध्ये प्रातिनिधिक लोकशाहीच आवश्यक ठरते, ज्याला रुसोचा विरोध होता.

निष्कर्ष (Conclusion)**:**

रुसोचा सामाजिक करार सिद्धांत हा आधुनिक राजकीय विचारांमधील अत्यंत महत्वाचा व प्रभावी सिद्धांत मानला जातो. वरीलप्रमाणे रुसोच्या सामाजिक करार सिद्धांतावर ऐतिहासिक आणि व्यावहारिक पातळीवर कितीही टीका झाली, तरी त्याचे राजकीय महत्त्व नाकारता येत नाही. रुसोने राजाच्या जुलुमी सत्तेला आव्हान देऊन सामूहिक इच्छेच्या माध्यमातून सत्तेची खरी चावी जनतेच्या हातात दिली. त्याने जनतेला सत्तेचा स्रोत मानले. त्याचे हे विचार लोकशाहीला पोषक ठरतात. जीन जॅक्स रुसोचा सामाजिक करार सिद्धांत हा आधुनिक लोकशाही, जनसार्वभौमत्व, लोकसत्ता, स्वातंत्र्य, समानता आणि लोकसहभाग यांचा तात्त्विक पाया मानला जातो. रुसोने राज्यसत्तेचा स्रोत जनतेमध्ये असल्याचे प्रतिपादन केले आणि सामूहिक इच्छेच्या माध्यमातून लोकसत्तेची संकल्पना विकसित केली. जरी त्याच्या निसर्गावस्थेचे वर्णन काल्पनिक मानले गेले आणि सामूहिक इच्छेच्या संकल्पनेवर अस्पष्टतेची टीका झाली, तरीही फ्रेंच राज्यक्रांती, आधुनिक लोकशाही आणि मानवी हक्कांच्या विकासावर त्याचा प्रभाव अत्यंत महत्त्वपूर्ण राहिला आहे. त्यामुळे रुसोला आधुनिक लोकशाहीचा प्रमुख प्रवर्तक मानले जाते. परंतु, सामूहिक इच्छेची अस्पष्टता आणि तिच्या गैरवापराची शक्यता, बहुसंख्यांकांची निरंकुशता निर्माण होण्याचा धोका, हुकूमशाहीचा छुपा धोका, काल्पनिक इतिहास, व्यावहारिकतेचा अभाव, अस्पष्ट संकल्पना यामुळे या सिद्धांतावर टीका देखील करण्यात आली आहे. त्यामुळे रुसोचा सिद्धांत हा लोकशाहीचा पाया मानला जातो, परंतु त्याची अंमलबजावणी करताना सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. रुसोच्या सामाजिक करार सिद्धांतात काही व्यावहारिक दोष आणि विरोधाभास नक्कीच आहेत. परंतु, तत्कालीन फ्रान्ससह जगभरातील जुलमी राजेशाहीच्या काळात त्याने मांडलेला जनतेच्या हातात सत्ता असावी हा विचार आजही तितकाच जिवंत आहे.

स्वयं अध्ययन प्रश्न -४ :

प्रश्न-१): दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.

१. रुसोचा प्रसिद्ध ग्रंथ कोणता?

अ) Leviathan

ब) Two Treatises of Civil Government

क) Social Contract

ड) Politics

२. रुसोचा Social Contract हा ग्रंथ कोणत्या वर्षी प्रकाशित झाला?

अ) १७५१ ब) १७५५

क) १७६२ ड) १७८९

३. Man is born free, and everywhere he is in chains हे वाक्य कोणी म्हटले?

अ) हॉब्ज ब) लॉक

क) रुसो ड) बेंथम

४. रुसोच्या मते माणूस स्वभावतः कसा असतो?

अ) क्रूर ब) स्वार्थी

क) चांगला ड) दुष्ट

५. रुसोने आदिम मानवाला कोणती उपमा दिली?

अ) Political Animal ब) Noble Savage

क) Economic Man ड) Social Man

६. रुसोच्या मते निसर्गावस्थेचा अंत कशामुळे झाला?

अ) युद्धामुळे ब) धर्मामुळे

क) खाजगी मालमत्तेमुळे ड) राजेशाहीमुळे

७. रुसोच्या मते सार्वभौम सत्ता कुणामध्ये निहित (अंतर्भूत, समाविष्ट) असते?

अ) राजामध्ये ब) संसदेमध्ये

क) जनतेमध्ये ड) न्यायालयामध्ये

८. रुसोच्या सामाजिक करारातील केंद्रस्थानी असलेली संकल्पना कोणती?

अ) कायदा ब) अधिकार

क) सामूहिक इच्छा ड) शासन

९. General Will चा मराठी अर्थ काय?

अ) वैयक्तिक इच्छा ब) वास्तविक इच्छा

क) सामूहिक इच्छा ड) नैतिक इच्छा

१०. Actual Will म्हणजे काय?

अ) आदर्श इच्छा ब) स्वार्थी इच्छा

क) सामाजिक इच्छा ड) सामूहिक इच्छा

११. Real Will म्हणजे काय?

अ) आदर्श इच्छा ब) भावनिक इच्छा

क) स्वार्थी इच्छा ड) वैयक्तिक इच्छा

१२. रुसोच्या मते सामूहिक इच्छा कशाची बेरीज आहे?

अ) सर्व वास्तविक इच्छांची
ब) सर्व आदर्श इच्छांची
क) सर्व भावनिक इच्छांची
ड) सर्व खाजगी इच्छांची

१३. रुसोच्या विचारांनी कोणत्या क्रांतीला प्रेरणा दिली?

अ) रशियन क्रांती
ब) औद्योगिक क्रांती
क) फ्रेंच राज्यक्रांती
ड) अमेरिकन गृहयुद्ध

१४. रुसो कोणत्या देशाचा विचारवंत होता?

अ) इंग्लंड
ब) जर्मनी
क) फ्रान्स
ड) इटली

१५. रुसोच्या मते मानवी स्वभावाच्या दोन मूलभूत प्रवृत्ती कोणत्या?

अ) प्रेम व द्वेष
ब) आत्मप्रेम (Self Love) व सहानुभूती
क) लोभ व मत्सर
ड) सत्ता व संपत्ती

१६. Conscience याचा अर्थ काय?

अ) बुद्धी
ब) स्वार्थ
क) अंतःकरण
ड) अधिकार

१७. रुसोने कोणत्या लोकशाहीचे समर्थन केले?

अ) संसदीय लोकशाही
ब) अध्यक्षीय लोकशाही
क) प्रत्यक्ष लोकशाही
ड) संघराज्यीय लोकशाही

१८. रुसोच्या मते राज्याची निर्मिती कशातून झाली?

अ) विजयातून
ब) दैवी इच्छेतून
क) सामाजिक करारातून
ड) बलप्रयोगातून

१९. रुसोच्या मते समाजहिताला प्राधान्य देणारी इच्छा कोणती?

अ) वास्तविक इच्छा
ब) आदर्श इच्छा
क) वैयक्तिक इच्छा
ड) भावनिक इच्छा

२०. रुसोच्या सिद्धांतावर कोणत्या विचारवंताने तो सर्वाधिकारवादी आहे अशी टीका केली?

अ) लॉक
ब) हॉब्ज
क) बार्कर
ड) ग्रीन

सामाजिक करार सिद्धांताचा तुलनात्मक अभ्यास

विचारार्थ तुलनात्मक मुद्दे	थॉमस हॉब्ज	जॉन लॉक	रुसो
ग्रंथ	Leviathan	Two Treatises of Civil Government	Social Contract
मानवी स्वभाव	स्वार्थी, अहंकारी, भावनाशून्य, स्पर्धात्मक व सत्तालोलुप, आत्मकेंद्री.	विवेकी, नैतिक व सहकार्यशील	मूलतः चांगला, साधाभोळा, सरळ, सुस्वभावी, परंतु समाज्याच्या संपर्कामुळे भ्रष्ट(दुर्गुणी) होणारा.
निसर्गावस्था	सतत संघर्ष, भीती, अराजक, युद्धमय व असुरक्षिततेची अवस्था	शांतापूर्ण व विवेकपूर्ण अवस्था परंतु नैसर्गिक अधिकारांच्या संरक्षणाची गरज भासली.	स्वातंत्र्य, समता व साधेपणाची अवस्था. 'उदात्त रानटी' (Noble Savage), सुखी समाधानी आणि आनंदी.
अधिकार/हक्क	स्वसंरक्षणाचा हक्क (आत्मसंरक्षणाचा हक्क)	जीवित, स्वातंत्र्य व संपत्तीचे हक्क	स्वातंत्र्य, समतेचा व आत्मसंरक्षणाचा हक्क.
कराराचे पक्ष	व्यक्ती-व्यक्तीमध्ये करार (एकपक्षीय करार)	जनता आणि शासन यामध्ये करार	प्रत्येक व्यक्ती आणि संपूर्ण समाज यामध्ये करार
सामाजिक कराराचा उद्देश	शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करणे	नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करणे	सामूहिक इच्छेवर आधारित समाज निर्माण करणे
सामाजिक कराराचे स्वरूप	नैसर्गिक अवस्थेतील असुरक्षितता, संघर्ष आणि अराजकता दूर करण्यासाठी व्यक्तींनी परस्पर करार करून आपले सर्व अधिकार सार्वभौम सत्तेकडे सोपविले. या करारातून निरंकुश आणि शक्तिशाली	व्यक्तींनी आपल्या नैसर्गिक हक्कांचे (जीवित, स्वातंत्र्य आणि संपत्ती) संरक्षण करण्यासाठी परस्पर संमतीने सामाजिक करार केला. या करारातून मर्यादित अधिकार असलेले आणि जनतेस उत्तरदायी	*'सामान्य इच्छा' (General Will) सर्वोच्च मानून करार. *प्रत्येक व्यक्ती आपले सर्व अधिकार सामूहिक इच्छेकडे (General Will) समर्पित करून सामाजिक करारात सहभागी होते. या

	राज्याची निर्मिती होते. *राज्य करारात सहभागी नाही .*एकपक्षीय करार.	शासन निर्माण होते. *नैसर्गिक अधिकारांचे रक्षण करण्यासाठी दोन करार १)मूळ करारातून समाज्याची निर्मिती २) दुसऱ्या करारातून राज्यनिर्मिती, *करारात राजा सहभागी	करारातून लोकसत्तेवर आधारित राज्य निर्माण होते आणि सार्वभौम सत्ता जनतेमध्ये निहित राहते.
सार्वभौम सत्तेचे स्वरूप	सर्वोच्च, निरंकुश व अमर्याद	*मर्यादित व घटनात्मक सर्वभौमत्व. *शासनसत्ता समाजाच्या 'विश्वास्थ संस्था (Trustee) च्या स्वरुपात	जनतेमध्ये निहित (अंतर्भूत) असते. (अमर्याद, अविभाज्य आणि अदेय)
राज्याचे/शासनाचे स्वरूप	निरंकुश राजेशाहीचे समर्थन	मर्यादित लोकशाही शासन	प्रत्यक्ष लोकशाही
जनतेचे अधिकार	सार्वभौमाविरुद्ध बंडाचा अधिकार नाही.	अन्यायी शासनाविरुद्ध बंडाचा अधिकार आहे.	जनता हीच अंतिम सार्वभौम सत्ता आहे. जनतेला क्रांतीचा अधिकार नाही
कायद्याचे स्थान	सार्वभौमाची आज्ञा म्हणजे कायदा	कायदा नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करतो	कायदा सामूहिक इच्छेची अभिव्यक्ती आहे
स्वातंत्र्याची संकल्पना	कायद्याने परवानगी दिलेले स्वातंत्र्य	नैसर्गिक हक्कांचे संरक्षण असलेले स्वातंत्र्य	सामूहिक इच्छेचे पालन करण्यातच खरे स्वातंत्र्य
राज्याचे स्वरूप	सर्वशक्तिमान राज्य	मर्यादित राज्य	लोकसत्ताक राज्य
राजकीय विचारधारेला योगदान	निरंकुशतावादाचा पाया	उदारमतवादाचा पाया	लोकसत्ता व लोकशाहीचा पाया

३.२.३ राज्याच्या उत्पत्तीचा उत्क्रांतिवादी सिद्धांत: (Evolutionary Theory of the Origin of State):

पार्श्वभूमी :

'राज्य'ही मानवी जीवनातील सर्वात महत्त्वाची राजकीय संस्था आहे. मानवाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवनाचे नियमन राज्याद्वारे केले जाते. राज्याची उत्पत्ती कशी झाली, याविषयी प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत अनेक विचारवंतांनी विविध सिद्धांत मांडले आहेत.

राज्याच्या उत्पत्तीचा दैवी सिद्धांत, शक्ती सिद्धांत, सामाजिक करार सिद्धांत आणि उत्क्रांतिवादी (ऐतिहासिक) सिद्धांत हे त्यांपैकी प्रमुख आहेत. उत्क्रांतीवादी सिद्धांतालाच ऐतिहासिक सिद्धांत असेही म्हणतात. यांपैकी उत्क्रांतिवादी अथवा ऐतिहासिक सिद्धांत हा सर्वाधिक वास्तववादी, तर्कसंगत, वैज्ञानिक आणि ऐतिहासिक वास्तवावर आधारित सर्वमान्य आधुनिक दृष्टिकोन मानला जातो. उत्क्रांतिवादी सिद्धांत हा आधुनिक काळात राज्यशास्त्रज्ञांनी सर्वाधिक स्वीकारलेला सिद्धांत मानला जातो. या सिद्धांतानुसार राज्याची निर्मिती एका रात्रीत, एका क्षणात, ईश्वराच्या इच्छेने अथवा एका व्यक्तीच्या इच्छेने (शक्ती/बळाद्वारे) किंवा एखाद्या कराराद्वारे झालेली नाही. राज्य ही मानवी समाजाच्या हजारो वर्षांच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकीय उत्क्रांतीची परिणिती आहे. राज्य हा एक विकसित (उत्क्रांत) झालेला संस्थात्मक प्रकार आहे. हा सिद्धांत राज्याला मानवी सभ्यतेच्या (Civilization) विकासातील नैसर्गिक टप्पा मानतो. ज्या प्रकारे कुटुंब, कुल, जमात (टोळी), गाव, नगर, धर्म आणि संस्कृती यांचा विकास क्रमाक्रमाने झाला, त्याच प्रकारे राज्याचाही विकास झाला. उत्क्रांतवादी सिद्धांताची मांडणी प्रा. गार्नर, आर. एम. मॅकआयव्हर, प्रा.बर्जेस, प्रा. गेटल, लिकॉक, केलर आदी विचारवंतांनी केली आहे.

उत्क्रांतीवादी (ऐतिहासिक) सिद्धांत असे मानतो की, राज्य ही एक 'उत्क्रांत झालेली' संस्था आहे. प्रा. गार्नर (Garner) या विचारवंताच्या मते, 'राज्य हे निसर्गाची निर्मिती नसून मानवी इतिहासाच्या प्रदीर्घ प्रक्रियेतून निर्माण झालेली एक सामाजिक संस्था आहे.' राज्य हे मानवाच्या गरजा आणि परिस्थितीनुसार हळूहळू विकसित होत गेले आहे. राज्य ही मानवी समाजाच्या दीर्घकालीन सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकीय विकासाची नैसर्गिक परिणती आहे. जसे बीजापासून वृक्ष हळूहळू विकसित होतो, त्याचप्रमाणे कुटुंब, कुळ, जमात (टोळी), ग्रामसंस्था (गाव), नगरराज्य (गणराज्य) आणि राजकीय संघटनांचा क्रमशः विकास होत जाऊन राज्याची निर्मिती झाली. म्हणूनच या सिद्धांतानुसार राज्य ही कृत्रिम संस्था नसून एक नैसर्गिक, ऐतिहासिक आणि उत्क्रांतीतून विकसित झालेली संस्था आहे.

१) उत्क्रांतीवादी सिद्धांताचा अर्थ व स्वरूप :

उत्क्रांतीवादी सिद्धांतानुसार राज्य ही कोणत्याही विशिष्ट दिवशी किंवा विशिष्ट घटनेतून निर्माण झालेली संस्था नाही. मानव कुटुंब करून एकत्रित राहू लागला तेव्हापासून मानवी जीवनाच्या गरजा वाढत गेल्या, सामाजिक संबंध गुंतागुंतीचे बनले, आर्थिक व्यवहार वाढले आणि संरक्षणाची आवश्यकता निर्माण झाली. या सर्व घटकांच्या प्रभावामुळे राजकीय संघटनांचा विकास होत गेला आणि त्यातून राज्याची निर्मिती झाली. म्हणूनच या सिद्धांताचे मुख्य प्रतिपादन असे आहे की, राज्य हे बनविले गेलेले नसून विकसित झालेले आहे. (The State is a growth and not a creation). उत्क्रांतिवादी सिद्धांतानुसार राज्याचा विकास पुढील क्रमाने झाला - कुटुंब, कुळ, जमात, गाव, जनपद, राज्य हा विकास अचानक झालेला नसून हजारो वर्षांच्या सामाजिक परिवर्तनाचा परिणाम आहे.

या सिद्धांताच्या विकासामध्ये त्याला बळकट करण्यामध्ये अनेक विचारवंतांचे योगदान महत्त्वाचे आहे.

अरिस्टॉटल च्या मते, मनुष्य हा स्वभावतः समाजशील आणि राजकीय प्राणी आहे. (Man is by nature a social and political animal.) कुटुंबापासून गाव आणि गावापासून राज्य निर्माण झाले. त्यामुळे राज्य ही नैसर्गिक उत्क्रांतीची सर्वोच्च अवस्था आहे.

प्रा. डॉ. गार्नर (Garner) च्या मते, राज्याच्या निर्मितीत कोणतीही एक घटना कारणीभूत नसून, अनेक घटकांचा एकत्रित परिणाम असल्याचे स्पष्ट केले आहे, तर

डॉ. गार्नर आणि लिकॉक (Leacock) च्या मते, राज्याचा उगम समाजजीवनाच्या प्रदीर्घ संघर्षातून आणि सहकार्यातून झाला.

सर हेन्री मेन यांनी राज्याच्या विकासाचा इतिहास अभ्यासून असे मत मांडले की, समाजाचा विकास कुटुंबापासून सुरू होऊन कुळ, जमात आणि राष्ट्रापर्यंत पोहोचला. हेन्री मेन यांनी राज्यनिर्मितीचा पाया रक्तसंबंधात (Kinship) असल्याचे सांगितले. त्यांच्या मते सुरुवातीला समाजाची रचना कुटुंबाभोवती होती. नंतर कुटुंबांचे कुळ, कुळांचे जमात (टोळी) आणि जमातींचे राज्य बनले. उदा: प्राचीन भारतातील अनेक जनपदे (गणराज्ये/नगरराज्ये) ही कुळ आणि जमातींच्या (टोळींच्या) संघटनांतून निर्माण झाली. सर हेन्री मेन यांनी राज्य निर्मितीत रक्तसंबंधांचे आणि पितृसत्ताक कुटुंबाचे महत्त्व अधोरेखित केले.

जे. डब्ल्यू. बर्गेस यांच्या मते, राज्य ही मानवजातीच्या राजकीय जाणीवेच्या विकासाची परिणती आहे. समाजातील संघटनात्मक शक्ती वाढत गेल्यामुळे राज्य निर्माण झाले. त्यांच्या मते राज्य हे समाजाच्या राजकीय जाणीवेतून विकसित झालेले संघटन आहे.

जोहान ब्लंटश्ली यांच्या मते, राज्य हे एक सजीव संस्थेसारखे आहे. ब्लंटश्ली यांनी राज्याला सजीव संस्थेची उपमा दिली. त्यांच्या मते राज्याचा विकासही सजीव प्राण्यांच्या विकासाप्रमाणे टप्प्याटप्प्याने होतो.

आर. एम. मॅकआयव्हर या उदारमतवादी विचारवंताच्या मते, 'आधुनिक राज्य अनेक चढ-उतारानंतर सर्वोच्च हितसंवर्धनाच्या साधनांच्या रूपात विकसित झालेले आहे'.

मार्क्सवादी विचारवंत फ्रेडरिक एंजल्सच्या मते, 'राज्याची उत्पत्ती व विकास समाजातील श्रीमंत (धनिक) व गरीब (निर्धन) वर्गाच्या उत्पत्ती व विकास यांच्याशी संबंधित आहे आणि मागच्या सर्व ऐतिहासिक अवस्थांप्रमाणे आधुनिक राज्याचे संघटनसुद्धा वर्ग-संघर्षावर (Class Struggle) आधारित आहे.

२) राज्य उत्क्रांतीचे प्रमुख घटक (The Major Factors of the State Evolution):

राज्याच्या उत्पत्ती मध्ये मानवी सहज प्रवृत्ती, रक्तसंबंध, धर्म, आर्थिक घटक, युद्ध किंवा शक्ती, राजकीय जाणीव जागृती इत्यादी घटकांचे/ तत्वांचे महत्त्वाचे योगदान आहे. राज्याची उत्पत्ती एका दिवसात झाली नाही. ती खालील सहा टप्प्यांतून किंवा घटकांमधून झाली. त्याची सविस्तर चर्चा पुढील प्रमाणे करण्यात आली आहे.

१) सामाजिक प्रवृत्ती किंवा मानवी सहज प्रवृत्ती: (Social Attitude):

राज्याच्या निर्मितीमध्ये सर्वप्रथम मूळ सामाजिक प्रवृत्ती, समूह जीवनाची गरज किंवा मानवी सहज प्रवृत्ती हा घटक महत्त्वाचा ठरतो. मनुष्य हा निसर्गतःच समाजशील (समाजप्रिय) प्राणी आहे. तो एकटा राहू शकत नाही. समूह करून राहण्याची त्याची मूळ प्रवृत्ती आहे. अन्न, वस्त्र, निवारा, सुरक्षा, शिक्षण आणि सांस्कृतिक गरजा पूर्ण करण्यासाठी त्याला इतर व्यक्तींच्या सहकार्याची आवश्यकता असते म्हणून मनुष्य समूहाने राहू लागला. त्यामुळे सुरुवातीला कुटुंबाची निर्मिती झाली. अनेक कुटुंबे एकत्र येऊन समूह तयार झाले. या समूहांमध्ये परस्पर सहकार्य, संरक्षण आणि संसाधनांचे वाटप केले जात असे. समूह

जीवनामुळे सामाजिक नियम निर्माण झाले. पुढे या नियमांचे पालन करण्यासाठी नेतृत्व आणि संघटना विकसित झाली. याच संघटनांचा विकास होत जाऊन राज्याची निर्मिती झाली.

दुसऱ्या शब्दात; मानव हा समाजशील प्राणी आहे. सुरुवातीच्या काळात मानवाला सुरक्षिततेसाठी समूहाने राहणे भाग होते. अन्नाच्या शोधात आणि वन्य प्राण्यांपासून संरक्षणासाठी मानवाने एकत्र येण्यास सुरुवात केली. हा समूह म्हणजे राज्याचे प्राथमिक स्वरूप होते. मानवाच्या या 'सहज प्रवृत्ती'मुळेच पुढे संघटित समाजाची निर्मिती झाली. जेव्हा मानवाला जाणवले की एकटे राहण्यापेक्षा समूहात राहणे जास्त सुरक्षित आणि सोयीचे आहे, तेव्हापासून राज्याच्या निर्मितीची पायाभरणी झाली. हे सामूहिक जीवन शिस्तबद्ध करण्याच्या गरजेतून पुढे 'नियंत्रण व्यवस्था' आणि 'राज्य' आकारास आले.

२) रक्तसंबंध (Kinship)**:**

राज्यनिर्मितीच्या प्रारंभिक अवस्थेत रक्तसंबंधाला अत्यंत महत्त्व होते. एकाच पूर्वजापासून निर्माण झालेल्या कुटुंबांचे समूह म्हणजे कुळ होय. अनेक कुळे (Clans) मिळून जमात (Tribes) निर्माण होत असे. प्राचीन समाजात लोकांचे परस्परसंबंध रक्ताच्या नात्यावर आधारित होते. व्यक्तीची निष्ठा, कर्तव्ये आणि अधिकार हे सर्व रक्तसंबंधांवर अवलंबून असत. जमातीचा (टोळीचा) प्रमुख हा सहसा सर्वात ज्येष्ठ किंवा शक्तिशाली व्यक्ती असे. उदा:, प्राचीन भारतीय आर्य समाज, अरब जमाती आणि आफ्रिकेतील अनेक आदिवासी समूह यांचे संघटन रक्तसंबंधांच्या आधारे झाले होते.

सर हेन्री मेन यांनी राज्यनिर्मितीत रक्तसंबंधांचे आणि पितृसत्ताक कुटुंबाचे महत्त्व अधोरेखित केले. रक्तसंबंधामुळे कुटुंबातील लोकात समान हेतू व एकात्मतेची भावना आढळते. कुटुंबात पितृसत्ताक व्यवस्थेमध्ये पित्याची तर मातृसत्ताक व्यवस्थेमध्ये मातेची सत्ता सर्वावर चालते. यातून आज्ञापालनाची सवय होते. सत्ता गाजवणे, आज्ञापालन, ऐक्य भावना, संरक्षण इत्यादी गोष्टी राज्यसंस्थेत आढळतात. तेव्हा कुटुंबातून कुळे व कुळातून टोळ्या निर्माण झाल्या. टोळ्यामधून गणराज्य निर्माण झाली आणि राज्यसंस्थेचा विकास झाला. सर हेन्री मेन यांनी राज्यनिर्मितीच्या सुरुवातीच्या टप्प्यात रक्तसंबंध हा सर्वात महत्त्वाचा घटक असल्याचे प्रतिपादन केले आहे. मात्र, आधुनिक राज्य केवळ रक्तसंबंधांवर आधारित नसते. आज विविध जाती, धर्म आणि भाषांचे लोक एकाच राज्यात राहतात.

३) धर्म (Religion)**:**

प्राचीन काळापासून सर्वत्र धर्माचा प्रभाव समाजावर दिसतो. राज्यनिर्मितीत धर्म या घटकाचीही भूमिका महत्त्वाची आहे. प्राचीन काळात धर्म हा सामाजिक आणि राजकीय जीवनाचा केंद्रबिंदू होता. लोकांना एकत्र ठेवण्याचे आणि त्यांच्यामध्ये शिस्त निर्माण करण्याचे कार्य धर्म करीत असे. प्राचीन काळी मानवाचा निसर्गावर विश्वास नव्हता, त्यामुळे तो निसर्गशक्तींना घाबरत असे. या भीतीपोटी त्याने धर्माचा आधार घेतला. धर्म आणि रक्तसंबंध हे एकत्र आल्यामुळे टोळ्या अधिक संघटित झाल्या. धार्मिक विधी, पूजाअर्चा आणि समान श्रद्धा यांनी लोकांमध्ये एकतेची भावना निर्माण केली. धर्माचा प्रमुख पुरोहित किंवा धर्मगुरू हाच समाजाचा पहिला शासक बनला.

समाज नियंत्रणासाठी धार्मिक श्रद्धा, रितीरिवाज, आचारविचार, रूढी, प्रथा, परंपरा उपयुक्त ठरल्या. यामुळे समाजात धार्मिक ऐक्याची, एकात्मतेची भावना वाढीस लागली. धार्मिक श्रद्धांमुळे लोकांमध्ये

एकात्मता निर्माण झाली. धार्मिक प्रमुखांना अर्थात पुरोहित व धर्मगुरूंना समाजात मोठा मान मिळत असे. अनेक वेळा धर्मगुरूंकडून राजसत्तेला धार्मिक मान्यता दिली जात असे. त्यामुळे राजकीय सत्तेची स्थिरता वाढत असे. यातूनच राज्याला 'पवित्रतेचे' अधिष्ठान प्राप्त झाले. पुढील काळात पुरोहित व धर्मगुरूंनी राजाची भूमिका स्वीकारली. राजा व राज्य यांना दैवी शक्तीचा आविष्कार मानले जाऊ लागले. त्यामुळे राजा व राज्यसंस्थेच्या आज्ञेला महत्व प्राप्त झाले. अशाप्रकारे धर्माने समाजात नैतिकता, शिस्त आणि सामूहिक भावना निर्माण केली. त्यामुळे मोठ्या समाजाचे संघटन शक्य झाले आणि राज्यनिर्मितीची प्रक्रिया सुलभ झाली.

४) आर्थिक घटक (Economic Factors)**:**

मानवी समाजाच्या विकासामध्ये आर्थिक घटकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.जेव्हा मानवाच्या मूलभूत गरजा (अन्न, वस्त्र, निवारा) पूर्ण होऊ लागल्या, तेव्हा त्याने शेती आणि पशुपालनाकडे लक्ष दिले. शेतीसाठी स्थिर राहणे आवश्यक होते, ज्यातून 'खाजगी मालमत्तेची' संकल्पना उदयास आली. शेती, पशुपालन, हस्तकला आणि व्यापार यांच्या विकासामुळे लोकांचे जीवन अधिक स्थिर झाले. एका टोळीने दुसऱ्या टोळीशी व्यापार सुरू केला. आर्थिक व्यवहार वाढू लागल्यावर मालमत्तेचे संरक्षण, करव्यवस्था, व्यापाराचे नियमन आणि वादांचे निराकरण करण्यासाठी संघटित सत्तेची आवश्यकता निर्माण झाली. या गरजेतून राज्यसंस्था विकसित झाल्या. उदा: नदीखोऱ्यांमध्ये विकसित झालेल्या प्राचीन संस्कृतींमध्ये शेती आणि व्यापाराच्या व्यवस्थापनासाठी प्रशासन निर्माण झाले. मेसोपोटेमिया, इजिप्त आणि सिंधू संस्कृतीमध्ये आर्थिक विकासाबरोबर राज्यसंस्थेचाही विकास झाला.

५) युद्ध किंवा शक्ती (War or Force)**:**

युद्ध किंवा शक्ती (बळ, बल) हा राज्य निर्मितीतील एक निर्णायक घटक आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंत जगात अनेक युद्धे, महायुद्धे झाली. त्यांचा कमी-अधिक प्रमाणात परिणाम राज्यांच्या अस्तित्वावर व विकासावर झाला आहे. इतिहासात युद्ध आणि शक्ती(बल) यांचीही महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. 'बळी तो कान पिळी' या न्यायानुसार, शक्तीचा (Force) वापर करून अनेक वेळा बलवान जमातींनी (Tribes) (टोळ्यांनी) दुर्बल जमातींवर विजय मिळवून मोठी राजकीय संघटना निर्माण केली. युद्धामुळे विविध लहान समूह (टोळ्या) एकत्र आले. युद्धामुळे टोळ्यांचे एकत्रीकरण झाले व गणराज्य निर्माण झाली. सुरुवातीला टोळीत असणारे संघर्ष पुढे गणराज्यात होऊ लागले. गणराज्यातून राज्य निर्माण झाली. ही राज्य विविध धर्म, रक्तसंबंधाची असल्याने राज्याराज्यात भिन्न हितसंबंधांसाठी युद्ध, संघर्ष होऊ लागले. राज्यांच्या संरक्षणाची गरज वाढल्यामुळे मजबूत नेतृत्व निर्माण झाले. सैन्य संघटनांमुळे राजकीय सत्ता अधिक केंद्रीकृत झाली. उदा: प्राचीन रोमन साम्राज्य, मंगोल साम्राज्य आणि अनेक मध्ययुगीन राज्यांचा विस्तार युद्धाच्या किंवा बलाच्या माध्यमातून झाला. भारतातही विविध राजवंशांनी विजय मोहिमांद्वारे मोठी राज्ये निर्माण केली. उदा: भारतीय इतिहासातील मौर्य, गुप्त, चोल, मुघल आणि मराठा साम्राज्ये याची प्रमुख उदाहरणे मानली जातात. शक्ती हा राज्यनिर्मितीचा एकमेव घटक नसला तरी राज्याच्या विस्तारात आणि संघटनात त्याचे योगदान नाकारता येत नाही. मात्र, केवळ शक्तीवर आधारित राज्य दीर्घकाळ टिकू शकत नाही. त्यासाठी लोकांची निष्ठा, प्रशासन आणि वैधता आवश्यक असते.

६) राजकीय जाणीव जागृती (Political Consciousness)**:**

मानवी सहज प्रवृत्ती, रक्तसंबंध, धर्म, आर्थिक घटक अथवा व्यवसाय, युद्ध किंवा शक्ती यासारख्या वरील सर्व घटकांमुळे जेव्हा समाज संघटित झाला, तेव्हा मानवत 'राजकीय जागृती' निर्माण झाली. एका निश्चित अशा भूप्रदेशावर व्यक्ती कायम वस्ती करून राहिल्यानंतर इतर व्यक्तींची संपत्ती, वस्तू इतरांनी

कोणीही हस्तगत करू नये अशी स्वभाविक इच्छा होती. त्यासाठी नियमांची व कायद्यांची आवश्यकता भासू लागली. हे राजकीय जाणीव किंवा राजकीय जागरूकता निर्माण होण्याचे मूळ होते. संघटित झाल्यानंतर आपल्याला केवळ जगण्यासाठी नाही, तर 'चांगले जीवन जगण्यासाठी'(To live well) राज्याची गरज आहे, हे मानवाला उमजले. राजकीय जागृती म्हणजे आपल्या हक्क आणि कर्तव्यांची जाणीव होणे. जेव्हा समाजाने स्वतःहून नियमांचे पालन करून न्याय व्यवस्थेची मागणी केली, तेव्हा खऱ्या अर्थाने राज्याचा उदय झाला. ही जाणीवच राज्याला केवळ एक संघटना न ठेवता एक 'राजकीय संस्था' बनवते.

गीलक्राईस्टच्या मते, 'राज्यनिर्मितीच्या तत्त्वांमध्ये रक्तसंबंध, धर्म आणि राजकीय चेतना ही सर्वात प्रमुख तत्व आहेत.' तर ब्लंटशली यांच्या मते, 'मनुष्यात सामाजिक जीवनाची इच्छा ही राजनिर्मितीचे कारण बनते.' अशाप्रकारे या तत्त्वांच्या समन्वयातून राज्याची उत्पत्ती (निर्मिती) झाली आहे.

प्रा. गार्नर यांनी स्पष्ट केले आहे की, 'यामधील कोणत्याही एका तत्त्वाच्या (घटकाच्या) कारणामुळे राज्याचा उदय झाला नाही, तर सर्वांच्या सामूहिक कार्याच्या परिणामस्वरूप राज्य अस्तित्वात आले आहे.'

राजकीय जागृती हा राज्यनिर्मितीचा सर्वात प्रगत टप्पा मानला जातो. समाजातील लोकांना सामूहिक हित, सार्वजनिक व्यवस्था आणि शासनाची आवश्यकता यांची जाणीव होऊ लागते.लोकांमध्ये अधिकार, कर्तव्ये, न्याय, कायदा आणि शासन यांविषयी जागरूकता निर्माण होते. या जागृतीमुळे अधिक संघटित आणि उत्तरदायी राजकीय व्यवस्था विकसित होते.

अशाप्रकारे वरीलप्रमाणे राज्याच्या उत्पत्तीच्या/उदयाच्या उत्क्रांतीवादी सिद्धांताचा अभ्यास केल्यानंतर असे म्हणता येईल की, राज्याचा विकास, उदय होताना रक्तसंबंध, धर्म, आर्थिक घटक अथवा व्यवसाय, युद्ध व शक्ती, राजकीय जाणीव जागृती इत्यादी घटकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

सारांश:

वरील विवेचनावरून असे म्हणता येईल की, उत्क्रांतीवादी किंवा ऐतिहासिक सिद्धांत हा सर्व सिद्धांतांमध्ये सर्वश्रेष्ठ ठरतो, कारण तो कोणत्याही कल्पनेवर आधारित नसून मानवी संस्कृतीच्या वास्तववादी अभ्यासावर आधारित आहे. राज्याच्या निर्मितीत केवळ शक्ती /बल (शक्ती सिद्धांत) किंवा केवळ धर्म (दैवी सिद्धांत) जबाबदार नसून, या सर्व घटकांचा मिलाफ असल्याचे हा सिद्धांत स्पष्ट करतो. हे एक सेंद्रिय (Organic) उत्क्रांतीचे मॉडेल आहे.थोडक्यात, राज्य हे मानवी उत्क्रांतीचे सर्वोच्च शिखर आहे. रक्तसंबंधांनी समाजाला जोडले, धर्माने शिस्त लावली, युद्धाने सीमा ठरवल्या आणि आर्थिक गरजांनी प्रशासन निर्माण केले. या सर्व प्रक्रियेतून आजचे आधुनिक 'सार्वभौम राज्य' अस्तित्वात आले आहे. राज्य ही मानवी बुद्धिमत्ता आणि सामाजिक गरजा यांची एक उत्कृष्ट निर्मिती आहे, जी आजही काळानुसार स्वतःमध्ये बदल घडवून आणत आहे.

राज्याच्या उत्पत्तीच्या उत्क्रांतीवादी सिद्धांताचे मूल्यमापन:

या सिद्धांतात काही गुण आणि काही दोषही आढळून येतात.

अ) उत्क्रांतीवादी सिद्धांताचे गुण (Merits):

१) वास्तववादी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन:

उत्क्रांतीवादी सिद्धांत इतिहास, समाजशास्त्र आणि मानववंशशास्त्राच्या आधारावर मांडलेला आहे. उत्क्रांतीवादी सिद्धांत राज्याच्या उत्पत्तीचे स्पष्टीकरण ऐतिहासिक घटनांच्या आधारे करतो. तो दैवी शक्ती किंवा काल्पनिक करारांवर अवलंबून राहत नाही. उदा: प्राचीन भारतातील जनपदे (लहान प्रादेशिक राज्य) आणि महाजनपदे (मोठी संघटीत राज्ये) ही सामाजिक व राजकीय उत्क्रांतीची फलश्रुती होती. त्यामुळे हा सिद्धांत अधिक तर्कसंगत आणि वैज्ञानिक मानला जातो.

२) राज्यनिर्मितीत अनेक घटकांचा समन्वय:

उत्क्रांतीवादी सिद्धांत राज्यनिर्मितीसाठी एकाच घटकाला जबाबदार न धरता विविध घटकांचा विचार करतो. मानवी सहज प्रवृत्ती, कुटुंब, रक्तसंबंध, धर्म, युद्ध, अर्थव्यवस्था, परंपरा आणि राजकीय जागृती यांचे योगदान तो मान्य करतो.

३) राज्याच्या क्रमिक विकासाचे योग्य स्पष्टीकरण:

राज्य एका दिवसात निर्माण झाले नाही, तर त्याचा विकास टप्प्याटप्प्याने झाला हे या सिद्धांताचे महत्त्वाचे योगदान आहे. सुरुवातीला कुटुंब, नंतर कुल, जमात, गाव, नगर आणि पुढे राज्य अशी प्रगती झाली. उदा: आर्य समाजातील कुटुंबापासून जनपद (लहान प्रादेशिक राज्य) आणि नंतर मोठ्या राज्यांची निर्मिती झाली. त्यामुळे राज्याच्या ऐतिहासिक विकासाची सुसंगत मांडणी या सिद्धांतात आढळते.

४) सामाजिक विकासाचे सातत्य:

मानवी समाज सुरुवातीला भटक्या अवस्थेत होता, त्यानंतर तो स्थिर झाला आणि शेतीचा शोध लागला. या सिद्धांतानुसार, जसजसा मानवी समाज गुंतागुंतीचा होत गेला, तसतशी सामाजिक सुव्यवस्था राखण्यासाठी राजकीय संरचनेची गरज भासली. हा सिद्धांत सामाजिक परिवर्तनाशी सुसंगत आहे. हा सिद्धांत वास्तववादी स्पष्टीकरण देऊन राज्यनिर्मितीची प्रक्रिया प्रत्यक्ष सामाजिक विकासाशी जोडतो.

५) आधुनिक राज्यांच्या निर्मितीचे स्पष्टीकरण:

आधुनिक राष्ट्र-राज्यांच्या विकासाचे स्पष्टीकरण देण्यासाठी हा सिद्धांत उपयुक्त ठरतो. उदा: जर्मनी आणि इटली या देशांचे एकीकरण भाषा, संस्कृती, आर्थिक हितसंबंध आणि राजकीय चळवळींच्या परिणामातून झाले. त्यामुळे राज्यनिर्मितीची ऐतिहासिक प्रक्रिया समजून घेण्यास मदत होते.

ब) उत्क्रांतीवादी सिद्धांताचे दोष (Demerits):

१) राज्याच्या उत्पत्तीचा निश्चित कालावधीत (कालखंड) सांगत नाही:

उत्क्रांतीवादी सिद्धांत राज्य कसे विकसित झाले हे सांगतो; परंतु राज्याची निर्मिती नेमकी कधी झाली हे स्पष्ट करत नाही. उदाहरणार्थ, प्राचीन भारतात जमातीपासून (टोळी पासून) राज्यात संक्रमण नेमके

कोणत्या कालखंडात पूर्ण झाले याबाबत मतभेद आहेत. त्यामुळे राज्याच्या प्रारंभाचा निश्चित कालावधी (कालखंड) किवा टप्पा सांगण्यात हा सिद्धांत अपुरा पडतो.

२) सर्व राज्यांच्या उत्पत्तीचे स्पष्टीकरण देत नाही:

जगातील सर्व राज्यांचा विकास एकाच पद्धतीने झालेला नाही. काही राज्ये विजय, युद्ध किंवा वसाहतवादामुळे (उदा. भारत-पाकिस्तान) निर्माण झाली आहेत. उदाहरणार्थ, अनेक आफ्रिकी आणि आशियाई देशांच्या आधुनिक सीमा युरोपीय वसाहतवादी सत्तांनी आखल्या. उदा: भारत-पाकिस्तान सीमा, भारत - चीन सीमा या ब्रिटिश वसाहतवादी शासकानी आखल्या आहेत. त्यामुळे उत्क्रांतीवादी सिद्धांत सर्व राज्यांना समानपणे लागू होत नाही.

३) राज्य विकासाचा वेग सर्वत्र सारखा नाही:

जगातील विविध भागात राज्याच्या विकासाची गती वेगळी होती. काही ठिकाणी राज्ये लवकर उदयास आली, तर काही ठिकाणी खूप उशिरा. हा सिद्धांत एकसमान विकासाचा विचार करतो, परंतु प्रत्यक्षात भौगोलिक आणि सांस्कृतिक परिस्थितीनुसार राज्याच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेत मोठा फरक दिसून येतो, जो पूर्णपणे स्पष्ट होत नाही.

३) कोणता घटक सर्वात महत्त्वाचा हे स्पष्ट करत नाही:

राज्यनिर्मितीत धर्म, युद्ध, अर्थव्यवस्था, रक्तसंबंध आणि परंपरा, राजकीय जागृती यांचा सहभाग मान्य केला जातो; परंतु यांपैकी सर्वाधिक प्रभावी घटक कोणता हे स्पष्ट होत नाही. उदाहरणार्थ, प्राचीन इजिप्तमध्ये धर्म महत्त्वाचा होता, तर रोमन साम्राज्यात लष्करी शक्ती अधिक महत्त्वाची होती. त्यामुळे हा सिद्धांत काहीसा संदिग्ध वाटतो.

४) काही निष्कर्ष अनुमानांवर(तर्कावर) आधारित आहेत:

प्राचीन आदिम समाजाविषयी पुरेशा ऐतिहासिक नोंदी उपलब्ध नसल्याने काही निष्कर्ष अनुमानावर आणि तर्कावर अधारित आहेत. उदाहरणार्थ, आफ्रिका व आशिया खंडातील हजारो वर्षांपूर्वीच्या जमातींच्या राजकीय संघटनांबाबत संपूर्ण माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे सिद्धांतातील काही मते निश्चितपणे सिद्ध करता येत नाहीत.

५) व्यक्तीच्या योगदानाकडे दुर्लक्ष:

उत्क्रांतीवादी सिद्धांत सामाजिक शक्तींवर भर देतो; परंतु महान नेते आणि शासकांच्या योगदानाला कमी महत्त्व देतो. उदाहरणार्थ, ओटो व्हॉन बिस्मार्क (Otto von Bismarck) यांनी जर्मनीच्या एकीकरणात महत्त्वाची भूमिका बजावली, तर ज्युसेप्पे गॅरिबाल्डी (Giuseppe Garibaldi) यांनी इटलीच्या एकीकरणासाठी क्रांतिकारी चळवळ उभारून मोठे योगदान दिले. अशा व्यक्तींची भूमिका या सिद्धांतात पुरेशी स्पष्ट होत नाही.

६) अत्यंत व्यापक आणि अस्पष्ट सिद्धांत:

राज्यनिर्मितीसाठी अनेक घटकांचा समावेश केल्यामुळे हा सिद्धांत अतिशय व्यापक बनतो. त्यामुळे राज्याच्या निर्मितीचे नेमके कारण निश्चित करणे कठीण जाते. उदाहरणार्थ, काही समाजांमध्ये रक्तसंबंध व

धर्म प्रमुख घटक होता तर काही ठिकाणी आर्थिक गरजा महत्त्वाच्या होत्या. त्यामुळे सिद्धांताची निश्चितता कमी होते.

७) युद्धाच्या भूमिकेचे अपुरे स्पष्टीकरण:

अनेक राज्यांची निर्मिती युद्ध आणि विजयातून झाली आहे; परंतु उत्क्रांतीवादी सिद्धांत युद्धाला केवळ एक घटक मानतो. उदाहरणार्थ, मंगोलांच्या युद्ध विजयांच्या मोहिमा किंवा मंगोलांची विजय मोहीम यांच्या माध्यमातून विशाल साम्राज्याची निर्मिती झाली. अशा घटनांमध्ये युद्धाचे निर्णायक महत्त्व दिसून येते, जे या सिद्धांतात पुरेसे अधोरेखित होत नाही.

८) आधुनिक क्रांतीजन्य राज्यांचे स्पष्टीकरण मर्यादित:

काही आधुनिक राज्यांची निर्मिती क्रांती आणि राष्ट्रवादी चळवळींमधून झाली. उदाहरणार्थ, फ्रान्सच्या राज्यक्रांती नंतर आधुनिक राष्ट्रवादाला चालना मिळाली. तर इस्राईल या देशाची निर्मिती प्रखर राष्ट्रवादी चळवळी मधून झाली.अशा वेगवान राजकीय परिवर्तनांचे स्पष्टीकरण उत्क्रांतीवादी सिद्धांत पूर्णपणे देऊ शकत नाही, कारण तो प्रामुख्याने क्रमिक विकासावर भर देतो.

निष्कर्ष:

उत्क्रांतीवादी किंवा ऐतिहासिक सिद्धांत हा राज्याच्या उत्पत्तीचे सर्वात संतुलित स्पष्टीकरण देणारा सिद्धांत आहे. उत्क्रांतीवादी किंवा ऐतिहासिक सिद्धांत हा राज्याच्या उत्पत्तीचा सर्वाधिक स्वीकारार्ह आणि वैज्ञानिक सिद्धांत मानला जातो. या सिद्धांतानुसार, राज्य ही देवाची निर्मिती नसून किंवा केवळ बळाचा वापर करून निर्माण झालेली संस्था नसून, ती मानवी इतिहासातील अनेक शतकांच्या प्रक्रियेतून, टप्प्याटप्प्याने विकसित झालेली एक नैसर्गिक संस्था आहे. कुटुंब, रक्तसंबंध, धर्म, प्रथा, आर्थिक गरजा, युद्ध व शक्ती (बळ), संरक्षणाची आवश्यकता, भौगोलिक परिस्थिती, आणि राजकीय जाणीव,राजकीय संघटन यांसारख्या विविध घटकांच्या संयुक्त परिणामातून, परस्परसंवादातून राज्याचा विकास झाला. हे उत्क्रांतीवादी सिद्धांत प्रभावीपणे स्पष्ट करतो. म्हणूनच राज्य हे मानवी सभ्यतेच्या (Civilization) उत्क्रांतीचे सर्वोच्च राजकीय रूप मानले जाते. परंतु, राज्याच्या उत्पत्तीचा निश्चित कालावधी सांगण्यात, सर्व राज्यांना समानपणे लागू करण्यात आणि विविध घटकांचे सापेक्ष महत्त्व निश्चित करण्यात हा सिद्धांत काही प्रमाणात मर्यादित ठरतो. तरीही आधुनिक काळात राज्याच्या उत्पत्तीचे सर्वसमावेशक आणि वास्तववादी स्पष्टीकरण देणारा सिद्धांत म्हणून उत्क्रांतीवादी (ऐतिहासिक) सिद्धांताला राज्यशास्त्रात महत्त्वाचे स्थान प्राप्त आहे. जरी या सिद्धांतात काही ऐतिहासिक पुराव्यांची कमतरता असली, तरी तो मानवी प्रगतीचा नैसर्गिक मार्ग अधोरेखित करतो. राज्य ही एक जिवंत आणि बदलणारी संस्था आहे, हे या सिद्धांताने अधोरेखित केल्यामुळे आजही त्याचे महत्त्व कायम आहे.

स्वयं-अध्ययन प्रश्न: ५

प्रश्न १) : योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा.

१. राज्याच्या उत्पत्तीचा उत्क्रांतीवादी सिद्धांत अन्य कोणत्या नावाने ओळखला जातो?

अ) दैवी सिद्धांत — ब) ऐतिहासिक सिद्धांत

क) शक्ती सिद्धांत — ड) सामाजिक करार सिद्धांत

२. उत्क्रांतीवादी सिद्धांतानुसार राज्याची निर्मिती कशी झाली?

अ) ईश्वराच्या इच्छेने — ब) सामाजिक कराराने

क) क्रमिक सामाजिक विकासातून — ड) एका युद्धातून

३. Man is by nature a social and political animal हे विधान कोणी केले?

अ) लॉक — ब) रूसो

क) अरिस्टॉटल — ड) हॉब्ज

४. सर हेन्री मेन यांनी राज्यनिर्मितीचा पाया कोणता मानला?

अ) धर्म — ब) युद्ध

क) रक्तसंबंध — ड) अर्थव्यवस्था

५. The State is a growth and not a creation या विधानाचा अर्थ काय?

अ) राज्य अचानक निर्माण झाले

ब) राज्य दैवी शक्तीने निर्माण झाले

क) राज्य क्रमिक विकासातून निर्माण झाले

ड) राज्य करारातून निर्माण झाले

६. खालीलपैकी राज्य उत्क्रांतीचा योग्य क्रम कोणता?

अ) गाव, कुटुंब, राज्य, जमात

ब) कुटुंब, कुळ, जमात, गाव, जनपद, राज्य

क) जमात, राज्य, कुटुंब, गाव

ड) कुळ, राज्य, गाव, जमात

७. Societal Evolution हा ग्रंथ कोणी लिहिला?

अ) गार्नर — ब) बर्गेस

क) अल्बर्ट गॅलोवे केलर — ड) मॅकआयव्हर

८. उत्क्रांतीवादी सिद्धांतानुसार राज्यनिर्मितीतील पहिला महत्त्वाचा घटक कोणता?

अ) धर्म — ब) रक्तसंबंध

क) मानवी सहज प्रवृत्ती — ड) युद्ध

९. प्राचीन इजिप्तमध्ये कोणाला देवतुल्य मानले जात होते?

अ) सम्राट अशोक — ब) फराओ (Pharaoh)

क) सीझर — ड) अकबर

१०. राज्यनिर्मितीमध्ये आर्थिक घटकांचा संबंध कशाशी आहे?

अ) शेती, व्यापार व मालमत्ता संरक्षण — ब) धार्मिक विधी

क) रक्तसंबंध — ड) राजकीय पक्ष

११. उत्क्रांतीवादी सिद्धांताचा सर्वात मोठा गुण कोणता?

अ) काल्पनिक स्वरूप — ब) दैवी आधार

क) वैज्ञानिक व वास्तववादी दृष्टिकोन — ड) एकाच घटकावर भर

१२. राज्यनिर्मितीमध्ये युद्ध व शक्तीची भूमिका कोणत्या उदाहरणातून स्पष्ट होते?

अ) फ्रेंच राज्यक्रांती — ब) मंगोल साम्राज्य

क) संयुक्त राष्ट्रसंघ — ड) लोकसभा

१३. राज्य इतिहासाची निर्मिती आहे असे कोणी म्हटले?

अ) बर्गेस — ब) हॉब्ज

क) लॉक — ड) रूसो

१४. उत्क्रांतीवादी सिद्धांताचा प्रमुख दोष कोणता?

अ) इतिहासाचा आधार घेतो

ब) राज्याचा निश्चित प्रारंभकाल सांगत नाही

क) वैज्ञानिक आहे

ड) अनेक घटकांचा विचार करतो

१५. आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये कोणत्या घटकाची महत्त्वपूर्ण भूमिका होती?

अ) रक्तसंबंध — ब) राजकीय जागृती

क) धर्म — ड) युद्ध

१६. खालीलपैकी उत्क्रांतीवादी सिद्धांताचा विचारवंत कोण?

अ) प्रा. गार्नर ब) हॉब्ज

क) लॉक ड) रूसो

१७. फ्रेडरिक एंजल्स यांच्या मते राज्याची उत्पत्ती कशाशी संबंधित आहे?

अ) दैवी इच्छा ब) सामाजिक करार

क) वर्गसंघर्ष ड) नैतिकता

१८. उत्क्रांतीवादी सिद्धांतानुसार राज्य कोणत्या प्रकारची संस्था आहे?

अ) कृत्रिम संस्था ब) दैवी संस्था

क) नैसर्गिक व उत्क्रांत संस्था ड) तात्पुरती संस्था

१९. मनुष्य हा समाजशील व राजकीय प्राणी आहे ही संकल्पना कोणाशी संबंधित आहे?

अ) अरिस्टॉटल ब) हॉब्ज

क) लॉक ड) मार्क्स

२०. उत्क्रांतीवादी सिद्धांताला सर्वाधिक मान्यता का मिळते?

अ) तो धार्मिक आहे

ब) तो काल्पनिक आहे

क) तो वैज्ञानिक, वास्तववादी व ऐतिहासिक आहे

ड) तो फक्त युद्धावर आधारित आहे

३.३ सारांश (Summary) :

आधुनिक काळात राज्यशास्त्राच्या अभ्यासामध्ये राज्य ही संकल्पना मध्यवर्ती बनली आहे. राजकीय सिद्धांताची चर्चा राज्य नावाच्या शब्दाशिवाय परिपूर्ण होत नाही. खऱ्या अर्थाने राज्य मानवी जीवनाच्या सर्व पैलूंना स्पर्श करते. प्लेटो पासून ते आजपर्यंत अनेक विचारवंतानी अतिशय काळजीपूर्वक राज्याची संकल्पना, प्रकार, भूमिका यावर लक्ष वेधले आहे. राज्य हा राज्यशास्त्र अभ्यासाचा मुख्य केंद्र मानून अनेक विचारवंतांनी राज्याचा अर्थ, व्याख्या सांगितले आहेत. त्याचबरोबर राज्याचे आवश्यक घटक, राज्य संकल्पनेचा विकास कसा झाला ते सांगून राज्याच्या स्वरूपाचे विविध सिद्धांत सांगितलेले आहेत. त्याचबरोबर राज्य म्हणजे काय? राज्याची कामे कोणती? आदर्श राज्य कोणती? या संदर्भात विचार मांडले आहेत. परंतु त्याचबरोबर राज्याची उत्पत्ती कशी झाली. राज्य निर्मिती कोणी, केव्हा व कशी केली याबद्दलची प्रचंड उत्सुकता, कुतूहल नेहमीच सर्वांच्या मनात असते. यासंदर्भात पारंपारिक, मध्ययुगीन व आधुनिक काळातील राज्यशास्त्रात राज्यशास्त्रज्ञानी विचारमंथन करून वेगवेगळे सिद्धांत मांडलेले आहेत.

राज्याच्या उत्पत्ती विषयी राज्यशास्त्राच्या काही विचारवंतांनी कल्पनाशक्तीच्या व तर्कशक्तीच्या आधारावर तर काही विचारवंतानी वास्तववादी व शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करून वास्तवाच्या जवळ जाणारे विचार मांडून राजकीय सिद्धांताची मांडणी केलेली आहे. पारंपारिक राज्यशास्त्रात राज्याच्या उत्पत्तीचे, निर्मितीचे प्रमुख दोन सिद्धांत मांडलेले आहेत. यामध्ये दैवी सिद्धांत व शक्तीसिद्धांत महत्त्वाचे होते. राज्याच्या उत्पत्तीचा दैवी सिद्धांत हा राज्याच्या उत्पत्तीविषयीचा सर्वांत प्राचीन सिद्धांत मानला जातो. या सिद्धांतानुसार राज्य ही मानवनिर्मित संस्था नसून ईश्वरनिर्मित संस्था आहे. दैवी सिद्धांतात 'राजाच्या दैवी अधिकारांचा' (Divine Right of Kings) पुरस्कार केला जातो, ज्यामुळे राजाची सत्ता मर्यादित राहण्याऐवजी निरंकुश बनते. लोकशाही, जनसत्ता आणि मानवी विवेकाला महत्त्व प्राप्त झाल्यानंतर या सिद्धांताचा प्रभाव कमी झाला. आधुनिक लोकशाही युगात हा सिद्धांत पूर्णपणे नाकारला गेला आहे, कारण तो निरंकुश सत्तेचे समर्थन करतो आणि नागरिकांच्या स्वातंत्र्याचा संकोच करतो. 'राज्याची उत्पत्ती शक्तीतून झाली आहे. ज्यामध्ये अधिक शारीरिक बळ होते त्यांनी आपल्या दुबळ्या साथीदारांवर अधिपत्य निर्माण करून राज्याची स्थापना केली होती. म्हणजेच राज्य समाजातील बलवान व्यक्तींनी तयार केले असे बलसिद्धांत म्हणतो. हा सिद्धांत मानसशास्त्रीय संकल्पनेवर आधारलेला आहे.

मध्ययुगीन कालखंडात इंग्लंडमध्ये थॉमस हॉब्स व जॉन लॉकने तर फ्रान्समध्ये जीन जॅक्स रुसोने राज्याच्या उत्पत्तीचा सामाजिक करार सिद्धांत मांडला. हा सिद्धांत राज्याच्या निर्मितीमध्ये मानवी इच्छा आणि कराराला महत्त्वाचे स्थान देतो. सामाजिक करार सिद्धांत राज्याला एक 'मानवनिर्मित संस्था' मानतो. हॉब्जने निरंकुश सत्तेचा पुरस्कार केला, तर लॉकने मर्यादित आणि घटनात्मक सरकारची मांडणी केली, जी लोकशाहीचा पाया बनली. रूसोने सामान्य इच्छेच्या माध्यमातून लोकशाहीत व्यक्तीचे महत्त्व अधोरेखित केले. थोडक्यात, हे तीनही विचारवंत हे मान्य करतात की राज्य हे लोकांच्या सहमतीवर आणि त्यांच्या कल्याणासाठी निर्माण झालेले एक साधन आहे, जी आधुनिक शासनव्यवस्थेची मूळ धारणा आहे.

उत्क्रांतीवादी किंवा ऐतिहासिक सिद्धांतानुसार राज्याची निर्मिती एखाद्या विशिष्ट घटनेमुळे, दैवी शक्तीमुळे किंवा एका करारामुळे झालेली नसून ती दीर्घकालीन ऐतिहासिक प्रक्रियेचा परिणाम आहे. राज्य ही संस्था मानवसमाजाच्या क्रमिक विकासातून निर्माण झाली आहे. कुटुंब, कुल, जमात (टोळी), वंश, समाज आणि राजकीय संघटना अशा विविध टप्प्यांतून राज्याचा विकास झाला. मूळ सामाजिक प्रवृत्ती अथवा सहज मानवी प्रवृत्ती, रक्तसंबंध, धर्म, प्रथा-परंपरा, आर्थिक गरजा, युद्ध, विजय, राजकीय जाणीव जागृती आणि सामाजिक संघटन यांसारख्या अनेक घटकांनी राज्यनिर्मितीत योगदान दिले. या सिद्धांतानुसार राज्य ही एक सजीव आणि सतत विकसित होणारी संस्था आहे. राज्याच्या उत्पत्तीचे वास्तववादी, वैज्ञानिक आणि ऐतिहासिक स्पष्टीकरण देणारा हा सिद्धांत मानला जातो. त्यामुळे आधुनिक राज्यशास्त्रात उत्क्रांतीवादी सिद्धांताला सर्वाधिक मान्यता प्राप्त झालेली आहे.

थोडक्यात; राज्याच्या उत्पत्तीविषयीचे दैवी सिद्धांत, शक्ती सिद्धांत, सामाजिक करार आणि उत्क्रांतीवादी सिद्धांत हे सर्व सिद्धांत राज्याच्या निर्मितीचे वेगवेगळे पैलू स्पष्ट करतात. या सर्व सिद्धांतांच्या अभ्यासातून राज्यसंस्थेची उत्पत्ती, स्वरूप आणि उद्दिष्टे यांविषयी सखोल आकलन प्राप्त होते.

३.४.पारिभाषिक शब्द:

१. **दैवी अधिकार** (Divine Right): राजाला राज्य करण्याचा अधिकार थेट ईश्वराकडून प्राप्त झाला आहे, अशी धारणा.

२. **निरंकुश सत्ता** (Absolute Authority): कोणत्याही नियंत्रणाशिवाय राजाकडे असलेली अमर्याद सत्ता.

३. **राजकीय आज्ञापालन** (Political Obedience): प्रजेने राजाच्या आदेशांचे पालन करणे.

४. **सार्वभौम सत्ता** (Sovereign Power): करारानंतर निर्माण झालेली सर्वोच्च, अविभाज्य आणि अमर्याद राजकीय सत्ता.

५. **लेव्हायथन** (Leviathan): हॉब्जने राज्याचे केलेले रूपकात्मक वर्णन. बलशाली व सर्वशक्तिमान राज्य.

६. **निरंकुश राज्य** (Absolute State): ज्यामध्ये सार्वभौम सत्तेवर कोणतेही घटनात्मक किंवा कायदेशीर बंधन नसते.

७. **नैसर्गिक हक्क** (Natural Rights): जीवन, स्वातंत्र्य आणि मालमत्ता हे मानवाचे जन्मजात हक्क.

८. **नैसर्गिक नियम** (Natural Law): विवेकबुद्धीवर आधारित नैतिक नियम, ज्यांचे पालन सर्वांनी करावे.

९. **विश्वस्त शासन** (Trusteeship Theory): शासन हे जनतेचे विश्वस्त असून जनहितासाठी कार्य करणे त्याचे कर्तव्य आहे.

१०. **नागरी समाज** (Civil Society): सामाजिक करारानंतर राज्याच्या अधीन निर्माण झालेला संघटित व कायदेनिष्ठ समाज.

११. **राजकीय समाज** (Political Society): नागरिकांनी स्थापन केलेली आणि शासनाद्वारे संचालित राजकीय संघटना.

१२. **सामूहिक ईहा** (General Will): संपूर्ण समाजाच्या सर्वसाधारण हिताचे प्रतिनिधित्व करणारी इच्छा.

१३. **लोकसत्ता** (Popular Sovereignty): सार्वभौम सत्ता जनतेमध्ये निहित असते, असे मानणारी संकल्पना.

१४. **सार्वभौमत्व** (Sovereignty): राज्यातील सर्वोच्च व अंतिम सत्ता.

१५. **राजकीय समुदाय** (Political Community) : सामाजिक करारातून निर्माण झालेला संघटित समाज.

१६. **सभ्यता** (Civilization): सभ्यता म्हणजे संघटित, सुसंस्कृत आणि प्रगत मानवी जीवनपद्धती.

१७. **मत्स्यन्याय :** बलवानाकडून दुर्बलांचे शोषण होणारी अराजक अवस्था.

१८. **जनपद :** जनसमूहाचे स्थिर वसतिस्थान व राज्यप्रदेश.

१९. **महाजनपद :** विस्तृत व संघटित प्राचीन राज्य.

२०. **राजकीय जागृती :** राजकीय जागृती म्हणजे आपल्या हक्क आणि कर्तव्यांची जाणीव होणे.

३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे:

स्वयंअध्ययन प्रश्न–१ ची उत्तरे:

१. क) दैवी सिद्धांत, २. ड) ईश्वराने,
३. क) ईश्वराचा, ४. क) धार्मिक कर्तव्य,
५. ब) गिलक्राईस्ट, ६. क) सूर्यदेव,
७. ब) सूर्याचा, ८. ब) स्वर्गपुत्र,
९. क) विष्णू, १०. क) फिल्मर,
११. ब) ॲडम, १२. क) मध्ययुगीन,
१३. ब) राजेशाही, १४. क) बलवानाने दुर्बलावर अत्याचार करणे,
१५. ब) लोकांच्या संरक्षणासाठी, १६. ब) मनू,
१७. क) सामाजिक करारातून, १८. क) काल्पनिक व तर्कहीन आहे,
१९. अ) लोकशाहीविरोधी स्वरूप

स्वयं–अध्ययन प्रश्न –२

१. ब) Leviathan, २. क) इंग्लंड,
३. क) सामाजिक करारातून, ४. ब) स्वार्थी व संघर्षप्रिय,
५. क) संघर्षमय व अराजकपूर्ण, ६. ड) एकाकी, दरिद्री व अल्पजीवी,
७. ब) स्पर्धा, भय व कीर्तीची इच्छा, ८. क) आत्मसंरक्षण व सुरक्षितता,
९. क) सार्वभौम सत्तेकडे, १०. क) निरंकुश व सर्वोच्च,
११. ब) नाही, १२. क) नाही,
१३.क) व्यक्तींच्या जीविताचे संरक्षण करणे, १४. क) निरंकुश राजेशाही,
१५. ब) राज्य, १६. क) इंग्लंडमधील गृहयुद्ध,
१७. क) आत्मसंरक्षणाचा अधिकार, १८. ब) नव्हते,
१९. क) निरंकुश सत्तेला समर्थन, २०. क) थॉमस हॉब्ज

स्वयंअध्ययन प्रश्न –३

१. क) Two Treatises of Civil Government, २.ब) इंग्लंड,
३. क) विवेकी व सामाजिक, ४. क) शांतता व सहकार्याची अवस्था,
५. अ) राज्यपूर्व, ६. ब) जीवन, स्वातंत्र्य, संपत्ती,
७. क) नैसर्गिक, ८. ब) तीन,
९. अ) स्पष्ट कायद्याचा अभाव, १०. ब) नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करण्यासाठी,

११. ब) विश्वस्त संस्था, १२. क) लोकसंमतीवर,

१३. ब) मर्यादित शासन, १४. क) गौरवशाली क्रांती (१६८८),

१५. ब) १६८९, १६. ब) शासन बदलण्याचा,

१७. अ) अमेरिका, १८. क) उदारमतवाद,

१९. क) व्यक्तीला, २०. क) जॉन लॉक

स्वयंअध्ययन प्रश्न –४:

१. क) Social Contract, २. क) १७६२,

३. क) रुसो, ४. क) चांगला,

५. ब) Noble Savage, ६. क) खाजगी मालमत्तेमुळे,

७. क) जनतेमध्ये, ८. क) सामूहिक इच्छा,

९. क) सामूहिक इच्छा, १०. ब) स्वार्थी इच्छा,

११. अ) आदर्श इच्छा, १२. ब) सर्व आदर्श इच्छांची,

१३. क) फ्रेंच राज्यक्रांती, १४. क) फ्रान्स,

१५. ब) आत्मप्रेम व सहानुभूती, १६. क) अंतःकरण,

१७. क) प्रत्यक्ष लोकशाही, १८. क) सामाजिक करारातून,

१९. ब) आदर्श इच्छा, २०. क) बार्कर

स्वयंअध्ययन प्रश्न : ५:

१. ब) ऐतिहासिक सिद्धांत, २.क) क्रमिक सामाजिक विकासातून,

३. क) अरिस्टॉटल, ४.क) रक्तसंबंध,

५. क) राज्य क्रमिक विकासातून निर्माण झाले,

६. ब) कुटुंब, कुळ, जमात, गाव, जनपद, राज्य,

७. क) अल्बर्ट गॅलोवे केलर, ८. क) मानवी सहज प्रवृत्ती,

९. ब) फराओ (Pharaoh), १०. अ) शेती, व्यापार व मालमत्ता संरक्षण,

११. क) वैज्ञानिक व वास्तववादी दृष्टिकोन, १२. ब) मंगोल साम्राज्य,

१३. अ) बर्गेस, १४. ब) राज्याचा निश्चित प्रारंभकाल सांगत नाही,

१५. ब) राजकीय जागृती, १६. अ) प्रा. गार्नर,

१७. क) वर्गसंघर्ष, १८. क) नैसर्गिक व उत्क्रांत संस्था,

१९. अ) अरिस्टॉटल,

२०. क) तो वैज्ञानिक, वास्तववादी व ऐतिहासिक आहे.

३.६. सरावासाठी स्वाध्याय:

अ) टिपा लिहा (Short Notes)

१. राज्याच्या उत्पत्तीच्या दैवी सिद्धांताची संकल्पना.

२. युरोपीय परंपरेतील दैवी सिद्धांताचे स्वरूप.

३. थॉमस हॉब्जच्या मते सामाजिक कराराची प्रक्रिया.

४. थॉमस हॉब्जची सार्वभौमत्वाची संकल्पना.

५. जॉन लॉकने प्रतिपादन केलेले नैसर्गिक हक्क (Natural Rights).

६. जॉन लॉकच्या सामाजिक करार सिद्धांतातील क्रांतीचा अधिकार.

७. रुसोची 'सामूहिक इच्छा' (General Will) संकल्पना.

८. लोकसत्ता (Popular Sovereignty) आणि रुसो.

९. राज्यनिर्मितीत रक्तसंबंधाचे महत्त्व.

१०. राजकीय जागृती आणि राज्यनिर्मिती.

ब) लघुत्तरीय प्रश्न (Short Answer Questions)

१. भारतीय परंपरेतील दैवी सिद्धांताचे स्वरूप स्पष्ट करा.

२. दैवी सिद्धांतानुसार राजाच्या अधिकारांचे स्वरूप स्पष्ट करा.

३. थॉमस हॉब्जच्या सामाजिक करार सिद्धांतानुसार राज्याची निर्मिती कशी झाली?

४. थॉमस हॉब्जच्या सामाजिक करार सिद्धांताचे गुण व दोष स्पष्ट करा.

५. जॉन लॉकचे मानव स्वभावासंबंधी विचार स्पष्ट करा.

६. जॉन लॉकची 'क्रांतीचा अधिकार' ही संकल्पना स्पष्ट करा.

७. रुसोच्या सामाजिक कराराची प्रक्रिया थोडक्यात सांगा.

८. रुसोच्या निसर्गावस्थेतील मानवाचे स्वरूप स्पष्ट करा.

९. उत्क्रांतीवादी सिद्धांतानुसार राज्य निर्मितीस कोणते प्रमुख घटक कारणीभूत ठरतात?

१०. कुटुंब आणि राज्य यांचा संबंध स्पष्ट करा.

क) दीर्घोत्तरी प्रश्न (Long Answer Questions)**:**

१. राज्याच्या उत्पत्तीचा (उदयाचा) दैवी सिद्धांत सविस्तर स्पष्ट करा.

२. राज्याच्या उत्पत्तीच्या दैवी सिद्धांताचे चिकित्सक मूल्यमापन (गुण व दोष) करा.

३. युरोपीय व भारतीय परंपरेतील राज्याच्या उत्पत्तीच्या दैवी सिद्धांताची तुलनात्मक चर्चा करा.

४. राज्याच्या उत्पत्ती संबंधातील थॉमस हॉब्जच्या सामाजिक करार सिद्धांताचे सविस्तर वर्णन करा.

५. थॉमस हॉब्जच्या सामाजिक करार सिद्धांताचे चिकित्सक मूल्यमापन (गुण व दोष) करा.

६. राज्याच्या उत्पत्ती संबंधातील जॉन लॉकच्या सामाजिक करार सिद्धांताचे सविस्तर विवेचन करा.

७. जॉन लॉकच्या सामाजिक करार सिद्धांताचे चिकित्सक मूल्यमापन (गुण-दोषांसह) करा.

८. थॉमस हॉब्ज आणि जॉन लॉक यांच्या सामाजिक करार सिद्धांतांची तुलनात्मक चर्चा करा.

९. जीन जॅक्स रुसोच्या राज्य उत्पत्तीच्या सामाजिक करार सिद्धांताचे सविस्तर वर्णन करा.

१०. रुसोच्या सामाजिक करार सिद्धांताचे चिकित्सक मूल्यमापन (गुण-दोष) करा.

११. हॉब्ज, लॉक आणि रुसो यांच्या सामाजिक करार सिद्धांतांची तुलनात्मक चर्चा करा.

१२. राज्याच्या उत्पत्तीचा उत्क्रांतीवादी (ऐतिहासिक) सिद्धांत सविस्तर स्पष्ट करा.

१३. राज्याच्या उत्पत्तीच्या उत्क्रांतीवादी (ऐतिहासिक) सिद्धांताचे चिकित्सक मूल्यमापन (गुण-दोष) करा.

३.७ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ (References):

१) Kapur A.C., (2014), 'Principles of Political Science', S. Chand Publication, New Delhi.

२) Gaus Garald F., (2000), 'Political Concepts and Political Theories' Westniew Press, Boulder.

३) Johari J. C. 'Political Thought : Ancient and Medieval, and Modern to Recent', S. P. Pvt. Ltd. New Delhi.

४) कपूर अनुपचंद, मिश्र कृष्णकांत, (२००१), 'राजनीति विज्ञान के सिद्धांत,' एस. चांद अँड कंपनी लि., नई दिल्ली.

५) जोहरी जे. सी., (२०१७), 'राजनीति विज्ञान,' एस. बी. पी. डी., नई दिल्ली.

६) अग्रवाल आर. सी., 'राजनीतिशास्त्र के मूल सिद्धांत', एस. चांद अँड कंपनी, नई दिल्ली.

७) जोहरी जे. सी., जोहरी सीमा, (२०१६), 'आधुनिक राजनीति विज्ञान के सिद्धांत' स्टर्लिंग पब्लिशर्स प्रा. लि., नई दिल्ली.

८) वनारसे राजू, कांबळे सत्यपाल, (२०२२), 'राजकीय सिद्धांत आणि संकल्पना', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

९) गाबा ओ. पी. (मुळ लेखक), प्रा. जाधव तुकाराम (मराठी अनुवाद), (२०२६), 'राजनीतिशास्त्र परिचय', के. सागर पब्लिकेशन्स, पुणे.

१०) भार्गव राजू, आचार्य अशोक, (२००८), 'राजकीय सिद्धांताचा परिचय', पीअरसन प्रकाशन, नवी दिल्ली.

❍❍❍

घटक ४

राजकीय सिद्धांतातील संकल्पना
(Concepts in Political Theory)

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

(अ) राजकीय सत्ता (Political Power)

४.२.१ राजकीय सत्ता – अर्थ

४.२.२ राजकीय सत्तेची साधने

४.२.३ राजकीय सत्तेचे प्रकार

४.२.४ राजकीय सत्तेचे सिद्धांत

(अ) मनोविश्लेषणवादी सिद्धांत

(ब) समाजशास्त्रीय सिद्धांत

(क) उदारमतवादी लोकशाही सिद्धांत

(ड) मार्क्सवादी सिद्धांत

(ब) अधिसत्ता (Authority)

४.२.५ अधिसत्ता अर्थ आणि व्याख्या

४.२.६ अधिसत्तेचे प्रकार

(क) अधिमान्यता (Legitimcy)

४.२.७ अधिमान्यता अर्थ आणि व्याख्या

४.२.८ अधिमान्यतेचे आधारभूत घटक

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द

४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

४.० उद्दिष्टे :

राजकीय सिद्धांतातील संकल्पना या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

१) राजकीय सिद्धांतातील संकल्पना अभ्यासता येतील.

२) राजकीय सत्तेचा अर्थ, स्वरूप आणि सिद्धांत समजून घेता येतील.

३) राजकीय सत्तेचे प्रकार समजून घेता येतील.

४) अधिसत्तेचा अर्थ, स्वरूप व प्रकार स्पष्ट करता येतील.

५) अधिमान्यतेचा अर्थ आणि त्याचे आधारभूत स्पष्ट घटक समजून घेता येतील.

४.१ प्रस्तावना :

राज्यशास्त्रातील आधुनिक राजकीय संकल्पना म्हणून राजकीय सत्ता, अधिसत्ता आणि अधिमान्यता या संकल्पनाचा समावेश होतो. प्लेटो, ॲरिस्टॉटल यांच्या काळापासून अनेक विचारवंतांनी राजकीय विश्लेषणात सत्ता ही संकल्पना राज्यशास्त्रीय चिंतनाचा विषय समूजन मांडणी केली. आधुनिक वर्तनवाद्यांनी तर सत्ता या संकल्पनेला संपूर्ण राज्यशास्त्राची गुरूकिल्ली मानली. राजकीय प्रक्रियेतील सत्तेच्या सर्वसाधारण वापरामुळे ती राजकीय जीवनाचा केंद्रबिंदू ठरते, असा विचार डेव्हिल इस्टन, आर. एच. टोणी, लॉसवेल आणि बईन्ड रसेल यांनी मांडली. अपेक्षित परिणाम घडवून आणणारी क्षमता किंवा व्यक्ती यांच्या बळावर अन्य व्यक्तीचे वा समूहाचे आपल्या इच्छेप्रमाणे बदल घडवून आणण्याची क्षमता अशा स्वरूपात सत्तेची मांडणी करण्यात आली. सत्ता ही संकल्पना राज्यशास्त्राची मध्यवर्ती संकल्पना मानली असली तरी तिच्या मर्यादा स्पष्ट होत गेल्या. राजकारणात सत्तेलाच महत्त्व असते, हे समीकरण वस्तुस्थिती व त्यावेळची समिकरणे यामुळे त्यावर मर्यादा आल्या. त्यातून सत्तेला कायदेशीर मान्यता अधिसत्ता ही संकल्पना उदयास आली. सत्तेला अधिमान्यता मिळाली की ती ‘अधिसत्ता’ बनते. लोकांना अधिसत्ता कायदेशीर व श्रेष्ठ वाटते. कायदेशीर समाज परिवर्तनाचे व समाजवर्तनाचे नियंत्रणाचे साधन म्हणून रॉबर्ट डहाल, मॅक्सवेअर, सी. जे. फेडरिक आणि प्रा. लास्की इत्यादी विचारवंतांनी राज्यशास्त्रात मांडली. सत्ताधारकाच्या सत्तेला कायदेशीर मान्यतेबरोबर जनतेची मान्यता असणे आणि सत्तेविषयी जनतेमध्ये औचित्याची, विश्वासाची आणि नैतिक व्यवहाराची भावना निर्माण होणे याला ‘अधिमान्यता’ म्हणतात. लिपसेट यांच्या मते, ‘अधिमान्यता म्हणजे अशी राजकीय व्यवस्था की सर्वार्थाने समाजहिताच्या दृष्टीने योग्य आहे असा विश्वास जनतेत निर्माण करण्याची व टिकवून धरण्याची त्या व्यवस्थेची क्षमता होय. अशा प्रकारे शासन संरचना, कार्यपद्धती, कृती, धोरणे, अधिकारी आणि सत्ताधाऱ्याचे राजकारण या दृष्टीने सत्ता, अधिसत्ता आणि अधिमान्यता या राजकीय संकल्पना महत्त्वाच्या आहेत. या घटकामध्ये आपण या संकल्पनांचा अर्थ, त्याचे स्वरूप, वैशिष्टे आणि प्रकार यांचा अभ्यास करणार आहोत.

४.२ विषय–विवेचन :

अ) राजकीय सत्ता (Political Power) :

४.२.१ राजकीय सत्तेचा अर्थ व व्याख्या :

सत्ता संकल्पना ही राजकीय सिद्धांतामधील सर्वात मध्यवर्ती संकल्पना आहे. सर्वसाधारण सत्ता म्हणजे आपल्या इच्छेप्रमाणे आणि आपल्या पद्धतीने दुसऱ्याचे वर्तन बदलण्याचे सामर्थ्य किंवा क्षमता म्हणजे सत्ता होय. पारंपरिक राज्यशास्त्राचे विचारवंत प्लेटो, अरिस्टॉटलपासून वर्तनवादी दृष्टिकोनाचे डेव्हिड इस्टन लासवेल आणि कप्लान यांच्यापर्यंत सत्ता ही संकल्पना मध्यवर्ती राजकीय संकल्पना म्हणून त्याची मांडणी केली. राजकीय व्यवस्था आणि राजकारणाचा विचार करता सत्ता या घटकाचे त्यामध्ये असणारे (स्थान) महत्त्वपूर्ण स्थान कोणालाही नाकारता येणार नाही. आधुनिक वर्तनवादी विचारवंत डेव्हीड इस्टन, लास्वेल, आलमंड इत्यादी विचारवंतांनी वर्तनवादी दृष्टिकोन राज्यशास्त्राचा सत्तालक्षी दृष्टीकोन विकसित केला. त्यामध्ये सत्ता ही संकल्पना मूळ संकल्पना मानली. अनेक विचारवंतांच्या मते राज्यशास्त्र म्हणजे सत्ताविषयक अभ्यास करणारे शास्त्र होय आणि शासन व्यवस्थेतील राजकारण हे सत्तेभोवती फिरत असते, राजकारण हा राजकीय सत्ता संपादन करण्यासाठीचा खेळ आहे. अशा प्रकारे राज्यशास्त्र म्हणजे सत्तासंबंधाचा अभ्यास करणारे शास्त्र होय, असे गृहीत धरून सत्ता आणि त्याची परिणाम क्षमता या आधारावर 'राजकीय सत्तेची' संकल्पना राज्यशास्त्रात मांडण्यात आली.

राजकीय सिद्धांतामध्ये राजकीय सत्ता ही संकल्पना सर्वात मूळ संकल्पना आहे. प्राचीन राजकीय विचारवंत प्लेटो, ॲरिस्टॉटल, मॅकआयव्हॅली, मार्क्स इत्यादी विचारवंतांबरोबर रॉबर्ट डहाल, बर्नाड रसेल, लासवेल, चार्लस् मेरीयन इत्यादी आधुनिक विचारवंतांनी आधुनिक राजकीय विश्लेषणातसुद्धा 'राजकीय सत्ता' संकल्पनेला मध्यवर्ती स्थान दिले आहे. सत्ता या संकल्पनेत निर्णय निर्धारण आणि निर्णय अंमलबजावणी करण्याचा अधिकार महत्त्वाचा मानला जात असला तरी व्यक्तीच्या वर्तनात अपेक्षित बदल घडवून आणण्याची क्षमता आणि स्वत:च्या इच्छेनुसार इतरांच्या कृतीवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता म्हणून राजकीय सत्ता संकल्पनेला महत्त्वाचे स्थान आहे.

१) **बर्ट्रांड रसेल :** आपल्या इच्छेप्रमाणे इतरांच्या संबंधात परीणाम किंवा बदल घडवून आणण्यासाठी लागणारी क्षमता म्हणजे राजकीय सत्ता होय.

२) **चार्लस मेरियन :** व्यक्तीच्या ठिकाणी असणारी इतरांच्या धोरणावर प्रभाव टाकण्याची क्षमता म्हणजे 'सत्ता' होय.

३) **आर. एच. टोनी :** व्यक्ती किंवा गट जिच्या बळावर अन्य व्यक्तीचे वा गटाचे वर्तन आपल्या इच्छेप्रमाणे बदलून घेवू शकतात, अशी क्षमता होय.

४) **डेव्हीड इस्टन :** एक व्यक्ती वा गट जेंव्हा एखाद्या स्वत:च्या इच्छेनुसार इतरांच्या कृती निर्धारित करतो तेंव्हा त्यांच्यातील संबंध म्हणजे सत्ता होय.

५) **मिचेल :** विशिष्ट समुहात किंवा व्यवस्थेत प्रभुत्व किंवा श्रेष्ठत्व निर्माण करण्यासाठी लागणारी क्षमता म्हणजे राजकीय सत्ता होय.

थोडक्यात, वरील सर्व व्याख्यांचा अभ्यास केला असता सत्ता ही मनुष्यामध्ये अपेक्षित परिणाम घडवून आणणारी, व्यक्तीचे किंवा गटाचे वर्तन आपल्या इच्छेप्रमाणे घडवून आणणारी संकल्पना आहे. राजकीय सत्तेमध्ये मानवी वर्चस्वाला प्राधान्य आहे. व्यक्ती, राजकीय व्यवस्था आणि परिस्थिती यानुसार राजकीय सत्तेचे प्रकटीकरण किंवा अविष्करण होत असले, तरी निर्णय घेण्याची क्षमता व स्वत:च्या इच्छेनुसार व्यक्ती व समूहाच्या वर्तनात बदल घडवून आणणारी आणि नियंत्रण ठेवणारी संकल्पना म्हणजे 'राजकीय सत्ता' होय. व्यक्तीच्या राजकीय निर्णयावर परिणाम घडवून आणण्याची आणि निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची शक्ती अशा शब्दांत सत्तेचा अर्थ राज्यशास्त्र कोषात स्पष्ट केला आहे.

राजकीय सत्तेची वैशिष्टे :

(अ) सत्ता वापरण्यासाठी क्षमता लागते :

व्यक्ती किंवा व्यक्ती समुहावर सत्तेचा वापर करून अपेक्षित परिणाम घडवून आणण्यासाठी क्षमता आवश्यक असते. जी व्यक्ती सत्तेचा वापर करणार आहे, त्या व्यक्तीकडे असलेल्या गोष्टी-साधने पैसे, सामर्थ्य आणि गुण इत्यादी घटकामुळे ती इतरांच्या वर्तनावर नियंत्रण ठेऊ शकते किंवा त्याचे वर्तन आपल्या इच्छेप्रमाणे बदलून घेवू शकते. अशा प्रकारचे सामर्थ्य एका व्यक्तीकडेच असते. त्या क्षमता सामान्य व्यक्तीकडे नसतात. त्यामुळे ज्या व्यक्तीच्या किंवा व्यक्ती समुहाच्या अंगी सत्ता वापरण्याची क्षमता असते, तिच सत्तेचा वापर करू शकते. त्याच्या पाठीमागे सत्तेचे मुलस्रोत आणि अधिबलने असतात. चार्लस मेरियन यांनी आपल्या 'Political Theory' या ग्रंथात सत्तेच्या अविष्करणासाठी व्यक्तीची समाजातील क्षमता महत्त्वाची असते, असे म्हटले आहे. प्रभाव व वैयक्तिक क्षमता यावर सत्तेचे अविष्करण अवलंबून असते, असे त्याचे मत होते.

(ब) सत्ता वर्तनात्मक असते :

सर्वसाधारण सत्ता वर्तन नियंत्रित करणारी आणि आपल्या इच्छेप्रमाणे इतरांचे वर्तन व कृती निर्धारित करणारी असते. त्यामुळे ती व्यक्ती किंवा समूह सत्तेचा वापर करताना दुसऱ्याचे वर्तन आपल्याप्रमाणे बदलण्यास भाग पाडत असते. त्यासाठी ती साम, दाम, दंड, भेद यांचा वापर करते. आपल्याला अपेक्षित सत्ताग्राहकाच्यामध्ये बदल घडवण्यासाठी पाशवी सामर्थ्याचा वापर करू शकते. त्यातून त्याचे सामर्थ्य समाजासमोर येते. थोडक्यात, सत्तेचा मूळ हेतू वर्तन नियंत्रणात्मक असतो.

(क) सत्ता व्यक्तीसापेक्ष, गटसापेक्ष असते :

राजकीय व्यवस्थेमध्ये किंवा समाजात व्यक्ती किंवा व्यक्तीसमूह आपले वर्चस्व, प्रभुत्व निर्माण करून सत्ताधारी बनते तेंव्हा ती व्यक्तीसापेक्ष किंवा गटसापेक्ष असते. व्यक्तीमधील गुण, संपत्ती, चारित्र्य, कार्यक्षमता, ज्ञान आणि निर्णयक्षमता या गोष्टी सत्तेच्या अविष्करणासाठी प्रभावी असतात. त्या सर्व क्षमता सर्व व्यक्तीकडे

असणे शक्य नाही त्यामुळे ज्या व्यक्तीकडे या क्षमता प्रभावी आहेत, तिच व्यक्ती सत्तेचा वापर करू शकते. त्यामुळे सत्ता व्यक्तीसापेक्ष आहे. उदा. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडीत नेहरू, जयप्रकाश नारायण तसेच असे काही बहुसंख्यांक गट असतात त्यांची कायम स्वरूपी राजकीय सतेवर पकड असते. त्यांची क्षमता आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय आणि धार्मिक परिस्थितीतून प्रकट होते व ते राजकीय सत्ता संपादन करण्यात यशस्वी होतात. त्यामुळे सत्ता ही व्यक्तीसापेक्ष बरोबर गटसापेक्ष असते.

(ड) सत्ता प्रसंगविशिष्ट किंवा परिस्थितीसापेक्ष असते :

सामान्यत: सत्ता प्रसंगविशिष्ट किंवा परिस्थितीसापेक्ष असते. एखाद्या व्यक्तीची किंवा व्यक्तिसमूहाची सत्ता वैयक्तिक सामर्थ्याबरोबरच तिची क्षमता किंवा विशिष्ठ प्रसंगाच्या भूमिकेत तपासावी लागते. कारण व्यक्ती सत्ताक्षमता ही विभिन्न प्रसंगात कमी-अधिक असू शकते. त्यामध्ये व्यक्तीचे गुण, पद, प्रतिष्ठा आणि तिची संवेदनशिलता महत्त्वाची असते. एखाद्या पदावर असणारी व्यक्ती पद गेल्यावर सत्तेचा वापर करू शकत नाही. त्यामुळे त्या व्यक्तीचे पद हा महत्त्वाचा घटक सत्तेसाठी मानला जातो. त्यामुळे सत्ता प्रसंगविशिष्ट असते.

(इ) सत्ता नेहमी मर्यादित असते :

व्यक्ती किंवा व्यक्तीसमूह आपल्या सत्ता इतरांच्या वर्तनात बदल करण्यासाठी किंवा त्यांच्या वर्तनावर नियंत्रण करण्यासाठी गाजवत असली तरी ती नेहमीच मर्यादित असते. जी व्यक्ती सत्तेचा वापर करते तिला पद, प्रतिष्ठा, प्रसंग आणि परिस्थिती याची मर्यादा येत असते आणि त्या मर्यादीत राहूनच सत्तेचा वापर करावा लागतो. जर व्यक्तीने किंवा व्यक्तीसमूहाने सत्तेचा अतिरेक केला तर त्यांचे हुकूमशाहीत रूपांतर होते. या प्रवृत्तीविरुद्ध जनप्रवाह तयार होऊन क्रांती होऊ शकते. त्यामुळे प्रत्येक राजकीय सत्तेवर पद-प्रतिष्ठा, कायदा, जनता आणि परिस्थितीची मर्यादा असतेच. त्यामुळे सत्ता ही मर्यादित असते.

सत्तेची साधने (Sources of Powar)

४.२.२ राजकीय सत्तेची पारंपारिक साधने -

१. परंपरा आणि वारसा -

परंपरा व वारसा यातून सत्ता मिळते. म्हणजे सत्तेचा अधिकार वंशपरंपरेने मिळतो. राजा किंवा सम्राट हे 'दैवी अधिकार' किंवा परंपरेच्या आधारे सत्तेत येतात. समाज त्या परंपरेला मान्यता देतो, त्यामुळे सत्तेला वैधता मिळते. उदा. युरोपातील राजेशाही, भारतातील राजघराणी.

२. बलप्रयोग -

सत्तेचा ताबा सैन्य किंवा शक्तीच्या वापराने मिळवला जातो. यात बंड, क्रांती किंवा लष्करी उठाव यांचा समावेश होतो. ही सत्ता 'भीती' आणि 'दडपशाही' वर आधारित असते. उदा. रशियन क्रांती, अनेक आफ्रिकन आणि लॅटिन अमेरिकन देशांतील लष्करी सत्तांतर.

३. धर्म आणि धार्मिक वैधता –

धर्म आणि धार्मिक वैधता यातून सत्ता मिळते. सत्ता ही धार्मिक श्रद्धांवर आधारित असते. शासकाला 'देवाचा प्रतिनिधी' मानले जाते. तर धार्मिक संस्था किंवा धर्मगुरू सत्तेवर प्रभाव टाकत असतात. उदा. इराणमधील धर्माधारित शासन, मध्ययुगीन युरोपमध्ये राज सत्तेवरील चर्चचा प्रभाव.

४. कायदेशीरता आणि परंपरागत संस्था –

पारंपारिक संस्था जसे की पंचायत, सरदार मंडळ ही सत्तेची केंद्रे असतात. लोक या संस्थांना मान्यता देतात, त्यामुळे त्यांना सत्ता मिळत असते. उदा. भारतातील पारंपारिक ग्रामपंचायत व्यवस्था, आदिवासी समाजातील प्रमुखांची सत्ता.

थोडक्यात पारंपारिक साधने ही परंपरा, धर्म, बल आणि व्यक्तिमत्त्व यांवर आधारित असतात. आधुनिक काळात लोकशाही, निवडणुका आणि संविधानिक साधने अधिक महत्त्वाची झाली असली तरी, पारंपारिक साधनांचा प्रभाव अजूनही काही प्रमाणात दिसून येतो.

ब) सत्तेची आधुनिक साधने

आधुनिक काळातील सत्तेची साधने पुढीलप्रमाणे आहेत.

१. राजकीय शक्ती –

राजकीय पक्षः राजकीय पक्ष स्थापन करून किंवा राजकीय पक्षात सहभागी होऊन सत्ता मिळवली जाते. राजकीय पक्ष निवडणुकीद्वारे लोकांचे समर्थन मिळवून सरकारमध्ये स्थान मिळवतो म्हणजे सत्ता प्राप्त करीत असतो.

निवडणूक जिंकणे: लोकसभा, विधानसभा किंवा स्थानिक निवडणुकांमध्ये जिंकून सत्ता मिळवली जाते. लोकशाहीत सत्ता मिळवण्याचा हा सर्वात कायदेशीर आणि प्रमुख मार्ग आहे. निवडणुकीद्वारे लोकांचा पाठिंबा मिळवून सत्ता प्राप्त केली जाते.

आघाडी सरकारः दोन किंवा अधिक राजकीय पक्ष एकत्र येऊन सरकार बनवतात. हे सत्ता मिळविण्याचे एक महत्त्वाचे साधन बनत आहे. विशेषतः अस्थिर राजकीय वातावरणात या मार्गाने सत्ता मिळविली जाते.

विचारधारा व कार्यक्रमः एक स्पष्ट राजकीय विचारधारा आणि लोकोपयोगी कार्यक्रमांची मांडणी करून जनतेला आकर्षित करून सत्ता मिळविली जाते.

नेतृत्व कौशल्यः करिश्माई नेतृत्व, वक्तृत्व आणि लोकांच्या भावना समजून घेण्याची क्षमता, ज्यामुळे लोक नेत्याच्या मागे उभे राहतात. त्यांतून नेतृत्व सत्ता मिळविते.

२. जनतेचे समर्थन –

जनमतः लोकांचा भावनात्मक आणि मानसिक पाठिंबा मिळवून सत्ता मिळविली जाते. आंदोलन, प्रचार आणि सार्वजनिक एकजूट यांद्वारे मोठ्या प्रमाणावर लोकांमध्ये समर्थन निर्माण होऊ शकते. त्यातून सत्ता मिळविली जाते.

जनतेला शिक्षित करणे: योग्य माहिती आणि शिक्षणामुळे लोक आपल्या अधिकारांची जाणीव करून घेतात आणि आपले मत सुस्पष्टपणे व्यक्त करू शकतात, ज्यामुळे सत्ता मिळवणे सोपे होते.

३. आर्थिक शक्ती –

धनसंचय: व्यक्ती किंवा संस्थेचे आर्थिक सामर्थ्य, त्यातून लोकांवर प्रभाव टाकणे. यामुळे निवडणुका जिंकणे किंवा इतर राजकीय व सामाजिक क्रियांवर प्रभाव ठेवता येतो.

व्यवसायातील प्रभाव: मोठे उद्योग आणि कंपन्या सरकारच्या निर्णयांवर प्रभाव टाकूण सत्तेत भागीदारी मिळवीत असतात.

४. सैन्य आणि पोलिस दलांचा वापर –

सैन्यशक्ती: सैनिकांची मदत किंवा सैन्याच्या वापराने सत्ता मिळवली जाते. यामध्ये दहशतवाद, विद्रोह किंवा सैन्य काबीज करण्याची प्रक्रिया असते.

पोलिस व सुरक्षा यंत्रणा: सत्ता मिळविण्यात पोलिस दलांची भूमिका महत्त्वाची असते. जर पोलिस दलाचा प्रभाव अधिक असेल, तर ते लोकांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवून सत्ता मिळवू शकतात.

५. माध्यमांचा प्रभाव –

सोशल मीडिया: माध्यमे विशेषतः सोशल मीडिया सत्ता मिळविण्यासाठी एक शक्तिशाली साधन बनली आहे. यामुळे विचारधारा पसरवणे, प्रचार करणे आणि जनतेच्या मनोवृत्तीस प्रभावित करणे शक्य होते. त्यातून सत्ता मिळविली जाते.

जनप्रवृत्ती निर्माण करणे: लोकांच्या भावना आणि प्रवृत्ती समजून त्यानुसार संदेश देऊन सत्ता मिळविण्याचे काम मीडिया करत असतो.

प्रचार व प्रसारमाध्यमे वर्तमानपत्रे, टीव्ही, सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करून आपल्या विचारांचा प्रसार करणे आणि जनमतावर प्रभाव टाकणे हे देखील आधुनिक काळातील सत्ता प्राप्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे.

६. संविधानिक आणि कायदेशीर साधने –

संविधान व कायद्यांचा वापर: लोकशाही सरकारांमध्ये सत्ता मिळविण्यासाठी व मिळालेली सत्ता टिकवण्यासाठी संविधानिक मार्गाचा वापर केला जातो. विधीमंडळातील कायदे, न्यायालयीन निर्णय आणि राज्यघटनेचा आदर यामुळे सत्ता मिळवणे शक्य होते.

थोडक्यात, अशा विविध मार्गानी सत्ता मिळविता येते. सत्ता मिळविणे हे एक जटिल आणि विविध घटकांवर आधारित असलेली कार्यप्रणाली आहे. तर प्रत्येक साधनाच्या वापराच्या परिणामांनुसार त्याचा प्रभाव वेगवेगळा असू शकतो.

४.२.३ **राजकीय सत्तेचे प्रकार (Types of Political Power) :**

राजकीय सत्ता ही निरनिराळ्या स्वरूपात आढळत असल्यामुळे व त्यासंबंधी विचार अनेक विचारवंतांनी आपापल्या पद्धतीने व दृष्टिकोनातून केला असल्यामुळे सत्तेचे वेगवेगळे प्रकार पाहायला मिळतात. पारंपारिक राज्यशास्त्रापासून ते आधुनिक राजकीय विश्लेषणापर्यंत 'सत्ता' ही राज्यशास्त्रातील मूलभूत संकल्पना म्हणून अभ्यासली जाते. पारंपरिक राज्यशास्त्रातील प्लेटो, ॲरिस्टॉटल इत्यादी विचारवंतांनी राजकीय सत्तेचा साकलिक पद्धतीने अभ्यास करून सत्तेचा संबंध सवयीवर व त्याच्या गुणवैशिष्ट्यांवर अवलंबुन असतो, असा विचार मांडला. वर्तनवादी आणि व्यवस्थावादी विचारवंत चार्लस मेरिअम, हेरॉल्ड, लासवेल, डेव्हीड इस्टन, अब्राहम कप्लान, कॅटलीन इत्यादी विचारवंतांनी आधुनिक राजकीय विश्लेषणात राजकीय सत्तेचा सूक्ष्म पद्धतीने अभ्यास करून सत्तेची संकल्पना मांडली. राजकीय प्रक्रियेचा अर्थच राजकीय सत्तेला आकार देणे, तिचे वितरण करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे, असा होतो अशी भूमिका मांडली. त्यांनी राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा 'सत्तालक्षी दृष्टीकोन' म्हणजे 'पॉवर ॲप्रोच' मांडला. त्यामुळे राजकीय सत्तेचे वेगवेगळे प्रकार आपल्याला पहायला मिळतात. राजकीय सत्तेचे प्रकार पुढीलप्रमाणे –

(अ) क्रेस पायनी यांनी सत्ताधारक व सत्ताग्राहक यांच्यातील प्रत्यक्ष संबंधाच्या आधारे राजकीय सत्तेचे पुढील ६ प्रकार केले आहेत.

१. बलसत्ता, २. अमिष सत्ता,

३. प्रतिक्रियात्मक सत्ता, ४. अडसर सत्ता,

५. आकर्षण सत्ता, ६. अनुनायात्मक सत्ता.

(ब) हॅरॉल्ड लासवेल यांनी मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून निरोगी, समाधानी, नैतिक आणि सामाजिक जीवशास्त्रीय दृष्टिकोनातून 'Power and Personal Insecurity' या ग्रंथात पुढील प्रकार पाडले आहेत.

१. भ्रामक व दिखाऊ राजकीय सत्ता, २. उघड किंवा स्पष्ट राजकीय सत्ता,

३. कायदेशीर किंवा विधिमय राजकीय सत्ता.

(क) बर्ट्रांड रसेल यांनी पुढीलप्रमाणे राजकीय सत्तेचे प्रकार सांगितले आहेत.

१. पारंपरिक राजकीय सत्ता, २. नग्न राजकीय सत्ता,

३. क्रांतिकारक राजकीय सत्ता.

वरील वेगवेगळ्या राजकीय विचारवंतांच्या राजकीय प्रकारांचा अभ्यास केला असता सर्वसाधारण पुढीलप्रमाणे राजकीय सत्तेचे प्रकार पडतात.

१) **पारंपरिक सत्ता :** पारंपरिक सत्ता सवयी, श्रद्धा, संस्कृती, धर्म आणि नैतिकतेवर आधारित असते.

२) **प्रतिकावर आधारित सत्ता :** समाजातील प्रतिके आणि त्यावर आधारित श्रद्धा यावर ही प्रतिक सत्ता अवलंबून असते.

३) **नग्न सत्ता :** नग्न सत्ता ही बळ वा पाशवी शक्ती यावर आधारित असते. यामध्ये बळाचा वापर केला जातो.

४) **क्रांतिकारी सत्ता :** प्रस्थापित सत्तेविरुद्ध किंवा त्यांच्या हुकूमशाही पद्धतीविरुद्ध उठाव क्रांती म्हणून निर्माण झालेली सत्ता होय.

५) **कायदेशीर सत्ता :** राज्यघटना वा राजकीय संकेत यांच्या आधारावर निर्माण झालेली सत्ता म्हणजे कायदेशीर सत्ता होय.

६) **प्रकट किंवा गुप्त सत्ता :** जेंव्हा सत्तेचा वापर प्रकट स्वरूपात होतो, उघडपणे होतो त्याला प्रकट सत्ता म्हणतात. तर जेव्हा अप्रकट किंवा गुप्त स्वरूपात तिचा वापर होतो तेव्हा ती गुप्त सत्ता असते.

७) **दिखाऊ किंवा भ्रामक सत्ता :** जेंव्हा सत्ता स्वत:च्या ताब्यात नसताना किंवा सत्ता आहे पण त्यांचा वापर दिखाव्यासाठी केला जातो तिला दिखाऊ किंवा भ्रामक सत्ता म्हणतात.

८) **आत्मीक सत्ता :** व्यक्ती आपल्या आंतरिक सामर्थ्याच्या आधारावर सत्ता प्राप्त करते तिला आत्मीक सत्ता म्हणतात. यासाठी आत्मक्लेश व आत्मशुद्धी आवश्यक असते.

९) **बलसत्ता :** व्यक्ती किंवा व्यक्ती समूहाच्या विशिष्ट बळाच्या आधारावर सत्ता मिळवली जाते किंवा गाजवली जाते तिला बलसत्ता म्हणतात. उदा. शस्त्रबळ, पैसा, संपत्ती, ज्ञान.

१०) **विचारप्रणालीवर आधारित सत्ता :** विचारप्रणाली हे एक सत्ता मिळवण्याचे प्रभावी साधन आहे. तर्कसंगत तत्वावर आधारित विचारप्रणाली सत्ता प्राप्त करते तेंव्हा तिला विचारप्रणालीवर आधारीत सत्ता म्हटले जाते. उदा. चीन - साम्यवाद.

४.२.४ राजकीय सत्तेचे सिद्धांत (Theories of Political Power) :

(अ) मनोविश्लेषणवादी सिद्धांत (Psycho - Analytial Theory) **:**

मनोविश्लेषणवाद हा मानसशास्त्रातील एक आधुनिक दृष्टिकोन आहे. सिग्मंड फ्राईड (१८५६ ते १९३९) यांना मानसशास्त्रातील मनोविश्लेषणवादी दृष्टिकोनाचा संस्थापक मानला जातो. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धानंतर हा दृष्टिकोन मानसशास्त्रात रूढ झाला. सिग्मंड फ्राईड यांनी मानवी वर्तनाचे स्पष्टीकरण देण्यासाठी अबोध मन किंवा अबोधावस्थेचा अभ्यास करणे गरजेचे आहे, असे त्याचे मत होते. फ्राईडचा असा विश्वास होता की, मनोविश्लेषणात्मक संकल्पनेच्या संचलनाद्वारे घेतलेल्या निर्णयामध्ये सुप्त आणि अबोध प्रेरणा घेण्यासाठी मन जबाबदार असते. माणसाच्या मनामध्ये स्वाभिमान, अहंकार आणि अतिअहंकार हे मानवी मनाचे तीन पैलू आहेत त्यावर व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व अवलंबून आहे. व्यक्ती फक्त स्वत:च्या मनाच्या नाटकातले कलाकार असतात. ते कधी स्वेच्छेने ढकलले जातात किंवा योगायोगाने ओढले जातात. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास हा त्याच्या स्वत:च्या अंतर्गत संघर्षावर अवलंबून असतो. फ्राईडचा असा विश्वास होता की, लोक अबोध प्रेरणा घेऊन जागरूक होवून बरे होऊ शकतात.

मनोविश्लेषणवादी सिद्धांताची मांडणी आणि सर्व मानवी वर्तनाला कवेत घेण्यासाठी त्याची क्षमता या दोन वैशिष्ट्यामुळे फ्राईड हे विसाव्या शतकातील सर्वांत महत्त्वाचे मानसशास्त्रज्ञ मानले जातात. त्यांनी साहित्य, कला, धर्म, पुराणकथा, संस्कृती, सर्वसामान्य वर्तन या सर्व प्रश्नावर प्रकाश टाकला. मानवी मनाची बैठक ईश्वरनिरपेक्ष सहजप्रवृत्ती व चैतन्यशक्ती या आधारे मांडून सृष्टीनियमाचा शोध घेण्याची वैज्ञानिक पद्धत मांडली. फ्राईड यांनी 'मन' ही संकल्पना तीन स्तरात मांडली. पहिली मानवी मनाच्या बोधावस्था, दुसरी बोधपूर्वी अवस्था आणि तिसरी अबोधावस्था अशा तीन स्तरात विस्तारलेल्या असतात हा मुख्य सिद्धांत मांडला. ज्या मानसिक घटना आणि भूतकाळातील स्मृती यांची वर्तमानकाळातील व्यक्तीला जाणीव होणे म्हणजे 'बोधस्तर' होय. स्मृती आणि इच्छा याची मानवी मनात जाणीव नसते पण सहजपणे उपलब्ध होऊ शकते, त्याला बोधपूर्वी मन म्हणतात. आणि स्मृती, इच्छा, प्रच्छन प्रेरणा दाबून असतात तो विचार पाशवी व वासनाच्या स्वरूपात मनात भरलेला असतो, त्याला अबोध मन म्हणतात. मनाच्या या प्रकारच्या रचनेमुळे नियंत्रण झुगारून अबोध मन आणि बाह्य वास्तवातील नियमांच्या अंकित असणारे बोध मन यांचे सतत द्वंद्व सुरू असते. असा विचार फ्राईड यांनी मांडला. राजकीय सत्तेची मनोविश्लेषणवादी सिद्धांत मांडताना फ्राईड, वॅटसन, अब्राहम मॅस्लो, कार्ल रॉजर्स पुढीलप्रमाणे सिद्धांत मांडतात.

१. व्यक्तीच्या वर्तनामागे व्यक्तीची सहज प्रेरणा असते.

२. व्यक्तिमत्त्वामध्ये स्व-अहंकार आणि अतिअहंकार किंवा सर्वश्रेष्ठत्व हे तीन मूलभूत घटक असतात.

३. व्यक्तीच्या संवेदन, स्मरण, विचार या क्रियांना सहजप्रेरणेमुळे दिशा मिळते.

४. व्यक्तीमध्ये अहंम असतो त्यामुळे त्याला स्वत:विषयी अतिअभिमान वाटतो. त्यामुळे तो फक्त स्वत:च्या सुखाचाच विचार करत असतो.

५. व्यक्तीला स्वत:च्या हिताच्या पलीकडे काहीही नसते. त्यामुळे स्वत:च्या हितापलीकडे कोणाचा विचार करत नाही.

६. व्यक्तीचे वर्तन अबोध मनाच्या पातळीवरील इच्छा-वासना आणि प्रेरणा याद्वारे नियंत्रित होत असते.

७. व्यक्तीचे वर्तन परिस्थितीच्या प्रभावाने आकारास येते.

८. व्यक्तीच्या वर्तनावर बाह्य जगाविषयी ज्ञान आकलन विचार, स्मरण-संवेदना, माहीती यांचा प्रभाव टाकत असतात.

९. प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या स्वत:विषक्षी आपेक्षा व आकांक्षा असतात त्यानुसार त्यांचे वर्तन नियमित होत असते.

१०. व्यक्तीचे जीवनमान सुधारण्यासाठी व्यक्तीच्या स्व-संकल्पना आणि स्वत्व आदर यांना महत्त्व दिले जाते.

अशा प्रकारे राजकीय सत्तेचा मनोविश्लेषणवादी सिद्धांत मांडला आहे.

मनोविश्लेषणवादी राजकीय सत्तेचा सिद्धांताचे महत्त्व :

आधुनिक राजकीय सत्तेच्या सिद्धांतामध्ये मनोविश्लेषणवादी सिद्धांताचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. सिग्मंड फ्राईड, वॅटसन, कॉर्ल रॉजर्स आणि अब्राहम मास्लो इत्यादी मानसशास्त्रज्ञांनी राजकिय सत्तेचा मनोविश्लेषणवादी सिद्धांताचा पुरस्कार केला. कोणत्याही स्वरूपाची राजकिय व्यवस्था असो त्या व्यवस्थेमध्ये मानवाचे किंवा राजकिय श्रेष्ठीजनांचे महत्त्व अनन्यसाधारण असते. कारण राजकीय सत्तेत मानवाला विविध प्रकारच्या भूमिका पार पाडाव्या लागतात. त्या भूमिका पार पाडत असताना त्या व्यक्तीचा स्वभाव, वर्तन, व्यक्तिमत्त्व आणि कृती महत्त्वाची असते. त्या व्यक्तीच्याच वर्तनावर राजकीय व्यवस्थेचे भवितव्य अवलंबून असते. तसेच सत्ताधारी व्यक्तीच्या वर्तनावरच त्या त्या देशातील राजकीय व्यवस्था आकारास येत असते. उदा. भारत (इंग्लंड) येथे पंडीत नेहरू, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्त्वामुळे लोकशाही व्यवस्था अस्तित्वात आली. याच्या उलट हिटलर, मुसोलिनी यांच्या नेतृत्त्वामुळे जर्मनी व इटली मध्ये हुकूमशाही व्यवस्था अस्तित्वात आली होती. त्यामुळे राजकीय सत्तेच्या मनोविश्लेषणवादी सिद्धांताला महत्त्वाचे स्थान आहे.

(ब) समाजशास्त्रीय सिद्धांत (Sociological Theory) **:**

मानवाच्या सामाजिक संबधाचा आणि सामाजिक घटनांचा पद्धतशीर शास्त्रीय अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे सामाजिक शास्त्र होय. समाजशास्त्राचे जनक ऑगस्ट कॉम्त यांनी सामाजिक संबंध आणि प्रगती यांचे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय, अशी व्याख्या केली आहे. सामान्यत: ऑगस्ट कॉम्त, मॅक्सवेबर, किग्लले, केव्हीस, हंट इत्यादी समाजशास्त्रज्ञांनी समाजशास्त्राच्या व्याख्या स्पष्ट केल्या आहेत. समाजशास्त्र म्हणजे सामाजिक क्रियांचे स्पष्टीकरण करणारे, मानवी सामाजिक जीवनाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणारे शास्त्र आणि मानवी वर्तनातील सहसंबंध शोधणारे शास्त्र होय. अशी संकल्पना सर्व शास्त्रज्ञांनी मांडल्या. थोडक्यात, समाजशास्त्र हे सामाजिक संबंध आणि मानवी संबंधाविषयी ज्ञान मिळवणे या हेतूने समाजशास्त्रज्ञांनी आपले विचार मांडले.

समाजशास्त्रातील सामाजिक वर्तनाचा अभ्यास हा राजकिय सत्तेला प्रभावित करीत असतो, असे मत जॉर्ज मिसेल आणि व्हॉन वीझ यांनी मांडले. त्यांच्या मते, समाजातील विविध समूहाचे वर्तन हे मानवी संबंधाच्या म्हणजे विविध व्यक्ती-व्यक्तीमधील संबंध, त्याचे वर्तन, व्यक्ती-संस्था संबंध, संस्था-संस्था संबंध यावरून घडत असते. तसेच व्यक्तीचे संपूर्ण जीवन समूहावर आणि संस्थावर अवलंबून असते, व्यक्ती समूहाशिवाय असूच शकत नाही, असा सिद्धांत मांडून मानवी समूहाचे आंतरसंबंध स्पष्ट केले. या समाजशास्त्रांनी सत्तेचा संबंध मानवाचे परस्पर संबंध, मानवाचे सामाजिक वर्तन, विभिन्न मानवी समाज, मानवी सामाजिक समूह यांच्या अभ्यासाच्या दृष्टिकोनाने मांडले.

पुढे १९ व्या शतकापासून समाजशास्त्राच्या अभ्यासाला खरी गती मिळाली. ऑगस्त कॉम्त यांनी Positive Philospophy आणि Positive Polity या ग्रंथात, कार्ल मार्क्स यांनी दास कॅपिटल, दि पाव्हटी ऑफ फिलॉसॉफी या ग्रंथात हर्बल स्पेन्सर यांनी आपल्या सेंद्रीय सिद्धांतात, विलफ्रेडो परेटो यांनी 'Mind and Society'

या ग्रंथात राजकीय सत्तेचा समाजशास्त्रीय सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न केला. त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे–

१. संपूर्ण मानवाचे वर्तन हे समूहातून निर्माण होते.

२. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे.

३. नवसमाज निर्मितीसाठी सामाजिक घटना महत्त्वाच्या असतात.

४. मानवी समस्यांचे निराकरण हे समाजशास्त्रातील विज्ञानवाद, बुद्धीप्रमाण्यवाद, स्तरिकरण व विश्लेषण यातून होते.

५. समाजरचनेच्या वर्गव्यवस्थेमुळे त्यांच्यात संघर्ष होऊन समाजाचा आर्थिक विकास होऊ शकतो.

६. समाजावर कुटुंब, धर्म, परंपरा यांचा प्रभाव असतो.

७. मानवाच्या सामाजिक वर्तनावर बाह्य भौतिक परिस्थितीचा सुद्धा प्रभाव पडतो.

८. भाषा, धर्म, कायदा व लोकांचे आर्थिक जीवन राजकीय व्यवस्थेचे भवितव्य ठरवू शकतात.

९. संघर्ष हा समाजजीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. तो सामाजिक वास्तवतेचा घटक असतो.

१०. व्यक्तीच्या आंतरक्रिया या भिन्न हावभावावर किंवा हावभावातून प्रकट होतात.

११. नोकरशाहीचे वर्तन लोकशाही व्यवस्थेच्या विकासासाठी पूरक असते.

१२. परस्परावलंबी घटकांनी युक्त अशी समाजाची समतोल व्यवस्था ही परिवर्तनशील असते.

अशा प्रकारे पॅरोटो, मॅक्स वेबर, जॉन हर्बट मीट, कार्ल मार्क्स, किंग्लजे डेव्हीस, गिन्सवर्ग रॉबर्ट पार्क इत्यादी विचारवंतांनी समाजशास्त्रीय संबंधाच्या दृष्टिकोनातून मानवी वर्तनाचे सिद्धांत मांडले. मानवी वर्तन हे समूहावर अवलंबून असून समतोल समाजव्यवस्था निर्माण करणारे राजकीय श्रेष्ठीजनाचे कार्य आहे, असे मत मांडले. समाजावरच मानवी वर्तन अवलंबून असते, असा सिद्धांत त्यांनी मांडला.

(क) उदारमतवादी लोकशाही सिद्धांत :

व्यक्तीस्वातंत्र्य, व्यक्तीविकास यांची हमी देवून राज्याने व्यक्तीजीवनात कमीतकमी हस्तक्षेप करावा. राज्याची कार्ये फक्त समाजात शांतता व सुव्यवस्था ठेवण्यापुरतेच मर्यादित असावे आणि राज्याने व्यक्ती विकासास जास्तीत जास्त संधी द्यावी, या मुख्य तत्त्वाच्या आधारे आधुनिक राजकीय विश्लेषणात उदारमतवादी लोकशाही सिद्धांत मांडला जातो. लोकशाही हा शासन प्रकार नसून तो सामाजिक व आर्थिक जीवनाचा मार्ग आहे आणि शासन हे त्या मार्गातील साधन आहे. आणि व्यक्ती हा विकासाचा केंद्रबिंदू मानून जॉन लॉक, ॲडम स्मिथ, रिकार्डो, माल्थस, जे. एस. मिल, ऑस्टीन टीचएच ग्रीन इत्यादी विचारवंतांनी उदारमतवादी लोकशाही सिद्धांत मांडला. त्यांनी व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार करून राज्याच्या कार्यक्षेत्राची कक्षा मर्यादित असावी असे मत मांडले.

१७८९ ची फ्रेंच राज्यक्रांती आणि इंग्लंडमधील १६८९ चा बिल ऑफ राईटचा कायदा यांच्या परिणामातून उदारमतवादाचा उदय झाला. जॉन लॉकच्या सामाजिक करारामध्ये सुद्धा उदारमतवादाचे विचार आपल्याला मिळतात. लॉकच्या विचाराचा केंद्रबिंदू हा व्यक्ती असून राज्य हे व्यक्ती विकासाचे साधन आहे, असे विचार मांडले. याचाच विचार पुढे बेंथम आणि मिल यांनी मांडले. बेंथमने अधिकात अधिक सुख या तत्वाच्या आधारे उपयुक्तता वादाचा सिद्धांत मांडला. व्यक्तीने स्वत:चे सुख पहात अधिकात अधिक सुख समाधान मिळवण्यासाठी धडपड करावी, असा विचार मांडला. त्यांच्या मते, राज्य हा व्यक्तीचा गट असून त्याची संघटना व्यक्तीचे जातीस्त जास्त सुख साध्य करण्यासाठी आणि वाढवण्यासाठी निर्माण झालेली आहे. सर्वसामान्य लोकांचे जास्तीत जास्त सुख साधणे, हे राज्यसंस्थेचे उद्दिष्ट असते. ॲडम स्मिथ यांनी आपल्या 'वेल्थ ऑफ नेशन' (Wealth of Nation) या ग्रंथात मुक्त अर्थव्यवस्थेचा सिद्धांत मांडून व्यक्तीस्वातंत्र्य आणि मुक्त व्यापार सिद्धांताचा पुरस्कार केला. व्यक्तीच्या जास्तीत जास्त सुखासाठी आणि राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी राज्याने आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप न करता मुक्त स्पर्धा आणि खाजगी मालकी उद्योगांना प्रोत्साहन द्यावे असे स्मिथचे मत होते. जे. एम. मिल यांनी आपल्या 'On Liberty' या ग्रंथात व्यक्तीच्या विचारस्वातंत्र्य व कृतीस्वातंत्र्याचा पुरस्कार करून राज्याच्या हस्तक्षेपावर टिका केली. व्यक्ती ही शारीरिक व मानसिक दृष्ट्या सार्वभौम असते. त्यामुळे तिला स्वत:ला स्वहितासाठी व तिच्या व्यक्तीमत्त्वाच्या विकासासाठी स्वातंत्र्य दिले पाहिजे, असा विचार प्रकट केला. मिलच्या मते, राज्य ही आवश्यक आपत्ती असून ते समाज कल्याणाचे साधन आहे. बेथम आणि मिलच्या प्रभावाने टी. एच. ग्रीन यानेसुद्धा उदारमतवादाचा पुरस्कार केला. त्याच्या मते, राज्य हे मानवी इच्छेतून निर्माण झाले असून व्यक्तीचा नैतिक विकास साधणे हे राज्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. लोकांना अन्यायी अत्याचारी शासनाचा प्रतिकार करण्याचा अधिकार असावा. लोकांचा प्रतिकार हा बहुमताने होत नसतो तर लोकांचे हित किती प्रमाणात साधले जाईल यावर आधारलेला असतो, असा त्यांनी विचार मांडला. थोडक्यात, उदारमतवादी लोकशाही सिद्धांतामध्ये व्यक्तीस्वातंत्र्य, व्यक्तीविकास, व्यक्तीचे सुख आणि राज्याचे मर्यादित स्वरूप या संकल्पनांचा समावेश आहे. उदारमतवादी लोकशाही सिद्धांताच्या माध्यमातून राजकीय सत्तेचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट होते.

१. कोणतीही राजकीय सत्ता अमर्याद नसते.

२. व्यक्तीला स्वत:च्या विकासासाठी व्यक्ती स्वातंत्र्य आवश्यक असते.

३. व्यक्ती ही शारीरिक व मानसिक दृष्ट्या सार्वभौम असते.

४. शासन हे व्यक्तीविकासाचे साधन आहे.

५. राज्याचे कार्य फक्त समाजात शांतता व सुव्यवस्था ठेवण्यापुरते मर्यादित असावे.

६. राज्याने व्यक्ती विकासास जास्तीत जास्त संधी द्यावी.

७. राज्य हे व्यक्ती विकासाचे साधन आहे आणि व्यक्तीचा नैतिक विकास हे राज्याचे उद्दिष्ट आहे.

८. राज्याने व्यक्तीच्या जास्तीत जास्त सुखासाठी प्रयत्न केला पाहिजे.

९. राज्याने आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप न करता मुक्त स्पर्धा व खाजगी मालकीला प्रोत्साहन द्यावे.

१०. व्यक्तीला मुक्त आर्थिक स्वातंत्र्य आवश्यक आहे.

११. व्यक्तीला विकासासाठी विचार स्वातंत्र्य व कृतीस्वातंत्र्य आवश्यक आहे.

१२. राज्याने मर्यादित स्वरूपात आर्थिक कार्याची जबाबदारी घ्यावी.

१३. राज्य हे आवश्यक आपत्ती नसून ते समाजकल्याणाचे साधन आहे.

१४. सार्वजनिक आरोग्य, सुरक्षितता व शिक्षण ही राज्याची प्राथमिक कर्तव्ये आहेत.

१५. अन्यायी शासनाला प्रतिकार करण्याचा अधिकार लोकांना असावा.

अशा प्रकारे लोकशाही उदारमतवाद्यांनी व्यक्ती स्वातंत्र्य, व्यक्ती विकास यासाठी मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. राज्याच्या कार्याचे स्वरूप स्पष्ट केले. राज्य हे समाजकल्याणाचे साधन आहे आणि राज्याचे अन्यायी स्वरूप असेल तर त्याला विरोध करण्याचा अधिकार लोकांना आहे, असा विचार मांडला. त्यांनी व्यक्तिवादाला आणि उपयुक्तता वादाला जास्त महत्त्व दिले. मानवी बुद्धी ही तिच्या कार्यक्षमतेप्रमाणे विवेकी असून आपला विकास करू शकते, असा विचार मांडला. राज्याने फक्त शांतता व सुव्यवस्था राखण्याचे कार्य करावे, अशी अपेक्षा मांडली. एकूणच या सिद्धांताने व्यक्ती आणि व्यक्तीविकास केंद्रबिंदू मानून राज्याला दुय्यम स्थान दिले आहे. या सिद्धांताने व्यक्तीची प्रतिष्ठा आणि तिचे रक्षण करण्याचा पुरस्कार केला आहे.

(ड) मार्क्सवादी सिद्धांत :

शास्त्रीय समाजवादाचा जनक कार्ल मार्क्स या समाजवादी विचारवंताने राजकीय सत्तेचा मार्क्सवादी सिद्धांत मांडला. कार्ल मार्क्सने कम्युनिस्ट मॅनीफेस्टो, दास कॅपिटल, दि पॉव्हर्टी ऑफ फिलॉसॉफी या ग्रंथात साम्यवादी विचारसरणीचा आढावा घेतला. त्याने पुढील सिद्धांताच्या माध्यमातून मार्क्सवादी सिद्धांत किंवा समाजवादी समाजरचनेचा सिद्धांत मांडला.

मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवादाच्या सिद्धांतात मानवाच्या विकासाचा सिद्धांत मांडला आहे. कार्लमार्क्सच्या मते, प्रत्येक वस्तूचा दुसऱ्या वस्तूशी संघर्ष घडत असतो आणि या संघर्षातून परिवर्तन होत असते. इतिहासाचा अभ्यास केला असता मनुष्य हा भौतिक वस्तूंची प्राप्ती करण्यासाठी उत्पादनाची भौतिक साधने आणि मानवी श्रेय यांच्यात संबंध निर्माण होतात. वस्तूचा संबंध उत्पादनाशी येतो आणि उत्पादनाचा संबंध हा अर्थकारणाशी येतो आणि अर्थकारणाचासंबंध मानवी श्रेयाशी येतो. या संबंधानुसार समाजामध्ये राजकीय सामाजिक व आर्थिक स्थित्यंतरे घडून येतात, असा सिद्धांत मार्क्सने मांडला. त्यामुळेच इतिहासात सरंजामशाही, भांडवलशाही व समाजवाद अशी स्थित्यंतरे घडून आलेली दिसतात, असे मत मांडले. म्हणजे ऐतिहासिक स्थित्यंतरास आर्थिक संबंधच जबाबदार असतात, असे मत मांडले. ही स्थित्यंतरे वाद-प्रतिवाद आणि सुसंवाद या स्वरूपात घडतात असा सिद्धांत मांडला. आजपर्यंतचा या जगाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा आणि उत्पादन पद्धतीचा इतिहास आहे, असे मार्क्सने म्हटले आहे. आर्थिक संबंधाच्या अनुषंगाने मार्क्सने मानव जातीच्या इतिहासाचे

पुढील पाच अवस्था सांगितल्या आहेत. १) प्राचीन साम्यवाद २) गुलामगिरीचा कालखंड ३) सरंजामशाहीचा कालखंड ४) भांडवलशाही व्यवस्था ५) समाजवादी व्यवस्था ६) साम्यवाद.

मार्क्सने साम्यवादी विचारांच्या विकासामध्ये 'अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत' मांडला आहे. या सिद्धांतामध्ये त्यांनी मजुरांच्या श्रमाचे मूल्य, उत्पादन, विक्री मूल्य यातील तफावत कशी मजुरांची पिळवणूक करते, हे दाखवून दिले. श्रमिकाला त्याच्या श्रमाचा पुरेपूर मोबदला न देता कमी मोबदल्यात वस्तू उत्पादन करून भांडवलदार अधिक नफा मिळवतात. ही आर्थिक शोषणाची पद्धती त्यांनी जगासमोर मांडली. कार्ल मार्क्सने या सिद्धांतातून पुढील सिद्धांत मांडले. १) वस्तूचे मूल्य हे तिच्यावर खर्च झालेल्या सामाजिक श्रमावरून ठरते, २) मानवी श्रमाशिवाय कोणतीही वस्तू निर्माण होऊ शकत नाही. ३) कामगाराजवळ उत्पादन निर्मितीची क्षमता असते. ४) मजुरी आणि वस्तूच्या बाजारातील किंमतीमधील तफावत हे अतिरिक्त मूल्य असते. ५) अतिरिक्त मूल्याच्या माध्यमातून भांडवलशाहीत संपत्तीचे केंद्रीकरण मूठभर लोकांच्या हातात होते. ६) भांडवलदार श्रमिकावर अन्याय करतात व त्यांची आर्थिक पिळवणूक करतात. ७) अतिरिक्त मूल्य सिद्धांतामुळे समाजात 'आहे रे' वर्ग आणि 'नाही रे' वर्ग तयार होतात.

अशा प्रकारच्या अतिरिक्त मूल्याच्या सिद्धांतामुळे समाजात श्रीमंत व गरीब असे वर्ग तयार होतात. त्यांना आहे रे वर्ग आणि नाही रे वर्ग म्हणतात. या दोन्ही वर्गात वर्गसंघर्ष निर्माण होतो. अशा प्रकारचा वर्ग सिद्धांत मार्क्सने आपल्या कम्युनिस्ट मॅनिफेस्टो या ग्रंथात मांडला. कार्ल मार्क्सच्या मते, आजपर्यंतचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे आणि हा वर्गसंघर्ष असंतुष्ट कामगार आणि भांडवलदार यांच्यामध्ये होतो. कामगार भांडवलशाही विरूद्ध क्रांती करतात आणि समाजात कामगारांची हुकूमशाही निर्माण होते. ही हुकूमशाही कांही काळासाठी स्थापन झाल्यानंतर खाजगी संपत्ती व उत्पादन साधनांची सामूहिक मालकी प्रस्थापित करतात. त्यामुळे समाजातील वर्ग-विग्रहाचे प्रमाण कमी होवून समाज वर्गविरहीत बनतो आणि वर्गविहीन समाजव्यवस्था स्थापन होते. म्हणजेच समाजवादी समाजरचना जी वर्गविहीन, राज्यविहीन असेल, असा विचार कार्लमार्क्सने आपल्या साम्यवादी सिद्धांतात मांडला आहे. थोडक्यात, सत्तेच्या मार्क्सवादी सिद्धांतात पुढील वैशिष्ट्ये दिसून येतात.

१. ऐतिहासिक विकासामध्ये भौतिकवाद महत्त्वाचा असतो.
२. समाजपरिवर्तनाचा ऐतिहासिक विकास होत असताना तो संघर्षातूनू होत असतो.
३. मानवी इतिहासाच्या विकासात आर्थिक घटकाला महत्त्व आहे. संपूर्ण मानवी जीवन आर्थिक पायावर उभारलेले आहे.
४. आजपर्यंतचा इतिहास हा श्रीमंत व गरीब वर्गाच्या संघषर्घाचाच इतिहास आहे.
५. समाजाचा इतिहास हा प्रामुख्याने उत्पादन पद्धतीचाच आहे.
६. आर्थिक संबंधाच्या अनुषंगाने मानव जातीच्या इतिहासात पाच प्रकारच्या अवस्था निर्माण होतात.
७. समाजवादी व्यवस्था ही संपूर्ण मानवी कल्याणाच्या विकासाचे काम करते.

८. वस्तूचे 'अतिरिक्त मूल्य' हे श्रमिकांच्या शोषणाचा मार्ग आहे.
९. वस्तूचे मूल्य हे तिच्यावर खर्च झालेल्या सामाजिक श्रमावरून ठरते.
१०. मानवी श्रमाशिवाय कोणतीही वस्तू निर्माण होऊ शकत नाही.
११. भांडवलशाहीत संपत्तीचे केंद्रीकरण होवून मूठभर लोकांच्या हातात सत्ता एकवटते.
१२. भांडवलदार वर्गाकडून मजूर श्रमिकावर अन्याय होतो, त्याची पिळवणूक होते.
१३. जुलूम करणारा आणि जुलूम सोसणारा अशा दोन्ही वर्गात वर्गसंघर्ष कायम असतो.
१४. आजपर्यंतच्या संपूर्ण समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे.
१५. कामगारांच्या क्रांतीनंतर वर्गविहीन आणि राज्यविहीन समाज व्यवस्था निर्माण होते. तीचे साम्यवादी समाजरचना म्हणून ओळखली जाते.

अशाप्रकारे कार्ल मार्क्स यांनी ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांत, अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत, कामगार क्रांती, कामगारांची हुकूमशाही आणि साम्यवादी समाजरचनेच्या माध्यमातून राजकीय सत्तेचा मार्क्सवादी सिद्धांत मांडला. यामध्ये मार्क्सने आर्थिक घटक हाच समाजपरिवर्तनासाठी महत्त्वाचा असतो, अशी मांडणी केली. ज्या घटकाकडे आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होते त्याच्याकडेच राजकीय सत्ता असते आणि तो गरीब, श्रमिक यांच्यावर अन्याय, अत्याचार करतो. या अन्याय-अत्याचारा विरोधात वर्गसंघर्ष होवून कामगार क्रांती होते. कामगारांची हुकूमशाही निर्माण होते आणि शेवटी साम्यवादी समाजरचना अस्तित्वात येते ती समाजरचना वर्गविहीत, राज्यविहीन असते असा सिद्धांत मांडला.

अ) स्वयं अध्ययन प्रश्न-१ : रिकाम्या जागा भरा.

१. राजकारण म्हणजे .... चा खेळ होय.
२. निर्णय होण्याची आणि त्या निर्णयाची कार्यवाही करण्याची क्षमता म्हणजे .... होय.
३. 'Political Power' हा ग्रंथ .... यांनी लिहिता.
४. .... यांच्या मते, सत्तेचे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय.
५. हेरॉल्ड लासवेल यांनी राजकीय सत्तेचे .... प्रकार सांगितले आहेत.
६. .... याने राजकीय सत्तेच्या मनोविश्लेषणावर सिद्धांताचा पुरस्कार केला.
७. .... याने मानव हा समाजशील प्राणी आहे, असे म्हटले आहे.
८. .... याला समाजशास्त्राचा जनक म्हणतात.
९. .... याने समाजाविषयीचा सेंद्रीय सिद्धांत मांडला.
१०. उदारमतवादी लोकशाही सिद्धांत .... महत्त्व देतो.
११. .... याने राजकीय सत्ता हा ग्रंथ लिहला.
१२. लोकशाहीत अधिसत्तेचे अधिष्ठान .... ला असते.

ब) अधिसत्ता (Authority) :

४.२.५ अधिसत्ता : अर्थ आणि व्याख्या :

इंग्रजी भाषेतील Authority या राज्यशास्त्रीय संकल्पनेसाठी 'अधिसत्ता' या शब्दाचा उपयोग केला जातो. ऑथॉरीटी या शब्दाची उत्पत्ती Auctor या रोमन शब्दापासून झालेली असून त्याचा मूळ अर्थ सल्ला किंवा मसलत असा होतो. रोमन राजकीय व्यवस्थेतील 'वरीष्ठ सभा' या जेष्ठ, अनुभवी व तज्ज्ञ लोकांची सभा म्हणून अस्तित्वात होती. ही 'वरीष्ठ सभा' धर्म, नीती, परंपरा, संकेत, रुढी या आधारावर जनसभेने घेतलेल्या निर्णयाचे परीक्षण करून व विचार-विनिमय करून मान्यता दिली जाते. त्या निर्णयाला अधिकृत दर्जा मिळतो तेव्हा त्यास अधिसत्ता म्हटले जात असे, अशा प्रकारे रोमन काळात सत्ताधारकांमध्ये निर्णय घेण्याची क्षमता आणि त्यानुसार आदेश देण्याचा अधिकार व त्या निर्णयाचे पालन करून घेण्याची क्षमता या अर्थाने 'अधिसत्ता' हा शब्द वापरला जात होता. पण सर्वसाधारणपणे राज्यशास्त्रीय दृष्टिकोनातून अधिसत्ता म्हणजे सत्ता धारकाच्या आज्ञांचे पालन त्या आज्ञांच्या पाठीमागे असलेले अधिबलन म्हणजे अधिसत्ता होय. सत्तेला कायद्याची, बहुसंख्य जनतेची अधिमान्यता मिळाली की त्याचे रूपांतर 'अधिसत्तेत' होते. ही अधिसत्ता न्याय, योग्य, वैध आणि न्यायोचित मानली जाते. यामध्ये परस्पर सहकार्य, संमती आणि परस्पर सहभाग अभिप्रेत असतो.

राजकीय सत्तेला आज्ञांचे आपोआप आज्ञापालन मिळते, त्याच्या ठिकाणी बुद्धीसंगत सांगोपांग मांडणी करण्याची क्षमता असणे, तिला असा करण्याचा अधिकार आहे आणि आज्ञाचे पालन करणे, माझे कर्तव्य आहे, अशी भावना बहुसंख्य लोकांच्या कडून अधिबलन मिळते त्यावेळी त्याचे अधिसत्तेत रूपांतर होते. लोकांच्या मान्यतेनुसार चालवणारी किंवा चालवली जाणारी सत्ता म्हणजे अधिसत्ता होय आणि हीच अधिसत्ता लोकांना कायदेशीर व श्रेष्ठ वाटते. थोडक्यात, सत्तेला अधिमान्यता मिळाली की तिचे 'अधिसभेत' रूपांतर होते.

सत्ताधारक लोकांना कायद्याची, जनतेची आणि इतर नैतिक बाबींच्या संदर्भात निर्णय घेण्याची आणि त्याची अंमलबजावणी करण्याची मान्यता मिळते. त्यावेळी सत्तेचे अधिसत्तेत रूपांतर होते. अधिसत्तेला कायद्याची व जनतेची मान्यता असते. त्यामुळे अधिसत्तेकडून आलेल्या आदेशांचे पालन सहजपणे व बिनविरोध करतात. अधिसत्तेकडून मिळालेल्या आज्ञा, आदेश लोकांना कायदेशीर, योग्य व न्याय वाटतात. थोडक्यात, सत्तेला अधिमान्यता असणे म्हणजे अधिसत्ता होय.

१. **मॅक्स वेबर :** अधिसत्ता म्हणजे एखादा आदेश किंवा आज्ञा देण्याची किमान राजकीय सत्ता होय.

२. **युनोस्को :** जनतेकडून स्विकारण्यात आलेली व सन्मानीत झालेली व जी सर्वांना माहिती असलेली मान्यताप्राप्त झालेली सत्ता म्हणजे अधिसत्ता होय.

३. **सी. जे. फ्रेडरिक :** विवेकशील प्रतिक्रियेद्वारे समर्थन करण्याची क्षमता किंवा सत्ता म्हणजे अधिसत्ता होय.

४. **रॉबर्ट डहाल :** अधिमान्यता असलेली राजकीय सत्ता म्हणजे अधिसत्ता होय.

५. **लेली किप्सन :** अधिमान्यतेच्या वेष्टनात असलेली राजकीय सत्ता म्हणजे अधिसत्ता होय.

वरीलप्रमाणे अधिसत्तेच्या व्याख्यावरून असे स्पष्ट होते कि, अधिसत्तेला समाजातील बहुसंख्य लोकांची मान्यता असते. त्यांनी अधिसत्तेचा स्विकार स्वेच्छेने केलेला असतो. अधिसत्तेला राज्याच्या पाशवी शक्तीचा आधार नसून जनतेची इच्छा तिचा आधार असतो. आधुनिक काळात अधिसत्तेची रचना घटनात्मक तत्त्वावर आधारित असून अधिसत्तेला राज्यघटनेचे कवच असते. थोडक्यात, सत्तेला कायद्याची, लोकांची मान्यता, संमती असणे म्हणजे 'अधिसत्ता' होय.

अधिसत्तेची वैशिष्टे :

१. अधिसत्ता अधिमान्य असते : अधिसत्ता ही सर्व दृष्टिकोनातून अधिमान्य असते. राजकीय व्यवस्थेतील संवैधानिक तरतुदीनुसार तिला मान्यता असते. तसेच समाजातील बहुसंख्य लोकांची त्याला मन्यता असते. तिला नैतिकतेचे सुद्धा अधिष्ठान असते. त्यामुळे बहुसंख्य जनता अधिसत्तेच्या आदेशाचे पालन आपले कर्तव्य म्हणून करत असते. अधिसत्तेकडून आलेल्या आज्ञा आदेश लोकांना न्याय वाटतात. त्यामुळे अधिसत्ता ही लोकांना कायदेशीर व न्याय वाटते. अधिसत्तेला लोकांच्या संमतीचे पाठबळाबरोबरच कायद्याची अधिमान्यता असते.

२. संघटनात्मक स्वरूप : कार्यात्मक स्वरूपात अधिसत्तेला नियमांचे किंवा आज्ञाचे नियमन करावयाचे असेल तर संघटना असणे गरजेचे आहे. विशेषत: आधुनिक राजकीय व्यवस्थेचा विचार करता राष्ट्राचा भूप्रदेश, लोकसंख्या, प्रथा-परंपरा आणि राज्यव्यवस्थेकडून लोकांच्या असलेल्या अपेक्षांचा विचार करता निर्णय निर्धारण आणि निर्णय अंमलबजावणीसाठी अधिसत्तेला संघटनात्मक स्वरूपाशिवाय तरणोपाय नाही. त्यामुळे साकल्याने या सर्व घटकांचा विचार करता अधिसत्तेचे स्वरूप संघटनात्मक असते. अधिसत्ता व्यक्ती व्यक्ती, संस्था संस्था यामधील सुसंवाद कायम राखणारी कार्यक्षम यंत्रणा म्हणून अधिसत्तेचे स्वरूप संघटनात्मक असते.

३. अधिसत्ता प्रतिकात्मक असते : सत्तेला अधिसत्तेत रूपांतर होण्यासाठी काही प्रतिके आवश्यक असतात. या प्रतिकांच्या आधारावर राजकीय सत्ता जनतेत आदर, निष्ठा, प्रेम निर्माण करून स्वत:ला अधिसत्तेत परावर्तीत करून घेते. उदा. राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, बोधचिन्ह, राजचिन्हे, राजमुकूट इत्यादी राष्ट्राची प्रतिके जनतेमध्ये लोकप्रिय असतात. त्यासाठी ते जीवसुद्धा देवू शकतात. त्यामुळे राजकीय अधिसत्ता या प्रतिकांचा वापर करून लोकांकडून आदेशाचे, आज्ञेचे सहज पालन करून घेवू शकतात. उदा. ब्रिटीश राजाविषयी राजा मृत आहे, राजा चिरायू होवो. यातून राजाची सत्ता अमूर्त आहे हे मान्य केले जाते.

४. अधिसत्ता आज्ञार्थी असते : अधिसत्तेला जनतेकडून आज्ञा करण्याचा अधिकार असतो. त्यामुळे अधिसत्ता जनतेसाठी आदेश किंवा आज्ञा देण्याचे काम करत असते. एवढेच नव्हे तर त्या आज्ञांचे लोकांकडून पालन करवून घेण्याचाही अधिकार अधिसत्तेला असतो. कोणत्याही स्वरूपाची राजकीय व्यवस्था असो, त्यामधील अधिसत्ता लोककल्याणात आणि समाज कल्याणासाठी आदेश किंवा आज्ञा देते आणि त्याचे पालन लोकांच्याकडून घेवू शकते. त्यामुळे अधिसत्ता ही कायमस्वरूपी आज्ञा देणारी किंवा आदेश देणारी आज्ञार्थी असते.

५. अधिसत्ता कमी खर्चीक असते : अधिसत्तेद्वारे जेव्हा आज्ञा, आदेश दिले जातात किंवा सामाजिक वर्तनाचे नियंत्रण केले जाते त्यासाठी अधिसत्तेला कमी साधनसंपत्तीचा वापर करणे शक्य होते. कारण अधिसत्तेला समाजातून सकारात्मक-अधिबलने अधिक असतात. त्यामुळे आदेशाचे पालन करून घेण्यासाठी खर्च कमी होतो. ज्या अधिसत्तेला लोकांचा पाठिंबा असतो, लोकांना ती अधिसत्ता कायदेशीर व श्रेष्ठ वाटते. तेथे अधिक शक्तीचा, बळाचा वापर करावा लागत नाही. कमी साधनामध्ये अधिसत्ता आपले कार्य पार पाडू शकते. म्हणून अधिसत्ता कमी खर्चीक आहे. अधिसत्ता ही कायम मान्य आणि स्विकृत असते. त्यामुळे अधिसत्तेचे निर्णय लोक सहजपणे पाळतात.

४.२.६ अधिसत्तेचे प्रकार :

मॅक्स वेबर यांच्या मते, राजकीय व्यवस्थेमध्ये राजकीय अधिसत्तेला महत्त्वाचे स्थान आहे. कोणत्याही स्वरूपाची अधिसत्ता ही रूढी, परंपरा संकेत, व्यक्तीचे नेतृत्त्वगुण, दिव्यवलय आणि वैधानिक बुद्धीमत्ता यावर आधारित असते. या वरील आधारावरच लोक अधिसत्तेच्या आज्ञेचे व आदेशाचे पालन करत असतात. आणि अधिसत्तेला अधिमान्यता मिळवून देणारे ते आधार आहेत. त्या आधारावरच मॅक्स वेबर यांनी अधिसत्तेचे पुढील 'तीन' प्रकार सांगितले आहेत.

१. पारंपारिक अधिसत्ता : पारंपारिक अधिसत्ता म्हणजे रूढी, परंपरा संकेत यावर आधारित असलेली अधिसत्ता म्हणजे पारंपारिक अधिसत्ता होय. या प्रकारातील अधिसत्तेला किंवा सत्ताधारकाला त्या विशिष्ट समुहातील लोकांची मान्यता मिळालेली असते. तिचा आधार दिर्घकाळापासून चालत आलेल्या रूढी-परंपरा संकेत हा असतो. परंपरागत अधिसत्तेची अधिबलने ही परंपरागत पिढ्यान पिढ्यांच्या वहीवाटीवर आधारलेली असतात. या अधिसत्तेच्या पाठीमागचा मूळ स्रोत हा व्यक्ती किंवा कायदा नसून परंपरा हा असतो. पितृसत्ताक कुटूंब पद्धती हे पारंपारिक अधिसत्तेचे उदाहरण आहे. कुटूंबातील प्रमुखाला जी सत्ता प्राप्त होते ती वंशपरंपरागत असते. तिच्या पाठीमागे रुढी व परंपरा असते. त्यामुळे कुटूंबातील सर्व लोक त्या व्यक्तीची सत्ता मान्य करतात. पारंपारिक अधिसत्तेचे उदाहरण म्हणून प्राचीन काळातील टोळी राज्ये, इंग्लंड व नेपाळमधील राजेशाही इत्यादी. यामधील अधिसत्ता ही वंशपरंपरेवर आधारित आहे. विशेष म्हणजे तेथील लोकांनीही ती सत्ता मान्य केलेली आहे. जशी व्यक्ती व व्यक्ती समुहाला परंपरागत आधारावर अधिसत्ता प्राप्त होते तशी त्या अधिसत्तेवर परंपरेची मर्यादा असते. अधिसत्तेने वर्तन करताना रुढी-परंपरा यांचा आदर करूनच आपले अधिकार गाजवणे आवश्यक आहे. पारंपारिक अधिसत्ता ही रूढी-परंपरा संकेत यावर आधारित असल्यामुळे तिला कोणतेही आव्हान नसते. कारण या अधिसत्तेला कायदेशीर आधार नसतो. ती वंशपरंपरागत असल्यामुळे पारंपारिक अधिसत्तेत सत्ताधिशाचा शब्द आज्ञा, निर्णय आणि आदेश म्हणजे कायदा असतो. आधुनिक राजकीय व्यवस्थेत परंपरागत अधिसत्तेचा प्रकार जवळ जवळ संपुष्टात आला आहे.

२. दिव्यवलयी अधिसत्ता : दिव्यवलयी अधिसत्ता ही सत्ताधारी व्यक्तीच्या अलौकिक गुणावर किंवा दिव्यशक्तीवर आधारित असते. जेव्हा सत्ताधारकापाशी काहीतरी दिव्यशक्ती किंवा अलौकिक गुण आहेत ते लोकांच्या कल्याणासाठी वापर करतील, अशी लोकांची खात्री होते आणि त्यामुळे त्या व्यक्तीवर वा त्याच्या

अलौकिक गुणावर विश्वास ठेवून त्याच्या आदेशाचे पालन निमूटपणे केले जाते तेव्हा दिव्यवलयी अधिसत्ता अस्तित्वात येते. उदा. महात्मा गांधी, पंडीत नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुभाषचंद्र बोस इत्यादी. दिव्यवलयी अधिसत्ता धारण करणाऱ्या व्यक्तीला निर्णय घेण्याचे अमर्याद स्वातंत्र्य असते. कारण तिच्या ठिकाणी असलेल्या शक्तीवर लोकांचा अमर्याद विश्वास असतो. त्यांना विरोध करण्याची मन:स्थिती लोकांच्यामध्ये नसते. त्यांचे सर्व आदेश मान्य करण्याच्या मन:स्थितीत असतात. अशा प्रकारे दिव्यवलयी अधिसत्ता ही अलौकिक गुण, दिव्य शक्ती, आकर्षण आणि व्यक्तित्व यावर आधारित असल्यामुळे ती वैयक्तिक स्वरूपाची असते. त्यामुळे जोपर्यंत लोकांचा त्यांच्या नेतृत्त्व कौशल्यावर किंवा अलौकिक व्यक्तिमत्त्वावर विश्वास असतो तोपर्यंतच त्याची दिव्यवलयी सत्ता टिकून राहते. लोकांचा विश्वास उडाला की दिव्यवलयी सत्ता डळमळीत होते. मॅक्स वेबरने या 'दिव्यवलयी अधिसत्तेला' अधिक अस्थिर अधिसत्ता म्हटले आहे.

३. विधीविवेकजन्य अधिसत्ता : राजकीय सत्तेची यथायोग्यता परिणामकारक, मूल्यसमरसता, विश्वासार्हता आणि विधीनियमानुसार लोकांची स्विकृती व मान्यता मिळते अशा अधिसत्तेला विधी विवेकजन्य अधिसत्ता म्हणतात. ही अधिसत्ता वैधानिक तत्त्वानुसार, नियमानुसार आणि स्वत:च्या सद्‌विवेकानुसार कार्यान्वित होत असते. लोकहित हाच हेतू या अधिसत्तेचा असल्यामुळे लोकांची संमती या अधिसत्तेला असते. वैधानिक अधिसत्तेसमोर सर्व शक्ती समान असतात. त्यांच्या समोर भेदभाव नसतो. तसेच ही सत्ता विधीनियमांचे उल्लंघन करणाऱ्यावर कारवाई करू शकते. त्यामुळे आधुनिक राज्यव्यवस्थेची उभारणी विधीविवेक अधिसत्तेच्या संकल्पनेवरच निर्माण झालेली दिसून येते. राष्ट्रपतीपासून ते कनिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत या अधिसत्तेची उदाहरणे देता येतील, अशा प्रकारे मॅक्स वेबरने अधिसत्तेची तीन प्रकार सांगून पारंपारिक सत्ता व दिव्यवलयी अधिसत्ता अविकसीत देशात अस्तित्वात येते तर विधीविवेकनिष्ठ अधिसत्ता विकसीत देशात आढळून येते असे स्पष्टीकरण केले आहे.

ब) स्वयं अध्ययन प्रश्न २ : रिकाम्या जागा भरा.

१. ॲथॉरिटी या शब्दाची निर्मिती .... या रोमन शब्दापासून झालेली आहे.

२. अधिमान्यता असलेली राजकीय सत्ता म्हणजे .... होय.

३. लोकांना .... सत्ता कायदेशीर व श्रेष्ठ वाटते.

४. राष्ट्रध्वज हे .... अधिसत्तेचे वैशिष्ट आहे.

५. पारंपारिक अधिसत्ता .... आधारित असते.

६. वैधानिक सत्तेला .... ची मान्यता असते.

७. मॅक्स वेबरने अधिसत्तेचे .... प्रकार सांगितले आहेत.

८. सामाजिक परिवर्तनाचा वर्तुळगामी सिद्धांत .... यांनी मांडला.

९. वर्गसंघर्षाचा आणि वर्गविहीन समाजाचा सिद्धांत .... ने मांडला.

क) अधिमान्यता (Legitimacy) :

४.२.७ अधिमान्यतेचा अर्थ आणि व्याख्या :

सत्ता, अधिसत्ता प्रमाणे आधुनिक राजकीय विश्लेषणात 'अधिमान्यता' या संकल्पनेला महत्त्वाचे स्थान आहे. अधिमान्यता ही संकल्पना रामायण, महाभारतापासून अस्तित्वा आहे. प्लेटो, ॲरिस्टॉटल पासून आधुनिक राजकीय विश्लेषक मॅकआयव्हॅली डेव्हीड इस्टन, कॉप्लान, लासवेल इत्यादी विचारवंतांनी 'अधिमान्यतेची' संकल्पना मांडली आहे. उदा. रामायण, महाभारत यामध्ये राजाची सत्ता, प्लेटोची न्याय संकल्पना, ॲरिस्टॉटलची सार्वभौम कायद्याची सत्ता, सामाजिक करार या सर्व संकल्पनेत अधिमान्यतेची संकल्पना आढळते. थोडक्यात, अधिमान्यता म्हणजे राज्यातील सत्ताधारी व्यक्तीला जनतेची मान्यता असणे होय. तसेच प्रस्थापित राजकीय सत्तेविषयी लोकांच्या मनात विश्वासाची भावना निर्माण होणे म्हणजे अधिमान्यता होय. प्रत्येक राजकीय सत्तेचे विशिष्ठ लक्षण म्हणजे अधिमान्यता होय. कारण प्रत्येक राजकीय व्यवस्था अधिमान्यतेवर आधारित असते आणि ज्या राजकीय सत्तेला लोकांची अधिमान्यता नसते ती राजकीय व्यवस्था अस्थिर असते. त्या व्यवस्थेचे विघटन होते त्यामुळे आधुनिक राजकीय व्यवस्थेच्या दृष्टीने 'अधिमान्यतेला' अनन्यसाधारण महत्त्व आहे.

अधिमान्यता (Legitimacy) हा शब्द Legitimus या लॅटीन शब्दापासून निर्माण झालेला असून रोमन ग्रीक विचारवंत सिसेरो याने वैधानिक व न्यायिक सत्ता यासाठी Legitimus हा शब्द वापरलेला होता. अधिमान्यता म्हणजे राज्यातील सत्ताधारकांना सामान्य जनतेची मान्यता असणे होय. आधुनिक राजकीय विश्लेषणात सर्वप्रथम एस. एम. लिपसेट या अमेरिकन विचारवंताने १९४९ मध्ये Political Science Review या मासिकात अधिमान्यतेची संकल्पना स्पष्ट केली आणि आपल्या Political Man या ग्रंथात अधिमान्यतेच्या संकल्पनेचे विश्लेषण केले आहे.

१. लिप्सेट : यांच्या मते, अधिमान्यता म्हणजे अशी राजकीय व्यवस्था कि, जी सर्व सामर्थ्यानिशी समाजहितासाठी कार्य करते, असा विश्वास जनतेत निर्माण करण्याची व ती टिकवून ठेवण्याची त्या राजकीय व्यवस्थेची क्षमता होय.

२. रॉबर्ट डहाल : शासनाच्या संरचना, कार्यपद्धती, कृती, निर्णय, धोरणे, अधिकारी वा पुढारी यांच्या ठिकाणी अचूकपणा, औचित्य, नैतिक, चांगुलपणा हे गुण आहेत आणि त्यामुळे आपण त्यांचा स्विकार केला पाहिजे, असा जो विश्वास लोकांना वाटतो, त्याला अधिमान्यता म्हणतात.

३. मार्टीन लिप्सेट – डाल्फ स्टर्नबर्गर : यांच्या मते, राजकीय सत्तेचा पाया अधिमान्यता हा असून राज्यशासन चालवण्याचा अधिकार आपणास आहे, असे शासन संस्थेला वाटते आणि त्याला काही प्रमाणात लोकांची मान्यता असते त्याला 'अधिमान्यता' म्हणतात.

वरील व्याख्यांचा अभ्यास केला असता असा निष्कर्ष काढता येईल की, राजकीय व्यवस्थेला लोकांची खास मान्यता आणि खास संपत्ती होय. सत्तेला ज्यावेळी अधिमान्यता मिळते तेव्हा त्याचे रूपांतर अधिसत्तेत होते आणि अधिसत्ता लोककल्याणाची कार्ये करते असा जनतेचा विश्वास असतो. त्यामुळे प्रत्येक शासकीय

कृतीला किंवा शासनाच्या धोरणांना लोकांचा पाठिंबा मिळतो, त्यालाच अधिमान्यता म्हणतात. जिथे राजकीय सतेला अधिक अधिमान्यता असते तेथील राजकीय व्यवस्थेत कायदा व सुव्यवस्था पहायला मिळते. शासन स्थिर असते आणि याच्या उलट जिथे राजकीय सत्तेला अधिमान्यता कमकुवत असते तेथे कायदा व सुव्यवस्थेसाठी दंडशक्तीचा वापर करावा लागतो. तेथील शासन अस्थिर असते. अशा प्रकारे लोकांना राजकीय सत्तेविषयी औचित्याची, कार्यपद्धती विषयी विश्वासाची व चांगुलपणाची भावना आणि कृती असणे म्हणजे 'अधिमान्यता' होय.

४.२.८ अधिमान्यतेचे आधारभूत घटक :

सत्ताधारकांना, राजकीय व्यवस्थेला, तिच्या उपव्यवस्थेला व तिच्या कार्यपद्धतीला अधिमान्यता मिळवण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी पुढील व्यवस्था अनेक मार्गाचा अवलंब करीत असते. ते मार्ग म्हणजेच अधिमान्यतेचे आधारभूत घटक होय. ते पुढीलप्रमाणे -

१. विचारप्रणालीतून मान्यता : सत्ताधारकाला विशिष्ठ विचारप्रणालीतून राजकीय अधिमान्यता प्राप्त होऊ शकते. सामान्यत: सत्ताधारक अधिमान्यता प्राप्त करत असताना विशिष्ट विचारांच्या आधारे किंवा मूल्यांच्या आधारे एक आदर्श संदर्भ चौकट लोकांसमोर उभी ठेवतात आणि अधिमान्यता मिळतात. सत्ताधाऱ्यांनी मांडलेल्या विचाराविषयी ज्यावेळी जनतेमध्ये विश्वास उत्पन्न होतो त्यावेळी त्याला लोक अधिमान्यता देतात. सत्ताधारक आपले विचार आपल्या भाषणातून आणि प्रचारातून लोकांसमोर सतत समर्थन करून अधिमान्यता मिळवण्याच्या प्रयत्नासाठी कटिबद्ध असतात. या विशिष्ठ विचारसरणीच्या आधारावरच राजकीय श्रेष्ठीजन अधिमान्यता प्राप्त करून सत्ताधीश होतो व ते टिकवण्याचा प्रयत्न करतात. उदा. नाझीवाद, हिटलर, फॅसीवाद, मुसोलिनी, इंदिरा गांधी-वीस कलमी कार्यक्रम इत्यादी.

२. चिन्हे आणि प्रतिकाद्वारे अधिमान्यता : राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, गौरवशाली ऐतिहासिक परंपरा, प्रसिद्ध घोषवाक्ये यांच्या आधारे जनतेचा विश्वास संपादन केला जातो. अशा चिन्हांना आणि प्रतिकांना मोठ्या श्रद्धेने लोकांनी स्विकारलेली असते. कारण या प्रतिकाबाबत जनतेमध्ये श्रद्धा असतात आणि त्याचाच वापर करून दिव्यवलयी व्यक्तिमत्त्व 'अधिमान्यता' प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत असते.

३. प्रभावी, अलौकिक व दिव्यवलयी व्यक्तीमत्त्वाद्वारे अधिमान्यता : अधिमान्यता मिळवण्यासाठी राजकीय श्रेष्ठीजनाजवळील ज्ञान, कौशल्य, अलौकिक शक्ती काही वेळा आधार बनते. विशिष्ट परिस्थितीवर मात करून एखादा नेता किंवा समुदाय कसा लोकोपयोगी निर्णय घेतो यावरती लोक प्रभावी होतात व त्यांना अधिमान्यता देतात. लेनिन, स्टॅलीन, माओ, महात्मा गांधी, पंडीत नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, इंदिरा गांधी आणि सध्याचे नरेंद्र मोदी यांनी आपल्या प्रभावी नेतृत्त्वातून आणि कार्यातून अधिमान्यता मिळवली आहे आणि सत्ताधीश झालेले आहेत. राजकीय श्रेष्ठीजनामधील असामान्य कर्तृत्व, क्षमता, ज्ञान, कौशल्य, प्रसंगावधानता इत्यादी आधार अधिमान्यता मिळवण्यासाठी पूरक ठरतात. अशा दिव्यवलयी नेत्यांचा जनमानसात आदर असतो.

४. विवेक–विधीव्यवस्था यातून अधिमान्यता : ज्यावेळी सत्ताधारक विवेकाच्या किंवा नैतिकतेच्या निकषावर सिद्ध होवून कार्यक्षमपणे कार्य कार्य करतो त्यावेळेस त्याचा प्रभाव जनसामान्यावर पडतो आणि त्याला अधिमान्यता मिळते. विवेकाच्या आधारावरती अधिमान्यता मिळवलेल्या व्यक्तीने कायमस्वरूपी सद्विवेकाचा वापर करावा लागतो. त्याने कायमच जनतेच्या कल्याणासाठी काय चांगले, काय वाईट, योग्य, अयोग्य याचा विचार करून कृती केली पाहिजे ही मर्यादा त्याच्यावर पडते त्याचप्रमाणे ही सत्ता संविधानिक व अन्य वैधानिक तत्त्वातून मिळते. म्हणजेच सत्ताधीशाला संविधान, कायदे या आधारावर अधिमान्यता मिळते. त्यामुळे त्याची आज्ञा, आदेश, निर्णय लोक सहजपणे पाळतात. येथे त्याला कायदेशीर किंवा संविधानातील अधिमान्यता मिळालेली असते.

५. सांस्कृतिक मूल्ये किंवा परंपरेतून अधिमान्यता : अधिमान्यता विशिष्ठ सांस्कृतिक मूल्यांच्या आधारे अधिमान्यता मिळवू शकते. तशीच ती समाजातील रूढी, परंपरा, संकेत या मार्गानेही प्राप्त करू शकते. सांस्कृतिक मूल्ये, श्रद्धा, रूढी, परंपरा, संकेत हे लोकांच्या भावनेशी संबंधित मूल्ये आहेत. त्यामुळे समाजातील सर्व लोक या मूल्यावर अधिक प्रेम करत असतात. त्यावर लोकांची श्रद्धा, आस्था आणि आदर असतो. त्यामुळे सत्ताधारकांनी या मूल्यांची काळजीपूर्वक जोपासना केली तर त्यांना अधिमान्यता मिळू शकते. उदा. इंग्लंडमधील राजेशाही, उमरावगृह, भारतातील भारतीय जनता पक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ इत्यादींनी हिंदू प्रथा–परंपरेचा सांस्कृतिक मूल्यांचा प्रखर प्रचार आणि प्रसार केल्यामुळे आज त्यांचा भारतीय राजकारणावर प्रभाव आढळून येतो.

६. राजकीय व्यवस्थेची कार्यक्षमता : आधुनिक राजकीय व्यवस्थेमध्ये 'अधिमान्यता' ही सध्यकालीन राजकीय व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर, राजकीय स्थिरतेवर आणि आर्थिक–स्थितीवर अवलंबून असते. जी शासन व्यवस्था राजकीयदृष्ट्या स्थिर, कार्यक्षम, भ्रष्टाचारमुक्त, कल्याणकारी याबाबत यशस्वी झाली असेल तर ती अधिमान्यता सहजपणे प्राप्त होवू शकते. अमेरिकेची राजकीय व्यवस्था किंवा शासन राजकीयदृष्ट्या स्थिर व आर्थिक दृष्ट्या सक्षम असल्यामुळे अमेरिकेच्या व्यवस्थेला सहजपणे अधिमान्यता मिळालेली आहे. पण याच्या उलट पाकिस्तानचा विचार करता राजकीय अस्थिरता आणि लष्करी शासनाचा प्रयोग यामुळे लोकांचा राजकीय व्यवस्थेसंबंधी भ्रमनिराष झाल्यामुळे तेथील लोकांची प्रभावी अशी 'अधिमान्यता' राजकीय व्यवस्थेला मिळालेली नाही.

७. कार्यपद्धती अधिमान्यता : सत्ताधारक सत्ता धारण केल्यानंतर त्यांची कार्यपद्धती, निर्णय पद्धती संविधानाला व वैधानिक नियमांना धरून असेल तर लोकांची 'अधिमान्यता' सहजासहजी मिळते. रूसोने 'सर्वसाधारण ईहा' या संकल्पनेतून या अधिमान्यतेचा पुरस्कार केला आहे. त्याच्या मते, राज्यकर्त्यांच्या विशिष्ठ कृतीचा निर्णय कोणत्या पद्धतीत घेण्यात आला त्यावर त्याची अधिमान्यता अवलंबून असते. अधिमान्यतेच्या आधारे लोक सत्ता प्रतिनिधींच्या हाती सोपवित असले तरी त्यामुळे ते प्रतिनिधी सार्वभौम होवू शकत नाहीत. असा जर प्रकार घडला तर लोक त्यांची अधिमान्यता काढून घेतात. थोडक्यात, अधिमान्यता ही कार्यपद्धतीवर सुद्धा अवलंबून असते.

८. समाजीकरणातून अधिमान्यता : अधिसत्तेला मान्यता देण्याची मानवाची प्रवृत्ती ही जन्मसिद्ध नसते. तो जरी सामाजिक प्राणी असला तरी त्याची अधिमान्यतेची प्रक्रिया किंवा भावना ही सामाजिकरणाच्या प्रक्रियेतून घडत असते. ही समाजीकरणाची प्रक्रिया समाजातील विविध प्रकारचे हितसंबंधी गट, व्यवसाय, संघटना, सांस्कृतिक संघटना करीत असतात व ही प्रक्रिया कायमस्वरूपी घडणारी असते. वरील घटक समाजीकरणासाठी नभोवाणी, वृत्तपत्रे, दूरदर्शन आणि डिजिटल मिडीयाचा वापर करतात. राजकीय समाजीकरणाद्वारे लोकांची राजकीय मूल्ये, दृष्टिकोन, श्रद्धा यांचे ज्ञान करून दिले जाते. अपेक्षित असे वर्तन व लोकमत घडवून आणून राजकीय व्यवस्थेला 'अधिमान्यता' मिळवून दिली जाते. थोडक्यात, समाजीकरणाच्या माध्यमातून अधिमान्यता मिळवली जाऊ शकते.

अधिमान्यतेचा पेचप्रसंग : (Crisis of Legitimacy)

'अधिमान्यतेचे संकट' हे राजकीय, सामाजिक नेतृत्त्वावरील विश्वास कमी होणे, बेकायदेशीर, असामाजिक व दडपशाहीचे वर्तणूक किंवा दडपशाहीचे वाढते प्रमाण यामुळे निर्माण होते. ज्यावेळी अधिमान्य व्यवस्था मूलभूत मानवी गरजांकडे दुर्लक्ष करते तेंव्हा कायदेशीर व्यवस्थेचा बोजबारा उडतो. त्यावेळी अधिमान्यतेसमोर पेचप्रसंग निर्माण होवून राजकीय व्यवस्था कोसळू शकते, असा विचार हेबरमास यांनी १९७३ मध्ये मांडला. जेष्ठ समाजशास्त्रज्ञ हेबरमास यांनी अधिमान्यतेचा प्रेचप्रसंगाचा अभ्यास प्रशासकीय कार्ये, संस्था किंवा नेतृत्त्व यांच्या 'विश्वासातील' घट या दृष्टिकोनातून त्याचा विस्तार केला. कोणत्याही कायदेशीर संस्था त्यांची अंतिम लक्ष्ये साध्य करण्यासाठी, प्रभावी संरचना राखण्यासाठी किंवा स्थापित करण्यासाठी प्रशासकीय क्षमता नसते त्यावेळी हा पेचप्रसंग निर्माण होतो असे मत मांडले. हेबरमास यांच्या नंतर लिपसेट यांनी सामाजिक परिवर्तन, सामाजिक सहभाग आणि कार्यक्षमतेचा अभाव इत्यादी कारणांच्या आधारे अधिमान्यतेचा पेचप्रसंग तयार होतो, अशी मांडणी केली आहे.

१. सामाजिक बदल : मानवाची जगण्यासाठी सतत धडपड सुरू असते. त्यासाठी तो प्रयत्नपूर्वक पर्यावरणाशी जुळवून घेवून स्वत:मध्ये परिवर्तन करत असतो. म्हणजेच बदलत्या पर्यावरणाशी येणाऱ्या संबंधातील बदलामुळे सामाजिक परिवर्तन घडून येते. त्यामुळे समाज गतिमान होतो. अशा गतिमान बदलत्या समाजाबरोबर राजकीय बदल घडून येणे अपेक्षित असते. पण अशावेळी समाजातील राजकीय श्रेष्ठीजन, सत्ताधारक प्रस्थापित गटाला अशी भीती वाटत असते कि, या समाजातील राजकीय स्थित्यंतरामुळे आपली सत्ता, पद, प्रतिष्ठा यांना धोका पोहचून आपल्याला राजकीय व्यवस्थेत प्रवेश मिळणार नाही. अशी भिती त्यांना वाटत असल्यामुळे ते नव्या सामाजिक परिवर्तनाला विरोध करतात. त्यामुळे अधिमान्यतेचा पेचप्रसंग निर्माण होतो. असा विचार जीन ब्लाँडेल यांनी मांडला. अशा प्रकारचे क्रायसिस भारत, अमेरिका, चीन व पाकिस्तान मध्ये निर्माण झालेले दिसतात.

२. राजकीय सहभागाची समस्या : वाढत्या प्रमाणात लोकांचा सहभाग राजकीय प्रक्रियेमध्ये होणे, हे आधुनिक व्यवस्थेचे ठळक वैशिष्ठ आहे. रॉबर्ट-डहाल यांच्या मते, राजकीय सहभागात पुढील चार वर्गाचा समावेश

होतो. १) सत्ताधारी वर्ग, २) सत्तेसाठी प्रयत्न करणारा वर्ग, ३) राजकारणात आवड असलेला वर्ग, ४) राजकारणात उदासिन वर्ग असे वर्गीकरण करून रॉबर्ट डहाल यांनी राजकीय सहभागाची संकल्पना मांडली असली तरी आधुनिक राजकीय व्यवस्थेत सत्ताधारी वर्ग किंवा सत्तेसाठी प्रयत्न करणारा वर्ग हा समाजातील अल्पसंख्य, दुर्बल, कमकूवत गटांना राजकीय सत्तेपासून दूर ठेवले जाते, त्यांना सत्तेतत सामावून घेतले जात नाही किंवा राजकीय प्रक्रियेत त्यांना प्रवेश नाकारला जातो. त्यावेळी अधिमान्यतेचा पेचप्रसंग निर्माण होतो, असे लिपसेट यांचे मत होते. हा असंतुष्ट गट क्रांतीचा मार्ग स्विकारून व्यवस्थेला धक्का पोहचवण्याचा धोका असतो. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी 'सर्वसमावेशक राजकीय सहभागाची प्रक्रिया राबवणे गरजेचे आहे. त्यामुळे व्यवस्थेला धोका कमी होवून 'अधिमान्यतेची समस्या' होणार नाही.

३. कार्यक्षमतेचा अभाव : समाजशास्त्रज्ञ हेबरमास आणि लिपसेट यांनी सांगितले आहे कि सत्ताधारी कोणीही असो उदा. राजकीय श्रेष्ठीजन, प्रशासकीय अधिकारी, इत्यादींनी परिस्थितीनुसार येणाऱ्या समस्या संकटे यांचे निराकरण कार्यक्षमपणे समर्थपणे केले तर त्यांना अधिमान्यतेचा प्रश्न निर्माण होत नाही. पण युद्ध, आर्थिक अस्थिरता, दारिद्र्य, बेकारी इत्यादी समस्याबाबत जर राजकीय व्यवस्थेने किंवा राजकीय श्रेष्ठीजनांनी याचे निराकरण योग्य प्रकारे केले नाही तर अधिमान्यतेचा पेचप्रसंग निर्माण होऊ शकतो. बेजबाबदारपणा, अकार्यक्षमता, नाकर्तेपणासारख्या राज्यकर्त्यांच्या वर्तनामुळे सामान्य जनतेला त्याचे वाईट परिणाम भोगावे लागतात. अशावेळी जनता त्या राजकीय व्यवस्थेचा किंवा राजकीय श्रेष्ठीजनांचा पाठिंबा काढून घेतात. सहाजिकच त्यावेळी अधिमान्यता धोक्यात येते. त्यासाठी कार्यक्षमतेचा अभाव हा 'अधिमान्यतेचा पेचप्रसंग निर्माण करण्यास कारणीभूत ठरतो' असे मत लिप्सेट यांनी मांडले.

ब) स्वयं अध्ययन प्रश्न ३ : एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. अधिमान्यता म्हणजे काय?

२. एस. एम. लिप्सेट यांनी कोणत्या मासिकात अधिमान्यतेची संकल्पना स्पष्ट केली?

३. 'Political Man' हा ग्रंथ कोणी लिहिला?

४. लेजिटीमसी (Legitimacy) हा शब्द कोणत्या लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे?

५. अधिमान्यतेचा एक आधारभूत घटक सांगा.

४.४ पारिभाषिक शब्द :

१) राजकीय विश्लेषण : राजकीय सिद्धांताचे नवीन स्वरूप

२) राजकीय सत्ता : इच्छेनुसार बदल करण्याची क्षमता

३) व्यक्तीसापेक्ष : व्यक्ती व्यक्तीनुसार बदलणारी

४) परिस्थिती सापेक्ष : विशिष्ट परिस्थितीनुसार निर्माण होणारी

५) **सत्ताधारी :** ज्याच्या हातात सत्ता आहे, अशी व्यक्ती किंवा गट

६) **भ्रामक :** अस्तित्वात नसलेली

७) **अमिष सत्ता :** कोणतेतरी लालूच दाखवून निर्माण केलेली सत्ता

८) **मनोविश्लेषणवाद :** मानसशास्त्रातील एक आधुनिक दृष्टिकोण

९) **प्रतिकात्मक :** विशिष्ठ प्रतिकावर आधारित

१०) **वैधानिक :** कायदेशीर

४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

(अ)	१) राजकीय सत्तेचा,	२) सत्ता,	३) चार्लस मेरियन,
	४) जॉर्ज कॅटलीन,	५) तीन,	६) सिग्मन फ्रॉईड,
	७) ॲरिस्टॉटल,	८) ऑगस्ट काम्त,	९) हर्बर्ट स्पेन्सर,
	१०) व्यक्तीस्वातंत्र्य,	११) चार्लस् मरियन,	१२) लोकमत.
(ब)	१) Auctor (ऑक्टर),	२) अधिसत्ता,	३) अधिसत्ता,
	४) प्रतिकात्मक,	५) धर्म-परंपरा-रूढी,	६) संविधानाची,
	७) तीन,	८) विलफ्रेडो परेरो,	९) कार्ल मार्क्स.

(क) १) सत्ताधारकांना जनतेची मान्यता किंवा संमती असणे म्हणजे अधिमान्यता होय.

२) Political Science Review या मासिकात.

३) एस. एम. लिपसेट

४) 'Legitimus' या लॅटीन शब्दापासून

५) विचारसरणी, व्यक्तिमत्त्व, रूढी, परंपरा संकेत.

४.६ सरावासाठी स्वाध्याय :

अ) टिपा लिहा.

१) राजकीय सत्तेचा अर्थ

२) राजकीय सत्तेचा मार्क्सवादी दृष्टिकोन

३) अधिसत्तेचा अर्थ

४) दिव्यवलयी अधिसत्ता

५) अधिमान्यतेचा आधार-विचारसरणी

६) मार्क्सचा वर्गसंघर्ष सिद्धांत

ब) सविस्तार प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) राजकीय सत्तेचा अर्थ सांगून राजकीय सत्तेचे प्रकार स्पष्ट करा.

२) राजकीय सत्तेचा उदारमतवादी लोकशाही सिद्धांत स्पष्ट करा.

३) अधिसत्ता म्हणजे काय? अधिसत्तेचे प्रकार स्पष्ट करा.

४) अधिमान्यता म्हणजे काय? अधिमान्यतेचे आधारभूत घटक स्पष्ट करा.

५) राजकीय सत्तेचा समाजशास्त्रीय सिद्धांत स्पष्ट करा.

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१) डेव्हीड इस्टन : 'The Decline of Modern Political Theory', The Journal of Politics, 1 Feb, 1951

२) जे एस. मिल. : 'Utilitarianlism', London Parkar Son & Brown, 1863.

३) डॉ. भा. ल. भोळे : राजकीय सिद्धांत आणि संकल्पना, पिंपळापुरे. (१९८६)

४) वा. भा. पाटील : राजकीय सिद्धांत, प्रशांत, जळगाव. (२०१५)

५) व्होरा आणि पळशीकर : राज्यशास्त्र कोष, दास्ताने प्रकाशन, नागपूर. (१९८७)

६) जे. एस. मिल : स्वातंत्र्याविषयी

७) राम बापट : कार्ल मार्क्सचा विचार

८) प्रा. बी. बी. पाटील : राजकीय सिद्धांत, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

९) तिजारे, पेशवे : आधुनिक राजकीय सिद्धांत, मंगेश, नागपूर. (१९७९)

१०) चि. ग. घांग्रेकर : राज्यशास्त्र सिद्धांत आणि राजकीय विचार, मंगेश नागपूर. (१९९४)

११) डॉ. विजय देव : राजकीय विश्लेषण कोष, डायमंड, पुणे. (१९८८)

१२) Varma, S. P. : 'Modern Political Theory', Vikas, N. Delhi. (1975)

❍❍❍

घटक –१

प्लेटो (Plato)

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ जीवन परिचय

१.२.२ प्लेटोची अभ्यासपद्धती

१.२.३ प्लेटोचा न्यायसिद्धांत

१.२.४ प्लेटोची शिक्षणपद्धती

१.२.५ प्लेटोचा साम्यवाद

१.२.६ प्लेटोचे आदर्श राज्य

१.२.७ प्लेटोचे उपआदर्शराज्य

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

१.५ स्वंय–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

१.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासात आपल्याला

- प्लेटो या ग्रीक विचारवंताच्या विचारांचा अभ्यास करता येईल.
- यामध्ये त्याचे पूर्व चरित्र व त्याच्यावर पडलेला प्रभाव यांचा अभ्यास करता येईल.
- प्लेटोच्या अभ्यासपध्दतीचा आढावा घेता येईल.
- प्लेटोचा न्यायाचा सिध्दान्त अभ्यासता येईल, त्याचबरोबर प्लेटोपूर्वी प्रचलित असलेले न्यायसिद्धान्त व प्लेटोने त्यांचे केलेले खंडण अभ्यासता येईल.

- प्लेटोच्या शिक्षणपद्धतीचे महत्व अभ्यासता येईल.
- प्लेटोच्या साम्यवादाचा उद्देश अभ्यासता येईल. त्यामध्ये संपत्ती व स्त्रियांचा (कुटुंबाचा) साम्यवाद अभ्यासता येईल.
- त्याच्या शिक्षणपद्धती व साम्यवादातून निर्माण होणारे आदर्श राज्य याची माहिति होईल.
- आदर्शराज्यातील त्रूटी दूर करून त्याने मांडलेले उपआदर्श राज्याविषयीचे विचार अभ्यासता येतील.

१.१ प्रास्ताविक :

राजकीय विचारांचा आरंभ जरी प्लेटोपूर्वी झाला असला तरी राजकीय विचारांचा वैज्ञानिक दृष्टीकोणातून विचार प्रथम प्लेटोनेच केला हे मान्य करावे लागेल. सॉक्रेटीस आणि सोफीस्ट् विचारवंतांनी जनतेमध्ये राजकीय विचाराबद्दल जरी उत्सुकता निर्माण केली असली तरी अशा राजकीय विचारांना क्रमबद्ध आकार देण्याचे श्रेय प्लेटोलाच द्यावे लागेल. सोफिस्ट आणि सॉक्रेटीस यांनी ग्रीक राजकीय विचारात कोणतीही भर घातलेली असो. त्यांनी सूत्रबद्ध राजकीय विचार मांडलेले नाहीत राजकीय प्रश्नावर शास्त्रीय पध्दतीने लिहिणारा विचारवंत म्हणून प्लेटोचा उल्लेख करावा लागेल. त्याचा शिष्य ॲरिस्टॉटल व प्लेटो यांचे लिखाण म्हणजे युरोपच्या बौद्धिक विश्वातील फार मोठी भरारी आहे. प्लेटोनी आपल्या लिखाणात महत्त्वाचे विचार मांडले आहेत.

१.२ विषय-विवेचन :

१.२.१ जीवन परिचय :

प्लेटोचा जन्म इ. स. पूर्व ४२७ मध्ये ॲथेन्स येथे झाला. त्याचे घराणे कुलीन होते. प्लेटोच्या वडिलांचे नाव पेरीकरियन आणि आईचे नाव एरिस्टीज होते तो लहान असतानाच ॲथेन्स व स्पार्टा यांच्या युद्धात ॲथेन्सचा पराभव झाला. ॲथेन्सच्या सत्ताधारी वर्गात प्लेटोचे अनेक नातेवाईक होते. स्पार्टाच्या वर्चस्वाखाली तीस सर्वसत्ताधिकाऱ्यांचे ॲथेन्ससाठी जे मंडळ होते, त्यात प्लेटोचे काही नातेवाईक होते.

त्या काळातील वरिष्ठ वर्गीय मुलाप्रमाणे प्लेटोचे लहानपणी शिक्षण झाले. तरूणपणी तो सॉक्रेटिसच्या सहवासात आला आणि सॉक्रेटिसच्या विचारांचा त्याच्यावर प्रभाव पडला. ॲथेन्समधील लोकशाही प्रेमी लोकांनी सॉक्रेटिसचा विष देऊन खून केला. सॉक्रेटिसच्या मृत्यूने प्लेटोच्या जीवनाला वेगळे वळण मिळाले. ग्रीक नगरराज्याच्या राजकारणात भाग घेण्याऐवजी तो तत्वज्ञ बनला. राजकारण आणि तत्वज्ञान यांचा परस्परांशी त्याने इतका मेळ घातला की राजा तत्वज्ञानी असणे आवश्यक झाले. सॉक्रेटिसच्या मृत्यूनंतर प्लेटोने लवकरच ॲथेन्स सोडले. मेगॅरा, सिरीन, इजिप्त, लोअर इटली, सिसिली, इराण, बॅबिलोनिया, हर्बिया इत्यादी देशाना त्याने भेटी दिल्या व आदर्शराज्य निर्मितीच्या दृष्टीने विचार केला. जवळ जवळ बारा वर्षे प्रवास करून प्लेटोने विविध देशांच्या राजकीय परिस्थितीचा व तेथील विचारप्रणालींचा अभ्यास व निरीक्षण केले.

इ. स. पूर्व ३८८-३८७ मध्ये प्लेटोने ॲथेन्स येथे ॲकॅडमीची स्थापना केली. ॲकॅडमी स्थापण्याच्या पाठीमागे त्याचे दोन हेतू होते. पहिला म्हणजे केवळ ज्ञान मिळविण्याच्या लालसेने व शास्त्रशुध्द पद्धतीने

विद्येचा अभ्यास व्हावा; व दुसरा हेतू असा की मिळविलेले ज्ञान माणसाचे हित साधण्यासाठी वापरावे. ॲकॅडमीत शिक्षण देत असताना झालेल्या विविध सवांदांचा एक संग्रह म्हणजे त्याचा 'रिपब्लिक'(Republic) हा ग्रंथ होय. मुळची तल्लख बुध्दी, त्यात प्रवास व संकटामुळे परिपक्व झालेल्या अनुभवाची भर, तरूण पिढीस जनहितार्थ शिक्षण देऊन तयार करण्याची आंतरिक तळमळ यामुळे ॲकॅडमीस चांगले यश मिळाले. ॲकॅडमीत सर्व ग्रीसमधून निरनिराळ्या प्रांतातील तरूण येवून शिकून गेले. या संस्थेतून अनेक तत्वेवेत्ते, राजकारणी पुरुष व सेनापती निर्माण झाले. ॲकॅडमीचे काम पहात असताना प्लेटोने तत्वज्ञान, निती, राजकारण, अध्यात्म इत्यादी विषयक विविध ग्रंथ लिहिले होते. हे अध्ययन अध्यापनाचे कार्य इ. स. पूर्व ३४७ पर्यंत (मृत्यूपर्यंत) म्हणजे वयाच्या ८० वर्षापर्यंत चालू ठेवले.

प्लेटोवर पडलेला प्रभाव :

१) तत्कालीन परिस्थिती :

कोणत्याही विचारवंतावर तत्कालीन परिस्थितीचा प्रभाव पडत असतो. विचारवंत, तत्वज्ञ हे त्यांच्या काळाचे अपत्य असतात, त्यामुळे त्या काळातील आवश्यकतांनी प्रभावित होऊन ते सिद्धान्त प्रस्थापित करत असतात. प्राचीन ॲथेन्समधील अस्ताव्यस्त राजकीय परिस्थितीचा प्लेटोच्या मनावर फारच सखोल परिणाम झाला. ॲथेन्स व स्पार्टा ही नगरराजे युध्दात गुंतली होती. त्यांच्यातील संघर्षाचे विपरीत परिणाम दिसू लागले होते. अनेक प्रकारच्या शासनपध्दतीचा प्रयोग होऊन गेला होता. कुलीन तंत्र आणि प्रजातंत्र यांना भगदाडे पडली होती. लोकशाहीच्या बुरख्याआड सर्रास अत्याचार सुरू होता. सॉक्रेटिसारख्या महान विचारवंताचा बळी गेला होता. अशा वेळी आदर्शप्रणालीची समाजाला आवश्यकता होती, या गोष्टीचा प्रभाव पडल्याने प्लेटोने त्याच्या 'रिपब्लिक' या ग्रंथात आदर्श राज्याची कल्पना मांडली.

२) सॉक्रेटिसचा प्रभाव :

प्लेटोच्या विचारावर सर्वात अधिक प्रभाव सॉक्रेटिसचा पडला. सॉक्रेटिसच्या सान्निध्यात तो सॉक्रेटिसच्या मृत्यूपर्यंत राहीला. सॉक्रेटिसच्या विद्वत्तेचा व ज्ञानाचा सखोल परिणाम त्याच्यावर झाला. सद्‌गुण हेच ज्ञान आहे व ज्ञान हाच सद्‌गुण आहे. या सॉक्रेटिसच्या तत्वज्ञानाचा प्लेटोवर सखोल परिणाम झाला व त्यातूनच त्याची तत्वज्ञ राजाची कल्पना उदयास आली. प्लेटोच्या शिक्षणाचा सिद्धान्त व न्यायाचा सिद्धान्त म्हणजे सॉक्रेटिसचा प्लेटोवर झालेला प्रत्यक्ष परिणामच होय.

३) ग्रीकमधील नगरराज्यांचा प्रभाव :

प्लेटोने निरनिराळ्या देशात भ्रमंती करून तेथील राज्यपद्धतीचा अभ्यास केला, इतर राज्यातील विचारप्रणालीचाही त्याच्यावर प्रभाव पडला आहे. प्लेटोच्या साम्यवादाच्या कल्पनेवर स्पार्टाच्या व्यवस्थेचा प्रभाव दिसून येतो.

४) ग्रीक तत्त्वज्ञानाचा प्रभाव :

सेलन, थेलीस, डेमॉक्रीटस, लायकर्गस, ऑर्किटॅस, पायथॉगोरस इत्यादी ग्रीक तत्वज्ञांच्या तत्वज्ञानाचा प्लेटोने अभ्यास केलेला होता. त्यामुळेच प्लेटोने मांडलेल्या राजकीय विचारांची बैठक तात्विक स्वरूपाची होती. तत्वज्ञानाच्या अभ्यासामुळे तो आदर्श राज्याच्या कल्पनेकडे झुकलेला दिसतो.

५) डायोनिसियचा परिणाम :

सिसिलीच्या डायोनिसियला (राजाला) आदर्श शासक बनविण्याचा प्लेटोने प्रयत्न केला, परंतु त्यात त्याला अपयश आले. आदर्श शासक बनविण्यात अनंत अडचणी आहेत, याची प्लेटोला कल्पना आली त्यानूसार हळूहळू वास्तवादाच्या दृष्टीकोणातून प्लेटो विचार करू लागला. त्यातूनच त्याने 'दि स्टेटस्मन' आणि 'दि लॉज' हे ग्रंथ लिहिले. या ग्रंथात प्लेटोचा आदर्शवाद कमी होऊन व्यवहाराच्या पातळीवर प्लेटो उतरला आहे असे दिसून येते.

प्लेटोची ग्रंथसंपदा :

प्लेटोने जवळ जवळ ३६ ग्रंथ लिहले 'ॲपॉलॉजी' आणि 'क्रिटो' या ग्रंथात त्याने राज्य व व्यक्तीचे संबंध व्यक्त केले आहेत. 'मिनो' मध्ये ज्ञान व प्रशिक्षणाचा विचार केला आहे. 'चार्मिडिज' आणि 'लॅकेज' मध्ये आत्मसंयमाच्या गुणांचा उल्लेख आहे. 'प्रोटोगोरस' व 'गोर्जिया' हे त्याचेच ग्रंथ आहेत. प्लेटोच्या ३६ ग्रंथापैकी राजकीय अभ्यासाच्या दृष्टीने त्याचे तीन ग्रंथ महत्वाचे आहेत.

१) दि रिपब्लिक (The Republic)

२) दि पॉलिटिक्स किंवा स्टेटस्मन (The Politics or The Statesman)

३) दि लॉज (The Laws)

१.२.२ प्लेटोची अभ्यासपद्धती :

विचार किंवा भाव व्यक्त करण्याची (शैली) म्हणजेच पद्धती होय. प्लेटोने अवलंबलेल्या पद्धतीवर सॉक्रेटिसचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. सॉक्रेटिसप्रमाणे प्लेटोने संवादात्मक पध्दती वापरली. वादविवादाच्या रूपात जेव्हा लोक आपले विचार व्यक्त करतात त्यावेळी त्यांच्या कल्पना व्यवस्थित समजू शकतात. वादविवादामुळे सत्याची पारख होते. संवादात्मक पद्धतीमुळे सत्य आणि वास्तविक ज्ञानाचा विजयच होतो. संवादात्मक पद्धतीने असत्य आणि अवास्तविकता दूर होते. प्लेटोच्या ग्रंथात लहान लहान उपमा कथा आणि अलंकार यांची रेलचेल आहे. पण त्यात प्लेटोने आपला वास्तवतेवरील जोर ढळू दिलेला नाही.

प्लेटोने सदृश्यतेचा प्रयोग (Use of Analogy) आपल्या पद्धतीत केला आहे. मानवी जीवनातील आणि पशूंच्या जीवनातील साम्यांचा उपयोग करून त्याने आपले लिखाण हृदयस्पर्शी बनविले आहे. राज्याच्या संरक्षकाची तुलना त्याने कुत्र्याशी केली आहे. त्याच्यामते संरक्षकाचा स्वभाव हा कुत्र्यासारखा असावा, शत्रुवर त्याने तुटून पडावे व परिचित व्यक्तीचे स्वागत करावे. अशाच प्रकारे मनुष्याच्या वंशासंबंधी विचार करताना त्याने

जनावरातील सादृश्याचा उपयोग केला. जनावरे जशी विशिष्ठ काळातच (मोसमात) गर्भदानात रत राहतात त्याचप्रमाणे माणसाचे असावे, स्त्री व पुरूषांनी याच पद्धतीने अस्थायी रूपात एकत्र यावे. याचबरोबर प्लेटोने आगमनात्मक व निगमनात्मक पद्धतींचाही उपयोग केला आहे.

१.२.३ प्लेटोचा न्यायसिद्धान्त (Plato's Theory of Justice) :

प्लेटोच्या 'रिपब्लिक' या ग्रंथाने दुसरे नाव 'Concerning Justice' असे आहे. ग्रंथाच्या नावावरूनच त्याने न्यायाला किती महत्व दिले आहे याची प्रचिती येते. न्याय हा प्लेटोच्या 'रिपब्लिक'चा मुख्य सिध्दान्त आहे. प्लेटोचे आदर्श राज्य हे मूळ न्यायावर आधारलेले आहे किंवा त्याच्या आदर्श राज्याचा आधार न्याय हाच आहे. न्यायाशिवाय आदर्श राज्याची कल्पनाच करता येणार नाही. प्लेटोने या ग्रंथात पूर्वी प्रचलित असलेल्या विविध न्यायविषयक सिद्धान्तांचे खंडण केले आहे. प्लेटोची न्यायविषयक कल्पना नैतिकतेवर आधारलेली होती. समाजात शांतता, सुव्यवस्था, संघटन आणि न्याय प्रस्थापित होत असेल तरच आदर्श राज्य निर्माण होऊ शकते, असे प्लेटोचे मत होते. प्लेटोने आपल्या न्यायसिद्धान्ताद्वारे 'व्यक्तीला आपल्या कर्तव्याची जाणीव करून समाजातील इतर व्यक्तींच्या कर्तव्याला हानी न पोहचविता प्रत्येकाने आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे व विकास साधला पाहिजे असे सांगितले' मानसशास्त्रीय दृष्टीकोणातून विचार करून त्याने असा सिद्धान्त मांडला की भिन्न व्यक्ती भिन्न प्रकारची कार्ये करतील पण ती करत असतानाही ते त्या एकतेच्या सुत्रात बांधलेल्या राहतील आदर्श समाजाला घातक ठरणाऱ्या गोष्टी दूर करून व मनुष्याला आपल्या कर्तव्यशिलतेची जाणीव करून देवून त्यांना संघटीत ठेवण्याचे कार्य प्लेटोचा न्यायसिद्धान्त करतो.

सिद्धान्ताचे कारण :

प्लेटोच्या काळी अॅथेन्सची अवस्था अतिशय वाईट झाली होती. सर्वत्र स्वार्थ व सत्ता पिपासू यांचे साम्राज्य पसरले होते. अॅथेन्सच्या अधिकाऱ्यांनी सत्तेचा भयानक गैरवापर सुरू केला होता. अपरिपक्व राज्यकारभार, परस्परांत हस्तक्षेप, गटबाजी व राजकीय स्वार्थ हे त्याकाळचे चित्र होते. त्यामुळे राज्यकारभाराकडे सर्वांचे दुर्लक्ष झाले होते. यातुनच निस्वार्थी सेवा व स्वतःचे कार्य लक्ष केंद्रीत करून इतरांच्या हस्तक्षेपा विना करणे अशी पद्धत निर्माण करणे जरूरीचे होते. त्यासाठीच प्लेटोने न्यायाचा नवा सिद्धान्त मांडला. त्यानुसार समाजाचे तीन भागात विभाजन व प्रत्येक भागाने स्वतःचे कार्यक्षेत्र केंद्रीत करून ते पार पाडणे, यातुन राजकीय स्पर्धा नाहीशी होवून राज्याचे ऐक्य व सुसंवाद प्रस्थापित होईल असे प्लेटोला वाटत होते. यामधूनच त्याचा न्यायसिद्धान्त आस्तित्वात आला.

प्लेटोने न्यायाची व्याख्या करताना असे म्हटले की ''प्रत्येक व्यक्तीला ती गोष्ट प्राप्त व्हावी जी तिला प्राप्य आहे'' म्हणजेच प्लेटोने योग्यता आणि शिक्षणाच्या अनुरूप व्यवहारांसाठी व्यक्तीला पात्र ठरविले.

प्लेटोने आपली न्यायाची कल्पना स्पष्ट करताना पूर्वी प्रचलित असलेल्या न्यायसंबधीच्या सिद्धान्तांचे खंडण केले. प्लेटोने ज्या न्यायसिद्धान्ताचे खंडण केले ते पुढीलप्रमाणे-

१) न्यायाचा परंपरागत सिद्धान्त (सिफॉलसचा सिद्धान्त) (The Theory of Cephalus) **:**

प्लेटोच्या 'रिपब्लिक' ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात न्यायविषयक सिद्धान्त सिफॉलस व पॉलिमारकस यांनी मांडला. सिफॉलसच्या मते, भाषणात सत्यता असणे, कार्यात श्रेष्ठत्व असणे, आणि ईश्वराचे व मनुष्याचे ऋण फेडणे हाच खरा न्याय होय. सिफॉलसचा मुलगा पॉलिमारकस् यांने वडिलांच्या पश्चात न्यायाच्या परंपरावादी सिद्धान्ताचे प्रतिनिधीत्व केले. त्यांच्या मते, मित्रांचे चांगले करणे व शत्रुचे वाईट करणे, मित्राशी मित्रत्वाची आणि शत्रुशी शत्रुत्वाची वर्तणूक करणे म्हणजे न्याय होय. सत्य बोलणे आणि घेतलेली वस्तू ज्याची त्याला परत देणे म्हणजे न्याय होय. म्हणजेच एकंदरीत न्यायाचा परंपरागत सिद्धान्त असा होता की, न्याय की एक कला असून ती मित्रांना सुख देण्यात व शत्रूंना दुःख देण्यात सामावलेली असते.

प्लेटोने न्यायाच्या परंपरागत सिद्धान्ताचे खंडण केले आहे. त्याच्यामते, एखादा मनुष्य वेडा झाल्यावर त्याचे शस्त्र त्याला करणे हा काही न्याय ठरू शकणार नाही. त्याचबरोबर या परंपरागत न्यायसिद्धान्ताप्रमाणे न्याय समान तत्वावर मिळणार नाही. हा सिद्धान्त मित्र व शत्रू यांना वेगवेगळा न्याय देतो. कारण मित्र कोण व शत्रू कोण याची पारख करणे कठीण असते. एखादी व्यक्ती वाईट म्हणून त्या व्यक्तीशी वाईटच व्यवहार केला तर ती व्यक्ती पहिल्यापेक्षाही अधिक वाईट होईल. पण हा न्यायाचा उद्देश राहू शकत नाही. परंपरावादी सिद्धान्तानुसार न्याय हा देश, काळ, परिस्थितीनुरूप बदलतो परंतु न्याय हा सर्व ठिकाणी, सर्व परिस्थितीत, सर्व काळात सारखाच असतो. देश काल परिस्थितीनुसार अपराधाच्या मान्यता बदलू शकतात पण न्यायमार्ग सर्व ठिकाणी एकच पाहिजे परंपरागत दृष्टीकोणातील दोष दाखवून प्लेटोने तो सिद्धान्त चुकीचा असल्याचे स्पष्ट केले. परंपरावादी न्यायाची कल्पना एका मर्यादेपर्यन्त आंशिक रूपात उपयुक्त वाटत असली तरी त्या कल्पनेच्या खोलात शिरल्यास अनेक अडचणी आणि परस्पर विरोधी तत्वे समोर उभी राहतात. तसेच न्याय ही एक कला आहे हे तत्व अयोग्य वाटते उदा. एखाद्या वैद्याला शल्यचिकित्सेची कला अवगत असेल, म्हणून तो जर मनात आणील तर एखाद्या रोग्यास जीवदान देवू शकेल किंवा एखाद्या रोग्याला मारून टाकू शकेल. तेव्हा न्याय ही कला आहे असे म्हणणे चूकीचे ठरेल. म्हणून प्लेटोने न्यायाच्या परंपरागत सिद्धान्ताचे खंडण केले आहे.

२) न्यायाचा क्रांतिकारी सिद्धान्त (The Theory of Thracysmachus) :

थ्रेसीमाकस् हा क्रांतिकारी सोफिस्टांचे प्रतिनिधित्व करतो. त्याच्यामते, ''शक्तीशाली व्यक्तीची इच्छा म्हणजे न्याय'' न्याय म्हणजे शक्तीशाली व्यक्तीचा लाभ आहे (Justice is the interest of Stronger) शक्तीशाली व्यक्ती लाभासाठी जो कायदा बनविल तोच न्याय असतो. व्यवहारात बळी तो कानपिळी हाच सिद्धान्त सर्वत्र चालत आलेला दिसतो. शक्तीशाली शासकाची आज्ञा म्हणजे न्याय होय. सबल, सशक्त लोकांनी केलेले कायदे दुर्बल, अशक्त लोकांनी पाळावेत आज्ञापालन करणे म्हणजे न्याय होय. आज्ञाभंग किंवा कायदाभंग म्हणजे अन्याय होय. जो आज्ञाभंग करेल तो दंडास पात्र ठरेल. कायदा व न्याय शासकाच्या हितासाठी असतो. 'थ्रेसिमाकस्च्या मते, ''अन्यायी व्यक्ती न्यायशील व्यक्तीपेक्षा अधिक सुखी असते. म्हणून शासक वर्गाने अन्यायी वृत्तीने वागावे; म्हणजे त्यांचे जीवन सुखी होईल'' अन्यायी व्यक्ती स्वतःच्या हितासाठी कार्य करते तर न्यायी व्यक्ती राज्याच्या हितासाठी कार्य करते. अन्याय करणे हे स्वभावतःच चांगले असते

आणि अन्याय सहन करणे वाईट असते. समाजात अन्यायी माणसाला अधिक प्रतिष्ठा व मान असतो. अन्यायीपणाने वागणे हीच सुखाची गुरूकिल्ली आहे. असे त्याचे मत होते.

प्लेटोने या क्रांतिकारी सिद्धान्ताचे खंडण केले आहे. त्याच्यामते, शासकाची प्रत्येक कृती न्यायी असू शकत नाही. ज्यावेळेला शासक त्याच्या सत्तेचा वापर अन्यायी पध्दतीने करतो तेव्हा त्याचे कार्य समाजहितास अपायकारक असते. प्लेटोच्या मते न्याय हा मुळातच दुर्बलांच्या हितासाठी असतो. न्यायाची उभारणी ही तर त्याचसाठी झालेली असते. प्लेटोच्या मते ''शासकवर्ग स्वतःच्या सुखासाठी राज्य करीत नसून तो प्रजेच्या सुखासाठी राज्य करतो, त्यामुळे खरा न्यायी शासनकर्ता हा शक्तीशाली व शहाणा असून तो अन्यायी माणसापेक्षा अधिक सुखी असतो.'' अशा रितीने प्लेटोने क्रांतिकारी सिद्धान्ताचे खंडण केले आहे.''

३) न्यायाच्या व्यवहारवादी सिद्धान्त (The Theory of Glaucon) **:**

क्रांतिकारी सिद्धान्ताच्या विरोधी असा हा न्यायसिद्धान्त आहे. या सिद्धान्ताचे प्रतिनिधित्व ग्लाकन करतो. त्याच्यामते, न्याय हे एक कृत्रिम तत्व आहे. निसर्गावस्थेचा आधार घेवून त्याने हा सिद्धान्त मांडला त्याच्या मते, निसर्गावस्थेत बलवान लोक मनमानी करत होते, तर दुर्बल अन्याय अत्याचार सहन करीत होते. या अत्याचाराला विरोध म्हणून त्यांनी आपापसात करार केला. त्यानुसार कायद्याचे स्वरूप निश्चित करण्यात आले. शक्तीशाली व्यक्तींच्या भितीमुळे संघटीत होऊन दुर्बल लोकांनी आपल्या रक्षणासाठी कायद्याची व न्यायाची निर्मिती केली. म्हणून न्याय कृत्रिम आहे. या करारावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे, न्याय हा भितीमुळे निर्माण झाला आहे. भिती हा न्यायाचा आधार आहे. बलवान लोकांच्या अन्यायापासून वाचण्यासाठी दुर्बलांनी काही नियम प्रस्थापित केले, त्या नियमांचे पालन म्हणजे न्याय व त्या नियमांची अवहेलना म्हणजे अन्याय, ग्लाकन थ्रेसिमाकस प्रमाणे न्याय म्हणजे बलवानांची इच्छा मानीत नाही तर दुर्बलांची आवश्यकता मानतो. प्लेटोच्या मते, न्याय ही कृत्रीम व्यवस्था नाही. न्याय हा आत्म्याचा गुण आहे. ती एक आंतरिक स्थिती आहे. कायदे पाळले जातात ते शक्तीच्या आधारावर नव्हेत तर ते त्यांनी स्वतःच्या इच्छेने बनविलेले असतात, म्हणून समाजाच्या इच्छेचे साकार रूप म्हणजे कायदा आहे. व्यवहारवादी सिद्धान्त मनुष्याला स्वार्थी ठरवून कायद्याला कृत्रिम मानतो. प्लेटोने या तिन्ही सिद्धान्ताचे खंडण करून आपला स्वतःचा सिद्धान्त मांडला.

प्लेटोचा न्याय सिद्धान्त :

इतरांच्या न्यायसिद्धान्ताचे खंडण केल्यानतंर प्लेटो आपला न्यायविषयक सिद्धान्त स्पष्ट करतो. त्यावेळच्या राजकीय व सामाजिक आजारांवर न्याय हाच एकमेव उपाय आहे, असे प्लेटो म्हणतो. प्लेटोची न्यायाची कल्पना नैतिकतेवर आधारलेली आहे. त्याच्यामते आदर्शराज्यातच न्याय प्रस्थापित होवू शकते. राज्यात न्याय निर्माण होण्यासाठी चारित्र्याची आणि सद्‌गुणांची वाढ होणे आवश्यक असते. आपला न्यायसिद्धांत प्रथम मानवी स्वभावाच्या विश्लेषणाने प्लेटो त्याचा आरंभ करतो. त्याच्यामते प्रत्येक व्यक्ती समाजात राहून आपली योग्यता व आवड लक्षात घेवून कार्य करील तर समाजाचे अधिकतम कल्याण होईल. प्रत्येक व्यक्तीने कर्तव्यपालन चोख करावे, इतरांच्या कार्यात हस्तक्षेप करू नये. न्याय म्हणजे आंतरिक इच्छेची अभिव्यक्ती आहे.

त्याच्या मते प्रत्येक व्यक्तीत तीन प्रकारच्या भावना असतात.

(१) वासना (Appetite) (२) साहस (Spirit) (३) बुद्धी (Wisdom) या तिन्ही भावनांचा योग्य असा समन्वय एखाद्या व्यक्तीमध्ये होत असेल तर ती व्यक्ती न्यायी असेल. परंतु या तिन्ही भावना व्यक्तीत सारख्या प्रमाणात नसतात. एखाद्या व्यक्तीत बुद्धीची भावना प्रखर असते तर एखाद्या व्यक्तीत वासना तीव्र असते. काही लोकांमध्ये साहसी वृत्ती अधिक आढळते. त्यामुळे समाजात काही व्यक्ती वासनाप्रधान, काही साहसप्रधान तर काही बुद्धीप्रधान असतात. प्लेटोच्या मते वासनाप्रधान लोक उत्पादक कार्य चांगल्या प्रकारे करू शकतात. बुद्धीप्रधान लोक शासनकार्य कुशलतापूर्वक करू शकतात. तर साहसप्रधान लोक आंतरिक व बाह्य रक्षणाचे म्हणजेच सैनिकांचे कार्य अधिक चांगल्या रितीने करतात. वरील विश्लेषणातून हे स्पष्ट होते की आपला न्यायसिद्धांत मांडताना मानवी स्वभावाच्या विश्लेषणाने प्लेटो त्याचा आरंभ करतो. वरील प्रमाणे प्रत्येक व्यक्ती समाजात राहून आपली पात्रता व कल लक्षात घेऊन कार्य करील तर समाज आदर्श अवस्थेत पोहचेल प्रत्येक व्यक्तीने आपले कार्य त्यावर लक्ष केंद्रीत करून पार पाडावे आणि इतरांच्या क्षेत्रात ढवळाढवळ करू नये. न्याय म्हणजे आंतरिक इच्छेचे प्रगट स्वरूप आहे. ज्याला आपण नितिमत्ता म्हणतो तोच न्याय आहे. असे फॉस्टर प्लेटोच्या न्यायाच्या संदर्भात म्हणतो. वरील विचाराचे विवरण पुढील कोष्टकात व्यवस्थितपणे दाखविता येते.

	व्यक्तीचा आंतरिक गुण	**समाजगटातील वर्ग**	**समाजगटातील कार्य**
१.	बुद्धी (विवेक)	शासक (राजकर्ते)	राज्यकारभार चालविणे, शासन प्रशासनाची कार्ये
२.	साहस (शौर्य)	सैनिक	राज्यात शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करणे, परक्रापासून राज्याचे रक्षण करणे.
३.	वासना	उत्पादकांचा वर्ग	उत्पादन, श्रम, शेती, व्यापार करणे, राज्याच्या विकासात भर घालणे.

१) **तत्वज्ञ राज्यकर्त्यांचा वर्ग –** समाजातील बुद्धीवादी, ज्ञानी लोकांचा हा सर्वश्रेष्ठ वर्ग होय. या वर्गाचा ज्ञान, विवेक, शहाणपण हा विशेष गुण असतो. या वर्गाने आपल्या ज्ञानाच्या, आधारे राज्यकारभार, प्रशासन चालवायचे असते.

२) **सैनिकाचा वर्ग –** साहस, शौर्य, धैर्य अशा गुणांनी युक्त असणारा हा वर्ग होय. राज्याच्या संरक्षणासाठी सैनिकांची आवश्यकता असते. त्याचबरोबर अंतर्गत शांतता, सुव्यवस्था, राखण्याची जबाबदारी त्यांची असते. सैनिकवर्गाने शौर्याबरोबर सभ्यता, स्वामिनिष्ठा, कर्तव्य तत्परता इ. गुणांची जोपासना केली पाहिजे.

३) **श्रमिकांचा वर्ग –** समाजाच्या भौतिक गरजा भागविण्यासाठी वस्तूंचे उत्पादन करणारा हा वर्ग होय. शेतकरी, कामगार, व्यापारी व इतर व्यवसाय करणाऱ्या लोकांचा यामध्ये समावेश होतो. प्लेटोच्या मते हा वर्ग वासनाप्रधान प्रवृत्तीचा असून तो फक्त श्रम करण्याच्या पात्रतेचा असतो.

वरील तीन वर्गाशिवाय त्या काळात अँथेन्समध्ये जनतेचा आणखी एक वर्ग होता. तो गुलामांचा होता. या वर्गाचा उल्लेख प्लेटोने कुठेही केला नाही. त्या काळात गुलामाला पशुसारखीच वागणूक मिळत होती. जनावराप्रमाणे गुलामांची बाजारात विक्री होत असे. त्यांना एकही नागरी हक्क दिलेला नव्हता. त्यांना नागरिकत्वाचा दर्जा नव्हता. त्याकाळी गुलामगिरीची प्रथा होती. त्यामुळेच कदाचित प्लेटोने या वर्गाकडे दुर्लक्ष केलेले असावे.

प्लेटोच्या न्यायसिद्धांताची वैशिष्ट्ये :

१) **हस्तक्षेपाचा अभाव –** प्लेटोची न्यायव्यवस्था प्रत्येकाने स्वतःचे कार्य स्वतःवर लक्ष केंद्रीत करून पार पाडावी आणि इतरांच्या क्षेत्रात हस्तक्षेप करू नये अशी होती. प्लेटो म्हणतो एका व्यक्तीने एकच कार्य पार पाडावे परस्परांच्या क्षेत्रात हस्तक्षेप होऊ लागला तर संघर्ष आणि सर्वनाश अटळ आहे.

२) **कार्यविशेषज्ञता –** प्लेटोच्या न्यायसिद्धांताची उभारणी ही कार्य विशेषज्ञतेच्या तत्वावर झाली आहे आणि त्याचे आदर्श राज्य ही कार्यविशेषज्ञतेच्या आधारावर अवलंबून आहे. एका माणसाने एकच कार्य करावे व त्यावर आपले लक्ष केंद्रीत करावे ही कल्पना त्यामागे आहे.

३) **व्यक्तीवादाच्या विरोधी –** प्लेटोचा न्यायसिद्धांत व्यक्तीवादाच्या विरोधी जाणारा आहे. प्लेटोच्या मते व्यक्तीने आपण स्वतः कोणीतरी वेगळे आहोत असे न मानता आपण राज्याचे अंग आहोत असे मानले पाहिजे. व्यक्तीने आपल्या हक्कांचा विचार न करता कर्तव्याचा विचार केला पाहीजे असे प्लेटोचा न्याय सिद्धांत सांगतो.

४) **सुसंवाद –** प्लेटोची न्यायाची कल्पना सामाजिक सुसंवादावर आधारलेली आहे. न्यायाच्या आधारे राज्यात एकतेची स्थापना केली जाईल व राज्याच्या विविध अंगात समतोल स्थापन केला जाईल असा समतोल वासना, साहस, बुद्धी या गुणात सुसंवाद स्थापन करून निर्माण केला जाईल.

५) **न्यायाचे आंतरिक स्वरूप –** प्लेटो न्यायाला बाह्य बाब मानत नाही, त्याच्या मते न्याय आत्म्याचा गुण आहे आणि माणसाच्या अंतर्मनाचा तो एक भाग आहे. संपूर्ण समाजाला त्यापासून निश्चित असा फायदा होतो.

६) **राज्य म्हणजे व्यक्तीचे विस्तारीत रूप –** व्यक्ती आणि राज्य यांच्यात संपूर्ण असे साम्य आहे त्याच्या मते राज्य म्हणजे व्यक्तीचे विस्तारीत स्वरूप आहे व्यक्ती व राज्य यांच्यातील एकरूपता हे प्लेटोच्या न्याय व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे.

न्यायसिद्धांताचे परीक्षण :

प्लेटोच्या न्याय सिद्धांतावर पुढीलप्रमाणे टीका केली जाते.

१) प्लेटोची विचारसरणी कायद्यापासून अलिप्त :

प्लेटोची न्यायाची कल्पना ही नैतिक भावनेतून निर्माण झाली असून मानवी आत्मा, मानवी भावना आणि प्रवृत्ती या आधारावर प्लेटोने न्यायाची कल्पना स्पष्ट केली आहे. त्यामुळे या विचारसरणीने कायद्यापासून फारकत घेतली आहे. म्हणूनच प्लेटोच्या न्यायविषयक विचारांना 'सिद्धांत' म्हणता येणार नाही.

२) आधुनिक युगात अशक्य :

आधुनिक काळात प्लेटोचा न्यायसिद्धांत लागू होवू शकत नाही. कारण आज नगरराज्ये आस्तित्वात नाहीत. आजचा राज्याच्या आकार व लोकसंख्या प्रचंड मोठी आहे. एवढ्या मोठ्या राज्याचे तीन भागात विभाजन करणे शक्य नाही, त्यामुळे त्यांची कामे ही निश्चित करणे शक्य नाही त्यामुळे हा सिद्धांत आजच्या परिस्थितीत शक्य नाही.

३) व्यक्तीविकास व व्यक्तिस्वातंत्र्यास मारक :

प्लेटोने सामाजिक न्यायावर अधिक भर दिला आहे. तो व्यक्तीच्या अधिकारापेक्षा केवळ व्यक्तीच्या कर्तव्यावर भर देतो. वास्तविक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी अधिकाराची, स्वातंत्र्यांची आवश्यकता असते. त्यामुळे हा सिद्धांत व्यक्तीविकास व व्यक्तीस्वातंत्र्यांच्या दृष्टीने मारक ठरतो.

४) सर्वंकष सत्तावादी राज्याची निर्मिती :

राज्यकर्त्यांच्या कार्यक्षेत्रात कोणालाही हस्तक्षेप करता येत नसल्याने राज्यकर्त्यांची हुकूमशाही निर्माण होवू शकते प्लेटोच्या न्यायपद्धतीने व्यक्तीचे राज्यात दुय्यम स्थान निर्माण झाले आहे. मुठभर राज्यकर्त्यांच्या मर्जीनुसारच असंख्य लोकांना राज्यात रहावे लागणार आहे.

५) हस्तक्षेपाची आवश्यकता :

प्लेटोने त्याच्या न्यायसिद्धांतामध्ये एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीच्या कार्यात हस्तक्षेप करू नये असे म्हटले आहे परंतु अनेकवेळा असा हस्तक्षेप आवश्यक असतो. समाजातील वर्गात संघर्ष होत असेल तर शांतता प्रस्थापित करण्यासाठी राज्यकर्त्यांचा हस्तक्षेप आवश्यक असतो. त्याचबरोबर सैनिक वर्गानेच जर स्वतःच्या मर्जीने इतरांवर आक्रमण सुरू केले तर राज्यकर्त्यांना स्वस्थ कसे बसता येईल?

६) साम्यवादाची अयोग्य कल्पना :

प्लेटोच्या न्यायव्यवस्थेत राज्यकर्त्यासाठी साम्यवादाची योजना आखण्यात आली आहे. शासक व सैनिक यांच्यासाठी त्याने संपत्तीचा व स्त्रियांचा साम्यवाद सांगितला आहे. साम्यवादामुळे त्यांना संपत्ती व स्त्रीचा मोह राहणार नाही व ते आपल्या कार्याकडे लक्ष केंद्रीत करतील असे प्लेटोला वाटते. वासनांपूर्तीसाठी त्यांनी

स्त्रीयांशी अल्पकाळ सहवास करावा असे तो म्हणतो म्हणजेच त्यांने केवळ माणसाच्या वासना या भावनेकडे लक्ष दिले परंतु आंतरिक भावनेकडे दिले नाही.

७) समतेच्या तत्वाविरोधी :

प्लेटोच्या न्यायसिद्धांताने समाजाचे तीन वर्ग पाडले असून बुद्धीवादी वर्गास फार महत्व दिले आहे. तर उत्पादक वर्ग हा राज्याचा पाठीचा कणा असून त्याला कनिष्ठ स्थान दिले आहे. प्लेटोच्या या सिद्धांतामुळे एक विशेषाधिकार असलेला वर्ग निर्माण होतो, त्यामुळे सामाजिक विषमता वाढते व समतेचे वातावरण नष्ट होते.

८) एकाच वेळी माणसात अनेक प्रवृत्ती असू शकतात :

प्लेटोच्या मते माणसात वासना, साहस, बुद्धी या पैकी एक प्रवृत्ती प्रधान असते पण म्हणून माणसात कायम एकच प्रवृत्ती प्रधान असते असे म्हणता येणार नाही. कारण निरनिराळ्या परिस्थितीत मनुष्यातील निरनिराळ्या प्रवृत्ती प्रबल असू शकतात.

१.२.४ प्लेटोची शिक्षणपद्धती (Plato's Theory of Education) :

प्राचीन ग्रीक नगरराज्यामध्ये शिक्षणाला फार महत्व होते. प्लेटोने सुद्धा आपल्या विचारामध्ये शिक्षणावर फार मोठा भर दिला आहे. प्लेटोच्या मते शिक्षण ही एक कला आहे. प्राचीन ग्रीक समाजात कलेची संकल्पना अशी होती की अपूर्ण अवस्थेमधील साहित्य हाताशी घेवून आपल्या कौशल्याच्या व अनुभवाच्या आधारावर त्याला पूर्णावस्था प्राप्त करून देण्याचा तो एक मार्ग आहे. उदा. खाणीतून काढलेला दगड ओबडधोबड असतो तो अपूर्णावस्थेत असतो. त्यावर छन्नी-हातोड्याचे हळूवार आघात करून त्यातून आपल्या कल्पनेतील मूर्ती साकार केली जाते. म्हणून मूर्तीकाराची हातोटी अगर प्रक्रिया ही एक कला आहे, त्याचप्रमाणे अज्ञानी अवस्थेतील अपरिपक्व मनांची जबाबदारी घेवून त्यांना संस्कारक्षम करून सुसंस्कृत व प्रगल्भ बनविणे हे शिक्षणकलेचे कार्य आहे. राज्यातील मुलांना उत्तम नागरिक बनविणे हे तत्वज्ञ पालकांचे कर्तव्य आहे. नवजात अर्भकातून शासक व सैनिक वर्गाचे गुण बनविणे हे तत्वज्ञ पालकांचे कर्तव्य आहे. प्लेटोची भाषा काव्यात्मक व रूपकांनी नटलेली आहे. तो म्हणतो तांबे, रूपे, सोने हे भूगर्भात दडलेले असते. त्यापैकी कोठे काय उपलब्ध होईल हे जाणण्याची दृष्टी असणाऱ्याला त्याचा लाभ होईल. तसेच उत्पादक, सैनिक व शासक या वर्गासाठी कोणकोणती नवजात अर्भके अनुरूप आहेत हे ठरविण्याचे काम तत्वज्ञ पालकांच्या सूक्ष्म दृष्टीलाच करता येईल. परंतु प्रत्यक्षात शिक्षणाची योजना आखताना मात्र प्लेटोने आपली दृष्टी फक्त सैनिक व शासक वर्गापुरतीच मर्यादित ठेवली आहे.

प्लेटोने आपल्या रिपब्लीक या ग्रंथामध्ये शिक्षणावर इतका जोर दिला आहे की रूसोने तर या ग्रंथाला शिक्षणावरील सर्वोत्कृष्ठ ग्रंथ म्हटले आहे. प्लेटोच्या मते आदर्श राज्य तेव्हाच निर्माण करता येईल की जेव्हा शिक्षणाद्वारे व्यक्तीमध्ये सुधारणा करून त्यांना राज्याच्या कार्यास योग्य बनविले जाईल. मानवाला आदर्श राज्याची दिशा दाखविणारे शिक्षण हेच योग्य साधन आहे शिक्षणामुळेच मनुष्य आपल्यासमोरील समस्या समजू शकतो. आणि संकटाशी सामना करू शकतो. शिक्षणामुळे माणसाच्या मूळ प्रवृत्तीत फरक पडू शकतो.

त्याच्यातील स्वार्थाची भावना दूर करून त्याला परोपकारी बनविता येते.

न्यायतत्व क्रियाशिल करण्यासाठी त्याने शिक्षणाला आधार बनविले प्लेटोच्या शिक्षणावर विचार करताना बार्करने असे म्हटले आहे की, ''शिक्षण म्हणजे अशी सामाजिक प्रक्रिया आहे की जी समाजाचा एक घटक या नात्याने व्यक्तीमध्ये चेतना निर्माण करते व समाजाच्या प्रती आपले कर्तव्य निभावण्यास शिकवीते. शिक्षणामुळे व्यक्तीला समाजात उचित स्थान मिळते. अज्ञानरूपी अंधकार नष्ट करून ज्ञानाची ज्योत लावण्याचे कार्य शिक्षण करते.''

प्लेटोच्या शिक्षणाचा उद्‌देश :

१) निरनिराळ्या वर्गात कर्तव्याची भावना निर्माण करणे.

२) व्यक्तीव्यक्तीमध्ये समाजहिताची भावना निर्माण करणे.

३) सत्य शोधून काढणे.

शिक्षण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. समाजाचा एक मौल्यवान घटक या नात्याने ते व्यक्तीस प्रेरणा देते व समाजाशी आपले कोणते कर्तव्य आहे याची व्यक्तीला जाणीव देते.

प्लेटोच्या शिक्षणाची वैशिष्ट्ये :

१) राज्य नियंत्रित शिक्षण :

शिक्षणाने व्यक्तीचे चारित्र्य घडविले जाते व कर्तव्यासंबंधी निस्वार्थी भावना शिकविली जाते. शिक्षण हे इतके महत्वाचे आहे की ते खाजगी क्षेत्राकडे सोपविणे प्लेटोला अतिशय धोकादायक वाटते. राज्याच्या हितासाठी व सुसंवादासाठी नागरिकांना शिक्षण मिळणे व तेही राज्याकडून मिळणे त्याला आवश्यक वाटते.

२) मानसिक व शारीरिक विकास साधण्याचा प्रयत्न :

प्लेटोने त्याच्या शिक्षणपद्धतीच्या माध्यमातून व्यक्तीचा मानसिक व शारीरिक विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठीच त्याने आपल्या शिक्षण योजनेत संगीत व व्यायाम यांना अतिशय महत्वाचे स्थान दिले आहे. प्लेटोच्या शिक्षण योजनेत मन व शरीर यांना समान महत्व आहे उत्तम शरीरात उत्तम मन वास करते यावर प्लेटोचा दृढ विश्वास होता.

३) स्त्री-पुरूषांसाठी समान शिक्षण :

त्याची शिक्षणपद्धती फक्त पुरूषांकरिता मर्यादित नसून ती स्त्रियांसाठी देखील आहे. जुन्या अ‍ॅथेन्समध्ये फक्त पुरूषांनाच शिक्षण घेण्याचा अधिकार असे. स्त्रियांना शिक्षणापासून वंचीत ठेवले जात असे. प्लेटोने स्त्री व पुरूष यांच्यासाठी समान शिक्षणाचा पुरस्कार प्लेटोने केला आहे. या संदर्भातील प्लेटोचे शिक्षण विषयक विचार क्रांतिकारी वाटतात.

४) प्लटोची शिक्षण पद्धती केवळ शासक व सैनिक यांच्यासाठी :

त्याची शिक्षण पद्धती ही केवळ वरिष्ठ वर्गासाठी असून त्याने उत्पादक वर्गाचा विचार केला नाही. प्लेटोने जरी अनिवार्य शब्द वापरला असला तरी त्याचा अर्थ सर्व व्यक्ती असा होत नाही, ज्या व्यक्ती शिक्षण घेण्यास लायक आहेत त्या व्यक्ती असाच त्याचा अर्थ होतो.

५) ॲथेन्स व स्पार्टा येथील शिक्षण पद्धतीचा संगम :

दोन्ही नगरराज्यातील शिक्षणपद्धतीमधील दोष दूर करून स्वीकारल्या आहेत. ॲथेन्सच्या बौद्धिक शिक्षणाला त्याने स्पार्टाच्या शारीरिक शिक्षणाची जोड दिली. ॲथेन्सच्या शिक्षणाच्या वैयक्तीक रूपाला त्याने स्पार्टाच्या सामाजिक रूपाची जोड देवून सुरेख संगम साधला आहे.

प्लेटोची शिक्षणाची योजना :

प्लेटोने आपल्या शिक्षण योजनेचे दोन टप्पे केले होते.

१) प्राथमिक शिक्षण (Primary Education)

२) उच्च शिक्षण (Higher Education)

शिक्षण योजनेच्या पहिल्या भागात रिपब्लीक पुस्तकाच्या दुसऱ्या व तिसऱ्या भागात पालकवर्ग, राज्यकर्ते व सैनिक यांच्या शिक्षणाचा आराखडा दिला असून त्यामध्ये शरीर संवर्धन व बल यांचा समावेश आहे. दुसऱ्या भागात उच्च शिक्षणाची योजना असून ती तत्वज्ञ राज्यकर्तेतयार करण्यासाठी आहे. बालशिक्षणाच्या संदर्भात सविस्तर चर्चा प्लेटोने त्याच्या 'दि लॉज' या ग्रंथात केली आहे.

वरील वर्गीकरणाचा आधार व्यक्तीचे वय हा आहे. त्याचबरोबर व्यक्तीचा वर्ग हा देखील एक आधार आहे. प्राथमिक शिक्षण किशोरावस्थेपर्यत दोन्ही वर्गाना दिले जाते. परंतु उच्चशिक्षण प्रौढावस्थेमधील शासक वर्गासाठी आहे प्राथमिक शिक्षणाचा उद्देश भावनेचे परिमार्जन करून चारित्र्य निर्मिती करणे हा आहे.

अ) प्राथमिक शिक्षण :

प्राथमिक शिक्षणाचे विभाजन प्लेटो तीन भागात करतो.

१) वयाच्या ६ व्या वर्षापर्यंतचे शिक्षण :

प्राथमिक शिक्षणासाठी पहिल्या टप्यात म्हणजे वयाच्या ६ व्या वर्षापर्यंत बालकांना नीतीचे व धर्माचे पाठ शिकविले जातात. या काळात मुलांना गोष्टी, गाणी यातून शिक्षण द्यावे. धार्मिक गोष्टीतून त्यांच्यावर योग्य ते संस्कार करावेत. या वयात मुलांचे फाजील लाड करू नयेत व त्यांच्याशी फार कठोरतेने वागू नये असे तो म्हणतो.

२) वयाच्या ६ ते १८ वर्षापर्यतचे शिक्षण :

या टप्प्यातील मुलांना बैद्धिक आणि शारीरिक अशा दोन्ही प्रकारचे शिक्षण दिले जाते. याच वयोगटात संगितावरही विशेष भर दिला जातो. शारीरिक शिक्षणात घोड्यावर बसणे गोफण फिरविणे, बाणांनी अचूक नेम धरणे इत्यांदी प्रकारचा शिक्षणाचा समावेश असावा. संगीतामुळे मानवी मनाचा विकास होतो. कवायत, नृत्य, संघगीते याद्वारे मुलांना शिक्षण द्यावे असे त्याचे मत होते.

३) वयाच्या १८ ते २० वर्षापर्यंतचे शिक्षण :

तिसऱ्या वयोगटात सैनिकी शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे. शिस्त, संयम, आज्ञापालन या सर्व गुणांसाठी सैनिकी शिक्षण आवश्यक मानले जाते. याच काळात अंकगणित, भूमिती, ज्योतिषशास्त्र या विषयांचे शिक्षण द्यावे. व्यायाम हा शरीरासाठी प्रशिक्षण असतो तर संगीत हे मनाच्या विकासासाठी आवश्यक असते. दोन्हीमधून चारित्रसंवर्धन होते असे प्लेटोचे मत होते.

ब) उच्च शिक्षण :

प्लेटोने रिपब्लीक ग्रंथात उच्चशिक्षणाचा विचार केला आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एक चाचणी परीक्षा घेवून निवडक व हूशार विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षणासाठी पात्र ठरविले जाते. उच्च शिक्षणाची कालमर्यादा २० ते ३५ वर्ष असते. प्लेटोने उच्च शिक्षणाचे दोन टप्पे सांगितले आहेत.

१) २० ते ३० वर्षापर्यंत :

या वयोगटातील विद्यार्थ्यांना उच्च प्रकारचे शारीरिक व बौद्धिक शिक्षण दिले जाते. हे शिक्षण मूलगामी व तार्किक स्वरूपाचे असावे. विसाव्या वर्षापासून तिसाव्या वर्षापर्यंत गणित, विज्ञान ही शास्त्रे शिकविण्यात येतात. गाणित, विज्ञान, ज्योतिष, भूमिती, खगोल, तत्वज्ञान इत्यादी विषयांचा सखोल अभ्यास शिकविला जावा. तसेच त्यांना सैनिकी स्वरूपाचे शिक्षण दिले जावे. वयाच्या तिसाव्या वर्षी एक परीक्षा घेवून जे विद्यार्थी उत्तीर्ण होतील त्यांना पुढील शिक्षणासाठी निवडले जावे आणि जे या परीक्षेत नापास होतील त्यांना सैन्य व प्रशासन या क्षेत्रात अधिकाऱ्यांचा जागा दिल्या जाव्यात.

२) ३० वर्षानंतरचा टप्पा :

वयाच्या तिसाव्या वर्षानंतर अत्यंत निवडक अशा नागरिकांना उच्चशिक्षण देण्याचा क्रम सुरू होतो. हा कालखंड पाच वर्षासाठी असतो. या कालावधीत चिंतन मनन करण्यास शिकविले जाते. सत्य शोधून काढण्यासाठी त्यांची क्षमता वाढविली जाते. तत्वज्ञ राज्यकर्तेनिर्माण करण्यासाठी या टप्प्यात विद्यार्थ्यांला सर्वोच्च ज्ञान प्राप्त करून घ्यावे लागते. तर्कशुद्ध आचार-विचार आणि सद्‌गुण या दृष्टीने व्यक्ती परिपूर्ण असली पाहिजे राजकारणी पुरूष व राजे यांना राजकारणात तत्वज्ञानाची गरज असते म्हणून त्यांना तत्वज्ञानाचे ज्ञान करून दिले पाहिजे असे प्लेटोचे मत होते. अशा प्रकारे ३५ व्या वर्षी शिक्षण पूर्ण झाल्यावर, विद्यार्थ्यांनी सार्वजनिक जीवनात भाग घ्यावा व नगरराज्याची नोकरी करावी अशी त्यांच्यावर सक्ती असावी.

३५ ते ५० वर्षापर्यंत त्यांच्या व्यावहारिक शिक्षणावर अधिक जोर देण्यात येतो. प्लेटोच्या मते ५० व्या वर्षापर्यंतच्या परीक्षांच्या कसोटीला उतरणारे तत्वज्ञानीच खरे शासनाचे अधिकारी आहेत. अशा उच्चशिक्षण घेतलेल्या राज्यकर्त्यांनी जरूर पडेल त्यावेळी राज्यकारभार अंगावर घेण्यास तयार असावे. इतर वेळी 'श्रेयस' (गूढ) विचारात गढून राहावे.

प्लेटोच्या शिक्षण योजनेचे मूल्यमापन :

गुण :

१) ॲथेन्स व स्पार्टातील शिक्षण पद्धतीचा सुरेख संगम :

प्लेटोने त्याच्या शिक्षणविषयक विचारात ॲथेन्समधील व्यक्तीगत आणि खाजगी शिक्षण पद्धती आणि स्पार्टाची सामाजिक हिताची शिक्षण पद्धती यांचा मेळ घालून समाजाला पूरक व पोषक अशी शिक्षणपद्धती देण्याचे कार्य केले आहे.

२) ज्ञान म्हणजे सद्‌गुण :

ज्ञान म्हणजे सद्‌गुण हे तत्व प्लेटोने स्वीकारून ज्ञान प्राप्तीसाठी शिक्षणाची अत्यंत गरज आहे असे सांगण्याचे कार्य प्लेटोने केले. माणसाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी त्याचबरोबर आदर्श राज्यासाठी शिक्षण हे सर्वोत्कृष्ट साधन आहे असे प्लेटोने सांगितले.

३) योग्य वयात योग्य शिक्षण :

कोणत्या वयात कोणत्या प्रकारचे शिक्षण दिल्यानंतर बौद्धिक, शारीरिक, व मानसिक विकास होवू शकतो हे प्लेटोने सांगितले. तो फक्त शिक्षण विषयक माहिती देऊनच थांबला नाही तर त्याने प्रत्यक्षात ॲथेन्स येथे 'ॲकॅडमी' सुरूही केली होती.

४) पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांना शिक्षण :

प्लेटोने त्याच्या शिक्षण पद्धतीत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनाही शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून दिली आहे. इसवीसनापूर्वीच्या कालखंडात पुरूषांबरोबर स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार देणारा विचारवंत म्हणून प्लेटोने क्रांतिकारी पाऊल टाकले आहे.

५) शिक्षणाचा सर्वांगिण दृष्टीकोणातून विचार :

प्लेटोने शिक्षणविषयक योजना मांडताना सर्वांगिण विचार केला आहे. नैतिक, धार्मिक, भौतिक, शारीरिक, सांस्कृतिक, मानसिक अशा विविध दृष्टीकोणातून व्यक्तीचा सर्वांगिण विकास कसा होईल इकडे प्लेटोने अधिक लक्ष दिले आहे.

दोष / टीका :

१) फक्त राज्यकर्त्या वर्गासाठीच :

प्लेटोची शिक्षणपद्धती ही फक्त वरच्या वर्गासाठीच तयार केली आहे. त्याच्या शिक्षणयोजनेत कनिष्ठ वर्गाला अजिबात थारा नाही. त्याच्या या शिक्षण योजनेत श्रमिक व कष्टकरी यांचा कुठेही विचार केला नाही. इतकेच नव्हे तर प्राथमिक शिक्षणाची किमान योजना त्यांच्यासाठी कशी असेल याचाही तो विचार करत नाही एका वर्गाला उपेक्षीत ठेवून आदर्श राज्य कसे काय निर्माण होऊ शकेल,

२) अव्यवहार्य योजना :

प्लेटोची शिक्षणपद्धती केवळ पुस्तकी स्वरूपाची आहे. ती व्यवहारात उतरविणे फार अवघड आहे. अशा योजनेतून व्यवहारी व चतूर राजकारणी निर्माण होतीलच असे नाही. वास्तविक पाहता चांगले व आदर्श राज्यकर्तेनिर्माण करणे हे तर प्लेटोच्या शिक्षण पद्धतीचे ध्येय आहे.

३) राज्याच्या एकतेसाठी व्यक्तीमधील विविधतेचा बळी :

प्लेटोने सर्वासाठी एकसारख्या शिक्षणाची व्यवस्था करून राज्याच्या एकतेसाठी व्यक्तीतील विविधतेचा बळी दिला आहे. प्लेटोच्या शिक्षणयोजनेत विविधतेकडे लक्ष दिले असले तरी रूचीच्या विविधतेकडे या योजनेत लक्ष दिले गेले नाही.

४) स्त्री पुरूषांसाठी समान शिक्षण :

प्लेटोने स्त्री आणि पुरूषांसाठी एकाच प्रकारच्या शिक्षणपद्धतीची व्यवस्था सांगितली आहे. स्त्री आणि पुरूष बौद्धिक दृष्टीकोणातून सारखे असले तरी भावनात्मक आणि शारीरिक दृष्टीकोणातून स्त्री आणि पुरूष यात भेद असतो या गोष्टीकडे प्लेटोने लक्ष दिले नाही.

५) नैतिकतेच्या नावाखाली कला, साहित्य, संगीत राज्याच्या नियंत्रणाखाली :

नैतिकतेच्या नावाखाली प्लेटोने कला, साहित्य व संगीत राज्याच्या नियंत्रणाखाली ठेवले. वास्तविक नियंत्रीत असलेली कला, साहित्य, संगीत मनाला आनंद देवू शकत नाही. केवळ नैतिक उद्देश हाच कलेचा उद्देश राहतो तेव्हा ती कला इतरांच्या ह्दयाच्या तारा छेडू शकत नाही. लोकांच्या अंतर्मनाला ती स्पर्श करू शकत नाही. त्यांच्या विचारात ती परिवर्तन करू शकत नाही कलेचा आंनद उपभोगायला कला अनियंत्रीत असावी लागते ही गोष्ट प्लेटोने विचारात घेतली नाही.

६) प्रदिर्घ व कंटाळवाणी योजना :

प्लेटोच्या शिक्षणाची योजना अत्यंत प्रदीर्घ स्वरूपाची किचकट व कंटाळवाण्या स्वरूपाची आहे. जगाच्या कोणत्याही भागात, कोणत्याही काळात अशी पद्धत अस्तित्वात आली नसेल वयाच्या ३५ व्या वर्षापर्यंत शिक्षण घेणारी व्यक्ती आयुष्यात कोणतेही कार्य धडाडीने करू शकेल असे वाटत नाही कोणत्याही शिक्षणतज्ञाने किंवा मानसशास्त्रज्ञाने या पद्धतीला पाठींबा दिला नाही. ही शिक्षणपद्धती प्लेटोच्या स्वप्नाळू

आदर्शवादाचे एक प्रतीक आहे असे म्हणता येईल.

७) ज्ञानी माणसे सद्‌गुणी असतातच असे नाही :

'ज्ञानी माणसे सद्‌गुणी असतात' हे प्लेटोचे तत्व चूकीचे वाटते. कारण प्रत्यक्ष व्यवहारात न शिकलेली अज्ञानी, अडाणी माणसेही सद्‌गुणी असलेली दिसतात. म्हणून केवळ ज्ञानाने माणूस नीतीवान व सद्‌गुणी होईल असे म्हणता येणार नाही.

८) विविधता नष्ट होते :

प्लेटोने सर्वांसाठी एकसुरी व समान शिक्षणपद्धती स्पष्ट केली आहे. त्यामुळे राज्याचे ऐक्य साधण्यासाठी त्याने विविधता मात्र नष्ट करून टाकली आहे. शिक्षणयोजनेत विविधता असणे गरजेचे आहे. प्लेटोने न्यायाच्या आधारावर राज्य निर्माण करण्याचे ठरविले हे त्याच्या शिक्षणपद्धतीचे ध्येय आहे परंतु राज्याच्या विकासाकडे लक्ष देताना तो व्यक्तीला मात्र फार दुय्यम स्थान देतो.

९) गणितावर अतिरिक्त भर :

प्लेटोने सांगितलेल्या अभ्यासक्रमात गणित व तर्कशास्त्र या विषयावर वाजवीपेक्षा जास्त भर दिलेला आहे. साहित्य, प्रशासन, कला इत्यादी अभ्यासविषयांकडे प्लेटोने दुर्लक्ष केले आहे.

अशा पद्धतीने प्लेटोच्या शिक्षणविषयक विचारावर टीका होत असली तरी त्याने मांडलेल्या शिक्षण-विचारांचे महत्व कमी होत नाही, कारण प्लेटोचा त्यामागील उदात्त हेतू लक्षात घेता त्याचे महत्व नाकारता येणार नाही.

१.२.५ प्लेटोचा साम्यवादाचा सिद्धांत (Plato's Theory of Communism) :

आदर्श राज्याची स्थापना करणे हे प्लेटोचे ध्येय होते. व्यक्तीला राज्याच्या अनुरूप बनविण्यासाठी त्याने शिक्षणाची आखणी केली होती. परंतु माणसाचा स्वभाव ध्यानात घेता फक्त शिक्षणाने आदर्श राज्य निर्माण होईल असे वाटत नव्हते, म्हणून प्लेटोने त्याच्या रिपब्लिक या ग्रंथात 'साम्यवादाविषयीचे' विचार मांडले आहेत. आदर्श राज्याच्या निर्मितीसाठी अधिक तात्वीक स्वरूपात साम्यवादाची कल्पना स्पष्ट केलेली दिसते. त्यासाठी राज्यकर्त्यांच्या मनोवृत्तीतच बदल होणे आवश्यक आहे. राज्यकर्त्यांना भ्रष्ट करणाऱ्या मूळ कारणांचा त्यासाठी शोध घेणे आवश्यक होते. प्लेटोने साम्यवादाची योजना फक्त राज्यकर्त्या वर्गासाठी मांडली. राज्यकर्त्या वर्गाला भ्रष्ट करणाऱ्या दोन गोष्टी आहेत (१) स्त्री (२) संपत्ती म्हणून स्त्रियांचा व संपत्तीचा साम्यवाद ही धाडसी व क्रांतिकारी योजना प्लेटोने मांडली. संपत्ती व स्त्रियांच्या मोहानेच राज्यकर्तेभ्रष्ट होतात असे प्लेटोला वाटत होते. आपल्या कर्तव्यापासून विचलीत न होता निस्वार्थी भावनेने राजकारभार करायचा असेल तर खाजगी संपत्ती व कुटूंब यापासून राज्यकर्त्यांना अलग ठेवण्याची कल्पना प्लेटोने मांडली आहे. यातूनच प्लेटोचा साम्यवाद अस्तित्वात आला आहे. प्लेटोच्या या साम्यवादात राज्यकर्तावर्ग व संरक्षक वर्ग यांचे स्वतःचे कुटूंब

असणार नाही किंवा त्यांची स्वतःची संपत्ती असणार नाही. त्यामुळे वैयक्तीक मोहाची कोणतीही शक्यता नसल्याने आपले कार्य ते अधिक लक्ष केंद्रित करून पार पाडू शकतील. राज्यकारभारावर संपत्तीचा अत्यंत विपरीत परिणाम होतो असे प्लेटोला वाटते त्यासाठी त्याने संपत्ती व स्त्रियांचा साम्यवाद स्पष्ट केला. येथे एवढे मात्र ध्यानात घेणे जरून आहे की स्त्रिया व संपत्तीचा साम्यवाद सैनिक व शासनकर्त्यासाठीच सांगितला आहे. उत्पादक वर्गासाठी हा साम्यवाद नाही.

प्लेटोच्या साम्यवादी सिद्धांताचे स्वरूप समजावून घेण्यापूर्वी, त्याचा साम्यवाद मांडण्या पाठीमागे हेतू काय होता, हे पाहणे अधिक उपयुक्त ठरते. प्लेटोने साम्यवादी विचारसरणी मांडताना पुढील उद्देश गृहीत धरले होते.

★ आदर्श राज्यासाठी आदर्श राज्यकर्त्यांची जरूरी असते. त्याच्यासाठी शासनकर्ते, सैनिक हे शुध्द चारित्र्याचे निःस्वार्थी व तत्वज्ञ असले पाहिजेत, यासाठी प्लेटोने साम्यवादाची कल्पना मांडून राज्यकर्त्यांची कर्तव्ये व भूमिका स्पष्ट केलेली दिसते.

★ कांचन व कांता (संपत्ती व स्त्री) माणसाला भ्रष्ट करतात म्हणून राज्यकर्त्यांचे वर्तन शुद्ध राहण्यासाठी प्लेटोने संपत्ती व स्त्रियांचा साम्यवाद मांडला.

★ राजसत्ता व आर्थिकसत्ता एकत्र आल्या की राज्याचा नाश अटळ असतो. म्हणून या दोन्ही सत्ता परस्परापासून दूर ठेवण्यासाठी प्लेटोने संपत्तीचा साम्यवाद मांडला.

★ सुदृढ, निरोगी, आणि हुशार संतती निर्माण करण्याच्या दृष्टीने प्लेटोने साम्यवादी सिद्धांत मांडला. आदर्शराज्यासाठी सुदृढ व निरोगी असे राज्यकर्ते व अधिकारी सैनिक यांची गरज असते. या उद्देशाने प्लेटोने त्याच्या साम्यवादी सिद्धांताची मांडणी केलेली दिसते.

● **संपत्तीचा साम्यवाद (Communism of Property) :**

प्लेटो शासक व सैनिक यांना संपत्तीपासून दूर ठेवतो. शासक व सैनिक यांच्यासाठी त्याने 'संरक्षक वर्ग' हा शब्द वापरला आहे. राजकीय सत्ता व आर्थिक सत्ता यांना एकमेकापासून दूर ठेवण्यासाठी प्लेटोने संपत्तीचा साम्यवाद मांडला. शासनाची सत्ता आणि पैसा एकाच व्यक्तीच्या हाती केंद्रीत झाल्यास शासक निरंकूश होऊन मनमानी करतील असे प्लेटोला वाटत होते म्हणून त्याने आर्थिक सत्तेला शासन सत्तेपासून अलग केले. प्लेटोच्या मते राज्यकर्तेव सैनिक हे श्रीमंत ही असणार नाहीत व गरीब ही असणार नाहीत. जीवन जगण्यासाठी जेवढी संपत्ती आवश्यक आहे तेवढीच संपत्ती त्यांना दिली जावी. त्यांना स्वतःचे घर, जमीन, जूमला अशी खाजगी संपत्ती असणार नाही, त्यांची राहण्याची व जेवण्याची सोय राज्यसंस्थेमार्फत करण्यात येईल. प्लेटोने शासकांची जीवनर्याच दिली आहे शासक संपत्तीपासून दूर राहूनच राज्याची खरी सेवा करू शकतात. ते जेव्हा वैयक्तीक भूमी व संपत्ती धारण करू लागतील तेव्हा ते जनतेचे सेवक न राहता ते शोषणकर्ते ठरतील. आपल्या राष्ट्राच्या सर्वनाशाचा मार्ग ते मोकळा करतील.

प्लेटोला राज्याच्या संरक्षणाचे आणि शासनाचे कार्य अशाच व्यक्तींच्या हाती द्यायचे होते की ज्या साहसी व बुद्धीवादी असतील, प्रत्येकाला संपत्ती धारण करण्याची सवलत दिली गेली तर शासनकार्यात भाग

घेण्यासाठी बुद्धी ही योग्यता न राहता संपत्ती हीच योग्यता राहील असे प्लेटोला वाटत होते सबाईन च्या मते ''शासनावर संपत्तीचा पडणारा भयानक प्रभाव पाहून तो दूर करण्यासाठी प्लेटोने संपत्तीचा नाश केला.''

● **स्त्रियांचा साम्यवाद :**

प्लेटोच्या साम्यवादात सैनिकांना व राज्यकर्त्यांना मालमत्ता बाळगण्याचा अधिकार तर नाहीच पण त्याचबरोबर त्यांना कुटूंब बाळगण्याचा अधिकार देखिल नाही. कुटूंबाच्या भरभराटीसाठी मालमत्ता ही वाढवावीच लागते. म्हणून त्यांना कुटूंबसंस्था करण्याचा अधिकारच दिला गेला नाही तर त्यांनी मालमत्ता जमा करण्याचा प्रश्नच येत नाही. यासाठी प्लेटोने कुटूंबसंस्थाही नष्ट केली आहे. असे म्हटले सबाईन म्हणतो की, 'संपत्तीप्रमाणेच प्लेटोने विवाहसंस्थेचेही उच्चाटन केले आहे' वैवाहिक जिव्हाळ्यामुळे राज्यकर्ते राज्यकारभाराकडे पुरेसे लक्ष देवू शकत नाहीत थोडक्यात राज्यकारभारावर चांगल्या प्रकारे लक्ष केंद्रीत करता यावे म्हणून त्याने स्त्रियांचाही साम्यवाद मांडला.

स्त्रियांचा साम्यवाद मांडण्यापाठीमागे प्लेटोचा आणखी एक उद्देश होता तो म्हणजे त्या काळी प्रचलित असलेल्या विवाहपद्धती मध्ये अनुरुप आणि चांगल्या व्यक्ती जवळ येत नव्हत्या. रोगट व अयोग्य स्त्री पुरुष एकत्र आल्याने निर्माण झालेली संतती ही सुद्धा दुबळी, शक्तीहीन व सत्वहीन अशी जन्माला येत असे. आदर्श राज्य निर्माण होण्यासाठी चांगला शासक वर्ग व साहसी सैनिक वर्ग आवश्यक असतो. त्यासाठी सुदृढ स्त्रिया व सुदृढ पुरुष यांच्या मिलनातून बलवान निरोगी प्रजा निर्माण होणे जरूरी होते. तरच उत्तम राज्यकर्ता वर्ग व सैनिक वर्ग त्यातून निर्माण होवू शकला असता. प्लेटोने निवडक स्त्री पुरूषांनाच एकत्र येण्याची परवानगी दिली आहे. अशा स्त्री पुरूषांना मुले होईपर्यंत एकत्र राहण्याची परवानगी असेल, मूल झाल्यानंतर स्त्री-पुरुष पुन्हा विभक्त राहतील अशा मुलांच्या संगोपनाची जबाबदारी राज्यसंस्थेवर सोपविली जाईल. प्लेटोच्या मते अशा पद्धतीने निर्माण होणारी मुले उत्तम प्रकृतीची आणि बुद्धीमान असतात. त्यांना योग्य शिक्षण दिले तर त्यातून आदर्श राज्यकर्तेनिर्माण होऊ शकतात.

प्लेटोच्या या वरील विचारावर अशी टीका केली जाते की अशा मूलांचे संगोपन व संवर्धन शासनाने केल्याने त्यांना आपले आई-वडील ओळखू येणार नाहीत. त्यामुळे प्रेमाची व जिव्हाळ्याची भावना लोप पावेल परंतु याला प्लेटोचे उत्तर असे आहे की अशी मुले समाजातील सर्वच स्त्री-पुरूषांना आपल्या आई-वडीलांच्या ठिकाणी मानतील व समाजातील सर्वच स्त्री पुरूष या मुलांना आपलीच मुले समजतील साहजीकच समाजात प्रेमाची ऐक्याची भावना वाढीस लागेल.

● **संपत्तीच्या साम्यवादावर करण्यात येणारी टीका :**

१) या साम्यवादात उत्पादक वर्गाला स्थान नाही :

हा साम्यवाद फक्त वरच्या दोन वर्गापुरता मांडलेला असून तो समाजातील सर्व वर्गांची (घटकांची) काळजी घेत नाही म्हणून हा साम्यवाद नकारात्मक स्वरूपाचा आहे. वरच्या दोन वर्गापेक्षा संख्येने अनेक पट जास्त असलेल्या उत्पादक वर्गाकडे त्याने पूर्ण दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे समाजाचे दोन भागात कृत्रीम विभाजन झाले आहे.

२) माणसाच्या स्वभावाकडे दुर्लक्ष :

प्रत्येक माणसात संग्रह करण्याची प्रवृत्ती असते. आपली स्वतःची मालमत्ता असावी अशी आंतरिक इच्छा असते. परंतु या वरच्या दोन वर्गासाठी त्याने कोणतीच सवलत दिली नाही. त्यांना मालमत्ता धारण करण्याचा अधिकार नसल्यामुळे त्यांच्या व्यक्तीमत्व विकासात अडथळा निर्माण होतो.

३) नैसर्गिक इच्छा नष्ट केली आहे :

मालमत्ता बाळगणे ही प्रत्येक व्यक्तीची नैसिर्गिक इच्छा असते. मालमत्तेचा अधिकार नष्ट करणे म्हणजे माणसाची नैसर्गिक इच्छा मारण्यासारखे आहे. म्हणूनच प्रगत जगात मालमत्तेचा हक्क कोणत्याही राष्ट्राने हिरावून घेतला नाही. साम्यवादी व्यवस्थेचा स्वीकार केलेल्या राष्ट्रांनी सुद्धा व्यक्तीचा मालमत्तेचा हक्क डावललेला नाही.

४) गुलामाबद्दल स्पष्टीकरण नाही :

प्लेटोने उत्पादक वर्गास मालमत्ता बाळगण्याचा अधिकार दिला आहे. परंतु त्या काळी समाजाचा अविभाज्य भाग असणाऱ्या गुलामांना हा अधिकार आहे किंवा नाही याबद्दल प्लेटो काही सांगत नाही. बहुतेक गुलामांशिवाय राज्य आस्तित्वात राहू शकते हेच यातून प्लेटोला सुचवायचे असावे.

५) समाजाचे आर्थिक चित्र बदलत नाही :

प्लेटोच्या मालमत्तेच्या साम्यवादामुळे समाजाचे आर्थिक चित्र बदलत नाही. खरे पाहता संपत्तीच्या साम्यवादामुळे समाजात होणारे बदल हे तळापासून व्हायला हवेत परंतु या साम्यवादात तसे होताना दिसत नाही. उत्पादकांवर त्याचा कोणताही परिणाम होताना दिसत नाही.

६) राज्य साध्य व्यक्ती साधन :

राज्य हा अंतिम उद्देश मानून प्लेटोने व्यक्तीला साधन बनविले आहे. व्यक्तीने राज्यासाठी यंत्राप्रमाणे कार्य करणे चुकीचे आहे. राज्याप्रमाणे व्यक्तीलाही स्वतःचे व्यक्तीत्व आहे. या गोष्टीकडे प्लेटोने दुर्लक्ष केले आहे.

- **स्त्रियांच्या साम्यवादावरील टीका :**

१) व्यक्तीच्या नैसर्गिक प्रवृत्तीचा विचार केला नाही :

प्लेटोचा साम्यवाद हा समाजहिताच्या जाणिवेतून निर्माण झाला आहे. त्यामुळे त्याने मनुष्याच्या नैसर्गिक प्रवृत्तींचा विचार केला नाही. मनुष्य हा भावनाशील प्राणी आहे. कुटुंब करून राहणे त्याची सहज प्रवृत्ती आहे. परंतु प्लेटोने स्त्री-पुरूषांना एकमेकापासून अलग ठेवून त्यांच्या भावनांचा कोंडमारा केला आहे.

२) प्रजोत्पादनाची पद्धती कृत्रिम, अयोग्य, अनैतिक वाटते :

सुदृढ व बुद्धीमान स्त्री पुरूषांना एकत्र आणुन त्यांचा संयोग घडवून सर्वोत्तम नागरिक निर्माण करणे ही प्लेटोची कल्पना वास्तवात येणे कठीण आहे. अशा पद्धतीने जन्माला येणाऱ्या मुलांना आई-वडीलांचे प्रेम, वात्सल्य, ममता या गोष्टी मिळणार नाहीत आणि त्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास होणार नाही.

३) प्लेटोने स्त्री–पुरूषांना पशूच्या पातळीवर आणून सोडले आहे :

कृत्रीमरित्या स्त्री–पुरूषांनी मिलनासाठी एकत्र येणे हा सार्वजनिक व्यभिचार आहे. विकृती आहे. फक्त सुदृढ स्त्री–पुरूषांना वासना असते व दुर्बल स्त्री–पुरूषांना नसते; असे नाही त्यांच्या वासनेचे काय? हा प्रश्न अनुत्तरीत राहतो. फक्त पशूच मिलनापूरते एकत्र येतात मनुष्याचे तसे नसते.

४) राज्यकर्ते व सैनिक यांनी सामुदायिक जीवन जगण्याची कल्पना निरर्थक :

संपत्ती व विवाह यापासून अलिप्त राहून निवडक बुद्धीवादी राज्यकर्त्यांनी राज्यकारभार करणे किती कठीण गोष्ट आहे, याची जाणिव असूनही प्लेटोने या विचारावर भर दिलेला आहे.

५) विवाह एक संस्कार :

विवाह हा एक संस्कार असतो स्त्री व पुरूष फक्त संभोगासाठी एकत्र येतात ही प्लेटोची कल्पना चुकीची आहे. विवाह ही एक माणसाची नैसर्गिक गरज आहे याकडे प्लेटोने दुर्लक्ष केले आहे.

६) बालकांची मानसिक वाढ नीट होणार नाही :

प्लेटोच्या साम्यवादामुळे बालकांची मानसिक वाढ नीट होणार नाही व मानसिक दृष्ट्या एक दूर्बल पीढी यातून निर्माण होईल, वात्सल्य, प्रेम, जिव्हाळा या गोष्टी लहान मुलांच्या निकोप वाढीसाठी अत्यंत आवश्यक असतात हे प्लेटो विचारात घेत नाही.

- **ॲरिस्टॉटलने केलेली टीका :**

प्लेटोचा शिष्य आणि महान विचारवंत ॲरिस्टॉटल याने ही प्लेटोच्या साम्यवादावर टीका केली आहे.

१) प्लेटोच्या साम्यवादामुळे राज्यात एकता निर्माण होण्याऐवजी संघर्ष व फुटीर वृत्ती वाढीस लागेल असे तो म्हणतो.

२) उत्साहाने काम करण्यासाठी आणि व्यक्तीविकासासाठी संपत्ती आवश्यक असते. प्लेटोचा साम्यवाद व्यक्तीविकासास घातक आहे. असे ॲरिस्टॉटल म्हणतो.

३) संपत्ती माणसाला भ्रष्ट बनविते या एकाच गोष्टीकडे प्लेटो लक्ष केंद्रीत करतो. परंतु संपत्तीही प्रेरणाशक्तीदेखील आहे ही गोष्ट प्लेटो विसरतो. याकडे ॲरिस्टॉटल लक्ष वेधतो.

४) प्लेटोचा संपत्तीचा साम्यवाद हा ऐतिहासिकदृष्ट्या देखील दोषपूर्ण ठरतो. कारण ही साम्यवादी व्यवस्था जर खरोखरच चांगली असती तर ती समाजाने कधीतरी उपयोगात आणली असती.

५) स्त्री संबंधीचा साम्यवाद समाजात अनैतिकता पसरवितो. सुंदर स्त्रीसाठी पुरुषांमध्ये भांडणे होतील. पुरुष हा सौंदर्यवान स्त्रीकडे आकर्षित होतो. स्त्रीच्या सामुहिक स्वामित्त्वाच्या योजनेने अराजकता निर्माण होईल.

६) आई, वडील, मुलगा, मुलगी, भाऊ, बहीण यांना एकमेकांचे नाते माहित असणार नाहीत. त्यामुळे संभोगाच्या बाबतीत पशुमध्ये आढळणारी अनैतिकता निर्माण होईल.

७) कुटूंब ही नागरीजीवनाची प्राथमिक पाठशाळा आहे असे म्हटले जाते पण प्लेटोच्या साम्यवादाने कुटूंबसंस्थाच राहणार नाही. त्यामुळे आदर्श नागरिकही निर्माण होणार नाहीत.

८) राज्यातील सार्वजनिक मुलांची अवस्था अनाथालयातील मुलांसारखी होईल. त्यांची योग्य वाढ होणार नाही.

९) प्लेटोच्या साम्यवादाने उत्पादक वर्गाची उपेक्षा केली आहे. वास्तविक साम्यवाद प्रथम उत्पादक वर्गावरच लागू करायला हवा होता.

१०) प्लेटोचा स्त्रीसंबंधीचा साम्यवाद मानवी नैतिकतेच्या आणि पावित्रतेच्या कल्पनेवर जोरदार प्रहार करणारा आहे. व्यक्ती व कुटूंबाचा बळी देऊन एकतेचा प्रयत्न करणे कधीच उचित मानले जाऊ शकत नाही. असे ॲरिस्टॉटल म्हणतो.

प्लेटोच्या साम्यवादावर कितीही टीका झाली असली तरी प्लेटोचा साम्यवाद मांडण्यापाठीमागील उदात्त हेतू आपणास विसरता येणार नाही. राज्यकर्तेमोहामुळे भ्रष्ट होतात हे सार्वकालिक सत्य नाकारता येणार नाही. त्यासाठी प्लेटोचा उपाय अतिशयोक्तीपूर्ण वाटत असला तरी त्यापाठीमागचा त्याचा सद्हेतू आपणास विसरता येणार नाही.

प्लेटोचा साम्यवाद व आधुनिक साम्यवाद साम्य भेद :

साम्य :

१) प्लेटो त्याच्या आदर्श राज्यासमोर व्यक्तीला काही महत्त्व देत नाही. मनुष्य राज्यात राहूनच आपल्या उद्देशांची पूर्ती करू शकतो.

आधुनिक साम्यवादातही व्यक्तिला काहीच स्थान नाही, मनुष्य म्हणजे राज्यरूपी यंत्राचा केवळ एक भाग आहे.

२) प्लेटो हा तत्त्वज्ञ राज्यकर्तेव सैनिक या वर्गाकडे राजकारभाराची सूत्रे देतो तर आधुनिक साम्यवादात मार्क्स कामगारवर्गाच्या हाती सत्ता देतो.

३) प्लेटो आपल्या साम्यवादी राज्यात अधिकारापेक्षा कर्तव्यावर भर देतो. आधुनिक साम्यवाद देखील कर्तव्यावर अधिक भर देतो.

४) मनुष्यातील स्वार्थी वृत्तीकडे प्लेटोने लक्ष केंद्रीत केले आहे. मार्क्सनेसुद्धा माणसाच्या स्वार्थी वृत्तीकडेच अधिक लक्ष दिले आहे.

५) प्लेटोचा साम्यवाद हा शासक व सैनिकवर्ग यांना खासगी संपत्ती ठेवण्यास प्रतिबंध करतो. आधुनिक

साम्यवाद देखील खासगी संपत्तीचा विरोध करतो.

६) दोन्ही साम्यवादांनी माणसाच्या नैसर्गिक सहजप्रवृत्तीकडे दुर्लक्ष केले आहे. संपत्ती साठविणे, स्वातंत्र्यसुख उपभोगणे या मानवी मूलभूत प्रवृत्ती आहेत परंतु प्लेटो आणि मार्क्स या दोघांनीही मूलभूत प्रवृत्तीना महत्त्व दिले नाही.

७) प्लेटोचा साम्यवाद राज्यात एकता स्थापन करण्याचा प्रयत्न करतो. आधुनिक साम्यवाद आर्थिक समानता स्थापित करून राज्यात एकता निर्माण करण्याचा प्रयत्न करतो.

भेद –

१) प्लेटोचा साम्यवाद संपूर्ण समाजाला लागू पडत नाही. तो फक्त शासक व सैनिक यांच्यासाठीच आहे. तो उत्पादक वर्गाला लागू होत नाही.

तर आधुनिक साम्यवाद हा विशिष्ट वर्गासाठी नसून तो सर्व समाजाला लागू होतो.

२) प्लेटोच्या साम्यवादात वर्ग कायम राहतात, राज्य कायम राहते.

तर आधुनिक साम्यवादात मात्र वर्गविहिन समाजाची कल्पना आहे. श्रमिकांच्या हुकूमशाहीनंतर ज्य नष्ट होते.

३) प्लेटोचा साम्यवाद आर्थिक आणि कौटूंबिक असा दोन्ही प्रकारचा आहे. मात्र आधुनिक साम्यवाद हा फक्त आर्थिक आहे.

४) प्लेटोच्या साम्यवादाची कल्पना नगरराज्यातील अराजकतेमधून निर्माण झाली तर आधुनिक साम्यवादाची कल्पना आर्थिक विषमतेमधून निर्माण झाली आहे.

५) प्लेटोचा साम्यवाद एका राज्यापुरताच मर्यादित आहे. सर्व नगरराज्यांना एकत्र आणण्याचे स्वप्न प्लेटोने कधीच पाहिले नाही. आधुनिक साम्यवाद मात्र सार्वत्रिक स्वरूपाचा आहे. तो एक नवी व्यवस्था निर्माण करू इच्छितो, त्यामध्ये जगातील सर्व कामगारांची एकजूट आवश्यक आहे.

६) प्लेटोच्या साम्यवादात उत्पादनाच्या साधनावर राज्याचा अधिकार नव्हता परंतु आधूनिक साम्यवादात उत्पादनाची साधने ही राज्याच्या मालकीची असलेली दिसतात.

७) प्लेटोचा साम्यवाद ही नैतिकता व अध्यात्म यावर आधारलेला होता. परंतु आधुनिक साम्यवाद हा पूर्णपणे आर्थिक घटकांवर आधारलेला आहे.

८) प्लेटोच्या साम्यवाद कधीही प्रत्यक्षात येवू शकला नाही तो फक्त आदर्शच राहीला कोणत्याही देशाने त्याचा स्वीकार केला नाही. परंतु आधुनिक साम्यवाद मात्र व्यावहारीक स्वरूपाचा आहे. आज जगातील अनेक राज्ये आधूनिक साम्यवादाच्या प्रभावाखाली आहेत.

९) प्लेटोचा साम्यवाद हा उत्पादन वर्गाशी संबंधीत नाही त्यावर त्याचा काहीही परिणाम होत नाही. उत्पादनाची व्यक्तीवादी पध्दती तो बदलत नाही आधुनिक साम्यवाद मात्र आर्थिक व्यक्तीवादाच्या विरोधी आहे. उत्पादनाच्या सर्व साधनावर तो राज्याची मालकी सांगतो.

१०) प्लेटोच्या साम्यवादापाठीमागील कारण म्हणजे ॲथेन्स नगर राज्याचे होत असलेले अधःपतन होय. परंतु आधूनिक साम्यवाद उदयास येण्याचे कारण म्हणजे औद्योगिक क्रांतीचे निर्माण केलेले भयानक प्रश्न. विशेषतः आर्थिक विषमतेचा प्रश्न. या दोन्ही साम्यवादांचा उदय वेगवेगळ्या पार्श्वभूमीवर झाला.

अशा रीतीने प्लेटोचा साम्यवाद व आधुनिक साम्यवाद यामध्ये असलेला फरक दिसून येतो. प्लेटोने मांडलेला साम्यवाद तार्किक व काल्पनिक स्वरूपाचा होता. त्यामुळे तो कधीही आस्तित्वात आला नाही उलट आधुनिक साम्यवाद हा व्यवहारवादावर आधारलेला असल्याने विविध देशात साम्यवादी विचाराची राज्ये निर्माण झालेली दिसतात.

प्लेटोचा तत्वज्ञ राजा (Plato's Philosopher King) **:**

रिपब्लिक ग्रंथाच्या पाचव्या व सहाव्या भागात तत्वज्ञ राजाचे सविस्तर वर्णन प्लेटोने केले आहे. तो म्हणतो की, जो पर्यंत राजे तत्वज्ञ बनणार नाहीत आणि राजे हे तत्वज्ञ असणार नाहीत तो पर्यत नगरराज्यांचा नाश होत राहणे हे अटळ आहे. प्लेटोला आदर्शराज्य निर्मितीसाठी आदर्श असे तत्वज्ञ राज्यकर्ते निर्माण करायचे होते. त्याच्यामते राज्यात फारच थोडे लोक असे असतात की, जे बुद्धिवान व कार्यक्षम असतात. राज्यकारभार पाहण्यासाठी कुशल, बुद्धिमान आणि निस्वार्थी व्यक्तींची आवश्यकता असते. तत्वज्ञानी शासक स्वार्थापासून दूर राहून विवेकाने शासन करतील आणि अशा वेळी ॲथेन्सची विस्कटलेली घडी पूर्ववत होईल असे प्लेटोला वाटत होते व या परिस्थितीतून प्लेटोला तत्वज्ञ राज्यकर्त्यांची कल्पना सुचलेली होती. रिपब्लिक या ग्रंथाच्या आठव्या व नवव्या भागात प्लेटोने आपल्या शेजारच्या देशातील अनेक राज्यांचा परामर्श घेवून तत्वज्ञ राजाची निकड स्पष्ट केली आहे. ॲथेन्सची लोकशाही, स्पार्टाची अल्पजनशाही, आणि सिरॅक्यूजची हुकूमशाही हे प्रकार व्यर्थ व वाईट आहेत. कारण त्यात तीव्र व्यक्तिवाद आणि स्वार्थ फार बोकाळला होता. ॲथेन्सवर तर अज्ञानाचा प्रचंड पगडा होता. अशावेळी राज्याची सूत्रे तत्वज्ञ, बुद्धिमान व्यक्तीच्या हातात दिली तर ॲथेन्सची विस्कटलेली घडी पूर्ववत होईल असे प्लेटोला वाटत होते. या परिस्थितीतूनच प्लेटोला तत्वज्ञ राज्यकर्त्याची कल्पना सूचली होती.

प्लेटोच्या मते, तत्वज्ञ राज्यकर्त्याच्या अंगी पुढील गुण असावेत :

- तत्वज्ञ राज्यकर्ता (शासक) बुद्धिमान व सुदृढ असावा, शासनकर्त्याला नैतिक, अध्यामिक व तात्विक दृष्टीकोणातून शिक्षण दिले पाहिजे. राज्यकर्ता हा सद्गुणी असला पाहिजे. त्याचबरोबर तो संपत्ती व स्त्रिया कुटूंब यापासून दूर असला पाहिजे. तो निस्वार्थी, कर्तव्यदक्ष व प्रजाहितदक्ष असावा, त्याने सामुदायिक जीवन जगावे व समाजहित साधावे, समाजाला नियंत्रीत करण्याची शक्ती त्याच्या ठिकाणी असावी. शासनकर्ता हा नितीमान, व्यवहारी मुत्सद्दी व संयमी असला पाहिजे.

अशा पद्धतीने तत्वज्ञ शासनकर्त्याच्या अंगी कोणत्या पात्रता आवश्यक आहेत हे सांगून, तत्वज्ञ राज्यकर्ते सत्ताधारी झाले तर नगर राज्यातील दोष नाहीसे होवून प्रजा सुखी होईल, असे प्लेटोला वाटते. प्लेटोच्या मते ''जो पर्यंत तत्वज्ञ राजे बनत नाहीत किंवा या जगातील राजे व राजपूत्र तत्ववेत्यांची तर्कबुद्धी व बौद्धिक पात्रता संपादन करीत नाहीत, तोपर्यंत नगरराज्ये दोषमुक्त होऊ शकणार नाहीत. राजकीय तत्वज्ञान व राजकीय सत्ता एकत्र आल्याशिवाय नगरराज्ये आदर्श बनणार नाहीत अशी प्लेटोची धारणा होती. तत्ववेत्ते सत्ताधारी झाल्याशिवाय किंवा सत्ताधारी तत्ववेत्ते झाल्याशिवाय समाज सुव्यवस्थित होणार नाही.''

राज्यकर्ते बुद्धिमान व तत्वज्ञ होण्याकरिता प्लेटोने शिक्षण योजना मांडली होती. राज्यकर्त्या वर्गाने वयाच्या पस्तीस वर्षापर्यंत शिक्षण घेऊन ज्ञान संपादन करावे आणि नंतर व्यवहारज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी पाच-दहा वर्ष सेवा करावी असे सुचविले आहे. प्लेटोने तत्वज्ञ राज्यकर्त्यांच्या संदर्भात आचारसंहिता सांगितली आहे.

- तत्वज्ञ राज्यकर्त्याने न्याय प्रस्थापित होण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला तीच्या कुवतीनुसार काम द्यावे.
- राज्याच्या शिक्षणपद्धतीवर नियंत्रण ठेवून तिचे संचलन करावे.
- राज्याची लोकसंख्या माफक असावी या दृष्टीने लक्ष ठेवावे.
- खाजगी संपत्तीवर योग्य नियंत्रण ठेवून व्यक्तीला अधिक श्रीमंत किंवा अधिक गरीब बनू देवू नये.

तत्वज्ञ राजा सिद्धांताचे परीक्षण :

१) राजाची हुकूमशाही निर्माण होते :

प्लेटोचा तत्वज्ञ राजा हा कोणत्याही नियमांने, कायद्याने बांधलेला नव्हता. राजा कितीही बुद्धिवान, तत्वज्ञ असला तरी त्याला सत्तेचा मोह भ्रष्ट करतोच करतो. सत्ता जितकी जास्त वापरली जाते तसा सत्तेचा जास्त दुरूपयोग होतो हे इतिहासाने वारंवार सिद्ध केले आहे. प्लेटोचा तत्वज्ञ राजा त्याला कसा काय अपवाद ठरू शकेल त्याचा राजासुद्धा अनियंत्रीत, अमर्याद, निरंकूश राज्यकर्ता बनू शकतो.

२) तत्त्वज्ञ राज्यकर्ता कल्पा एकांगी व अपूर्ण वाटते :

तत्वज्ञ राज्यकर्ता ही कल्पना केवळ दोन वर्गापूरती मर्यादित होती. उपजीविका साधने निर्माण करणाऱ्या वर्गातील लोकांना तत्वज्ञ राजा होता येणार नाही. त्यामुळे प्लेटोची तत्वज्ञ राजकर्ता ही कल्पना एकांगी व अपूर्ण वाटते.

३) तत्वज्ञ राजकर्ता गूढ कल्पनेत रमण्याची शक्यता :

प्लेटोचा तत्वज्ञ राज्यकर्ता हा आपल्या तार्किक बुद्धीच्या व अनुभवाच्या आधारे भविष्यकालीन किंवा भूतकाळात गढून राहण्याची शक्यता असल्याने त्याचे वर्तमानकाळातील घडामोडीकडे दुर्लक्ष होण्याचा दाट संभव असतो.

४) अकार्यक्षम राज्यकारभार :

त्वरित निर्णय आणि निर्णयाची शीघ्र अंमलबजावणी हे कोणत्याही कार्यक्षम राज्यकारभाराचे गमक असते परंतु तत्वज्ञानी राजा मनन चिंतन यात एवढा व्यस्त झालेला असेल की, त्याला कोणतेही निर्णय त्वरित घेता येणार नाहीत. ज्यावेळी परकीय राज्य आक्रमण करते अशावेळी जलद निर्णयाची आवश्यकता असते.

५) आवश्यक शिक्षणाची तरतूद नाही :

राज्यकारभार करायचा असेल तर केवळ तत्वज्ञान उपयोगाचे नाही. राज्यकारभार सुव्यवस्थितपणे चालविण्यासाठी इतर आवश्यक बाबींचे शिक्षणही घ्यावयास हवे, त्याची दखल प्लेटोने घेतलेली नाही. उदा. अर्थशास्त्राचे, राज्यशास्त्राचे, मुत्सद्देगिरीचे ज्ञान, सैनिक प्रशिक्षण या बाबतीत राजा पारंगत असावयास हवा. परंतु प्लेटोने ते आवश्यक मानले नाही. यातून आदर्श प्रशासक कसा निर्माण होईल? चांगले शासन तरी कसे निर्माण होईल. केवळ गणित व तत्त्वज्ञान यांचा अभ्यास केलेला राजा कार्यक्षम प्रशासक बनू शकणार नाही.

६) तत्त्वज्ञ राजांची उदाहरणे नाहीत :

तत्त्वज्ञ राजे जगाच्या इतिहासात अपवादात्मक होऊन गेले. उदा. ऑस्ट्रियाचा दुसरा जोसेफ असे राजे राज्यकारभारात यशस्वी होत नाहीत. लोकांमध्येही ते लोकप्रिय होऊ शकत नाहीत. असे राजे प्रजेला विश्वासात न घेता एकाएकी क्रांतिकारी निर्णय घेतील. लोकांच्या भावनेची ते कदर करतील याची खात्री देता येत नाही. फार दूरवरच्या भविष्याचा विचार करताना किंवा भूतकाळाचा विचार करताना वर्तमानकाळाशी त्याचा संपर्क संपूर्णपणे तुटतो. तत्त्वज्ञानात अधिक रमलेला प्रशासक तऱ्हेवाईक प्रवृत्तीचा बनतो व तऱ्हेवाईक व्यक्तीने चालविलेला राज्यकारभार अन्यायी असमतोल व अप्रिय बनू शकतो.

१.२.६ प्लेटोचे आदर्श राज्य (Ideal State) :

प्लेटोने आदर्शराज्यविषयक कल्पना त्याच्या ‘रिपब्लीक’ या ग्रंथात मांडली आहे. त्यावेळी ग्रीक राज्यात पसरलेली अराजकता पाहूनच प्लेटोने आदर्श राज्याची कल्पना मांडली आहे. व्यक्तीला चांगले जीवन जगता यावे यासाठी आदर्श राज्य आवश्यक आहे असे प्लेटोला वाटते. आदर्श राज्याचे चित्र रंगविताना प्लेटो व्यवहारवादाकडे दुर्लक्ष करतो. त्याचे आदर्श राज्य म्हणजे ग्रीकमधील वाईट गोष्टींचे निराकरण करण्याचा प्रयत्न होतो. अशा राज्याचा राजा तत्त्वज्ञानी असावा असा त्याचा अट्टाहास होता. ‘‘जोपर्यंत तत्त्वज्ञानी राजा राज्य करणार नाही तोपर्यंत राज्याचे कल्याण होणार नाही.’’ प्लेटोच्याच शब्दात "Until philosophers and kings or the kings and Princes of this world have the spirit & power of philosophy, cities will never have rest from their evils." प्लेटोच्या मते, राज्य म्हणजे व्यक्तीचे विशाल रूप होय. जशा पद्धतीने व्यक्ती निर्माण होतात आणि त्यांचे कार्य चालते, तशा पद्धतीने समाज बनत असतो. समाजाच्या गरजा भागविण्यासाठी तीन वर्ग असतात. राज्यकर्त्यांचा वर्ग, संरक्षकांचा वर्ग, उत्पादकांचा वर्ग, या तीन वर्गाच्या माध्यमातून राज्याचे संवर्धन होत असते. माणसाच्या शरीरात पोट, छाती व मेंदू हे तीन भाग वासनापूर्ती, संरक्षण, व नियंत्रण ही कामे करीत असतात, त्याचप्रमाणे समाजातील हे वर्ग राज्याची कार्येकरीत असतात. आदर्श नागरिक निर्माण करणे

हे राज्याचे मुख्य कार्य होय. आदर्श राज्यातच मनुष्याला चांगले जीवन जगता येते. माणसाच्या सर्व गरजा आदर्श राज्यातच पुऱ्या होतात. आदर्श राज्याची उभारणी न्यायावर झालेली असते.

प्लेटो आपल्या आदर्श राज्याची रचना तीन प्रकारे मांडतो (१) पुरुष व स्त्रिया समान आहेत, त्यामध्ये फरक असेल तर तो फक्त अंशाचा आहे, प्रकाराचा नाही, त्यांना सारखेच शिक्षण मिळावे व सारखीच सार्वजनिक कार्ये पार पाडता यावीत. (२) प्लेटोने कुटूंबव्यवस्था नाहीशी करून साम्यवादाची निर्मिती करावी असे सूचविले आहे. हा साम्यवाद स्त्रियांचा व संपत्तीचा, मालमत्तेचा असेल (३) तत्त्वज्ञानी राजाची सत्ता स्थापन व्हावी असे तो सूचवितो.

आदर्श राज्याची वैशिष्ट्ये :

१) तत्त्वज्ञ राज्यकर्ते : आदर्श राज्यात राज्याची संपूर्ण सत्ता ही तत्त्वज्ञ राजाच्या हाती आहे. राज्याच्या अग्रभागी हा तत्त्वज्ञानी राजा आहे. तो संपूर्णपणे ज्ञानी असल्याने भावना व विकार यांचे त्याच्यावर नियंत्रण राहणार नाही. त्याला कोणाबद्दलही द्वेष व आकस असणार नाही. तो सत्याचा व आदर्शाचा मुर्तीमंत प्रतिक आहे. ज्ञानाचा अविष्कार आहे. त्यामुळे त्यास राज्याच्या हिताची दूरदृष्टी लाभलेली असते. तोच राज्याचे खरे कल्याण साधू शकतो. त्याच्या प्रत्येक कृतीमध्ये सद्गुणांचे प्रतिबिंब ठळकपणे दिसते. तो लिखीत कायदे आणि चंचल लोकमत यांच्या पेक्षा श्रेष्ठ असतो. म्हणजेच यांचे त्याच्यावर बंधन नसते.

२) आदर्श नागरिक : प्लेटोच्या मते, नगरराज्यात नागरिकांची संख्या ५०४० एवढी असावी. सुजाण, सुसंस्कृत नागरिक निर्माण करणे म्हणजे आदर्श राज्य निर्माण करणे होय. कारण 'जसे नागरिक तसे राज्य' या नियमांनुसार आदर्श नागरिकच आदर्श राज्य निर्माण करू शकतील असे प्लेटोला वाटत होते. यामुळे प्लेटोने नगरराज्यातील लोकांच्या शिक्षणाकडे, आरोग्याकडे आस्थेने लक्ष देवून विविध योजना सुचविल्या होत्या.

३) न्यायव्यवस्था : प्लेटोच्या आदर्श राज्यात न्यायाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. अर्थात न्याय शब्द आपण रोज व्यवहारात वापरतो त्या अर्थाने प्लेटो हा शब्द वापरत नाही. त्याच्या मते ''न्याय म्हणजे स्वतःच्या वाट्याला आलेले कार्य प्रामाणिकपणे करणे आणि दुसऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप न करणे होय''. न्यायाचा हा धागा सर्व समाजास एकतेच्या सूत्रात बांधतो. विविध कार्यासाठी सुयोग्य असलेल्या विविध व्यक्ती एकत्र येतात व आदर्श राज्याच्या विकासास हातभार लावतात. प्रत्येक व्यक्ती तीचे कार्य व्यवस्थितपणे पार पाडते, ती इतरांच्या क्षेत्रात ढवळाढवळ करीत नाही. प्लेटोच्या मते न्याय म्हणजे ज्या व्यक्तीस जे योग्य आहे गरजेनुसार व क्षमतेनुसार देणे होय.

४) राज्य नियंत्रित शिक्षणपद्धती : तत्त्वज्ञ राज्यकर्ते व संरक्षक अधिकारी यांच्यासाठी प्लेटोने आदर्श शिक्षणपद्धती सुचविली आहे. शिक्षणामुळे व्यक्तिला तिच्या कर्तव्याची जाणीव होते. म्हणून नागरिकांना विशिष्ट पद्धतीचे शिक्षण देणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्याच्या नियंत्रणाखाली शिक्षणाचे कार्य चालले पाहिजे.

५) राजाची हुकूमशाही नसते : आदर्श राज्यामध्ये राजाकडे सर्वाधिकार असले, तो कायदा, चालिरीती, लोकमत या सर्वापलीकडे तो असला तरी तो हुकूमशहा नसतो. कारण तो न्यायी राजा असतो. राज्याचे हित

पाहणारा तो प्रजाहितवादी राज्यकर्ता आहे. तो राज्याच्या मूलभूत तत्त्वांचा भंग करत नाही. रूढ अर्थाने तो हुकूमशहा असला तरी उपकारकर्ता हुकूमशहा आहे.

६) कर्मसिद्धान्ताचा अवलंब : आदर्श राज्यात कर्म सिद्धान्ताचा अवलंब केला पाहिजे. प्लेटोच्या मते, कर्मसिद्धान्त म्हणजे प्रत्येक व्यक्तीने आयुष्यभर तिच्या वाट्याला आलेले काम प्रामाणिकपणे करत रहावे आणि इतरांच्या कामात हस्तक्षेप करू नये. राज्यातील नागरिकांना जी कामे वाटून दिली जातात, ती कामे त्यांनी आपल्या योग्यतेनुसार, पात्रतेनुसार पार पाडली पाहिजेत. जेव्हा समाजघटकातील तीन वर्ग आपआपली कार्येजाणिवपूर्वक, जबाबदारीने पार पाडतील त्यावेळी राज्य आणि समाज आदर्श होईल. आदर्श राज्यातच समाजाच्या गरजा भागविल्या जातील.

७) राज्याचे तीन वर्गात विभाजन : आदर्श राज्यात निर्माण होणाऱ्या न्यायव्यवस्थेनुसार प्लेटोने समाजघटकांचे तीन वर्गात विभाजन केले आहे. पहिला वर्ग हा राज्यकर्त्यांचा असून तत्वज्ञ राजकर्तेहे त्याच्या अग्रभागी आहेत. राज्याची सर्व सत्ता ही तत्त्वज्ञ राज्याच्या हाती असते. दुसरा वर्ग हा सैनिकांचा आहे. राज्याचे परचक्रापासून संरक्षण करणे हे त्यांचे काम आहे. आणि समाजघटकांचा तिसरा वर्ग आहे तो उत्पादकांचा, श्रमिकांचा, कष्टकऱ्यांचा या वर्गाला उत्पादकाचे काम करावे लागते. राज्यातील विविध वस्तुंचे उत्पादन हा वर्ग करतो. प्रत्येक वर्ग अशा पद्धतीने त्यांच्या वाट्याचे कार्य पार पाडतो. यातील पहिले दोन वर्ग उच्च समजले जातात. उत्पादकांच्या वर्गाला समाजातील कनिष्ठ प्रतिचा वर्ग मानन्यात आले आहे. अशा रितीने समाजाचे तीन वर्गात विभाजन करून कार्यविशेषज्ञतेचा सिद्धान्त सांगितला आहे.

८) साम्यवाद : प्लेटोच्या आदर्श राज्यात साम्यवादाचा स्वीकार करण्यात आला आहे. त्याचा साम्यवाद हा दुहेरी प्रकारचा आहे. स्त्रियांचा साम्यवाद व संपत्तीचा साम्यवाद मांडून आदर्श राज्याची उभारणी करण्याचे ठरविले होते. प्लेटोचा साम्यवाद हा फक्त वरच्या दोन वर्गांनाच लागू आहे. वरच्या दोन वर्गांना संपत्ती बाळगता येणार नाही. त्यांना कुटुंबसंस्थाही नसेल, संपत्ती व स्त्री हे दोन मोह राज्यकर्त्यांना कर्तव्यापासून दूर सारतात. म्हणून त्यांनी या मोहापासून अलिप्त राहून राज्यकारभार करावा असे तो सूचवितो.

९) कला व साहित्य यावरती बंधने : प्लेटोच्या आदर्श राज्यात कला, साहित्य यावर बंधने आहेत. कला व साहित्याच्या क्षेत्रात जी निर्मिती होईल, त्यावर राज्याचे संपूर्ण नियंत्रण असेल. राज्याच्या देखरेखीखाली ते वाढू शकते. कला व साहित्याच्या क्षेत्रात संपूर्ण स्वातंत्र्य दिले गेले तर आदर्श राज्याची उभारणी उत्कृष्ट पद्धतीने होणार नाही. राज्यातील तरूण पिढीवर विकृत साहित्याचा वाईट परिणाम होईल. त्यासाठी कला व साहित्यावर राज्याचे संपूर्ण नियंत्रण असणे आवश्यक आहे, असे तो मानतो.

१०) स्त्री–पुरूषांना समान दर्जा : प्लेटोने आदर्श राज्यात स्त्रियांना पुरुषांबरोबर समान दर्जा देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यामते पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना समान शिक्षण द्यावे. त्याच्या शक्तीचा, सामर्थ्याचा राज्यासाठी उपयोग करून घ्यावा. स्त्रियांना राज्यकारभारात समाविष्ट करून न घेणे म्हणजे अर्धी शक्ती वाया घालविण्यातील प्रकार आहे. पुरुषांतील सर्वच गुण स्त्रियांमध्येही असतात असे प्लेटो म्हणतो.

११) सर्वंकष सत्तावादी राज्य : प्लेटोचे आदर्शवादी राज्य हे निरंकुश, अमर्यादित व सर्वंकष सत्तावादी राज्य आहे. सर्व कला, साहित्य यावर राज्याचे नियंत्रण असल्याने हे राज्य सर्वंकष सत्तावादी बनले आहे. हे राज्य व्यक्तीजीवनाच्या सर्व भागास स्पर्श करते. राज्याच्या नियंत्रणापासून कोणीही मुक्त नाही. इथे हेही ध्यानात घेतले पाहिजे की, हा सर्वंकष सत्तावादसुद्धा आदर्श स्वरूपाचा आहे.

१२) राज्य घटनेशिवायचे आदर्श राज्य : प्लेटोच्या आदर्श राज्याला राज्यघटनेची आवश्यकता नाही. कारण या राज्यातील व्यक्ती इतक्या पूर्णत्वास पोहचल्या आहेत की, त्यांना राज्यघटनेची आवश्यकताच वाटत नाही. कायदा व राज्यघटना माणसाच्या अपूर्णतेचे लक्षण आहे. प्लेटो तर म्हणतो की, कायद्याचा उपयोग केव्हाच नसतो. गुंड व्यक्तीसाठी कायद्याचा असूनही उपयोग नाही, तर सज्जन व्यक्तींना कायद्याची आवश्यकता नसते. एकंदरीत आदर्श राज्यासाठी कायदा व राज्यघटना यांची आवश्यकता नाही असे प्लेटो म्हणतो.

प्लेटोच्या आदर्श राज्याचे परीक्षण :

प्लेटोने मांडलेली आदर्श राज्याची कल्पना कितीही चांगली असली तरी ती कल्पनारम्य, स्वप्नरंजनात्मक, अव्यवहार्य व अवास्तव अशी आहे. प्लेटोच्या आदर्श राज्यावर पुढीलप्रमाणे टीका करण्यात येते.

१) आदर्श राज्याचे विचार काल्पनिक वाटतात : प्लेटोच्या आदर्श राज्याची कल्पना तात्त्विक स्वरूपाची वाटते. प्रत्यक्ष व्यवहारात आदर्श राज्य निर्माण होणे कठीण आहे, हे स्वतः प्लेटोने त्याच्या 'दि लॉज' या ग्रंथात मान्य केले आहे. कारण त्याने वर्णन केलेला 'तत्त्वज्ञ राजा' निर्माण होऊ शकणार नाही. विवाह, कुटूंब यापासून अलिप्त राहून राज्यकारभार करणारे राज्यकर्तेमिळणे दुर्मिळ आहे.

२) उत्पादक वर्गाकडे दुर्लक्ष : आदर्श राज्याची उभारणी करताना प्लेटोने उत्पादक वर्गाकडे संपूर्ण दुर्लक्ष केले आहे. त्यांना राज्यात तो कोणत्याही प्रकारचे स्थान देत नाही. फक्त उत्पादक म्हणून त्यांनी यंत्रवत जीवन जगायचे आहे. प्लेटोने बुद्धिवादी वर्गास फारच महत्त्व दिले. तसे उत्पादकांना फारच कमी लेखले आहे. उत्पादकांच्या विकासाची कोणतीही योजना प्लेटोने मांडलेली नाही.

३) सदोष शिक्षण पद्धती : प्लेटोच्या आदर्श राज्यातील शिक्षणपद्धतीसुद्धा सदोष आहे. ती प्रदीर्घ चालणारी कंटाळवाणी अशी आहे. वयाच्या चाळीसाव्या वर्षापर्यंत चालणारे शिक्षण कोणत्याही शिक्षण किंवा मानसशास्त्रीय पद्धतीत बसत नाही. त्याचबरोबर तळागाळातील लोकांसाठी, उत्पादकांसाठी त्याने कोणतीही शिक्षणपद्धती सांगितली नाही. त्याचा परिणाम असाही होऊ शकतो की बहुसंख्येने असणाऱ्या या वर्गात असंतोषाचा भडका उडू शकतो. कनिष्ठ वर्गातील लोकांनी तसेच राहावे अशी ही प्लेटोची आदर्श राज्याची कल्पना आहे.

४) आदर्श राज्याची कल्पना व्यक्तीस्वातंत्र्यास मारक : प्लेटोच्या आदर्श राज्यात व्यक्तीला गौण स्थान दिले असून राज्याला आदर्श मानण्यात फार मोठी चूक केली आहे. आधुनिक काळात राज्य हे व्यक्तीविकासाचे साधन मानले जाते. या राज्यात प्लेटोने व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर बंधने घातली आहेत. ती व्यक्तीविकासाच्या दृष्टीनेही मारक ठरतात.

५) तत्त्वज्ञ राजाची कल्पना अव्यवहार्य : प्लेटोची तत्त्वज्ञ राजाची कल्पना अव्यवहार्य आहे. आदर्श राज्याच्या सर्वोच्च पदी तत्त्वज्ञ राजा आहे. तत्त्वज्ञ राजा हा उत्कृष्ठ व्यक्ती बनू शकेल. परंतु तो उत्कृष्ट प्रशासक बनू शकणार नाही. प्लेटोचा तत्त्वज्ञ राजा हा जरी ज्ञानी असला तरी तो ज्ञानी मनुष्य राज्यकारभारापेक्षा मनन चिंतनाकडेच अधिक वेळ देईल. तो आदर्श प्रशासक बनू शकणार नाही. त्याचबरोबर एकदा त्याच्या हाती सत्ता आल्यावर असा राजा अनियंत्रित, निरंकुश बनणार नाही हे कशावरून?

६) गुलामगिरीकडे दुर्लक्ष : प्राचीन ग्रीसमध्ये प्लेटोच्या काळात माणसाला जनावराप्रमाणे वागणूक देणारी गुलामगिरीची प्रथा अस्तित्वात होती. प्लोटोने त्याच्या आदर्श राज्यात गुलामगिरीचे समर्थन केले नसले तरी त्याच्या आदर्श राज्यात गुलामांचे स्थान काय, याविषयी प्लेटोने मौन बाळगले आहे किंवा त्यांच्या मुक्तीची कोणतीही योजना सांगितली नाही. त्या काळातील समाजातील एवढा मोठा वर्ग दुर्लक्षित, उपेक्षीत राहणे चांगले नाही. याचा अर्थ असा की गुलामगीरी वाईट आहे हे मानावयास प्लेटो तयार नाही.

७) कायद्यापेक्षा व्यवहाराला जास्त महत्त्व : प्लेटोने त्याच्या आदर्श राज्यात कायद्यापेक्षा व्यवहाराला जास्त महत्त्व दिले आहे. किंबहूना त्याच्या आदर्श राज्यात कायद्याचे अस्तित्वच नाही. त्याच्या आदर्श राज्यातील तत्त्वज्ञ राजा हा कायद्यापेक्षा श्रेष्ठ मानला गेला असल्याने कायद्याचे राज्य निर्माण होऊ शकत नाही. तसेच प्लेटो राज्यातील सर्व लोकांना समान वागणूक देत नाही. विशिष्ट वर्गानाच त्यामुळे महत्त्व मिळते. साहजिकच अशा राज्यात सर्वांना समान न्याय मिळणे कठीण असते.

८) न्यायाची उभारणी नैतिकतेच्या आधारावर : प्लेटोच्या आदर्श राज्यातील न्यायदानाची पद्धत ही आधुनिक न्यायदान पद्धतीपेक्षा वेगळी आहे. प्लेटोच्या मते प्रत्येक व्यक्तीने त्याच्या वाट्याला आलेले काम पार पाडणे. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप न करणे किंवा समाजघटकाच्या सर्व वर्गांनी त्यांची कामे व्यवस्थितपणे पार पाडणे म्हणजे न्याय होय. प्लेटोने त्याच्या न्यायाच्या कल्पनेत कायद्यापेक्षा कर्तव्यावर अधिक भर दिला आणि न्यायाची उभारणी नैतिकतेच्या आधारावर केली.

९) कार्यविशेषज्ञतेचा अयोग्य विचार : प्लेटोच्या आदर्श राज्यात न्यायाची पूर्तता होण्याच्या दृष्टीने त्याने कार्यविशेषज्ञतेचा सिद्धान्त मांडला. परंतु त्याची न्यायाची कल्पना आणि कार्यविशेषज्ञतेचा सिद्धान्त यामुळे व्यक्तीचा विकास खुंटण्याची शक्यता आहे. व्यक्तीची योग्यता असली तरी या सिद्धान्तामुळे ती इतर कामे पार पाडू शकत नाही. या सिद्धान्तामुळे व्यक्तीच्या सर्वांगिण विकासाची हमी मिळू शकत नाही. कारण व्यक्तीमधील इतर गुणांना वाव मिळू शकत नाही.

१०) ॲरिस्टॉटलने केलेली टीका : ॲरिस्टॉटलनेसुद्धा प्लेटोच्या आदर्श राज्यावर टीका केली आहे. ॲरिस्टॉटलच्या मते प्लेटोने मांडलेली साम्यवादाची कल्पना ही मानवी स्वभावाच्या विरोधी आहे. प्लेटोने राज्याच्या एकतेवर अनावश्यक इतका भर दिला. त्यामुळे राज्याचा खरा विकास होणार नाही. त्याचबरोबर प्लेटोने कनिष्ठ वर्गाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे.

अशाप्रकारे प्लेटोच्या आदर्श राज्यावर टीका होत असली तरी त्याच्या आदर्श राज्याचे महत्त्व नाकारता येणार नाही. आजचा साम्यवादाचा उगम प्लेटोच्या विचारातच आहे. त्याने मांडलेले विचार तात्त्विक, काल्पनिक असले तरीसुद्धा आदर्श राज्याचे वर्णन करताना प्लेटोने शिक्षण, न्याय, नीती, स्त्रियांचा समान दर्जा व समान हक्क इत्यादीबाबत वास्तववादी व उपयुक्त विचार मांडले आहेत. प्लेटोच्या कार्यविशेषज्ञतेच्या सिद्धान्ताचा परिणाम म्हणून आधुनिक काळात सत्ताविभाजनाच्या तत्त्वाचा पुरस्कार करण्यात आला आहे. मालमत्तेचा साम्यवाद आज जगातील बऱ्याच राज्यांनी स्वीकारला आहे. प्लेटोच्या 'बुद्धीचे राज्य' या सिद्धान्ताचासुद्धा आधुनिक राज्यपद्धतीवर परिणाम झाला आहे. लष्करी, प्रशासकीय प्रशिक्षीत अधिकाऱ्यांचे प्रशासनातील महत्त्व आपणास नाकारून चालणार नाही.

मिश्र राज्य (उपआदर्श राज्य) :

प्लेटोने उपआदर्श राज्याची कल्पना त्याच्या 'दि लॉज' या ग्रंथात मांडली. दि लॉज हा प्लेटोचा शेवटचा ग्रंथ आहे. हा ग्रंथ संवादात्मक शैलीत लिहिला आहे. 'रिपब्लिक' या ग्रंथामध्ये त्याच्या कल्पनेचा मुक्त विहार आहे. तर 'दि लॉज'मध्ये वास्तवतेशी टक्कर देण्याचा त्याने प्रयत्न केला आहे. आदर्श राज्यासाठी तत्त्वज्ञ राजा निर्माण करणे अशक्य आहे. हे ओळखूनच प्लेटोला उपआदर्श राज्याची व्यवस्था सुचली. त्याचा रिपब्लिक हा ग्रंथ भावनेवर आधारित आहे तर 'दि लॉज' हा ग्रंथ अनुभवावर आधारित आहे. अनुभवावरून प्लेटोला विधिद्वारा आधारीत असलेली शासनप्रणाली स्वीकारावी लागली. राजेशाहीत काही प्रमाणात लोकशाहीची तत्त्वे स्वीकारणे गरजेचे आहे आणि लोकांना काही प्रमाणात स्वातंत्र्य देणे आवश्यक आहे असे त्याला वाटते.

'दि लॉज' मधील उपआदर्श राज्य म्हणजे वास्तवाशी केलेला समझोता होता. मानवी दुर्बलतेशी घातलेली सांगड होती. आदर्श राज्यासाठी तत्त्वज्ञानी शासक मिळणे कठीण आहे. हे पाहिल्यावर प्लेटो उपआदर्श राज्याकडे वळला. बेजलिनच्या मते ''प्लेटोच्या निराशेचे कारण म्हणजे त्याला आज्ञापालन करणारे प्रजानन मिळाले नाहीत हे नव्हे तर त्याला आदर्श शासक मिळाले नाहीत.''

प्लेटोच्या उप–आदर्श राज्यासाठी आवश्यक गोष्टी/वैशिष्ट्ये :

१) कायद्याला महत्त्वाचे स्थान : रिपब्लिक या ग्रंथामध्ये कायद्याला प्लेटोने नगण्य असे स्थान दिले आहे. परंतु 'दि लॉज' ग्रंथामध्ये मात्र त्याने कायद्याला उचित स्थान दिले आहे. फक्त जनतेलाच नव्हे तर राज्यकर्त्यावरही त्याने कायद्याचा अंकुश ठेवला आहे. 'रिपब्लिक मधील आदर्श राज्य वास्तवात येवू शकणार नाही असे तो जाणून होता. प्रत्येक व्यक्तीला काही मर्यादा असतात. प्रत्येकाला हे माहित नसते की त्याला नेमके काय हवे आहे. माणसाच्या अपूर्णत्वामुळेच समाजात शांतता सुव्यवस्था नांदावी म्हणूनच नियंत्रणाची आवश्यक असते. असे नियंत्रण हे कायद्याद्वारेच प्रस्थापित होवू शकते. सामाजिक हित व सामाजिक स्वास्थ्यासाठी कायद्याची आवश्यकता असते.

प्लेटोच्या मते कायद्याची आवश्यकता दोन कारणासाठी असते. एक म्हणजे व्यक्तीमध्ये समाजहीत कशामध्ये आहे हे समजण्याची पात्रता नसते आणि दुसरे कारण म्हणजे व्यक्तीही स्वार्थाने प्रेरित असल्याने ती

समाजहितास अनुकूल कार्य करील याची खात्री देता येत नाही. व्यक्ती जेव्हा समाजहित विरोधी कार्य करते तेव्हा तिला रोखण्यासाठी कायदा आवश्यक असतो. कायद्याला सुस्थिर स्वरूप देण्याचे कार्य प्लेटोने केले. प्लेटो म्हणतो की, 'राज्याचा कारभार हा कायद्यानुसार चालविला जावा. कायदा हा राज्यानुसार नसावा.'

२) उप–आदर्श राज्याची भौगोलिक स्थिती व लोकसंख्या : प्लेटोच्या मते उपआदर्श राज्य हे समुद्रकिनाऱ्यापासून दूर असावे. समुद्रकिनाऱ्याजवळ असणाऱ्या राज्याला परदेशी व्यापार, परदेशी लोक, परकीय संस्कृती यापासून धोका संभवतो. समुद्रकिनाऱ्याजवळील राज्याला परकीय आक्रमणाची भिती असते. त्याचबरोबर जहाजे, नाविकदल यांची व्यवस्था ठेवावी लागते. त्यामुळे किनाऱ्यावर रक्षणासाठी पुष्कळ पैसा खर्च करावा लागतो. त्यासाठी राज्य हे नैसर्गिकदृष्ट्या चारही बाजूनी सुरक्षीत असेल तर परकीय आक्रमणाची कमी भिती असते. प्लेटोला स्वावलंबी कृषीप्रधान राष्ट्र मान्य होते. त्याच्या मते अशा राज्याची लोकसंख्या ५०४० इतकी असावी. ही संख्या शांतीकाळात, युद्धकाळात आणि कर वसूल करण्यासाठी उपयुक्त आहे. प्लेटोने राज्याची लोकसंख्या वाढू नये किंवा कमी होवू नये यासाठी कायदे करण्याचा अधिकार राज्याला दिला. राज्याची जमिन सुपिक असावी, जमिनीचे तुकडे पाडून ते नागरिकांना वाटून द्यावेत. जमिनीतून येणारे उत्पन्न एकत्र करून त्याची समान वाटणी करावी. शेतीची कामे गुलामांनी करावी, जमिनीची मालकी वंशपरंपरेने यावी.

३) मिश्र शासनपद्धती : उपआदर्श राज्यासाठी प्लेटोने मिश्र शासनपद्धतीचा पुरस्कार केला. त्याच्या मते राजेशाही व लोकशाहीमधील चांगल्या गुणांचा समन्वय साधून नवीन शासन पद्धती निर्माण करावी. प्लेटोचे मिश्रित राज्य म्हणजे राजतंत्रात्मक पद्धतीमधील बुद्धी आणि प्रजातंत्रात्मक (लोकशाही) शासनातील स्वतंत्रता ह्यांचा समन्वय आहे. राजेशाहीतील शहाणपणा व लोकशाहीतील स्वातंत्र्य यांचा संगम करून मिश्र राज्य स्थापन करावे. अतिराजतांत्रिक आणि अतिलोकशाही राज्ये विनाशाला कारणीभूत ठरतात. राज्याचा अधःपात होऊ नये म्हणून बुद्धी, शक्ती व स्वातंत्र्य यांचा समन्वय साधला पाहिजे.

४) आर्थिक व्यवस्था : प्लेटोने उपआदर्श राज्यात खासगी संपत्ती ठेवता येईल असे सांगतो. संपत्तीमध्ये तो भूमी, घर यांचा समावेश करतो. संपत्तीच्या संचयावरून समाजात चार वर्ग मानावेत. यामध्ये जीवनावश्यक गरजा भागविण्याएवढी मर्यादित संपत्ती असणारे, त्यांच्यापेक्षा दुप्पट संपत्ती बाळगणारे, पहिल्या वर्गाच्या तिनपट संपत्ती बाळगणारे आणि चौपट संपत्ती असणारे असे चार वर्ग समजून राज्याने या चारी वर्गावर नियंत्रण ठेवून आर्थिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करावा. सर्व नागरिकांना भूमी सारख्या प्रमाणात असावी असे प्लेटो म्हणतो.

५) सामाजिक व्यवस्था : सामाजिक व्यवस्थेच्या संदर्भात प्लेटोने नव्या आदर्श राज्यातही 'रिपब्लीक' या ग्रंथामधील सामाजिक व्यवस्थेचा पुनरुच्चार केला आहे. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात उत्साहाने भाग घ्यावा असे प्लेटो म्हणतो. स्त्री व पुरुषांना समान शिक्षण असले पाहिजे असे तो म्हणतो. शारीरिक विकासाच्या कार्यक्रमात समान रीतीने भाग घेतला पाहिजे. उपआदर्श राज्यात मात्र प्लेटोने स्त्रियांच्या साम्यवादाची कल्पना सोडून दिलेली दिसते. युद्धकालीन परिस्थितीमध्ये स्त्रियांनी पुरुषांच्याप्रमाणेच योगदान दिले पाहिजे. उपआदर्श राज्यामध्ये प्लेटोने कार्यविशेषज्ञतेच्या सिद्धान्ताचा त्याग केलेला दिसतो. उलट समाजातील हे तीन वर्ग एकमेकांपासून अलग ठेवण्याऐवजी या तिन्ही वर्गात समन्वय व सुसंवाद कसा स्थापन करता येईल

याचाच त्याने विचार केला आहे. 'दि लॉज' या ग्रंथामध्येही त्याने बुद्धी व ज्ञानाला महत्त्व दिले असले तरी आदर्श राज्यामध्ये सामान्यजनांच्या वाट्याला जी उपेक्षा आली होती ती उप आदर्शराज्यामध्ये त्यांच्या वाट्याला येत नाही.

६) आत्मसंयम : उपआदर्श राज्याच्या स्थापनेसाठी आत्मसंयम आवश्यक असतो. आत्मसंयम म्हणजे वासनेने बुद्धीला शरण जाणे. आत्मसंयम हा राज्याचा पाया आहे. आत्मसंयमाच्या अभावी राज्यात अनेक प्रकारचे दोष निर्माण होतात. कायदा निर्माण करताना विविध दृष्टीकोन समजावून घेवून कायदा निर्माण केला पाहिजे. त्यामध्ये सद्गुणांचाही विचार झाला पाहिजे. रिपब्लिक ग्रंथामध्ये त्याने आत्मसंयमाला न्यायापेक्षा कमी महत्त्व दिले होते. तर 'दि लॉज' मध्ये आत्मसंयमाला श्रेष्ठ स्थान दिले. आत्मसंयम म्हणजे वासना आणि तर्क यांच्यातील सामंजस्य होय. त्याच्या मते कायदे निर्माण करणाऱ्यांना आत्मसंयमाच्या पूर्ण गुणांची माहिती असली पाहिजे.

७) न्याय व्यवस्था : प्लेटोच्या उप आदर्श राज्यात चार प्रकारची न्यायालये असावीत.

अ) **स्थानिक स्वरूपाची न्यायालये –** ही न्यायालये स्थानिक प्रश्नांचा विचार करून न्याय देतील.

ब) **निवडक न्यायाधिशांचे न्यायालय –** यांची निवड राज्यसरकारचे अधिकारी करतील. पूर्ण राज्यातील खटल्यांचा, भांडणांचा निवाडा हे न्यायाधिश करतील.

क) **प्रादेशिक न्यायालय –** राज्यातील बारा प्रदेशांसाठी त्या विशिष्ट प्रदेशातील लोकांनी निर्वाचित केलेली न्यायालये ही वैयक्तिक भांडणांचा निवाडा करतील.

ड) **अंतिम न्यायालय (जनतेचे न्यायालय) –** सर्व खटल्यांचा न्यायनिवाडा येथे होईल.

८) शैक्षणिक व धार्मिक संस्था : 'दि लॉज' या ग्रंथात प्लेटोने शिक्षणाकडे नागरिकत्वाच्या दृष्टीकोणातून अधिक भर दिला आहे. व्यक्तीमध्ये नागरी गुण निर्माण करणे हा शिक्षणाचा उद्देश आहे. या शिक्षणातून राज्य कसे चालवावे व नागरिक कसे बनावे याचे ज्ञान नागरिकास होते. साहजिकच लोकांच्यात कायद्याविषयी आस्था निर्माण होते. उपआदर्श राज्यातही तो राज्य नियंत्रीत शिक्षणाचा ध्यास सोडत नाही.

उपआदर्श राज्यामध्ये धर्म ही राज्याच्या देखरेखीखाली आणला आहे. प्लेटो व्यक्तीगत धार्मिक उत्सवाच्या विरोधी होता. सार्वजनिक आणि धार्मिक ठिकाणीच धार्मिक कार्ये व्हावीत या मताचा तो होता.

९) राजकीय व्यवस्था : प्लेटोने राज्यकारभारासाठी सर्वसाधारण समिती, सल्लागार समिती, व प्रशासकीय समित्यांची कार्येविशद केली आहेत.

अ) **सर्वसाधारण समिती** : राज्यातील सर्व ५०४० नागरिकांचा समावेश या समितीत असेल प्रत्येक नागरिक या समितीचा सदस्य असेल. किमान वर्षातून एकदा तरी या समितीची बैठक बोलविण्यात येईल त्यामध्ये नागरिकांची मते जाणून घेतली जातील.

ब) **सल्लागार समिती** : सर्वसाधारण समिती ही समितीमधील लोकांची निवड करील. या समितीमध्ये सर्वसाधारणपणे ३०० सदस्य असतील. हे ३०० सदस्य नंतर आपल्यातून १०० सदस्य निवडतील व हे

१०० सदस्य ३७ सदस्य निवडतील. हे ३७ सदस्य सल्लागार समिती म्हणून कार्य करतील. या सदस्यांचे वय ५० ते ७० च्या दरम्यान असावे आणि ही समिती राज्यकारभाराबाबत सल्ला देत राहील असे तो म्हणतो.

क) प्रशासकीय समिती : ही समिती ३६० लोकांची राहील. समाजात संपत्तीच्या आधारे चार वर्ग पाडण्यात येतील. प्रत्येक वर्गातून ९० सभासद या प्रमाणे त्यांची निवड केली जाईल. सल्लागार समितीने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे काम या समितीला करावे लागेल.

१०) अतिश्रेष्ठ कार्यकारी मंडल : प्लेटोच्या उपआदर्शराज्यात वर उल्लेख केल्याप्रमाणे ३७ लोकांची सल्लागार समिती असावी असे सांगितले आहे व या ३७ लोकामधून वयोवृध्द धर्मगुरू, शिक्षणतज्ञ अशा दहा लोकांचे अतिश्रेष्ठ कार्यकारी मंडळ असावे. या मंडळावर कायद्याचे बंधन असणार नाही. उपआदर्श राज्यातील सर्व घटकांवर, संस्थांवर या मंडळाची देखरेख व नियंत्रण असेल असे प्लेटो म्हणतो.

अशा पद्धतीने प्लेटोने उपआदर्श राज्यात महाजनशाहीला महत्त्व दिलेले दिसते. राजेशाही व लोकशाही यांच्या मिश्रणातून चांगली पद्धती शोधता-शोधता प्लेटो काही थोड्या लोकांची महाजनशाही पसंत करतो.

प्लेटोच्या 'दि लॉज'मधील कल्पनांचा प्रभाव पुढील पिढीतील अनेक विचारवंतावर व राज्यघटनावर पडला असला तरी उप आदर्श-राज्याची लोकसंख्या ५०४० एवढी असावी हा विचार पटणारा नाही आणि ही लोकसंख्या कशाप्रकारे नियंत्रीत करायची हे समजत नाही. राज्यकर्त्यांनी लोकसंख्येवर नियंत्रण ठेवावे म्हणजे नेमके काय करावे हा गमतीशीर प्रश्न आहे. प्लेटोचे राज्य समुद्र किनाऱ्यापासून दूर आहे म्हणजे ते व्यापाराच्या दृष्टीने अयोग्य आहे.

१.३ सारांश :

प्लेटोनी शिक्षण, न्याय, आदर्श राज्य, तत्त्वज्ञ राजा, साम्यवाद इत्यादी महत्त्वाच्या विषयावर आपले विचार मांडले आहेत. त्याच्या विचारातील काही मूल्ये आज ही उपयुक्त आहेत. राज्यकर्तेसुशिक्षीत, प्रशिक्षित पाहिजेत त्याचबरोबर समाजाची इतरप्रकारे सेवा करणाऱ्या डॉक्टर, इंजिनियर, तंत्रज्ञ लोकांप्रमाणेच राज्यकर्त्यांना देखील योग्य प्रशिक्षण मिळाले पाहिजे हे आजही मान्य आहे. राज्यकर्त्यांनी जनतेच्या हितासाठी कार्य केले पाहिजे. त्यांच्या कारभारात स्वार्थ, लाचलुचपत, वशिलेबाजी, भ्रष्टाचार नको हेही आज मान्य आहे. राज्यकर्त्यांना युद्धाचे, राज्यकारभाराचे ज्ञान हवेच त्याचबरोबर त्यांची दृष्टीही समाजहिताशी एकरूप होणारी हवी. स्त्री-पुरुषांना समान संधी हवी हे तत्त्व आज मान्यता पावले आहे. प्लेटोला अभिजनसत्ता हवी असली तरी अशी सत्ता बुद्धीवर, चारित्र्यावर आधारलेली असावी याबद्दल कुणाचेही दुमत होणार नाही.

प्लेटोचा अभिजनवाद हा सद्गुणावर, ज्ञानावर, चारित्र्यावर आधारित आहे. प्लेटोच्या शिक्षणपद्धतीमध्ये काही अंशी सक्ती असली तरी निर्बुद्धपणा व यांत्रिकता नाही. अल्पसंख्यांकांच्या वंशश्रेष्ठतेचे स्तोम नाही. दुसऱ्याच्या भूमीची हाव नाही. प्लेटोच्या राज्यातील शारीरिक शिक्षण शिस्तीसाठी तर सैनिकी शिक्षण आत्मसंरक्षणासाठी आहे. विचारांची गरूडझेप, बुद्धीचा प्रचंड आवाका, महत्त्वाची गोष्ट म्हणजे मानवहिताची

सतत चिंता या गुणांमुळे राजकीय विचारवंतामध्ये प्लेटोला जागतिक स्वरूपाचे स्थान प्राप्त झाले आहे. हे मान्य करावेच लागेल.

१.४ पारिभाषिक शब्द :

- **दि रिपब्लीक :** प्लेटोच्या प्रसिद्ध ग्रंथाचे नाव.
- **Concerning Justice :** 'दि रिपब्लीक' या ग्रंथाचे दुसरे नाव
- **'दि पॉलीटीक्स' :** प्लेटोचे राजकीय विचार या ग्रंथात आहेत. या संवादाला स्टेटस्मन या नावानेही ओळखले जाते.
- **दि लॉज :** हा प्लेटोचा एक प्रसिद्ध ग्रंथ आहे. उप आदर्श राज्याची कल्पना या ग्रंथामध्ये मांडली आहे.

१.५ स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे :

१. प्लेटोच्या मते, न्यायाचा अर्थ .... हा आहे.

अ) प्रबलांचे हित जपणे ब) स्वतःच्या हिताचे रक्षण करणे

क) प्रत्येकास त्याचा वाटा देणे ड) दुऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप न करणे.

२. प्लेटोच्या .... या ग्रंथास शिक्षणावरील सर्वोत्तम ग्रंथ म्हटले आहे.

अ) क्रिटो ब) दि रिपब्लीक

क) दि लॉज ड) दि पॉलीटीक्स

३. प्लेटो .... चा शिष्य होता.

अ) डायोनिसियसचा ब) ॲरिस्टॉटलचा

क) सॉक्रेटीसचा ड) रूसोचा

४. प्लेटोने त्याच्या उपआदर्श राज्यात लोकसंख्या .... एवढी असावी असे सांगितले आहे.

अ) ३०७० ब) ५०४१

क) ५०४० ड) ५०५०

५. प्लेटोच्या मते व्यक्तीमध्ये ...., ..., ..., या तीन भावना असतात.

अ) युक्ती, प्रेम, द्वेष ब) दया, सहानुभूती, प्रेम

क) वासना, साहस, बुद्धी ड) प्रेम, दया, वासना

६. प्लेटोच्या मते राज्याचा आधार .... हा आहे.

अ) सत्ता ब) न्याय

क) शक्ती ड) अधिकार

७. प्लेटोच्या ग्रंथाना .... म्हणतात.

अ) प्लेटोचे लेखन ब) प्लोटोचे लेख

क) प्लेटोचे विचार ड) प्लेटोचे संवाद

८. प्लेटोने .... वर्षेॲकॅडमीमध्ये शिक्षणाचे कार्य केले.

अ) ३० ब) ४०

क) ५० ड) ३५

९. प्लेटोने शासक व सैनिक वर्गाला .... गोष्टीपासून दूर ठेवले.

अ) स्त्री व संपत्ती ब) संपत्ती व निवारा

क) फक्त संपत्ती ड) यापैकी नाही

१०. प्लेटोने .... या विचाराद्वारे कुटूंब संस्थेवर आघात केला.

अ) स्त्रियांचा साम्यवाद ब) शिक्षणविषयक विचार

क) संपत्तीचा साम्यवाद ड) न्याय विषयक विचार

स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

१) ड - दुसऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप न करणे. २) ब - दि रिपब्लीक

३) क - सॉक्रेटीस ४) क - ५०४०

५) क - वासना, साहस, बुद्धी ६) ब - न्याय

७) ड - प्लेटोचे संवाद ८) ब - ४०

९) अ - स्त्री व संपत्ती १०) अ - स्त्रियांचा साम्यवाद

१.६ सरावासाठी स्वाध्याय :

१) प्लेटोच्या न्यायविषयक सिद्धान्ताचे मूल्यमापन करा.

२) प्लेटोचे शिक्षणविषयक विचार स्पष्ट करा.

३) संपत्तीचा साम्यवाद व स्त्रियांचा साम्यवाद यासंबंधी प्लेटोचे विचार स्पष्ट करा.

४) प्लेटोच्या तत्वज्ञ राजा ही संकल्पना स्पष्ट करा.

५) प्लेटोच्या आदर्श राज्याची कल्पना सटीक स्पष्ट करा.

६) प्लेटोच्या उपआदर्श राज्याची संकल्पना विशद करा.

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१) श्रुंगारपुरे अरविंद, समग्र भारतीय व पाश्चात्त्य राजकीय विचारवंत, मंगेश प्रकाशन, नागपूर.

२) गर्दे दि. का., पाश्चात्य राजकीय विचार प्रवाह, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.

३) डोळे ना. य., राजकीय विचारांचा इतिहास, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.

OOO

घटक-२

ऑरिस्टॉटल (Aristotle)

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ जीवन परिचय

२.२.२ ॲरिस्टॉटलवरील प्रभाव

२.२.३ ॲरिस्टॉटलचे राज्यासंबंधी विचार

२.२.४ ॲरिस्टॉटलचे क्रांतिसंबंधी विचार

२.२.५ ॲरिस्टॉटलचे नागरिकत्वासंबंधी विचार

२.२.६ ॲरिस्टॉटल राज्यशास्त्राचा जनक

२.२.७ ॲरिस्टॉटलचे गुलामगिरी (दासप्रथा) विषयी विचार

२.२.८ ॲरिस्टॉटलचे आदर्श राज्याविषयी विचार

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

२.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासात आपल्याला

- ॲरिस्टॉटलचे राज्यासंबंधी विचार स्पष्ट करता येतील.
- क्रांतीसंबंधी विचार स्पष्ट करता येतील.

- ॲरिस्टॉटलचे नागरिकत्वासंबंधी विचाराचा आढावा घेता येईल.
- ॲरिस्टॉटलचे राज्यशास्त्राचा जनक म्हणून केलेले विवेचन गुलामगिरी (दासप्रथा) विषयी विचार समजून घेता येतील.
- आदर्श राज्याविषयी ॲरिस्टॉटलचे मत जाणून घेता येईल.

२.१ प्रास्ताविक :

ग्रीक नगरराज्यात होऊन न गेलेला आणि राज्यशास्त्र या विषयाला शास्त्रीय रूप देणारा पहिला विचारवंत ॲरिस्टॉटल होय. ॲरिस्टॉटल यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणार आहोत. ॲरिस्टॉटल हा पाश्चिमात्त्य संस्कृतीचा व तत्त्वज्ञानाचा उदगाता मानला जातो. त्याने प्राचीन ग्रीकचे तत्त्वज्ञान शास्त्रशुद्ध पायावर उभारण्याची महत्त्वाची कामगीरी केली आहे. ॲरिस्टॉटल हा तत्त्वज्ञ राजा होऊ गेला. ॲरिस्टॉटल यानी राज्यासंबंधी विचार, राज्याचे वर्गीकरण, नागरिकत्व, क्रांतीसंबंधी विचार मांडून राज्यशास्त्राला एक वेगळीच कलाटणी देण्यात त्याचे महत्त्वाचे योगदान आहे.

२.२ विषय–विवेचन :

२.२.१ जीवन परिचय :

ॲरिस्टॉटलचा जन्म इ.स. पूर्व ३८४ मध्ये ग्रीसमधील स्टॅगिरा नावाच्या शहरी झाला. त्याचे वडील निकोमेक्स मॅसिडोनीयाच्या राजदरबारात राजवैद्य होते. राजघराण्याशी वडिलांचा संबंध असल्याने ॲरिस्टॉटलचे जीवन सुखी व संपन्न होते. इ. स. पूर्व ३६७ मध्ये ॲरिस्टॉटलने प्लेटोच्या ॲकॅडमीत प्रवेश केला. या ॲकॅडमीत ॲरिस्टॉटलने जवळपास २० वर्षेघालविली. त्या काळात प्लेटोची ॲकॅडमी एक नामांकीत विद्यापीठ म्हणून गाजले होते. या ॲकॅडमीत अध्ययनाबरोबरच अध्यापनाचे आणि व्यवस्थापक म्हणून ॲरिस्टॉटला प्लेटोच्या गैरहजेरीत काम करावे लागत असे. प्लेटो म्हणायचा की ॲरिस्टॉटल हा माझा आवडता शिष्य आहे. आपल्या शिष्याविषयी योग्यता प्लेटोला माहिती होती. प्लेटो म्हणतो ॲरिस्टॉटल म्हणजे विद्यापीठाचे मन असे तो नेहमी म्हणे तर ॲरिस्टॉटल ही आपल्या गुरूविषयी आदर, प्रेम, निष्ठा राखत होता. गुरू–शिष्याचे संबंध अधिक निकटचे व दृढ होते. प्लेटोच्या विचारांची त्यांच्या जीवनावरील छाप ही शेवटपर्यंत कायम होती. प्लेटोच्या मृत्यूनंतर त्याला ॲकॅडमी सोडावी लागली. बारा वर्षेतो भ्रंमती करीत राहिला. जगजेत्या सिंकदराचा गुरू होण्याची त्याला सुसंधी मिळाली परंतु त्यांची सिकंदरावर कोणत्याच प्रकारची छाप पडली नाही. इ. स. पूर्व ३४७ मध्ये प्लेटोच्या मृत्यूनंतर त्याने अथेन्स सोडले.

इ. स. पूर्व ३३४ मध्ये ॲरिस्टॉटलने अथेन्स येथे एक पाठशाळा सुरू केली. ती पुढे 'लायसिअस' या नावाने प्रसिद्ध झाली. प्लेटोच्या ॲकॅडमीचा अभ्यास करून या धर्तीवरच ॲरिस्टॉटलने ही शिक्षण संस्था स्थापन केली होती. सिंकदरच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर अनेक आरोप करण्यात आले. म्हणून त्यानी अथेन्स सोडले. ॲरिस्टॉटलचे ज्ञान एखाद्या ज्ञानकोषासारखे होते. त्याने अध्यात्म, नितीशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र,

शरीर विज्ञान, भौतिकशास्त्र, हवामानशास्त्र, खगोल शास्त्र, इत्यादी विषयावर अनेक ग्रंथ लिहिले आहेत. अशा या महान थोर ग्रीकवेत्याचा मृत्यू इ. स. पूर्व ३२२ मध्ये झाला.

ग्रंथ संपदा :

ॲरिस्टॉटलची प्रतिमा फार मोठी होती. त्याने जवळ -जवळ सर्वच विषयावर लिखाण केलेले दिसून येते. असा एकही विषय नाही त्याविषयी ॲरिस्टॉटलने लिखाण केलेले नाही. सर्वच विषयावर त्यांचे लिखाण उच्च दर्जाचे होते. ॲरिस्टॉटलने जवळ-जवळ चारशे ग्रंथ लिहिले आहेत. राज्यशास्त्राच्या दृष्टीने त्यांचे महत्वाचे ग्रंथ म्हणजे The Politics आणि The Constitution हे आहेत. ॲरिस्टॉटलचा The Politics हा ग्रंथ जगप्रसिद्ध मानला जातो. हा ग्रंथ एकूण आठ विभागात विभागला आहे. या ग्रंथामध्ये राज्यव्यवस्थेचे स्वरूप विस्तृतपणाने वर्णन करण्यात आलेले आहे. या ग्रंथात वास्तविकता आढळते. त्याने १५८ राज्याच्या राज्यघटनांचा अभ्यास करून आपले विचार मांडले आहेत. त्यामुळे या ग्रंथात तर्कशुद्धता दिसून येते. राज्यशास्त्र नितीशास्त्रापासून कशा प्रकारे भिन्न आहे या विषयी त्यामध्ये लिखाण करण्यात आले आहे. परंतु या ग्रंथामध्ये क्रमबद्धततेचा अभाव आढळून येतो. अनेक गोष्टी, घटनेवर पुन्हा-पुन्हा लिहिण्यात आल्या आहेत. या ग्रंथातील सुव्यवस्थीतपणा यांचा पण अभाव आढळून येतो. तर काही ठिकाणी विषय परिवर्तन झाले आहे. हा ग्रंथ अपूर्ण आणि अस्पष्ट असूनही जगभर प्रसिद्ध ठरला आहे.

ॲरिस्टॉटलचा राज्यशास्त्राच्या दृष्टीने दुसरा महत्वाचा ग्रंथ म्हणजे The Constitution of Athens (अथेन्सची राज्यघटना) होय. हा ग्रंथ लिहिण्याअगोदर ॲरिस्टॉटलने १५८ देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास केला आहे. या १५८ देशांच्या राज्यघटनेचा तुलनात्मक अभ्यास करून हा ग्रंथ लिहिला आहे. परंतु काळाच्या ओघात हा ग्रंथ नष्ठ झाला आहे. या ग्रंथाचा काही भाग उपलब्ध आहे. या ग्रंथातून ॲरिस्टॉटलचे वास्तववादी रूप आपणाला दिसून येते. ॲरिस्टॉटलने आपल्या ग्रंथ लिखाणाच्या माध्यमातून जगात आपला प्रभाव निर्माण केलेला दिसून येतो.

२.२.२ ॲरिस्टॉटलवरील प्रभाव :

कोणताही विचारंवत जेव्हा आपल्या मेहनतीने मोठा होतो तेव्हा त्यांच्यावर कोणत्या ना कोणत्या घटकाचा विचारांचा, परिस्थितीचा प्रभाव पडतो. अशाच प्रकारे ॲरिस्टॉटलवर ही प्रभाव पडलेला दिसून येतो. ॲरिस्टॉटलवर पहिल्यांदा त्यांच्या गुरूचा प्रभाव पडलेला दिसून येतो. ॲरिस्टॉटल प्लेटोच्या सहवासात कमीत कमी २० वर्षे होता. प्लेटोच्या विचारांचा प्रभाव मोठया प्रमाणात दिसून येतो. प्लेटोचा त्याच्या विचारावरील अशा स्वरूपाचा प्रभाव आहे. आदर्श नागरिक घडण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. मनुष्य सामाजिक जीवनाकडे वळला पाहिजे कमी लोकसंख्या असलेले राज्य हे आदर्श राज्य निर्माण होते. या प्रकारे प्लेटोचा प्रभाव ॲरिस्टॉटलवर आढळून येतो. ॲरिस्टॉटलवर प्लेटोव्यतिरिक्त त्यांच्या वडिलांचा प्रभाव दिसून येतो. ॲथेन्सच्या राजकीय परिस्थितीचा प्रभाव आढळून येतो. ग्रीसमधील नगरराज्यांचाही प्रभाव आढळून येतो. ग्रीक संस्थानाचा प्रभाव आहे. अलेक्झांडरच्या सहवासाचा प्रभाव ॲरिस्टॉटलवर दिसून येतो.

२.२.३ ॲरिस्टॉटलचे राज्यासंबंधी विचार :

ॲरिस्टॉटलने दि. पॉलिटिक्स ग्रंथातील पहिल्याच भागात राज्यासंबंधी विचार मांडले आहेत. राज्याची उत्पती, विकास, उद्देश, आणि स्वरूपासंबंधी विस्तृतपंणाने विवेचन केले आहे.

१) राज्याची निर्मिती :

राज्याची निर्मिती ही मनुष्याच्या स्वभाविक गरजेतून निर्माण झाली आहे. मनुष्याच्या गरजा ह्या अनंत असतात. त्या सर्व गरजा एकटा माणूस पूर्ण करू शकत नाही. त्या गरजा पूर्ण करण्यासाठी इतर माणसांची मदत घ्यावी लागते. जसजशा माणसांच्या गरजा वाढत गेल्या तसतसे मानंवाचे परस्पर सहाकार्य वाढत गेले. स्त्री-पुरूष एकत्रीकरणातून कुटूंब निर्माण झाले. अशा प्रकारचे कुटूंब जेव्हा परस्परांच्या सहकार्याने वागू लागले तेव्हां गाव निर्माण झाले. गावाचा हळूहळू विस्तार होऊन शहर निर्माण झाले त्यातून नगरराज्य निर्माण झाले. मानवीविकास वाढत गेला आणि मानव आपल्या अंतिम ध्येयापर्यत येऊन पोहचला. मानवाच्या भौतिक गरजांच्या पूर्ततेसाठी गाव असमर्थ ठरले. समाजांच्या नियमांची, नियंत्रणाची, संरक्षणाची गरज भासू लागली. यातूनच राज्यसंस्थेची निर्मिती झाली.

२) राज्य ही नैसर्गिक संस्था :

मनुष्याच्या गरजा पूर्ण करण्याच्या उपक्रमातून निर्माण झालेले राज्य मनुष्याला सुखी, आनंदी, सन्मानीत, चांगले जीवन जगण्यासाठी सदैव अस्तित्वात राहणारी संस्था आहे तात्पर्य असे आहे की चांगले जीवन जगण्यासाठी राज्याची आवश्यकता असते. राज्याशिवाय मनुष्य पशूसारखे जीवन जगू शकतो असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. मनुष्य हा बुद्धिवादी प्राणी आहे त्याच्या अंगी विचार करण्याची शक्ती आहे. ही शक्ती त्याला सामजिक आणि राजकीय जीवनातच प्राप्त होते.

३) राज्य सेंद्रिय आहे :

ॲरिस्टॉटलने राज्याला सेंद्रिय म्हटले आहे. मनुष्यात ज्या प्रकारचे गुण असतात त्या प्रकारचे गुण देखील राज्यात असतात. मनुष्याच्या शरीरात जसे निरनिराळे अवयव असतात तसेच राज्यातही निरनिराळे अवयव असतात. त्या सर्व अवयवाचे एकजीव रूप म्हणजे राज्य होय. राज्याचे सैन्य, कायदेविभाग, कार्यकारी विभाग, न्यायविभाग, शेतकरी, नागरीक, व्यक्ती समुदाय, गाव, शासक वर्ग हे राज्याचे वेगवेगळे अवयव आहेत. या सर्व अवयवांचा राज्याशी अविभाज्य संबंध असतो. ॲरिस्टॉटलने राज्य आणि मानवी शरीरात साम्य दर्शवून म्हटले आहे. राज्य मानवी शरीराप्रमाणे आहे.

४) राज्य हे सर्वश्रेष्ठ समुदाय :

राज्याच्या सत्तेला ॲरिस्टॉटलने सार्वभौम शब्द वापरला नाही. राज्याची सत्ता सर्वश्रेष्ठ असते एवढेच त्यांनी म्हटले आहे. मनुष्याने आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी विशिष्ठ प्रकारचे समुदाय निर्माण केले आहेत. समुदायांचे पहिले उद्दिष्ठ आहे की, जनतेचे कल्याण करणे ॲरिस्टॉटल राज्याला समुदाय मानतो. कारण इतर समुदायांचे अस्तित्व राजामध्ये असते. राज्याशिवाय इतर समुदाय आपला उद्‌देश पूर्ण करू शकत नाही.

५) राज्य विभीन्नतेत एकतेचे प्रतीक आहे :

जशा प्रकारे भिन्न स्तरातून एका चांगल्या संगीताची निर्मिती होते. तसेच राज्याच्या विभिन्न अंगाच्या माध्यमातून एकात्मतेची निर्मिती होते. राज्यात विभिन्नता असणे आवश्यक आहे. भिन्नता नष्ठ करणे म्हणजे अत्यंत निकृष्ठ प्रतीचे राज्य निर्माण करणे हे होय. ॲरिस्टॉटलने राज्याच्या एकतेवर जास्त भर दिलेला आहे. काही बाबतीत नियत्रंण आणि इतर गोष्टीचे नागरीकांना स्वांतत्र्य दिले तर राज्यात एकता निर्माण होण्यास मदत होते.

६) स्वावलंबन :

ॲरिस्टॉटलच्या काळात नगरराज्य स्वावलंबी होते. राज्य अशी संस्था आहे की, ज्यात नागरिकांच्या इतर भौतिक सोयी सुविधा पुरवल्याच पाहिजेत मनुष्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी इतर काही संख्या कमी पडू लागल्यामुळेच राज्याची निर्मिती झाली. राज्याचे कर्तव्य आहे की मनुष्याचा सर्वच गरजाची पूर्तता करणे कारण राज्य ही सर्वश्रेष्ठ संस्था आहे.

७) राज्याचा विकास :

राज्याच्या विकासांच्या बाबतीत ॲरिस्टॉटलने तीन अवस्थाचे वर्णन केले आहे. एक रानटी अवस्था, दुसरी पशुपालन आणि शेवटची बौद्धिक अवस्था होय. या पहिल्या अवस्थेत मानव केवळ प्रजोत्पादन करून वंशावळ कायम ठेवणे हा रानटी अवस्थेचा गुणधर्म आहे. राज्याच्या विकासातील पहिली पायरी म्हणजे कुटूंबसंस्था होय. या अवस्थेत मानवाची कुटूंबे निर्माण केली. अनेक कुंटूंबातून ग्राम निर्माण झाले. राज्याच्या विकासाची दुसरी अवस्था म्हणजे पशूपालन अवस्था होय. गावचे जीवन सुखी समाधानी राहावे यासाठी नियंमाची निर्मिती करण्यात आली. वेगवेगळ्या नियमांची निर्मिती या दुसऱ्या अवस्थेत करण्यात आली. राज्याच्या विकासाची तिसरी अवस्था म्हणजे बौद्धिक आवस्था होय. राज्य हे मनुष्याच्या बौद्धीक विकासांचे प्रतीक आहे.

८) राज्याची उद्दिष्ट्ये (कार्ये) :

ॲरिस्टॉटलच्या मते केवळ जगणे हा मनुष्याचा उद्देश नसून ते जीवन श्रेष्ठ प्रतीचे जीवन जगणे हा त्यांचा उद्देश आहे. हा मानवाचा उद्देश प्राप्त करून देणे हे राज्याचा उद्देश आहे. राज्य हे मानवी जीवनासाठी निर्माण झाले आणि चांगल्या जीवनाच्या पूर्ततेसाठी टिकून राहिले. मानवाला सद्गुणी बनविण्यासाठी राज्यांनी त्यांच्या नैतिक गुणांचा विकास करावा. राज्यांच्या कार्यातून मनुष्याला उच्च मूल्यांची प्राप्ती झाली पाहिजे. राज्याचे कार्य हे सकारात्मक आणि रचनात्मक दोन्ही स्वरूपाचे आहेत. मनुष्याला नैतिक बनवण्याची जबाबदारी राज्यांची आहे. राज्यांने मनुष्याला धर्मसुसंगत बनवावे. एखाद्याने दुसऱ्याच्या अधिकारात हस्तक्षेप रोखण्यापुरते राज्याने कार्ये करू नये तर त्या मनुष्याच्या अंगी अपराधीपणाची वृत्ती बळावणार नाही, नष्ट होईल असे राज्यानी कार्ये करावे. ॲरिस्टॉटल म्हणतो मनुष्य म्हणजे गुण आणि दोषांचा समन्वय आहे. राज्याने मनुष्याच्या दोंषावर अंकूश ठेवावा. समाजात न्यायव्यवस्था प्रस्थापित करून मानवाला उच्च प्रतिचे जीवन कसे जगता येईल यासाठी राज्यांनी

कार्ये करावे. राज्याला ॲरिस्टॉटलने समुदाय बनविले आहे. समुदायाप्रमाणेच राज्यानी कार्ये करणे ही मनुष्याची भावना आहे असे ॲरिस्टॉटल म्हणतो. राज्यामुळे मानवी जीवन सुसंस्कृत बनते. मानवी जीवन संकुचीत न होता ते विकसीत होते राज्याने नकारात्मक कार्यामध्ये केवळ नागरिकांच्या अधिकारात आक्रमण होऊ नये, आर्थिक गरजांची पूर्तता व्हावी याविषयी समाजात शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी न्यायाच्या उद्देशाने राज्याने कार्ये करावीत. ॲरिस्टॉटल राज्याच्या कार्याबाबत सकारात्मक कार्यावर जास्त भर देतो.

ॲरिस्टॉटलचे राज्याचे वर्गीकरण :

सामान्यपणे आजच्या काळात राज्याचे वर्गीकरण करणे शक्य नाही असा विचार प्रवाह आहे. राज्यांचे वर्गीकरण या विषयी ॲरिस्टॉटलवर प्लेटोच्या स्टेटसमन ग्रंथाचा प्रभाव आढळून येतो. राज्याच्या आवश्यक घटकाचा विचार केल्यास राज्य केवळ लहान आणि मोठे या दोन्हीतच वर्गीकरण करता येतो. ॲरिस्टॉटलच्या राज्याच्या वर्गीकरणाला समजावून घ्यायचे असल्यास तत्कालीन परिस्थितीला समजणे आवश्यक आहे. त्या काळात राज्य आणि शासन यात फरक केला जात नसे. त्यामुळे जी शासनाची कार्ये ती राज्याची कार्ये समजली जात असल्यामुळे दोन्ही शब्दाला समानार्थी मानण्यात येत असे. शासनाची सत्ता कोणाच्या हाती आहे. या आधारावर त्यानी राज्याचे वर्गीकरण केले आहे. ॲरिस्टॉटलने राज्याचे वर्गीकरण करण्यापूर्वी संविधानाचा अर्थ स्पष्ट केला आहे.

संविधानाचा अर्थ :

ॲरिस्टॉटलने 'पॉलिटिक्स' या ग्रंथात विभिन्न संविधानाचे वर्णन केले आहे. त्यांच्या मते, ''संविधान म्हणजे अशा प्रकारची व्यवस्था ज्या द्वारे राज्यातील सार्वभौम सत्तेचे स्थान निश्चित होऊन ते नेमले कुठे आहे याचे ज्ञान होते. शासनाचे स्वरूप कसे आहे. शासनाचा उद्देश काय आहे शासनाचे कार्य हे ज्याद्वारे समजते ते संविधान होय''. संविधानाने राज्याची निर्मिती होते. त्यामुळे जेव्हा संविधानात बदल झाल्यास राज्यातही बदल होतो. तात्पर्य असे की, संविधानाला मात्र राज्याचे अंग मानत नाही तर संविधानात राष्ट्रीय एकात्मतेची अभिव्यक्ती असते. संविधानातील बदलाबाबत त्याचा अर्थ स्पष्ट करताना ॲरिस्टॉटल म्हणतो की, ''शासनाची सार्वभौम सत्ता ज्यांच्या हाती आहे अशा पदव्यवस्थेत परिवर्तन म्हणजे संविधानात बदल नाही तर त्यांचा परिवर्तनाचा अर्थ फार व्यापक आहे. त्याच्या मते समाजातील नैतीक, आर्थिक, सामाजिक मूल्यांमध्ये जेव्हा बदल होतो तेंव्हा संविधानात परिवर्तन झाले असे मानतो.'' याचाच आधार घेवून संविधानांचे वर्गीकरण करून राज्यांच्या वर्गीकरणाचे तो प्रतिपादन करतो. राज्याच्या वर्गीकरणाचे निकष ॲरिस्टॉटलने पुढील दोन घटकाच्या अधारे केले आहे.

वर्गीकरणाचे निकष :

१) संख्यात्मक :

संख्या तत्वाचा आधार घेताना ॲरिस्टॉटल म्हणतो की राज्यांतील सार्वभौम सत्तेचा वापर करण्याची संख्या किती आहे. या आधारावर राज्याचे प्रकार पाडले आहेत.

२) **गुणात्मक / उद्‌देशात्मक :**

गुणात्मक तत्व म्हणजे राज्याची सार्वभौम सत्ता वापरण्यामागील हेतू काय आहे. तसेच सत्ता वापरणाऱ्याचा हेतू कोणता आहे. सार्वभौम सत्ता वापरणाऱ्याचा हेतू स्वार्थी आहे की निस्वार्थी आहेत, यावरून राज्याचा उद्‌देश सार्वजनिक आहे की वैयक्तीक हित आहे हे यावरून लक्षात येते. तसेच यावरून राज्याचे शुद्ध आणि अशुद्ध प्रकार पाडले आहेत.

राज्याचे वर्गीकरण :



१) एक व्यक्ती	राजेशाही / राजतंत्र	हुकूमशाही
२) काही व्यक्ती	महाजनसत्ता / कूलीन तंत्र	अल्पजनशाही / सरंजामशाही / धनिकतंत्र
३) अनेक व्यक्ती	लोकशाही (समतोल)	लोकशाही (झुंडशाही)

ॲरिस्टॉटलने संख्यात्मक व गुणात्मक तत्वाच्या आधारावर राज्याचे शुद्ध व अशुद्ध असे दोन प्रकार सांगितले आहेत अशा एकूण सहा प्रकारात राज्याचे वर्गीकरण केले आहे.

अ) शुद्ध प्रकार :

१) राजेशाही :

ॲरिस्टॉटलने राज्याच्या शुद्ध प्रकारात चांगले राज्य म्हणून राजेशाही यांचा समावेश केला आहे. राज्याचा हा सर्वात चांगला प्रकार आहे. शासनाची सत्ता एका व्यक्तीच्या हातात असताना राजा विवेक बुद्धीने निर्णय घेत असतो. त्यांचा उद्‌देश हा जनकल्याणाचा असतो सार्वजनिक हितासाठी चांगले निर्णय एका व्यक्तीला घेता येतात म्हणून राजेशाही हा शासनाचा प्रकार श्रेष्ठ दर्जाचा आहे.

२) महाजनशाही :

महाजनशाही हा राज्याचा शुद्ध प्रकार आहे. या प्रकारात राज्याची सार्वभौमसत्ता काही मोजक्या लोकांच्या हातात असते. त्या लोकांचा उद्‌देश हा चांगला असतो या शासन प्रकारातील काही लोकांच्या

हातात सत्ता असलेले लोक निस्वार्थी व गुणी वृत्तीचे असतात. अशा व्यक्तींना राज्यव्यस्थेचा अधिकार वंशपरंपरेनुसार प्राप्त होऊ शकतो. महाजनशाहीत सार्वभौम सत्तेचा वापर जनतेच्या कल्याणासाठी केला जातो.

३) लोकशाही :

हा शासनाचा चांगला प्रकार आहे. सर्वसामान्य लोकांना सार्वभौम सत्तेमध्ये सहभागी करून घेतले जाते. या प्रकारात शासनाची सत्ता लोकांच्या हाती असते ते सर्व सुखी जीवनासाठी शासनाचे संचालन करतात जनकल्याण हा शासनाचा उद्‌देश असतो. जनतेचे जनतेसाठी आणि जनतेद्वारे चालविण्यात आलेल्या राज्याची ही अभिव्यक्ती आहे. त्यामुळे आपणच कायदे करणारे, आपणच कायद्याची अंमलबजावणी करणारे ती योग्य की अयोग्य आपणच तपासणारे त्याच्या यशापयशाची जबाबदारी आपल्यावरच असणारी ही जबाबदार शासनपद्धती आहे.

अशा प्रकारे शुद्ध किंवा चांगल्या राज्याचे तीन प्रकारात वर्गीकरण करण्यात आले आहे. यात महत्वाचे म्हणजे सत्तेचा उपयोग हा जनहित कल्याणासाठीच केला जातो. ज्या शासन पद्धतीत अशा प्रकारचा उद्‌देश असतो ती शासनपद्धती चांगली असते.

ब) अशुद्ध प्रकार :

१) हुकूमशाही :

हा राज्याचा अशुद्ध प्रकार आहे. शासनाची सार्वभौम सत्ता जेव्हा एका व्यक्तीच्या हातामध्ये असते तेव्हा ती व्यक्ती स्वार्थी वृत्तीची असते. स्वार्थाने तो शासन करतो. तेव्हा त्याला आपण हुकूमशाही असे म्हणतो. समाजहितापेक्षा वैयक्तीक हिताला प्राधान्य शासनकर्त्यामार्फत केले जाते. अशा शासनाच्या प्रकारात जनता सुखी-समाधानी जीवन जगू शकत नाही. जनतेचे सुख हा राज्याचा मुख्य उद्‌देश गमावल्यामुळे हा राज्याचा अशुद्ध प्रकार आहे.

२) संरजामशाही किंवा अल्पजनशाही :

महाजनशाहीला विकृत रूप प्राप्त होते तेव्हा सरंजामशाही किंवा अल्पजनशाही निर्माण होते. यामध्ये देखील शासनकर्त्याचा उद्‌देश स्वार्थ असतो. ज्या ज्या ठिकाणी स्वार्थी लोकांच्या हातात राज्य जाते मग ते संख्येने कितीही असो ते राज्य अशुद्ध प्रकारात मोडते. जनतेचे हित करणे त्याचे दुय्यम उद्‌देश असतो. जणकल्याणाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे यात सत्तेचा दुरूपयोग होतो. म्हणून सरंजामशाही हा राज्याचा प्रकार अशुद्ध आहे.

३) लोकशाही (झुंडशाही) :

हा अशुद्ध राज्याचा शेवटचा प्रकार आहे. ज्यावेळी शासनाची सत्ता सर्वच लोकांच्या हाती असते आणि या सर्वांचा उद्‌देश स्वार्थ सिद्ध करण्याचा असतो. तेव्हा सत्तेचा दुरूपयोग होऊन गोंधळ आणि अशांतता निर्माण

होते. यामुळे समाजामध्ये आराजकता निर्माण होते. ज्याला जसे वाटेल तसे वागल्यामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्था मोडकळीस येतो म्हणूनच या प्रकाराला झुंडशाही म्हटले आहे.

राज्याचे परिवर्तनचक्र / राजकीय परिवर्तनाचे (क्रांतिचे) फिरते चक्र :

ॲरिस्टॉटलने राज्याचे परिवर्तनाचे चक्र स्पष्ट केले आहे. राज्याच्या वर्गीकरणाचे स्पष्टीकरण केल्यानंतर राज्याच्या परिवर्तन कशा प्रकारे होते या विषयी विवेचन करण्यात आले आहे. शुद्ध आणि अशुद्ध यामध्ये राज्याचे प्रकार तेच आहेत नामसदृश्यामुळे दोन्हीमध्ये नेमके काय पाहिजे यामध्ये विचाराबाबत गोंधळ होऊ नये यासाठी ॲरिस्टॉटलने राज्याचे परिवर्तनचक्र स्पष्ट केले आहे. परिवर्तनाचा विचार करताना त्यांनी सत्तांतर तत्वाचा विचार केलेला आहे.

परिवर्तनाचा अर्थ :

राज्यातील परिवर्तन म्हणजे राज्यांचे चांगल्या प्रकारातून वाईट प्रकारात जाण्याची क्रिया होय. ही प्रक्रिया नेहमी चालू असते. म्हणून त्यानी त्याला परिवर्तन चक्र असे म्हटले आहे. राजेशाही हा राज्याचा शुद्ध प्रकार आहे. यामध्ये सत्तेचा वापर करणारा राजा हुशार, बुद्धीवान, गुणी असतो परंतु यातील सर्व राज्याचे राजे हे वरील प्रकारचे असतीलच असे नाही. तर राजा जुलमी, अन्यायी, स्वार्थी असेल तर राजेशाही या शुद्ध प्रकाराचे रूपांतर अशुद्ध हुकूमशाही प्रकारात होतो. राजेशाहीला विकृत स्वरूप प्राप्त होते या शासनाच्या पद्धतीला लोक कंटाळतात. अशा कंटाळलेल्या अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी राज्यातील काही लोंक बुद्धिवान, हुशार, कुशाग्र लोक सार्वभौम सत्ता आपल्या हाती घेतात तेव्हा महाजनशाही हा शुद्ध प्रकार तयार होतो. या महाजनशाहीमध्ये सत्तेचा वापर करणारे लोक हे जनकल्याणासाठी वापर करतात तरच शुद्ध प्रकार टिकून राहातो. अन्यथा कालांतराने हे सत्ता वापरणारे लोक म्हणजे महाजनशाहीतील सत्ताधिश अन्यायी व स्वार्थी वागतात. यातून महाजनशाहीचे रूपांतर संरजामशाहीमध्ये होते. संरजामशाहीमध्ये सत्ताधीश वर्ग हा समाजाच्या हिताकडे दुर्लक्ष करून स्वहिताकडे कटाक्षाने लक्ष देत असतो. संरजामशाही हा अशुद्ध प्रकार आहे. यामुळे कालांतराने काही लोक या शासनाल्या प्रकाराला कंटाळून जातात. काही कालांतराने मग लोकशाही निर्माण होते. राज्याची सार्वभौम सत्ता अनेक व्यक्तीच्या हातामध्ये असते. या अनेक सत्ताधिश व्यक्ती ह्या समाजांच्या कल्याणसाठी, विकासासाठी कार्य करतात. समाजातील मनुष्याना उच्च दर्जाचे जीवन जगण्यासाठी कार्य करतात. हे कार्य करता-करता यामध्ये काही स्वार्थी निर्माण होते. मग स्वार्थ निर्माण झाला की काही कालांतराने लोकशाहीचे रूपांतर झुंडशाही चा अशुद्ध प्रकारात परिवर्तन होते. कालांतराने राज्यातील जनता लोकशाहीस (झुंडशाहीस) कंटाळते. अशा वेळी राज्यातील एखादी हुशार, तज्ञ, कर्तबगार व्यक्ती पुढे येऊन सत्ता प्राप्त करते तेव्हा राजेशाही निर्माण होते. अशा प्रकारे राज्याचे फिरतेचक्र हे सतत चालू असते.

ॲरिस्टॉटलच्या राज्याच्या वर्गीकरणाचे परिक्षण / मूल्यमापन :

ॲरिस्टॉटलने संख्यात्मक आणि गुणात्मक या दोन तत्वाच्या आधारे राज्याचे वर्गीकरण जे केले आहे परंतु

त्यांच्या वर्गीकरणावर काही दोष आहेत ते पुढील मुद्यावरून करण्यात येते.

१) शासनाचे किंवा राज्याचे वर्गीकरण :

ॲरिस्टॉटलने केलेले वर्गीकरण राज्याचे नसून राज्यातील सरकारचे आहे. सरकार परिवर्तनीय असते. पण राज्य परिवर्तनीय नसते. ॲरिस्टॉटलने मात्र राज्य आणि शासन यात फरकच केला नाही वास्तविकता हा सरकार हा राज्याचा अत्यंत महत्वाचा घटक आहे. सार्वभौमत्व नष्ट झाले तर राज्य नष्ट होते. त्यामुळे ॲरिस्टॉटलने शासनाचे वर्गीकरण करून राज्याचे वर्गीकरण असे म्हटले आहे.

२) अपूर्ण वर्गीकरण :

ॲरिस्टॉटलने राज्याचे केलेले वर्गीकरण हे पूर्ण नाही अशी टीका केली जाते. ॲरिस्टॉटलने या आधुनिक कालखंडातील शासनाचे जे प्रकार आहेत त्यांचा उल्लेख शुद्ध किंवा अशुद्ध या प्रकारात समावेश केला नाही. म्हणून ते वर्गीकरण अपूर्ण वाटते.

३) संख्यातत्वावर भर :

ॲरिस्टॉटलने राज्याचे वर्गीकरण करताना संख्येला आधार माणून राज्याचे प्रकार केले. गुणांना त्यानी ज्या प्रमाणात महत्व द्यायला पाहिजे होते त्या प्रमाणात महत्व दिलेले नाही. असा त्यांचा वर्गीकरणावर आक्षेप घेण्यात आलेला आहे.

४) आधुनिक काळासाठी अनुपयुक्त / निरूपयोगी :

ॲरिस्टॉटलने राज्याच्या वर्गीकरणात ज्या प्रकाराचा उल्लेख केला त्यापैकी अनेक प्रकार हे इतिहास जमा झाले आहेत. त्यामुळे आधुनिक काळात त्याचे वर्गीकरण उपयोगी नाही. आधुनिक काळातील शासनाचे प्रकार यामध्ये संसदीय, अध्यक्षीय, संघराज्यात्मक, एकात्म अशा वेगवेगळया शासनाचे प्रकार आहेत यांचा पण उपयोग ॲरिस्टॉटलने वर्गीकरणात करायला पाहिजे होता पण केलेला नाही अशी एक टीका केली जाते.

थोडक्यात ॲरिस्टॉटलच्या राज्याचे वर्गीकरण निर्दोष नाही. परंतु त्यामुळे त्यांच्या विचारांचे महत्व काय कमी होत नाही. ॲरिस्टॉटलने केलेले राज्याचे वर्गीकरण हे नगरराज्याच्या पार्श्वभूमीवर तपासणे अगत्याचे ठरेल. ॲरिस्टॉटलच्या वर्गीकरणाचा आधार घेतल्याशिवाय राज्याचे वर्गीकरण पूर्ण होत नाही. ॲरिस्टॉटलने संख्यात्मक व गुणात्मक तत्वाच्या आधारे राज्याची सार्वभौम सत्ता वापरणारी लोक कोणते व त्याना असलेले सरकार कोणते याविषयी उपयुक्त माहिती सार्वभौम सरकारांना व राज्यातील नागरीकांना मिळण्यासाठी उपयुक्त आहे. ॲरिस्टॉटलने दिलेले शाश्वत तथ्य हे आधुनिक शासनाची पारख होण्यास मदत होते. ॲरिस्टॉटलने राज्याचे केलेले वर्गीकरण हे शास्त्रशुद्ध व उपयुक्त अशा स्वरूपाचे आहे.

२.२.४ ॲरिस्टॉटलचे क्रांतिसंबधी विचार :

ॲरिस्टॉटलने क्रांतिसंबधी विचांर 'पॉलिटिक्स' या ग्रंथाच्या पाचव्या व सहाव्या भागात विवेचन केले आहे. क्रांती म्हणजे काय? क्रांतीचे स्वरूप, कारणे, उपाय याविषयी वास्तववादी व मानसशास्त्रीय पद्धतीने विवेचन करण्यात आले आहे. शासनात वारंवार होणारे राजकीय परिवर्तन ही ॲरिस्टॉटलच्या काळातील ही नगरराज्याची फार मोठी समस्या होती. त्याचे कारणे शोधून त्यावर प्रतिबंध घालण्यासाठी काही उपाय सूचविण्याच्या अनुषंगाने ॲरिस्टॉटलने क्रांतीसंबधी विचार मांडले आहेत. क्रांती हा राज्यसंस्थेला लागलेला रोग आहे. असे ॲरिस्टॉटल म्हणतो. तो रोग नाहीसा करण्यासाठी ॲरिस्टॉटलने उच्च दर्जाचा डोस देण्याचा प्रयत्न क्रांतीविषयक विचारातून केलेला आहे.

क्रांतीचा अर्थ :

ॲरिस्टॉटलच्या मते, क्रांती म्हणजे बदल होय. मग ते राज्यघटनेत असो किंवा सत्ताधारी व्यक्तीत असो. राज्यघटनेत किंवा सत्ताधारी व्यक्तीत बदल होणे म्हणजे क्रांती होय. राज्यघटनेच्या बदलामुळे राज्याच्या सामजिक, आर्थिक, प्रशासकीय, स्वरूपात बदल होतो. राज्यघटना तीच राहून सत्ताधारी व्यक्तीत बदल होतो त्यास क्रांती म्हणतात. सामान्यतः क्रांती ही बलपूर्वक होण्याच्या बदलाला म्हणतात. ॲरिस्टॉटलला या पेक्षा व्यापक अर्थ अभिप्रेत आहे. हे यावरून स्पष्ट होते. तो म्हणतो क्रांतीचे स्वरूप नेहमी सारखे नसते. म्हणून त्यांनी क्रांतीचे प्रकार सांगितले.

क्रांतीचे प्रकार :

ॲरिस्टॉटलच्या मते क्रांती होण्यासाठी पाच प्रकार स्पष्ट करण्यात आले आहेत. क्रांतीसाठी राज्यघटनेत पूर्णतः बदल किंवा अंशतः बदल होतो. यावरून क्रांतीचे प्रकार पाहता येतील.

१) संपूर्ण क्रांती

जुन्या राजकीय व्यवस्थेचे समुळ उच्चाटन करून नविन राजकीय व्यवस्था निर्माण होते किंवा जुनी राज्यघटना बदलून पुन्हा नवीन राज्यघटना तयार होते त्या बदलाला संपूर्ण क्रांती म्हणतात.

२) आंशिक क्रांती

संविधान जसेच्या तसे रहाणे संविधानातील एखाद्या भागात अल्पशा प्रमाणात बदल होणे म्हणजे अंशतः क्रांती होय.

३) रक्तमय किंवा रक्तहिन क्रांती

राजकीय व्यवस्थेत बदल करताना जेव्हा रक्तपात होतो किंवा हिसांत्मक मार्गाने सत्तेत बदल करावा लागतो त्या क्रांतीस रक्तरंजीत क्रांती म्हटले जाते. या उलट अंहिसेंच्या मार्गाने राजकीय व्यवस्थेत बदल केला जातो त्याला रक्तहिन क्रांती म्हणता येतो.

४) व्यक्तीगत क्रांती

एखाद्या जुलमी राज्यकर्त्यामुळे राज्यात अन्याय, अत्याचार वाढत असेल त्या विरोधात जनमत संघटीत होऊन संबंधीत राजाला पदावरून पाय उतार करणे म्हणजे व्यक्तीगत क्रांती होय.

५) वैचारिक क्रांती :

समाजास घातक असलेली प्रचलित विचारप्रणाली टाकून देऊन नवीन विचारप्रणाली स्वीकारणे यास वैचारिक क्रांती असे म्हणतात.

क्रांतीची कारणे :

ॲरिस्टॉटलने क्रांतीची विविध कारणे विशद केलेली आहेत. परिवर्तनाची कारणे शोधली यालाच क्रांतीचे कारणे म्हणता येईल तो म्हणतो क्रांती तीन कारणांनी होते. ॲरिस्टॉटलच्या क्रांतीच्या मीमांसाने त्यांचे ज्ञान किती सखोल आहे हे आपणाला स्पष्ट होते. क्रांतीचा मुख्य उद्देश हा अन्यायाविरूद्ध उठाव करणे हा असतो. क्रांतीचे प्रमुख तीन कारणे पुढील प्रमाणे आहेत.

अ) क्रांतीची सामान्य कारणे :

प्रथम क्रांतीचा विचार मनुष्याच्या मनात निर्माण होतो. नागरीकांवर जर अन्याय निर्माण होत असेल तर त्या अन्यायाविरूद्ध उठाव करण्याचे निर्धार मनुष्याच्या मनामध्ये निर्माण होतो मग माणूस परिवर्तन घडवून आणतो. क्रांतीची सामान्य कारणे सांगताना मानसशास्त्रीय, राजकीय, आर्थिक आणि सामाजिक दृष्टीकोणातून स्पष्ट करण्यात आलेली आहेत. राज्यात क्रांती घडून येण्यासाठी सामान्यतः पुढील घटक कारणीभूत आहेत.

१) समानतेची आंकांक्षा

हे क्रांतीचे मानसशास्त्रीय कारण आहे. समतेची आकांक्षा जागृत होणे हे क्रांतीचे प्रमुख अस्त्र आहे. राज्यात जेव्हा सामाजिक न्याय आणि असमानता नाकारली जाते तेव्हा क्रांती होते. समानतेची वागणूक न मिळाल्यास असमानता निर्माण होऊन जनतेत अंसतोषाची भावना निर्माण होते यातूनच क्रांती होते.

२) आर्थिक विषमता

आर्थिक विषमतेमुळे गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी वाढत जाऊन श्रीमंत व्यक्ती गरीब व्यक्तीकडे तुच्छ नजरेने तर गरीब व्यक्ती श्रीमंत व्यक्तीकडे ईर्षा व सूडाच्या भावनेने पाहतात आपल्यालाही त्यांच्याप्रमाणे जीवन जगता यावे या भावनेतून क्रांती होते समाजामध्ये आर्थिक विषमतेची खोल दरी निर्माण झाल्यास क्रांती होण्याची भीती असते.

३) दारिद्र्य

दारिद्र्य हे क्रांतीच्या पाठीमागील सर्वात प्रमुख कारण आहे. लोकसंख्या वाढत जाते आणि उत्पादनाच्या साधनाना मर्यादा पडतात. राज्यात जनतेला उपासमारीची वेळ निर्माण होते. या उपासमारीच्या वेळेतून जनतेत अंसतोष निर्माण होतो. या जनतेच्या अंसतोषातून काही व्यक्ती बंडाचा मार्ग उपसतात यातूनही क्रांती होते.

४) भिती

राज्यातील निरनिराळ्या वर्गात परस्पराविषयी अविश्वासाची भावना वाढीस लागून संशयही बळावतो. यातून एका वर्गाला दुसऱ्या वर्गाविषयी भिती निर्माण होते. गुन्हेगारांना आपल्याला शिक्षा होईल अशी भिती वाटते म्हणून तो शासनव्यवस्थाच उलटून टाकण्याचा प्रयत्न करतो. किंवा भविष्यात आपल्यावर अन्याय होईल या भीतीने तो क्रांती करतो.

५) पक्षपाती वर्तणूक

प्रत्येक नागरीकाला राज्यकारभारात भाग घेण्याची समान संधी असावी असे वाटते. एकच गट सत्तेत असेल तर बाकीचे गट नाराज होतात. अशा प्रकारे सत्तेसाठी स्पर्धा सुरू होऊन त्यातून क्रांती होण्याची शक्यता असते.

६) निष्काळजीपणा

शासनाच्या निष्काळजीपणामुळे कधीकधी अयोग्य व्यक्तीची नियुक्ती महत्वाच्या पदावर होते. अशी व्यक्ती संधी मिळताच विद्रोह करून सत्ता आपल्या हाती घेते.

७) अयोग्य मोबदला

मनुष्याला योग्यतेप्रमाणे त्यांच्या कार्याच्या प्रमाणात जर मोबदला मिळाला नाही तर तो क्रांतीसाठी प्रवृत होतो.

ब) क्रांतीची विशिष्ठ कारणे :

ॲरिस्टॉटलने विविध शासनपद्धतीत क्रांतीची विशिष्ठ कारणे स्पष्ट केलेली आहेत.

१) राजेशाहीतील क्रांती

राजघराण्यातील कौटूंबीक भांडणे, परस्परात सत्तेसाठी स्पर्धा, परस्पर द्वेष तसेच जेव्हा राजा आपल्या प्रजेशी जुलमी वर्तन करतो, एखाद्या प्रतिष्ठित व्यक्तीचा अपमान करतो तेव्हा राजाविरूद्ध कटकारस्थान, बंडखोरी, विद्रोह होण्याची शक्यता असते.

२) महाजनशाहीतील क्रांती

महाजनशाहीत राज्याची सार्वभौम सत्ता काही लोकांच्या हातात असते. ते सत्ता आणि मानसन्मानाला पात्र होतात जेव्हा हे राज्यातील सामान्य जनतेला सहन होणार नाही तेव्हा ते क्रांतीसाठी प्रवृत्त होतात.

३) अल्पजनशाहीतील क्रांती

यामध्ये श्रीमंत पण स्वार्थी राज्यकर्ता जनतेवर जुलूम आणि अत्याचार करतो. राज्यकर्त्यांची लोभी महत्वकांक्षा आणि आपापसातील शत्रुत्व तसेच श्रीमंत लोक सत्तेसाठी सतत धडपडत असतात त्यामुळे जनहितांकडे दुर्लक्ष होऊन जनता क्रांती करण्यास प्रवृत्त होते.

४) लोकशाहीतील क्रांती

अनेक वेळा वक्तृत्वाची कला अवगत असलेले लोक सत्य असल्याचा आश्रय घेऊन लोकमत आपल्या बाजूने करून घेऊन जनतेच्या भावनेला आव्हान देऊन ते असंतोष पसरवितात आणि त्यातून क्रांती होते. प्रजा व जनता यामध्ये दुरावा निर्माण होऊन क्रांती निर्माण होते.

५) हुकूमशाहीतील क्रांती :

एकाच व्यक्तीच्या हाती सत्ता असल्याने स्वतःच्या स्वार्थासाठी सत्तेचा दुरूपयोग करून जनहिताकडे दुर्लक्ष केले जाते. जनतेस अन्यायी वागणूक देऊन बेजबाबदारपणे वागतात. अशा जुलमी राजवटीविरूद्ध जनता एकत्र येऊन क्रांती करते.

क्रांती टाळण्याचे उपाय :

ॲरिस्टॉटलच्या मते क्रांती ही राज्यातील जनतेसाठी धोकादायक आहे म्हणून ती टाळली पाहिजे. याचा अर्थ क्रांती होऊच नये असा नाही क्रांतीची कारणे दाखविण्यात ॲरिस्टॉटलची राजकीय परिपक्वता जेवढ्या मोठ्या प्रमाणात दिसून येते तेवढीच ती क्रांती टाळण्याचे उपाय सांगतानाही दिसून येते. वारंवार होणाऱ्या क्रांतीमुळे राज्यातील स्थैर्य नाहिसे होऊन राज्याच्या विकासात अडथळे निर्माण होतात. म्हणून क्रांतीची परिस्थितीच निर्माण होऊ नये यासाठी काही उपाय ॲरिस्टॉटलने सांगितले आहेत. ते पुढीलप्रमाणे–

१) कायदा व न्यायाबद्दल आदर :

जनतेच्या मनामध्ये कायद्याबद्दल सार्वजनिक आदर व निष्ठा निर्माण करण्याचे प्रयत्न करावेत. जनतेत कायदा पालनाची सवय वाढीस लावावी. कायदे पालन केले तरच आपले हित साध्य आहे. कायद्याचा आदर केला तरच न्याय प्रस्थापित करता येतो म्हणून कायद्याचा भंग करणाऱ्या व्यक्तीस कठोर शिक्षा करावी.

२) शिक्षण :

ॲरिस्टॉटलच्या मते क्रांती टाळण्याचा उत्तम उपाय म्हणजे शिक्षण होय. शिक्षणामुळे राज्यातील नागरिकाला क्रांतीच्या गुण–दोषाची पारख करता येते. यामुळे लोकांत कर्तव्याची जाणीव निर्माण होते.

३) सत्तेचे विकेंद्रीकरण :

राज्याची सत्ता ही एकाच वर्गाच्या हाती केंद्रित होऊ नये सत्तेच्या केंद्रीकरणामुळे सत्ताधारी वर्ग भ्रष्ट बनतो. सत्ता ही माणसाला भ्रष्ट करते आणि निरकूंश सत्तेमुळे माणूस पूर्ण भ्रष्ट होतो. म्हणून मानव भ्रष्टाचारापासून मुक्त करायचा असेल तर सत्तेचे विकेंद्रीकरण करावे त्यामुळे क्रांती टाळता येईल.

४) परिदृढ राज्यघटना :

लवचिक राज्यघटना ही राज्याला अस्थिरतेकडे नेत असते. म्हणून राज्याच्या स्थैर्यासाठी व क्रांती टाळण्यासाठी राज्यघटना परिदृढ असली पाहिजे. राज्यघटना परिदृढ असल्यास राज्यघटनेत सहजा–सहजी बदल करावा अशी भावना जनतेच्या मनामध्ये निर्माण होणार नाही म्हणजे ती क्रांती टाळण्यासाठी उत्तम उपाय आहे.

५) जागरूक शासन :

राज्याचा शासक वर्ग आपल्या कर्तव्याविषयी नेहमी जागरूक असला पाहिजे. आपल्या राज्यातील हालचालीवर शासकाचे बारीक लक्ष असावे लागते. कोणकोणते गट शासकाच्या विरोधात कार्य करतात. गटबाजी कोण करतो, कोणते गट क्रांतीची तयारी करतात शासकाच्या विरूद्ध काही डावपेच आखले जातात का इत्यादी माहिती मिळवून त्यांच्यावर कडक कारवाई केली पाहिजेत त्यासाठी शासक सतत जागरूक असले पाहिजे.

६) पदाची समान वाटणी :

राज्यातील विविध पदावर व्यक्तीची नेमणूक करताना समान तत्वाच्या आधारे व्यक्तीची पात्रता व योग्यता पहावी. जे अनेक वर्षापासून नोकरीसाठी वंचित आहेत त्यांचा पण विचार केला पाहिजेत. त्यामुळे राज्यातील नागरीक समाधानी राहतील.

७) राज्यकर्त्याचे आदर्शवर्तन :

राज्याची सत्ता भोगणाऱ्या राज्यकर्त्यानी आपले वर्तन साफ ठेवले पाहिजे. तो चारित्र्यसंपन्न असला पाहिजे त्यांच्या गुणामुळे जनतेत आदर्श निर्माण झाला पाहिजे. त्यानी निस्वार्थभावनेने आणि निःपक्षपातीपणे कारभार करून जनतेच्या मनात विश्वास संपादन करावा जेणे करून जनता क्रांतीचा मार्ग अंवलंबणार नाही.

८) भ्रष्टाचाराला आळा :

राज्यातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी व राज्यकर्तेयाना भ्रष्टाचार लाचलुचपत व वशिलेबाजी यापासून दूर राखले पाहिजे.

९) परकीय आक्रमणाची भिती :

जनतेचे लक्ष अंतर्गत प्रश्नापासून विचलीत करण्यासाठी व त्यांच्यात राष्ट्रभक्तीची भावना वाढीस लावून राष्ट्रीय एकता निर्माण करण्यासाठी अधून-मधून नागरिंकाना परकी य आक्रमणाच्या धोक्याची जाणीव निर्माण करून द्यावी म्हणजे जनता क्रांतीस प्रवृत्त होणार नाही.

१०) संभाव्य संकटाची माहिती :

राज्यातील लोकांना राज्यात येणाऱ्या संभाव्य संकटाची माहिती देऊन त्यांची मानसिक तयारी व येणाऱ्या संकटाला मात करण्याची तयारी करावी या विषयी त्यांना मार्गदर्शन राज्यकर्त्याकडून नागरीकांना मिळाले तर ते नागरिक क्रांती करण्यास प्रवृत्त होणार नाहीत.

थोडक्यात, ॲरिस्टॉटलने क्रांती का निर्माण होते तिची कारणे आणि क्रांती टाळण्याचे उपाय सांगितले आहेत. ॲरिस्टॉटलच्या या क्रांतीविषयी विचारावरून त्यांच्या बुद्धिमतेचा आवाका आपणाला लक्षात येतो. ॲरिस्टॉटलने या विषय विचार मांडताना त्यांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडणी केली आहे. यांचा अभ्यास

मानसशास्त्रीय, आर्थिक, सामाजिक, राजकीय अनुषंगाने उपयुक्त ठरतो. ॲरिस्टॉटलने क्रांतीविषयी कारणे व उपाय सुचवून राज्यव्यवस्था कशा पद्धतीने पुढील वाटचाल करते यासाठी एक मार्गदर्शक विचार त्यानी दिलेली आहेत. जगातील आजपर्यंत ज्या क्रांत्या झाल्या आहेत त्या क्रांतीचे कारणे ही ॲरिस्टॉटलने सांगितली त्या क्रांतीची कारणे यात आपणाला सापडतात. म्हणून क्रांतीविषयी विचार सांगणारे एकमेव पाश्चात्य विचारवंत ॲरिस्टॉटल यांचे नाव घ्यावे लागते.

२.२.५ ॲरिस्टॉटलचे नागरिकत्वासंबंधी विचार :

ॲरिस्टॉटलने नागरिकत्वासंबधी विचार 'द पॉलिटिक्स' या ग्रंथाच्या तिसऱ्या भागात विवेचन केले आहे. त्याच्या मते नागरिक म्हणजे राज्यातील सर्व जनता नसून राज्यकारभारात सहभागी असणारे लोक म्हणजेच नागरिक होय. नागरिकांचे मुख्य लक्षण शासन कारभारात भाग घेणे आहे. राज्य नागरीकांचे मिळून बनले असते. ज्याला राज्याच्या राज्यकारभारात भाग घेता येतो तो नागरिक नागरिक होण्यासाठी विशिष्ठ योग्यता असली पाहिजे ती योग्यता नैसर्गिक आहे. राज्याचे शासन चालविणे किंवा दुसऱ्याकडून चालवून घेणे अशी योग्यता असणाऱ्यालाच ॲरिस्टॉटल नागरिक मानतो.

नागरिकत्वाचा अर्थ :

नागरिक म्हणजे अशी व्यक्ती की जी न्यायशासनात आणि विधीनियमांच्या निर्मितीच्या कार्यात किंवा एका कार्यात भाग घेणारी व्यक्ती नागरिक ठरते.

ॲरिस्टॉटलच्या मते राज्यघटना ही नागरिकत्वाचा पाया आहे. राज्यघटना ही राज्यातील राज्यकारभाराच्या योजना, स्वरूप व पद्धती आणि कार्य स्पष्ट करते. तेंव्हा राज्यातील लोक हे राज्यघटनेच्या नियमाप्रमाणे राज्यकारभारात भाग घेतात तेच खऱ्या अर्थाने नागरिक ठरतात. ॲरिस्टॉटलच्या मते जे राज्याच्या विविध प्रकारानुसार नागरिकत्वाच्या विविध अटी निर्माण कराव्यात नागरिकत्वाच्या विविध अटी पूर्ण करून राज्यकारभारात प्रत्यक्ष सहभाग घेतो त्यालाच नागरिक म्हणावे.

नागरिकत्वाच्या अटी / पात्रता :

ॲरिस्टॉटलने राज्यांतील व्यक्तीला नागरिकत्व प्राप्त होण्यासाठी काही अटी घालून दिलेल्या आहेत.

१) नागरिक होऊ इच्छिणारी व्यक्ती बुद्धिमान, हुशार, शिक्षित असली पाहिजे.

२) संपत्तीनुसार नागरिकत्व द्यावे.

३) सामाजिक संस्थेच्या सभासदांना नागरिकत्व द्यावे.

४) राज्यकारभारात भाग घेण्याची क्षमता असणाऱ्यांना द्यावे.

५) ज्यांच्या अंगी संयम, शौर्य, न्याय, उदारता असणाऱ्यांना द्यावे.

६) भौतिक विवंचनेपासून मुक्त असलेल्यांना नागरिकत्व द्यावे.

नागरिकत्वाची अपात्रता :

ॲरिस्टॉटलने नागरिकत्वासाठी जे अटी घालून या अटीच्या निकषानुसार जशी पात्रता सांगितली आहे. त्याचप्रमाणे काही अटीच्या धर्तीवर राज्यातील व्यक्तींना नागरिकत्व देता येणार नाही या आधारावर त्यानी अपात्रता सांगितली आहे. ती नागरिकत्वाची अपात्रता पुढील प्रमाणे

१) जन्मावरून नागरिकत्व देऊ नये.

२) भूमितत्व या तत्वामुळे नागरिकत्व देऊ नये.

३) परकीयांना नागरिकत्व देऊ नये.

४) गरीब, कामगार यांना नागरिकत्व देऊ नये.

५) स्त्रियांना नागरिकत्व देऊ नये.

६) घरगुती कामे करणाऱ्या मुलांना नागरिकत्व देऊ नये.

ॲरिस्टॉटलने नागरिकत्वाच्या पात्रता आणि अपात्रता सांगून जो राज्यकारभारात भाग घेतो त्याला नागरिक म्हणावे असे सांगितले. कायदेनिर्मिती, कायद्याची अंमलबजावणी, न्यायदान, प्रशासन इत्यादी क्षेत्रात व्यक्तीला जेव्हा राज्यकारभारात संधी मिळते आणि ती व्यक्ती मिळालेली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडते तिचा समावेश नागरिकत्वात केला जावा. ॲरिस्टॉटलचे गुण हे नगरराज्यांचे होते. त्यामुळे त्यांनी नागरिकत्वाची केलेली व्याख्या संकुचित आहे त्यांच्यामते नागरिकत्व हा विशेष गुण आहे कारण त्यासाठी विशेष योग्यता लागते. शासनकार्यात सक्रिय भाग घेण्यासाठी बुद्धी आणि नैतिकतेच्या विशिष्ठ पातळीची आवश्यकता लागते. राज्यात राहाणाऱ्या प्रत्येक नागरिकांची पातळी ही वेगळी असते. त्यांच्याजवळ एवढी क्षमता नसते. त्यामुळे बहुसंख्य वर्ग नागरिकत्वाच्या अधिकारापासून वंचित राहातो. ॲरिस्टॉटलच्या मते नागरिकत्व म्हणजे हक्काची मिळणारी हमी नाही तर राज्याची सेवा करण्याचा तो एक प्रकार आहे. राजकीय हक्क उपभोगणाऱ्या समुहाला त्याने नागरिकत्वाच्या कक्षेत घेतले आहे.

थोडक्यात ॲरिस्टॉटलच्या मते ग्रामसभेचा सदस्य म्हणून कायदा निर्मिती प्रक्रियेत सहभाग होणारा आणि राज्याच्या घडामोडीत सक्रिय सहभाग नोंदवणारा व्यक्ती म्हणजे नागरिक होय.

नागरिकत्वाच्या विचाराचे परिक्षण :

ॲरिस्टॉटलने नागरिकत्वाचा विचार हा आदर्शाच्या दृष्टीकोणातून केला असला तरी त्याच्या विचारावर पुढील प्रमाणे टीका करण्यात येते.

१) संकुचित विचार

ॲरिस्टॉटलची नागरिकत्वाविषयी जो अर्थ सांगितला तो संकुचित स्वरूपाचा वाटतो. ग्रीक नगर राज्यात योग्य असली तरी ती आधुनिक काळात अयोग्य वाटते. यामुळे नागरिक व प्रजा यामध्ये फरक करणे कठीण जाते.

२) समतेविरोधी

नागरिकत्वाचा दर्जा ठराविक लोकांना दिला आहे. त्यामुळे राज्यातील नागरिकांना विषमता पहायला मिळाली. स्त्रियांना, कामगाराना, गुलांमाना नागरिकत्व यापासून वंचीत ठेवले आहे. त्यामुळे स्त्री-पुरुष, गरीब, श्रीमंत, कामगार, भांडवलदार अशी विषमता निर्माण झाली आहे.

३) चूकीचे निकष

राज्यकारभार करणाऱ्यास पात्र नागरिक ठरविले आहे. परंतु ही पात्रता कशी निश्चित करावी याबाबत अस्पष्टता दिसून येते. तसेच स्त्रिया, गुलाम, गरीब, कामगार हे गुणवान, बुद्धिवान नसतात हा विचारच चूकीचा वाटतो.

४) कर्तव्यावर भर

ॲरिस्टॉटलने नागरिकत्व बहाल करताना राज्यातील व्यक्तीच्या हक्कावर भर न देता त्यांच्या कर्तव्यावर भर दिलेला दिसतो. व्यक्तीने राज्यकारभारात भाग घेण्यासाठी त्यांच्या अंगी विशिष्ठ गुण असणे आवश्यक आहे.

५) श्रीमंताना नागरिकत्व

ॲरिस्टॉटलने श्रीमंत लोकांना नागरिकत्व देताना तो हुशार, बुद्धीमान, कुशाग्र आहे किंवा नाही याचा विचार केलेला नाही.

थोडक्यात, ॲरिस्टॉटलच्या नागरिकत्वाच्या विचारावर टीका होत असली तरी आदर्श नागरिक म्हणजे आदर्श राज्य हा त्याचा विचार महत्वाचा व प्रभावी वाटतो. ॲरिस्टॉटलने त्या काळातील नगरराज्याच्या परिस्थितीनुसार विचार मांडलेला आहे.

२.२.६ ॲरिस्टॉटल राज्यशास्त्राचा जनक :

पाश्चात्य देशात राजकीय तत्वज्ञानाची सुरूवात झाली. त्यामध्ये प्लेटो, ॲरिस्टॉटल सारख्या महान विचारवंताची भर पडली. ग्रीक राजकीय विचारवंतानी राज्यशास्त्रासाठी फार मोठे योगदान दिले आहे. ॲरिस्टॉटलची प्रज्ञा प्लेटोप्रमाणे विशुद्ध, तार्कीक विचाराची इमारत बांधणारी प्रज्ञा नाही. ती वास्तववादी व शास्त्रीय स्वरूपाची प्रज्ञा आहे व त्यातच ॲरिस्टॉटलचे वेगळेपण दिसून येते. प्लेटोनी राज्यशास्त्राला स्वतंत्र शास्त्र म्हणून कधीच संबोधले नाही किंवा तसा प्रयत्नही केला नाही. नीतीशास्त्राचा भाग म्हणून राज्यशास्त्राचा विचार केला त्याने प्लेटोच्या बाबतीत शास्त्रज्ञांची कसोटी लावता येत नाही. कारण प्लेटोचे विचार कल्पनेवर आणि आदर्शावर आधारित आहेत. ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्राला वेगळे शास्त्र स्वतंत्र शास्त्र म्हणून संबोधले आहे. शास्त्र म्हणजे एखाद्या ज्ञानाच्या शाखेची सुत्रबद्ध मांडणी होय. शास्त्रज्ञ नेहमी वास्तववादी दृष्टीकोणातून विचार करतो. शास्त्रज्ञाला आदर्शवादात रस नसतो. त्याला आदर्शवाद महत्वाचा वाटत नाही. ॲरिस्टॉटलच्या

तत्वज्ञानात वास्तवतेवर भर, शास्त्रियतेवर भर दिलेला दिसतो. ॲरिस्टॉटल हा शास्त्रज्ञाच्या कसोटीला उतरणारा विचारवंत आहे म्हणून त्याला राज्यशास्त्राचा जनक म्हणून संबोधले जाते. ॲरिस्टॉटलच्या वास्तववादी राजकीय दृष्टीने आणि त्यांच्या सूत्रबद्ध विचाराने राज्यशास्त्राची पायाभरणी झाली. राज्यशास्त्राला नीतीशास्त्रापासून वेगळे करून स्वंतत्र शास्त्र म्हणून मान्यता मिळवून दिली. त्याला राज्यशास्त्राचा जनक मानण्याची महत्वाची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) शास्त्रीय दृष्टीकोण

ॲरिस्टॉटलचा राज्यशास्त्राचा अभ्यास करण्याचा दृष्टिकोन हा शास्त्रीय स्वरूपाचा होता. ॲरिस्टॉटलची अभ्यास पद्धती निरीक्षण करून माहिती गोळा करण्याची आणि मिळालेल्या माहित्यांच्या आधारे नवीन सिद्धांत प्राप्त करण्याची होती. कोणताही सिद्धांत मांडण्यापूर्वी त्यांनी तत्कालीन राजकीय संस्थाचा सखोल अभ्यास केला. अभ्यासासाठी त्यांनी शास्त्रीय पद्धतीने माहिती गोळा केली. त्याने १५८ देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून शास्त्रीय निष्कर्ष काढले. त्यांनी काढलेले निष्कर्ष प्राप्त माहितीवर आधारित असल्यामुळे तो पहिला शास्त्रीय विचारवंत मानला जातो. शास्त्राचे दोन प्रकारात वर्गीकरण करतो एक सैद्धांतिक शास्त्र तर दुसरे व्यावहारिक शास्त्र यामध्ये राज्यशास्त्राचा समावेश व्यावहारिक शास्त्रात करतो.

२) वास्तववादी, व्यवहारवादी विचारवंत

राज्यशास्त्राच्या अभ्यासाला ॲरिस्टॉटलने नविन दिशा दिली त्याचा महत्वाचा गुण म्हणजे समतोल किंवा सुवर्णमध्य साध्य करण्याचा प्रयत्न आणि संतुलित विचार होय. त्यांचा विश्वास होता की मनुष्य केवळ कल्पनेवर किंवा आदर्शावर जीवन जगू शकत नाही त्यांच्या गरजापूर्ण होणे आवश्यक आहे. ॲरिस्टॉटलने प्लेटोच्या साम्यवादावर टीका करून कुटूंब संस्थेचे आणि मालमत्तेचे जोरदार समर्थन केले. गुलामगिरीचे समर्थन व्यवहार वादातून केले आहे. वास्तववादी आणि व्यवहारवादी स्वीकारणारा तो पहिला विचारवंत असल्यामुळे तो राज्यशास्त्राचा जनक आहे.

३) तुलनात्मक पद्धतीचा स्वीकार

राजकीय घटनांचा विचार करताना त्याने तुलनात्मक पद्धतीचा अवलंब केला. त्याने अनेक देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास करून तुलनात्मकरित्या कोणती पद्धती आदर्श ठरू शकते याचे स्पष्टीकरण केले. तुलनात्मक पद्धतीचा वापर आजही शास्त्रीय पद्धत म्हणून केला जातो. ॲरिस्टॉटलने राज्याचे वर्गीकरण हे विचार तुलनात्मक अभ्यास पद्धतीनेच मांडले आहेत. तुलनात्मक पद्धतीसाठी त्याने प्रचलित पद्धतीचा आणि आदर्श ठरू पाहणाऱ्या पद्धतीचा अभ्यास करून सिद्धांत प्रतिपादन केला. त्याची अभ्यासपद्धती पूर्णपणे शास्त्रीय होती. त्याने १५८ देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून ॲथेन्सची राज्यघटना हा ग्रंथ लिहिला आहे.

४) राज्यशास्त्राला स्वतंत्र दर्जा

ॲरिस्टॉटल पूर्व राज्यशास्त्राचा अभ्यास हा नीतीशास्त्रातून केला जात असे. प्लेटोनी पण राज्यशास्त्र हा नीतीशास्त्राचा एक भाग मानला होता. ॲरिस्टॉटलने मात्र नीतीशास्त्रापासून अलग करून राज्यशास्त्राला

पहिल्यांदा शास्त्र म्हणून दर्जा मिळवून दिला. राज्यशास्त्र हे स्वंतत्र शास्त्र आहे म्हणून त्यांचा अभ्यास करण्यात येऊ लागला राज्यशास्त्राचा अभ्यास हा स्वंतत्र शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणारा पहिला शास्त्रज्ञ आहे म्हणून त्याला राज्यशास्त्राचा जनक मानतात.

५) अनुभवजन्य पद्धती

ॲरिस्टॉटलने १५८ राष्ट्राच्या राज्यघटनांचा अनुभव पद्धतीने अभ्यास केला. अनुभवजन्य पद्धती म्हणजे एखादी गोष्ट कशी असावी हे पाहण्याऐवजी एखादी गोष्ट कशी आहे या पद्धतीने विचार करणे होय. प्लेटोने कसे असावे या पद्धतीने राजकीय विचार प्रतिपादन केले. ॲरिस्टॉटलने कसे आहे या पद्धतीने विचाराचे प्रतिपादन केले. ॲरिस्टॉटलने आदर्श राज्य शक्य आहे या अनुषंगाने विचार अनुभवजन्य पद्धतीने केले आहे.

६) तत्वज्ञांची सुत्रबद्ध मांडणी

ॲरिस्टॉटलने नवीन तत्वज्ञान सांगितले नाही तर प्रचलित तत्वज्ञाला सूत्रबद्ध पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला. काळाच्या अनुभवावर त्याला विश्वास होता इतिहासाला त्यानी अभ्यासाचा विषय बनविला. काळाच्या अनुभवाला दुर्लक्षीत करू नये असे त्याचे मत होते. त्याला संस्कृती, प्रथा, परंपरेबद्दल आदर होता. अशा प्रकारे नवीन आदर्शवादी तत्वज्ञान निर्माण करण्याऐवजी त्याने प्रचलित ज्ञान सुसंघटीत स्वरूपाचा मांडण्याचा प्रयत्न केला. म्हणून तो राज्यशास्त्राचा जनक आहे.

७) कायद्याचे सार्वभौमत्व

ॲरिस्टॉटलने कायद्याच्या अधिराज्यांची आणि सार्वभौमत्वाची कल्पना स्पष्ट केली आहे. तो म्हणतो की मनुष्य कितीही बुद्धिमान असला तरी त्यांचे ज्ञान कायद्यापेक्षा श्रेष्ठ असूच शकत नाही. यामध्ये प्लेटो कायद्यापेक्षा मनुष्याच्या बुद्धिवर विश्वास ठेवतो. मनुष्याची बुद्धी भ्रष्ट होईल तिला नियंत्रीत आणण्यासाठी कायद्याची आवश्यकता आहे असे प्लेटोला वाटत नाही. कायद्याची अधिसत्ता असल्यास व्यक्तीची हुकूमशाही प्रस्थापित होऊ शकत नाही. यासाठी ॲरिस्टॉटलने कायद्याचे सार्वभौमत्वाची कल्पना मांडली.

८) राजकीय संस्थांना आर्थिक आधार

ॲरिस्टॉटल म्हणतो की, संपत्तीच्या वाटपावर शासनाचा दर्जा आणि प्रकार अवलंबून असतो. याचे स्पष्टीकरण ॲरिस्टॉटल यांनी दिले आहे. राज्यातील लोकांच्या व्यवसायांवर आणि उदयोगधंद्यावर त्यांचा राजकीय कल आणि क्षमता अवलंबून असते. आर्थिक विषमतेतून राज्यात क्रांती होते आजही त्या विचाराची प्रचिती दिसून येते हा विचार ॲरिस्टॉटलचा वास्तववादी स्वरूपाचा वाटतो.

सारांशरूपाने असे म्हणता येईल की ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्राची मोठी सेवा केली आहे. राजकीय विचारांच्या इतिहासात अग्रस्थानाने ॲरिस्टॉटलचे नाव घेता येते. प्लेटोच्या तत्वज्ञानाला सामान्य माणसाच्या आवाक्यात आणण्याचे महत्वाचे योगदान दिले आहे. वास्तविक राज्यशास्त्राची सुरूवात खऱ्या अर्थाने ॲरिस्टॉटलपासून होते. त्यांचा झेश्रळींळली हा ग्रंथ शासनाच्या शास्त्रावर आधारित आहे. त्यांचे विचार

शास्त्रीय, वास्तववादी, अनुभवजन्य, व्यवहारवादी स्वरूपाचे आहेत त्याला विश्लेषणात्मक आधार आहे. वर्तमान काळात देखील त्यांचे राज्यशास्त्राच्या अभ्यासासाठी मार्गदर्शनाच्या आधारभूत तत्वासारखे आहे. प्लेटोच्या आदर्शवादाला नाजूक वळण देण्याचे कार्य ॲरिस्टॉटल करतो. थोडक्यात ॲरिस्टॉटलचे तत्वज्ञान त्याला राज्यशास्त्राचा जनक ठरवतात.

२.२.७ ॲरिस्टॉटलचे गुलामगिरी (दास्यप्रथा) संबंधी विचार :

ॲरिस्टॉटलने गुलामगिरीविषयी विवेचन "Politics' ग्रंथाच्या पाचव्या भागात केले आहे. ॲरिस्टॉटल वास्तववादी विचारवंत असून देखील तो तत्कालीन प्रथेद्वारे प्रभावित झाला होता हे त्यांच्या गुलामगिरीच्या विचारातून स्पष्ट होते. गुलामगिरी ही नगरराज्यांचे महत्वाचे वैशिष्ट्ये होय. प्रत्यक्ष व्यवहारात तर गुलामगिरी होतीच पण वैचारिक क्षेत्रात देखील ग्रीक विचरकांनी गुलामगिरीचे समर्थन केले आहे. अशाच पद्धतीने ॲरिस्टॉटलने देखील कोणत्याच प्रकारचे संकोच न करता गुलामगिरीचे समर्थन करून त्यामध्ये काही सुधारणा करण्याच्या प्रयत्नाने गुलामगिरी विषयी विचार मांडतो.

गुलामगिरी ही नैसर्गिक असून गुलामाने गुलाम म्हणून जीवन जगणे त्यातच त्यांचे हित आहे. जमिनीची मालकी वरिष्ठ वर्गाकडे असली तरी जमिन करण्याचे काम मात्र गुलामच करत होते. गुलाम ही राष्ट्राची संपत्ती मानली जात असे त्यांच्या श्रमावर सर्व देशांचा चरितार्थ चालत असे गुलाम हा कुटूंबसंस्थेचा अविभाज्य अंग असून गुलाम हे कुटूंबाची संपत्ती आहे हे सांगून ॲरिस्टॉटलने गुलामगिरी सिद्धांताचे दोन तत्व सांगितले आहे.

१) **नैसर्गिक असमानता** : ॲरिस्टॉटलच्या मते प्रत्येक मनुष्यात निसर्गतः वेगवेगळे गुण कमी अधिक असतात. त्यामुळे प्रत्येकाची बुद्धी निसर्गतः वेगवेगळया प्रकारची असते.

२) **जन्मत** : अंतर असते : ॲरिस्टॉटल म्हणतो की, काही लोक जन्मतःच शासन करण्यास योग्य असतात आणि काही लोक शासित होण्यासाठीच जन्मलेले असतात.

गुलामगिरीच्या समर्थनांचे आधार

१) नैसर्गिक आधार

मनुष्यामध्ये नैसर्गिक दृष्ट्या असमानता असते काही लोक जन्मतःच बुद्धिमान असतात आणि काही मूर्ख असतात. मनुष्यातील नैसर्गिक असमानताच गुलामगिरीचे मूळ आहे. त्यांच्या मते विषमता हा निसर्गता नियम आहे. श्रेष्ठांचे कनिष्ठावर शासन हा नैसर्गिक नियम आहे. या दोन वर्गातील लोकांत निसर्गाने शारीरिक व मानसिक शक्तीमध्ये भेद केला आहे. बुद्धिमान व्यक्तीने मालक होऊन आज्ञा द्याव्यात तर बुद्धीहिन व्यक्तीनी मालकांने दिलेल्या आज्ञा पाळाव्यात त्यांचा जन्म आज्ञा पालनासाठीच झाला आहे.

२) गुलामगिरी गुलामांच्या हितांची

गुलाम हे जन्मतःच बुद्धिहिन असल्याने त्यांनी मालकांच्या मार्गदर्शनाखाली राहाणे योग्य असते. कारण त्याना स्वतंत्र बुद्धी नसल्याने ते आपल्या योग्य दिशेने विकास करत नाहीत आणि त्यांच्या उदरनिर्वाहासाठी त्यांना

रोजगार मिळणार नाही. मालकांचे त्याना संरक्षण हवे असते म्हणून गुलामगिरी ही गुलामांच्या हितांची आहे. याविषयी ॲरिस्टॉटल म्हणतो की, गुलामांने गुलामगिरीतच आपली धन्यता मानावी तरच त्यांचे कल्याण होईल अन्यथा त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणार आहे. हे टाळण्यासाठी गुलामाने गुलामासारखे राहाणे हे त्यांच्या हितांच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

३) गुलामगिरी मालकाच्या / समाजाच्या हितासाठी

गुलामगिरीचा फायदा मालकांना व समाजाला होतो. जो शासक वर्ग संपूर्ण वेळ बौद्धिक कार्यात खर्च करतो त्याचा लाभ समाजाला निश्चित होतो. आपल्या निर्जिव संपत्तीवर श्रम खर्च करून उत्पादन वाढवण्यासाठी मालकांकडे गुलाम असल्याने गुलामांच्या कष्टातून त्याना पैसाही मिळतो व काम नसल्याने त्याना शासन करण्यासाठी वेळही मिळतो मिळालेल्या वेळेत मालकवर्ग चांगल्याप्रकारे समाजाची सेवा करू शकतील समाजांच्या कल्याणांसाठी त्याची आर्थिक आवश्यकता असते.

४) स्थैर्य आणि आर्थिक सुधारणेसाठी

ॲरिस्टॉटल व्यवहारवादी विचारक होता त्याने दासप्रथेच्या समर्थनासाठी व्यवहारवादी दृष्टीकोनातून विचार केला आहे. त्यांच्या मते राज्यातील गुलामगिरी नष्ट झाली तर राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे देशात अस्थिरता निर्माण होण्याची शक्यता असते. म्हणून ॲरिस्टॉटलने गुलामगिरी ही राज्याला स्थैर्य व आर्थिक उन्नती करून देते.

५) कुटूंब संस्थेचा मूलभूत घटक

कुटूंब संस्थेच्या अस्थित्वासाठी गुलाम आवश्यक असतात. गुलाम ही कुटूंबाची संपत्ती असते. गुलाम नसेल तर निर्जिव संपत्तीवर श्रम कोणी करावयाचे त्यामुळे उत्पादन होणार नाही. गुलाम आपल्या श्रमातून उत्पादन करतो व त्यावरच कुटूंबाचा उदरनिर्वाह चालत असतो.

गुलामाचे प्रकार :

१) नैसर्गिक गुलाम : जन्मतःच बुद्धिहिन असलेले व्यक्ती

२) कायदेशीर गुलाम : युद्धात जिंकले गेल्यामुळे गुलाम व्हावे लागलेल्या व्यक्ती.

गुलामगिरीबद्दल ॲरिस्टॉटलने केलेल्या सूचना :

१) गुलामगिरी प्रथा वंशपरंपरेने चालणार नाही.

२) गुलामांच्या बुद्धिमान मुलांना गुलामगिरीची वागणूक दिली जाणार नाही.

३) मालक वर्गाने गुलामाची पिळवणूक करू नये.

४) मालक वर्गाने गुलांमाचा फायदा करून द्यावा.

५) गुलामांची संस्था मर्यादित असावी.

६) गुलामगिरीकडे एक सामाजिक गरज म्हणून बघितले जावे.

७) गुलामगिरी ही कुटूंबसंस्थेचा आधार आहे.

८) गुलामगिरी ही राष्ट्राची संपत्ती आहे.

९) गुलामगिरी ही नैसर्गिक आहे.

१०) गुलामगिरी ही मालकाच्या व समाजाच्या हिताची आहे.

गुलामगिरीवरील टीका

१) गुलामगिरी नैसर्गिक असते हे असत्य.

२) बुद्धिवान व बुद्धिहिन ओळखण्याची कसोटी नाही.

३) प्राकृतिक समानतेकडे दुर्लक्ष.

४) गुलामाशी मैत्रीपूर्ण व्यवहार या विषयी अस्पष्ट मत

५) अधिकार आणि स्वातंत्र्य नाकारणे म्हणजे मानवतेचा अपमान आहे.

६) समाजाचे मालक आणि गुलाम असे विभाजन अयोग्य.

७) गुलामगिरीचे विचार हे निरंकुशतेकडे वाटचाल करणारे आहेत.

८) एकीकडे गुलामगिरीचे समर्थन तर दुसरीकडे पात्रता सिद्ध केल्यास त्यातून त्याची मुक्तता हा विचार परस्पर विरोधी वाटतो.

ॲरिस्टॉटलने गुलामगिरीच्या समर्थनासाठी तर्काचा आधार घेऊन स्पष्टीकरणाचा प्रयत्न केला आहे. पण ॲरिस्टॉटलसारख्या तत्वज्ञाने गुलामगिरीसारख्या अनैसर्गिक, अस्वाभाविक अमानुष पद्धतीचे समर्थन करावे ही खरोखर खेदाची गोष्ट आहे.

२.२.८ ॲरिस्टॉटलचे आदर्श राज्यासंबधीचे विचार :

प्लेटोप्रमाणे ॲरिस्टॉटलने आदर्श राज्यासंबधी विचार त्यांच्या Politics या ग्रंथाच्या पाचव्या भागात मांडले आहेत. ॲरिस्टॉटलच्या मते सनदशीर मार्गाने कायद्याचे श्रेष्ठत्व मान्य करणे म्हणजे आदर्श राज्य होय. आदर्श राज्यात सार्वभौमत्व कायद्याच्या ठिकाणी असावे, कोणत्याही व्यक्तीच्या ठिकाणी नसावे. प्लेटोनी उप आदर्श राज्याची जी वास्तववादी व व्यवहारवादी कल्पना मांडली त्याप्रमाणेच ॲरिस्टॉटलनेही आदर्श राज्याची कल्पना प्रत्यक्षात व्यवहारात आणण्यासाठी व्यवहारवादी विचार मांडलेले आहेत. ॲरिस्टॉटलच्या मते राज्याचे मुख्य ध्येय म्हणजे प्रजेचे हित करणे होय. ज्या राज्यात नागरिकांना सर्वश्रेष्ठ सुख मिळते आणि त्यांचे राज्यातील जीवन समाधानी असते. त्या राज्याला आदर्श राज्य समजले जाते. राज्यघटना तत्कालीन परिस्थितीला अनुरूप

असावी. ती स्थिर स्वरूपाची आणि सर्व मताचे प्रतिनिधित्व करणारी असावी एकांगी असू नये. अशा घटनेतून निर्माण झालेले राज्य हे आदर्श राज्य असेल.

ॲरिस्टॉटलने आदर्श राज्यात आदर्शवाद आणि व्यवहारवादाला समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. आदर्श राज्याची रचना स्पष्ट करण्याऐवजी त्याने आदर्श राज्य स्थापनेसाठी बाह्य आवश्यक गोष्टींचे स्पष्टीकरण केले आहे. ॲरिस्टॉटलने आदर्श राज्याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगितले आहेत.

१) लोकसंख्या

ॲरिस्टॉटलच्या मते राज्याची लोकसंख्या मर्यादित असावी. ज्यामुळे लोकांना व्यवसाय व इतर उद्योगधंद्यात काम मिळू शकते. राज्याची लोकसंख्या जास्त असेल तर राज्यातील जनतेला उपासमारीची वेळ येऊ शकते. तसेच राज्यात शांतता व सुव्यवस्था राहणार नाही आणि जर लोकसंख्या फारच कमी असेल तर राज्यांचे सार्वभौमत्व धोक्यात येते. राज्याची लोकसंख्या इतकी असावी की, ज्यामुळे राज्यामध्ये सुव्यवस्था राहून लोकांना चांगले जीवन जगता यावे. ॲरिस्टॉटलने राज्यातील लोकसंख्येविषयी वर्णन करताना म्हणतो की, प्रत्येक नागरिकाला राज्यकारभारात भाग घेता येईल येवढी लोकसंख्या असावी.

२) भूप्रदेश

भूप्रदेश हा सुरक्षित असावा. राज्याची सीमा ही समुद्रकिनाऱ्याला लागून असल्यास फारच चांगले, असे ॲरिस्टॉटल म्हणतो. यामुळे परदेशी व्यापार वाढून राज्य आर्थिकदृष्ट्या संपन्न होईल. अर्थात प्लेटो प्रमाणे ॲरिस्टॉटल हे मान्य करतो की, समुद्रकिनाऱ्याला लागून भूप्रदेश असला तर परकीय आक्रमणाची भीती असते. राज्याचा भूप्रदेश एवढा विस्तृत असू नये ज्यामुळे राज्य करणे व संरक्षण करणे अवघड होईल आणि एवढा कमीही असू नये ज्यामुळे आर्थिक सपन्नता व स्वालंबनात बाधा येईल. राज्यात असलेल्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करता येईल एवढा मर्यादित भूप्रदेश असावा. राज्याभोवती संरक्षणाच्या दृष्टीने तट बांधावा. भूमी ही उत्तम प्रकारची असावी की ज्यामुळे व्यापार आणि शेती दोन्हीचाही विकास होईल.

३) संविधान

आदर्श राज्यासाठी संमिश्र संविधान ही सर्वश्रेष्ठ असते असे तो म्हणतो. राजेशाही व महाजनशाही यामध्ये गुणांचे एकत्रीकरण झालेली राज्यघटना त्यास हवी आहे. त्या संमिश्र राज्यघटनेस तो Polity असे म्हणतो. मर्यादित लोकशाही हा ॲरिस्टॉटलने आदर्श शासन प्रकार असल्याचे सांगितले. या शासन पद्धतीत राज्याची सार्वभौम सत्ता मध्यम वर्गाच्या हाती असल्याने तेथे हुकूमशाही किंवा अराजकता निर्माण होणार नाही. म्हणून आदर्श राज्यासाठी संमिश्र संविधान आवश्यक आहे.

४) सामाजिक व्यवस्था :

आदर्श नगरराज्यात शेतकरी, व्यापारी, सैनिक, तंत्रज्ञ, शिल्पकार, धर्मगुरू आणि प्रशासन असे हा प्रकारचे वर्ग असावेत अन्नधान्य निर्मिती, व्यापार, संरक्षण, कलाकौशल्य, धार्मिक विधी इत्यादी कार्येया विविध

वर्गामार्फत केली जावीत नगरराज्यातील शेतकरी, शिल्पकार इत्यादिना नागरिकत्वाचा दर्जा देऊ नये असे मत ॲरिस्टॉटल मांडतो. ॲरिस्टॉटलचे हे वर्गीकरण जातीवर किंवा वंशावर आधारित नाही. अत्यंत खालच्या वर्गातील मनुष्य सुद्धा उच्च वर्गात जाऊ शकतो.

५) शिक्षण

आदर्श राज्यात शिक्षणाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. लोकांचे चारित्र्य घडविण्याचे ते एक प्रभावी माध्यम आहे. यासाठी राज्याने शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे शिक्षणाचा मूळ उद्देश व्यक्तींच्या नैतिक शैक्षणिक गुणांची वाढ करण्याचा आहे. शिक्षणामुळे नागरिकांत जाणिवा निर्माण होतात. आपली कार्ये पार पाडण्यासाठी क्षमता त्यामुळे निर्माण होते. संपूर्ण राज्यात समान आणि सक्तीच्या शिक्षणपद्धतीची आवश्यकता आहे. शिक्षणाची सार्वत्रिकता राज्याच्या नियंत्रणाशिवाय शक्य नाही. राज्य हा एक समुदाय एकसंध बनविण्यासाठी शिक्षणाची गरज असते. तेव्हा राज्यातील नागरिक व राज्यकर्ते यांना शिक्षण देऊन त्यांच्यामध्ये राजकीय जागृती जाणीव निर्माण करून दिली पाहिजे.

६) जनतेचे चारित्र्य :

चारित्र्य आणि योग्यतेच्या दृष्टीने राज्यातील सर्व ग्रीक नागरिक गुणांनी युक्त असावेत तो बुद्धिमत्ता आणि चैतन्य किंवा शौर्य या गुणावर अधिक भर देतो. राज्यातील नागरिक चारित्र्यसंपन्न असल्याशिवाय राज्य आदर्श होणार नाही. वरील गुणांमुळेच राजकीय विकास पूर्ण करणे शक्य होईल.

७) संपती :

ॲरिस्टॉटलने व्यक्तीगत संपत्तीला मान्यता दिली आहे. फक्त संपत्तीच्या अधिकाधीक संचयाला त्यांचा विरोध होता. संपत्तीच्या न्यायोचित वितरणाला त्यांची संमती होती. तो म्हणतो संपत्तीमुळे व्यक्तीच्या आवश्यक गरजा पूर्ण होतात. संपत्तीशिवाय व्यक्तीला सुखाने जीवन जगता येत नाही. त्यामुळे व्यक्तीगत संपत्तीचे त्याने समर्थन केले आहे.

८) विवाह, कुटूंब :

ॲरिस्टॉटलने विवाहपद्धती व कुटूंबसंस्था यांची गरज व महत्व विशद केली आहे. प्रजनन आणि संगोपन यातून भावी काळातील आदर्श नागरिक निर्माण होतील. विवाह, कुटूंबसंस्था या विषयी नागरिकांना मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. कुटूंबाला राज्याची छोटी प्रतिकृती ॲरिस्टॉटल समजतो. अनेक कुटूंबातूनच राज्य निर्माण होतो. तेव्हा विवाहसंस्था व कुटूंबसंस्था समाजाला आवश्यक व पोषक आहे असे वर्णन करतो.

प्लेटोने रिपब्लिक ग्रंथात आदर्श राज्याची रचना सांगितली आहे. ॲरिस्टॉटलने आदर्श राज्य प्रत्यक्षात कसे येऊ शकेल यांचा व्यावहारिक विचार मांडला. यासाठी त्याला प्लेटोच्या 'लॉज' ग्रंथाचा फायदा झाला. त्यांच्या प्रभाव ॲरिस्टॉटलच्या आदर्श राज्याच्या विचारातून दिसून येतो.

२.३ सारांश :

ॲरिस्टॉटल हे राज्यशास्त्राचे जनक आहेत. त्यांनी राज्याच्या प्रकाराचे विकृत व शुद्ध प्रकाराची चर्चा केली आहे. तसेच त्यांनी क्रांतीसंबंधी नागरिकत्वसंबंधी, गुलामगिरी आणि आदर्श राज्य इत्यादी विषयी विचार मांडले आहेत. ॲरिस्टॉटलचे लोकशाही (समतोल) या प्रकाराला शुद्ध प्रकार सांगून महत्त्व दिले आहे. क्रांतीचे प्रकार स्पष्ट केले आहेत. तसेच क्रांती टाळण्याचे उपायही सांगितले आहेत. ॲरिस्टॉटल यांनी समाजातील गुलामगिरी विषयी चर्चा केली असून त्यास समर्थन दिले आहे. त्याचबरोबर ॲरिस्टॉटलने आदर्श राज्याची कल्पना मांडली आहे. त्यामध्ये त्यांनी आदर्शवाद आणि व्यवहारवाद यांचा समतोल राखण्याचा प्रयत्न केला आहे. आदर्श राज्याची मांडणी करताना त्यामध्ये प्रामुख्याने लोकसंख्या, भूप्रदेश, शिक्षण, जनतेचे चारित्र्य, संपत्ती, विवाह, कुटुंब संविधान, सामाजिक व्यवस्था इत्यादी गोष्टींचा विचार केला आहे. हे मांडण्यासाठी प्लेटोनी जी आदर्श राज्याची कल्पना मांडली आहे याचा फायदा झाला आहे.

२.४ पारिभाषिक शब्द :

- **अथेन्स :** ग्रीक नगरराज्याचे नाव
- **ग्राम :** गाव, खेडे
- **परिवर्तन :** मौलिक स्वरूपातील बदल
- **जनक :** पिता, निर्माता, प्रणेता
- **अशुद्ध प्रकार :** विकृत प्रकार
- **महाजनसत्ता :** समाजातील थोडक्यात पण गुणी व धनवान लोकांची सत्ता
- **क्रांती :** परिवर्तन, बदल
- **अंशतः :** काही प्रमाणात

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे

स्वयंः अध्ययन प्रश्न-१

खालील प्रश्नाची उत्तरे एका वाक्यात लिहा.

१) ॲरिस्टॉटलच्या जगप्रसिद्ध ग्रंथाचे नाव काय?

२) The Politics हा ग्रंथ किती विभागात विभागला आहे?

३) ॲरिस्टॉटलच्या गुरूचे नाव काय?

४) ॲरिस्टॉटलने किती देशांच्या राज्यघटनांचा तौलनिक अभ्यास केला?

५) ॲरिस्टॉटलने राज्याच्या विकासाच्या किती अवस्था सांगितल्या?

स्वयं: अध्ययन प्रश्न–२

मोकळ्या जागी योग्य शब्द लिहा.

१) ॲरिस्टॉटलने राज्याचे वर्गीकरण ...... तत्वावर केले.

२) महाजनशाही हा राज्याचा .... प्रकार आहे.

३) ॲरिस्टॉटलने .... हा जगप्रसिद्ध ग्रंथ लिहिला.

४) राजकीय परिवर्तनाचे क्रांतिचे चक्र ...... यानी मांडले.

५) सार्वभौम सत्ता काही लोकांच्या हातात असते तेंव्हा .... राज्याचा शुद्ध प्रकार असतो.

उत्तरे :

स्वयं: अध्ययन प्रश्न–१

१) दि पॉलिटिक्स
२) आठ
३) प्लेटो
४) १५८
५) तीन

स्वयं: अध्ययन प्रश्न–२

१) गुण, संख्या
२) शुद्ध
३) दि पॉलिटिक्स
४) ॲरिस्टॉटल
५) महाजनशाही

२.६ सरावासाठी स्वाध्याय :

१) ॲरिस्टॉटलचे राज्यविषयक विचार स्पष्ट करा.

२) ॲरिस्टॉटलचे क्रांतीसंबंधी कारणे व उपाय योजना स्पष्ट करा.

३) ॲरिस्टॉटलचे नागरिकत्वासंबंधी विचार.

४) ॲरिस्टॉटल हा राज्यशास्त्राचा पिता आहे स्पष्ट करा

५) ॲरिस्टॉटलने गुलामगिरीचे समर्थन करण्यामागी कारणे स्पष्ट करा.

टीपा लिहा.

१) ॲरिस्टॉटलचे आदर्शराज्याची वैशिष्ट्ये

२) ॲरिस्टॉटलचा परिवर्तनाचे फिरते चक्र

३) नागरिकत्वाची पात्रता

४) गुलामगिरी विषयी सूचना

५) क्रांतीची सामान्य कारणे.

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ :

१) डोळे ना. य., 'राजकीय विचारांचा इतिहास', कॉन्टिनेन्टल, प्रकाशन, पुणे.

२) शृंगारपुरे अरविंद, 'पाश्चिमात्य राजकीय विचारक', मंगेश प्रकाशन, नागपूर.

❍❍❍

घटक – ३

मॅकियाव्हेली (Machiavelli)

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ जीवन परिचय

  ३.२.२ मॅकियाव्हेलीचे मनुष्य स्वभावासंबंधी विचार

  ३.२.३ राजकारणाची धर्म व नैतिकतेपासून फारकत

  ३.२.४ मॅकियाव्हेलीचे शासनाचे वर्गीकरण

  ३.२.५ मॅकियाव्हेलीने राजाला केलेला उपदेश

  ३.२.६ मॅकियाव्हेली : आधुनिक राजकीय विचारांचा जनक

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

३.५ स्वयं–अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

३.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास–

- मॅकियाव्हेलीच्या मनुष्य स्वभावासंबंधीच्या विचारांचे आकलन होईल.
- राजकारणाची – धर्म व नैतिकतेपासून फारकत करणे गरजेचे का होते? हे समजेल.
- राजाने राज्यसंस्था टिकविण्यासाठी कसे वर्तन करावे? हे स्पष्ट होईल.
- मॅकियाव्हेलीला आधुनिक राजकीय विचारांचा जनक का म्हणतात, हे स्पष्ट करता येईल.

३.१ प्रास्ताविक :

ग्रीक व रोमन काळात धर्मसत्ता व राज्यसत्ता ह्या वेगवेगळ्या होत्या. त्यामुळे राज्याचे स्वरूप धर्मनिरपेक्ष राहिले. पण रोमन सम्राटाने ख्रिश्चन धर्माचा स्विकार केल्यानंतर तो राजधर्म बनला व धर्मसत्तेचे वर्चस्व वाढू लागले. राजकारणात हस्तक्षेप करीत चर्चने सत्ता आपल्या हातात घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे चर्च आणि राज्य यांच्यात सत्तेसाठी संघर्ष सुरू झाला.

या सुमारास काही विचारवंतानी जनतेत बौद्धिक जागृती करण्याचा प्रयत्न केला. पोपच्या अनियंत्रीत सत्तेला विरोध करण्यासाठी लोकांच्या बौद्धिकतेला आव्हान देण्यात येऊ लागले. मध्ययुगाचा शेवट हा धर्मसुधारणा व पुनरुज्जीवनाच्या आंदोलनाने झाला. याच काळाचा मॅकियाव्हेली प्रतिनिधी असून त्याचा इहलोकाचा विचार, बुद्धिप्रामाण्य व तर्काचा वापर यामुळे इतर मध्ययुगीन विचारवंतापेक्षा मॅकियाव्हेली वेगळा मानला जातो. त्याचे राजकीय विचारात एक वेगळे स्थान निश्चित होते.

३.२ विषय–विवेचन :

◆ जीवन परिचय :

निकोलो मॅकियाव्हेलीचा जन्म इटलीतील फ्लॉरेन्स या ठिकाणी सामान्य कुटूंबात १४६९ मध्ये झाला. त्याचे वडील व्यवसायाने वकील होते तरी परिस्थिती सामान्य असल्याने त्याला उच्च शिक्षण घेता आले नाही. खूप प्रयत्नांनी १४९० मध्ये त्याला सामान्य प्रशासकीय पदावर नोकरी मिळाली. पुढे वयाच्या २९ व्या वर्षी फ्लॉरेन्स शहरराज्याच्या प्रशासन विभागात त्याला सचिवाची नोकरी मिळाली. येथे अंतर्गत व्यवहार व युद्धकार्ये यासाठी असलेल्या युद्धमंडळाचा तो चौदा वर्षे चिटणीस होता. या चिटणीस पदावर असताना राजदूत या नात्याने रोम, पॅरिस, बर्लिन इ. राज्यांना भेटी दिल्या. परदेश प्रवासात फ्रान्स, स्वित्झर्लंड, जर्मनी इ. राज्यव्यवस्थाचा अभ्यास केला. स्वित्झर्लंडची संघराज्य व्यवस्था इटलीत निर्माण व्हावी. तसेच फ्रान्स, स्पेन प्रमाणे संघटित होऊन इटलीने सामर्थ्यशाली बनावे असे मॅकियाव्हेलीला वाटत होते.

पण पोप दुसरा ज्युलियस याने स्पेन व व्हेनिस यांच्याशी मैत्री करून १५१२ प्लॉरेन्स नगरराज्यावर आक्रमण करून तेथील राज्यसत्ता नष्ट केली. पुढे मेडिसी घराण्याची सत्ता आली. या घराण्याची सत्ता घराण्याविरूद्धच्या कटात सामील असल्याचा आरोप मॅकियाव्हेलीवर ठेवून एक वर्षाची कारावासाची शिक्षा दिली. पण तो निर्दोष आढळल्याने त्याला सोडून देण्यात आले. पुढील आयुष्याची १५ वर्षे फ्लॉरेन्सजवळील एका खेड्यात मॅकियाव्हेलीने घालवली. याच काळात मॅकियाव्हेलीने ग्रंथलेखन केले पुढे २० जून १५२७ रोजी मॅकियाव्हेलीचे निधन झाले.

◆ ग्रंथरचना :

इटलीची चालेली अधोगती, दारिद्र्य, अशांतता हे दोष नाहीसे करणे. यासाठी इटलीचे ऐक्य घडवून एक स्वतंत्र राज्य निर्माण करण्याच्या हेतूने मॅकियाव्हेलीने आपली ग्रंथरचना केली. त्याच्यासमोर १) इटलीच्या

राज्याची निर्मिती २) इटलीच्या नगरराज्यांना समृद्ध करण्यासाठीची उपाययोजना ३) ज्ञानाच्या पुनरूज्जीवनाच्या चळवळीला सहकार्य आणि ४) अंधविश्वासातून इटालीयन समाजाची मुक्तता या समस्या होत्या.

या समस्यांचा विचार करून मॅकियाव्हेलीने

१) The Prince (दि प्रिन्स)

२) Discourses on the first decade of Titas Livious या ग्रंथालाच Discourses of Livy (डिस्कोर्सेस ऑफ लिव्ही)

३) Art of War (आर्ट ऑफ वॉर)

४) History of Florence (हिस्ट्री ऑफ फ्लॉरेन्स)

या महत्वाच्या ग्रंथाची निर्मिती करून व्यावहारिक दृष्टीकोनातून मॅकियाव्हेलीने आपले विचार मांडले.

◆ **मॅकियाव्हेलीची अध्ययनपद्धती :**

मॅकियाव्हेलीने वापरलेल्या अध्ययनपद्धतीचे विश्लेषण केल्यास, त्याने ऐतिहासिक, तुलनात्मक निरीक्षणात्मक, वास्तववादी व शास्त्रीय पद्धतीचा वापर करून आपले विचार मांडले. मॅकियाव्हेली पारंपरिक विवेचनातून मुक्त होऊन, स्वतंत्र बुद्धीने विवेचन करणारा वास्तववादी विचारवंत होता. जे प्रत्यक्ष अनुभवता येते, जे दिसते अशाच आधारांवर निष्कर्ष काढण्याची पद्धत त्याने वापरली. मॅकियाव्हेलीने स्वतःच्या अनुभवाच्या आधारावर आपली विशिष्ट मते बनविली व त्यांच्या समर्थनासाठी इतिहासातील दाखले दिले. त्याबरोबरच निरिक्षणाचा वापर करून तत्कालीन राज्यव्यवस्थेतील दोष स्पष्ट केले. त्यातून मनुष्य स्वभावतःच स्वार्थी असतो अशा निष्कर्षापर्यंत तो पोहचला. अशा शास्त्रीय दृष्टीकोनातूनच त्याने वाढलेल्या अवास्तव चर्चच्या सत्तेला विरोध केला. धर्म ही व्यक्तीगत बाब असून, धर्माने राज्याच्या कार्क्षेत्रात हस्तक्षेप करू नये असे त्याने स्पष्ट केले.

३.२.१ मॅकियाव्हेलीचे मनुष्यस्वभावासंबंधीचे विचार :

आपल्या 'दि प्रिन्स' या ग्रंथात मॅकियाव्हेलीने मनुष्यस्वभावाचे विवेचन केले आहे. मनुष्य हा निसर्गतःच स्वार्थी व दुष्ट प्रवृत्तीचा असतो. स्वार्थच त्याला कार्य करण्यासाठी प्रेरित करीत असतो. याबरोबरच मनुष्य कृतघ्न, भित्रा, चंचल व विश्वासघातकी असतो. त्यामुळे मानवास त्याच्या इच्छेप्रमाणे कार्य करण्याची मुभा दिली तर, त्याच्याकडून वाईट कृत्येच अधिक होतील. त्यामुळे मानवी वर्तनावर नियंत्रण ठेवणे आवश्यक बनते. प्रत्येक मनुष्यात स्वार्थ लपलेला असतो असे मॅकियाव्हेली म्हणतो. प्रजेच्या ठिकाणी संपत्ती व स्त्रीचा स्वार्थ असतो. व या गोष्टी मिळविण्यासाठी मनुष्याचे लोभी मन कोणतेही वाईट कृत्य करण्यास तयार असते. यातून स्पर्धा व संघर्ष निर्माण होतात आणि बुद्धीचा विसर पडतो व मानवी वर्तन पशूप्रमाणे बनते असे मॅकियाव्हेलीचे म्हणणे आहे. मानवाच्या ठिकाणी प्रेम, सहकार्य हे गुण आढळत असले तरी, ते सर्व स्वतःच्या स्वार्थाकरीता असतात, ज्या गोष्टीतून आपल्याला फायदा होईल अशा गोष्टींबाबत मानव अधिक प्रेम दाखवतो किंवा

त्याबाबत चांगले वर्तन करतो. मॅकियाव्हेलीच्या मते, मनुष्य आपल्या जन्मदात्या पित्याची हत्या विसरेल, पण आपल्या संपत्तीतील आपला वाटा विसरणार नाही. अशा ढोंगी वृत्तीच्या मनुष्याकडून सहज चांगल्या वर्तनाची अपेक्षा न करणे हेच चांगले होय.

मॅकियाव्हेलीच्या मते, मनुष्य ज्याप्रमाणे स्वार्थी, दुष्ट आहे, त्याप्रमाणेच तो भित्रा व दुबळा ही आहे. त्यामुळे मनुष्यास आपल्या जीविताची व संपत्तीची खात्री वाटत नाही. साहजिकच जीविताचे व संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी त्याला राज्यसंस्थेची गरज भासते. या गरजेतूनच राज्यसंस्थेची निर्मिती होते व तिचा प्रमुख या नात्याने राजा निर्माण होतो. या राज्यसंस्थेने मनुष्याची संपत्ती व जीवन यांचे संरक्षण चांगल्याप्रकारे केल्यास तिला स्थैर्य प्राप्त होते. पण स्वार्थी व दुष्ट मनुष्यावर कायद्याने नियंत्रण निर्माण करण्याबरोबरच, त्याला अराजकतेची भीतीही दाखवावी अशा अराजकतेच्या भीतीतून शासनास आपोआपच स्थैर्य प्राप्त होत असते. स्वार्थ, लोभ, प्रेम यातून निर्माण होणारे स्नेहसंबंध हे कालसापेक्ष व पोकळ असतात. असे स्नेहसंबंध स्वार्थाच्यावेळी नष्ट करण्यास मनुष्यास काहीही वाटत नाही. पण ज्याविषयी दरारा व भीती असते. अशा राज्यसंस्थेस दगा देण्यास मनुष्य घाबरतो. कारण राज्यसंस्थेच्या दंडशक्तीचा धाक किंवा भीती त्याच्यासमोर असते. म्हणून राजाने स्वार्थी, दुष्ट व लोभी प्रजेवर दंडशक्तीच्या भीतीनेच राज्य करावे असे मॅकियाव्हेलीला वाटत होते. राजाच्या आज्ञा मोडणाऱ्यांना कडक शासन करावे, तसेच राजाने शक्तीशाली बनून प्रजेला संरक्षण ही द्यावे. समाजात अनेक स्वभावाची माणसे असल्याने त्यांच्याशी राज्याने धूर्तपणे कायदा व दंडशक्ती यांचा वापर करावा. काही वेळेस मनुष्यास भीती दाखवून, त्याला फसवून त्याच्याकडून चांगले काम करून घ्यावे. त्याची स्वार्थी वृत्ती दाबण्यासाठी राजाने दंडशक्तीचा उपयोग करावा.

मॅकियाव्हेलीच्या मनुष्यस्वभाव विषयक विचारांची वैशिष्ट्ये :

१) मनुष्यस्वभाव स्वार्थी, दुष्ट, कपटी, भित्रा व दुबळा आहे.

२) मनुष्य स्वतः जीविताच्या आणि संपत्तीच्या सुरक्षिततेसाठीच धडपडतो व त्यातूनच राज्यसंस्थेचे नियंत्रण स्वीकारतो.

३) राजाने आपले धोरण ठरविताना मनुष्यस्वभाव लक्षात घेऊन प्रेमापेक्षा भीतीनेच आपले कार्य साध्य करावे.

४) दंडशक्तीचा वापर करून राजाने प्रजेच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण करावे व राज्यकारभार चालवावा.

५) मनुष्यातील दुर्गुणांना दंडशक्तीच नियंत्रणात आणू शकते.

मॅकियाव्हेलीच्या मनुष्यस्वभाव विषयक विचारांवरील आक्षेप :

१) मॅकियाव्हेलीने केलेले मनुष्यस्वभावाचे विवेचन एकांगी असून, ते केवळ त्या वेळच्या इटलीतील मनुष्याच्या वर्तनावर आधारित आहे.

२) मनुष्यस्वभावातील दुर्गुणांकडे लक्ष देणारा मॅकियाव्हेली, मनुष्यातील देशहित व परस्पर सहकार्याच्या गुणांकडे दुर्लक्ष करतो.

३) मनुष्यात चांगले व वाईट असे दोन्ही गुण असतात, याबाबत मॅकियाव्हेली भाष्य करत नाही.

४) परिस्थितीनुसार मनुष्यातील चांगले किंवा वाईट गुण प्रदर्शित होत असतात, याकडे तो दुर्लक्ष करतो.

५) मॅकियाव्हेलीने केलेल्या मनुष्यस्वाभावाच्या विश्लेषणाला कोणताही शास्त्रीय आधार नाही.

अशा रितीने मॅकियाव्हेलीने मनुष्यस्वभावाचे केलेले विवेचन निराशावादी वाटते. पण वेगवेगळया विचारवंतांनी या विषयासंबंधीची मांडणी आप-आपल्या विषयाला अनुसरून केलेली दिसून येते. मॅकियाव्हेलीने सुद्धा निरंकुश व अमर्याद राज्यसत्तेच्या निर्मितीसाठी, मनुष्याला स्वार्थी, दुष्ट ठरवून विचारांची मांडणी केलेली पहावयास मिळते.

३.२.२ राजकारणाची धर्म आणि नैतिकतेपासून फारकत :

मॅकियाव्हेलीला त्यांने मांडलेल्या नैतिकते संबंधीच्या विचारांनीच त्याला मध्ययुगातील विचारवंतांपासून वेगळे करून वर्तमान विचारवंतांच्या पंक्तीत आणून बसवले आहे. तो आपले विचार तर्कशुद्ध व शास्त्रीय आधारावर मांडत असताना धर्माला व नीति-अनीतीच्या कल्पनांना महत्व देत नाही.

मॅकियाव्हेलीने धर्म व नीती यांचा राजकारणावर पडलेला वाईट प्रभाव अनुभवला होता. त्यामुळे त्याने फार काळजीपूर्वक राजकारणापासून धर्म आणि नैतिकता अलग केली. नैतिकतेला तो राज्याच्या आधार मानायला तयार नाही. शासकाने आपले उद्‌दिष्ट किंवा साध्य प्राप्त करण्यासाठी कोणत्याही नैतिक, अनैतिक साधनांचा उपयोग करावा असे मॅकियाव्हेली म्हणतो. त्याच्यामते राज्य हे साधन नसून साध्य आहे. राज्याचे हितसंबंध साकारण्यासाठी राज्याने केलेली कोणतेही कृती किंवा कार्य न्याय व नैतिक असते.

मॅकियाव्हेलीने नैतिकतेचे दोन प्रकार मांडले आहेत

१) व्यक्तिगत नैतिकता (Private Morality)

२) जन / लोक नैतिकता (Public Morality)

व्यक्तिगत नैतिकतेत तो राज्याच्या नैतिकतेचे मापदंड ठरवितो तर जन किंवा सामाजिक नैतिकतेत जनतेच्या नैतिकतेचे नियम ठरवितो. मॅकियाव्हेलीच्या मते, सामान्य जनतेने नैतिकतेचे पूर्ण पालन करावे कारण त्यातच जनतेचे कल्याण असते. राज्याच्या आदेशांचे, कायद्याचे पालन करणे, राष्ट्रासाठी बलिदान देणे व राज्याला सहकार्य करणे म्हणजेच नैतिकता होय अशा प्रकारची नैतिकता जनतेसाठी आवश्यक आहे पण राज्यकर्त्यांसाठी तो अशी नैतिकता आवश्यक मानत नाही. राजा हा पूर्ण स्वतंत्र असून, तो नीतीनियमांच्या बंधनात अडकलेला नसतो, कारण त्याच्यासाठी नैतिक नियम नसतात. नैतिक नियम फक्त प्रजेसाठी असतात. राजाने आपली शक्ती / सामर्थ्य वाढविण्यासाठी व टिकविण्यासाठी कोणत्याही साधनांचा वापर करावा. कारण सर्वच साधने राजासाठी न्याय असतात. साध्य प्राप्त करणे हेच प्रमुख उद्‌दिष्ट असले पाहिजे. अत्याचार, हिंसा, धोकेबाजपणा राज्याच्या संरक्षणासाठी व दृढतेसाठी आवश्यक असतो. साध्य प्राप्त होत असेल तर कोणतेही साधन उचित ठरते. त्यामुळे राजाने साध्याचा विचार करावा साधनांचा नाही. मॅकियाव्हेलीच्या मते, राजाने फक्त

राज्य सुरक्षित व दृढ कसे राहिल याची चिंता करावी. कारण नीती- अनीतीच्या कल्पना राजासाठी नाहीत. राज्याच्या संरक्षणासाठी वाटेल तो अन्याय अत्याचार करावा लागला, धोका द्यावा लागला तरी राजाने मात्र पुढे पाहू नये. कारणे नैतिक-अनैतिक अशा कोणत्याही साधनाचा वापर करून राजाने आपला उद्‌देश साध्य करावा. मॅकियाव्हेलीच्या मते, चांगले-वाईट, धर्म-अधर्म, नैतिक-अनैतिक, इहलोक-परलोक हे विचार भित्र्या मनुष्यासाठी आहेत. राजासाठी नाहीत गरज भासल्यास राजाने कपट, धोका, बेईमानी, हत्या संधीसाधुपणा असे कोणतेही साधन वापरावे. कारण साध्यावरून साधनाची किंमत ठरते. मॅकियाव्हेलीच्या मते कायद्याची व नीतीची निर्मिती राजा करीत असेल, तर त्याचे बंधन राजावर असणार नाही. राजाला सार्वजनिक हित साधावयाचे असल्याने त्याच्यावर राज्याची मोठी जबाबदारी असते. त्यामुळे राजाची प्रत्येक कृती किंवा कार्य समर्थनीयच असते. राज्य हे मूळातच नैतिक किंवा अनैतिक नाही, तर ते नीतीकक्षेच्या बाहेर असते. नीती-अनीतीच्या कल्पना ह्या धर्माशी संबंधीत असतात. राजा सिंहाप्रमाणे शूर व कोल्ह्याप्रमाणे धूर्त असावा वेळप्रसंगी राजा इतका कपटी व धूर्त असावा की, लोकांच्या डोळ्यात धूळ फेकून आपण कसे दया-प्रेम-श्रद्धा धार्मिकतेचे प्रतीक आहोत, असा त्याने भास निर्माण करावा.

मॅकियाव्हेलीने नैतिकतेबरोबरच धर्मालाही उच्च स्थान दिले नाही. राज्याच्या हितासाठी राजाने अनैतिक व अधार्मिक कार्याचा अंगीकार केला तरी चालेल. इतकेच नाही तर वेळ प्रसंगी धर्माचाही त्याग राज्यकर्ता करू शकतो. मॅकियाव्हेलीच्या या विचारांवरून तो अधार्मिक व अनैतिक आहे असा आक्षेप घेतला जातो. पण तो तसा नाही तर राजकारणात शिरलेल्या धर्म व नीतीच्या विरोधात तो आहे. त्याच्यामते राजा राज्याचा निर्माता असल्याने तो कायद्याच्या सीमेबाहेर असतो आणि नैतिकतेसंबंधी कायदे बनविले तर तो नैतिकतेच्या सीमेबाहेर असेल. मॅकियाव्हेली नास्तिक नव्हता पण राजकारणातील धर्म प्रभावाच्या विरोधी होता. मॅकियाव्हेलीच्या मते, जर एखादा राजा किंवा गणराज्य भ्रष्टाचारमुक्त राहू इच्छित असेल तर त्याने प्रथम धर्म संस्कारांना शुद्ध ठेवले पाहिजे. धर्माबद्‌दल उचित श्रद्धा असली पाहिजे. कारण धर्माची हानी म्हणजेच देशाच्या विनाशाचे लक्षण होय. मॅकियाव्हेली चर्च नष्ट करू इच्छित नव्हता, तर त्याद्‌वारे राज्याच्या नियमाबाबत जनतेला कर्तव्यशील बनवू इच्छित होता.

मॅकियाव्हेलीचे धर्म आणि नैतिकतेसंबंधीचे विचार लक्षात घेताना त्याने ते का मांडले? हे समजून घेणे आवश्यक ठरते.

१) मॅकियाव्हेली राज्याला मनुष्याच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक मानत होता. व्यक्तीचे कल्याण राज्यच करू शकते यावर त्याचा विश्वास होता. त्यामुळे राज्य सुरक्षित ठेवणे गरजेचे असल्याने तो राज्याच्या सुरक्षिततेसाठी कोणत्याही साधनाचा पुरस्कार करतो.

२) पोपद्वारे होत असलेल्या भ्रष्टाचाराने तो हैराण झाला होता. तर ज्या अंधविश्वासाने मनुष्य संकटांशी सामना करू शकत नाही. अशा मनुष्याला दुर्बल बनविणारी पोपची सत्ता कमी करण्याचा मॅकियाव्हेलीचा उद्‌देश होता.

३) मॅकियाव्हेलीला राज्याला महत्वाचे स्थान द्यावयाचे होते. यासाठी त्याचे सामर्थ्य वाढवणे आवश्यक होते म्हणून त्याने स्वर्गलोकातील लाभापेक्षा इहलोकातील लाभ महत्वाचा मानला व धर्म भक्तीपेक्षा देशभक्ती महत्वाची आहे, या विचाराने राजकारणापासून धर्म व नैतिकतेची फारकत केली.

४) प्रचलित दैवी सिद्धांत खोडून, राज्यही मानवनिर्मित संस्था आहे हे मॅकियाव्हेलीने स्पष्ट केले. मनुष्याच्या स्वार्थी व दुष्ट वृत्तीतून जी अराजकता निर्माण झाली, ती नष्ट करण्यासाठी राज्याची निर्मिती झाली असे त्याचे मत होते.

३.२.३ मॅकियाव्हेलीचे शासनाचे वर्गीकरण :

मॅकियाव्हेलीने आदर्श राज्याच्या स्पष्टीकरणासाठी शासन संस्थेचे वर्गीकरण मांडले आहे. मॅकियाव्हेलीवर ग्रीक संस्कृतीतील राज्यविचारांचा प्रभाव असल्याने, आदर्श राज्याची सत्ता अमर्यादित असते असे तो मानतो. मॅकियाव्हेलीचे शासनाचे वर्गीकरण संख्यातत्वावर आधारित असून ॲरिस्टॉटलप्रमाणे त्याने शासनाचे शुद्ध व भ्रष्ट अशा दोन प्रकारात वर्णन केले आहे.

शुद्ध स्वरूप	भ्रष्टस्वरूप
१) राजतंत्र	१) एकतंत्र
२) कुलीनतंत्र	२) धनिकतंत्र
३) प्रजातंत्र	३) लोकशाही

वरील सहा प्रकारांशिवाय संमिश्र शासनाचा सातवा प्रकार त्याने सांगितला. संमिश्र शासनात वरील सर्व शासन प्रकारातील गुणांचा समावेश केला जातो त्यामुळे त्यात सत्ता संतुलन व नियंत्रण हे दोन्हीही गुण दिसून येतात. तरी देखील मॅकियाव्हेलीने दोन प्रकारच्या शासनाचेच विचारपूर्वक वर्णन केले आहे ते म्हणजे १) राजतंत्र २) प्रजातंत्र होय.

१) राजतंत्र

कोणत्या देशात राजतंत्र सर्वश्रेष्ठ ठरेल याचे विवेचन करताना मॅकियाव्हेलीने म्हणतो की, ज्या देशात स्वार्थ शिगेला पोहचला असेल, ज्या ठिकाणी व्यक्तीहिताकडे अधिक लक्ष असेल, चारित्र्य नसलेली प्रजा व जिकडेतिकडे भ्रष्टाचार असेल अशा देशात निरंकुश राजतंत्र पाहिजे. तत्कालीन इटलीचे भ्रष्टरूप नजरेसमोर असल्याने मॅकियाव्हेलीने निरंकुश राजतंत्राचे समर्थन केले. अशा राजतंत्राचे त्याने दोन प्रकार पाडले. अ) अनुवंशिक राजतंत्र ब) कृत्रिम राजतंत्र होय. यातील अनुवंशिक राजतंत्रातील राजाला कमीत-कमी समस्यांना तोंड द्यावे लागते. कारण पिढ्यान-पिढ्या तेच राजघराणे प्रजेवर राज्य करीत असते व प्रजा राजाशी एकनिष्ठ असल्याचे संकेत प्रस्थापित झालेले असतात. त्यामुळे परस्परांचा घनिष्ठ संबंध, विश्वास व आत्मीयता या गोष्टी गृहित धरता येतात. त्यामुळे अशा राजाला अधिमान्यता मिळविण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागत नाहीत.

याउलट कृत्रिम राजतंत्रातील राजाला अधिक समस्यांना तोंड द्यावे लागते. अशा राजाकडे प्रजा परकीय आक्रमण किंवा शत्रू अशाच नजरेने पाहत असते. कारण तो आक्रमण करून सत्तेवर आलेला असतो. अशा परिस्थितीत प्रजेची अधिमान्यता मिळविण्यासाठी प्रजा हिताची कार्य करून विश्वास संपादन करावा लागतो राजतंत्राचे समर्थन करताना राज्याच्या सुरक्षिततेसाठी न्याय-अन्याय, योग्य-अयोग्य वा नैतिक-अनैतिक याकडे लक्ष देऊ नये असे त्याने म्हटले आहे.

२) प्रजातंत्र

मॅकियाव्हेलीने आपल्या 'डिस्कोर्सेस' या ग्रंथात प्रजातंत्राचे समर्थन केले असून, व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास करण्याची संधी व त्यासाठी अनुकूल परिस्थिती प्रजा किंवा गणतंत्रात मिळते म्हणून ते श्रेष्ठ आहे असे तो म्हणतो. ज्या समाजात पुरेशी समानता व प्रगल्भता असते तेथे प्रजातंत्र शासन यशस्वी होऊ शकते. याबरोबर संपत्तीच्या वितरणात समानता व जनतेत सार्वजनिक भावना जास्ती-जास्त असणे गरजेचे असते. प्रजातंत्रात राजकीयदृष्ट्या जनता सुशिक्षित व सहकार्याची भावना जोपासलेली असल्याने जनतेच्या मताप्रमाणे राज्यकारभार चालतो व शासनाला स्थैर्य मिळते. एका व्यक्तीचे निर्णय अधिक अचूक असण्याची शक्यता जास्त असते. प्रजातंत्रात मागील चूका दुरूस्त करून भविष्यात अधिक योग्य निर्णय घेतले जाण्याची शक्यता वाढते. राजकीय प्रक्रियेत लोकांचा सहभाग असल्याने शासनाचे स्थैर्य वाढतेच पण अन्य राज्याच्या मनात त्यांच्या विषयी विश्वासाची भावना अधिक बळकट होते. प्रजातंत्रात एखादे राजकीय परिवर्तन घडवताना संघर्ष, हिंसाचार करावा लागत नाही. कोणताही कडवटपणा येऊ न देता असा बदल घडवून आणता येतो. हे सर्व सत्य असले तरी तत्कालीन इटलीच्या परिस्थितीने प्रजातंत्राविषयीच्या मॅकियाव्हेलीच्या भावना पूर्णपणे दबल्या गेल्या व राजतंत्राविषयीच्या प्रभावी झाल्या असे म्हणता येईल.

याचा परिपाक म्हणून मॅकियाव्हेलीचा कुलीन तंत्राला कट्टर विरोध होता. कारण या कुलीनतंत्रानेच इटलीचे झालेले अधःपतन त्याने आपल्या डोळ्यांनी पाहिले होते. इटलीतील भ्रष्टाचाराला व विभाजनाला तो ह्या शासनालाच जबाबदार मानत होता. त्यामुळे इटलीची परिस्थिती पाहून व काळाची गरज ओळखून मॅकियाव्हेलीने राजतंत्राचे समर्थन केले आहे.

३.२.४ मॅकियाव्हेलीने राजाला केलेला उपदेश :

राज्यामध्ये शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी राजाने कशापद्धतीने वर्तन करावे, कोणत्या उपाय योजना कराव्यात. या गोष्टीचे विश्लेषण मॅकियाव्हेलीने आपल्या 'प्रिन्स' या ग्रंथात केले आहे. राजाला त्याच्या कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी उपदेश केलेला दिसून येतो. राज्याची उत्पत्ती कशी झाली हे सांगून ते टिकवावे, कसे ह्याचे विवेचन करताना राजाने पुढील तीन कर्तव्ये पार पाडवीत असे म्हणतो.

१) राज्याच्या संरक्षणाबरोबरच राज्यविस्तार वाढवावा.

२) दंडशक्ती व कायदा याद्वारे राजाने राज्यात शांतताः सुव्यवस्था निर्माण करावी.

३) राज्याचे हित लक्षात घेऊन प्रजेच्या कल्याणाची कार्येकरावीत.

वरील कर्तव्ये पार पाडण्यासाठी राजा जवळ सिंहाचे क्रौर्य आणि कोल्ह्याचा धूर्तपणा असावा. कोणत्याही प्रकारची साधने वापरून राजाने आपला उद्‌देश साध्य करावा. राजेशाहीतील राजा हा कायद्याचा निर्माता असल्याने त्याचे स्थान कायद्यापेक्षा श्रेष्ठ असते. तसेच राजाने स्थान व्यक्तिगत नैतिकतेपेक्षा वरचे असते. राजा व राज्य हे कायदा आणि नैतिकता या संकल्पनेच्या कक्षेबाहेर असतात. अशाप्रकारे राजेशाहीतील राज्यकर्ता निरंकूश असला तरी त्यानी काही पथ्ये आवर्जून पाळली पाहिजेत त्याबाबत मॅकियाव्हेली राजाला उपदेश करतो. मॅकियाव्हेलीचा राजा निरंकुश असला तरी त्याची निरंकुशता जनतेच्या कल्याणासाठी आहे, स्वतःच्या स्वार्थासाठी नाही. यासाठी राजाला केलेला उपदेश पुढीलप्रमाणे

१) राजाकडे सिंहाचे क्रौर्य व कोल्ह्याचा धूर्तपणा असावा कारण राजाने कोणत्याही प्रकारची साधने वापरून उद्‌देश साध्य करावा, धूर्तपणा अभावी तो कटकारस्थाने हेरू शकणार नाही व क्रौर्याच्या अभावी शत्रूचे दमन करू शकणार नाही. या दोन्ही गुणांचा समन्वय राजा यशस्वी बनण्यासाठी अत्यावश्यक आहे.

२) राजाने प्रजेच्या संपत्तीला व स्त्रीच्या चारित्र्याला धक्का पोहचवू नये. कारण दोन गोष्टीत प्रजा संवेदनशील असते. अन्यथा जनक्षोभ होतो मनुष्य आपल्या मालकीच्या गोष्टीबाबत इतका दक्ष असतो की, तो आपल्या पित्याच्या हत्याऱ्याला माफ करेल, पण वडीलार्जीत संपत्ती हिसकावून घेणाऱ्याला तो कधीही माफ करणार नाही.

३) समाजातील प्रचलित रुढी व परंपरांमध्ये राजाने हस्तक्षेप करू नये. काही अप्रिय कार्ये हाताखालील लोकांकडून करून घ्यावीत व दोष त्यांच्यावर ढकलावा, खापर त्यांच्या माथ्यावर फोडावे.

४) राजाने राज्याच्या हितासाठी नैतिक-अनैतिक, न्याय-अन्याय ह्याचा विचार करू नये. राजाने दयाळूपणाचा बुरखा पांघरून आपले क्रौर्य झाकावे. उत्तमप्रकारे बहुरूप्याचे सोंग वठवावे.

५) मॅकियाव्हेलीच्या मते मनुष्य दोन कारणांनी दुसऱ्याच्या आज्ञा पाळतो १) भीती व २) प्रेम पण राजाने प्रेमावर विश्वास ठेवू नये. कारण मनुष्य मुळातच स्वार्थी व धोकेबाज असल्याने राजाने जनतेला भीती दाखवूनच आज्ञांचे पालन करून घ्यावे. पण देखावा मात्र उदार अंतःकरणाचा, धार्मिकतेचा करावा.

६) राजाने लोकांच्या भावना भडकवून त्याचा उपयोग राज्यकारभारात करून घ्यावा. पण स्वतः मात्र भावनेच्या आहारी जाऊ नये.

७) राजाने राज्याच्या हितासाठी शेजारील राष्ट्राशी आवश्यक असे कोणतेही करार करावेत व कालांतराने गरज नसल्यास ते करार मोडावेत, त्यांचा प्रदेश हडप करण्यासही मागेपुढे पाहू नये.

८) राजाने सतत आक्रमण योजना तयार करून आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सत्ता संतुलन ठेवण्याचा प्रयत्न करावा. शेजारील दोन राज्यात करार होऊन ती आपल्यापेक्षा बलवान होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

९) राजाने जवळील राज्यात सतत हस्तक्षेप करीत रहावे. संधी मिळताच त्यांचा प्रदेश गिळंकृत करून आपली सीमा वाढवावी व नवीन भूमीवर अधिकार प्रस्थापित करावा.

१०) राजाने दृढनिश्चयी, संयमी व निर्णयक्षम अशी आपली प्रतिमा तयार केली पाहिजे राजाने आत्मस्तुतीला कधीही भाळू नये.

११) राजाने राज्याचे संरक्षण व विकास हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून नैतिक-अनैतिक, उचित-अनुचित अशा कोणत्याही साधनाचा वापर करावा.

१२) युद्ध हे अनेकदा गरजेचे वा उपयुक्तही असते. युद्धात आपल्याला विजयाची खात्री असल्यास राजाने युद्ध टाळू नये. पण तेही स्वबळावर लढावे. एखाद्या बलाढ्य सत्तेचा पाठिंबा घेऊन दुसऱ्यावर हल्ला करू नये. कारण आपल्यापेक्षा सामर्थ्यवान राज्य आपल्याला केव्हाही गिळंकृत करण्याचा धोका असतो.

१३) राजाला आपल्या सद्गुणांचे व दुर्गुणांचेही चांगले भांडवल करता आले पाहिजे. आपले दुर्गुणही राज्याच्या हितासाठी कसे आवश्यक आहेत हे प्रजेला पटवून देता आले पाहिजे.

१४) राजाने कृषी, वाणिज्य, संगीत, कला, साहित्य याक्षेत्रातील व्यक्तींना राजाश्रय द्यावा. कारण जनमाणसात त्यांचे आदराचे स्थान असते. त्यांच्याकडून राजाला मिळालेली पसंती राजाचे स्थान आणखी बळकट करते.

१५) राजाने केलेली अलौकिक कामगिरी कोणत्या-ना-कोणत्या मार्गांनी सतत लोकांच्या नजरेत राहील असे पहावे.

१६) राजाने साम्राज्य विस्ताराचे धोरण स्वीकारावे. त्यासाठी साम, दाम, दंड, भेद या नीतीचा अवलंब करून आपले शक्तीप्रदर्शन करावे.

अशाप्रकारे मॅकियाव्हेलीने राजाला केलेला उपदेश हा राजाला अधिक संपन्न, सामर्थ्यवान व शक्तीशाली बनविण्यासाठी केला असून त्यातून मॅकियाव्हेली निरंकूश राजा तयार करू इच्छितो. पण ही निरंकुशता जनकल्याणासाठी व राज्याच्या सुरक्षिततेसाठी असल्याने दिसून येते. त्यात स्वतःचा स्वार्थनाही. त्यामुळे या विचारांचे महत्व कायम आहे.

३.२.५ मॅकियाव्हेली आधुनिक राजकीय विचारांचा जनक :

आधुनिक राजकीय विचारांचा जनक असे मॅकियाव्हेलीला म्हटले जाते कारण मॅकियाव्हेलीने मध्ययुगातील रुढी, परंपरांचे खंडन करून आधुनिक व्यवहारवादी युगाचा पाया घातला. याबरोबरच त्याने मध्ययुगातील प्रचलित विचारांचा शेवट केला. आधुनिक राजकीय विचारांची मांडणी करताना त्यांनी महत्वाच्याबाबींचा पुरस्कार केला. शास्त्रीय अभ्यास पद्धतींचा वापर केला व राजकारणापासून विकृत धर्माला दूर केले.

१) मनुष्यनिर्मित कायद्याला मान्यता

मॅकियाव्हेलीने मनुष्यनिर्मित कायद्याचे अस्तित्व मान्य करून, दैवी कायदा नाकारला. मध्य युगात दैवी कायद्याना महत्वाचे स्थान होते व पाप-पुण्य, इहलोक-परलोक या कल्पनांवर ते आधारित होते. धर्म राजापेक्षा श्रेष्ठ होता. मॅकियाव्हेलीने राज्यनिर्मित कायद्याचे श्रेष्ठत्व मान्य करताना कायद्याची निर्मिती देवाने नाहीतर राजाने केली आहे. स्वर्गप्राप्ती हा त्याचा हेतू नसून, राज्यात राजाने केली आहे. स्वर्गप्राप्ती हा त्याचा हेतू नसून, राज्यात शांतता व सुव्यवस्था टिकवणे हा आहे असे स्पष्टीकरण केले.

२) सर्वश्रेष्ठ राज्यसंस्था

मध्ययुगात ईश्वराचा प्रतिनिधी म्हणून पोचला श्रेष्ठ समजण्यात येत होते. पण इटलीतील चर्चचे धर्मगुरू भ्रष्ट, चारित्र्यहिन व निरंकुश बनले चर्चमुळे अनैतिकता मोठ्या प्रमाणात वाढली अशी मॅकियाव्हेलीची पक्की धारणा होती.

यातून बाहेर पडण्यासाठी त्याने राज्यसंस्थेला सर्वश्रेष्ठ स्थान दिले समाजातील इतर सर्वसंस्थांना गौण स्थान देऊन, त्या सर्व आपल्या कार्याबाबत राजाला जबाबदार राहतील असे स्पष्ट केले. पोपचे महत्व नष्ट करून धर्मसंस्था ही राज्यसंस्थेच्या आधीन करण्याचे काम मॅकियाव्हेलीने केले.

३) राष्ट्र-राज्याच्या कल्पनेचा पुरस्कर्ता

राष्ट्र-राज्य हे सर्वोच्च किंवा अंतिम राज्य आहे, असे मॅकियाव्हेलीचे मत होते राष्ट्र-राज्याचा पुरस्कार करणारा तो पहिला विचारवंत होता. राज्यात एकात्मता निर्माण करण्यासाठी समान रुढी, परंपरा, भाषा, धर्म व कायदे असावेत असे त्याचे मत होते. राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणाऱ्या घटकांची त्याला जाणीव होती. त्यानेच राष्ट्र-राज्याच्या कल्पनेचा प्रथम पुरस्कार केला.

४) राज्याच्या शक्ती सामर्थ्यावर विश्वास

जनतेने राजाच्या आज्ञेचे पालन करावे. यासाठी व राज्य टिकविण्यासाठी शक्तीचा वापर करावा असे मॅकियाव्हेलीचे मत होते. शक्तीच्या वापराशिवाय राज्यात सुव्यवस्था राहू शकत नाही असे त्याचे मत होते. आधुनिक काळात जगातील सर्वच राष्ट्रे शक्तिसामर्थ्य वाढविण्यात गुंतलेली दिसतात.

५) व्यक्तिवादाचे बीजारोपण

राज्याला सर्वोच्च स्थान दिले असेल तरी शासकाने व्यक्तीच्या संपत्तीचे व जीवितोचे सरंक्षण करावे असे त्याने म्हटले आहे. व्यक्तीगत बाबीचे अपहरण हा मोठा अपराध मानून, व्यक्तीची संपत्ती हडप करण्याचा अधिकार तो राजाला देत नाही. अशाप्रकारे व्यक्तीवादाचे समर्थन मॅकियाव्हेलीने केले.

६) ऐतिहासिक पद्धतीने विश्लेषण :

धार्मिक दृष्टांतावरून सिद्धांताचे स्पष्टीकरण करणे अयोग्य व अव्यावहारिक आहे असे स्पष्ट करून मॅकियाव्हेलीने आपल्या सिद्धांताच्या स्पष्टीकरणासाठी ऐतिहासिक दाखले दिले आहेत. ही बाब पूर्णपणे दोषरहित नसली तरी पुढील विचारवंतांना एक नवी दिशा देते.

७) राजकारणापासून धर्म आणि नीतीची फारकत

राजाने धर्म व नीतीचा विचार न करता राज्य कायम स्वरूपी टिकविण्यासाठी कोणत्याही नैतिक-अनैतिक, योग्य-अयोग्य, साधनांचा वापर केला तरी तो न्यायच ठरेल असे मत मांडले. साधनांची नैतिकता त्याच्या साध्यावरून ठरवून मॅकियाव्हेलीने राज्याला धर्म आणि नैतिकतेच्या बंधनातून इतिहासात प्रथमच मुक्त केले.

८) मनुष्यनिर्मित राज्य

इतिहासातील प्रचलित सर्व सिद्धांत खोडून काढत राज्य ही दैवी संस्था नसून मनुष्यनिर्मित आहे असा विचार मॅकियाव्हेलीने मांडला. समाजात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी राज्याची निर्मिती झाली आहे स्वर्गप्राप्तीसाठी नाही असे मत त्याने मांडले.

९) व्यावहारिक दृष्टीकोन

मॅकियाव्हेली आपले विश्लेषण करताना व्यावहारिकतेवर भर देतो. धर्म, नीतीच्या काल्पनिक व आध्यात्मिक साधनांवर विश्वास न ठेवता तो साध्य गाठण्याला महत्व देतो.

मॅकियाव्हेलीचे वरील सर्व विचार लक्षात घेऊन त्याला आधुनिक राजकीय विचारांचा जनक असे संबोधले जाते.

३.३ सारांश :

मॅकियाव्हेलीने निरीक्षणात्मक, शास्त्रीय व वास्तववादी अध्ययन पद्धतीने आपले राजकीय विचार स्थिर करताना, पारंपरिक अध्ययनातील अतिधार्मिकता नाकारली. धार्मिकतेतून राजकीय तत्वज्ञानास मुक्त करताना जे प्रत्यक्ष अनुभवता येते, अशाच आधारांवर निष्कर्ष काढण्याची पद्धती वापरली. इटलीची तत्कालीन परिस्थिती पाहूनच मनुष्य स्वभावतःच स्वार्थी व दुष्ट असतो अशा निष्कर्षापर्यंत तो पोहचला पण अशा मनुष्यास स्वतःच्या जीविताच्या व संपत्तीच्या संरक्षणासाठी राज्यसंस्थेची आवश्यकता निर्माण झाली. या गरजेतून राज्यसंस्थेची निर्मिती झाली, हे प्रतिपादन करताना त्यासंबंधीचा दैवी सिद्धांत मॅकियाव्हेली खोडून काढतो.

राजकारणाची धर्म आणि नैतिकतेपासून फारकत करून मॅकियाव्हेली आधुनिक विचारवंताच्या पंक्तीत येतो. नैतिकतेला व धार्मिकतेला तो राज्याचा आधार मानायला तयार नाही. राज्याच्या हितासाठी राजाला अनैतिक व अधार्मिक कार्य करण्याची तो मुभा देतो. राजा कायद्याचा निर्माता असल्याने तो कायद्याच्या सीमेबाहेर असतो आणि नैतिकतेसंबंधी कायेदबनवले तर तो नैतिकतेच्या सीमेबाहेर असतो. असे स्पष्ट करून,

मॅकियाव्हेली निरंकुश राजाचे समर्थन राज्यसंस्थेच्या सुरक्षिततेसाठी करताना दिसतो. राज्यसंस्था स्थिर होण्यासाठी राजाने कशाप्रकारे वर्तन करावे याविषयी मॅकियाव्हेली राजाला उपदेश करतो. त्याच्यामते राजाने नैतिक-अनैतिक, न्याय-अन्याय, योग्य-अयोग्य अशा कोणत्याही साधनांचा वापर करून राज्याचे संरक्षण व सामर्थ्य यामध्ये वाढ करावी.

राज्यसंस्था मानव निर्मित आहे त्याने हे स्पष्ट केले. मनुष्य निर्मित कायद्यांना मान्यता व दैवी कायद्यांना नाकारणारा मॅकियाव्हेली आधुनिक युगातील पहिला विचारवंत आहे. राज्यसंस्थेला सर्वश्रेष्ठ स्थान देतानाच व्यक्तीवादाचे समर्थन मॅकियाव्हेली करतो. राज्याच्या शक्ती सामर्थ्यावर विश्वास ठेवून अंतिम राज्य म्हणजे राष्ट्र-राज्य होय अशी संकल्पना मांडणारा तो पहिला विचारवंत आहे. अशा प्रकारे आधुनिक राज्यशास्त्राला पोषक ठरणाऱ्या अनेक संकल्पनांची मांडणी सर्वप्रथम मॅकियाव्हेलीने केली म्हणून त्याला आधुनिक राजकीय विचारांचा जनक असे संबोधले जाते.

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

१) **धर्मसुधारणा चळवळ** – पोप व चर्च यांच्या भ्रष्ट व अनियंत्रीत सत्ते विरूद्धची चळवळ

२) **पुनरूज्जीवन** – ग्रीक विचारांची पुनर्मांडणी

३) **इहलोक** – जगाच्या संदर्भात व जगासंबंधी मानवाचा केलेला विचार

४) **जीविताची** – जीवनाची / आयुष्याची

५) **दंडशक्ती** – नियमभंगाबाबत शिक्षा देणारी सत्ता

६) **फारकत** – वेगवेगळे करणे

७) **नास्तिक** – ईश्वर न मानणारा

८) **राजतंत्र** – राजेशाही

९) **प्रजातंत्र** – लोकांचे राज्य

१०) **उपदेश** – सल्ला देणे

११) **धूर्तपणा** – चाणाक्षपणा

१२) **गिळंकृत करणे** – नाश करणे, आपल्यात सामावून घेणे

१३) **निरकूंश** – ज्याच्यावर कोणाचेही नियंत्रण नाही असा

१४) **राष्ट्र** – एकतेची भावना जपणारा समूह

३.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे :

स्वयं अध्ययन प्रश्न-१

अ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

१. मॅकियाव्हेलीचा जन्म कोणत्या ठिकाणी व किती साली झाला?

२. मॅकियाव्हेलीच्या दोन ग्रंथांची नावे लिहा.

३. मॅकियाव्हेलीने अध्ययनासाठी कोणत्या पद्धतींचा वापर केला?

४. मॅकियाव्हेलीचे निधन कधी झाले?

स्वयं अध्ययन प्रश्न-२

१) मॅकियाव्हेलीच्यामते मनुष्य निसर्गतः कशा प्रवृत्तीचा असतो?

२) मनुष्याला सर्वात जास्त भीती कशाची वाटते?

३) राजाने प्रजेवर कसे राज्य करावे?

स्वयं अध्ययन प्रश्न-३

१) मॅकियाव्हेलीने राजकारणाची कशापासून फारकत केली?

२) नैतिकतेचे प्रकार सांगा.

३) मॅकियाव्हेलीच्या मते राज्य कोणी निर्माण केले?

४) व्यक्तीचे कल्याण कोण करू शकते असे मॅकियाव्हेलीली वाटते?

५) मॅकियाव्हेलीने राज्याच्या निर्मिती संबंधीचा कोणता सिद्धांत खोडून काढला?

स्वयं अध्ययन प्रश्न-४

१) मॅकियाव्हेलीने आदर्श राज्याच्या स्पष्टीकरणासाठी कशाचे वर्गीकरण केले आहे?

२) प्रजातंत्र श्रेष्ठ का असते?

३) राज्याच्या सुरक्षिततेसाठी राजाने कशाकडे लक्ष देऊ नये?

४) कोणत्या देशात निरंकूश राजतंत्र पाहिजे?

५) मॅकियाव्हेली सर्वात कट्टर विरोधक कोणत्या शासन पद्धतीचा होता?

स्वयं अध्ययन प्रश्न–५

१) राजाकडे कोणते गुण असावेत?

२) राजाने कोणत्या गोष्टींना धक्का पोहचवू नये?

३) मनुष्य कोणत्या दोन कारणांनी दुसऱ्याच्या आज्ञा पाळतो?

४) मॅकियाव्हेलीने राजाला उपदेश कशासाठी केला?

स्वयं अध्ययन प्रश्न–६

१) मॅकियाव्हेलीने कोणत्या कायद्याला मान्यता दिली?

२) कोणत्या संस्थेला मॅकियाव्हेलीने सर्वोच्च स्थान दिले?

३) आधुनिक राजकीय विचारांचा जनक असे कोणास म्हणतात?

४) मॅकियाव्हेलीने कशाचे बीजारोपण केले?

उत्तरे :

स्वयं अध्ययन प्रश्न–१

१) मॅकियाव्हेलीचा जन्म इटलीतील फ्लॉरेन्स या ठिकाणी १४६९ साली झाला.

२) १) दि प्रिन्स   २) डिस्कोर्सेस ऑफ लिव्ही

३) मॅकियाव्हेलीने अध्ययनासाठी ऐतिहासिक, निरिक्षणात्मक, वास्तववादी शास्त्रीय व तौलनिक पद्धतीचा वापर केला.

४) मॅकियाव्हेलीचे निधन २० जून १५२७ मध्ये झाले.

स्वयं अध्ययन प्रश्न–२

१) मॅकियाव्हेलीच्यामते मनुष्य निसर्गतः स्वार्थी व दुष्ट प्रवृत्तीचा असतो.

२) मनुष्याला आपल्या जीविताच्या व संपत्तीच्या संरक्षणाची सर्वात जास्त भीती वाटते.

३) राजाने प्रजेवर दंडशक्तीच्या भीतीने राज्य करावे.

स्वयं अध्ययन प्रश्न–३

१) मॅकियाव्हेलीने राजकारणाची धर्म व नैतिकतेपासून फारकत केली.

२) नैतिकतेचे दोन प्रकार १) व्यक्तिगत नैतिकता आणि २) जन किंवा लोकनैतिकता होय.

३) मॅकियाव्हेलीच्या मते राज्य मानवाने निर्माण केले.

४) व्यक्तीचे कल्याण राज्यच करू शकते असे मॅकियाव्हेलीला वाटते.

५) मॅकियाव्हेलीने राज्याच्या निर्मिती संबंधीचा दैवी सिद्धांत खोडून काढला.

स्वयं अध्ययन प्रश्न–४

१) मॅकियाव्हेलीने आदर्श राज्याच्या स्पष्टीकरणासाठी शासनसंस्थेचे वर्गीकरण केले आहे.

२) प्रजातंत्रात व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास करण्याची संधी व त्यासाठी अनुकूल परिस्थिती मिळते म्हणून ते श्रेष्ठ असते.

३) राज्याच्या सुरक्षिततेसाठी राजाने न्याय अन्याय, योग्य-अयोग्य वा नैतिक-अनैतिक अशा कोणत्याच गोष्टीकडे लक्ष देऊ नये.

४) ज्या देशात स्वार्थ शिगेला पोहचला असेल, व्यक्ती हिताकडे जास्त लक्ष असेल, चारित्र्यहीन प्रजा व भ्रष्टाचार असेल अशा देशात निरंकुश राजतंत्र पाहिजे.

५) मॅकियाव्हेली सर्वात कट्टर विरोधक कुलीन तंत्र या शासन पद्धतीचा होता.

स्वयं अध्ययन प्रश्न–५

१) राजाकडे सिंहाचे क्रौर्य व कोल्ह्याचा धूर्तपणा हे गुण असावेत.

२) राजाने प्रजेच्या संपत्तीला व स्त्रीच्या स्त्रीत्वाला/ चारित्र्याला धक्का पोहचवू नये.

३) मनुष्य १) भिती २) भिती या दोन कारणांनी दुसऱ्याच्या आज्ञा पाळतो.

४) मॅकियाव्हेलीने राजाला अधिक संपन्न, सामर्थ्यवान व शक्तीशाली बनविण्यासाठी उपदेश केला.

स्वयं अध्ययन प्रश्न–६

१) मॅकियाव्हेलीने दैवी कायदा नाकारून मनुष्यनिर्मित कायद्याला मान्यता दिली.

२) मॅकियाव्हेलीने सर्वात श्रेष्ठ स्थान राज्यसंस्थेला दिले.

३) आधुनिक राजकीय विचारांचा जनक असे मॅकियाव्हेलीस म्हणतात.

४) मॅकियाव्हेलीने व्यक्तिवादाचे बीजारोपण केले.

३.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) खालील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा.

१) मॅकियाव्हेलीच्या मनुष्यस्वभावासंबंधी विचारांचे विश्लेषण करा.

२) आधुनिक राजकीय विचारांचा जनक म्हणून मॅकियाव्हेलीचे योगदान विषद करा.

३) मॅकियाव्हेलीचे शासनाचे वर्गीकरण स्पष्ट करा.

ब) टीपा लिहा.

१) राजकारणाची धर्म व नैतिकतेपासून फारकत व मॅकियाव्हेली.

२) मॅकियाव्हेलीने राजाला केलेला उपदेश.

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ :

१) काणे प. सि., काही प्रमुख राज्यशास्त्रज्ञ

२) गर्दे दि. का, पाश्चात्य राजकीय विचारप्रवाह, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे.

३) शृंगारपुरे अरविंद, पाश्चिमात्य राजकीय विचारक, मंगेश प्रकाशन, नागपूर.

४) नांदेडकर व. गो., राजकीय विचार आणि विचारवंत

५) देवरे पी. डी., निकुंभ डी. एस., पाश्चिमात्य राजकीय विचारवंत

❍❍❍

घटक ४

जीन जॅक रूसो (J. J. Rousseau)

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ जीवन परिचय
- ४.२.२ निसर्गावस्थेवरील विचार
- ४.२.३ सामाजिक करारासंबंधी विचार
- ४.२.४ सामूहिक इहेचा सिद्धांत
- ४.२.५ सार्वभौमत्त्वाचे विचार
- ४.२.६ राज्य आणि शासनसंस्थाविषयक विचार

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द व अर्थ

४.५ सरावासाठी स्वाध्याय

४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

४.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास-

- जीन जॅक रूसोच्या निसर्गावस्थेवरील विचाराचे आकलन होईल.
- रूसो सामाजिक करारासंबंधी विचार स्पष्ट होईल.
- रूसोच्या सामूहिक इंहेचा सिद्धान्त समजून घेईल.
- रूसोचे सार्वभौमत्त्वाविषयी विचार स्पष्ट होईल.
- रूसोचे राज्य आणि शासन संस्थाविषयक विचार समजून येईल.

४.१ प्रास्ताविक :

राज्यशास्त्र विषयामध्ये पाश्चात्य राजकीय विचार ही एक महत्त्वाची शाखा आहे. त्यात प्रामुख्याने ग्रीक विचारवंतापासून आजपर्यंतच्या सर्व विचारवंतांचा अभ्यास केला जातो. ग्रीक विचारवंतामध्ये सॉक्रेटीस, प्लेटो, ॲरिस्टॉटल या विचारवंतांचा अभ्यास केला जातो. आधुनिक राजकीय विचारांमध्ये मॅकिआव्हेली हा विचारवंत महत्त्वाचा आहे. राज्याची निर्मिती संबंधी अनेक विचारवंतांनी वेगवेगळे सिद्धांत मांडले आहेत. परंतु पाश्चात्य राजकीय विचारवंतामध्ये हॉब्ज, लॉक, रूसो या विचारवंतांनी सामाजिक कराराची मांडणी करून राज्यनिर्मितीसंदर्भातील नवा सिद्धांत मांडला आहे. त्यामुळे याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये रूसो यांच्या विचाराचा अभ्यास करणार आहोत.

४.२ विषय–विवेचन :

जीन जॅक रूसो हा फ्रेंच विचारवंत आहे. त्याने अनेक महत्त्वाचे ग्रंथ लिहिले आहेत. त्या ग्रंथामध्ये मानवी स्वभावासंबंधी, निसर्गावस्था, सामाजिक करार, सामूहिक ईहा, राज्य व शासनसंस्था, सार्वभौमत्व इत्यादी विचारांची मांडणी केली आहे. या विचारांची प्रस्तुतता आजही आहे. आज जगातील अनेक गोष्टी पाहिल्यानंतर विचारवंतांनी मांडलेल्या विचारातून स्पष्टपणे दिसून येतात किंवा येणाऱ्या अडचणीवर त्यातून मात करण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळे विचारवंताचे विचार किंवा कल्पनांचा अभ्यास आवश्यक आहे, त्यांनी मानवी स्वभावासंबंधी केलेले वर्णन हे हॉब्जपेक्षा वेगळे आहे. कारण हॉब्जने माणूस हा जन्मत:च वाईट असतो, असे म्हटले. परंतु रूसो किंवा लॉक यांनी मात्र माणूस स्वभावत: चांगला असतो, अशी भूमिका मांडली आहे. तसेच सामाजिक करार यामध्ये भिन्नता असली तरी सामूहिक ईहेची कल्पना महत्त्वाची आहे, या रूसोच्या सर्व विचारांची चर्चा या प्रकरणामध्ये करणार आहोत.

४.२.१ जीवन परिचय

जीन रुसोचा जन्म स्वित्झर्लंडमधील जिनेव्हा येथे २८ जून १७१२ रोजी झाला. त्याचे वडील आयझॅक हे घड्याळ दुरुस्त करणारे एक साधारण फ्रेंच कलाकार होते. रुसोच्या जन्मानंतर अवघ्या दहा महिन्यातच त्याच्या आईचे निधन झाले. त्याच्या वडिलांवर दुसऱ्याची हत्या करण्याचा आरोप होता. त्यामुळे त्यांनी पलायन केले व रुसोला त्याच्या चुलत्याकडे रहावे लागले. जीवनात रुसोला अनंत अशा अडचणींना सामोरे जावे लागले. आपल्या आत्मचरित्रात मध्ये त्याने अनेक बाबींची कबुली दिली आहे, त्यावरून त्याच्या नितिभ्रष्ट वागण्याची एक कल्पना येते.

रुसो आपल्या आत्मचरित्रात म्हणतो की, आपल्यामध्ये अल्पावधीतच वाचनाची आवड निर्माण झाली व इतर मुलांपेक्षा प्रचंड आकलनशक्ती उत्पन्न झाली. अनेक वेळा वाचनातील बराच भाग त्याला कळत नसे. परंतु त्याच्या मनावर विशेष संवेदना उमटत असत. अशा प्रकारच्या गुढ व अव्यक्त भावना ज्या त्याच्यात विकसित झाल्या त्यांचा रुसोच्या पुढील जीवनावर एवढा खोलवर प्रभाव झाला की, त्यामधून तो शेवटपर्यंत बाहेर पडू शकला नाही. रुसो सोळा वर्षांचा असताना फ्रान्सला पळून गेला. तो उनाड अवस्थेत भटकत राहिला.

त्याच्या गर्विष्ठ व अहंकारी स्वभावामुळे मित्र टिकवता आले नाहीत. फ्रान्समध्ये तो एका कॅथॉलिक पाद्रीला शरण गेला व कॅथॉलीक पंथाची दिक्षा घेतली. त्याचा अनेक स्त्रियांशी संबंध आला, पण तो कुठेच एकनिष्ठ राहिला नाही. थेरशी नावाच्या महिलेपासून त्याला पाच अपत्ये झाली. परंतु त्यांची जबाबदारी न स्विकारता त्याने सर्वांना अनाथालयात पाठविले. सव्वीस वर्षे तिच्या सोबत संसार केल्यावर त्याने तिच्याशी लग्न केले. अशा प्रकारचे त्याचे वैयक्तिक जीवन हे बेशिस्त पद्धतीचे होते. त्याच्या मित्राच्या सहाय्याने फ्रेंच दुतावासात नोकरी मिळाली परंतु ती त्याला टिकवता आली नाही. १७४९ मध्ये त्याच्या जीवनाला कलाटणी देणारी घटना घडली. 'डी. जॉन अकादमी'ने एक निबंधस्पर्धा आयोजित केली होती. त्यामध्ये त्याने 'शास्त्र व कला यांच्या प्रगतीने नैतिक जीवन उन्नत केले की अवनत केले' हा निबंध लिहिला व त्याच्या या निबंधाला प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. यामध्ये त्याने मांडलेला विचार थोडक्यात असा होता की, जेवढ्या मोठ्या प्रमाणात शास्त्र व कलेत वृद्धी झाली त्याच प्रमाणात मानवी मन व त्यातून मानवाचे वर्तन भ्रष्ट झाले.

१७५८ साली 'Discources on Political Economy' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. १७६२ साली त्याचे दोन गाजलेला ग्रंथ प्रसिद्ध झाले. ते म्हणजे Social Contract आणि 'Emile' ह्या ग्रंथातील विचारसरणांमुळे त्यांना फार त्रास दिला गेला. ह्या ग्रंथामुळे त्याला फ्रान्समधून स्वित्झर्लंडमध्ये व तेथून इंग्लंडमध्ये जावे लागले. तेथे त्याने आपल्या आयुष्यातील बऱ्याच गोष्टीचे व भावभावनांचे स्पष्ट व यथार्थ असे लिखाण केले. परिणामी, त्याला इंग्लंड देखील सोडावे लागले व शेवटी २ जुलै १७७८ रोजी मानसिक वृत्तीने पछाडलेल्या अवस्थेतच त्याचा मृत्यू झाला. त्याने आत्महत्या केली, असे काहींचे मत आहे. त्याच्या विचारसरणीची फ्रान्सच्या क्रांतिकारकांना प्रेरणा मिळाली. त्या प्रेरणा व स्फुर्तीचा परिणाम म्हणून फ्रेच राज्यक्रांती यशस्वी झाली, असाही विचार पुढे आला. त्याच्या विचारांच्या क्रांती यशस्वी करणाऱ्या क्रांतीकारकांनी त्याचा मृतदेह सन्मानाने पॅरिस येथे आणून त्याला दफन केले.

रुसाने आपल्या आयुष्यामध्ये अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यातील महत्त्वाचे ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत.

१) The Discources on Art's and Science, 1744.

२) The Discources on the origin of Inequality, 1774.

३) An Introduction to Political Economy, 1752.

४) Social Contrat - 1761

५) The Emile - 1762

रुसो यावरती ग्रीक विचारवंताबरोबरच हॉब्ज व लॉक या विचारवंताचा प्रभाव पडलेला आहे. तसेच तत्कालीन परिस्थितीचाही त्याच्यावर प्रभाव होता.

१) **ग्रीक विचारवंतांचा प्रभाव :** प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांच्या विचारांप्रमाणे रुसो मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे, असे मानतो. त्याने कल्पीलेली निसर्गावस्था कितीही चांगली असली तरी परत त्या अवस्थेत जाणे अयोग्य मानून राज्यातच व्यक्तिला विकास करवून घेणे शक्य असल्याचे प्रतिपादन करतो. राज्याचे श्रेष्ठत्व मानल्याचे कारण कायदा नसून नैतिकता आहे, असे प्लेटोचे शब्द त्याच्या आवाजातूनच पुन्हा ऐकावयास येतात, असे म्हटले आहे.

२) **हॉब्ज व लॉकच्या सामाजिक कराराचा प्रभाव :** हॉब्जच्या प्रभावामुळे त्याचे विचार निरंकुश व व्यक्तिवादी स्वरूपाचे व निरंकुश सार्वभौमत्त्वाचे समर्थन केल्याचे निदर्शनास येतो.

३) **तत्कालीन परिस्थिती :** त्याच्या स्वत:च्या घरातील वातावरणाचा व संस्कृतीचा, गरीबीचा त्याच्या लिखाणावर मोठा प्रभाव दिसून येतो. बालपणापासूनच त्याची झालेली अबाळ, विविध प्रवृत्तीची संपर्कात आलेली माणसे त्या सर्वांच्या विचारांचा रूसोवर प्रभाव पडला आहे.

४) **फ्रान्समधील राजकारण :** फ्रान्समधील दुतावासात त्याने केलेले काम त्यादरम्यान त्याचा अनेक व्यक्तिंशी आलेला संपर्क याही गोष्टींचा प्रभाव त्याच्या विचारांवर पडला. 'Emile' या ग्रंथामुळे त्याला जीवन अस्थिर जगावे लागले.

या सर्व घटकाचा त्याच्या जिवनावर प्रभाव होता. यामध्ये भेटलेल्या वेगवेगळ्या लोकांच्यामुळे मनुष्य स्वभावासंबंधीचे विचार स्पष्ट केले आहेत.

मानवी स्वभावाविषयीचे विचार :

'Discources on the origin of Inequality' या ग्रंथामध्ये रुसोने मानवी स्वभावासंदर्भात आपले विचार मांडले आहेत. प्लेटोच्या मते, मानव हा स्वभावत:च चांगला आहे, या विधानाला रुसो मान्यता देतो. मानवी स्वभावाचे सामाजिक कराराच्या दोन पुरस्कर्त्यांनी (हॉब्ज व लॉक) परस्पर विरोधी विचार मांडले आहेत. रुसो हॉब्जप्रमाणे मानवाला स्वार्थी व दृष्ट मानत नाही, तर तो लॉकप्रमाणे माणूस स्वभावत:च चांगला आहे, असे मानतो. समाजाच्या संपर्कामुळे माणूस दुर्गुणी बनला, असे रुसोचे मत आहे.

रुसोच्या मते, मनुष्य स्वभावनिर्मिती मागे दोन प्रेरणा असतात. त्यामध्ये एक आत्मप्रेम किंवा स्वसंरक्षण भावना व दुसरा सहानुभूती किंवा परस्पर सहकार्य होय. रुसो म्हणतो, माणसाचा पहिला कायदा स्वसंरक्षण करणे असून त्याला आपली स्वत:ची काळजी असते. माणसात जर स्वभावत:च ही भावना नसती तर तो प्राचीन काळातच नष्ट झाला असता. आत्मप्रेमामुळेच व्यक्ती आपले संरक्षण करत असते. सहानुभूती व परस्पर सहकार्यामुळे मानवी जीवन सुखी झाले आहे. ही प्रवृत्ती व्यक्तिमध्ये नसती तर संघर्षातून मानवी जीवन जगणे कठीण झाले असते. सहानुभूती व परस्पर सहकार्य हीच भावना कुटुंबाचा आधार असते. माणसाच्या स्वभावाच्या आत्मप्रेम व सहानुभूती या दोन मूळ प्रवृत्ती असून इतर भावनांची निर्मिती या प्रवृत्तींवर आधारित असते. रूसोच्या मते, या दोन्ही भावनामध्ये कधी कधी संघर्ष होतो. दोन्ही भावना एकाच वेळी संतुष्ट होत नाहीत. अशावेळी मनुष्य करार करायला तयार होतो. या दोन्हींच्या संघर्षातून जी भावना निर्माण होत, त्याला रूसो जाणीव किंवा अंत:करण (Conscience) म्हणतो.

ही भावना शिक्षण किंवा बुद्धीमुळे निर्माण होत नाही. कारण अंत:करण या दोन्हीच्याही अगोदर आहे. ती नैसर्गिक भावना आहे, देणगी आहे. अंत:करण सत्यावर प्रेम करावयास तर असत्याची घृणा करावयास सांगते. सत्कार्याची प्रेरणा देते. ती केवळ एक नैसर्गिक शक्ती आहे. अंत:करणाला सत् असत् यात फरक करता येत नाही. अधिक तपशील सांगताना रुसो म्हणतो, माणूस विवेकाद्वारे समाजात राहूनच आपला संपूर्ण विकास करू शकतो. जोवर माणूस आपल्या विवेक व अंत:करण प्रवृत्तीवर समन्वय साधू शकतो तोपर्यंत तो स्वाभाविक असतो. चांगला असतो. परंतु जेंव्हा विपरीत घडते तेव्हा विकृती निर्माण होते. म्हणजेच असे म्हणता येईल की, मनुष्य स्वभावत:च चांगला आहे. त्याचे अध:पतन होण्यास कारण त्याचे आत्मप्रेम होय. हे आत्मप्रेम दंभामध्ये परिवर्तीत होते. माणसाने विवेकाला दंभापासून दूर ठेवेल. तर तो अत्यंत चांगला व आदर्श राहू शकेल.

४.२.२ निसर्गावस्थावरील विचार :

'Discourses on the Art's and Science' मध्ये रुसोने नैसर्गिक अवस्थेचे वर्णन केले आहे. नैसर्गिक अवस्था व तत्कालीन अवस्था त्याचे तुलनात्मक विचार त्याने मांडले आहेत. नागरी समाजापेक्षा नैसर्गिक अवस्थेतील व्यक्तिला व त्याचा जीवनालाच रुसो श्रेष्ठ मानतो.

निसर्गावस्थेतील माणूस सुखी व आनंदी जीवन जगत होता. सहजीवनाचा आल्हाद त्याला स्वच्छंद फुलपाखरासारखा अनुभवता येई. निसर्गावस्थेतील मानवाचे कुणाशीही भांडण किंवा द्वेष करीत नव्हता. नसत. अशा मानवाला तो उदात्त वनचर (Noble Savage) असे म्हणतो.

नैसर्गिक अवस्था म्हणजे अत्यंत सुखमय अशी स्थिती होय, ते युग म्हणजे सुवर्णयुग होते. रुसो निसर्गावस्थेतील माणूस एकांत, आनंदी व निश्चित जीवन जगत होता, असे गृहीत धरून चालतो. माणसाला भाषा व पोषाख अवगत नव्हती. त्याच्यावर कोणतेही बाह्य बंधन नव्हते. त्याचे जीवन निर्दोष असल्याने आनंदी होते. बुद्धी, विचार आणि संस्कृती ह्यांचा प्रभाव पडल्यामुळे मानवाचे खरे आणि सुखी जीवन नष्ट झाले. बुद्धी आणि विचार यामुळे मानवामानवात अलगपणा निर्माण झाला. संस्कृतीमुळे मानवात संशय, दिखाऊपणा, मत्सर ढोंगीपणा इत्यादिकाची निर्मिती झाली. ज्ञानात वाढ झाल्यामुळे आदराची भावना नष्ट झाली. शास्त्रीय ज्ञानाच्या वाढीबरोबर श्रद्धा घटत गेली. बुद्धीनिष्ट दृष्टिकोन स्विकारला गेल्यामुळे नैतिकेतेचे महत्त्व कमी होत गेले. ह्यासाठी मानवाने आपल्या मूळ निसर्ग अवस्थेमध्ये गेले पाहिजे. म्हणजे मानवाला पुन्हा एकदा मुक्त आणि सुखी जीवन जगता येईल. त्यामुळे रूसो असे सुचवतो की, चुकीच्या ज्ञानाऐवजी योग्य ज्ञान आणि सामर्थ्य कमी न करणारी संस्कृती ह्यांचा अंगीकार यापुढे केला पाहिजे.

नैसर्गिक अवस्थेसारखी उदात्त अशी अवस्था नष्ट का झाली असावी, याबद्दल रुसो म्हणतो, ‘निसर्गावस्थेतील परिवर्तनाचे कारण स्वातंत्र्य व समतेचा ऱ्हास हा होय. विवेकाच्या उदयामुळे आदिम मानवाला स्थिर कौटुंबिक जीवन व्यतित करण्यासाठी खासगी संपत्तीची कल्पना सुचली असावी. रुसो म्हणतो, ज्या माणसाने एखादा भूखंडाभोवती कुंपण घालून हा भूखंड माझा आहे, अशी घोषणा प्रथम केली इतर व्यक्तींनी भाबडेपणाने त्यावर विश्वास ठेवला, तो राजकिय समाजाचा संस्थापक ठरतो, अशा प्रकारे खाजगी संपत्तीच्या उदयामुळे ‘तुझे व

माझे' शब्द अस्तित्वात येऊन माणसाचे आदिम जीवन बदलून गेले.

समाजातील बुद्धीवंतांनी अल्पश्रमात जास्तं संपत्ती प्राप्त करण्याचे उपाय शोधून काढले. परिणामत: समाजात धनिक व निर्धन असे दोन वर्ग उदय झाले. स्थिर कौटुंबिक व्यवस्थेमुळे मित्रत्वाऐवजी शत्रूत्व, सहानुभूती ऐवजी स्वार्थ बळावल्याने जीवन अस्थिर बनले. अशा परिस्थितीत परत निसर्गावस्थेकडे प्रवास करणे शक्य नव्हते. माणसाला नैसर्गिक अवस्थेसारखे चांगले जीवन हवे होते. या कारणामुळे मानवाला सामाजिक कराराच्या माध्यमातून राजकिय समाजाची स्थापना करावी लागली. या करारातून मानवाला निसर्गावस्थेचे जीवन प्राप्त होईल अशी रुसोला आशा होती.

४.२.३ सामाजिक करार (Social Contract) :

'Social Contract' या ग्रंथामध्य रूसोनी सामाजिक कराराचा सिद्धांत मांडला आहे. रुसो म्हणतो की, जन्मत:च मनुष्य स्वतंत्र आहे, मात्र तो बंधनांनी वेढला गेला आहे. 'Man is born free but every where he is bounded in chains'. रूसोच्या मते, निसर्गत: मनुष्य सुखी, समाधानी, शांततेत जीवन जगत होता. ज्यावेळी समाजामध्ये संपत्ती संग्रह करण्याची प्रवृत्ती निर्माण होऊन तुझे-माझे ही भावना निर्माण झाली तेंव्हा समाजातील सुख, शांती लोप पावली. हिंसा, संघर्ष, लूटमार या प्रवृत्तीमुळे अराजकता निर्माण होऊन समाजातील सुख व शांतता संपुष्टात आली. सुखाची जागा कलहाने घेतली. शांतता व सुरक्षितता निर्माण करण्यासाठी एका व्यवस्थेची गरज वाटायला लागली. या गरजेतून समाजामध्ये जो करार झाला तो म्हणजेच सामाजिक करार होय. रूसो जो सामाजिक करार सांगतो त्यानुसार स्वातंत्र्यही राहते आणि अधिकारही निर्माण होतो. निसर्गाव्यवस्थेतील स्वातंत्र्य कराराने नष्ट होत नाही. असंख्य व्यक्ती व्यक्ती समूहाबरोबर करार करतात. या करारातून समाज निर्माण होतो. रूसोच्या मते, समाजातील प्रत्येकजण सामूहिक इच्छेच्या सर्वोच्च नियंत्रणाखाली आपले सर्व अधिकार समर्पित करतो आणि सामुदायिक एकत्वाचा अविभाज्य घटक या नात्याने त्याचा परत स्विकार करतो. अशाप्रकारे निसर्गावस्थेतील प्रत्येक माणूस समाज घटकाचा एक भाग बनतो आणि सदस्य म्हणून नैतिक समाजाची निर्मिती करतो. रूसोंनी सांगितलेल्या करारामध्ये दोन बाजू आहेत. व्यक्ती करार करताना एक व्यक्ती असतो व दुसऱ्या बाजूला समाज असतो. सर्वजण व्यक्तिगत सर्वांसाठी आपले अधिकार समर्पित केल्यामुळे कुणीही कुणाच्या अधिन नसतो. वास्तविक प्रत्येकजण पूर्वीइतकाच स्वतंत्र असतो. करारामुळे व्यक्तीला वास्तवरित्या काहीच गमवावे लागत नाही. उलट नैसर्गिक अधिकाराची हमी संरक्षण व सहकार्य या गोष्टी प्राप्त होतात. रूसोच्या सामाजिक करारामुळे सर्व व्यक्तीच्या आपले सत्व समाजार्पण करण्याच्या निर्णयामुळे, एक नैतिक आणि सामाजिक समाज निर्माण होत असतो. या समाजाला स्वत:चे व्यक्तीत्व आणि इच्छा असते. ही इच्छा म्हणजेच सामूहिक ईहा होय. रूसो म्हणतो की, व्यक्ती आपले स्वतंत्र एका एका व्यक्तीला अर्पण न करता सर्व समाजाला अर्पण करीत असतात. त्यामुळे जे दिले जाते त्यापेक्षा जास्तच मिळत असतो. कारण जे स्वत: जवळ असते, त्याचे ती व्यक्ती उत्तम पद्धतीने रक्षण करू शकते. There is gained the equivalent of what is lost, with greater power to preserve what is left. एकूणच रूसोच्या सामाजिक करारामध्ये व्यक्तीला दोन भूमिका कराव्या लागतात. अशा प्रकारे सामाजिक करार महत्त्वाचा आहे. त्याची वैशिष्ट्ये

पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) **सर्वांना समानतेची निश्चिती :** करारातील सर्व सभासद आपले व्यक्तीत्व व सर्व अधिकार पूर्ण समाजाला समर्पित करतात. त्यामुळे सर्वजण एकाच पातळीवर कार्य करतात. समाजातील कोणालाही विशेषाधिकार असत नाहीत. सामाजिक संस्थेकडे सर्वश्रेष्ठत्व असते आणि प्रत्येक व्यक्ती त्या संस्थेची समान भागिदार असते.

२) **स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी :** जन्मत: माणूस स्वतंत्र असून तो सर्वत्र बंधनात आडकलेला आहे, असे रुसो सांगतो. नैसर्गिक अवस्थेत माणूस स्वतंत्र होता. पुढे विवेकाच्या उदयाने परिस्थिती अराजक बनली. सक्तीच्या आधारावर दुर्बलांवर जुलूम व्हावयास लागला. त्यामुळे स्वसंरक्षण व स्वातंत्र्य उपभोगल्यास सुविधा म्हणून कराराचे अस्तित्व आहे. सर्वजण नियम पालन केल्यानेच स्वतंत्र राहणार आहेत.

३) **सअवयवी (सिंद्रीय) राज्य निर्मिती** (Organic State) **:** सामाजिक कराराद्वारे निर्मित राज्य हे एक जिवंत प्राण्यासारखे असते. संपूर्ण शरीरामुळे निरनिराळ्या अवयवांना महत्त्व असते व अस्तित्व असते. तसे राज्यामुळे व्यक्तींना अस्तित्व असते. व्यक्ती आपल्या सुखी जीवनाची, प्राप्ती केवळ राज्यातच करू शकते. या संदर्भात सेबाईन रुसोचे आधारभूत तत्त्व माणूस नसून नागरिक आहे आणि राजकीय नियंत्रण मूलत: नैतिक असून विधी किंवा व्यवस्था त्याचा दुय्यम पैलू आहे, असे म्हणतो.

४) **अधिक अधिकारांची प्राप्ती :** सामाजिक कराराची शब्दरचना अशा प्रकारची आहे ज्यात व्यक्तीला काही ही गमवावे लागत नाही. नैसर्गिक अधिकार व स्वातंत्र्य समाजाचा एक घटक म्हणून परत मिळते. सोबतच शांतता व सुरक्षीतता या दोन गोष्टींची प्राप्ती होते.

५) **समूहाला अधिकार बहाल :** रुसो नैसर्गिक अधिकार एका व्यक्तीकडे देत नाही तर ते संपूर्ण समाजाला बहाल करतो. व्यक्ती एकाच वेळी राज्याची सदस्य व सार्वभौम अधिकार धारण करणारी व्यक्ती असे दुहेरी व्यक्तीत्व रुसो देताना दिसतो.

६) **कराराचे सातत्य :** करार हा एकदाच घडलेली प्रक्रिया आहे असे रुसो मानत नाही तर ती सतत चालणारे आहे, असे म्हणतो. राज्याचा नागरिक म्हणून व्यक्ती सामूहिक इहेत भाग घेऊन कार्यास सहमती दर्शविते.

७) **सामुहिक इहेची निर्मिती :** सामुहिक इहा हा रुसोच्या सामाजिक कराराचा महत्त्वपूर्ण भाग अर्थात गाभा आहे, असे मानतो.

रुसोचा ग्रंथ प्रसिद्ध होण्यापूर्वी डेव्हिड ह्युम याने राजा आणि प्रजा ह्यांचे संबंध कराराने ठरतात, हे इतिहासाशी विसंगत असल्याचे स्पष्ट केले होते. सर हेन्री मेन याने रुसोचा सिद्धांत अर्थशून्य असल्याचे सुचविले तर वुल्सी याने तो सर्वस्वी खोटा आहे असे सांगितले. सर फ्रेड्रीक पोलॉक यांच्या मते, सामाजिक कराराबाबतचा सिद्धांत म्हणजे, 'राजकिय क्षेत्रातील अनेक फसवणूकीपैकी अत्यंत यशस्वी आणि घातक ठरलेली अशी फसवणूक आहे.' जर्मन राज्यशास्त्रज्ञ ब्लंटश्ली याने, 'राज्य आणि राज्यातील संख्या व्यक्तीच्या लहरींवर

आधारलेल्या असतात,' असे या सिद्धांताचे प्रतिपादन केलेले असल्यामुळे तो अत्यंत घातक आहे, असे मत व्यक्त केलेले आढळून येते.

सामाजिक करारामधील मुख्य दोष खालीलप्रमाणे दिसून येतात.

१) इतिहासामध्ये असे एकही उदाहरण दाखविता येत नाही की, ज्या ठिकाणी राज्य करार करत स्थापन करण्यात आले.

२) पूर्वीच्या काळी कुटुंबाला महत्त्वाचे स्थान दिले जात असे, व्यक्तींना नाही.

३) प्राचीन काळी करार ही कल्पना अस्तित्वात नव्हती. ती अलीकडील काळातील संकल्पना आहे.

४) प्रत्येक करार हा करार करणाऱ्या व्यक्तीवर बंधनकारक असतो. त्याच्या वंशजावर नाही.

५) व्यक्ती जन्मत:च राज्याची नागरिक असते. राज्य आणि राज्यव्यवस्थेतील व्यक्ती याचे संबंध ऐच्छिक स्वरूपाचे नसतात.

६) निसर्गावस्थेत हक्क असू शकत नाहीत. ते निर्माण होण्यासाठी समाज आणि कायदा ह्यांची आवश्यकता असते.

७) एकाच व्यक्तीने दोन भूमिका स्विकारून करार केला, हे मान्य न होण्यासारखे आहे.

रुसोच्या विचारसरणीत अनेक संदिग्ध विचार असली तरी देखील ऐतिहासिक काळात या सामाजिक करार सिद्धांताने उपयुक्त कार्य केले आहे, हे मान्य करावे लागेल. राज्य मानवनिर्मित असून ते कराराने निर्माण झालेले आहे. हे क्रांतिकारक तत्त्व मांडून या सिद्धांताने राज्य ईश्वरनिर्मित आहे, या सिद्धांताला नाकारले. राजकीय तत्त्वज्ञानावर धार्मिक संकल्पनांचा वाढता प्रभाव देखील रुसोच्या सामाजिक करार सिद्धांताने रोखला असेच म्हणावे लागेल. रुसोने एकच करार केला आणि त्यामुळे समाज आणि राज्य स्थापन झाले, असे स्पष्ट करून शासन संस्थेशी अगर सरकारशी दुसरा करार झाला नाही. सार्वभौम राजा हा करारातील एक पक्ष नसतो तेंव्हा साधनसंस्थेची सत्ता सामाजिक इहाही केव्हाही काढून घेऊ शकते, असे मांडून जनतेचे सार्वभौमत्त्व आहे ती लोकशाहीचा पुरस्कार केला यामुळे रुसोच्या विचारसरणीला महत्त्व प्राप्त झालेले आहे.

जुलमी राजसत्तेविरुद्ध लढा देणाऱ्यांच्या हातात एक वैचारिक साधन मिळवून देण्याचे आणि जुलमी राजसत्तेविरुद्ध क्रांती करण्याचा जनतेला हक्क असतो, असे स्पष्टपणे भांडण्याचे कार्य रुसोने केले. या दृष्टीने त्याच्या एकूण विचाराचे महत्त्व मान्य करावे लागेल.

४.२.४ रुसोचा सामुहिक ईहेचा सिद्धांत (Theory of General Will) :

रुसोची सामुहिक ईहा आधुनिक राज्यशास्त्राला लाभलेली एक महत्त्वाची देणगी आहे. रुसोच्या राजकीय तत्त्वज्ञानाची उभारणी सामुहिक ईहा या कल्पनेवर आधारलेली आहे. त्याच्या सामाजिक ईहेच्या सिद्धांताने राजकीय विचाराच्या क्षेत्रामध्ये एक परस्परविरोधी वळण घेतले. लोकशाही समर्थकांनी या सिद्धांताला लोकशाहीचा

पाया मानले तर निरंकुश शासकांनी याच सिद्धांताच्या आधारावर मनमानी केली. सामाजिक करार करत असताना व्यक्ती आपले सर्वस्व संघटीत अशा समुदायाच्या सार्वत्रिक हितबुद्धी किंवा सामाजिक ईहेला अर्पण करीत असते. प्रत्येक व्यक्तीच्या मनात दोन प्रकारच्या इच्छा असू शकतात. ज्यावेळी व्यक्ती स्वहितावर नजर ठेवून समाजहिताकडे दुर्लक्ष करते अगर अतिशय संकुचीत असा दृष्टिकोन स्विकारून स्वार्थी बनते त्यावेळी ती ईच्छा व्यक्तीनिष्ठ असते. याउलट व्यापक आणि विशाल अशा दृष्टिकोनातून समाजहिताचा विचार करीत असते आणि स्वार्थत्याग करण्याची तयारी दर्शविते. त्यावेळी ती इच्छा समाजनिष्ट अशी होते. ही इच्छा खरी किंवा योग्य असते. कारण ती विवेकावर आधारलेली असते, केवळ भावनाधारित नसते.

सर्व व्यक्तींच्या समाजनिष्ठ इच्छांचे संपूर्ण एकीकरण झाले असता जी सार्वजनिक हितबुद्धी निर्माण होते तिला सामूहिक ईहा असे म्हणतात. अशी सामाजिक ईहा ही सार्वभौम असते. सामाजिक अगर सामूहिक ईहा म्हणजे समाजातील सर्व व्यक्तीच्या इच्छांची गोळा बेरीज अगर त्यापैकी बहुतेकांनी मान्य केलेली तडजोड ही नव्हे, कारण असे बहुमत स्वार्थीपणामुळे अज्ञानामुळे अगर अविचारामुळे प्रस्थापित झालेले असेल, अशा इच्छेला सर्वांची इच्छा (well & all) अगर ईहा म्हणता येईल. परंतु त्यास सामाजिक ईहा म्हणता येणार नाही. सामाजिक ईहा होण्याकरिता व्यापक समाजहित साधण्याची दृष्टीने तसा निर्णय घेतला गेला पाहिजे. अशी सामाजिक ईहा नेहमीच बरोबर असते आणि तिच्यामुळे नेहमी सार्वजनिक हित साधले जाते, असे मत रुसोने मांडले आहे...

व्यक्ती व्यक्तीमध्ये हिताबाबत संघर्ष निर्माण होत असल्याकारणाने आणि भावनाप्रधान इच्छेच्या आहारी जाऊन व्यक्ती विवेक सोडून देते आणि त्यामुळे व्यक्तींच्या इच्छेला सामूहिक इहेचे स्वरूप प्राप्त होऊ शकत नाही. परंतु ज्या बाबतीत असा संघर्ष होत नसतो आणि ज्या इच्छांमुळे सर्वांचे हित साध्य होत असते ती सामूहिक अगर सामाजिक ईहा असते, अशी सामुहिक ईहा सर्वांचे हित साध्य करीत असल्यामुळे ती सार्वभौम असते.

सामुहिक ईहा सर्वांचे हित व्यक्त करीत असते. परंतु ती संख्येवर अवलंबून नसते. गुणवत्तेवर असते सर्वांच्या हिताच्या दृष्टीने विचार केला असता एका व्यक्तीची इच्छा अगर काही थोड्या व्यक्तीची इच्छा ही सामूहिक ईहा होऊ शकते. याउलट बहुसंख्य लोकांनी, एवढेच नव्हे तर सर्व लोकांनी, समाजहित विरोधी इच्छा एकमताने प्रदर्शित केली तरी ती सामुहिक ईहा होणार नाही. सामुहिक ईहा ही सर्वांचे कल्याण अगर हीत साध्य करत असल्यामुळे अशा ईहेच्या आज्ञेचे पालन करणे हे सर्वांचे नैतिक कर्तव्य ठरते आणि अशा आज्ञांचे पालन आवश्यक झाल्यास सक्तीने करून घ्यावे लागते. नैतिक कर्तव्य केल्यानेच स्वातंत्र्य टिकू शकते.

सामुहिक ईहाच खऱ्या अर्थाने कायदे करू शकते. कायद्याची भूमिका सर्वांना समान मानण्याची असते, असे कायदे सर्वांनी पाळण्यामुळेच खरे स्वातंत्र्य सर्वांना उपभोगता येते. कायदेमंडळाचे निर्णय सर्वानुमते अगर एकमताने व्हावे, असे वाटत असले तरी ते होतीलच असे नाही. परंतु बहुसंख्य सभासदांची अगर लोकांची वृत्ती समाजहित करण्याची असल्यामुळे त्यांनी घेतलेले निर्णय हे सामुहिक हित साधणारे आहेत, असे मानून ते निर्णय मान्य नसणाऱ्या इतरांनी त्यांचे पालन करावयाला पाहिजे आणि तसे पालन झाले नाही तर तसे पालन सक्तीचे

करवून घेतले पाहिजे.

रुसोने सामुहिक ईहेला सार्वभौम मानले आहे. ती राज्याचा आधार आहे व जनमत निहीत असते. सामुहिक ईहेचे पालन करणे सर्वांचे कर्तव्य असते. कारण त्याशिवाय स्वातंत्र्याचे रक्षण करणे अवघड जाईल.

सामुहिक ईहाच्या संकल्पनेचे टिकात्मक परिक्षण :

१. सामुहिक ईहेची कल्पना अस्पष्ट आहे. ती कल्पना तात्त्विक आणि काल्पनिक स्वरूपाची असल्या कारणाने ती निश्चितपणे कोठे आहे, हे ठरविता येत नाही. सामुहिक ईहा ही नेहमी बरोबर असते. तसेच सर्वांचे कल्याण हेच तिचे उद्दिष्ट असते, हे मान्य केले तरी एखादी इच्छा ही सामुहिक आहे की नाही? हे ठरवायचे कसे? आणि कोणी ठरवायचे?

२. सामुहिक ईहा सर्वांचे कल्याण साध्य करू इच्छित असती तरी सार्वजनिक हित आणि सर्वांचे कल्याण ह्या बाबतीत व्याख्या करता येत नाही आणि प्रत्येक व्यक्ती आपल्या मताप्रमाणे त्याबाबतचा अर्थ लावू शकेल. शासनकर्ते तर ते, जे धोरण स्वीकारतात ते कल्याणकारीच असते असे म्हणत असत.

३. रुसोने व्यक्तीस संपूर्ण स्वातंत्र्य असावे, असे प्रतिपादन केले असले तरी सामाजिक ईहेचे आदेश तक्रार न करता पाळले पाहिजेत अगर सक्तीने त्यांचे पालन करवून घेतले पाहिजे, असेही म्हटले आहे. एवढेच नव्हे तर त्यामुळेच व्यक्तीचे स्वातंत्र्य टिकू शकेल, असेही सुचविले आहे.

४. सामुहिक देश सर्वसमावेशक आणि सर्वश्रेष्ठ असल्यामुळे धर्मसंस्था, राजकीय पक्ष, सांस्कृतिक मंडळ यासारख्या संस्थांचे स्वातंत्र्य मर्यादित होऊन सर्वंकष राज्याची निर्मिती होऊ शकेल.

५. सामुहिक ईहा ही प्रत्यक्षात सामुहिकही नसते आणि ईहाही नसते कारण ती सामुहिक असल्यास ईहा होणार नाही आणि ईहा असल्यास सामूहिक अगर सामाजिक होणार नाही. रुसोच्या सामुहिक ईहा या संकल्पनेमध्ये जरी काही प्रमाणात दोष दिसत असले तरी त्यामुळे त्याचे महत्त्व कमी होत नाही. राजकिय विचारामध्ये त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या सिद्धांताने राज्याचा हेतू संपूर्ण जनतेचे कल्याण आहे. व्यक्ती हितापेक्षा सामाजिक हिताला अधिक महत्त्व असते. राज्य एक नैतिक संघटन आहे आणि सार्वभौम जनतेमध्ये विहीत असते असे अनेक पैलू दाखविले आहेत. लोकसत्ताक पद्धतीचा पाया घालणारा व फ्रान्स राज्यक्रांती प्रवाहित करणारा हा सिद्धांत ठरला आहे. राष्ट्रवादी प्रवृत्ती फोफावल्यास मदत झाली. ग्रीन व हेशेल यांच्या लिखाणावर रुसोच्या विचारांचा ठसा उमटलेला दिसतो.

४.२.५ रुसोचे सार्वभौमत्त्वाचे विचार :

सामाजिक कराराच्या माध्यमातून स्थापन झालेला समाज हा सार्वभौम असतो. अशा सार्वभौम राज्याची ईहा म्हणजे ही सामाजिक ईहा सार्वभौम असते. सामाजिक करारात सार्वभौम या संकल्पनेचे विश्लेषण आले आहे. सार्वभौमत्त्व हे अविभाज्य असल्यामुळे त्याची विभागणी करता येत नाही. सार्वभौमत्त्वाची विभागणी केल्यास विशिष्ट ईहा निर्माण होऊन सार्वभोमत्व नष्ट होईल. तेव्हा एकतर सामुहिक ईहा असेल किंवा ती

असणार नाही, परंतु या दोन स्थितीमधील परिस्थिती अगर पर्याय राहू शकत नाही. सामुहिक ईहा म्हणजे सार्वभोमत्त्व हे दुसऱ्याला देता येत नाही. सार्वभौमत्त्वाचे प्रतिनिधित्व इतरांमार्फत करता येत नाही. सर्व लोक एकत्र येऊन कायदे करतात तेंव्हा जनता सार्वभौम असते. रुसोची सार्वभौमत्त्वाची संकल्पना ग्रीसमधील नगरराज्याच्या आधारावर म्हणजे प्रत्यक्ष लोकशाहीच्या संदर्भात लिहिलेली आहे. सध्याच्या आकाराने मोठ्या राज्यांना रुसोची सार्वभौमत्त्वाची संकल्पना लागू होणे अवघड आहे. तरी देखील ती पूर्णतः अस्विकारार्ह नाही.

बहुसंख्य लोकांच्या प्रतिनिधींना जी भूमिका अगर दृष्टिकोण बरोबर वाटेल तो स्विकारतील आणि त्यानुसार कायदे करतील. सार्वभौम सत्तज्ञ काहीच चुकत नाही. ती सर्व लोकांच्या हिताच्या दृष्टीने जे योग्य असते तेच करीत असते. सामाजिक ईहा एखादेवेळी फसू शकेल पण ती चूक असणार नाही. अर्थात, सार्वभौम सत्ता सर्वांचे हित साध्य करीत असल्यामुळे सामाजिक ईहा चूक करण्याची शक्यताच नसते. रुसो असेही म्हणतो. सार्वभौमत्त्वावर पुरणाऱ्या मर्यादांचा उल्लेख रुसाने केला आहे. त्यामध्ये १) सर्वांच्या हिताचे असेल असे काहीही सार्वभौम सत्ता करू शकत नाही. ("Sovereign cannot do what is not for the general welfare."-- Rosseau).

२) व्यक्तिच्या हितासाठी सार्वभौम सत्ता काहीही करू शकणार नाही. ह्याबाबात असा प्रश्न उपस्थित केला गेला की, व्यक्तीच्या हक्कामुळे सार्वभौमसत्तेवर आक्रमण होणार नाही काय? ह्या संदर्भात रुसोने परस्पर असे विधान केले आहे. तो म्हणतो, सार्वभौम सत्तेला व्यक्तीच्या बाबतीत अनियंत्रित सत्ता करारानुसार मिळते. त्याच संदर्भात पुढे तो असेही म्हणतो की, व्यक्तीने सामाजिक करार करताना समाजाच्या दृष्टीने जेवढी सत्ता मालमत्ता आणि स्वातंत्र्य उपयोगी ठरते अगर फायदेशीर ठरते तेवऐच समाजाला दिलेले आहे. परंतु यानंतर रुसोने असा खुलासा केला आहे की, त्या फायद्याबाबतचा निर्णय सार्वभौमाने घ्यावयाचा आहे, असेही ठरलेले आहे.

याचा अर्थ असा की, सार्वभौमत्त्व प्रस्थापित झाल्यावर व्यक्तीहित शिल्लक राहत नसल्यामुळे तो प्रश्नच उद्भवत नाही.

३) आणखी एक महत्त्वाची सार्वभौमत्त्वावरील मर्यादा अशी की, सार्वभौम सत्तेने सर्वांना समान वगणूक दिली पाहिजे, कायद्याच्या पुढे स० समान मानले पाहिजे. सर्वांना एकच नियम लागू केला पाहिजे आणि सर्वांवर समान प्रमाणात करारांचा भार पडेल, अशी व्यवस्था केली पाहिजे.

वरीलप्रमाणे रुसोच्या सार्वभौमत्त्वाच्या विचारांची मर्यादा आहे.

४.२.६ राज्य आणि शासनसंस्था विषयक रुसोचे विचार :

''सामाजिक करारानुसार ज्या संपूर्ण समाजामध्ये सार्वभौम सत्ता अगर सर्वोच्च सामाजिक ईहा निर्माण केली जाते तो समाज म्हणजे राज्य होय.'' अशी मांडणी रुसोने केली आहे. ("Community as a whole, created by social pact and manifesting itself in the supreme general well.")

सरकार अगर शासनसंस्था म्हणजे समाजाने सार्वभौमसत्तेची इच्छा अमंलात आणण्यासाठी ज्या व्यक्तीला अगर व्यक्ती समुहाला अधिकार दिलेला असेल, अशी व्यक्ती अगर व्यक्तीसमूह होय. सरकार अगर शासनसंस्था करारानुसार निर्माण होत नाही तर सार्वभौम सत्तेच्या आदेशानुसार, होत असतो. याचा अर्थ रुसो सरकार म्हणजे कार्यकारी विभाग असे समजतो. कार्यकारी मंडळाला राजा, शाासनअधिकारी अगर इतर कोणतेही नाव दिले तरी त्याने सार्वभौम सत्तेने जी कामे दिली असतील ती करावयाची असतात आणि जेवढे अधिकार दिलेले असतील. तेवढेच वापरायचे असतात. ते कमी करणे, रद्द करणे इत्यादी बाबतची सत्ता सार्वभौमालाच असते.

रुसोने शासनसंस्थेचे जे चार प्रकार सांगितले आहे ते असे - राजेशाही, महाजनशाही, लोकशाही आणि मिश्र प्रकार. लोकशाही म्हणजे असा प्रकार की, ज्या प्रकारात सर्व लोकांची सभा अगर सार्वभौम सभा शासनविषयक कार्ये प्रत्यक्षरित्या करीत असते. लहान राज्यात शासनसंस्थेची सर्व कामे अशा प्रकारे लोकांकडून प्रत्यक्षरित्या केली जाऊ शकतात. त्याने कोणता प्रकार चांगला व योग्य याविषयी स्पष्टपणे काही सांगितले नाही. विशेष परिस्थितीमध्ये विशिष्ट प्रकार योग्य ठरतो, असे त्याने म्हटले आहे आणि कोणते सरकार चांगले, याची कसोटी त्याने सांगितली आहे. ती खालीलप्रमाणे -

''कोणतेही बाह्य प्रयत्न न करता अगर बाहेरून लोक न आणता, आणि वसाहती नसताना जर नागरिकांची संख्या वाढत असेल तर ते सरकार चांगले आणि घटत असेल तर वाईटच. ("That under which people is decreasing and dging out is the worst." -- Raouseau.)

कायदे करणे हे काम सार्वभौम समाजाचे असते म्हणून ते सर्व लोकांच्या संमतीने केले पाहिजे. सरकाराला ते करता येणार नाही. सामुहिक इहा दुसऱ्याला देता येणार नाही. ह्याचे कारण असे की, ''सैनिक राष्ट्राला गुलाम बनवितात आणि प्रतिनिधीक लोकशाही म्हणजे राजकीय ऱ्हासाचा पुरावाच आहे, असे रुसो म्हणतो. ह्याचे कारण सांगताना रुसो म्हणतो की, ''सैनिक राष्ट्राला गुलाम बनवितात आणि प्रतिनिधी राष्ट्राची विक्री करतात.' एखादे काम करण्यासाठी प्रतिनिधी नेमावा परंतु प्रतिनिधींच्या हाती सर्वोच्च सत्ता दिली जाऊ नये. ह्या संदर्भात रुसोने ब्रिटनमधील प्रतिनिधीक लोकशाही बाबात आपले मत व्यक्त केलेले आहे. त्याच्या मते, ''इंग्लिश लोक असे समजतात की, आपण स्वतंत्र आहोत. परंतु ते चुकीचे आहे. पार्लमेंट सभासदांच्या निवडणुकीच्या काळात ते स्वतंत्र असतात. सभासद निवडले गेले की ते गुलाम होतात आणि शून्यवत बनतात.''

("It's free only during the election for members of Parliament; as soon as they are elected the people are ensalved and becomens a zero." - Rausseau.)

मोठ्या राज्यात कितीही अडचणी आल्या तरी सर्व लोकांकडून फायदे केले जाते, हेच योग्य असते.

रुसोच्या मते, फक्त सामाजिक करार करण्याच्या वेळी सर्वांची मान्यता अगर एकमत आवश्यक होत असते. परंतु यानंतरचे निर्भय एकमताने झाले नाहीत तरी चालू शकते. असे निर्णय बहुमताने घेतले गेले असले तरी ते सर्वांच्या हितासाठी घेतले गेलेले असल्याने अल्पमतवाल्यांनी ते मान्य केले पाहिजेत. अल्पमतवाले

त्यामुळे गुलाम ठरत नाहीत, फक्त समान हित कशात आहे, हे त्यांच्या लक्षात आले नाही एवढेच म्हणता येईल. "The Citizen who is in minority is not a slave but only a poor Guener." --- Rausseau.

रुसोच्या विचारांचे मूल्यमापन :

रुसोच्या विचारांवर बरीच टिका झालेली आहे. परंतु त्याच्या मांडणीतील विविध संकल्पना आजही प्रस्तुत आहे. परंतु एकूणच राजकीय व्यवस्थाविषयक दृष्टिकोन हा महत्त्वपूर्ण आहे हे लक्षात घ्यावे लागेल. 'सामाजिक करार' 'Social Contrat' हा रुसोचा राजकीय तत्त्वज्ञातील महत्त्वपूर्ण ग्रंथ होय. सामाजिक करारामधून राज्य निर्माण झाले, यासंदर्भात हॉब्ज व लॉक यांनी वेगवेगळी मते मांडली होती. रुसोने दोघांचा समन्वयात्मक विचार म्हणजे सामुहिक 'ईहेचा सिद्धांत' मांडला. हा सिद्धांत म्हणजे त्याने राज्यशास्त्राला दिलेली एक नवी देणगीच आहे, असे मानले जाते. त्याचा या विचारांची प्रेरणा पुढील अनेक विचारवंतांनी घेतली ज्यात हेगेले, ग्रीन यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

सरकार आणि राज्य यामध्ये सुस्पष्ट फरक रुसोने केला व जनतेला शासनाला विरोध करण्याचा अधिकार दिला. राज्याला विरोध करता येत नाही. नवराज्य व्यवस्था आणि प्रत्यक्ष लोकशाही महत्त्वाची मानली. प्रतिनिधीक लोकशाहीस विरोध केला. परंतु सामान्य इच्छेने लोकशाहीचा पाया घालून कल्याणकारी निर्माण केली.

रुसोच्या विचाराने राष्ट्रवादी प्रेरणा निर्माण केली. त्याचे धर्म व शिक्षण विषयक विचार क्रांतिकारी होते. रुसो सामुहिक ईहेच्या सिद्धांताने राष्ट्र राज्यासंबंधीच्या विचारांचे समर्थन करतो, असे डमींग यांना वाटते. याच सिद्धांताने आदर्शवाादाचा विचार विकसीत केला. व्यक्तीला केंद्रस्थानी मानून शासनसंस्थेला साधन मानले. व्यक्तिहिताला कनिष्ट मानून समाजहिताला श्रेष्ठत्व दिले. समता, स्वातंत्र्य व कायदा यांची सांगड घातली.

रुसोच्या विचारांत विविध छटा सापडतात. त्याच्या सामान्य इच्छेला अनियंत्रीत शासन, लोकशाही शासन, व समाजवादी व्यवस्थेसाठी वेगवेगळ्या विचारांच्या पुरस्कर्त्यांना उचलले आहे. जनतेच्या सार्वभौमत्वाचा पाया त्याने घातला. त्याचे तत्त्वज्ञान असंदिग्ध नाही परंतु सूचक आहे. अनियंत्रीत स्वातंत्र्याचा तो पुरस्कार करीत नाही, पण स्वातंत्र्य अबाधीत ठेवता. रुसोचा सार्वभौमत्त्वाचाा कायदा हा आधुनिक मूलभूत घटनात्मक कराराचा उद्गाता मानता येईल.

४.३ सारांश :

रुसोनी प्लेटो, ॲरिस्टॉटल प्रमाणे मानवी स्वभावासंबंधी मनुष्याचा स्वभाव चांगला असतो, असे स्पष्ट केले तसेच सामाजिक करार करताना हे केवळ एक करार असून व्यक्तीने आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवले आहे. मनुष्य हा निसर्गावस्थेमध्ये सुखी, समाधानी जीवन जगत होता. सामाजिक करारातून स्थापन झालेले राज्य हे सार्वभौम असते. सामूहिक ईहा ही सर्वांची इच्छा या अर्थाने वापरली जाते. सरकार हे सामाजिक करारावर निर्माण होत नाही तर सार्वभौम सत्तेवर आधारित आहे.

४.४ पारिभाषिक शब्द :

१) सामाजिक करार : राज्य स्थापन करण्यासाठी लोक / जनता व राजा यांच्यामध्ये झालेला करार.

२) सामुहिक ईहा : सर्व जनतेची / लोकांची इच्छा

३) सार्वभौमत्त्व : कोणत्याही बाह्य अथवा अंतर्गत घटकांच्या नियंत्रणापासून मुक्त

४) निसर्गावस्था : आधुनिक राज्य स्थापन होण्यापूर्वीची मानवाची अवस्था.

४.५ सरावासाठी स्वाध्याय :

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) रुसोचा जन्म कोठे झाला?

२) रुसोने कोणता सिद्धांत मांडला?

३) रुसोचे मानवी स्वभाव विषयक विचार कोणत्या ग्रंथामध्ये आहेत?

४) रुसोच्या मते, मनुष्य स्वभावनिर्मिती मागे कोणत्या दोन प्रेरणा असतात?

५) निसर्गावस्थेतील मानवाला रुसो काय म्हणतो?

६) रुसोने मांडलेला राज्यविषयक सिद्धांत कोणता?

७) सामुहिक इहा ही वस्तूला कोणत्या स्वरूपाची असते, असे रुसो म्हणतो?

८) रुसोच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा प्रमुख ग्रंथ कोणता?

९) रुसोप्रणीत सामाजिक करार कोणाच्या संमतीवर आधारित आहे?

१०) कोणत्या ग्रंथात रुसोने निसर्गावस्थेचे वर्णन केले आहे?

उत्तरे :

१) जिनेव्हा (स्वित्झर्लंड)

२) सामाजिक करार सिद्धांत

३) Discourses On The Origin of Inequality

४) आत्मप्रेम किंवा स्वसंरक्षण भावना व सहानुभूती किंवा परस्पर सहकार्य

५) उदात्त वनचर (Noble Savage)

६) सामुहिक इहा (General well)

७) सार्वभौम

८) सामाजिक करार (Social Contract)

९) नागरी समाज

१०) Discourses On Arts and Science.

ब) दिर्घोत्तरी प्रश्न :

१) रुसोचे मानवी स्वभावाविषयीचे विचार स्पष्ट करा.

२) रुसोच्या सामाजिक कराराची चर्चा करा.

३) रुसोच्या सामूहिक ईहेची संकल्पना स्पष्ट करा.

४) रुसोचे सार्वभौमत्त्वाविषयीचे विचार स्पष्ट करा.

५) रुसोचे राज्यशासनसंस्था विषय विचाराची चर्चा करा.

४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१) Suda, J. P. (2012) : 'History of Political Though Ancient & Medival', Vol-2, K. Nath & Co. Mercent.

२) गोखले, रा. म. (१९७८) : पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

३) शृंगारपुरे अरविंद (२०००) : 'पाश्चिमात्य राजकीय विचार', मंगेश प्रकाशन, नागपूर.

❍❍❍